।। पूर्ण परमात्मा नम: ।।



# ज्ञान गंगा




* प्रचार प्रसार समिती *

सतलोक आश्रम, हिसार–टोहाना रोड, बरवाला.

जिल्हा– हिसार (हरियाणा).

जगतगुरु तत्वदर्शी संत रामपाल जी महाराज
यांच्या संत्संगाचे संग्रह अनमोल पुस्तक

# "ज्ञान गंगा"

– प्रकाशक –

✻ प्रचार प्रसार समिती ✻

सतलोक आश्रम, हिसार–टोहाना रोड, बरवाला.
जिल्हा– हिसार (हरियाणा).

धर्मार्थ मूल्य = २०/–


## अवश्य पहा

जगतगुरु तत्वदर्शी संत रामपाल जी महाराज
यांचे मंगलमय प्रवचन






## सतलोक आश्रम

सतलोक आश्रम, हिसार–टोहाना रोड, बरवाला, जिल्हा–हिसार
(हरियाणा)

☎ 8222880541, 8222880542, 8222880543,
8222880544, 8222880545

Visit us at : www.jagatgururampalji.org
E-mail: jagatgururampalji@yahoo.com

# अनुक्रमणिका

भूमिका I-XV
१)भक्ति मर्यादा 1
✻ कोणत्या रामाचे नाम जपायचे? 6
✻ नामदीक्षा घेणाऱ्या व्यक्तिंसाठी आवश्यक माहिती 8
२) सृष्टि रचना 20
✻ जीवात्मे कालच्या जाळ्यात कसे फसले? 22
✻ श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी, श्री शिव जी यांची उत्पत्ती 26
✻ काय आहेत त्रिगुण? प्रमाणासहित 27
✻ ब्रह्मची (काल) अव्यक्त राहण्याची प्रतिज्ञा 28
✻ आपला पिताच्या (ब्रह्म/काल) प्राप्तिसाठी ब्रह्माचे प्रयत्न 30
✻ माता दुर्गा देवीकडून (प्रकृति) ब्रह्माला शाप 31
✻ विष्णुचे आपले पिताच्या (ब्रह्म/काल) प्राप्तिसाठी प्रस्थान आणि मातेचा आशीर्वाद प्राप्त करणे 32
✻ परब्रह्मच्या सात संख ब्रह्मांडांची स्थापना 40
✻ पवित्र अथर्ववेदामधील सृष्टि रचनेचे प्रमाण 41
✻ पवित्र ऋग्वेदामधील सृष्टि रचनेचे प्रमाण 46
✻ पवित्र श्रीमद् देवी महापुराणामध्ये सृष्टि रचनेचे प्रमाण 50
✻ पवित्र शिव महापुराणामधील सृष्टि रचनेचे प्रमाण 52
✻ पवित्र श्रीमद् भगवत गीतेमधील सृष्टि रचनेचे प्रमाण 53
✻ पवित्र बायबल आणि पवित्र कुर्आन शरीफमधील सृष्टि रचनेचे प्रमाण 55
✻ पूज्य कबीर परमेश्वरांच्या (कविर् देव) जी अमृतवाणीमधील सृष्टि रचना 57
✻ आदरणीय गरीबदास साहेबजींच्या अमृतवाणीमध्ये सृष्टि रचनेचे प्रमाण 59
✻ आदरणीय नानक साहेबजींच्या वाणीमध्ये सृष्टि रचनेचा संकेत 65
✻ अन्य संतांद्वारे सृष्टि रचनेची दंतकथा 68
३) कोण व कसा आहे विश्वाचा स्वामी? 70
✻ आदरणीय धर्मदास साहेबजी कबीर परमेश्वरचे साक्षीदार 72
✻ आदरणीय दादू साहेब जी कबीर परमेश्वर चे साक्षीदार 73
✻ कविर्देवांचे साक्षी आदरणीय मलूकदास साहेब जी 73

* कविर्देवांचे साक्षी आदरणीय गरीब दास साहेब जी 74
* आदरणीय नानक साहेबजींचे गुरु ग्रंथ साहेब मधील कबीर परमेश्वरचे प्रमाण 75
* प्रभु कबीरजींनी स्वामी रामानंदजींना तत्त्वज्ञान समजाविले 77
४) पवित्र धर्मग्रंथसुद्धा कबीर परमेश्वराचे (कविर्देव) साक्षीदार 86
५) कबीर साहेब चारही युगांत येतात 93
* सतयुगामध्ये कविर्देव (कबीर साहेब) यांचे सतसुकृत नावाने प्रगट होणे 93
* त्रेतायुगामध्ये कविर्देवांचे (कबीर साहेब) मुनिंद्र नावाने प्रगट होणे 97
* द्वापारयुगामध्ये कविर्देव (कबीर साहेब) करुणामय नावाने प्रगट होणे 100
* कबीर साहेबांचे (कविर्देव) कलियुगामधील अवतार 105
६) पूर्ण संताची ओळख 111
* तीन वेळा नामजाप देण्याचे प्रमाण 113
७) संतांच्या विटंबनेची शिक्षा 120
८) भटकलेल्यांना मार्गदर्शन 123
* लग्नाच्या चौदा वर्षांनंतर परमात्म्याने संतान दिले 123
* अद्भुत करिश्मा 124
* परमेश्वराने अशक्य ते शक्य केले 125
* प्रभुंनी गरिबांचे ऐकले 127
* भगवान असावा तर असा 128
* लुटले गेलेल्यांना आधार 129
* संत असावा तर असा 130
* आपल्या भक्ताला धर्मराजाच्या दरबारातून मुक्त केले 132
* पूर्ण परमात्मा साधकाला भयंकर रोगातून मुक्त करून आयुष्य वाढवून देतात 133
* भक्तमती सुशीलाचा डोळा बरा केला 135
* तिन्ही तापाला पूर्ण परमात्माच समाप्त करू शकतो 135
९) कबीर साहेबांचा कालाशी संवाद 140
१०) विश्व विजेता संत (संत रामपालजी महाराज यांच्या अध्यक्षतेखाली हिन्दुस्थान विश्व धर्म गुरु रुपात प्रतिष्ठीत होईल 143
* संत रामपालजींच्या विषयीमध्ये 'नॉस्ट्राडेमस' यांची भविष्यवाणी 143

❋ संत रामपालजी महाराजांच्या समर्थनात अन्य
भविष्यवक्त्यांची भविष्यवाणी 147
❋ संत रामपालजी महाराजांचा संक्षिप्त परिचय 150
११) प्रमाणासाठी पहा फोटो कॉपी 155
१२) यथार्थ ज्ञान प्रकाश 171
❋ पवित्र गीताजीचे ज्ञान कोणी सांगितले? 172
❋ श्रीमद् भगवत गीता सार 179
❋ तीन गुण काय आहेत? प्रमाणासहित 185
❋ वरील पुराणवाक्यांचे सार 187
❋ त्रिगुण माया जीवांना मुक्त होऊ देत नाहीत 187
❋ अन्य देवता (रजोगुणी ब्रह्मा जी, सतगुणी विष्णु जी,
तमोगुणी शिव जी) यांची पूजा बुद्धिहीनच करतात 190
❋ पवित्र चार वेदानुसार साधनेचा परिणाम केवळ
स्वर्ग–महास्वर्गाची प्राप्ति, मुक्ति नाही 193
❋ शास्त्रविधीविरुद्ध साधनेच्या पतनाचे कारण 194
❋ श्राद्ध घालणारे (पितरांची पूजा करणारे) पितरच बनतील,
त्यांना मुक्ति नाही 194
❋ तत्त्वज्ञानाच्या प्राप्तिनंतरच भक्तीचा प्रारंभ होतो 198
❋ गीता ज्ञानदाता ब्रह्मचा इष्ट (पूज्य) देव पूर्ण ब्रह्म आहे 199
❋ ब्रह्मचा साधक ब्रह्म यास व पूर्ण ब्रह्मचा साधक पूर्ण ब्रह्म
यास प्राप्त होतो 200
❋ ब्रह्मची (क्षरपुरुष) साधना अनुत्तम (अश्रेष्ठ) आहे 201
❋ शंका समाधान 204
❋ गादी व महंत परंपरा यांची माहिती 205
❋ पवित्र तीर्थ व धामांची माहिती 207
❋ स्वर्गाची परिभाषा आहे काय? 215
❋ गीता ज्ञानदाता ब्रह्मच्या (काल) उत्पत्तीचा संकेत 222
❋ कबीर साहेबांद्वारे बिभीषण आणि मंडोदरी यांना शरणामध्ये घेणे 224
❋ द्वापार युगामध्ये इंद्रमतीला शरणामध्ये घेणे 227
❋ पवित्र पुराणांचे रहस्य 232
१३) शास्त्रार्थ विषय (वादविवाद) 249
१४) भटकलेल्यांसाठी सत्मार्ग 257

❑❑❑

## ''भूमिका''

अनादि काळापासून मानव परमशांती, सुख व अमृत्व यांच्या शोधार्थ भटकत आहे. ते आपल्या सामर्थ्यानुसार प्रयत्न करीत आलेला आहे, परंतु त्याची ही अभिलाषा आजतागायत अपूर्णच राहिलेली आहे. असे होण्याचे एकमेव कारण म्हणजे की ती अभिलाषा पूर्ण करण्याच्या दिशेने जो मार्ग जातो, त्याचे पूर्ण ज्ञान त्याला आजतागायत माहीत झालेले नाही. सर्व प्राण्यांची इच्छा अशी असते, की कोणतेही कष्ट नसावेत, कर्म नसावे, स्वादिष्ट भोजन मिळावे, सुंदर वस्त्रे परिधान करण्यासाठी मिळावीत, वास्तव्यासाठी आलिशान निवासस्थान असावे, फिरण्यासाठी सुंदर बागबगीचे असावेत, मनोरंजनासाठी मधुर संगीत असावे, नाचावे, गात आनंदाने खेळावे, बागडावे, मौजमस्ती करावी, परंतु कधीही आजारी पडू नये, कधी वृद्धत्व येऊ नये, कधीही मृत्यू येऊ नये. अशा अनेक इच्छा मानवाच्या मनात असतात, परंतु ज्या जगात आपण सर्व जण वास्तव्य करीत आहोत, तेथे असे काहीही आणि कधीही नजरेत येत नाही आणि ते शक्यही नाही, कारण हा मृत्युलोकच मुळी नाशवान आहे. या लोकातील प्रत्येक वस्तू नाशवान आहे. या मृत्युलोकाचा राजा काल-ब्रह्म आहे, जो दररोज एक लाख मानवस्त्री सूक्ष्म शरीरांचे भक्षण करतो. त्याने सर्व प्राण्यांना कर्म-भ्रम आणि पाप-पुण्य रूपी जंजाळामध्ये अडकवून तिन्ही लोकांच्या (स्वर्ग-मृत्यू-पाताळ) पिंजऱ्यामध्ये कैद करून ठेवलेले आहे. कबीरसाहेब आपल्या वाणीमध्ये म्हणतात की :-

''कबीर, तीन लोक पिंजरा भया, पाप पुण्य दो जाल ।
सभी जीव भोजन भये, एक खानेवाला काल ।।
गरीब, एक पापी, एक पुन्यी आया, एक है सूम दलेल रे।
बिना भजन कोई काम नहीं आवै, सब है जम की जेल रे ।।''

त्याची इच्छा होत नाही की कोणीही प्राणी या जन्म-मृत्युरूपी कैदेतून बाहेर निघून जावा. जीवात्म्यांना आपल्या स्वत:च्या वास्तविक सतलोकाचे रहस्य व मार्ग प्राप्त व्हावा, अशीसुद्धा त्याची इच्छा नाही. त्यासाठी त्याने आपल्या त्रिगुणी मायेद्वारे प्रत्येक जीवाला भ्रमिष्ट केलेले आहे. मग मानवामध्ये या इच्छा-अभिलाषा कोठून उत्पन्न झालेल्या आहेत? या मृत्युलोकात तर असे काहीही नाही. प्रत्येकाला मृत्यू अटळ आहे. सर्व जण दु:खी आणि अशांत आहेत. जी आनंदी स्थिती येथे प्राप्त करण्याची आपली इच्छा आहे, त्या स्थितीतच आपण सर्व जीवात्मे आपल्या स्वत:च्या वास्तविक घरी- सतलोकी राहत होतो. तेथून येथे या काल ब्रह्मच्या लोकामध्ये येऊन आपण अडकलो गेलो आणि आपल्या निजघराकडे सतलोकाकडे जाण्याचा मार्ग विसरून गेलेलो आहोत. कबीर साहेब म्हणतात की :-

इच्छा रूपी खेलन आया, तातैं सुख सागर नहीं पाया।

या काल ब्रह्मच्या लोकामध्ये शांती व सुख-समाधान औषधालासुद्धा सापडत नाही. यासाठीच ते आपल्या त्रिगुणी मायेद्वारे प्रत्येक जीवाला काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार, राग-द्वेष, आनंद-दु:ख, नफा-तोटा, मान-अपमान अशा अवगुणांनी सतावत असतो. येथे एक जीव दुसऱ्याचा जीव घेत आहे, शोषण करत आहे, अब्रूवर घाला घातला जात आहे, चोरी-चपाटी, लूटमार होत आहे, दुसऱ्याच्या जीवनातील शांततेचा भंग केला जात आहे. येथे चारही दिशांना आग लागली आहे. आपली सुख-शांतीने राहण्याची इच्छा असली, तरी दुसरे आपणाला तसे राहू देणार नाहीत. आपली इच्छा नसतानाही चोर चोरी करून जातो. दुर्घटना घडतात, शेतकऱ्यांच्या पिकांची नासधूस होते, व्यापारांचा व्यापार ठप्प होत आहे. एखाद्या राजाचे राज्य

हिरावून घेतले जाते, निरोगी शरीरामध्ये आजार उत्पन्न होतात. म्हणजेच येथे कोणतीही वस्तू सुरक्षित नाही. राजाचे राज्य, धनवानाचे धन, अब्रुदाराची अब्रू, ताकदवानाची ताकद, इतकेच नव्हे तर आपल्या सर्वांचे शरीरही अचानक काढून घेतले जाते. मातापित्यांच्या डोळ्यांदेखत तरुण मुला-मुलींना मृत्यू येतो. दूधपित्या, खेळत्या-बागडत्या बालकांना रडत-रडत सोडून मातापित्यांवर मृत्यूचा घाला येतो. तरुण भगिनींच्या पदरात विधवापण येते आणि डोंगराएवढे दुःख भोगण्याशिवाय त्यांच्याजवळ पर्याय नसतो. जरा विचार करा, ही अशी जागा राहण्याच्या लायकीची आहे काय? परंतु आपण नाइलाजाने येथे वास्तव्य करत आहोत. कारण या कालाच्या पिंजऱ्यातून बाहेर पडण्याचा रस्ता आपल्याला दिसत नाही आणि आपल्याला एकमेकाला दुःखी करण्याची व दुःख सहन करण्याची सवयच झालेली आहे. कारण आपल्या सर्वांना स्वतःच्या वास्तविक घराचा, निजघराचा विसर पडलेला आहे. ही परमशांती व वास्तविक सुख येथे या मृत्युलोकात नसून स्वतःच्या खऱ्या घरी- सतलोकी आहे. तेथे जन्म-मृत्यू नाही, वृद्धत्व नाही, दुःख नाही, कोणतेही युद्ध, भांडणे नाहीत, कोणतीही रोगराई नाही, पैशाचा व्यवहार नाही, कोणतेही लाईटचे, पाण्याचे बिल भरावे लागत नाही, कोणतीही मनोरंजनाची साधने खरेदी करावी लागत नाहीत, की इतर कोणत्या अडचणीही येत नाहीत. तेथे सर्वकाही परमात्म्याद्वारे निःशुल्क, अखंड आणि अविरत आहे. बंदी छोड गरीब दासजी महाराज यांच्या वाणीमध्ये प्रमाण आहे, की-

बिन ही मुख सारंग राग सुन, बिन ही तंती तार। बिना सुर अलगोजे बजैं, नगर नांच घुमार।।
घण्टा बाजै ताल नग, मंजीरे डफ झांझ। मूरली मधूर सुहावनी, निसबासर और सांझ।।
बीन बिहंगम बाजहिं, तरक तम्बूरे तीर। राग खण्ड नहीं होत है, बंध्या रहत समीर।।
तरक नहीं तोरा नहीं, नांही कशीस कबाब। अमृत प्याले मध पीवैं, ज्यो भाटी चवैं शराब ।।
मतवाले मस्तानपुर, गली-२ गुलजार। संख शराबी फिरत हैं, चलो तास बजार।।
संख-संख पत्नी नाचैं, गावैं शब्द सुभान। चंद्र बदन सूरजमुखी, नांही मान गुमान।।
संख हिंडोले नूर नग, झूलैं संत हजूर। तख्त धनी के पास कर, ऐसा मुलक जहूर।।
नदी नाव नाले बगैं, छुटैं फुहारे सुन्न। भरे होद सरवर सदा, नहीं पाप नहीं पुण्य।।
ना कोई भिक्षुक दान दे, ना कोई हार व्यवहार। ना कोई जन्मे मरे, ऐसा देश हमार।।
जहां संखो लहर मेहर की उपजैं, कहर जहां नहीं कोई।
दासगरीब अचल अविनाशी, सुख का सागर सोई।।

सतलोकामध्ये केवळ एक रस परमशांती व सुख आहे. जोपर्यंत आपण सतलोकी जात नाही, तोपर्यंत आपण परमशांती, सुख व अमृत्व प्राप्त करू शकत नाही. जेव्हा आपण पूर्ण संतापासून नामोपदेश घेऊन पूर्ण परमात्म्याची आजीवन भक्ती करत राहू, तेव्हाच सतलोकी जाणे संभव आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून आम्ही जो संदेश देऊ इच्छितो, त्यातून कोणत्याही देव-देवता व धर्म यांची अवहेलना न करता सर्व पवित्र धर्मग्रंथांमधील लपलेल्या गूढ रहस्यांना प्रगट करून जी सध्याचे संत, महंत, आचार्य गुरुसाहेब यांना पवित्र शास्त्रामध्ये लपलेली गूढ रहस्ये समजू शकलेली नाहीत तो यथार्थ भक्तिमार्ग सांगितला आहे. कबीर साहेब आपल्या वाणीमध्ये म्हणतात, की- 'वेद कतेब झुठे ना भाई, झूठे हैं सो समझे नांही।।'

ज्यामुळे भक्त समाजाची अपार हानी होत आहे, ज्यामुळे मानसिक शांती मिळत नाही, शारीरिक सुख मिळत नाही किंवा घर अथवा व्यवसायातून लाभ होत नाही, त्यातून परमेश्वराचा साक्षात्कार होत नाही किंवा मोक्षही मिळत नाही असे स्वतःच्या तर्कवितर्कानुसार व गुरूंनी सांगितलेल्या शास्त्राविरुद्ध सर्व जण साधना करीत आहेत. मग हे सुख कसे प्राप्त होईल, तसेच

आपण स्वत: कोण आहोत? आपण नक्की कोठून आलो आहोत? आपल्या जन्म-मरणामागील उद्दिष्ट काय आणि आपण दु:ख का भोगत आहोत? सरतेशेवटी हे सर्व कोण घडवून आणत आहे? वास्तविक परमेश्वर कोण आहे? कसा आहे? तो कसा प्राप्त होईल? ब्रह्मा, विष्णु, शिव यांचे माता-पिता कोण आहेत? काल ब्रह्मच्या तुरुंगातून सुटका करवून घेऊन आपल्या वास्तविक हक्काच्या घरी (सतलोकी) परत जाण्याचा मार्ग कोणता? हे सर्व जाणून घेण्यासाठी या पुस्तकाच्या माध्यमातून हे सर्वकाही सांगण्याचा प्रयत्न केला आहे, जेणेकरून हे पुस्तक वाचल्यानंतर सर्वसाधारण भक्तात्म्यांचे कल्याण होऊ शकेल. हे पुस्तक म्हणजे पूर्ण संत सतगुरू रामपालजी महाराजांच्या तथ्य आणि सत्य यावर आधारित अमृतमय प्रवचनांचा संग्रह आहे. आम्हाला याचा पूर्ण विश्वास आहे, की जे रुची व निष्पक्ष भावाने या पुस्तकाचे वाचन करून अनुकरण करतील. त्यांचे कल्याण होईल :-

'आत्म प्राण उद्धार हीं, ऐसा धर्म नहीं और। कोटी अश्वमेघ यज्ञ, सकल समाना भौर।।
जीव उद्धार परम पुण्य, ऐसा कर्म नहीं और। मरूस्थल के मृग ज्यों, सब मर गये दौर-दौर।।'

भावार्थ :- जर एका आत्म्याला सतभक्तिमार्गावर लावून त्याचे कल्याण केले, तर त्यापासून कोटी अश्वमेध यज्ञांचे फल प्राप्त होते आणि त्याच्या बरोबरीचा दुसरा कोणताही धर्म नाही. जीवात्म्याच्या उद्धारासाठी केले गेलेले कार्य अर्थात सेवेपेक्षा दुसरे कुठलेही कार्य श्रेष्ठ नाही. आपले पोट भरण्यासाठी तर पशू-पक्षीही दिवसभर भटकत असतात. जी व्यक्ती परमार्थी कार्य करत नाही, ती पशू-पक्ष्यांसारखीच आहे. परमार्थी कर्म ही सर्वश्रेष्ठ सेवा असून हे कर्म जिवांच्या कल्याणासाठी केले जाते. जीव कल्याणाचे कार्य न करणारे मानव हे मृगजळाच्या मागे धावणाऱ्या हरिणासारखे पळून-पळून मरून जातात. हरिणाला समोर पाणी असल्याचा भास होत राहतो आणि ते तेथे पळत गेल्यावर तेथे जमीनच असते. त्यानंतर त्याच्या पुढेही त्याला पाण्याचा भास होतो. तेथेही तसेच घडते आणि पाणी न मिळाल्यामुळे हरीण पाण्याअभावी तडफडून मरून जाते. ज्या काललोकात आपण राहत आहोत, तेथील प्राणी हरिणासारखाच विचार करतात. निःसंतानाला अपत्यप्राप्तिची ओढ लागते, तर ज्यांना मूलबाळ असते, त्यांच्या वेगळ्याच समस्या ऐकायला मिळतात. निर्धन व्यक्ती पैसा मिळवून सुखी होण्याचा प्रयत्न करतात, तर धनाढ्य माणसाला विचारले तर त्याच्या अनेक समस्या ऐकायला मिळतात. एखादा राज्यप्राप्तित सुख मानत असेल तर ती त्याची मोठी चूक आहे. राजाच्या (मंत्री, मुख्यमंत्री, प्रधानमंत्री, राष्ट्रपती) स्वप्नातही सुख असत नाही. चार-पाच जणांच्या कुटुंबाचा प्रमुखही परिवाराच्या चिंतेने ग्रासलेला असतो. राजे लोक दारू पिऊन दुःख विसरायला बघतात. माया गोळा करण्यासाठी जनतेकडून कर वसूल करतात आणि जे राजे सत्यभक्ति करत नाहीत, ते पुढच्या जन्मी पशूचा जन्म घेऊन कर घेतलेल्या प्रत्येक व्यक्तिचे कर्ज फेडत बसतात. ज्या व्यक्ति मनमानी आचरण करतात किंवा भोंदू गुरूंकडून दीक्षा घेऊन भक्ति किंवा धर्म करतात, ते विचार करतात, की भविष्यात सुखी होईन, पण सुख दूरच, त्यांना दुःखच प्राप्त होते. त्याचप्रमाणे कबीर साहेब म्हणतात, की माझे हे ज्ञान असे आहे, की जर एखादा ज्ञानी पुरुष असेल, तर ते हे ऐकून ह्दयात सामावून घेईल आणि जर ते मूर्ख असेल, तर ते त्याच्या आकलन शक्तिच्या बाहेरचे असेल.

'कबीर, ज्ञानी हो तो ह्दय लगाई, मूर्ख हो तो गम ना पाई'

'ज्ञान गंगा' हे पुस्तक वाचून सुप्रीम कोर्टाचे वरिष्ठ अधिवक्ता श्री. सुरेश चंद्र यांनी सांगितले आहे, की या पुस्तकाचे नाव 'ज्ञान सागर' ठेवायला पाहिजे. अधिक माहिती 'ज्ञान गंगा' या पुस्तकातून घ्यावी.

# ''कलियुगामध्ये सत्ययुग''

(संत रामपाल जी महाराज यांचे मंगल प्रवचनाने प्रेरीत)

ज्या युगात अधर्म होत नाही त्याला सत्ययुग म्हणतात, सर्वत्र शांती नांदते. वडिलांपूर्वी मुलांचा मृत्यू होत नाही. स्त्री विधवा होत नाही. शरीर निरोगी राहते. सर्व मानव भक्ति करतात. आध्यात्मिक ज्ञानाच्या सर्व कर्मांची माहिती असल्यामुळे सर्व जण परमात्म्याला घाबरून असतात. मन, कर्म आणि वचनाने दुसऱ्याला पीडा देत नाहीत आणि दुराचारी मार्ग अवलंबत नाहीत. योगी–सती, स्त्री–पुरुष असतात. सारा परिसर वृक्षवल्लींनी समृद्ध असतो. सर्व मानव वेदांच्या आधारे भक्ति करतात. सध्या कलियुग सुरू आहे. त्यामुळे अधर्म वाढला आहे. कलियुगात मानवाची भक्तिविषयी आस्था कमी होते किंवा भक्ति करतच नाहीत. जर करत असतील तर शास्त्रविधीचा त्याग करून मनमानी भक्ति करतात. अशी भक्ति भगवद् गीतेच्या १६ व्या अध्यायातील २३ व २४ व्या श्लोकांत वर्ज्य सांगितली आहे. अशा भक्तितून परमात्म्यापासून मिळणारे लाभ प्राप्त होत नाहीत. त्यामुळे अधिकतम मानव हे नास्तिक बनतात. पैसा मिळवण्यासाठी लाच घेणे, चोरी करणे, दरोडा टाकणे अशा माध्यमांचा अवलंब केला जातो, परंतु ही विधी धनलाभाची असल्यामुळे परमात्म्याचे दोषी बनतात आणि प्राकृतिक कष्ट झेलावे लागतात. नशिबात जे असेल त्यापेक्षा जास्त मिळत नाही, हे परमात्म्याचे विधान विसरून जातात. अवैध मार्गाने मिळवलेला पैसा टिकत नाही. एक व्यक्ति आपला मुलगा सुखी व्हावा, त्याला कष्ट पडू नयेत म्हणून अवैध मार्गाने पैसा मिळवत होता, परंतु काही दिवसांनी त्या मुलाच्या दोन्ही किडन्या खराब झाल्या. धडपड करून किडन्या बदलल्या. त्यासाठी ३ लाख रुपये खर्च आला. अवैध मार्गाने मिळवलेला सारा पैसा खर्च झालाच, त्याशिवाय डोक्यावर कर्ज झाले. त्यानंतर मुलाचे लग्न केले. सहा महिन्यांनी बस अपघातात त्या एकुलत्या मुलाचा मृत्यू झाला. आता मुलगाही राहिला नाही आणि अवैध मार्गाने मिळवलेला पैसाही राहिला नाही. मग मिळवले काय? अवैध मार्गाने पैसा मिळवण्यासाठी जे पाप केले, ते मात्र अजून शिल्लक आहे. ते पाप आता ज्यांच्या–ज्यांच्याकडून पैसा घेतला, त्यांच्याकडे गाय, बैल, गाढव अशा रूपात राबून फेडावे लागेल, परंतु परम अक्षर ब्रह्मची शास्त्रानुकूल साधना करणाऱ्या भक्ताचे नशीब परमेश्वर पालटतो. त्याचे कारण म्हणजे परमेश्वराच्या गुणांमध्ये लिहिले आहे, परमात्मा निर्धनाला धनवान बनवतो.

सत्ययुगात कोणीही प्राणी मांस, तंबाखू, दारू यांचे सेवन करत नाही, कारण त्यापासून घडणाऱ्या पापांची त्याला जाणीव असते.

❑ **मांसभक्षण पाप आहे :–** एकदा एक संत आपल्या शिष्यासह जात होते. वाटेत एका तलावात एक मच्छिमार मासे पकडत होता. जाळे तलावातून बाहेर काढल्यानंतर मासे तडफडून मरत होते. शिष्याने विचारले, गुरुदेव, या अपराधी प्राण्याला कोणता दंड मिळेल. गुरुजींनी सांगितले, बेटा, वेळ आल्यावर सांगेन. चार–पाच वर्षांनंतर दोघे गुरू–शिष्य एका जंगलातून जात होते. तेथे एक हत्तीचे पिल्लू चित्कारत होते. खेळता–बागडताना ते हत्तीचे पिल्लू दोन झाडांच्या बुंध्यात फसले होते. त्यातून ते कसेबसे बाहेर पडले, परंतु त्या प्रयत्नात त्याच्या शरीरावर खरचटले होते आणि जखमा झाल्या होत्या. जखमांमध्ये झालेले किडे त्याचे शोषण करत होते. ते हत्तीचे पिल्लू वेदनांमुळे आक्रोश करत होते. हा प्राणी कोणत्या पापाचे दंड भोगत आहे, असे शिष्याने गुरूंना विचारले. गुरुदेवांनी सांगितले, पुत्रा, हा तोच मच्छिमार आहे, जो शहराबाहेरील तलावातील मासे पकडत होता.

❑ **मद्यप्राशन किती पाप आहे? :-** दारू पिणाऱ्याला कुत्र्याचे ७० जन्म भोगावे लागतात. गावभर मल-मूत्र खात फिरत राहतो. इतरही बरेच कष्ट सोसावे लागतात. त्याचबरोबर शरीराची मोठी हानी होते ती वेगळीच. फुफ्फुस, यकृत, किडन्या आणि हृदय हे शरीराचे चार महत्त्वाचे अवयव आहेत. त्यांना दारूमुळे इजा होते. दारू प्यायलानंतर माणूस, माणूस न राहता पशूसारखे वर्तन करू लागतो, घाणीत पडतो, अंगावरील कपड्यातच मल-मूत्र विसर्जन करतो.

धनहानी, मानहानी, घरात अशांती आदींमागे मदिरापान हे कारण आहे. सत्ययुगात मदिरेचा प्रयोग चालत नाही. त्यामुळे जीवन सुख-शांतीत व्यतीत होते.

गरीब : मदिरा पीवै कडवा पानी, सत्तर जन्म स्वान के जानी।

❑ **दुराचार किती पाप आहे? :**

परद्वारा स्त्री का खोलै, सत्तर जन्म अन्धा हो डोलै।

जो परस्त्रीशी दुष्कर्म करतो, त्याला ७० जन्म अंधाचे भोगावे लागतात, असे पूज्य कबीर परमेश्वरांनी सांगितले आहे. बुद्धिमान व्यक्ती असले संकट कधीही ओढवून घेत नाही. मूर्खांचेच हे काम असते. आगीमध्ये हात घालणे म्हणजे स्वत:वर मृत्यू ओढवून घेतल्यासारखे आहे. जो दुसऱ्याच्या शेतात पेरणी करतो, ते महामूर्ख आहे. बुद्धिमान व्यक्ति असे कधीच करणार नाही. वेश्यागमन म्हणजे उकिर्ड्यावर गव्हाचे पोते टाकल्यासारखे आहे. बुद्धिमान व्यक्तिचे हे काम नसून महामूर्ख, दारूड्या, निर्लज्ज व्यक्तिचे हे काम आहे. विचार करण्यासारखा विषय हा आहे, की जो पदार्थ शरीराचा नाश करत असूनही आनंदानुभव देतो, तो शरीरात सुरक्षित ठेवल्यानंतर किती आनंद देणार? दीर्घायू, निरोगी शरीर, स्वस्थ मस्तिष्क, शूरवीरता आणि स्फूर्ती प्रदान करतो. ज्या पदार्थामुळे अनमोल अपत्यप्राप्ति होते, त्याचा नाश करणे म्हणजे अपत्याची हत्या केल्यासारखे आहे. त्यामुळे दुराचार आणि अनावश्यक भोगविलास वर्ज्य आहे.

❑ **तंबाखू खाणे किती पाप आहे? परमेश्वर कबीरजींनी सांगितले आहे:-**

सुरापान मद्य, मांसाहारी, गमन करै भोगै पर नारी।
सत्तर जन्म कटत हैं शिशम्, साक्षी साहिब है जगदीशम्।।
परद्वारा स्त्री का खोलै, सत्तर जन्म अन्धा हो डोलै।
सौ नारी जारी करै, सुरापान सौ बार।
एक चिलम हुक्का भरे, डुबै काली धार।।

वर वर्णन केल्याप्रमाणे दारू पिणारा सत्तर जन्म कुत्र्याचे जीवन जगतो, मल-मूत्राचे सेवन करत फिरतो. परस्त्रीगमन करणारा सत्तर जन्म अंधळ्याचे भोगतो. मांसभक्षण करणारा महाकष्टाचा भागीदार होतो. ही सर्व पापे शंभर वेळा केल्यानंतर जेवढा पापसंचय होतो, तेवढा हुक्का पिणारा अर्थात तंबाखू खाणाऱ्याला सहयोग देणाऱ्याचा होतो. तंबाखू खाणारे, हुक्का, सिगारेट, बिडी आदी पिणाऱ्यांना काय पाप लागत असेल? घोर पापाचे भागीदार होतात ते. एक व्यक्ति जेव्हा धूम्रपान करते, जेव्हा ती हुक्का, बिडी किंवा सिगारेट ओढून धूर सोडते, तेव्हा तो धूर लहान मुलांच्या शरीरात जाऊन हानी पोहोचवतो. ती मुलेही लवकरच वाईट गोष्टी शिकतात आणि त्यांचे स्वास्थ्यही बिघडते.

# ''हरी अवताराची परिभाषा''

'अवतारा'चा अर्थ आहे उच्च स्थानावरून खाली उतरणे. हा शब्द विशेषकरून जे पृथ्वीवर काही अद्‌भुत कार्य करतात, त्या उत्तम आत्म्यांसाठी वापरला जातो. त्यांना परमात्म्याकडून पाठवण्यात आले आहे, असे समजले जाते किंवा स्वत: परमात्म्याचे आगमन मानतात.

श्री मद्‌भगवत गीतेच्या पंधराव्या अध्यायातील १ ते ४ आणि १६ व १७ या श्लोकांमध्ये तीन पुरुषांचे (प्रभु) ज्ञान आहे.

❑ **१) क्षर पुरुष** :- याला ब्रह्मसुद्धा म्हणतात. याच्या साधनेचे नाम 'ओम' आहे. याचा पुरावा गीतेच्या आठव्या अध्यायातील १३ व्या श्लोकात आहे.

❑ **२) अक्षर पुरुष :-** याला परब्रह्मसुद्धा म्हणतात. याच्या साधनेचा मंत्र 'तत्' असा आहे, जो सांकेतिक आहे. याचा पुरावा गीतेच्या १७ व्या अध्यायातील २३ व्या श्लोकात आहे.

❑ **३) उत्तम पुरुष तू: अन्य:** :- श्रेष्ठ पुरुष परमात्मा तर वरील दोन्ही पुरुषांपेक्षा (क्षर पुरुष आणि अक्षर पुरुष) वेगळाच आहे. हा परम अक्षर पुरुष आहे. याला गीतेच्या आठव्या अध्यायातील पहिल्या आणि तिसऱ्या श्लोकांत ते परम अक्षर ब्रह्म आहे, असे म्हटले आहे. याचा सांकेतिक जप 'सत्' असा आहे. या परमेश्वराच्या प्राप्तिने साधकाला परमशांती आणि सनातन परमधाम प्राप्त होईल. गीतेच्या १८ व्या अध्यायातील ६२ व्या श्लोकात स्पष्ट केले आहे, की हा परमेश्वर (परम अक्षर ब्रह्म) गीता ज्ञानदात्यापेक्षा वेगळा, भिन्न आहे. अधिक माहितीसाठी 'ज्ञानगंगा' हे पुस्तक बरवाला येथील सतलोक आश्रमात मिळेल. अवतार दोन प्रकारचे असतात. आता तुम्हाला समजले असेल, की मुख्यत्वे तीन पुरुष (प्रभू) आहेत. यांचा उल्लेख वर केला आहे. आपणासाठी मुख्यत्वे दोन प्रभूंची भूमिका महत्त्वाची ठरते.

**१) क्षर पुरुष (ब्रह्म)** :- हा गीतेच्या अकराव्या अध्यायातील ३२ व्या श्लोकामध्ये स्वत:चा उल्लेख 'काल' असा करतो.

**२) परम अक्षर पुरुष (परम अक्षर ब्रह्म) :-** याच्याविषयी गीतेच्या आठव्या अध्यायातील तिसऱ्या आणि आठव्या ते दहाव्या श्लोकांमध्ये, १८ व्या अध्यायातील ६२ व्या श्लोकामध्ये आणि १५ व्या अध्यायातील १ ते ४ आणि १७ व्या श्लोकांमध्ये माहिती आहे.

# ''ब्रह्मच्या (काल) अवतारांची माहिती''

### गीतेच्या चौथ्या अध्यायातील सातवा श्लोक

यदा, यदा, हि, धर्मस्य, ग्लानि:, भवति, भारत,
अभ्युत्थानम्, अधर्मस्य, तदा, आत्मानम्, सृजामि, अहम् ।।७।।

**अनुवाद :** (भारत) हे भारत! (यदा, यदा) जेव्हा-जेव्हा (धर्मस्य) धर्माला (ग्लानि:) ग्लानी आणि (अधर्मस्य) अधर्माची (अभ्युत्थानम्) हानी (भवति) होते (तदा) तेव्हा तेव्हा (हि) ही (अहम्) मी (आत्मानम्) आपला अवतार अंश (सृजामि) रचतो अर्थात उत्पन्न करतो. (७)

जसे श्री मद्‌भगवत गीतेच्या चौथ्या अध्यायातील सातव्या श्लोकात गीता ज्ञानदाता म्हणतो, की जेव्हा-जेव्हा धर्मामध्ये घृणा उत्पन्न होते, धर्माला हानी पोहोचून अधर्माची वृद्धी होते, तेव्हा तेव्हा मी (काल=ब्रह्म=क्षरपुरुष) माझ्या अंश अवताराचे सृजन करतो म्हणजे उत्पन्न करतो.

जसे श्री रामचंद्र आणि श्री कृष्णजींना काल ब्रह्मनेच पृथ्वीवर उत्पन्न म्हणजे अवतारित केले होते आणि स्वत: विष्णु देखिल हे मान्य करतात.

याशिवाय आणखी आठ अवतार सांगितले आहेत. हे अवतार म्हणजे स्वत: विष्णु येत नाहीत, तर आपल्या लोकातून आपले कृपापात्र पवित्र आत्मा पाठवतात आणि तेही अवतार समजले जातात. पुराणांमध्ये काही ठिकाणी तर २५ अवतारांचा उल्लेख आला आहे. काल पुरुषाने (क्षर पुरुष) पाठवलेले हे अवतार पृथ्वीवर वाढलेल्या अधर्माचा नाश, संहार करतात.

उदाहरणार्थ :– श्री रामचंद्रजी, श्री कृष्णचंद्रजी, श्री परशुरामजी आणि नि:कलंकजी (हा अवतार अजून व्हायचा आहे. ते कलियुगाच्या शेवटी होईल.) हे सर्व अवतार घोर संहार करून अधर्माचा नाश करतात, अधर्मीयांना मारून शांती स्थापित करतात, परंतु शांतीच्या अपेक्षेतून अशांतीच वाढते. श्री रामचंद्रांनी रावणाला मारण्यासाठी युद्ध केले. युद्धात करोडो पुरुष मारले गेले. त्यामधील काही धर्मीय, तर काही अधर्मीय होते. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या बायका, मुले मागे राहिली. त्यांचे जीवन नरक बनले. या विधवा नराधमांच्या वासनेच्या शिकार बनल्या. त्यांच्या उदरनिर्वाहाची समस्या निर्माण झाली. अशी अशांतीची अनेक कारणे पुढे आली. हीच रीत श्री कृष्णजी आणि श्री परशुरामजींनी अंगीकारली होती. याच हेतूने काल ब्रह्मकडून (क्षर पुरुष) दहावा अवतार निर्माण केला जाईल. त्याचे नाव 'नि:कलंक' असेल. कलियुगाच्या शेवटी हा अवतार प्रगट होईल. हा अवतार राजा हरिश्चंद्राचा आत्मा असेल. ते संभलनगरातील विष्णु दत्त शर्मा याच्या घरी जन्म घेईल. त्यावेळी सर्व मानव जात अन्यायी आणि अत्याचारी होईल. त्या सर्वांना हा अवतार मारेल. त्यावेळी मनुष्याच्या मनात परमात्म्याविषयी भीती निर्माण होईल. जे सदाचारी असतील त्यांना अभय मिळेल आणि बाकीच्यांचा संहार होईल. ब्रह्मच्या (काल, क्षर पुरुष) अवतारांची अधर्माचा नाश करून शांती स्थापित करण्याची अशी रीत असेल.

## ''परम अक्षर ब्रह्म म्हणजेच सत्य पुरुषाच्या अवतारांची माहिती''

❑ १) परम अक्षर ब्रह्म स्वत: पृथ्वीवर प्रगट होतो. ते सशरीर येतो आणि सशरीर परत जातो. ही लीला ते परमेश्वर दोन प्रकारे करतो.

❑ क = प्रत्येक युगात वनामध्ये तळ्यातील कमळाच्या फुलावर शिशू रूपात प्रगट होतो. तेथून एक नि:संतान दांपत्य त्याला घेऊन जाते. त्यानंतर लीला करत ते मोठा होतो आणि आध्यात्मिक ज्ञानाचा प्रचार करून अधर्माचा नाश करतो. सरोवराच्या पाण्यातील कमळाच्या फुलावर अवतारित असल्यामुळे या परमेश्वराला नारायण म्हटले जाते. (नार म्हणजे जल, पाणी आणि आयण म्हणजे येणारा, अर्थात निवास करणारा, त्यामुळे याला नारायण असे संबोधले जाते.)

❑ ख = साधू-संत त्यांची इच्छा होईल तेव्हा जिवंत रूपात सत्यलोकातून पृथ्वीवर येतात आणि चांगल्या आत्म्यांना ज्ञान देतात. मग ते पुण्यात्मेही ज्ञानाचा प्रचार करून अधर्माचा नाश करतात. तेसुद्धा परमेश्वराने पाठवलेले अवतार होतात.

कलियुगात ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमा शके १४५५ (सन १३९८) रोजी कबीर परमेश्वर सत्यलोकातून चालत आले आणि काशी शहरातील लहरतारा सरोवरातील कमळाच्या फुलावर शिशू रूपात विराजमान झाले. तेथून निरू आणि नीमा या विणकर दांपत्याने त्यांना उचलून घरी आणले. शिशू रूपधारी परमेश्वर कविर्देवांनी (कबीर परमेश्वर) २५ दिवस कोणताही आहार घेतला नाही. निरू आणि नीमा हे जन्माने ब्राह्मण होते. ते शिवांचे पुजारी व भक्त होते.

मुसलमानांनी जबरदस्तीने मुस्लिम बनवल्यामुळे विणकऱ्याचे काम करून आपला उदरनिर्वाह करत होते. बाळाची नाजूक स्थिती पाहून नीमाने इष्ट दैवत शिवांचा धावा केला. शिवजी साधू रूपात तेथे आले आणि त्यांनी बालक रूपातील कबीर परमेश्वरांना पाहिले. बालक रूपातील कबीरजींनी शिवांना सांगितले, त्यांना सांगा, की एक कुमारी गाय आणा आणि ती तुमच्या आशीर्वादाने दूध देईल. कबीर परमेश्वरांनी सांगितल्याप्रमाणे करण्यात आले. कबीर परमेश्वरांच्या आदेशानुसार भगवान शिवजींनी गायीच्या पाठीवर थोपटले आणि त्याच वेळी त्या वासरीच्या आंचळातून दुधाच्या धारा वाहू लागल्या. एक नवीन मातीचे गाडगे खाली ठेवण्यात आले आणि ते दुधाने भरल्याबरोबर दूध यायचे बंद झाले. त्यानंतर दररोज त्या वासरीच्या आंचळाखाली भांडे ठेवल्यावर दूध येऊ लागले. ते कबीर परमेश्वर प्राशन करत होते. विणकऱ्याच्या घरी पालनपोषण झाल्यामुळे मोठे झाल्यावर परमेश्वर कबीरसुद्धा कपडे विणण्याचे काम करू लागले. ते आपल्या चांगल्या आत्म्यांना भेटले, त्यांना तत्त्वज्ञान समजावून सांगितले आणि स्वत: तत्त्वज्ञानाचा प्रचार करून अधर्माचा नाश केला. ज्यांना ज्यांना परमेश्वर जिवंत महात्म्याच्या रूपात भेटले, त्यांना सचखंडात (सत्यलोक) घेऊन गेले आणि परत आणून सोडले. त्यांना आध्यात्मिक ज्ञान दिले आणि आपल्या मूळ रूपाची ओळख करून दिली. ते त्या परमेश्वराचे (सत्य पुरुष) अवतार होते. त्यांनीही परमेश्वरांकडून प्राप्त झालेल्या ज्ञानाच्या आधारे अधर्माचा नाश केला. ते पुढील अवतार आहेत.

१) आदरणीय धर्मदास जी, २) आदरणीय मलुकदास जी, ३) आदरणीय नानकदेव साहेब जी (सिक्ख धर्माचे प्रवर्तक), ४) आदरणीय दादूसाहेब जी, ५) आदरणीय गरीबदास साहेब, छुडाणी (जि. झज्जर, हरियाणा) येथील ६) खेडा (जि. मेरठ, उत्तर प्रदेश) येथील आदरणीय घीसा दास साहेब जी. हे सर्व जण परम अक्षर ब्रह्मचे (सत्य पुरुष) अवतार होते. पृथ्वीवर आपले कार्य करून ते निघून गेले. त्यांनी अधर्माचा नाश केल्यामुळे वर्षानुवर्षे समाजात चांगुलपणा होता. आतासुद्धा संतांची कमतरता नाही, परंतु या संतांची साधना शास्त्राविरुद्ध असल्यामुळे कुठेही शांती दिसून येत नाही. त्यामुळे समाजात अधर्म वाढत आहे. शेकडो वर्षे हे पंथ आणि संत ज्ञानाचा प्रचार करत आहेत, तरीही अधर्म वाढतच चालला आहे.

## ''सत्यपुरुषाचा सध्याचा अवतार''

ज्या सत्य साधना आणि तत्त्वज्ञानाचा प्रचार पूर्वोक्त परमेश्वराचे अवतार संत करत होते, ज्यामुळे आपापसात प्रेम होते, एक दुसऱ्याच्या दु:खाने दु:खी होत होते, असहाय व्यक्तिंना मदत करत होते, तीच शास्त्रविधीनुसार साधना आणि तेच आध्यात्मिक यथार्थ ज्ञान संत रामपाल दासजी महाराजांना परमेश्वर कबीरसाहेबजींनी प्रदान केले आहे. मार्च १९९७, फाल्गुन शुक्ल प्रथमेला सकाळी दहा वाजता जिंदा महात्म्याच्या रूपात सत्यलोकातून परमेश्वर कबीरसाहेबजींनी येऊन संत रामपाल दासजी महाराजांना सतनाम आणि सारनाम देऊन, आदेश देऊन अंतर्धान पावले होते.

संत रामपाल दासजी महाराजसुद्धा आध्यात्मिक ज्ञानाद्वारे अधर्माचा नाश करणाऱ्या परमेश्वराच्या (परम अक्षर ब्रह्म) अवतारांपैकीच एक आहेत. आता विश्वात शांती नांदेल. सर्व धर्म आणि पंथांच्या व्यक्ति एक होऊन आपापसात प्रेमाने राहतील. राज्यकर्तेही निराभिमानी, न्याय देणारे आणि परमात्म्याला घाबरून कार्य करणारे असतील. ते जनतेचे सेवक बनून निष्पक्षपातीपणाने कार्य करतील. धरतीवर पुन्हा सत्ययुगासारखी स्थिती निर्माण होईल. सध्या पृथ्वीवर संत रामपाल दासजी महाराजच ते अवतार आहेत. आता घरोघरी परमेश्वराच्या

ज्ञानाची चर्चा होईल. गावात, शहरात किंवा बागेत बसून जिथे जुगार खेळला जात होता, कोणी राजकारणावर बोलत होते, आपला मुलगा किंवा सुनेच्या वर्तणुकीची चर्चा होत होती, तेथे परमेश्वराच्या महिमेची चर्चा होईल, 'ज्ञान गंगा' या पुस्तकातील ज्ञानावर विचारविमर्श होईल. परमात्म्याची महिमा, स्तुती केल्यानेच जीव पुण्याचा भागीदार बनतो. त्यानंतर परमात्मा शास्त्रविधीनुसार साधना करवून घेऊन जीवन सुखी बनवतील आणि आत्मकल्याण करतील. या कलियुगात पृथ्वीवर सत्ययुगासारखी वेळ येईल. पूर्ण ब्रह्म संत रामपालजी हेच वर्तमान युगात धरतीवर अवतार आहेत. अधिक माहितीसाठी कृपया ''धरती पर अवतार''(संपूर्ण) हे पुस्तक वाचावे.

## ''अमेरिकेची महिला भविष्यवेत्ता फ्लोरेन्सची महत्त्वपूर्ण भविष्यवाणी''

अमेरिकेची विश्वविख्यात भविष्यवेत्ता फ्लोरेन्सने आपल्या भविष्यवाणीत अनेक वेळा भारताचा उल्लेख केला आहे. 'दि फॉल ऑफ सेन्सेशनल कल्चर' या पुस्तकात तिने म्हटले आहे, की सन २००० वर्ष येता येताच भयावह प्रमाणात प्राकृतिक संतुलन बिघडेल. लोकांमध्ये आक्रोश करण्याची प्रबळ भावना निर्माण होईल. दुराचार परिसीमा गाठेल. पाश्चिमात्य देशांतील विलासी जीवन जगणाऱ्यांमध्ये निराशा, बेचैनी आणि अशांती निर्माण होईल. अतृप्त अभिलाषा आणखी जोर पकडतील. त्यामुळे आपापसात कटुता वाढेल. चारी बाजूंना हिंसा आणि अत्याचाराचे वातावरण असेल. त्यामुळे सगळीकडे हाहाकार माजेल, परंतु भारतात निर्माण होणारी एक नवी विचारधारा हे घातक वातावरण संपवून टाकेल. ही विचारधारा वैज्ञानिक दृष्टी आणि बंधुभावाचे महत्त्व समजावून सांगेल. धर्म आणि विज्ञान यांचा आपापसात विरोध नाही, हेसुद्धा समजावून सांगेल. आध्यात्मिकतेची उच्चता आणि भौतिकतेचे क्षणभंगुरत्व सगळ्यांसमोर प्रकट करेल. या विचारधारेने मध्यमवर्ग अधिक प्रभावी होईल. हा वर्ग समाजातील अन्य सर्व वर्गांना चांगल्या समाजनिर्मितीसाठी प्रोत्साहित करेल. ही विचारधारा संपूर्ण विश्वात चमत्कारिक परिवर्तन आणेल.

मला माझ्या सहाव्या अंतेंद्रियाद्वारे या शक्तीची जाणीव होत आहे, की ही विचारधारा निर्माण करणाऱ्या त्या महान संताचा भारतात जन्म झाला आहे. त्या संतांच्या ओजस्वी व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव सर्वांना आश्चर्यचकित करेल. त्यांची विचारधारा अध्यात्माचा जो प्रभाव कमी होत चालला आहे, त्याला पुन्हा नवी स्फूर्ती देईल. सगळीकडे आध्यात्मिक वातावरण असेल.

त्या संतांच्या विचारधारेने प्रभावित झालेले लोक पश्चिमेच्या दिशेने जातील. हळूहळू आशिया, युरोप आणि अमेरिकेमध्ये सगळीकडे त्याचा प्रभाव जाणवेल. त्या संतांच्या विचारधारेने संपूर्ण विश्व प्रभावित होईल आणि त्यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार चालेल. पाश्चात्त्य देश त्याला ईसा, मुस्लिम सच्चा रहनुमा आणि आशियायी लोक त्याला भगवानाचा अवतार मानतील.

त्या महान संताच्या विचारधारेने बौद्धिक क्रांती होईल. बुद्धिजीवांचे विचार बदलतील. त्यांच्यात ईश्वराप्रती श्रद्धा आणि विश्वासाचा अंकुर फुटेल.

फ्लोरेन्सच्या मतानुसार त्या संताने भारतामध्ये जन्म घेतलेला आहे. ती या संतामुळे खूपच प्रभावित झाली होती. तिने आपले दुसरे पुस्तक 'गोल्डन लाईट ऑफ न्यू एरा'मध्येही लिहिले आहे, की **"जेव्हा मी ध्यानधारणा करते, तेव्हा नेहमी एका संताला बघते. त्याचा वर्ण गोरा आहे. त्याचे केस पांढरे आहेत. त्याच्या चेहऱ्यावर दाढीही नाही**

**आणि मिशाही नाहीत. त्या संताच्या कपाळावर अफलातून तेज असते. त्याच्या कपाळावर आकाशातील एका नक्षत्राची प्रकाशकिरणे निरंतर वर्षाव करत असतात. मी बघते, की ते संत आपल्या कल्याणकारी विचारधारा आणि आपल्या सतचरित्र प्रबल अनुयायांच्या शक्तीने संपूर्ण विश्वभर एका नव्या ज्ञानाचा प्रकाश पसरवत आहे."**

ते संत आपली शक्ती निरंतर वाढवत आहे. **त्याच्यामध्ये एवढी शक्ती आहे, की ते प्राकृतिक परिवर्तनसुद्धा करू शकतो.** ते आपले कार्य वैज्ञानिक दृष्टिकोनातून करेल. त्यांची कृपा आणि प्रयत्नांती मानवी सभ्यतेमध्ये नवी जागृती येईल. विश्वातील समस्त जनसमूहात नव्या चेतनेचा संचार होईल. लोकशक्तीचे एक नवे रूप प्रगट होईल, जे सत्ताधाऱ्यांच्या मनमानीवर अंकुश ठेवेल.'

मनोचिकित्सक आणि संमोहन कलेचे विश्वविख्यात ज्ञाता डॉ. मोरे बर्सटीन यांची फ्लोरेन्सशी चांगली मैत्री होती. एकदा फोरेन्सने त्यांनाही सांगितले होते, की डॉक्टर, ती वेळ अगदी गतीने जवळ येत आहे, जेव्हा सत्तालोलुप राज्यकर्त्यांची अपेक्षा तुमच्यासारख्या समाजसेवकांच्या गोष्टी समाज अगदी लक्षपूर्वक ऐकेल. एकविसावे शतक सुरू झाल्यावर एक नवी विचारधारा साऱ्या विश्वाला प्रभावित करेल. प्रत्येक राष्ट्रात सच्चारित्र धार्मिक लोकांचे संघटन लोकांच्या डोक्यात बसलेल्या चुकीच्या कल्पना बदलून टाकेल. ही विचारधारा भारतामधून प्रसारित होईल आणि विश्वभर पसरेल. **मी त्या पवित्र स्थानावर एका प्रचंड तपस्वीला बघत आहे. त्याचे तेज प्रचंड गतीने पसरत आहे. मनुष्यातील निद्रिस्त देवत्वाला जागे करण्यासाठी आणि धरतीचा स्वर्ग बनवण्यासाठी ते संत दिवस-रात्र प्रयत्न करत आहेत.**

एका पत्रकाराने सन १९६४ मध्ये फ्लोरेन्सला विचारले होते, की तुम्ही जगाचे भविष्य सांगू शकाल काय? यावर ती म्हणाली होती, १९७० ची सुरवात व्यापक उलथापालथीने होईल. १९७९-८० मध्ये असे भूकंप होतील, की न्यूजर्सीचा काही हिस्सा आणि युरोप व आशियामधील काही देशांचे स्थान भूकंपामुळे विदिर्ण होऊन जाईल. काही जलमयसुद्धा होतील. तिसऱ्या महायुद्धाचे भय सगळ्यांच्या डोक्यात घर करेल आणि या युद्धाची तयारीही करतील, परंतु भारतीय राजनेता आपला प्रभाव आणि बुद्धीने तिसरे महायुद्ध टाळण्यात सफल होतील. तिसरे महायुद्ध सुरू होईपर्यंत भारताच्या शासनाचा सत्ता आध्यात्मिक प्रवृत्तीच्या लोकांच्या हातात येईल. त्यामुळे त्यांच्या प्रभावाने महायुद्ध टळेल. ते शासनकर्ते एका महान संताच्या ओजस्वी आणि क्रांतिकारी विचारधारेने प्रभावित होतील. ते त्या संताला असे समर्पित होतील, जसे वॉशिंग्टनवासीय स्वातंत्र्य आणि मानवतेसाठी समर्पित झाले होते.

अमेरिकेतील न्यूजर्सी शहरात राहणारी फ्लोरेन्स खरोखरीच एक विलक्षण महिला होती. एकदा नोबेल नावाची एक व्यक्ती टीव्हीवरील कार्यक्रमावेळी तिला म्हणाली, ''तुम्ही भारतामध्ये जन्म घेतलेल्या संताविषयी तर नेहमीच सांगत आला आहात. मी स्वत:विषयी थोडेफार जाणू इच्छितो ते सांगा.''

फ्लोरेन्सने त्याचा उजवा हात हातात घेतला आणि सांगितले, की ''तुम्ही लवकरच एखाद्या दुसऱ्या राज्यातून प्रसारण कराल.'' नोबेल त्यावेळी एका प्रसारण सेवेचा कर्मचारी होता. फ्लोरेन्सची वाणी ऐकून तो हसू लागला. काही वेळाने तो म्हणाला, ''तुम्ही माझी चांगलीच मस्करी केली. जर आमच्या कंपनीचे अधिकारी हा कार्यक्रम बघत असतील तर मी

दुसऱ्या राज्यात जावो अथवा न जावो, आता आहे त्या कंपनीतून मला लगेच काढून टाकले जाईल.''

काही मिनिटांतच कंट्रोल रूमचा फोन वाजला. तो फोन नोबेललाच होता. त्याच्या कंपनीचे जनरल मॅनेजर त्याच्याशी बोलू इच्छित होते. त्याने जेव्हा फोन उचलला, त्यावेळी जनरल मॅनेजरनी सांगितले, आम्ही न्यूयॉर्कमधून प्रसारण करण्याचा निर्णय घेतला आहे. तेथे तुम्हालाच पाठवले जाईल. आता ही बाब गुप्त ठेवायची आहे. उद्या त्याची घोषणा करण्यात येईल. मी टीव्हीवर फ्लोरेन्सबरोबरची तुझी चर्चा बघत होतो. फ्लोरेन्सने तुझ्याविषयी जे सांगितले, ते पूर्णपणे सत्य आहे. आश्चर्याची बाब हीच आहे, की हे गुपित तिला कसे माहीत झाले? नोबेल फ्लोरेन्सकडे बघतच राहिला.

एकदा काही पत्रकारांनीही तिला तुम्ही भविष्य कसे बघता आणि हरवलेल्या व्यक्ती किंवा वस्तूंचा कसा शोध लावता, असे विचारले. त्यावेळी ती म्हणाली, माझे मलाच कळत नाही, हे कसे शक्य होते. **मी भविष्याच्या बाबतीत एक महत्त्वपूर्ण बाब सांगतो. विसाव्या शतकाच्या शेवटी भारतवर्षातून एक प्रकाश निघेल. हा प्रकाश सर्व जगाला त्या दैवी शक्तींविषयी माहिती देईल, ज्या आपणासाठी आतापर्यंत एक रहस्य बनून राहिलेल्या आहेत. (या दैवी शक्तींची माहिती संत रामपाल दासजी महाराजांनी सांगितली आहे, ती या पुस्तकाच्या पान नं. २० वर 'सृष्टि रचना'मध्ये वाचा.) एका दिव्य पुरुषाद्वारे हा प्रकाश संपूर्ण विश्वात पसरेल. ते सर्वांना सतमार्गाने चालण्याची प्रेरणा देईल. सर्व जगात एका नव्या विचाराची ज्योत उजळेल. जेव्हा मी ध्यानावस्थेत असते, तेव्हा मला तो दिव्य महापुरुष दिसतो.**

**फ्लोरेन्सने वारंवार त्या दिव्य पुरुषाचा उल्लेख केला आहे. त्याबरोबर ती हेसुद्धा सांगते, की उत्तरी भारतवर्षाच्या एका पवित्र स्थानी तो हजर आहे.**

सज्जनहो, ही भविष्यवाणी आणि वर्तमान वाणी परमसंत रामपाल दासजी महाराजांविषयी सत्य ठरत आहे आणि त्याचे समर्थन अन्य भविष्यवाणीसुद्धा करतात, ज्या पुढे दिलेल्या आहेत.

## ''भाई बाले वाली जन्म साखी मधील माहिती''

''एका महापुरुषाविषयी 'भाई बाले वाली जन्म साखी' मधील भक्त प्रल्हादाची भविष्यवाणी''

परमेश्वर कबीरजी आणि संत नानकजी यांच्यानंतरचा पंजाबच्या भूमीवर होणारा अवतार म्हणजे संत रामपाल दासजी महाराज आहेत, हे 'भाई बाले वाली जन्म साखी'मधील माहिती स्पष्ट करते. संत रामपाल दासजी महाराजांनी हरियाणा प्रांतातील (त्या वेळचा पंजाब प्रांत) सोनीपत जिल्ह्यातील धनाना गावातील जाट जातीतील श्री. नंद राम जाट आणि इंद्रादेवी यांच्या पोटी जन्म घेतला.

याविषयी भाई जवाहर सिंह कृपाल सिंह अँड कंपनी, बाजार माई सेवा, अमृतसर (पंजाब) यांनी हिंदीमध्ये आणि भाई जवाहर कृपालसिंह पुस्तकवाले, ८ वी गल्ली, रामानंद अमृतसर (पंजाब) यांनी पंजाबीमध्ये 'जन्म साखी भाई बाले वाली' हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

त्यामध्ये लिहिलेला अमर लेख या प्रकारे आहे :– की एकदा भाई बाला आणि मरदाना

यांना बरोबर घेऊन नानकदेवजी हे भक्त त्त प्रल्हादाच्या लोकात गेले. भक्त प्रल्हाद लोक पृथ्वीपासून कोसो दूर अंतराळात आहे. तेव्हा भक्त प्रल्हाद म्हणाला, की नानकजी, तुम्हाला परमात्म्याने दिव्य दृष्टी दिली आहे आणि कलियुगातील महान भक्त बनवले आहे. तुमचा कलियुगात मोठा प्रताप होईल. येथे (प्रल्हाद लोक) यापूर्वी कबीरजी आले होते. आज तुम्ही आला आहात. आणखी एक तुमच्या दोघांसारखा महापुरुष होईल. या तिघांशिवाय येथे माझ्या लोकात कोणीही येऊ शकत नाही. भक्त अनेक झालेत, यापुढेही होतील, परंतु येथे माझ्या लोकात कोणीही पोहोचू शकत नाही. या तिघांसारखी महिमा आणखी कोणाचीही नाही. त्यामुळे त्यांच्याशिवाय येथे कोणीही येऊ शकत नाही. मरदानाने विचारले, प्रल्हादजी, कबीरजी हे विणकर होते, नानकजी खत्री आहेत. ते तिसरा कोणत्या जातीचा असेल आणि कोणत्या धरतीवर अवतारित होईल?

भक्त प्रल्हाद म्हणाला, की नानकजी सचखंडात गेल्यानंतर शेकडो वर्षांनी पंजाबच्या भूमीवर ते तिसरा जन्म घेईल आणि त्याचे प्रचार क्षेत्र बरवाला शहर असेल. (लेख समाप्त)

विवेचन :- अन्य पुराव्यांबरोबर 'जन्म साखी' मधील पुराव्यांवरून संत रामपाल दासजी महाराजच ते अवतार आहेत हे खरे ठरते. 'जन्म साखी' मध्ये शंभर वर्षांनी असे लिहिले आहे. येथे शेकडो वर्षांनी असे सांगितले होते, जे पंजाबी भाषेमध्ये शंभर वर्षेच लिहिले आहे, कारण ते कोणत्या युगात अवतारित होईल, असे मरदानाने विचारल्यावर नानकजींनंतर शेकडो वर्षांनी कलियुगात ते संत जाट जातीत जन्म घेईल, असे भक्त प्रल्हादने सांगितले होते. त्यामुळे शंभर वर्षांनीच्या जागी शेकडो वर्षांनी असा अर्थ घेणे योग्य होईल. त्यांचे प्रचार क्षेत्र बरवालाच्या जागी बटाला असे लिहिले आहे. याची दोन कारणे असू शकतात. बरवाला शहर (जि. हिसार, हरियाणा) हे त्यावेळी पंजाब प्रांतात होते आणि ते प्रसिद्ध नव्हते, त्याचबरोबर बटाला शहर पंजाब प्रांतात प्रसिद्ध होते. त्यामुळे लेखकाने 'बरवाला'ऐवजी 'बटाला' असे लिहिले आहे. दुसरी गोष्ट अशी की, छपाई करताना **"ਵਰਵਾਲੇ"** च्या जागी **"ਵਟਾਲੇ"** असे छापले गेले आहे. आणखी एक विचार करण्यासारखी बाब म्हणजे परमेश्वर कबीरदेवजी आणि नानकदेवजी यांच्यासारखा महिमा आणि ज्ञानी असलेला जाट संत पंजाबमधील बटाला शहरात झालेला नाही. हा आणि इतर पुरावे आणि 'जन्म साखी'च्या आधारावरून हे स्पष्ट होते, की तिसरे महापुरुष संत रामपाल दासजी महाराज आहेत आणि त्यांचे आध्यात्मिक ज्ञानसुद्धा या दोन महापुरुषांसारखे (परमेश्वर कबीरजी आणि श्री नानकदेवजी) मिळते जुळते आहे. या दोन्ही प्रतिमा पंजाबी भाषेतील 'भाई बाले वाली जन्म साखी' या पुस्तकात आहेत आणि तसाच बरवालाऐवजी बटाला असा अनुवाद आणि पंजाबी पुस्तकाप्रमाणे हिंदीमध्ये अनुवादित पुस्तकात केला आहे. हिंदीमधील काही प्रकरणे व्यवस्थित लिहिलेली नाहीत. पंजाबी भाषेतील पुस्तकात 'जो इस जीहा कोई होवेगा तां एथे पहुँचेगा होर दर एथे पहुँचण दा कम नहीं' हे महत्त्वपूर्ण विवरण आहे, परंतु हिंदी भाषेतील 'जन्म साखी'मध्ये ते विवरण नाही. यावरून लिखाणावेळी काही प्रकरणे बदलतात, हे सिद्ध होते. तरीही या 'धरतीवर अवतार' आणि अन्य महापुरुषांनी संत रामपाल दासजी महाराजांवर लिहिलेल्या पुराव्यांवरून हे सिद्ध होते.

विशेष : छुडानी गावातील गरीबदास महाराज हे जाट जातीचे होते आणि पूर्वी छुडानी गाव पंजाब प्रांतात होते, यावरून 'जन्म साखी'मधील व्याख्या गरीबदासजी महाराजांवर लिहिली आहे, असे कोणी म्हणत असेल, तर तेही योग्य नाही, कारण संत गरीबदास महाराजांनी त्यांची अमृतवाणी 'असुर निकंदन रमैणी'मध्ये म्हटले आहे, की 'सतगुरु दिल्ली मंडल आयसी, सूती धरनी सूम जगायसी.' याचा अर्थ संत गरीबदासजींचे सद्गुरू पूज्य कबीरसाहेबजी होते.

**पूर्वीचा रोहतक जिल्हा (सोनीपत, रोहतक आणि झज्झरला लागून एक रोहतक जिल्हा होता.) हा दिल्ली मंडलात होता. ते कोणत्याही राजाच्या वर्चस्वाखाली नव्हता. ते इंग्रज सरकारच्या काळात दिल्लीमध्ये समाविष्ट होता. संत गरीबदासजींनी स्पष्ट केले आहे, की सद्गुरू (परमेश्वर कबीरजी) दिल्ली मंडलामध्ये येतील, भक्तिहीन प्राण्यांना जागे करतील आणि सत्यभक्ति करवून घेतील.** (कालच्या दूतांनी आपल्या अनुमानानुसार त्यामध्ये बदल करून सत्य न जाणता असत्याचे पुरावे दिले आहेत, हे लक्षात घ्यावे. त्याचा नाश करण्यासाठी कबीर परमेश्वरजींनी आपले अंश अवतार संत गरीबदास महाराजांद्वारे योग्य ज्ञानाचा प्रचार केला आहे आणि ते संत गरीबदासजींच्या अमृतवाणीच्या रूपात आहे. याला 'कबीर सागर'चे संपादक कबीर पंथी श्री. युगलानंद बिहारी यांच्या टिप्पणीवरून पुष्टी मिळते. कबीर पंथीयांनीच कबीर पंथाच्या ग्रंथांचा नाश केला आहे. आपापल्या मतानुसार फेरबदल करून त्यांनी आपली मते मांडली आहेत. एक मत दुसऱ्या मतापेक्षा पूर्ण भिन्न आहे, हे सांगणाऱ्या 'अनुराग सागर' आणि 'ज्ञान सागर'च्या किती तरी प्रती आहेत, अशी टिप्पणी बिहारीजींनी 'अनुराग सागर' आणि 'ज्ञान सागर'बाबत केली आहे.)

**संत रामपाल दासजी महाराजांचा जन्म श्री. नंद राम जाट यांच्या घरी ८ सप्टेंबर १९५१ रोजी सोनीपत जिल्ह्यातील (त्या वेळचा रोहतक जिल्हा) धनाना गावी झाला. सध्याचा हरियाणा आणि पंजाब प्रांत मिळून त्यावेळी पंजाब प्रांत होता. कलियुगाची ५५०० वर्षे पूर्ण झाल्यानंतर मी स्वत: गरीबदास यांच्या बाराव्या पंथातून येईन, असे परमेश्वर कबीरजींनी सांगितले होते. संत गरीबदास यांच्या माध्यमातून माझ्या (कबीर परमेश्वर) महिमेची वाणी प्रकट होईल आणि गरीबदासांच्या बाराव्या पंथातील साधक मला आधार मानून वाणी समजून घेण्याचा प्रयत्न करतील, परंतु वाणी समजून न घेतल्यामुळे सतनाम आणि सारनामापासून वंचित राहिल्यामुळे असंख्य जन्मांपर्यंत सत्यलोक प्राप्त करू शकणार नाहीत. त्या बाराव्या पंथात (गरीबदासजी महाराजांचा पंथ) मी (परमेश्वर कबीरजी) स्वत: येईन. त्यावेळी संत गरीबदासजी महाराजांच्या माध्यमातून प्रकट केलेली वाणी मी (कबीर परमेश्वर) प्रगट होऊन समजावून सांगेन. यावरून हे सिद्ध होते, की 'जन्म साखी'मध्ये ज्या जाट संताविषयी सांगितले आहे, ते निर्विवादपणे संत रामपाल दासजी महाराजच आहेत. तरीही आम्ही संत गरीबदास महाराजांचा आदर करतोच आहोत, कारण त्यांनी परमेश्वर कबीरजींचा अमर संदेश ऐकवला आहे.**

**एखाद्याने भ्रम निर्माण करून दहा गुरुसाहेबांतील एखाद्याकडे संकेत केला, तरी लक्षात ठेवा, दहा शीख गुरुसाहेबांमधील एकही जाट जातीतील नाही. दुसरे शीख गुरू अंगददेव खत्री होते. तिसरे गुरू अमरदासजी आणि चौथे गुरू रामदासजी हेसुद्धा खत्री होते. पाचवे गुरू अर्जुनदेवजींपासून शेवटचे दहावे गुरू गोविंद सिंहांपर्यंत श्री गुरू रामदास यांची संतान म्हणजेच खत्री होती. तरीही आम्ही सर्व जण सर्व गुरुसाहेबांचा विशेष आदर करतो.**

**संत रामपाल दासजी महाराज म्हणतात–**

''जीव हमारी जाति है, मानव धर्म हमारा।
हिन्दु मुस्लिम सिक्ख ईसाई, धर्म नहीं कोई न्यारा।।''

**परमेश्वर कबीरजींनी सांगितले आहे की–**

जाति ना पूछो संत की, पूछ लीजिए ज्ञान ।
मोल करो तलवार का, पडी रहन दो म्यान ।।

**'जन्म साखी'च्या पंजाबी आणि त्यावरून अनुवादित हिंदीमधील ग्रंथातील प्रतिमा येथे दिलेल्या आहेत. त्यावरून तुम्हाला वास्तविकता समजून येईल. 'जन्म साखी'च्या ग्रंथाचे**

प्रकाशक भाई जवाहर सिंह कृपाल सिंह हे अमृतसर (पंजाब) येथील आहेत.

कृपया पहा फोटोकॉपी 'जन्म साखी भाई बाले वाली'च्या पंजाबी भाषेतील पान नं. २७२ ची'

(੨੭੨) ਸਾਖੀ ਪ੍ਰਹਿਲਾਦ ਭਗਤ ਨਾਲ ਹੋਈ


ਕਾਜ ਸਵਾਰਿਆ ॥੪॥ ਤਾਂ ਪ੍ਰਹਿਲਾਦ ਭਗਤ ਕਹਿਆ ਨਾਨਕ ਤਪਾ ਜੀ ਤੇਨੂੰ ਕਲਜੁਗ ਵਿਚ ਰਾਮ ਜੀ ਨੇ ਵਡਾ ਭਗਤ ਕੀਤਾ ਹੈ ਔਰ ਆਪਕੇ ਸੰਜੋਗ ਬਹੁਤਿਆਂ ਕਾ ਉਧਾਰ ਹੋਵੇਗਾ ਤੇਰੀ ਸ੍ਰੀ ਰਾਮ ਨੇ ਵਡੀ ਨਦਰ ਖੋਲੀ ਹੈ ਤੇਰਾ ਵਡਾ ਪ੍ਰਤਾਪ ਹੋਵੇਗਾ ਇਸ ਕਲਜੁਗ ਵਿਚ ਅਗੇ ਕਬੀਰ ਭਗਤ ਏਥੇ ਆਯਾ ਹੈ ਅਤੇ ਜਾਂ ਆਪਕੋ ਕਰਤਾ ਨੇ ਆਂਦਾ ਹੈ ਤਾਂ ਮਰਦਾਨੇ ਪ੍ਰਹਿਲਾਦ ਭਗਤ ਨੂੰ ਪੁਛਿਆ ਹੇ ਭਗਤ ਜੀ ਤੁਸੀਂ ਭੀ ਵਡੇ ਭਗਤ ਹੋ ਅਤੇ ਤੁਸਾਡੇ ਪਿਛੇ ਰਾਮ ਜੀ ਵਡਾ ਚਲਤ ਦਿਖਾਇਆ ਹੈ ਤੇਰੀ ਰਾਮ ਜੀ ਨੇ ਵਡੀ ਨਦਰ ਖੋਲ੍ਹੀ ਹੈ ਭਗਤ ਜੀ ਏਥੇ ਹੋਰ ਕੋਈ ਵੀ ਪਹੁੰਚਿਆ ਹੈ ਕਿ ਕਬੀਰ ਅਤੇ ਨਾਨਕ ਤਪਾ ਹੀ ਪਹੁੰਚਿਆ ਹੈ ਤਾਂ ਪ੍ਰਹਿਲਾਦ ਭਗਤ ਬੋਲਿਆ ਭਾਈ ਨਾਨਕ ਤਪੇ ਪਾਸੋਂ ਪੁਛ ਲੇ ਹੋਰ ਭੀ ਆਵਸੀ ਕਿ ਨਾ ਆਵਸੀ ਕੋਈ ਤਾਂ ਮਰਦਾਨੇ ਕਹਿਆ ਜੀ ਤੁਸੀਂ ਵਡੇ ਭਗਤ ਹੋ ਅਗਲੀ ਤੇ ਪਿਛਲੀ ਸਭ ਆਪ ਨੂੰ ਸਤਿ ਜੁਗ ਥੀਂ ਆਦਿ ਲੈਕੇ ਮਾਲੂਮ ਹੈ ਤਾਂ ਪ੍ਰਹਿਲਾਦ ਭਗਤ ਨੇ ਕਹਿਆ ਸੁਣ ਭਾਈ ਇਸ ਜਿਹਾ ਕੋਈ ਹੋਵੇਗਾ ਤਾਂ ਏਥੇ ਪਹੁੰਚੇਗਾ ਹੋਰਸ ਦਾ ਏਥੇ ਪਹੁੰਚਣਾ ਕੰਮ ਨਾਹੀਂ ਹੋਰ ਅਗੇ ਵਡੇ ਵਡੇ ਭਗਤ ਹੋਏ ਹੈਨ ਅਤੇ ਹੋਵਨਗੇ ਪਰ ਪਹੁੰਚਿਆ ਕੋਈ ਨਾਹੀਂ ਤਾਂ ਫੇਰ ਮਰਦਾਨੇ ਪੁਛਿਆ ਜੀ ਓਹ ਕਦ ਹੋਸੀ ਕਿਤੇ ਨੇੜੇ ਜੁਗ ਵਿਚ ਹੋਸੀ ਤਾਂ ਪ੍ਰਹਿਲਾਦ ਭਗਤ ਕਹਿਆ ਸੁਣ ਭਾਈ ਕਲਜੁਗ ਵਿਚ ਹੋਵੇਗਾ ਜਟ ਨਾਨਕ ਤਪਾ ਸਚਖੰਡ ਜਾਵੇਗਾ ਤਾਂ ਇਸ ਤੋਂ ਪਿਛੇ ਸਉ ਵਰ੍ਹੇ ਹੋਸੀ ਅਤੇ ਏਹਨਾਂ ਤੇਹਾਂ ਤੋਂ ਬਗੈਰ ਹੋਰ ਕੋਈ ਨਾ ਆਵਸੀ ਤਾਂ ਮਰਦਾਨੇ ਪੁਛਿਆ ਜੀ ਤਿੰਨ ਕੇਹੜੇ ਹੈਨ ਤਾਂ ਪ੍ਰਹਿਲਾਦ ਭਗਤ ਕਹਿਆ ਭਾਈ ਅਗੇ ਕਬੀਰ ਹੋਇਆ ਹੈ ਤੇ ਹੁਣ

कृपया पहा फोटोकॉपी जन्म साखी भाई बाले वाली' च्या पंजाबी पान नं. २७३ ची

ਸਾਖੀ ਇਕ ਪਹਾੜ ਦੀ ਚਲੀ (੨੭੩)

ਨਾਨਕ ਤਪਾ ਹੂਆ ਹੈ ਅਤੇ ਫੇਰ ਉਹ ਹੋਸੀ ਤਾਂ ਮਰਦਾਨੇ ਪੁਛਿਆ ਜੀ ਕਬੀਰ ਜੁਲਾਹਾ ਹੋਯਾ ਤੇ ਨਾਨਕ ਖਤਰੀ ਹੋਏ ਅਤੇ ਜੀ ਉਹ ਕਿਸ ਵਰਨ ਹੋਵੇਗਾ ਜੀ ਤੇ ਕਿਸ ਧਰਤੀ ਤੇ ਹੋਸੀ ਕੇਹੜੇ ਸ਼ਹਿਰ ਤਾਂ ਪ੍ਰਹਿਲਾਦ ਭਗਤ ਕਿਹਾ ਭਾਈ ਪੰਜਾਬ ਧਰਤੀ ਤੇ ਵਰਨ ਜਟ ਤੇ ਸ਼ਹਿਰ ਵਟਾਲੇ ਵਿਚ ਹੋਸੀ। ਤਾਂ ਮਰਦਾਨਾ ਸ੍ਰੀ ਗੁਰੂ ਜੀ ਦੇ ਚਰਨਾਂ ਤੇ ਢਹਿ ਪਿਆ ਗੁਰੂ

कृपया पहा फोटोकॉपी 'जन्म साखी भाई बाले वाली'च्या हिंदी पान नं. ३०५ ची



जन्म साखी (३०५) भाई बाले वाली

तब भक्त प्रहलाद ने कहा—हे नानक देव। आप को इस कलियुग में बड़ा भक्त बनाया है। आप की ही संगति से अनेकों प्राणियों का भला होगा। और आप का अनंत प्रताप होगा। तब मरदाने ने कहा—हे प्रहलाद जी। आप भी तो परम भक्त हैं तथा भगवान ने आप के लिये ही अवतार धारन किया था। प्रहलाद जी ने कहा—हे भाई मरदाना। इस स्थान पर या तो कबीर पहुँचा है, और या यह गुरु नानक आया है। यहाँ आना कोई सुगम कार्य नहीं है। एक और महा पुरुष होगा जो पहुँच सकेगा। मरदाने ने कहा—हे भक्त वर। वह पुरुष कौन और कब होगा। प्रहलाद ने उत्तर दिया, कि जब गुरु नानक देव यहां आयेंगे तो इन के सौ वर्ष पश्चात आयेगा। अर्थात यहां केवल तीन आदमी ही आने हैं। एक तो भक्त कबीर और दूसरे श्री गुरु नानक देव जी इन के पश्चात वह तीसरा आयेगा। तब मर्दाने ने कहा हे प्रहलाद जी। कबीर तो जुलाहा था, और नानक देव—खत्री है। परंतु वह तीसरा किस जाती का होगा, उत्तर में प्रहलाद जी ने कहा—हे मर्दाना। पंजाब की धरती और वहां उस का जाट होगा। तथा नगर बरवाला में होगा। उस समय मर्दाना गुरु जी के चर्णों

प्रश्न : एका संस्कृतच्या विद्वान शास्त्रीने प्रश्न केला, की तुमचे गुरू संत रामपाल दासजी महाराजांनी गीतेचा यथार्थ अनुवाद करून भक्तांना सांगितला आहे, असे तुम्ही म्हणता. ते तर संस्कृत शिकले नाहीत, मग हे शक्य आहे का?

उत्तर : संत रामपाल दासजी महाराजांच्या शिष्याने उत्तर दिले, की शास्त्रीजी, जो भाषेचे ज्ञान नसताना अनुवाद करतो, त्यालाच परमेश्वराचा अवतार म्हणतात, कारण परमेश्वर सर्वज्ञ आहे. त्याच्या गुणांनी युक्त असाच त्याचा अवतार असतो आणि ते अवतार संत रामपाल दासजी महाराज आहेत. तुम्ही केवळ गीता आणि वेदांच्या अनुवादाने आश्चर्यचकित झाला असाल, पण संत रामपाल दासजी महाराजांनी बायबल आणि कुराणाचेही यथार्थ रूप सांगितले आहे आणि ते रूप सध्याचे फादर, पादरी आणि मुस्लिम धर्माचे मुल्ला आणि काजीसुद्धा समजू शकलेले नाहीत.

# भक्ती मर्यादा

''जीव हमारी जाति है, मानव धर्म हमारा।
हिन्दु मुस्लिम सिक्ख ईसाई, धर्म नहीं कोई न्यारा ।।''

**प्रिय भक्तजनहो!**

आजपासुन सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी कोणताही धर्म अथवा सांप्रदाय अस्तित्वात नव्हता. तेव्हा हिन्दू नव्हते, मुस्लिम नव्हते, सिक्ख नव्हते की ख्रिश्चन नव्हते. केवळ मानवधर्म होता आणि आहे. परंतु जस–जसा कलयुगाचा प्रभाव वाढत गेला, तसतसे आपल्यात मतभेद वाढत गेले. याचे कारण एवढेच आहे की अनेक धर्ममार्तंड, कुलगुरूंनी शास्त्रांमध्ये लिहिलेली वस्तुस्थिती लपवून ठेवली. यामागे त्यांचा स्वार्थ असू शकेल किंवा बाह्य अवडंबर. ज्याच्या परिणामस्वरूप आज एका मानवधर्माचे चार धर्म आणि अनेक सांप्रदायांचे पेव फुटलेले आहे. त्यामुळे आपापसात मतभेद होणे स्वाभाविकच आहे. सर्वांचा प्रभु/भगवान/राम/अल्लाह/रब/गॉड/खुदा/परमेश्वर हा एकच आहे. हे सर्व भाषा भिन्नतेने आलेले पर्यायी शब्द आहे. सर्वांचा परमेश्वर एकच आहे (सबका मालिक एक) हे देखिल सर्व जण मान्य करतात. मग हे वेगवेगळे धर्म सांप्रदाय कशासाठी?

सर्वांचा मालक/रब/खुदा/अल्लाह/गॉड/राम/परमेश्वर एकच आहे. त्यांचे वास्तविक नाव 'कबीर' आहे आणि ते आपल्या सतलोक/सतधाम/सच्चखण्डामध्ये मानवसदृश आकारामध्ये वास्तव्य करतात ही गोष्ट देखिल अगदी सत्य आहे. परंतु आता हिन्दू म्हणतात की आमचा राम महान आहे, मुस्लिम म्हणतात आमचा अल्लाह सर्वांत महान आहे, ख्रिश्चन म्हणतात आमचे येशू ख्रिस्त सर्वांत महान आणि सिक्ख म्हणतात की आमचे गुरू नानक साहेब जी सर्वांत महान आहेत. चार अज्ञानी बालक आहेत. त्या चौघांचे वडील तर एकच आहेत. पण त्यांच्यापैकी एकाने म्हणावे, हे माझे पापा आहेत. दुसऱ्याने म्हणावे, हे माझे पापा आहेत, तुझे नव्हेत. तिसरा म्हणतो, हे तर माझे पिताजी आहेत आणि ते सर्वांत मोठे आहेत. त्यानंतर चौथ्यानेही म्हणावे की 'अरे, नाही रे मूर्खांनो! हे तर माझे डॅडी आहेत, तुमचे नाहीत.' असा हा सगळा प्रकार आहे. त्या अज्ञानी बालकांप्रमाणे आज आपला मानव समाज आपापसात भांडत आहे.

''कोई कहै हमारा राम बड़ा है, कोई कहे खुदाई रे।
कोई कहे हमारा ईसामसीह बड़ा, ये बाटा रहे लगाई रे ।।''

परंतु आपल्या सर्व धार्मिक ग्रंथ व शास्त्रांमध्ये त्या एका प्रभु /स्वामी/रब/खुदा/अल्लाह/राम/साहेब/गॉड/परमेश्वराचे प्रत्यक्ष नाव लिहून महिमा गायिलेली आहे की ते एक मालक/प्रभु कबीर साहेब हेच आहेत, जे सतलोकामध्ये मानवसदृश रूपामध्ये, आकारामध्ये राहतात.

वेद, गीता, कुराण आणि गुरू ग्रंथसाहेब हे सर्व जवळजवळ एकमेकांशी मिळते जुळते आहेत. यजुर्वेदाच्या अध्याय ५ श्लोक नं ३२ मध्ये, सामवेदाच्या संख्या नं. १४००, ८२२ मध्ये, अथर्ववेद काण्ड ४ अनुवाद १ चा श्लोक नं ७, ऋग्वेदाच्या मंडल १ अध्याय १ सुक्त ११ च्या श्लोक नं. ४ मध्ये कबीर असे नाव लिहून सांगितले आहे की पूर्ण ब्रह्म कबीर हे आहेत आणि ते सतलोकामध्ये नराकार स्वरूपात वास्तव्य करतात. गीता जी चारही वेदांचे संक्षिप्त सार आहे. गीता जी देखिल त्याच सतपुरुष पूर्ण ब्रह्म कबीर इशारा करत आहे. गीता जी तील

अध्याय १५ श्लोक नं १६-१७, अध्याय १८ चे श्लोक नं. ४६,६२ अध्याय ८ चे श्लोक नं. ८ ते १० तसेच २२ मध्ये, अध्याय १५ श्लोक नं. १,२,४ मध्ये त्याच पूर्ण परमात्म्याची भक्ति करण्याचा निर्देश केलेला आहे. श्री गुरू ग्रंथसाहेबमधील पान नं. २४ आणि ७२१ वर नामोल्लेखासह कबीर साहेबांच्या महिमेचे वर्णन आलेले आहे. त्याचप्रमाणे कुराण व बायबलमध्ये एकसारखेच शास्त्र आहे. या दोन्हीमधून जवळजवळ एकच संदेश मिळतो की 'त्या कबीर अल्लाहाची महिमा समजून घ्या, ज्यांच्या शक्तिने ही सर्व सृष्टि चालते. कुराण शरीफमधील 'सुरत फुर्कानि' २५ च्या आयत नं. ५२ ते ५९ पर्यंत कबीरन्, खबीरा, कबीरू आदी शब्द लिहून त्याच एका कबीर अल्लाहाच्या महिमेचे वर्णन केलेले आहे की 'हे पैगंबर (मुहम्मद)! त्या कबीर अल्लाहाची महिमा सांग, ज्यांनी सहा दिवसांमध्ये आपल्या शक्तिने सृष्टिची रचना करून सातव्या दिवशी तख्तावर विराजमान झाले म्हणजेच सतलोकी जाऊन त्यांनी विश्रांती घेतली. ते अल्लाह (प्रभु) कबीरच आहेत.' याचे प्रमाण बायबलमधील उत्पत्ती ग्रंथातील सृष्टि क्रमात बायबलच्या प्रारंभीच्याच सात दिवसांच्या रचनेमध्ये १:२०-२:५ मध्ये आहे.

सर्व संत व धर्मग्रंथांचे सार हेच आहे की पूर्ण गुरूंकडून ज्यांच्याजवळ तिन्ही नाम आहेत आणि त्यांनाच फक्त नामोपदेश करण्याचा अधिकार आहे, त्यांच्याकडूनच नामोपदेश घेऊन जीवात्म्यांनी जन्म-मृत्युरूपी रोगापासून स्वत:ची सुटका करून घेतली पाहिजे. कारण आमचा हेतू तुमची कालरुपी तुरुंगातून सुटका करून आपले मूळ मालक कविर्देव (कबीर साहेब) यांचा सतलोक प्राप्त करवून देण्याचा आहे. कविर्देवांनी आपल्या वाणीमध्ये सांगितलेले आहे की 'एका जीवात्म्याला कालच्या साधनेपासून बाजूला करून पूर्ण गुरूंजवळ आणून सतउपदेश देण्याचे पुण्य एक कोटी गायी, बकऱ्या आदी प्राण्यांची कसाईपासून सुटका केल्याइतके आहे.' कारण हे अबोध मानवी शरीर धारण केलेले प्राणी अयोग्य गुरूंनी सांगितलेली शास्त्राविरुद्ध साधना करून कालच्या जाळ्यामध्ये फसून अडकून राहून न जाणे किती दु:खदायी ८४ लक्ष योनींचे कष्ट सहन करत राहतात. जेव्हा हे जीवात्मे पूर्ण गुरूंच्या माध्यमातून कविर्देवांना (कबीर साहेब) शरण येतात, नामाशी जोडले जातात, तेव्हा त्यांचे जन्म-मृत्यूचे कष्ट कायमचे समाप्त होते आणि सतलोकातील वास्तविक परमशांती त्यांना प्राप्त होते.

आता असा प्रश्न येतो की आजकाल जास्तीत जास्त शिष्य बनवून गुरू आपल्या योग्यतेचे प्रमाण दाखवत आहेत. अर्थात, त्यांच्यातला प्रत्येक जण चार कथा शिकतो आणि म्हणतो की मी देखिल नामोपदेश देतो. असे सांगून ते भोळ्याभाबड्या जीवात्म्यांना कालच्या जाळ्यामध्ये अडकवतात. शास्त्राविरुद्ध नामोपदेश करणारे आणि नामजप करणारे सर्व जण निश्चितपणे नरकाचे भागी होतील आणि त्यांना नरकामध्ये उलटे लटकवले जाईल. पवित्र शास्त्र देखिल (गीता, वेद व सर्व ग्रंथ) हेच सांगतात आणि ते सिद्ध करणारी एक संक्षिप्त कथा सांगतो.

एके काळी परीक्षित नावाचा पुण्यवान राजा भरतवर्षामध्ये राज्य करीत होता. सगळ्यांना समजले की राजा परीक्षिताला बरोबर सातव्या दिवशी सर्पदंश होईल व त्यात त्याचा मृत्यू होईल. हे जेव्हा सर्वांना माहीत झाले, तेव्हा सर्वांनी असा विचार केला की राजाला सात दिवस भागवत कथा ऐकवावी. त्यामुळे त्याचा इहलोकीचा मोह नाहीसा होऊन त्याचे मन ईश्वर चिंतनात लागेल. मृत्युसमयी ज्याची जशी भावना असेल, तेच त्याला प्राप्त होते. सर्वांनी या कल्पनेला सहमत दर्शविले. परंतु कथा ऐकवणार कोण, या प्रश्नाने सर्वांनाच निरुत्तर केले. त्यावेळी तेथे उपस्थित सर्व महर्षींसह 'श्रीमद् भागवत सुधासागर'चे रचनाकार महर्षी वेद व्यासजींनीही स्वत:ला कथा ऐकवण्यासाठी योग्य समजले नाही. कारण आपल्यात हे सामर्थ्य

नाही हे त्यांना माहीत होते. आपल्या सामर्थ्याची जाणीव असतानाही एखाद्या जीवात्म्यांचे जीवन नष्ट करून पापाचे भागीदार कशाला व्हायचे? बरोबर सातव्या दिवशी जो काही परिणाम होणार असेल तो समोर येणार होताच. त्यामुळे सात दिवसांपर्यंत कोणीही याबाबत हिंमत केली नाही. सर्वांना आपापल्या क्षमतेची जाणीव होती. त्यामुळे स्वर्गातून सुखदेवजींना भागवत कथा सांगण्यासाठी बोलाविले गेले आणि तेव्हाच राजा परीक्षिताचा मोह नाहीसा होऊन त्याला स्वर्गप्राप्ती झाली. पण स्वर्गसुख भोगल्यानंतर त्याला परत नरकामध्ये आणि त्यानंतर पुन्हा ८४ लक्ष योनींमध्ये फिरावे लागणार. हा येथील 'हार्ड अँड फास्ट' म्हणजेच कठोर आणि अटळ नियम आहे. तिन्ही लोकीच्या पूर्ण गुरूंविना देखिल हे प्राप्त होऊ शकत नाही.

अगदी अशाचप्रकारे जेव्हा एखाद्या ठिकाणी प्रधानमंत्री येत असतील, तर त्यांच्या आगमनापूर्वी दोन-तीन उत्कृष्ट वक्ते, गायक व तबला-बेंजो वाजवणारे आकर्षक आणि सुरेल आवाजात श्रोत्यांना प्रभावित करतात, परंतु ते जे काही म्हणत असतात, त्यामधील एकही गोष्ट करण्यास ते सक्षम नसतात. जेव्हा प्रधानमंत्री येतात, तेव्हा ते मात्र कमीत कमी शब्दांमध्ये सांगतात की आग्रा येथे आंतरराष्ट्रीय महाविद्यालय सुरू करा, चंदीगढमध्ये आंतरराष्ट्रीय विद्यापीठ बनवा इत्यादी. हे सर्व सांगून प्रधानमंत्री निघून जातात आणि दुसऱ्या दिवसापासून त्या कार्याला प्रारंभ होतो. कारण त्यांच्या शब्दामध्ये ताकद आहे. हीच गोष्ट मी किंवा माझ्यासारख्या इतर सर्वसामान्य व्यक्तिने सांगितली तर तो मूर्खपणा ठरेल. कारण आपल्या शब्दामध्ये तेवढी ताकद नाही किंवा आपणाला तेवढे अधिकार नाहीत. प्रधानमंत्र्यांसाठी मात्र ही सर्वसाधारण बाब आहे.

हे तथ्य पडताळून पाहण्यासाठी खाली दिलेल्या काही ओव्या वाचून त्यांचा खोल विचार करा आणि शीघ्रातिशीघ्र गुरुमंत्र प्राप्त करा.

कबीर, पंडित और मशालची, दोनों सूझैं नाहिं। औरों ने करैं चांदना, आप अंधेरे माहिं।।
कबीर, करणी तज कथनी कथैं, अज्ञानी दिन रात। कुकर ज्यों भौंकत फिरै, सुनी सुनाई बात ।।
गरीब, बीजक की बातां कहैं, बीजक नाहिं हाथ। पृथ्वी डोबन उतरे, कहैं-कहैं मीठी बात ।।
गरीब, बीजक की बातां कहैं, बीजक नाहिं पास। औरों को प्रमोध हीं, आपन चले निराश ।।
गरीब, कथनी के शूरे घने, कथैं अटम्बर ज्ञान। बाहर ज्वाब आवै नहीं, लीद करैं मैदान ।।

काखेत पोथी मारावी आणि म्हणावे की मी देखिल कथा सांगतो, मीही रामायणाचे पाठ करतो, गीता वर प्रवचन देतो, ग्रंथसाहेब ग्रंथाचे सार सांगतो, ज्ञानेश्वरीची पारायणे करून देतो, दासबोधाचा पाठ करून देतो, इतक्या कथा सांगणे आणि नामोपदेश देणे हा पोरखेळ नाही. पूर्ण संतांनाच कथा (सत्संग) सांगण्याचा आणि नामोपदेश देण्याचा अधिकार आहे आणि त्या कथांतील शंकांचे निरसनही तेच करू शकतात. कारण ज्याप्रमाणे शुकदेव ऋषिंच्या शब्दांमध्ये शक्ति होती, तशी पूर्ण संतांच्या शब्दांमध्ये शक्ति असते. जर कोणी एखादा सत्संग करू लागला आणि त्यात आंब्याची महिमा गाऊ लागला आंबा अत्यंत गोड असतो, तो फळांचा राजा आहे, त्यांचा रंग पिवळा-केशरी असतो इत्यादी आणि जर एखादा येऊन म्हणाला की अहो भाऊ, तो आंबा द्या बरं, तर सत्संग करणारा म्हणणार की माझ्याजवळ आंबा नाही. मग आंबा मागणारा विचारेल, मग तो कोठे मिळेल? तेव्हा सत्संग सांगणाऱ्याचे उत्तर असेल की त्यासंबंधी मला काही माहीत नाही बुवा. त्यावर आंबा मागणारा तत्काळ म्हणेल की अरे मुर्खा, जर तुझ्याकडे आंबा नाही आणि तो कोठे मिळेल हे देखिल तुला माहीत नाही, तर मग ही बाष्फळ बडबड करत का फिरत आहेस? सांगण्याचे तात्पर्य हेच की अधिकाराशिवाय कथा सांगणारे व त्याने सांगितलेले ऐकणारे सर्वच नरकाचे अधिकारी होतात.

जर कोणी व्यक्ती स्वत:ला गुरू बनवून शिष्य करत असेल, तर समजा की, तो आपल्या स्वत:च्या डोक्यावर पापाचा भार चढवून घेत आहे. कारण परमेश्वराचा नियम आहे की जोपर्यंत शिष्य मुक्त होत नाही, तोपर्यंत गुरूला वारंवार जन्म घ्यावाच लागतो. पूर्ण गुरू अर्धवट शिष्यांपासून सुटका करून घेण्यासाठी अशी लीला करतात, ज्यामुळे अज्ञानी शिष्याला गुरूंविषयी तिरस्कार वाटू लागतो. जेव्हा कबीर साहेब काशीमध्ये प्रगट झाले होते, त्यावेळी त्यांचे ६४ लाख शिष्य बनले होते. त्यांची परीक्षा घेण्यासाठी कबीर साहेबांनी काशी शहरामधील एका प्रसिद्ध वेश्येला सत्संगाचे ज्ञान समजावून सांगण्यासाठी तिच्या घरी जायला सुरवात केली. हे पाहून आणि यासंबंधीच्या वार्ता ऐकून शिष्यांमध्ये गुरूंविषयी तिरस्कार निर्माण झाला आणि सर्वांचा आपल्या पूर्ण गुरूंवरील विश्वास उडाला. केवळ दोघे शिष्य वगळता बाकीच्या साऱ्या जणांनी गुरूंची संगत सोडली. सतगुरु गरीब दास जी महाराजांच्या वाणीमध्ये याचे प्रमाण आले आहे की :-

गरीब, चंडाली के चौंक में, सतगुरु बैठे जाय। चौसठ लाख गारत गए, दो रहे सतगुरु पाय।।
भड़वा भड़वा सब कहैं, जानत नाहि खोज। दास गरीब कबीर कर्म से, बांटत सिर का बोझ।।

आमची तुम्हाला एवढीच प्रार्थना आहे की पूर्ण विचारविनिमय करूनच निर्णय घ्या.

'सामवेद'च्या ८२२ व्या श्लोकामध्ये सांगितले आहे की जीवात्म्यांना तीन नामांनी मुक्ति मिळेल. प्रथम ॐ, दुसरे सतनाम (तत्) आणि तिसरे सारनाम (सत्). भगवत गीता आणि गुरुग्रंथसाहेब देखिल ॐ-तत्-सत् हेच प्रमाण देतात आणि याच सतनामाचा जप करण्याचा निर्देश करत आहे. 'सतनाम-सतनाम' हा कोणताही जपण्याचा मंत्र नाही. हे तर केवळ त्या नामाकडे इशारा करते, जे सत्य आहे. अशाप्रकारे ते सारनामही आहे. केवळ एक 'ॐ' या मंत्रापासून काहीही लाभ शक्य नाही. हे तिन्ही नाम व नामोपदेश देण्याची आज्ञा मला माझे गुरुदेव स्वामी रामदेवानंदजी महाराजांकडून बक्षीसरूपात मिळाली आहे, जी कबीर साहेब यांच्या पिढीपासून पूर्वापार चालत आलेली आहे. प्रथम आपण सत्संग ऐका, सेवा करा, ज्यामुळे आपले भक्तिरूपी शेत पेरण्यायोग्य होईल.

कबीर, मानुष जन्म पाय कर, नहीं रटै हरि नाम। जैसे कुआँ जल बिना, खुदवाया किस काम।।
कबीर, एक हरि के नाम बिना, ये राजा ऋषभ हो। माटी ढोवै कुम्हार की, घास न डालेको ।।

यानंतर आपल्या पेरण्यायोग्य शेतामध्ये बीजारोपण करावे लागेल. पवित्र शास्त्रांच्या (कबीर साहेबांची वाणी, वेद, गीता, पुराण, कुराण, धर्मदास साहेब इत्यादी संतांची वाणी) अध्ययनाने मुक्ति मिळणार नाही. या सर्वच शास्त्रांचा एकच सार (तात्पर्य) आहे की पूर्ण मुक्तिसाठी पूर्ण परमात्मा कबीर साहेबांच्या प्रतिनिधी संतापासून (ज्यांना त्यांच्या गुरूंकडून नामोपदेश देण्याची आज्ञा असेल) नामोपदेश घेऊन आत्मकल्याण करवून घेतले पाहिजे. जर नामोपदेश घेतला नाही तर

नाम बिना सूना नगर, पड्या सकल में शोर।
लूट न लूटी बंदगी, हो गया हंसा भोर ।।
अदली आरती अदल अजूनी, नाम बिना है काया सूनी।
झूठी काया खाल लुहारा, इंगला पिंगला सुषमन द्वारा ।।
कृतघ्नी भूले नर लोई, जा घट निश्चय नाम न होई।
सो नर कीट पतंग भुजंगा, चौरासी में धर है अंगा ।।

जर बीजाचेच रोपण केले नाही, तर आत्मारूपी शेताची मशागत अर्थात तयारी करणे

**व्यर्थच होईल. सांगण्याचे तात्पर्य हेच आहे की त्यांच्यामुळे आपणास ज्ञान होईल, जे आवश्यक आहे. परंतु पूर्ण गुरूंकडून नामोपदेश घेणे अर्थात बीजाचे रोपण करणे हे देखिल अतिमहत्त्वाचे आहे. त्याच नामाचा जप करावा लागेल, ज्याचा जप गुरु नानक साहेब, गरीब दास साहेब जी, धर्मदास साहेब जी आदी संतांनी केला. याव्यतिरिक्त अन्य नामांपासून जीवांना मुक्ति (मोक्ष) मिळणारच नाही.**

**म्हणूनच सर्वांनी नामोपदेश घेऊन आपल्या भक्तिरूपी धनाचा संचय करायला प्रारंभ केला पाहिजे आणि इतरांनाही हे सांगणे आवश्यक आहे. जेवढे लवकर शक्य आहे, तेवढ्या लवकर हे केले पाहिजे. कारण या शरीरावरची आपली सत्ता केव्हा संपुष्टात येईल, याचा काहीच नेम नाही. गुरु नानक जीदेखील हेच सांगतात की–**

ना जाने ये काल की कर डारै, किस विधि ढल जा पासा वे।
जिन्हादे सिर ते मौत खुडगदी, उन्हानूं केडा हांसा वे ।।

**कबीर साहेब म्हणतात –**

कबीर, स्वांस स्वांस में नाम जपो, व्यर्था स्वांस मत खोए।
न जाने इस स्वांस का, आवन हो के ना होए ।।
सतगुरु सोई जो सारनाम दृढ़ावै, और गुरु कोई काम न आवै।

''सार नाम बिन पुरुष (भगवान) द्रोही''

**अर्थात, जो गुरू सारनाम व सारशब्द देत नाही अथवा त्याला आपल्या गुरूंकडून नाम देण्याचा अधिकार (आज्ञा) प्राप्त झालेला नाही म्हणजेच शास्त्रांचे अध्ययन करून जर कोणी मनमानी गुरू नाम देत असेल, तर तो गुरू आणि त्याचे शिष्य यांना नरकामध्ये टाकले जाईल. तो गुरू भगवानाचा शत्रू आहे, विद्रोही आहे. त्याला भगवानाच्या दरबारामध्ये उलटे लटकवले जाईल.**

**आता भक्त समाजात खोट्या गुरूंकडून (संताद्वारे) चुकीची धारणा पसरवली गेलेली आहे की एक गुरू केल्यानंतर दुसरा गुरू करायचा नसतो. पहिला गुरू बदलायचा नसतो. येथे जरा विचार करून पाहा, गुरू हे आपला जन्म–मृत्युरूपी रोग मुळापासून नष्ट करणारा कुशल वैद्य असतो. जर एका वैद्यापासून आपल्या रोगावर इलाज होत नसेल, तर आपण दुसऱ्या चांगल्या वैद्याजवळ (डॉक्टर) जातोच. त्यामुळे आपला जीवघेणा रोग नष्ट होतो. धर्मदास साहेबजींचे पहिले गुरू श्री रूपदासजी होते. परंतु त्यांना जेव्हा माहीत झाले की हे गुरू पूर्ण मुक्तिदाता नाहीत, तेव्हा लगेच त्यांनी रूपदासजींचा त्याग करून पूर्ण ब्रह्म परमेश्वर सतपुरुष कबीर साहेबजींना आपले गुरू बनविले आणि पूर्ण मोक्ष सतलोकी जाऊन प्राप्त केला. अगदी अशाचप्रकारे अपूर्ण गुरूंचा ताबडतोब त्याग केला पाहिजे.**

''झुठे गुरू के पक्ष को, तजत न कीजै वारि''

## (गुरू व नामाच्या महिमेची वाणी)

गरीब, बिन उपदेश अचंभ है, क्यों जीवत हैं प्राण। बिन भक्ति कहाँ ठौर है, नर नाहिं पाषाण ।।१।।
गरीब, एक हरि के नाम बिना, नारि कुतिया हो। गली–२ भौंकत फिरै, टूक ना डालै को ।।२।।
गरीब, बीबी पड़दे रहैं थी, ड्योढी लगती बार। गात उघाडे फिरती है, बन कुतिया बाजार ।।३।।
गरीब, नकबेसर नक से बनी, पहरत हार हमेल। सुन्दरी से सुनही (कुतिया) बनी, सुनि साहिब के खेल ।।४।।
कबीर, हरि के नाम बिना, राजा रषभ होए। माटी लदै कुम्हार कै, घास ना डाले कोए ।।५।।

कबीर, राम कृष्ण से कौन बड़ा, उन्हों भी गुरु कीन्ह। तीन लोक के वे धनी, गुरु आगे आधीन ।।६।।
कबीर, गर्भ योगेश्वर गुरु बिना, लागा हरि की सेव। कहै कबीर स्वर्ग से, फेर दिया सुखदेव ।।७।।
कबीर, राजा जनक से नाम ले, किन्ही हरी की सेव (पूजा) । कहै कबीर बैकुण्ठ में, उल्ट मिले सुखदेव ।।८।।
कबीर, सतगुरु के उपदेश का, लाया एक विचार। जै सतगुरु मिलते नहीं, जाता नरक द्वार ।।९।।
कबीर, नरक द्वार में दूत सब, करते खैंचा तान। उनतें कबहु ना छुटता, फिर फिरता चारों खान ।।१०।।
कबीर, चार खानी में भ्रमता, कबहु ना लगता पार। सो फेरा सब मिट गया, सतगुरु के उपकार ।।११।।
कबीर, सात समुन्द्र मसि करूं, लेखनी करूं बनराय। धरती का कागद करूं, गुरू गुण लिखा न जाए ।।१२।।
कबीर, गुरु बड़े गोविन्द से, मन में देख विचार। हरि सुमरे सो रह गए, गुरु भजे हुए पार ।।१३।।
कबीर, गोविन्द दोऊ खड़े, काके लागुंपाय बलिहारी गुरु आपने, जिन गोविन्द दिया मिलाय ।।१४।।
कबीर, हरि के रूठतां, गुरू की शरण में जाय। कबीर गुरु जै रुठजां, हरि नहीं होत सहाय ।।१५।।

## कोणत्या रामाचे नाम जपायचे ?

**भगवत गीता च्या १५ व्या अध्यायातील १६ वा श्लोक**

व्दौ, इमौ, पुरुषौ, लोके, क्षरः, च, अक्षरः, एव, च, क्षरः, सर्वाणि, भूतानि, कूटस्थः, अक्षरः, उच्यते ।।

**अनुवाद :- या संसारात नाशवान आणि दुसरे अविनाशी, असे दोन प्रकारचे भगवान आहेत आणि संपूर्ण भूतमात्रांचे शरीर नाशवान आहे व जीवात्म्याला अविनाशी म्हटले जाते.**

**भगवत गीता च्या १५ व्या अध्यायातील १७ वा श्लोक**

उतमः, पुरुषः, तु, अन्यः, परमात्मा, इति, उदाहृतः, यः, लोकत्रयम् आविश्य, बिभर्ति, अव्ययः, ईश्वरः ।।

**अनुवाद :- उत्तम भगवान तर दुसराच कोणी आहे, जो त्रिलोकांत प्रवेश करून सर्वांचे पालनपोषण करतो. याच भगवानास अविनाशी परमेश्वर परमात्मा संबोधले जाते.**

कबीर, अक्षर पुरुष एक पेड़ है, निरंजन वाकी डार।
त्रिदेवा (ब्रह्मा, विष्णु, शिव) शाखा भये, पात भया संसार ।।
कबीर, तीन देवको सब कोई ध्यावै, चोथा देवका मरम न पावै।
चोथा छांडि पँचम ध्यावै, कहै कबीर सो हमरे आवै।
कबीर, तीन गुणन की भक्ति में, भूलि पर्‌यौ संसार।
कहै कबीर निज नाम बिन, कैसे उतरै पार ।।
कबीर, ओंकार नाम ब्रह्म (काल) का, यह कर्ता मति जानि।
सांचा शब्द कबीर का, परदा माहिं पहिचानि ।।
कबीर, तीन लोक सब राम जपत है, जान मुक्ति को धाम।
रामचंद्र वसिष्ठ गुरु किया, तिन कहि सुनायो नाम ।।
कबीर, राम कृष्ण अवतार हैं, इनका नाहीं संसार।
जिन साहब संसार किया, सो किनहु न जनम्यां नारि ।।
कबीर, चार भुजाके भजन में, भूलि परे सब संत।
कबिरा सुमिरै तासु को, जाके भुजा अनंत।
कबीर, वाशिष्ट मुनि से तत्वेता ज्ञानी, शोध कर लग्न धरै।
सीता हरण मरण दशरथ को, बन बन राम फिरै ।।
कबीर, समुद्र पाटि लंका गये, सीता को भरतार।

ताहि अगस्त मुनि पीय गयो, इनमें को करतार ।।
कबीर, गोवर्धन कृष्ण जी उठाया, द्रोणागिरि हनुमंत।
शेष नाग सब सृष्टि उठाई, इनमें को भगवंत ।।
गरीब, दुर्वासा कोपे तहां, समझ न आई नीच।
छप्पन कोटि यादव कटे, मची रुधिर की कीच ।।
कबीर, काटे बंधन विपति में, कठिन किया संग्राम।
चीन्हों रे नर प्राणियां, गरुड बडो की राम ।।
कबीर, कह कबीर चित चेतहू, शब्द करौ निरूवार।
श्री रामचन्द्र को कर्ता कहत हैं, भूलि पर्‌यो संसार ।।
कबीर, जिन राम कृष्ण निरंजन किया, सो तो करता न्यार।
अंधा ज्ञान न बूझई, कहै कबीर बिचार ।।
कबीर, तीन गुणन (ब्रह्मा, विष्णु,शिव) की भक्ति में, भूल पड़यों संसार।
कहै कबीर निज नाम बिना, कैसे उतरो पार ।।

## ।।शब्द।। (संत रामपाल दास जी रचित)

युध्द जीत कर पांडव, खुशी हुए अपार। इन्द्रप्रस्थ की गद्दी पर, युधिष्ठिर की सरकार ।।१।।
एक दिन अर्जुन पूछता, सुन कृष्ण भगवान। एक बार फिर सुना दियो, वो निर्मल गीता ज्ञान ।।२।।
घमाशान युध्द के कारण, भूल पड़ी है मोहें। ज्यो का त्यों कहना भगवन्, तनिक न अन्तर होए ।।३।।
ऋषि मुनि और देवता, सबको रहे तुम खाय। इनको भी नहीं छोड़ा आपने, रहे तुम्हारा ही गुण गाय ।।४।।
कृष्ण बोले अर्जुन से, यह गलती क्यों किन्ह। ऐसे निर्मल ज्ञान को भूल गया बुध्दिहीन ।।५।।
अब मुझे भी कुछ याद नहीं, भूल पड़ी नीदान। ज्यों का त्यों उस गीता का मैं नही कर सकता गुणगान ।।६।।
स्वयं श्री कृष्ण को याद नहीं और अर्जुन को धमकावे। बुध्दि काल के हाथ है, चाहे त्रिलोकी नाथ कहलावे ।।७।।
ज्ञान हीन प्रचार का, ज्ञान कथें दिन रात। जो सर्व को खाने वाला, कहें उसी की बात ।।८।।
सब कहें भगवान कृपालु है, कृपा करें दयाल। जिसकी सब पूजा करें, वह स्वयं कहै मैं काल ।।९।।
मारै खावै सब को, वह कैसा कृपाल। कुत्ते गधे सुअर बनावै है, फिर भी दीन दयाल ।।१०।।
बाईबल वेद कुरान है, जैसे चांद प्रकास। सूरज ज्ञान कबीर का, करै तिमर का नाश ।।११।।
रामपाल साची कहै, करो विवेक विचार। सतनाम व सारनाम, यही मन्त्र है सार ।।१२।।
कबीर हमारा राम है, वो है दीन दयाल। संकट मोचन कष्ट हरण, गुण गावै रामपाल ।।१३।।

## ।।शब्द।। (संत रामपाल दास जी रचित)

ब्रह्मा विष्णु शिव, हैं तीन लोक प्रधान। अष्टंगी इनकी माता है, और पिता काल भगवान ।।१।।
एक लाख को काल, नित खावै सीना ताण। ब्रह्मा बनावै विष्णु पालै, शिव कर दे कल्याण ।।२।।
अर्जुन डर के पूछता है, यह कौन रुप भगवान। कहै निरंजन मै काल हूँ, सबको आया खान ।।३।।
ब्रह्म नाम इसी का है, वेद करें गुणगान। जन्म मरण चौरासी, यह इसका संविधान ।।४।।
चार राम की भक्ति में, लग रहा संसार। पाँचवें राम का ज्ञान नहीं, जो पार उतारनहार ।।५।।
ब्रह्मा-विष्णु-शिव तीनों गुण है दूसरा प्रकृति का जाल। लाख जीव नित भक्षण करें, राम तीसरा काल ।।६।।
अक्षर पुरुष है राम चौथा, जैसे चन्द्रमा जान। पाँचवा राम कबीर है, जैसे उदय हुआ भान ।।७।।
रामदेवानन्द गुरु जी, कर गए नजर निहाल। सतनाम का दिया खजाना, बरतै रामपाल ।।८।।

## नामदीक्षा घेणाऱ्या व्यक्तिंसाठी आवश्यक माहिती

१. पूर्ण गुरूंची ओळख :- आजच्या कलयुगात पूर्ण गुरू कोण, हे ओळखणे हा भक्त समाजापुढे एक कठीण प्रश्न आहे. परंतु याचे थोडक्यात आणि अत्यंत सोपे उत्तर आहे की जे गुरू शास्त्रांच्या अनुसार भक्ति करतात व आपल्या अनुयायांकडून करवून घेतात, तेच पूर्ण संत आहेत. कारण कबीर साहेबांची वाणी, नानक साहेबांची वाणी, वेद, गीता, पुराण, कुर्आन, पवित्र बायबल आदी भक्तिमार्गाचे संविधान म्हणजेच पवित्र धार्मिक शास्त्रच आहेत. जो संत शास्त्रानुसार भक्तिसाधना सांगतो, त्यानुसारच भक्त समाजाला मार्गदर्शन करतो, तोच पूर्ण संत आहे आणि जो शास्त्रांविरुद्ध साधना करवून घेतो, तो भक्त समाजाचा घोर शत्रू आहे. तो या अनमोल मनुष्य जन्माशी वाईटरीत्या खेळत आहे. अशा गुरू किंवा संताला भगवानाच्या दरबारामध्ये घोर नरकात उलटे लटकवले जाईल.

उदाहरणासाठी जसे कोणी अध्यापक सलेबस (पाठ्यक्रम) बाहेरचेच शिक्षण देत असेल तर तो त्या विद्यार्थ्यांचा शत्रूच म्हणावा लागेल.

गीता च्या ७ व्या अध्यायातील १५ वा श्लोक

न, माम्, दुष्कृतिनः, मूढाः, प्रपद्यन्ते, नराधमाः,<br>
मायया, अपहृतज्ञानाः, आसुरम्, भावम्, आश्रिताः ।।

अनुवाद :- मायाद्वारे ज्यांचे ज्ञानहरण झालेले आहे, असे आसुर स्वभाव धारण केलेले मनुष्य नीच दूषित कर्म करणारे मूर्ख माझी पूजा करत नाहीत म्हणजेच ते तीन गुणांची (रजगुण-ब्रह्मा, सतगुण-विष्णु, तमगुण-शिव) साधना करत बसतात. यजुर्वेदाच्या ४० व्या अध्यायातील १० वा श्लोक (संत रामपाल दास द्वारे भाषा-भाष्य)

अन्यदेवा हुः सम्भवादन्यदाहुरसम्भवात्, इति शुश्रुम धीराणां ये नस्तद्विचचक्षिरे ।।१०।।

मराठी अनुवाद :- सामान्यतः परमात्म्याविषयी निराकार म्हणजेच कधीही न जन्म घेणारा (अजन्मा) म्हटले जाते. काही जण आकारामध्ये म्हणजेच जन्म घेऊन अवतार रूपामध्ये येणारा म्हणतात. जे नित्य म्हणजेच पूर्णज्ञानी चांगल्याप्रकारे सांगतात, तेच योग्यप्रकारे समरूप अर्थात यथार्थ रूपामध्ये भिन्न भिन्न रूपाने प्रत्यक्ष ज्ञान देतात.

गीता च्या ४ थ्या अध्यायातील ३४ वा श्लोक

तत्, विद्धि, प्रणिपातेन, परिप्रश्नेन, सेवया,<br>
उपदेक्ष्यन्ति, ते, ज्ञानम्, ज्ञानिनः, तत्वदर्शिनः ।।

अनुवाद :- त्या पूर्ण परमात्म्याचे ज्ञान व त्यासंबंधीच्या प्रश्नांचे समाधान करू शकणाऱ्या संतांना नतमस्तक होऊन दंडवत घातल्याने, त्यांची सेवा केल्याने आणि निष्कपटपणे सरलतापूर्वक प्रश्न केल्याने परमात्मतत्त्व पूर्णपणे जाणणारे ज्ञानी महात्मा तुला त्या तत्त्वज्ञानाचा उपदेश करतील.

२. नशिल्या (उत्तेजक, उन्मादक) वस्तूंचे सेवन निषिद्ध :- हुक्का, मद्य (दारू), बीअर, तंबाखू, बिडी, सिगारेट, गुटखा, अफू, गांजा, मांस, अंडी आदी नशिल्या वस्तूंचे सेवन तर दूरच, अशा नशिल्या उत्तेजक वस्तू कोणाला आणून देखिल द्यायच्या नाहीत. बंदी छोड गरीब दास जी महाराज या सर्व अमली वस्तूंना अत्यंत वाईट असे सांगताना आपल्या वाणीमध्ये म्हणत आहेत की -

सुरापान मद्य मांसाहारी, गमन करै भोगैं पर नारी। सतर जन्म कटत है शीशं, साक्षी साहिब है जगदीशं।।
परद्वारा स्त्री का खोलै, सतर जन्म अंधा हावै डोलै। मदिरा पीवै कड़वा पानी, सत्तर जन्म श्वान के जानी।।
गरीब, हुक्का हरदम पिवते, लाल मिलावैं धूर। इसमें संशय है नहीं, जन्म पिछले सूर ।।१।।
गरीब, सो नारी जारी करै, सुरा पान सौ बार। एक चिलम हुक्का भरै, डुबै काली धार ।।२।।
गरीब, सूर गऊ कुं खात है, भक्ति बिहुनें राड। भांग तम्बाखू खा गए, सो चाबत है हाड ।।३।।
गरीब, भांग तम्बाखू पीव हीं, सुरा पान सैं हेत। गौस्त मट्टी खाय कर, जंगली बनें प्रेत ।।४।।
गरीब, पान तम्बाखू चाब हीं, नास नाक में देत। सो तो इरानै गए, ज्यूं भड़भूजे का रेत ।।५।।
गरीब, भांग तम्बाखू पीव हीं, गोस्त गला कबाब। मोर मृग कूं भखत है, देगें कहां जवाब ।।६।।

**३. तीर्थस्थानांना जाणे निषिद्ध :-** कोणत्याही प्रकारचे व्रतवैकल्य करायचे नाही. कोणत्याही तीर्थयात्रेस जायचे नाही. गंगास्नान वगैरेसारखे कोणतेही स्नान करायचे नाही. कोणत्याही धार्मिक स्थळावर स्नानासाठी किंवा दर्शनासाठी जायचे नाही, कोणत्याही मंदिरामध्ये देव आहे असे समजून मंदिर व तीर्थस्थानी पूजा व भक्तिच्या भावाने जायचे नाही. पुजाऱ्यांनी मंदिरामध्ये बांधून ठेवावा असा देव कोणतेही जनावर नाही. तो तर कणाकणांत व्यापलेला आहे. या सर्व साधना शास्त्रांविरुद्ध आहेत.

जरा विचार करून पाहा की ही सर्व तीर्थस्थळे (जगन्नाथ मंदिर, बद्रिनाथ, हरिद्वार, मक्का-मदिना, अमरनाथ, वैष्णोदेवी, वृंदावन, मथुरा, बरसाना, अयोध्येचे राम मंदिर, काशीधाम, छुडानीधाम आदी) मंदिर, मशीद, गुरुद्वारा, चर्च व इष्ट धाम आदी स्थळांवर एकेकाळी कोणी संत राहत होते? तेथे त्यांनी भक्तिसाधना केली, आपले भक्तिरूपी धन जमवले आणि शरीराचा त्याग करून आपल्या ईष्ट देवांच्या लोकी निघून गेले. त्यानंतर त्यांच्या स्मृती जपण्यासाठी त्या ठिकाणी कोणी मंदिर, कोणी मशीद, कोणी गुरुद्वार, कोणी चर्च, तर कोणी धर्मशाळा इत्यादींची रचना केली. भक्तिसाधना करणाऱ्यांची कायम स्मृती राहील आणि सर्वसामन्यांना जसे या महान आत्म्यांनी कर्म केलेले आहे, तसे आपण देखिल करायला हवे याचे प्रमाण मिळत राहील हाच त्यामागील उद्देश आहे. ही सर्वच धार्मिक स्थळे आपल्या सर्वांना हाच संदेश देतात की जशी भक्तिसाधना या प्रसिद्ध संतांनी केलेली आहे, तशीच आपणही केली पाहिजे. त्यासाठी आपण अशाप्रकारे साधना करणाऱ्या व सांगणाऱ्या संतांचा शोध घ्या व नंतर ते जसे सांगतील तसेच आचरण करा. नंतर मात्र अशा स्थानांचीच सर्व जण पूजा करू लागले. हे पूर्णपणे व्यर्थ आणि शास्त्रांविरुद्ध आहे.

ही सर्व स्थाने तर अशा स्थानासारखी आहेत, जेथे एखाद्या हलवायाने भट्टी बनवून जिलेबी, लाडू, मिठाई आदी पदार्थ बनवून स्वतः, आपल्या नातेवाइकांना, मित्रांना खाऊ घातले आहेत आणि निघून गेला आहे. आता त्या स्थानावर हलवाईही नाही आणि मिठाई देखिल नाही. तेथे उरली आहे ती केवळ भट्टी. ती भट्टी आपणाला मिठाई बनवायला शिकवू शकत नाही की मिठाईने आपले पोटही भरू शकत नाही. आता एखादा म्हणाला की चला रे, मी तुम्हाला ती भट्टी दाखवून आणतो जेथे एका हलवायाने कधी काली मिठाई बनवलेली होती. चला जाऊन येऊ या. तेथे जाऊन आपण भट्टी बघितली आणि सात प्रदक्षिणाही घातल्या. काय हो, आपल्याला मिठाई मिळाली का? आपल्याला मिठाई बनविण्याची प्रक्रिया सांगणारा हलवाई तेथे भेटला का? नाही. मग यासाठी आपणाला तसाच हलवाई शोधावा लागेल, जो अगोदर आपणाला मिठाई खाऊ घालेल आणि ती बनविण्याची प्रक्रियाही सांगेल. त्यानंतर मात्र तो हलवाई जे सांगेल, तेच करावे लागेल, अन्य नाही.

**अगदी अशाचप्रकारे तीर्थस्थानी पूजा करत व्यर्थ वाऱ्या घालण्यापेक्षा जे शास्त्रानुसार पूर्ण परमात्मा कबीर साहेबांची भक्ति करतात व सांगतात, अशा संतांचा शोध घ्यावा. ते जसे सांगतील अगदी तसेच करावे. आपल्या मनाप्रमाणे काहीही करू नये. सामवेद संख्या नं. १४०० उतार्चिक अध्याय नं. १२, खण्ड नं. ३, श्लोक नं. ५ (संत रामपाल दास द्वारे भाषा-भाष्य) :-**

भद्रा वस्त्रा समन्या३वसानो महान् कविर्निवचनानि शंसन्।
आ वच्यस्व चम्बो: पूयमानो विचक्षणो जागृविर्देववीतौ ।।५।।

**मराठी :- चतुर व्यक्तिंनी आपल्या वचनाद्वारे पूर्ण परमात्म्यांच्या (पूर्ण ब्रह्म) पूजेचा सत्यमार्ग न बघता, अमृतस्थानी असलेली उपासना सोडून सामान्य उपासना (भूत-पिशाच्च, पूजा, श्राद्ध घालणे, तीन गुणांची पूजा (रजगुण-ब्रह्मा, सतगुण-विष्णु, तमगुण-शंकर), तसेच ब्रह्म-काल काल ची पूजा, मंदिर, मशीद, गुरुद्वारा, चर्च, तीर्थस्थानी जाणे, उपवास आदी उपासना) करणे म्हणजेच जखमेतून किंवा फोडातून निघणाऱ्या पूसमान घाणीचे आदरयुक्त आचमन (ग्रहण) केल्यासारखेच असते. याच कारणास्तव परमसुखदायक पूर्ण ब्रह्म कबीर साहेब सशरीर साधारण वेशभूषेमध्ये ('वस्त्र' याचा अर्थ 'वेशभूषा' असा आहे. संतांच्या भाषेत याला 'चोला' देखिल (शरीर) म्हटले जाते. एखाद्या संताने शरीराचा त्याग केला, तर महात्मा चोला (शरीर) सोडून गेले, असे म्हटले जाते.) सतलोकीच्या शरीरासारखे दुसरे कमी तेजःपुंज असणारे शरीर धारण करून सर्वसामान्य व्यक्तिसारखे जीवन जगून काही दिवस या संसारामध्ये राहून आपल्या शब्द-साखी यांच्या माध्यमातून इतरांना ज्ञात नसलेल्या सत्यज्ञानाचा उलगडा करतात आणि पूर्ण परमात्म्याचे लपलेले वास्तविक सत्यज्ञान आणि भक्ती जागृत करतात.**

**गीता च्या १६ व्या अध्यायातील २३ वा श्लोक**

य:, शास्त्रविधिम्, उत्सृज्य, वर्तते, कामकारत:, न, स:,
सिध्दिम्, अवाप्नोति, न, सुखम्, न, पराम्, गतिम् ।।

**अनुवाद :- जी पुरुष शास्त्रविधींचा त्याग करून आपल्या इच्छेने मनमाना आचरण करतो तो ना सिद्धीला प्राप्त होतो ना परम गतीला आणि ना सुखालाही.**

**गीता च्या ६ व्या अध्यायातील १६ वा श्लोक**

न, अति, अश्र्नत:, तु, योग:, अस्ति, न, च, एकान्तम्,
अनश्र्नत:, न, च, अति, स्वप्नशीलस्य, जाग्रत:, न, एव, च, अर्जुन ।।

**अनुवाद :- हे अर्जुना! हा योग अर्थात भक्ति अतिशय खाणाऱ्यांना किंवा काहीच न खाणाऱ्यांना,तसेच एकाच जागी बसून साधना करणाऱ्याला तथा तसेच खूप झोपणाऱ्याला किंवा नेहमी जागे राहणाऱ्या व्यक्तिंनाही सिद्ध होत नाही.**

पूजैं देई धाम को, शीश हलावै जो। गरीबदास साची कहै, हद काफिर है सो ।।
कबीर, गंगा काठै घर करै, पीवै निर्मल नीर। मुक्ति नहीं हरि नाम बिन, सतगुरु कहैं कबीर।।
कबीर, तीर्थ कर-कर जग मूवा, उडै पानी न्हाय। राम ही नाम ना जपा, काल घसीटे जाय ।।
गरीब, पीतल ही का थाल है, पीतल का लोटा। जड़ भूरत को पूजतें, आवैगा टोटा ।।
गरीब, पीतल चमच्चा पूजिये, जो थाल परोसै। जड़ मूरत किस काम की, मति रहो भरोसै ।।
कबीर, पर्वत पर्वत मैं फिर्‌या, कारण अपने राम । राम सरीखे जन मिले, जिन सारे सब काम ।।

**४. पितरांची पूजा, श्राद्ध निषेध :- कोणत्याही प्रकारची पितरपूजा, श्राद्ध घालणे असे कोणतेही विधी करायचे नाहीत. भगवान श्री कृष्णजींनी देखिल पितरांची व भूत-पिशाच्चांची पूजा**

**करण्यास स्पष्टपणे मनाई केलेली आहे. गीता च्या ९ व्या अध्यायातील २५ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की :-**

यान्ति, देवव्रता:, देवान्, पितृऋन्, यान्ति, पितृव्रता:।
भूतानि, यान्ति, भूतेज्या:, मद्याजिन:, अपि, माम्।

**अनुवाद :- देवी-देवतांची पूजा करणारे देवी-देवतांना प्राप्त होतात, पितरांची पूजा करणारे पितरांना प्राप्त होतात, भूत-पिशाच्चांची पूजा करणारे भूत-पिशाच्चांना प्राप्त होतात आणि माझ्या मतानुसार माझी पूजा करणारे भक्त मलाच प्राप्त होतात.**

**बंदी छोड गरीब दास जी महाराज आणि कबीर साहेब जी महाराज देखिल म्हणतात-**

''गरीब, भूत रमै सो भूत है, देव रमै सो देव। राम रमै सो राम है, सुनो सकल सुर भेव ।।''

**यासाठी त्याच (पूर्ण परमात्मा) परमेश्वराची भक्ति करा ज्याच्याकडून पूर्ण मुक्ती मिळते. तो परमात्मा म्हणजे पूर्ण ब्रह्म सतपुरुष (सत कबीर) आहेत. याचे प्रमाण गीता च्या १८ व्या अध्यायातील ४६ व्या श्लोकामध्ये आहे.**

यत: प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम्।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिध्दिं विन्दति मानव: ।।४६।।

**अनुवाद :- ज्या परमेश्वरापासून संपूर्ण प्राण्यांची उत्पत्ती झालेली आहे आणि समस्त विश्व ज्याने व्यापलेले आहे, त्या परमेश्वराची आपल्या स्वाभाविक कर्मांद्वारे पूजा करून मनुष्यास परमसिद्धी प्राप्त होते.**

**गीता च्या १८ व्या अध्यायातील ६२ वा श्लोक :-**

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।
तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ।।६२।।

**अनुवाद :- हे भरतवंशोभ्द्रव अर्जुन! तू सर्वस्व भावाने त्या ईश्वराला शरण जा. त्यांच्या कृपेने तुला परमशांती, (संसारापेक्षा सर्वथा वेगळी) आणि अविनाशी परमपद प्राप्त होईल.**

**सर्वस्व भावाचे तात्पर्य असे आहे की कोणतीही अन्य पूजा न करता मन-कर्म-वचन यांनी एका ईश्वरावर श्रद्धा ठेवणे.**

**गीता च्या ८ व्या अध्यायातील २२ वा श्लोक :-**

पुरुष: स पर: पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया।
यस्यान्त: स्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् ।।२२।।

**अनुवाद :- हे पृथानंदन अर्जुना! सर्व प्राणी ज्याच्या अंतर्गत आहेत आणि ज्याने हा संपूर्ण संसार व्यापलेला आहे, तो परमपुरुष परमात्मा तर अनन्यभावे भक्ती केल्यानेच प्राप्त होणे संभव आहे.**

**अनन्यभावे भक्ती याचे तात्पर्य असे आहे की एका परमेश्वराची (पूर्ण ब्रह्म) भक्ती करणे. दुसऱ्या देवी-देवता म्हणजेच त्रिगुणांची (रजगुण-ब्रह्मा, सतगुण-विष्णु, तमगुण-शिव) भक्ति करू नये. गीता च्या पंधराव्या अध्यायातील १, ते ४ था श्लोक :-**

**गीता च्या १५ व्या अध्यायातील १ ला श्लोक**

उर्ध्वमूलम्, अध:शाखम्, अश्वत्थम्, प्राहु:, अव्ययम्,
छन्दांसि, यस्य, पर्णानि, य:, तम्, वेद, स:, वेदवित् ।।१।।

अनुवाद :- वरील बाजूला मूळ आणि खालील बाजूला फांद्या असलेला अविनाशी जो विस्तृत विस्तुत वृक्ष आहे, जो घोड्यासारखा मजबूत असून ज्याचे छोटे-छोटे भाग म्हणजेच शाखा (फांद्या) व पाने असे विभाग म्हटले आहे, त्या संसाररूपी वृक्षाला जो अशाप्रकारे जाणतो, तो भक्त पूर्ण ज्ञानी आहे.

गीता च्या १५ व्या अध्यायातील २ रा श्लोक

अधः, च, उर्ध्वम्, प्रसृताः, तस्य, शाखाः, गुणप्रवृध्दाः, विषयप्रवालाः,
अधः, च, मूलानि, अनुसन्ततानि, कर्मानुबन्धीनि, मनुष्यलोके ।।२।।

अनुवाद :- त्या वृक्षाची खाली आणि वर त्रिगुणरूपी (ब्रह्मा-रजगुण, विष्णु-सतगुण, शिव-तमगुण) विस्तारलेल्या विकार-काम, क्रोध, मोह, लोभ, अहंकार रूपी कोवळ्या फांद्या आहेत, ब्रह्मा, विष्णु, शिव जीवांना कर्मामध्ये बांधणारी ही मुळे अर्थात मूळ कारण आहेत. तसेच मनुष्यलोक, स्वर्ग, नरक हे तिन्ही लोक पृथ्वी लोकात खाली (८४ लक्ष योनींमध्ये) आणि वर स्थित केलेले आहेत.

गीता च्या १५ व्या अध्यायातील ३ रा श्लोक

न, रूपम, अस्य, इह, तथा, उपलभ्यते, न अन्तः, न, च, आदिः, न, च, सम्प्रतिष्ठा,
अश्वत्थम्, एनम्, सुविरूढमूलम्, असंगशस्त्रेण, दृढेन, छित्वा ।।३।।

अनुवाद :- या रचनेची नाही सुरवात तसेच नाही शेवट आहे नाही तसे स्वरूप प्राप्त होते आणि येथे विचार कालद्वारे म्हणजेच माझ्याद्वारे दिल्या जाणाऱ्या गीता ज्ञानाची पूर्ण माहिती मलाही नाही. कारण सर्व ब्रह्माण्डांची रचना योग्यप्रकारे स्थित आहे का, याचे मलाही ज्ञान नाही. या चांगल्याप्रकारे स्थायी स्थिती असणारा मजबूत स्वरूपाचा पूर्ण ज्ञानरूपी दृढ सूक्ष्म वेद म्हणजेच तत्त्वज्ञानाद्वारे जाणून छाटून म्हणजेच निरंजनाच्या भक्तिला क्षणिक अर्थात क्षणभंगूर समजा. (३)

गीता च्या १५ व्या अध्यायातील ४ था श्लोक

ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन्गता न निवर्तन्ति भूयः।
तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रतृत्ति प्रसृता पुराणी ।।४।।

अनुवाद :- त्यानंतर त्या परमपद परमात्म्याचा शोध घेतला पाहिजे. ज्यांना प्राप्त झालेले मानव परत या नाशवान संसारामध्ये येत नाहीत आणि ज्यांच्यापासून अनादि काळापासून चालत आलेली ही सृष्टि विस्तारलेली आहे, त्या आदिपुरुष परमात्म्यालाच मी शरण आहे.

अशाप्रकारेच स्वतः भगवान श्री कृष्णाने देवी-देवतांचा राजा इंद्र याच्या पूजेचा देखिल त्याग करून त्या परमात्म्याची भक्ति करण्याचीच प्रेरणा दिलेली होती, ज्यामुळे त्यांनी गोवर्धन पर्वत उचलून इंद्राच्या कोपापासून व्रज वासीयांचे रक्षण केले.

गरीब, इन्द्र चढ़ा ब्रिज डुबोवन, भीगा भीत न लेव।
इन्द्र कढाई होत जगत में, पूजा खा गए देव।।
कबीर, इस संसार को, समझाऊँ कै बार।
पूँछ जो पकड़ै भेढ की, उतरा चाहै पार ।।

५. गुरुआज्ञेचे पालन :- गुरुदेवजींच्या आज्ञेशिवाय घरामध्ये कोणत्याही प्रकारचे धार्मिक अनुष्ठान करू नये. याबाबत बंदी छोड आपल्या वाणीमध्ये म्हणतात की :-

"गुरु बिन यज्ञ हवन जो करही, मिथ्या जावे कबहु नहीं फलहीं।"

कबीर, गुरु बिन माला फेरते, गुरु बिन देते दान।
गुरु बिन दोनों निष्फल हैं, पूछो वेद पुराण ।।

**६. माता मसानी पूजन निषिद्ध :- आपल्या शेतामधील समाधी किंवा कोणत्याही खेड्यामधील एखाद्या स्थानांवरील समाधी अथवा अन्य देवतांच्या समाधीची पूजा करू नये. समाधी कोणाचीही असो, अजिबात तिची पूजा करायची नाही. इतर कोणत्याही उपासना करू नये. त्रिगुणांची देखील (ब्रह्मा, विष्णु, महेश) पूजा करायची नाही. केवळ सतगुरु सतगुरु जींनी सांगितल्याप्रमाणेच आचरण करायचे आहे.**

**गीता च्या ७ व्या अध्यायातील १५ वा श्लोक**

न, माम्, दुष्कृतिनः, मूढाः, प्रपद्यन्ते, नराधमाः,
मायया, अपहृतज्ञानाः, आसुरम्, भावम्, आश्रिताः ।।

**अनुवाद :- मायेद्वारे ज्यांचे ज्ञानहरण झालेले आहे, असे आसुर स्वभाव धारण केलेले मनुष्य, नीच, दूषित कर्म करणारे मूर्ख, माझी पूजा करत नाहीत. ते तिन्ही गुणांचीच (रजगुण-ब्रह्मा, सतगुण-विष्णु, तमगुण-शिव) साधना करत बसतात.**

कबीर, माई मसानी शेढ शीतला, भैरव भूत हनुमंत। परमात्मा उनसे दूर है, जो इनको पूजंत ।।
कबीर, सौ वर्ष तो गुरु की सेवा, एक दिन आन उपासी। वो अपराधी आत्मा, परै काल की फांसी।।
गुरु को तजै भजै जो आना। ता पसुवा को फोकट ज्ञाना ।।

**७. कबीर साहेब संकटमोचन आहेत :- कर्मभोगाचा त्रास झाल्यास, संकट आल्यानंतर कोणत्याही अन्य इष्ट देवतांची किंवा समाधींची पूजा कधीच करायची नाही. कोणत्याही प्रकारचे अन्य वाचन, पारायणे, व्रत करायचे नाही आणि कोणत्याही मांत्रिकास दाखवायचे नाही. केवळ बंदी छोड कबीर साहेबांची पूजा करायची आहे, जे सर्व दु:खहरण करणारे संकटमोचन आहेत.**

**सामवेद संख्या नं. ८२२ उतार्चिक अध्याय ३ खण्ड नं. ५, श्लोक नं. ८, (संत रामपाल दास द्वारा भाषा-भाष्य) :-**

मनीषिभिः पवते पूर्व्यः कविर्नृभिर्यतः परि कोशां असिष्यदत्।
त्रितस्य नाम जनयन्मधु क्षरन्निन्द्रस्य वायुं सख्याय वर्धयन् ।।५।।

**अनुवाद :- सनातन अर्थात अविनाशी कबीर परमेश्वर हृदयापासून इच्छिणाऱ्या, श्रद्धेने भक्ति करणाऱ्या भक्तात्म्यास तीन मंत्रांचा उपदेश देऊन पवित्र करतात आणि जन्म-मृत्यूपासून सुटका करतात, तसेच त्याचे प्राण म्हणजेच जीवनश्वासांना संस्कारवश आपल्या मित्र अर्थात भक्त मोजुन टाकलेले असतात त्यास आपल्या भण्डारातुन पुर्ण रूपाने वाढवितात. त्या रूपाने परमेश्वरापासून मिळणारा वास्तविक आनंद आपल्या आशीर्वाद प्रसादाने प्राप्त करवून देतात.**

कबीर, देवी देव ठाढे भये, हमको ठौर बताओ। जो मुझ (कबीर) को पुजैं नहीं, उनको लूटो खाओ।
कबीर, काल जो पीसैं पीसना, जोरा है पनिहार। ये दो असल मजूर हैं, सतगुरु के दरबार।

**८. अनावश्यक दान निषेध :- कोठेही आणि कोणालाही दान रूपामध्ये काहीही द्यायचे नाही. पैसे, कपडे असे काहीही द्यायचे नाही. जर कोणी दान रूपामध्ये काही मागत असेल, तर त्याला भोजन (अन्नदान) खाऊ घालावे. चहा, दूध, लस्सी, पाणी प्यायला द्या. परंतु वस्तुरूपात काहीही द्यायचे नाही. कदाचित तो भिक्षुक त्या पैशांचा दुरुपयोगही करेल. एखाद्या व्यक्तिकडे भिकाऱ्याने त्याची लहान बाळे उपचाराविना तडफडत आहेत, असे खोटे सांगून काही**

पैसे मागितले आणि भिकाऱ्याची कथा ऐकून भावनावश होऊन त्या व्यक्तिने भिकाऱ्याला शंभर रुपये दिले. तो भिकारी पूर्वी बाटलीचा पाव भाग दारू पीत होता आणि पैसे मिळाल्यावर त्या दिवशी अर्धी बाटली दारू प्यायला आणि त्याने आपल्या पत्नीला मारहाण केली. त्याच्या पत्नीने बाळासह आत्महत्या केली. येथे तुम्ही केलेले दान त्या परिवाराच्या विनाशाचे कारण बनले. जर अशा एखाद्या दु:खी व्यक्तिला मदत करण्याची तुमची इच्छा असेल, तर त्याच्या बाळाला डॉक्टरांकडे नेऊन औषधे द्या. पण पैसे कधीही देऊ नका :-

कबीर, गुरु बिन माला फेरते, गुरु बिन देते दान।।गुरु बिन दोनों निष्फल हैं, पूछो वेद पुरान ।।

**९. उष्टे खाणे निषिद्ध :-** ज्या व्यक्ति मद्य, मांस, तंबाखू, अंडे, बीअर, अफीम, गांजा आदींचे सेवन करतात, त्यांचे उष्टे अन्न कधीही खाऊ नये.

**१०. देहांतानंतरचे (सत्यलोक गमन) क्रियाकर्म निषिद्ध :-** जर परिवारातील कोणाचा मृत्यू झाला तर त्यास अग्नि कोणीही देवु शकतो, अग्नि देते वेळेस मंगलाचरण केले पाहिजे. तेथे फुल वगैरे काही ठेवायचे नाही. जर ती जागा साफ करणे गरजेचे असेल तर आपण स्वत: उचलुन वाहत्या पाण्यामधे टाकु शकता. त्यावेळेस मंगलाचरण उच्चारण करावे. पिंडदान, तेरावा, सहामाही, वर्षश्राध्द असे काहीही करु नये. सर्व नातेवाइक व भाउबंधांसाठी दुख: व्यक्त करण्यासाठी एक दिवस निवडावा. त्या दिवशी दररोज करण्याचा नित्यनियम लावावा. मृत्यु झालेल्या व्यक़्तिच्या नावाने काही दान धर्म करायचा असेल तर गुरुजींची आज्ञा घेउन बंदी छोड गरीब दास महाराजांचा अमृत'यी वाणीचा अख़ंड पाठ करावा. जर पाठ करण्याची आज्ञा न मिळाल्यास घरामध्ये चार किंवा सात दिवसाची अखण्ड देशी तुपामध्ये ज्योत लावावी. दिवसातुन ४ वेळ प्रथम मंत्र जप करावा व त्यातील ३ किंवा १ मंत्राचा दान संकल्प करावा. जसे योग्य समजाल तसे १ ते ३ दिवस मंत्र जाप करावा व मंत्र दान संकल्प करावा दररोज हे लक्षात ठेवुन ज्योती, आरती व मंत्र करावा.

कबीर, साथी हमारे चले गए, हम भी चालन हार। कोए कागज में बाकी रह रही, ताते लाग रही वार।।
कबीर, देह पडी तो क्या हुआ, झूठा सभी पटीट। पक्षी उड्या आकाश कूं, चलता कर गया बीट ।।

## ''कर्म काण्डा विषयी सत्य कथा''

माझे (संत रामपाल दास यांचे) पूज्य गुरुदेव स्वामी रामदेवानंदजी महाराज यांना सोळाव्या वर्षी एका महात्म्याचा सत्संग ऐकून वैराग्य प्राप्त झाले. एक दिवस ते शेतामध्ये गेले होते. जवळच एक जंगल होते. त्या जंगलामध्ये जाऊन त्यांनी एका मृत जनावराच्या हाडांजवळ आपले कपडे फाडून फेकले आणि ते महात्माजींसोबत निघून गेले.

घरातील व्यक्तींनी जेव्हा त्यांचा शोध घेतला, तेव्हा त्यांना जंगलामध्ये हाडांजवळ त्यांचे फाटलेले कपडे दिसले. घरच्यांना वाटले की एखाद्या जंगली प्राण्याने त्यांना खाल्ले असावे. त्यांनी ती कपडे आणि हाडे उचलून घरी आणली आणि अंतिम संस्कार केले. त्यानंतर दहावा, तेरावा, वर्षश्राद्ध घालण्यात आले. त्यानंतर प्रत्येक वर्षी श्राद्ध घालणे सुरूच झाले.

जेव्हा माझे पूज्य गुरुदेव अत्यंत वृद्ध झाले, तेव्हा एकदा त्यांच्या स्वत:च्या घरी गेले. त्यावेळी त्यांच्या घरच्यांना समजले की ते जिवंत आहेत आणि घर सोडून निघून गेलेले होते. घरच्यांनी सांगितले की जेव्हा तुम्ही घर सोडून गेला, तेव्हा तुमचा फार शोध घेण्यात आला. शेवटी जंगलामध्ये तुमचे कपडे मिळाले. त्या कपड्यांजवळ काही हाडेही पडलेली दिसली, तेव्हा आम्हाला वाटले की एखाद्या हिंस्र प्राण्याने तुम्हाला खाऊन टाकले असेल. आम्ही ते कपडे आणि हाडे घरी आणून अंतिम संस्कार केला.

नंतर मी (संत रामपाल दास) माझ्या पूज्य गुरुदेवांच्या लहान बंधूंच्या पत्नीला विचारले की जेव्हा आमचे पूज्य गुरुदेव घर सोड्न निघून गेले, त्यानंतर तुम्ही त्यांच्या माघारी काय केले? तिने सांगितले की जेव्हा विवाह होऊन मी या घरी आले, तेव्हा त्यांचे श्राद्ध घातले होते. त्यानंतर मी माझ्या स्वत:च्या हातांनी त्यांचे सुमारे सत्तर वेळा श्राद्ध घातले आहे. तिने पुढे सांगितले की जेव्हा घरामध्ये एखादे नुकसान व्हायचे, म्हणजे म्हशीने दूध न देणे, म्हशीचे सड खराब होणे किंवा अन्य काही तरी नुकसान, त्यावेळी आम्ही एखाद्या शहाण्या मांत्रिकाकडे जायचो. तो म्हणायचा की तुमच्या घरी कोणाचा तरी नि:संतान, लग्न न होता मृत्यू झालेला आहे. तेच तुम्हाला दु:खी करत आहे. त्यावेळी आम्ही त्या मांत्रिकाला वस्त्रे, धन इत्यादी द्यायचो.

यावर मी म्हणालो कीहे तर जगाचा उद्धार करत आहेत. हे कुठे कोणाला काय दु:ख देत होते? ते तर आता सुखदाता आहेत. आता तर ते आपल्यासमोरच आहेत. आता तर श्राद्ध घालणे इत्यादी व्यर्थ साधना बंद करा. तेव्हा त्या म्हणाल्या की ही तर आमची जुनी परंपरा आहे. हे कसे काय सोडू? याचा अर्थ असा की ''आपण आपल्या जुन्या रीती-परंपरांमध्ये इतके लीन झालेलो आहोत'' की प्रत्यक्ष प्रमाण असूनही त्या अयोग्य परंपरा आपण सोडू शकत नाही. यावरून हे सिद्ध होते की श्राद्ध घालणे, पितरपूजा करणे इत्यादी सर्व व्यर्थ आहे.

**११. आपत्य जन्मानंतर शास्त्राविरुद्ध पूजा निषिद्ध :-** घरामध्ये बाळाचा जन्म झाल्यानंतर पाचवी, सहावी म्हणजेच त्या त्या दिवशी जो विधी केला जातो, तो करू नये. सुतक पाळून दररोजची पूजा, भक्ती, आरती, गावरान तुपाचा दीवा प्रज्वलन करणे इत्यादी बंद करू नये. ते नेहमीप्रमाणे चालू ठेवावे.

या संदर्भात एक संक्षिप्त कथा सांगतो- एका व्यक्तिला लग्नानंतर दहा वर्षांनी पुत्र झाला. पुत्रजन्माचा त्याने मोठ्या प्रमाणात आनंदोत्सव साजरा केला. आजूबाजूच्या वीस-पंचवीस गावांना भोजनासाठी आमंत्रण दिले गेले. गाणे-बजावणे झाले. अर्थात, त्याने भरपूर पैसा खर्च केला. त्यानंतर वर्षभरातच त्याच्या मुलाचा मृत्यू झाला. त्यामुळे ते कुटुंब डोके आपटून घेत रडत बसले आहे आणि आपल्या दुर्भाग्याला दोष देत आहे. म्हणूनच कबीर साहेब आपणाला सांगतात की :-

कबीर, बेटा जाया खुशी हुई, बहुत बजाये थाल। आना जाना लग रहा, ज्यों कीडी का नाल।।
कबीर, पतझड़ आवत देख कर, बन रोवै मन माहिं। ऊंची डाली पात थे, अब पीले हो हो जाहिं।।
कबीर, पात झडतां यूं कहै, सुन भई तरुवर राय। अब के बिछुडे नहीं मिला, न जाने कहां गिरेंगे जाय।।
कबीर, तरूवर कहता पात से, सुनों पात एक बात। यहाँ की याहे रीति है, एक आवत एक जात ।।

**१२. धार्मिकस्थळी जावळ काढणे निषिद्ध :-** लहान बालकांचे कोणत्याही धार्मिकस्थळी जाऊन जावळ काढू नये. जेव्हा जेव्हा केस वाढतील, तेव्हा ते कापा आणि फेकून द्या. एका मंदिरामध्ये एक प्रसंग पाहिला- श्रद्धाळू भक्त आपल्या मुलाचे किंवा मुलीचे जावळ काढण्यासाठी आले. तेथे हजर असलेल्या न्हाव्याने बाहेरच्यापेक्षा तिप्पट दराने केस कापले आणि त्या माता-पित्यांना दिले. त्यांनी श्रद्धेने ते मंदिरामध्ये अर्पण केले. पुजाऱ्याने ते केस एका पिशवीमध्ये टाकून ठेवले आणि रात्री दूर एकांतस्थानी फेकून दिले. ही केवळ नाटकबाजी आहे. मग जाऊळ काढण्यापेक्षा नेहमीप्रमाणे केस कापून स्वत: बाहेर का फेकून देऊ नयेत? परमात्मा नामजपाने प्रसन्न होतो, पाखण्डीपणाने नाही.

**१३. नामजपाने सुखप्राप्ती :-** नामोपदेश केवळ दु:खनिवारणाच्या दृष्टिकोनातून घेऊ नये, तर

**ते आत्मकल्याणासाठी घ्यावे. त्यानंतर नामजपाच्या प्रभावाने एकेक करत सर्व सुख आपोआपच प्राप्त होते.**

''कबीर, सुमिरण से सुख होत है, सुमिरण से दुःख जाए।
कहैं कबीर सुमिरण किए, सांई माहिं समाय।।''

**१४. व्यभिचार निषिद्ध :- परस्त्रीकडे माता-कन्या-बहीण या दृष्टीने पाहावे. व्यभिचार महापाप आहे. जसे :-**

गरीब, पर द्वारा स्त्री का खोलै। सत्तर जन्म अन्धा हो डोलै ।।सुरापान मद्य मांसाहारी। गवन करें भोगैं पर नारी।।सत्तर जन्म कटत हैं शीशं। साक्षी साहिब है जगदीशं।।पर नारी ना परसियों, मानो वचन हमार।भवन चर्तुदश तास सिर, त्रिलोकी का भार।।पर नारी ना परसियो, सुनो शब्द सलतंत।धर्मराय के खंभ से, अर्धमुखी लटकंत ।।

**१५. निंदा करणे व ऐकणे निषिद्ध :- चुकूनही आपल्या गुरूंची निंदा करू नये व ऐकू नये. ऐकू नये म्हणजे जर कोणी आपल्या गुरूंविषयी मिथ्या, अयोग्य गोष्टी सांगत असतील तर आपण त्यांच्याबरोबर भांडायचे नाही किंवा मारामारी करायची नाही तर ते कसलाही विचार न करता बोलत आहेत खोटे बोलत आहेत असे समजायचे.**

'गुरु की निंदा सुनै जो काना। ताको निश्चय नरक निदाना ।।
अपने मुख निंदा जो करहीं। शुकर श्वान गर्भ में परहीं ।।'

**भले समोरची व्यक्ति कितीही सामान्य असू दे, तुम्ही निंदा तर कोणाचीच करायची नाही आणि ऐकायची देखील नाही. याबाबत कबीर साहेब म्हणतात की-**

''तिनका कबहू न निन्दीये, जो पांव तले हो।कबहु उठ आखिन पड़े, पीर घनेरी हो ।।''

**१६. गुरू दर्शनाची महिमा :- वेळ मिळेल तेव्हा सत्संग ऐकायला जायचा प्रयत्न केला पाहिजे. गुरूंचे मार्गदर्शन व सत्संग या दोन गोष्टी भक्तांच्या दृष्टीने जणू पर्वणीच आहेत. सत्संगामध्ये नखरे (मान, प्रतिष्ठा, बढाई, दिखाऊगिरी) करण्यासाठी येऊ नये. स्वतःला एक आजारी रोगी समजून यावे. आजारी व्यक्ति कितीही श्रीमंत असो, उच्च पदवीधर असो, जेव्हा रुग्णालयात जाते, तेव्हा त्या व्यक्तिचा उद्देश केवळ रोगमुक्त होणे हाच असतो. जेथे डॉक्टर बसायला सांगतील, तेथे ती व्यक्ति बसते, झोपायला सांगितल्यावर झोपते, उठायला सांगितले की उठते, बाहेर जायला सांगितले, तर बाहेर जाते. बाहेर गेल्यानंतर लगेच आत यायला सांगितले, तर ती व्यक्ति लगेच आत येते. आगदी याच भावाने तुम्ही जर सत्संगाला येत असाल, तरच त्याचा लाभ प्राप्त होईल. अन्यथा आपले तेथे जाणे पूर्ण निष्फळ ठरेल. सत्संगामध्ये जेथे बसण्यास मिळेल तेथे बसावे, खायला-प्यायला जे अन्नपाणी मिळेल, ते परमात्मा कबीर साहेबजींच्या कृपेचा प्रसाद समजून प्रसन्न चित्ताने सेवन करावे.**

कबीर, संत मिलन कूं चालिए, तज माया अभिमान। जो जो कदम आगे रखे, वो ही यज्ञ समान।।
कबीर, संत मिलन कूं जाईए, दिन में कई-कई बार। आसोज के मेह ज्यों, घना करे उपकार।।
कबीर, दर्शन साधु का, परमात्मा आवै याद। लेखे में वोहे घड़ी, बाकी के दिन बाद।।
कबीर, दर्शन साधु का, मुख पर बसै सुहाग। दर्श उन्हीं को होत हैं, जिनके पूर्ण भाग ।।

**१७. गुरुमहिमा :- जर एकाद्या ठिकाणी पाठ किंवा सत्संग सुरू असेल अथवा तुम्ही गुरूंच्या दर्शनासाठी गेला असाल, तर सर्वप्रथम गुरुजींना साष्टांग दंडवत घालावा. त्यानंतर संत ग्रंथसाहेब व प्रतिमा जशा की कबीर साहेबांची प्रतिमा, गरीब दास जी महाराजांची, स्वामी**

**रामदेवानंदजी व गुरुजी यांच्या प्रतिमांना दंडवत घालावा, ज्यामुळे आपल्या मनात त्या प्रकारचे भावनिर्माण होतील. मूर्तिपूजा करायची नाही. केवळ प्रणाम करणे हा प्रकार कोणत्याही पूजेत मोडत नाही, तर तो भक्तांच्या मनात श्रद्धा दृढ करण्यासाठी सहयोगी ठरतो. पूजा तर केवळ जे मुक्ती देणार आहेत, त्या गुरू व नाममंत्राची करायची आहे.**

'कबीर, गुरु गोविन्द दोऊ खड़े, काके लागुं पाय।
बलिहारी गुरु आपने, जिन गोविन्द दियो मिलाय ।।
कबीर, गुरु बडें है गोविन्द से, मन में देख विचार।
हरि सुमरे सो रह गए, गुरु भजे होय पार ।।
कबीर, हरि के रुठतां, गुरु की शरण में जाय।
कबीर गुरु जै रुठजां, हरि नहीं होत सहाय ।।
कबीर, सात समुन्द्र की मसि करुं, लेखनि करुं बनिराय।
धरती का कागज करुं, तो गुरु गुन लिखा न जाय ।।'

**१८. मांसभक्षण निषिद्ध :- अंडी व मांस भक्षण व जीव हिंसा करायची नाही. ते महापाप आहे. जसे कबीर साहेब जी महाराज व गरीब दास जी महाराज सांगतात :-**

कबीर, जीव हने हिंसा करे, प्रकट पाप सिर होय। निगम पुनि ऐसे पाप तें, भिस्त गया नहिं कोय ।।१।।
कबीर, तिलभर मछली खायके, कोटि गऊ दे दान। काशी करौंत ले मरे, तो भी नरक निदान ।।२।।
कबीर, बकरी पाती खात है, ताकी काढी खाल। जो बकरी को खात है, तिनका कौन हवाल ।।३।।
कबीर, गला काटि कलमा भरे कीया कहै हलाल। साहब लेखा मांगसी, तब होसी कौन हवाल ।।४।।
कबीर, दिनको रोजा रहत हैं, रात हनत हैं गाय। यह खून वह वंदगी, कहुं क्यों खुशी खुदाय ।।५।।
कबीर, कबिरा तेई पीर हैं, जो जानै पर पीर। जो पर पीर न जानि है, सो काफिर बेपीर ।।६।।
कबीर, खूब खाना है खीचडी, मांही परी टुक लौन।।मांस पराया खायकै, गला कटावै कौन ।।७।।
कबीर, मुसलमान मारैं करदसो, हिन्दू मारैं तरवार। कहै कबीर दोनूं मिलि, जैहैं यमके द्वार ।।८।।
कबीर, मांस अहारी मानव, प्रत्यक्ष राक्षस जानि। ताकी संगति मति करै, होइ भक्ति में हानि ।।९।।
कबीर, मांस खाय ते ढेड सब, मद पीवैं सो नीच। कुलकी दुरमति पर हरै, राम कहै सो ऊँच ।।१०।।
कबीर, मांस मछलिया खात है, सुरापान से हेत। ते नर नरकै जाहिंगे, माता पिता समेत ।।११।।
गरीब, जीव हिंसा जो करते हैं, या आगे क्या पाप। कंटक जुनी जिहान में, सिंह भेड़िया और सांप।।
झोटे बकरे मुरगे ताई। लेखा सब ही लेत गुसाई।।मृग मोर मारे महमंता। अचरा चर है जीव अनंता।।
जिह्वा स्वाद हिते प्राना। नीमा नाश गया हम जाना।।
तीतर लवा बुटेरी चिडिया। खूनी मारे बडे अगड़िया।।
अदले बदले लेखे लेखा। समझ देख सुन ज्ञान विवेका।।
गरीब, शब्द हमारा मानियो, और सुनते हो नर नारि।
जीव दया बिन कुफर है, चले जमाना हारि ।।

**अजाणतेने झालेल्या हिंसेचे पाप लागत नाही. बन्दी छोड कबीर साहेब म्हणतात :-**

''इच्छा कर मारै नहीं, बिन इच्छा मर जाए। कहैं कबीर तास का, पाप नहीं लगाए।।''

**१९. गुरुद्रोह्यांचा संपर्क निषिद्ध :- जर एखाद्या भक्ताने सतगुरुजींशी द्रोह (गुरुजींशी विमुख होणे) केला, तर तो महापापाचा भागीदार बनतो. जर एखाद्याला तो मार्ग चांगला वाटला नाही, तर तो आपला गुरू बदलू शकतो. पण जर तो पूर्व गुरूंशी वैर धरत असेल किंवा निंदा करत असेल तर तो गुरुद्रोही म्हटला जातो. अशा व्यक्तिशी भक्तिची चर्चा करण्यात जो उपदेशी**

**असेल त्याला दोष लागतो. त्याची भक्ति समाप्त होते.**

गरीब, गुरु द्रोही की पैड़ पर,जे पग आवै बीर। चौरासी निश्चय पड़ै, सतगुरु कहैं कबीर।।
कबीर, जान बुझ साची तजै, करै झूठे से नेह। जाकी संगत हे प्रभु, स्वपन में भी ना देह ।।

**अर्थात गुरुद्रोहीजवळ जाणारा भक्तिहीन होऊन नरकात जातो व ८४ लक्ष योनींच्या फेऱ्यामध्ये अडकतो.**

**२०. जुगार, मटका निषिद्ध :- जुगार-पत्ते कधीही खेळू नये.**

'कबीर, मांस भखै और मद पिये, धन वेश्या सों खाय। जूआ खेलि चोरी करै, अंत समूला जाय ।।'

**२१. नाचगाणे निषिद्ध :- कोणत्याही आनंदाच्या प्रसंगी नाचणे व अश्लील गाणी गाणे आदी भक्तिभावाच्या विरुद्ध आहे. एकदा एक विधवा आनंदाच्या प्रसंगी आपल्या नातेवाइकांच्या घरी गेली होती. सर्व जण आनंदाने नाचत होते, गाणी म्हणत होते. परंतु ती भगिनी मात्र एका बाजूला बसून प्रभुचिंतनात व्यग्र झाली होती. तिचे नातेवाईक तिला विचारू लागले कीतुम्ही असे निराश होऊन का बसला आहात? तुम्ही देखिल आमच्याबरोबर नाचा, गाणी म्हणा व आनंद साजरा करा. ती भगिनी म्हणाली की या विधवेला एकच पुत्र होता आणि आता तोही देवाघरी गेला. आता कसला आनंद उरलाय माझ्यासाठी? अगदी अशीच स्थिती या कालच्या मृत्युलोकामध्ये प्रत्येक व्यक्तिची आहे. गुरु नानक देवजी आपल्या वाणीमध्ये म्हणतात की :-**

ना जाने काल की कर डारै, किस विधि ढल पासा वे।
जिन्हादे सिर ते मौत खुड़गदी, उन्हानूं केडा हांसा वे ।।
साध मिलें साडी शादी (खुशी) होंदी, बिछड दां दिल गिरि (दु:ख) वे।
अखदे नानक सुनो जिहाना, मुश्किल हाल फकीरी वे ।।

**कबीर साहेब जी महाराज देखिल म्हणतात की :-**

कबीर, झूठे सुख को सुख कहै, मान रहा मन मोद।
सकल चबीना काल का, कुछ मुख में कुछ गोद ।।
कबीर, बेटा जाया खुशी हुई, बहुत बजाये थाल।
आवण जाणा लग रहा, ज्यों कीड़ी का नाल ।।

**विशेष :- स्त्री तसेच पुरुष दोन्हीही परमात्मा प्राप्तीचे अधिकारी आहेत. स्त्रियांनीही मासिक धर्माच्या (Mainces) दिवसांमध्येही आपली दैनंदिन पूजा, ज्योत लावणे इत्यादी बंद करू नये किंवा एखाद्याच्या देहांताच्या अथवा जन्माच्या वेळीही दैनिक पूजाकर्म बंद करू नये.**


**टीप :- जे भक्तजन या एकवीस सूत्रीय आदेशांचे पालन करणार नाहीत, त्यांचे नाम समाप्त होऊन जाईल. जरी अजाणतेपणाने एखादी चूक झाली असेल, तर तिला माफी मिळते. पण जर जाणूनबुजून चूक केलेली असेल, तर तो भक्त नामरहित होतो. यावर उपाय हाच आहे की गुरुदेवजींकडे क्षमा मागून पुन्हा नामोपदेश घ्यावा लागेल.**

# परमेश्वर कबीर साहेबांचे असंख्य ब्रह्मण्डाचे लघु चित्र

अनामी लोक : या लोकामध्ये कबीर साहेब अनामी पुरुष रुपामध्ये राहतात. येथे एकटे आहेत.

अगम लोक : या लोकामध्ये देखिल कबीर साहेब अगम पुरुष रुपामध्ये राहतात.

अलख लोक : या लोकामध्ये देखिल कबीर साहेब अलख पुरुष रुपामध्ये राहतात.



# सृष्टि रचना

(सुक्ष्म वेदानुसार संक्षिप्त रुपात सृष्टिरचनेचे वर्णन)

प्रभु प्रेमी आत्म्यांना हे सृष्टि रचनेचे सत्यज्ञान पहिल्यांदा वाचताना असे वाटेल की जणू काही ही दंतकथाच आहे, परंतु सर्व धर्मांतील पवित्र सद्ग्रंथांमधील प्रमाणासहित पुरावे वाचनात येतील, तेव्हा तुम्हाला आश्चर्याचा धक्काच बसेल आणि म्हणाल की हे वास्तव सत्य अमृतज्ञान आजतागायत कोठे लपलेले होते? कृपया धैर्य व गांभीर्याने हे वाचा आणि या अमृतज्ञानाचे जतन करा. याचा आपल्या १०१ पिढ्यांना लाभ होईल. पवित्र आत्म्यांनो कृपया सत्यनारायण द्वारा (अविनाशी प्रभु/सतपुरुष) रचलेल्या सृष्टि रचना चे वास्तविक ज्ञान वाचा.

१. पूर्ण ब्रह्म :– या सृष्टि रचनेतील सतपुरुष– सतलोकीचा स्वामी (प्रभु) अलखपुरुष– अलखलोकीचा स्वामी (प्रभु), अगमपुरुष– अगमलोकीचा स्वामी (प्रभु) तसेच अनामीपुरुष– अनामीलोकीचा स्वामी (प्रभु) हे सर्व एकच असून हेच पूर्ण ब्रह्म आहेत, जे वास्तविक अविनाशी प्रभु आहेत. ते भिन्नभिन्न रूपे धारण करून आपल्या चारही लोकांमध्ये नित्य वास्तव्य करतात. त्यांच्या अंतर्गत असंख्य ब्रह्माण्डे येतात.

२. परब्रह्म :– हे केवळ सात संख ब्रह्माण्डाचे स्वामी आहेत. यांना अक्षर ब्रह्म असेही संबोधले जाते. परंतु हे आणि त्यांची सात संख ब्रह्माण्डे वास्तविक अविनाशी नाहीत.

३) ब्रह्म :– हे केवळ एकवीस ब्रह्माण्डांचे स्वामी (प्रभु) आहेत. यांना क्षर पुरुष, ज्योति निरंजन, काल इत्यादी उपमांद्वारे ओळखले जाते. हा तसेच याचे सर्व ब्रह्माण्ड नाशवान आहेत.

(वरील तिन्ही पुरुषांचे (प्रभुंचे) प्रमाण पवित्र श्री मद्भगवत गीता च्या १५ व्या अध्यायातील १६ व १७ व्या श्लोकांमध्ये आहे)

४) ब्रह्मा :– ब्रह्मा हे वर उल्लेख आलेल्या ब्रह्मचा ज्येष्ठ पुत्र असून, मधला पुत्र विष्णु तसेच अंतिम तिसरा पुत्र शिव आहेत. हे तिघेही ब्रह्मचे पुत्र केवळ एक ब्रह्माण्ड मध्ये एक विभागाचे (गुणाचे) स्वामी (प्रभु) आहेत तसेच नाशवान आहेत. अधिक माहितीसाठी खाली दिलेली सृष्टि रचना कृपया वाचावी :–

{कविर्देवांनी (कबीर परमेश्वर) सुक्ष्म वेद अर्थात कबिर्बाणी मध्ये आपल्या द्वारा रचलेल्या सृष्टिचे ज्ञान स्वतःच सांगितले आहे जे खालीलप्रमाणे आहे}

सर्व प्रथम 'अनामी' (अनामय) लोक होते. हे केवळ एकच स्थान होते. त्याला 'अकह लोक' असेही म्हटले जाते. पूर्ण परमात्मा या अनामी लोकामध्ये एकटेच वास्तव्य करत होते. त्या परमात्याचे नाव कविर्देव अर्थात कबीर परमेश्वर असे आहे. समस्त विश्वातील सर्व जीवात्मे त्या पूर्ण ब्रह्मच्या (पूर्णधनी) तेजःपुंज शरीरामध्येच सामावलेले होते. याच कविर्देवांचे उपमात्मक (पदवीसंबंधीचे नाव) अनामी पुरुष असे आहे. (पुरुष या शब्दाचा अर्थ 'प्रभु' असा होतो. त्या प्रभुने स्वत:च्याच स्वरूपाप्रमाणे मनुष्याची निर्मिती केली आहे. त्यामुळे मानवालाही पुरुष असे संबोधले जाते.) या अनामी पुरुषाच्या एक रोम कूपाचा प्रकाश संख सूर्यांच्या प्रकाशापेक्षाही अधिक आहे.

विशेष :– देशाच्या आदरणीय प्रधानमंत्र्यांचे नाव काही अन्य असते आणि पदवीच्या (पदाचे उपमात्मक) नावावरून त्यांना 'प्रधानमंत्री' असे संबोधले जाते. कित्येक वेळा प्रधानमंत्री आपल्याजवळ काही प्रमुख खाती देखिल ठेवतात. ते ज्या खात्याच्या दस्तऐवजांवर स्वाक्षरी करतात, तेव्हा ते त्याच खात्याचे पद लिहतात. गृहमंत्रालयाच्या कागदपत्रांवर सही करताना ते

गृहमंत्री असेच लिहितात. त्या त्या पदानुसार एकाच व्यक्तीच्या स्वाक्षरीची शक्ती कमी-अधिक होत जाते, त्याप्रमाणे कबीर परमेश्वरांच्या (कविर्देव) तेजामध्येही (प्रकाशामध्ये) अंतर पडत जाते.

अगदी अशाच प्रकारे पूर्ण परमात्मा कविर्देव (कबीर परमेश्वर) यांनी आणखी तीन लोकांची (अगमलोक, अलखलोक, सतलोक) रचना शब्दाद्वारे (वचन) केलेली आहे. हेच पूर्ण ब्रह्म परमात्मा कविर्देव (कबीर परमेश्वर) अगमलोकी प्रगट झाले. तेथे हेच कविर्देव (कबीर परमेश्वर) अगमलोकीचेही स्वामी आहेत. तेथे त्यांचे उपमात्मक (पदवीचे) नाव अगमपुरुष अर्थात अगमप्रभू असे आहे. याच प्रभुंचे मानवसदृश शरीर अत्यंत तेजोमय आहे, ज्यांच्या एक रोम कूपाचा (रंध्र) प्रकाश 'खरब' (अब्ज/अरबापेक्षाही अधिक) सूर्यांच्या प्रकाशापेक्षाही अधिक आहे.

हेच पूर्ण परमात्मा कविर्देव (कविर देव = कबीर परमेश्वर) अलखलोकी प्रकट झाले. तेथे उपमात्मक नाव (पदवीचे नाम) अलखपुरुष असे याच परमेश्वरांचे आहे. या पूर्ण प्रभुंचे मानवसदृश शरीर तेजोमय (स्वज्योर्ति) स्वयंप्रकाशित आहे. त्यांच्या एक रोम कूपाचा (रंध्राचा) प्रकाश 'अरब' सूर्यांच्या प्रकाशापेक्षाही अधिक आहे.

हेच पूर्ण प्रभु सतलोकी प्रकट झाले. तसेच सतलोकीचेही तेच अधिपती आहेत. त्यामुळेच त्यांचे उपमात्मक (पदवीचे) नाव-सतपुरुष (अविनाशी प्रभु) असे आहे. अकालमूर्ती, शब्दस्वरूपी राम, पूर्ण ब्रह्म, परम अक्षर ब्रह्म आदी त्यांची नावे आहेत. याच सतपुरुष कविर्देवांचे (कबीर प्रभु) मानवसदृश शरीर तेजोमय आहे. यांच्या एक रोम कूपाचा (रंध्र) प्रकाश कोटी सूर्य, तसेच तितक्याच चंद्रांच्या प्रकाशापेक्षाही अधिक आहे.

याच कविर्देव (कबीर प्रभु) सतपुरुष रूपामध्ये प्रगट झाले आणि सतलोकी विराजमान होऊन प्रथम तेथे अन्य रचना केल्या.

त्यांनी एका शब्दापासून (वचनाने) सोळा द्वीपांची रचना केली. नंतर सोळा शब्दांपासून सोळा पुत्रांची उत्पत्ती केली. अमृताने भरलेल्या एका मानसरोवराची रचना केली. सोळा पुत्रांची नावे अशी :- १) कुर्म २) ज्ञानी ३) विवेक ४) तेज ५) सहज ६) संतोष ७) सुरति ८) आनंद ९) क्षमा १०) निष्काम ११) जलरंगी १२) अचिंत १३) प्रेम १४) दयाल १५) धैर्य १६) योग संतायन अर्थात योगजित.

सतपुरुष कविर्देव यांनी आपला पुत्र अचिंत याच्याकडे सत्यलोकीच्या अन्य रचनांचा भार सोपवला आणि शक्ती प्रदान केली. अचिंतने शब्दापासून अक्षर पुरुषाची (परब्रह्म) उत्पत्ती केली आणि आपणास मदत करण्यास सांगितले. अक्षर पुरुष मानसरोवरावर स्नान करण्यासाठी गेला असता तेथील दिव्य अनुभूतीच्या आनंदात झोपी गेला. बराच वेळ तो बाहेर आला नाही. हे पाहून अचिंताने कविर्देवांकडे त्यासंबंधी प्रार्थना केली. अक्षर पुरुषाला निद्रेतून जागवण्यासाठी कविर्देवांनी (कबीर परमेश्वर) त्याच मानसरोवरामधील थोडे अमृतजल घेऊन एक अंडे निर्माण केले आणि त्या अंड्यामध्ये एक आत्मा प्रवेशित करून ते अंडे मानसरोवराच्या अमृतजलामध्ये सोडले. अंड्याच्या गडगडाटाने अक्षर पुरुषाचा निद्राभंग झाला. जागे होऊन त्याने अंड्याकडे क्रोधाने पाहिले असता त्या अंड्याचे तडकून दोन भाग झाले. त्यामधून ज्योति निरंजन (क्षर पुरुष) बाहेर पडला, जो पुढे 'काल' काल असा संबोधला गेला आहे. याचे वास्तविक नाव 'कैल' असे आहे. त्यावेळी सतपुरुषांनी (कविर्देव) आकाशवाणी केली की तुम्ही दोघे अचिंताच्या द्वीपामध्ये वास्तव्य करा. ही आज्ञा झाल्यानंतर अक्षर पुरुष आणि क्षर पुरुष (कैल) दोघेही

**अचिंतच्या द्वीपामध्ये वास्तव्य करू लागले. (पुत्रांमध्ये पुन्हा प्रभुतेची लालसा उत्पन्न होऊ नये म्हणून पुत्रांची मूर्खता त्यांनाच दर्शवून दिली. कारण समर्थांशिवाय कार्य सफल होत नाही.) नंतर पूर्ण धनी कविर्देवांनी सर्व रचना स्वत: केली. आपल्या शब्दशक्तीने एक 'राजेश्वरी' (राष्ट्री) शक्ती उत्पन्न केली. तिच्याद्वारे सर्व ब्रह्माण्डांची स्थापना केली. या शक्तिलाच पराशक्ती परानंदनी असे देखिल म्हटले जाते. कविर्देवांनी सर्व आत्म्यांना आपल्यामधूनच आपल्या वचनशक्तीद्वारे आपल्याच मानव शरीरसारखे उत्पन्न केले. प्रत्येक हंस आत्म्याची परमात्म्याच्या शरीरासारखी रचना केली, ज्याचे तेज सोळा सूर्यांइतके प्रकाशित मानवसदृशच आहे. परंतु परमेश्वराच्या शरीराच्या एक रोम कूपाचा (रंध्र) प्रकाश कोटी सूर्यापेक्षाही अधिक आहे. बऱ्याच कालावधीनंतर क्षर पुरुषाने (ज्योति निरंजन) विचार केला की आपण तिघेही (अचिंत, अक्षर पुरुष व क्षर पुरुष) एकाच द्वीपामध्ये वास्तव्य करतो, तर दुसरे प्रत्येकी वेगवेगळ्या स्वतंत्र द्वीपामध्ये वास्तव्य करत आहेत. मी देखिल साधना करून स्वतंत्र द्वीप प्राप्त करून घेईन. हा विचार करून क्षर पुरुषाने एका पायावर उभे राहून सत्तर युगे तप केले.**

## ''जीवात्मे कालच्या जाळ्यात कसे फसले?''


**विशेष :- जेव्हा ब्रह्म (ज्योति निरंजन) तप करत होता, तेव्हा आज ज्योति निरंजनच्या एकवीस ब्रह्माण्डांमध्ये वास्तव्य करणारे सर्व आत्मे काल ब्रह्म लाच्या साधनेवर (तप) आसक्त झाले आणि ह्दयापासुन त्याला पसंत करू लागले. यामुळे मूळ सुखदायी प्रभु कबीर साहेबांपासून (कविर्देव) ते विमुख होत गेले. त्यामुळे सर्व आत्मे पतिव्रता पदापासून (एकनिष्ठतेपासून) परावृत्त झाले. त्यावेळी पूर्ण प्रभु कविर्देवांनी (कबीर साहेब) वारंवार सावध करूनही आपली क्षर पुरुषावरील (काल ब्रह्म) आसक्ती ढळली नाही.** {आजही हाच प्रभाव या काल सृष्टि दिसून येत आहे. अभिनेता किंवा अभिनेत्री रोजगाराच्या दृष्टीने चित्रपटात अभिनय करत असतात आणि तरुणवर्ग त्यांच्या खोट्या अभिनयामुळे त्यांच्याकडे आकृष्ट होतो. कितीही प्रयत्न केला तरी ते त्यापासून परावृत्त होत नाहीत. एखादा अभिनेता किंवा अभिनेत्री जवळच्या एखाद्या शहरामध्ये आले, तर त्यांना निव्वळ बघण्यासाठी हा तरुणवर्ग गर्दी करतो. त्याच्याशी अभिनेत्याचे काहीही देणे-घेणे नसते. केवळ पैसा कमावणे हाच त्याचा उद्देश असतो. तो अभिनेता काम करून आपला उद्देश साध्य करतो आणि इकडे हे तरुण त्यांना फक्त बघण्यासाठी आपला वेळ आणि पैसा वाया घालवत बसतात. आई-वडिलांनी कितीही समजावून सांगितले, तरी त्यांना काहीही फरक पडत नाही. माता-पित्यांना काहीही कळू न देता गुपचूप ते तिकडे जातात, हे कळून देखिल येत नाही.}

**पूर्ण ब्रह्म कविर्देवांनी (कबीर प्रभु) क्षर पुरुषाला (काल ब्रह्म) विचारले कि तुला काय पाहिजे आहे सांग? तेव्हा तो म्हणाला की पिताजी, हे स्थान माझ्यासाठी कमी पडत आहे. कृपया मला स्वतंत्र द्वीप प्रदान करावे. त्यावेळी हक्का कबीरांनी (सतकबीर) त्याला २१ ब्रह्माण्डे प्रदान केली. काही कालावधीनंतर ज्योति निरंजनाला (काल) असे वाटायला लागले की या रिक्त २१ ब्रह्माण्डांत काही तरी रचना करायला पाहिजे. ही रिकामी बह्माण्डे (प्लॉट) काय कामाची? यासाठी त्याने पुन्हा ७० युगे एका पायावर उभे राहून तप केले आणि परमात्मा कविर्देवांकडे (कबीर प्रभु) रचना सामग्रीची याचना केली. सतपुरुष कविर्देवांनी त्याला त्रिगुण आणि पंचतत्त्वे प्रदान केली. त्यांच्या सहाय्याने ब्रह्मने (ज्योति निरंजन) आपल्या २१ ब्रह्माण्डांमध्ये काही रचना केल्या. नंतर त्याला वाटले की या विशाल ब्रह्माण्डांमध्ये काही जीव असणे गरजेचे आहे. आपले एकट्याचे मन येथे रमत नाही. याचा विचार करून ब्रह्मने (ज्योति**

निरंजन) पुन्हा ६४ युगे तप केले. पूर्ण परमात्मा कबीर देवांनी विचारल्यावर म्हणाला की पिताजी, मला काही जीवात्मे पाहिजे आहेत. माझ्या एकट्याचे येथे मन लागत नाही. तेव्हा सतपुरुष कविरग्नी (कबीर परमेश्वर) म्हणाले की हे ब्रह्मा, तुझ्या तपाचे फळ म्हणून मी तुला आणखी ब्रह्माण्डे देऊ शकतो. परंतु कोणत्याही जप–तपाच्या साधनेचे फळ म्हणून माझे आत्मे कदापि देणार नाहीत. पण जर कोणास (आत्म्यास) स्वेच्छेने तुझ्याबरोबर जायचे असेल, ते जाऊ शकतील. युवा कविरांचे (समर्थ कबीर साहेब) शब्द ऐकताच ज्योति निरंजन आपल्याजवळ (आत्म्यांच्या समीप) आला. आपण सर्व आत्मे पहिल्यापासून त्याच्यावर आसक्त झालेलो होतो. तो जवळ येताच, त्याला चारी बाजूंनी घेरून उभे राहिलो. ज्योति निरंजनाने सांगितले, की, मी पित्याकडून तपबळावर दुसरी स्वतंत्र २१ ब्रह्मांडे प्राप्त केलेली आहेत. तेथे नाना प्रकारची रमणीय स्थळे निर्माण केली आहेत. तुम्ही माझ्याबरोबर येणार काय? आज २१ ब्रह्माण्डांतील आपण दु:खी, कष्टी आत्मे आहोत ते सर्व त्यावेळी म्हणाले की जर पिताजींची आज्ञा असेल, तर आम्ही तयार आहोत. क्षर ब्रह्म (कालनिरंजन) लगेच पूर्ण ब्रह्म महान–कविर् (समर्थ कबीर प्रभु) यांच्याकडे गेला आणि सर्व वार्ता ऐकवली. कविर्देव (कबीर परमेश्वर) म्हणाले की माझ्या समक्ष स्वीकृती देणाऱ्यांनाच (हंस आत्म्यांना) मी आज्ञा देईन. क्षर पुरुष व परम अक्षर पुरुष (कविरमितौजा) दोघेही आम्हा सर्व हंसात्म्यांजवळ आले. सतकविर्देव म्हणाले की जे हंसात्मे ब्रह्मसोबत (काल निरंजन) जाऊ इच्छितात, त्यांनी हात वर करून स्वीकृती द्यावी. आपल्या परमपित्यासमोर एकाही हंसात्म्याची तसे करण्याची हिंमत झाली नाही. कोणीही जाण्याची स्वीकृती दिली नाही. बराच वेळ एकदम शांतता पसरली. त्यानंतर एक हंसात्मा धाडस करून म्हणाला की पिताजी, मी ब्रह्मसोबत जाऊ इच्छितो. त्याची स्वीकृती पाहून एक–एक करत आपण सर्व आत्म्यांनी (जे आज काल ब्रह्मच्या २१ ब्रह्माण्डांमध्ये कैद आहेत.) स्वीकृती दिली. परमेश्वर कबीर साहेब ज्योति निरंजनाला म्हणाले की तू तुझ्या स्थानी जा. ज्यांनी तुझ्याबरोबर येण्याची स्वीकृती दिली आहे, त्या सर्व हंसाम्यांना मी तुझ्याकडे पाठवून देईन. ज्योति निरंजन २१ ब्रह्माण्डांत निघून गेला. या वेळेपर्यंत ही सर्व २१ ब्रह्माण्डे सतलोकामध्येच समाविष्ट होती. तेथे आपणा सर्वांना जन्म–मरण, रोग, परिश्रम इत्यादी काहीही नव्हते. सर्वकाही विनासायास मूळ मालक पूर्ण ब्रह्म कविर्देव पुरवत होते. येथे या २१ ब्रह्माण्डांत येऊन मूळ मालक सतपुरुष कविर्देवांनी वेळोवेळी सावध करूनही आपल्या चुकीने क्षर पुरुषावर (ज्योति निरंजनावर) मोहित होऊन शाश्वत कविर्देवांच्या (कबीर साहेबांच्या) पवित्र पतिव्रता धर्माचा आपणाला विसर पडला आणि त्यात आपले पतन झाले आहे. (जे या ब्रह्माण्डातील देव, यक्ष, गंधर्व, मानव, पित्र, भूत, पशुपक्षी या सर्व ८४ लक्ष योनींतील आत्मे) त्या सतलोक धामापासून दूर गेल्याने कालच्या कैदेत कष्टी झालेले आहेत. हेच सत्य ज्ञान आपणाला समजले नसल्यामुळे आपण भावनेच्या भवसागरात करोडो युगांपासून गटांगळ्या खात आहोत.

त्यानंतर पूर्ण ब्रह्मनी (कबीर साहेब) सर्वप्रथम स्वीकृती देणाऱ्या हंस आत्म्याला मुलगीचे (स्त्री) रूप दिले. परंतु तिच्यात स्त्री इंद्रियाची रचना केली नाही. तिला शब्दशक्ती व तीन गुण प्रदान केले. सर्व आत्म्यांना (ज्यांनी ज्योति निरंजनसोबत जाण्यास सहमती दिली होती) त्या कन्येच्या शरीरात प्रवेशित केले. त्या कन्येचे नाव 'आष्ट्रा' (आदिमाया/प्रकृति देवी/दुर्गा) असे पडले. परमात्मा कबीर देव तिला म्हणाले की पुत्री, मी तुला शब्दशक्ति प्रदान केली आहे. ब्रह्म (काल) जेवढे जीव मागेल, तेवढे तू मी तुला दिलेल्या शब्दशक्तीद्वारे उत्पन्न करून देत जा. पूर्ण ब्रह्म कविर्देवांनी (कबीर साहेब) आपला पुत्र सहजदास याच्यासोबत प्रकृतिला क्षर पुरुषाकडे पोहोचवले. सहजदासजींनी ज्योति निरंजनाला सांगितले की हे निरंजन, परमपित्याने या तुझ्या

# एक ब्रह्मण्ड चे लघु चित्र



भगिनीच्या (बहिणीच्या) देहातून तुझ्याबरोबर येण्यास स्वीकृती दिलेले सर्व हंस आत्मे समाविष्ट केले आहेत आणि तिला दिलेल्या शब्दशक्तीद्वारे ती तुला जितके जीव पाहिजे असतील, तितके उत्पन्न करून देईल. हे सर्व सांगितल्यावर सहजदास परत आपल्या द्वीपामध्ये गेला.

तरुण असल्यामुळे त्या कन्येचे रंगरूप खुलून आले होते. त्यामुळे ब्रह्ममध्ये विषय वासना उत्पन्न झाली. तेव्हा प्रकृति देवी त्याला म्हणाली की हे ज्योति निरंजन मला परमपित्यांनी (कविर्देव) शब्दशक्ती प्रदान केलेली आहे. तू जेवढे प्राणी मागशील, तेवढे मी शब्दशक्तीने उत्पन्न करून देईन. तू देखिल त्याच पित्याच्या शब्दशक्तीने अंड्यातून उत्पन्न झालेला आहेस आणि मी तुझ्यानंतर उत्पन्न जरी झाले असले, तरी मी देखिल त्याच परमपित्याच्या वचन (शब्द) शक्तीनेच उत्पन्न झालेली आहे. त्यामुळे तू माझा मोठा भाऊ आहेस. भाऊ–बहिणीच्या नात्याच्या मर्यादेविरुद्धचा हा योग (कर्म) महापापाचे कारण बनेल. परंतु ज्योति निरंजनाने प्रकृति देवीची एकही प्रार्थना ऐकली नाही. त्याने तिची विनंती ऐकली नाही. त्यावेळी प्रकृति देवीने अब्रुरक्षणासाठी दुसरा कोणताही पर्याय नसल्यामुळे सूक्ष्मरूप धारण केले आणि निरंजनाच्या उघड्या तोंडातून त्याच्या पोटात प्रवेश केला आणि पूर्ण ब्रह्म कविर्देवांना आपल्या रक्षेसाठी अंतर्साद घालून याचना केली. त्याच वेळी कविर्देव आपला पुत्र योगजित अर्थात योगसंतायन याचे रूप धारण करून प्रकट झाले आणि आपल्या कन्येला ब्रह्मच्या उदरातून बाहेर काढले. त्यावेळी त्यांनी ज्योति निरंजनाला सांगितले की हे ज्योति निरंजना, आजपासून तुला 'काल' या नावाने संबोधले जाईल आणि तू क्षर पुरुष होशील म्हणजेच तुझे जन्म–मृत्यू होत राहतील. तसेच या तुझ्या दुष्टपणाचे फळ म्हणून तू दररोज एक लाख मानव देहधारी प्राण्यांचा आहार करशील व सव्वा लक्ष नव्याने उत्पन्न करशील. तुम्हा दोघांनाही या २१ ब्रह्माण्डांसह सतलोकामधून बाहेर काढून टाकले जाईल. त्यांनी एवढे सांगितल्यावर ती २१ ब्रह्माण्डे विमानासारख्या गतीने सहजदासाच्या द्वीपाजवळून जात बाजूला गेली. सतलोकापासून (सतधाम) १६ संख कोस (एक कोस म्हणजे सुमारे तीन किलोमीटर) अंतरावर येऊन स्थिर झाली.

विशेष विवरण – आतापर्यंत या सृष्टि रचनेमध्ये तीन शक्तींचे विवरण आलेले आहे.

१. पूर्ण ब्रह्म :– ज्यास इतर उपमात्मक नावांनीही ओळखले जाते. सतपुरुष, अकालपुरुष, शब्दस्वरूपी राम, परम अक्षर ब्रह्म/पुरुष आदी नावांनी यांना संबोधले जाते. हे पूर्ण ब्रह्म असंख्य ब्रह्माण्डांचे स्वामी आहेत, तसेच ते वास्तवामध्ये अविनाशी आहेत.

२. परब्रह्म :– ज्यास अक्षर पुरुष नावानेही संबोधले जाते. वास्तवात हे अविनाशी नाहीत. केवळ सात संख बह्मांडांचे ते स्वामी आहेत.

३. ब्रह्म :– हा केवळ २१ ब्रह्माण्डाचा मालक असून, याला ज्योति निरंजन, काल, कैल, क्षर पुरुष, धर्मराय आदी नावांनी संबोधले जाते. तो २१ ब्रह्माण्डामध्ये अव्यक्त रूपात राहतो. आता यापुढे याच ब्रह्मच्या सृष्टितील एका ब्रह्माण्डाची ओळख करून दिली जाईल ज्यामध्ये ब्रह्मा, विष्णु आणि शिवशंकर ही आणखी नावे तुमच्या वाचनात येतील.

ब्रह्म आणि ब्रह्मा यांच्यातील फरक :– एका ब्रह्माण्डातील सर्वोपरी स्थानावर ब्रह्म (क्षर पुरुष, ज्योति निरंजन) स्वत: तीन गुप्त स्थानांची रचना करून तेथे तो ब्रह्मा, विष्णु व शिव या रूपांत वास्तव्य करतो. तसेच आपली पत्नी प्रकृति (दुर्गा) हिच्या सहयोगाने तीन पुत्रांची उत्पत्ती करत असतो. त्यांची नावे ब्रह्मा, विष्णु व शिव अशीच ठेवतो. त्यातील ब्रह्मचा (काल) मुलगा 'ब्रह्मा' केवळ एकाच ब्रह्माण्डातील तीन लोकांमधील (पृथ्वीलोक, स्वर्गलोक, पाताळलोक)

रजगुण विभागाचा मंत्री (स्वामी) आहे. त्यांना त्रिलोकीचे ब्रह्मा म्हटले जाते. तसेच ज्योति निरंजन (काल) जो ब्रह्मलोकी 'ब्रह्मा' रूपामध्ये वास्तव्य करतो, त्यालाच महाब्रह्मा आणि ब्रह्मलोकीचा ब्रह्मा म्हटले जाते. त्याच बह्मला (काल) सदाशिव, महाशिव, महाविष्णु अशा नावांनी देखिल संबोधले जाते.

श्री विष्णु पुराणात प्रमाण :- चौथा अंश अध्याय १ पान संख्या २३०-२३१ वर श्री ब्रह्मा म्हणतात की, ज्या अमर सर्वांचा विधाता परमेश्वराविषयी सुरुवात, शेवट, मध्य, स्वरुप, स्वभाव व सार आम्ही समजु शकत नाही. (श्लोक ८३)

जो पुरुष माझे रुप धारण करुन संसाराची रचना करतात. रुद्राचे रुप धारण करुन संपुर्ण विश्वाचा नाश करतो व संपुर्ण जगतात अनंत रुप धारण करुन राहतात. (श्लोक ८६)

## ''श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी, श्री शिव जी यांची उत्पत्ती''

एकवीस ब्रह्माण्डांसह आल्यानंतर काल (ब्रह्म) प्रकृति देवीला (दुर्गा) म्हणाला की आता माझे कोण व काय वाकडे करणार आहे? माझ्या जे मनात येईल ते मी करू शकतो. यावर देवीने (दुर्गा) प्रार्थना केली की तुम्ही जरा तरी लाजलज्ञा बाळगा. पूर्ण परमात्मा कविर्देवांच्या शब्दशक्तीने तुमची व माझीही उत्पत्ती झाली आहे. त्यामुळे तुम्ही माझे मोठे भाऊ आहात. त्यानंतर आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे दुसऱ्या वेळेला त्याच पूर्ण परमात्याने मला तुमच्या उदरातून (पोटातून) निष्कासित केले (बाहेर काढले). त्यामुळे मी तुमची मुलगी आहे आणि तुम्ही माझे पिता आहात. या पवित्र नात्यांना छेद दिल्यामुळे महापाप घडेल. कविर्देवांनी प्रदान केलेल्या शब्दशक्तीने (वचनशक्ती) जेवढे जीव तुम्ही मागाल, तेवढे मी उत्पन्न करून देईन. पण ज्योति निरंजनाने तिची एकही विनंती ऐकली नाही. मला जी शिक्षा मिळणार होती, ती मिळाली आहे. त्यामुळे मला सतलोकातून हद्दपारही केलेले आहे. आता मी येथे मनमानी करणार, असे म्हणून प्रकृति देवीशी (दुर्गा, माया, आष्ट्रा.) जबरदस्तीने विवाह केला आणि तीन पुत्रांची (रजगुणयुक्त- ब्रह्मा, सतगुणयुक्त-विष्णु आणि तमगुणयुक्त-शिवशंकर) उत्पत्ती केली. परंतु या तिन्ही पुत्रांना तरुण होईपर्यंत दुर्गा मातेद्वारे अचेत (बेशुद्ध) करून ठेवले. तरुणावस्थेत आल्यानंतर श्री ब्रह्मांना कमळाच्या कोमल पुष्पावर, श्री विष्णुंना शेषनागाच्या शय्येवर आणि श्री शिवांना कैलास पर्वतावर सचेत करून एकत्र आणले. त्यानंतर प्रकृति द्वारे (दुर्गा) या तिघांचा विवाह करून एकाच ब्रह्माण्डातील तीन लोकांमधील (स्वर्ग, मृत्यू, पाताळ) एक-एक विभागाचे मंत्री म्हणून नियुक्त केले. श्री ब्रह्मा रजगुण विभागाचे, विष्णु सतगुण विभागाचे आणि शिवशंकर तमगुण विभागाचे मंत्री (प्रभु) करून स्वत: मात्र (काल) गुप्त रूपात (महाब्रह्मा, महाविष्णु आणि महाशिव) मुख्यमंत्रिपदाचे समायोजन करतो. तसेच ब्रह्मने (काल) एका ब्रह्माण्डामध्ये बह्मलोकाची रचना करून त्यामध्ये तीन गुप्तस्थानांची निर्मिती केली आहे. त्यापैकी एक रजगुणप्रधान आहे. तेथे हा ब्रह्म (काल) स्वतः महाब्रह्मा (मुख्यमंत्री) रूपामध्ये वास्तव्य करतो आणि आपली पत्नी दुर्गा हिला महासावित्री रूपामध्ये ठेवतो. या स्थानावर या दोघांपासून जो पुत्र उत्पन्न होतो, तोही रजगुण प्रभावयुक्त असतो. दुसरे स्थान सतगुणप्रधान बनविलेले आहे. या स्थानावर ब्रह्म (क्षर पुरुष) स्वतः महाविष्णु रूप धारण करून वास्तव्य करतो आणि तेथेही आपली पत्नी दुर्गा हिला महालक्ष्मी रूपात ठेवतो. त्यांच्यापासून ज्या पुत्राची उत्पत्ती होते, त्याचे विष्णु असे नाव ठेवले जाते. हा विष्णु सतगणप्रधान स्थानी उत्पन्न झाल्यामुळे तोही सतगुणयुक्त असतो. तिसऱ्या स्थानी कालने (बह्म) तमगुणप्रधान क्षेत्राची रचना केली आहे. तेथे तो स्वत: सदाशिव रूप धारण करून पत्नी दुर्गा हिला महापार्वती रूपामध्ये ठेवतो. यांच्यापासून

जो पुत्र निर्माण होतो, तो तमगुण असतो आणि त्याचे नाव शिव असे ठेवले जाते. (याच्या प्रमाणासाठी गीता प्रेस, गोरखपूर येथून प्रकाशित हिंदी अनुवादकर्ता श्री हनुमान प्रसाद पोद्दार यांच्या पवित्र श्री शिव महापुराण, रुद्रसंहितेच्या सहाव्या, सातव्या व नवव्या अध्यायातील पान नं.१०० व अनुवादकर्ता श्री हनुमानप्रसाद पोद्दार-चिमणलाल गोस्वामी यांच्या पवित्र श्रीमद् देवी भागवत महापुराणातील तिसऱ्या स्कंदामधील पान नं. ११४ ते १२३ पर्यंत पाहा.) पुढे या तिन्ही पुत्रांना गाफिल (धोक्यात) ठेवून कालाला मिळालेल्या शापाप्रमाणे दररोज एक लाख जीवांचा आहार करण्यासाठी आणि सव्वा लाख जीव नव्याने उत्पन्न करण्यासाठी श्री ब्रह्माद्वारे जीवांची उत्पत्ती, श्री विष्णुद्वारे मायाममतेच्या जाळ्यात ठेवून कालजाळ्यामध्ये फसवून ठेवतो आणि श्री शिवाद्वारे संहार करतो. कारण काल ब्रह्म ला शापामुळे एक लाख मानव देहधारी प्राण्यांच्या सूक्ष्मशरीरापासून मळ काढून आहार करायचा असतो. त्यासाठी २१ व्या ब्रह्माण्डामध्ये जेथे काल राहतो, तेथे धगधगणारी तप्त शिला (जसा चुलीवर मोठा तवा) असून त्यावर मानव सूक्ष्मदेहधारी जीव भाजून, वितळवून त्यावरील गंध, मळ याचा काल (ज्योति निरंजन) आहार करतो. त्यावेळी जीव मरत नाही. परंतु त्याला अत्यंत असहाय कष्ट, यातना सहन कराव्या लागतात. त्यानंतर पुढे ज्या-त्या जीवाच्या कर्माधारावर काल ब्रह्म ला आत्म्याला दुसरे शरीर (८४ लक्ष योनी) प्रदान करतो. एखाद्या घरात तीन खोल्या असतील आणि पहिल्या खोलीत अश्लील चित्रे लावलेली असतील, तर तेथे मलिन, अपवित्र विचार मनात येतील. दुसऱ्या खोलीत साधुसंतांची चित्रे लावलेली असतील, तर तेथे मनामध्ये सद्विचार उमटतील आणि प्रभु चिंतनही होत राहील. तिसऱ्या दालनात देशभक्त आणि शहीद हुतात्म्यांच्या प्रतिमा लावलेल्या असतील, तर तेथे जहाल, रक्त गरम करणारे विचार उत्पन्न होतील. अगदी अशाचप्रकारे ब्रह्मने (काल) जाणूनबुजून विचार करून या तीन गुणांनीयुक्त स्थानांची रचना केलेली आहे.

## ''काय आहेत त्रिगुण? प्रमाणासहित''

"तिन गुण रजगुण ब्रह्मा जी, सतगुण विष्णु जी, तमगुण शिव जी हे त्रिगुण आहेत. हे तिन्ही गुण ब्रह्म (काल) तसेच प्रकृति (दुर्गा) यांच्यापासून उत्पन्न झालेले आहेत. तसेच हे तिन्ही नाशवान आहेत."

१. प्रमाण :- श्री हनुमान प्रसाद पोद्दार यांनी संपादित केलेल्या व गीता प्रेस, गोरखपूर येथून प्रकाशित झालेल्या 'श्री शिवमहापुराण'मधील पान नं. २४ ते २६ विद्यवेश्वर संहिता तसेच पान ११० अध्याय ९ रुद्रसंहिता ९ अशाप्रकारे ब्रह्मा, विष्णु आणि शिव या तीन देवांमध्ये गुण आहेत, परंतु शिव (ब्रह्म-काल) गुणातीत म्हटला गेला आहे.

२. प्रमाण :- श्री हनुमान प्रसाद पोद्दार चिमनलाल गोस्वामी यांनी संपादित केलेल्या व गीता प्रेस, गोरखपूर येथून प्रकाशित झालेल्या 'श्रीमद देवी भगवतपुराण'मधील ३ ऱ्या स्कंदातील ५ व्या अध्यायातील पान नं.१२३ वर भगवान विष्णुंनी दुर्गा देवीची स्तुती केली की मी (विष्णु), ब्रह्मा तसेच शंकर तुमच्याच कृपेने विद्यमान आहे. आम्हा तिघांचा अविर्भाव (जन्म), तसेच तिरोभाव (मृत्यू) होतो. आम्ही तिघे नित्य (अविनाशी) नाही. तूच नित्य आहेस, जगज्ननी प्रकृति आणि सनातनदेवी आहेस. भगवान शंकर म्हणतात की जर भगवान ब्रह्मा, तसेच भगवान विष्णु तुझ्यापासून उत्पन्न झाले आहेत तर त्यांच्यानंतर उत्पन्न झालेला मी, तमगुण लीला करणारा शंकर काय, तुझी संतान (पुत्र) नाही का झालो? अर्थात, मलाही उत्पन्न करणारी तूच आहेस. या संसाराच्या सृष्टि-स्थिती-संहारामध्ये तुझेच गुण सदासर्वदा आहेत. याच तिन्ही

गुणांपासून उत्पन्न मी (शंकर), ब्रह्मा, विष्णु नियमानुसार कार्यतत्पर असतो.

हे विवरण केवळ हिंदीमध्ये अनुवादित आहे ज्यामध्ये काही तथ्ये लपवलेली आहेत, त्या 'श्री देवी श्रीमदेवीभागवत महापुराणा'मधील आहे. त्यासाठी हेच प्रमाण (गोपनीय) श्रीमद देवी भागवत महापुराण सभाषाटिकम् समहात्यम्, खेमराज श्री कृष्णदास प्रकाशन, मुंबई यामध्ये संस्कृतसहित हिंदी अनुवाद केलेल्या पुस्तकात आहे. ३ ऱ्या स्कंदातील ४ थ्या अध्यायातील ४२ वा श्लोक ४२, पृष्ठ नं. १० :-

ब्रह्मा - अहम् ईश्वर: फिल ते प्रभावात्सर्वे वयं जनि युता न यदा तू नित्या:, के अन्ये,सुरा: शतमुख प्रमुखा: च नित्या नित्या त्वमेव जननी प्रकृति: पुराणा। (४२)

**मराठी अनुवाद :- हे माते! ब्रह्मा, मी, तसेच शिव तुझ्याच प्रभावाने जन्मवान आहोत, पण आम्ही नित्य नाही अर्थात आम्ही अविनाशी नाही. मग अन्य इंद्रादी व दुसऱ्या देवता कशा काय नित्य असतील? तूच अविनाशी आहेस, प्रकृति तसेच सनातनी देवी आहेस. (४२)**

**५ व्या अध्यायातील ८ वा श्लोक, पृष्ठ नं. ११-१२ :-** यदि दयार्द्रमना न सदांऽबिके कथमहं विहित:च तमगुण: कमलजश्च रजगुण संभव: सुविहित: किमु सत्वगुणों हरि:। (८)

**अनुवाद :- भगवान शंकर म्हणाले :- हे माते! जर आमच्यावर तुम्ही दयायुक्त अहात, तर मला तमगुण का बनविले? कमळातून उत्पन्न झालेल्या ब्रह्मास रजगुण का बनविले आणि विष्णुस सतगुणी का बनविले? अर्थात, आमच्या त्रिगुणमयी प्रभावामुळे जीवांना जन्म-मरणरूपी दुष्कर्मांमध्ये का अडकवलेस? (८)**

श्लोक १२ :- रमयसे स्वपतिं पुरुषं सदा तव गतिं न हि विह विद्म शिवे (१२)

**मराठी :- आपला पति पुरुष अर्थात काल भगवानसोबत सदा तू भोगविलास करत असतेस. तुझी गती कोणीही जाणू शकत नाही.**

**निष्कर्ष :- या प्रमाणांवरून हे सिद्ध होते की रजगुण-ब्रह्मा, सतगुण-विष्णु तसेच तमगुण-शिव हे तिघेही नाशवान आहेत. दुर्गेचा पती ब्रह्म (काल) हा तिच्याशी भोगविलास करतो.**

## ''ब्रह्मची (काल) अव्यक्त राहण्याची प्रतिज्ञा''

**सुक्ष्म वेदानुसार उर्वरीत सृष्टि रचना........**

**रजगुण-ब्रह्मा, सतगुण-विष्णु व तमगुण-शंकर या तिन्ही पुत्रांच्या उत्पत्तीनंतर पत्नी दुर्गा (प्रकृति) हिला ब्रह्म (काल) म्हणाला की भविष्यामध्ये मी कोणालाही माझ्या वास्तविक रूपामध्ये दर्शन देणार नाही. त्यामुळे मी अव्यक्त मानला जाईन. तू माझे हे रहस्य कोणालाही सांगू नकोस. मी गुप्त राहणार आहे. यावर दुर्गा म्हणाली की आपण आपल्या पुत्रांनाही दर्शन देणार नाही का? ब्रह्म म्हणाला की मी आपल्या पुत्रांना, तसेच इतर कोणालाही कोणतीही साधना केली तरी दर्शन देणार नाही आणि हा माझा अटळ निर्णय आहे. तेव्हा दुर्गा म्हणाली की ज्यामुळे आपल्या पुत्रांपासून देखिल लपून राहावे लागेल, तो तुमचा निर्णय योग्य नाही. यावर काल (ब्रह्म) म्हणाला की दुर्गा, ही माझी विवशता आहे. मला एक लाख मानव शरीरधारी प्राण्यांचा आहार करण्याचा शाप लागलेला आहे. जर माझ्या पुत्रांना (ब्रह्मा, विष्णु, महेश) हे समजले, तर ते उत्पत्ती, स्थिती आणि संहार ही कार्ये करणार नाहीत. यासाठीच या माझ्या अनुत्तम निर्णयात कोणताही बदल होणार नाही. जेव्हा हे तिघेही बाल्यावस्थेत थोडे मोठे होतील, तेव्हा त्यांना अचेत (चेतनाहीन) कर. त्यांना माझ्याविषयी काहीच सांगू नकोस, नाहीतर मी**

**तुलाही दंड देईन. कालच्या या भीतीने दुर्गा वास्तविकता सांगत नाही. म्हणूनच गीता च्या सातव्या अध्यायातील २४ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की हा बुद्धिहीन जनसमुदाय मला, अव्यक्त मनुष्य रूपामध्ये आलेला अर्थात 'कृष्ण' असे मानतात.**

(अबुद्धय:) बुद्धि हीन (मम्) माझ्या अनुत्तम अर्थात अश्रेष्ठ नीच (अव्ययम्) अविनाशी (परमभावम्) विशेष भावास (अजानन्त:) न जानता (माम् अव्यक्तम्) मला अव्यक्ताला (व्यक्तिम्) मनुष्य रूपामध्ये (आपन्नम्) आलेला (मन्यन्ते) मानतात अर्थात मी कृष्ण नाही. (गीता च्या ७ व्या अध्यायातील २४ वा श्लोक)

**गीता च्या ११ व्या अध्यायातील ४७ व ४८ व्या श्लोकांमध्ये म्हटले आहे की हे माझे वास्तविक 'काल' रूप आहे. याचे दर्शन अर्थात ब्रह्मप्राप्ती वेदांमध्ये वर्णन केलेल्या विधीने, जपाने, तपाने अथवा अन्य कोणत्याही क्रियेने होऊ शकणार नाही.**

जेव्हा तिन्ही बालक युवा अवस्थेत आले त्यावेळी, माता भवानी (प्रकृति, अष्टांगी) म्हणाली की तुम्ही सागर मंथन करा. पहिल्या वेळी सागर मंथन केले, तेव्हा चारही वेद निर्माण झाले. (ज्योति निरंजनाने आपल्या श्वासाद्वारे चार वेद उत्पन्न केले आणि त्यांना गुप्तवाणीद्वारे सागरात राहण्याची आज्ञा दिली होती.) ते वेद ब्रह्माने घेतले. सागर मंथनातून ज्या वस्तू बाहेर पडल्या, त्या घेऊन तिघे जेव्हा माता दुर्गाकडे आले, तेव्हा ते म्हणाले की हे चारही वेद ब्रह्मा स्वत:कडे ठेवू दे व वाचू दे.

नोट :– वास्तविक पूर्ण ब्रह्मांनी (कबीर साहेबांनी) ब्रह्मला अर्थात कालला पाच वेद प्रदान केले होते. परंतु ब्रह्मने केवळ चार वेदच प्रकट केले. पाचवा वेद लपवून ठेवला (गुप्त राखला). हा पाचवा वेद (सूक्ष्मवेद) स्वत: परमेश्वरांनी प्रगट होऊन 'कविर्गिभी:' म्हणजेच कविर्वाणीद्वारे (कबीर वाणी) लोकोक्ती व दोहे या माध्यमांतून प्रगट केलेला आहे.

दुसऱ्या वेळी जेव्हा सागरमंथन केले, तेव्हा त्यातून तीन कन्या प्राप्त झाल्या. मातेने त्या कन्या तिघांमध्ये (ब्रह्मा, विष्णु, महेश) वाटून दिल्या. प्रकृतिने (दुर्गाने) आपलीच अन्य तीन रूपे (सावित्री, लक्ष्मी आणि पार्वती) धारण करून समुद्रात लपवलेली होती. तीच रूपे सागरमंथनावेळी बाहेर आली. तीच प्रकृति तीन रूपांत प्रगट झाली, तसेच भगवान ब्रह्मांना सावित्री, भगवान विष्णुंना लक्ष्मी आणि भगवान शंकरांना पार्वती अशा पत्नी रूपात प्रदान केली. तिघांनी भोगविलास करून सुर आणि आसुर दोघांनाही उत्पन्न केले.

{जेव्हा तिसऱ्या वेळी सागरमंथन केले, तेव्हा चौदा रत्ने ब्रह्माला, अमृत विष्णु आणि देवतांना, मद्य (दारू) आसुरांना दिले, तसेच विष परमार्थ शिवने आपल्या कंठामध्ये स्थिर केले. ही तर फार नंतरची गोष्ट आहे.} जेव्हा ब्रह्मा वेदांचे वाचन करू लागले, तेव्हा त्यांना समजले की सर्व ब्रह्माण्डांचा रचनाकार, सृजनहार, कुळाचा स्वामी, मालक पुरुष (प्रभु) हा तर कोणी वेगळाच आहे. तेव्हा ब्रह्माने विष्णु व शंकरांना सांगितले की वेदांमध्ये वर्णन आले आहे की सृष्टिचा सृजनहार (रचनाकार) कोणी वेगळाच आहे. परंतु वेद म्हणतात की याचे रहस्य आपणाला देखिल माहीत नाही. यासाठी संकेत दिला आहे की फक्त कोणत्या तरी तत्त्वदर्शी संताला विचारा. तेव्हा ब्रह्मा आपली माता प्रकृतीकडे आले आणि सर्व वृत्तांत सांगितला. माता प्रकृती नेहमी म्हणत असे की माझ्याशिवाय आणखी कोणीही नाही. मीच कर्ता धरता आहे. मीच सर्वशक्तिमान आहे. त्यावेळी ब्रह्मा प्रकृति देवीस म्हणाले की हे वेद ईश्वरकृत आहेत, हे असत्य असूच शकणार नाहीत. यावर दुर्गा देवीने सांगितले की तुझे पिता तुला कधीच दर्शन देणार नाहीत. त्यांनी तशी शपथ घेतली आहे. हे ऐकून ब्रह्मा म्हणाले की माते, आता आपल्या

**बोलण्यावर माझा विश्वासच बसत नाही. मी त्या पुरुषाचा (प्रभु) ठावठिकाणा शोधूनच काढेन. दुर्गा म्हणाली की जर त्याने तुला दर्शन दिले नाही, तर तू काय करशील? ब्रह्मा म्हणाले की असे झाले तर मी माझे तोंड देखिल तुला दाखविणार नाही. दुसरीकडे ज्योति निरंजनाने शपथ घेतली आहे की मी कोणालाही दर्शन देणार नाही म्हणजेच एकवीस ब्रह्माण्डांमध्ये कधीही आपल्या वास्तविक रूपामध्ये आकारामध्ये येणार नाही.**

गीता च्या ७ व्या अध्यायातील २४ वा श्लोक

अव्यक्तम्, व्यक्तिम, आपन्नम्, मन्यन्ते, माम्, अबुद्धय:।
परम्, भावम्, अजानन्त:, मम, अव्ययम्, अनुत्तमम् ।।२४।।

अनुवाद :- (अबुद्धय:) बुद्धिहीन लोक (मम्) माझ्या (अनुत्तमम्) अश्रेष्ठ (अव्ययम्) अटळ (परम्) परम (भावम्) भावास (अजानन्त:) न जाणता (अव्यक्तम्) अदृश्यमान (माम्) मला काललला (व्यक्तिम्) आकार रूपामध्ये कृष्णावतार (आपन्नम्) झालेला आहे (मन्यन्ते) असे मानतात.

गीता च्या ७ व्या अध्यायातील २५ वा श्लोक

न अहम्, प्रकाश: सर्वस्य, योगमायासमावृत:।
मूढ: अयम्, न अभिजानाति, लोक:, माम, अजम्, अव्ययम्।

अनुवाद :- (अहम्) मी (योगमाया समावृत्त:) योगमायेने लपलेला (सर्वस्य) सर्वांच्या (प्रकाश:) प्रत्यक्ष (न) येत नाही. अर्थात, अदृश्य राहतो. यामुळे (अजम्) जन्म न घेणाऱ्या (अव्ययम्) अविनाशी अटळ भावास (अयम्) हे (मूढ:) अज्ञानी (लोक:) जनसमुदाय संसार (माम्) मला (न्) न (अभिजानाति) जाणता म्हणजेच मला अवतार रूपामध्ये आलो आहे असे समजतात. कारण ब्रह्म आपल्या शब्दशक्तीने आपली नाना रूपे धारण करत असतो. तो दुर्गा देवीचा पती असल्यामुळेच या मंत्रामध्ये म्हटले आहे की मी श्री कृष्ण, राम आदींसारखा दुर्गेपासून जन्म घेत नाही.

## ''आपला पिता (काल/ब्रह्मच्या) प्राप्तीसाठी ब्रह्माचे प्रयत्न''

**त्यावेळी माया (त्रिदेवजननी दुर्गा) ब्रह्माला म्हणाली की अलखनिरंजन तुझे पिता आहेत. परंतु ते तुला दर्शन देणार नाहीत. ब्रह्मा म्हणाला की मी त्यांचे दर्शन घेऊनच परत येईन. माता म्हणाली की जर तुला त्यांचे दर्शन झाले नाही तर तू काय करशील? ब्रह्मा म्हणाला मी शपथ घेतो की, असे झाले तर मी तुझ्यासमोर येणार नाही. (तोंड दाखविणार नाही.) हे बोलुन ब्रह्मा व्याकुळ होऊन उत्तर दिशेला चालु लागला जेथे भयानक अंधार आहे. तेथे ब्रह्माने चार युगे ध्यान लावले परंतु त्याला काहीच प्राप्त झाले नाही. त्यावेळी कालने आकाशवाणी केली की जिवांची उत्पती का नाही केली? भवानी म्हणाली की आपला ज्येष्ठ पुत्र ब्रह्मा हट्ट धरून आपल्या शोधार्थ गेलेला आहे. ब्रह्मने (काल) सांगितले की त्याला परत बोलवून घे. ब्रह्माशिवाय सर्व कार्य अशक्यच आहे. मी त्याला दर्शन देणार नाही. तेव्हा दुर्गा देवीने (प्रकृति) आपल्या शब्दशक्तीने 'गायत्री' नावाची कन्या उत्पन्न केली आणि तिला ब्रह्माला परत घेऊन येण्यास सांगितले. गायत्री ब्रह्माजवळ गेली. परंतु ब्रह्मा समाधी अवस्थेत होते. येथे कोणीतरी आलेले आहे, याचा त्यांना कोणताही आभास झाला नाही. तेव्हा आदिमायेने (प्रकृति) ध्यानाद्वारे गायत्रीस सांगितले की ब्रह्माच्या चरणांना स्पर्श कर. त्याप्रमाणे गायत्रीने आचरण केले. चरणांना स्पर्श होताच ब्रह्मांचा ध्यानभंग झाला आणि क्रोधित होऊन ते म्हणाले की माझा ध्यानभंग करणारी तू कोण पापीणी आहेस? मी तुला शाप देतो. यावर गायत्री म्हणाली की यात माझा**

काही दोष नाही. शाप देण्यापूर्वी माझी बाजू ऐकून घ्या. तुमच्याशिवाय जीवांची उत्पत्ती होऊ शकत नसल्यामुळे मला तुमच्या मातेने तुम्हाला परत घेऊन येण्यास पाठविले आहे. ब्रह्मा म्हणाले की मला अजूनही पित्याचे दर्शन झालेले नाही. मग मी परत कसा जाऊ? मी जर असाच परत गेलो तर माझी नाचक्की होईल. जर मला माझ्या पित्याचे (ज्योति निरंजन) दर्शन झालेले आहे आणि ते मी माझ्या डोळ्यांनी बघितले आहे, असे तू माझ्या मातेला सांगणार असशील, तरच मी तुझ्यासमवेत येईन. तेव्हा गायत्री ब्रह्मांना म्हणाली की जर तुम्ही माझ्याबरोबर शारिरीकसंबंध बनवीण्यास तयार असाल तरच मी तुमची खोटी साक्ष देईन. ब्रह्माने विचार केला की आपल्याला पित्याचे दर्शन तर झालेलेच नाही. आपण जर असेच मातेसमोर गेलो, तर आपण कोणतीही प्रतिक्रिया देऊ शकणार नाही. त्यामुळे दुसरा कोणताही पर्याय नाही हे पाहून ब्रह्माने गायत्रीच्या विनंतीस मान्यता दिली.

गायत्री म्हणाली की आपण आणखी एक साक्षीदार तयार केला तर? ब्रह्मालाही तिचा विचार पटला. तेव्हा गायत्रीने आपल्या शब्दशक्तीद्वारे एक कन्या (पुहपवती) उत्पन्न केली. ते दोघे तिला म्हणाले की ब्रह्माला पित्याचे दर्शन झालेले आहे, अशी तू देखिल खोटी साक्ष दे. पुहपवती म्हणाली की मी का खोटी साक्ष देऊ? जर ब्रह्मा माझ्याबरोबर शारिरीकसंबंध बनवीण्यास तयार असेल तरच मी खोटी साक्ष देईन. ब्रह्मा याला तयार होईना, तेव्हा गायत्रीने याशिवाय दुसरा कोणताच मार्ग नाही, अशी त्याची समजूत घातली आणि ब्रह्माने त्याला मान्यता दिली. नंतर तिघे मिळून माता आदिमायेजवळ (प्रकृति) आले. दोन्ही देवींनी या अटी एवढ्यासाठीच घातल्या होत्या की जर ब्रह्माने मातेसमक्ष आपण खोटी साक्ष देत आहे असे सांगितले तर माता आपणाला शाप देईल. यासाठीच त्यालाही दोषी बनविले होते.

(येथे गरीब दास जी महाराज म्हणतात की 'दास गरीब यह चूक धुरों धुर')

## ''माता (दुर्गा) कडून ब्रह्माला शाप''

तेव्हा मातेने ब्रह्माला विचारले की तुला तुझ्या पित्याचे दर्शन झाले? ब्रह्मा ने म्हटले कि मला पिता चे दर्शन झाले आहे. दुर्गाने म्हटले कि साक्षी दार सांगा. तेव्हा ब्रह्मा ने म्हटले की या दोघींसमक्ष साक्षात्कार झाला आहे. देवीने त्या दोन्ही मुलींना विचारले की तुमच्या समोर ब्रह्म का साक्षात्कार झाला आहे तेव्हा दोघींनीही होय म्हटले, आम्ही आमच्या डोळ्यांनी पाहिले. याचा माता भवानीला (प्रकृति) संशय आला. ब्रह्मने (काल) तर तिला सांगितले होते की तो कोणालाही दर्शन देणार नाही आणि हे म्हणत आहेत की दर्शन झाले. याचा ती विचार करू लागली. शेवटी अष्टांगीने ध्यान लावले आणि ज्योति निरंजनाला (काल) विचारले की हे तिघे बोलतात ते खरे आहे काय? ज्योति निरंजन म्हणाला की ते तिघे जण खोटे बोलत आहेत. तेव्हा माता भवानी म्हणाली की तुम्ही तिघेही खोटे बोलत आहात. त्यावेळी यांना कोणतेही दर्शन झालेले नाही, अशी आकाशवाणी झाली. ते ऐकून ब्रह्मा व्याकुळतेने म्हणाला की माते मी शपथ घेऊन पित्याच्या शोधार्थ गेलो होतो. परंतु मला पित्याचे दर्शन झाले नाही. त्यामुळे मला तुझ्यासमोर यायची लाज वाटत होती म्हणून आम्ही खोटे बोललो. तेव्हा माता दुर्गा म्हणाली की आता मी तुम्हास शाप देते.

**ब्रह्माला शाप :–** तुझी या जगात पूजा होणार नाही. पुढे तुझे वंशज पाखण्ड करतील. खोट्या गोष्टींची रचना करून जगाला फसवतील. तुझे वंशज वरून कर्मकाण्ड करताना दिसतील. पण त्यांच्या मनामध्ये अनेक विकार असतील. कथा, पुराणे वाचून दाखवतील. स्वत:ला सद्ग्रंथांमध्ये वास्तविकता काय आहे, याचे ज्ञान नसताना मानसन्मान

आणि धनप्राप्तीसाठी गुरू बनून अनुयायांना (शिष्यांना) लोकवेद (शास्त्रविरुद्धच्या दंतकथा) ऐकवतील. देवदेवतांची पूजा करून आणि करवून घेऊन, दुसऱ्यांची निंदा करून स्वत: कष्टावर कष्ट झेलत बसतील. जे त्यांचे अनुयायी-शिष्य होतील, त्यांना ते परमार्थ सांगणार नाहीत. दक्षिणेसाठी जगाला चुकीच्या मार्गाने फिरवतील. स्वत:ला सर्वश्रेष्ठ मानतील आणि दुसऱ्यांना कमी लेखतील. जेव्हा मातेच्या मुखातून हे सर्व ऐकले, तेव्हा ब्रह्मा मूर्च्छित होऊन जमिनीवर कोसळला आणि दीर्घ काळानंतर शुद्धीवर आला.

**गायत्रीला शाप** :- अनेक सांड तुझे पती होतील. तू मृत्युलोक मध्ये गाय बनशिल.

**पुहपवतिला शाप :-** गलिच्छ, उकिरड्याच्या ठिकाणी तुझी जागा असेल. तुझ्या फुलांचा कोणत्याही पूजेसाठी वापर केला जाणार नाही. तुझ्या या खोट्या साक्षीमुळे तुला नरक भोगावा लागेल. तुझे नाव केवडा केतकी असेल. (केवडयांच्या फुलांचे वृक्ष महाराष्ट्रात आहेत. हरियाणामध्ये त्याला 'कुसोंधी' असे म्हटले जाते. ते गलिच्छ जागी, उकिरड्यावर उगवते.)

या प्रकारे त्या तिघांना असे शाप दिल्यानंतर माता भवानीला अत्यंत पश्चात्ताप झाला. (अशाप्रकारे जीवात्मा कोणताही विचार करता मनाच्या (काल निरंजन) प्रभावाने चुकीचे कार्य करतो. परंतु जेव्हा आत्म्याच्या (सतपुरुषाचा अंश) प्रभावाने सत्यज्ञान होते, तेव्हा मग पश्चात्ताप सहन करावा लागतो. माता-पिता आपल्या मुलाच्या लहानशा चुकीसाठी त्याला रागाने बोलतात आणि नंतर मात्र त्यांना अत्यंत पश्चात्ताप होतो. हीच प्रक्रिया मनाच्या (कालनिरंजन) प्रभावाने सर्व जीवांमध्ये कार्यरत आहे.) येथे आणखी एक बाब विशेष आहे की निरंजनाने देखिल (काल, ब्रह्म) कायदा केला आहे की जर कोणी जीवाने दुर्बल जीवाला त्रास दिला, तर त्याला त्याची परतफेड नक्कीच करावी लागते. जेव्हा आदिभवानीने (प्रकृति, अष्टांगी) ब्रह्मा, गायत्री व पुहपवती यांना शाप दिला, तेव्हा अलख निरंजनही (ब्रह्म-काल) म्हणाला की हे भवानी (प्रकृति/अष्टांगी), तू हे उचित, बरोबर केले नाहीस. यासाठी आता मी (निरंजन) तुलाही शाप देतो की द्वापारयुगामध्ये तुझे पाच पती होतील. (द्रौपदी ही आदिमायेचा अवतार झालेली आहे.) जेव्हा अशी आकाशवाणी ऐकली, तेव्हा आदिमाया म्हणाली की हे ज्योति निरंजन काहीही झाले तरी मी तुलाच वश आहे. त्यामुळे तुला जे वाटेल ते तू कर.

{सृष्टिरचनेमध्ये दुर्गाचे अन्य नावांना वारंवार लिहण्याचा उद्देश आहे कि, पुराण गिता तसेच वेदांमध्ये प्रमाण पाहतेवेळेस भ्रम उत्पन्न होउ नये. जसे गिता अध्याय १४ श्लोक ३-४ मध्ये काल ब्रह्म ने म्हटले आहे कि प्रकृति तर गर्भ धारण करणारी सर्व जिवांची माता आहे. मि तीच्या गर्भात बिज स्थापन करणारा पिता आहे. श्लोक ४ मध्ये म्हटले आहे कि प्रकृति पासुन तिन्ही गुणातील जिवात्मांना कर्माच्या बंधनात बांधले जाते. (लेख समाप्त)

या प्रकरणात प्रकृति तर दुर्गा आहे तसेच तिन्ही गुणांचे तिन्ही देवता म्हणजेच रजगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु तसेच तमगुण शिव चे सांकेतीक नाव आहे.}

## ''विष्णुचे आपले पिता (काल/ब्रह्मच्या) प्राप्तीसाठी प्रस्थान आणि मातेचा आशीर्वाद प्राप्त करणे''

त्यानंतर दुर्गेने (प्रकृति) विष्णुला सांगितले की पुत्रा, तू देखिल आपल्या पित्याचा शोध घे. तेव्हा विष्णु आपले पिता ब्रह्मचा (काल) शोध घेत पाताळलोकी पोहोचला, जेथे शेषनाग होता. विष्णु आपल्या हद्दीत आल्याचे पाहून शेषनागाने क्रोधित होऊन विष्णुच्या शरीरावर विषाचा फुत्कार मारला. त्याच्या प्रभावाने विष्णु जींचा रंग (वर्ण) सावळा झाला. तेव्हा या

नागाला चांगलाच धडा शिकवायला पाहिजे, असे विष्णुच्या मनात आले. हे जेव्हा ज्योति निरंजनाने पाहिले, तेव्हा त्याला वाटले की आता विष्णुला शांत करायला पाहिजे आणि आकाशवाणी झाली की हे विष्णु, आता तू तुझ्या मातेकडे जा आणि जे काही घडले आहे, त्याचे सत्यकथन कर, तसेच जो त्रास तुला शेषनागापासून झालेला आहे, त्याचा प्रतिशोध तू द्वापारयुगामध्ये घे. द्वापारयुगामध्ये तू कृष्ण अवतार धारण करशील आणि कालिदहात (काली डोहात) कालिंद्री (कालिया) नावाने शेषनागाचा अवतार होईल.

ऊँच होई के नीच सतावै, ताकर ओएल (बदला) मोही सों पावे।
जो जीव देई पीर पुनी काँहु, हम पुनि ओएल दिवावें ताहूँ ।।

तेव्हा विष्णु मातेकडे (दुर्गा माता) आले आणि त्यांनी मला पित्याचे दर्शन झालेले नाही, असे सत्य सांगितले. यावर आदिमाता (प्रकृति) अत्यंत प्रसन्न झाली आणि म्हणाली की पुत्रा, तू सत्यवादी आहेस. आता मी आपल्या शक्तीने तुला तुझ्या पित्याशी भेट घालून देते. तसेच तूझ्या मनातील संशय नष्ट करते.

कबीर, देख पुत्र तो हि पिता भीटाऊँ तौरे मन का धोखा मिटाऊँ।
मन स्वरूप कर्ता कह जानों, मन ते दुजा और न मानो।
स्वर्ग पाताल दौर मन केरा, मन अस्थीर मन अहै अनेरा।
निरंकार मनही को कहिए, मन की आस निश दिन रहिए।
देख हूँ पलटि सुन्य मह ज्योति, जहाँ पर झिलमिल झालर होती ।।

अशा प्रकारे मातेने (अष्टगी, प्रकृति) विष्णुला सांगितले की मन हाच जगाचा कर्ता आहे. हाच ज्योति निरंजन आहे. ध्यानामध्ये ज्या हजार ज्योती नजरेस पडतात, तेच त्याचे रूप आहे. जो शंख, घंटा इत्यादींचा आवाज ऐकू येतो, तो महास्वर्गामध्ये निरंजनाचाच वाजत आहे. मातेने (अष्टांगी, प्रकृति) पुढे सांगितले की पुत्रा, तू सर्व देवतांचा शिरोमणी आहेस. तुझी प्रत्येक कामना आणि कार्य मी पूर्ण करेन. सर्व जगतामध्ये तुझी पूजा होईल. याचे कारण तू जे काय आहे, ते सर्व सत्य सांगितले आहेस. कालच्या (ज्योति निरंजन) या ब्रह्माण्डातील प्राण्यांना एक विशेष सवय आहे की ते फक्त आपली व्यर्थ महिमा गातात. जसे दुर्गा विष्णुला म्हणत आहे की तुझी जगामध्ये पूजा होईल. मी तुला तुझ्या पित्याचे दर्शन घडवेन. दुर्गा मातेने केवळ प्रकाश दाखवून विष्णुवर क्रुपा केले. श्री विष्णुही परमात्म्याचा केवळ प्रकाश दिसतो. परमात्मा निराकार आहे, अशी प्रभुची स्थिती आपल्या अनुयायांना समजावून सांगू लागले. त्यानंतर आदिभवानी रुद्राकडे (महेश) जाऊन म्हणाली की महेश, तू देखिल आपल्या पित्याचा शोध घे. तुझ्या दोन्ही बंधूंना तुझ्या पित्याचे दर्शन झालेले नाही. त्यांना जे काही द्यायचे ते मी दिले आहे, तेव्हा आता तुला काय पाहिजे असेल ते माग. यावर महेश (शंकर) म्हणाले की हे जननी, माझ्या दोन्ही ज्येष्ठ बंधूंना पित्याचे दर्शन झालेले नाही. त्यामुळे मी माझा प्रयत्न करणे व्यर्थ आहे. कृपया मला असा वर प्रदान कर की मी अमर (मृत्युंजय) होईन. माता प्रकृति म्हणाली की पुत्रा, हे मी करू शकत नाही. परंतु मी एक युक्ती सांगू शकते, ज्यामुळे तुझे आयुष्य सर्वांपेक्षा जास्त होईल. ती युक्ति म्हणजे विधियोग आहे. (त्यामुळेच महादेव अधिकाधिक काळ समाधीमध्ये राहतात.) अशाप्रकारे आदिमाया प्रकृतिने तिन्ही पुत्रांना सृष्टिरचनेच्या विभागांची वाटणी करून दिली.

भगवान ब्रह्मांना काल लोकी ८४ लक्ष वस्त्रांची (शरीरे) रचना करण्याचे म्हणजेच रजगुणाने प्रभावित करून संतान उत्पत्तीसाठी विवश करून जीव उत्पन्न करण्याचा विभाग

प्रदान केला गेला.

भगवान विष्णुंकडे उत्पन्न झालेल्या जीवांचे पालन पोषण (कर्मानुसार) करणे, तसेच मोह-ममता उत्पन्न करण्याची स्थिती कायम ठेवण्याचा विभाग प्रदान केला गेला.

भगवान शिव शंकरांकडे (महादेव) संहार करण्याचा विभाग प्रदान केला.

कारण यांचे पिता ज्योति निरंजनास एक लक्ष मानव देहधारी जीव प्रतिदिन खावे लागतात.

येथे मनामध्ये एक प्रश्न उत्पन्न होतो की ब्रह्मा, विष्णु आणि शंकर यांच्यापासून उत्पत्ती, स्थिती आणि संहार कशाप्रकारे होतो? ते तिघेही आपापल्या लोकामध्ये वास्तव्य करत असतात. जसे आजकाल संचारप्रणाली चालवण्यासाठी अवकाशात उपग्रह सोडले जातात आणि त्याद्वारे खाली पृथ्वीवर दूरदर्शन, इतर सेवा आदी संचारप्रणाली चालविली जाते, अगदी त्याचप्रकारे हे तिन्ही देव जेथे वास्तव्य करत असतील, तेथून त्यांच्या शरीरातून निघणारे सूक्ष्म गुणांचे तरंग तिन्ही लोकांमध्ये आपोआप प्रत्येक प्राण्यावर कायम प्रभाव ठेवतात.

वरिल विवरण एका ब्रह्माण्डामधील ब्रह्मच्या (काल) रचनेचे आहे. क्षर पुरुषाची (काल) अशी-अशी एकवीस ब्रह्माण्डे आहेत.

परंतु क्षर पुरुष (काल) स्वतः व्यक्त म्हणजेच वास्तविक शरीर रूपामध्ये सर्वांसमक्ष येत नाही. त्याच्या प्राप्तीसाठी तीन देवांनाही (ब्रह्मा विष्णु, शिव) वेदांमध्ये वर्णन आलेल्या विधीनुसार खडतर साधना करूनही ब्रह्मचे (काल) दर्शन झालेले नाही. तत्पश्चात ऋषिंनी वेदांचे पठन केले. त्यात लिहिले आहे की 'अग्नेः तनूर् असि' (पवित्र यजुर्वेदाच्या पहिल्या अध्यातील १५ वा मंत्र). परमेश्वर सशरीर आहे, तसेच पवित्र यजुर्वेदाच्या ५ व्या अध्यायातील पहिल्या मंत्रामध्ये वर्णन आहे की 'अग्ने: तनुर् असि विष्णवे त्वा सोमस्य तनूर् असि।'या मंत्रांमध्ये वेद दोन वेळा साक्ष देत आहे की सर्वव्यापक, सर्वांचा पालनकर्ता, सतपुरुष सशरीर आहे. पवित्र यजुर्वेदाच्या ४० व्या अध्यायातील ८ व्या मंत्रामध्ये म्हटले आहे की (कविर् मनिषी) ज्या परमेश्वराची सर्व प्राण्यांना अतिआस्था (इच्छा) आहे, ते 'कविर्' अर्थात कबीर आहेत. त्यांचे शरीर नाडीविना- नाडीरहित (अस्नाविरम्) आहे, ते (शुक्रम्) वीर्यापासून उत्पन्न झालेल्या, पंचतत्त्वांनी बनलेल्या भौतिक कायारहित (अकायम्) आहेत. ते सर्वांचे स्वामी 'सर्वोपरि' (सर्वांत वर) सत्यलोकामध्ये विराजमान आहेत. त्या परमेश्वराचे शरीर तेजःपुंज व (स्वज्योति) स्वयंप्रकाशित आहे, जे शब्दरूप अर्थात अविनाशी आहे. तेच कविर्देव (कबीर परमेश्वर) जे सर्व ब्रह्माण्डांची रचना करणारे, (व्यदधाता) सर्व बह्मांडांचे रचनाहार, (स्वयम्भू:) स्वयं प्रगट होणारे, (यथा तश्य: अर्थान्) वास्तवामध्ये, (शाश्वत्) अविनाशी आहेत. (गीता च्या १५ व्या अध्यायातील १७ व्या श्लोकामध्येही याचे प्रमाण आले आहे) भावार्थ आहे की पूर्ण ब्रह्मच्या शरीराचे नाव 'कबीर' (कविर्देव) आहे. त्या परमेश्वराचे शरीर नूर (तेज) तत्त्वाने बनलेले आहे. परमात्म्याचे शरीर अतिसूक्ष्म आहे आणि ते त्याच साधकाला दिसते, ज्याची दिव्य दृष्टी उघडलेली आहे. अशाप्रकारे जीवाचेही सूक्ष्म शरीर आहे, ज्यावर पाच तत्त्वांचे वेष्टन (आवरण) आहे म्हणजेच पंचतत्त्वांची काया चढलेली आहे आणि ते माता-पिता यांच्या संयोगाने (शुक्रम्) वीर्याने बनलेले आहे. शरीराचा त्याग केल्यानंतरही जीवाचे सूक्ष्म शरीर सोबतच राहते. ते शरीर त्याच साधकाला दृष्टीस पडते, ज्याची दिव्यदृष्टी उघडलेली आहे. परमात्मा व जीव यांची स्थिती अशाप्रकारेच समजून घ्यावी. वेदामध्ये 'ओऽम' नामाच्या स्मरणाचे प्रमाण आहे, ते केवळ ब्रह्म साधना आहे. या उद्देशाने 'ओऽम' नामाच्या जपास पूर्ण ब्रह्मचे मानून ऋषिंनी हजारो वर्षे


हठयोग (समाधी लावून) करून प्रभुच्या प्राप्तीची चेष्टा (प्रयत्न) केली. त्यांना सिद्धी प्राप्त झाल्या. परंतु प्रभूचे दर्शन झाले नाही. याच सिद्धिरूपी खेळण्याने खेळून ऋषि देखिल जन्म-मृत्यूच्या चक्रामध्ये (८४ लक्ष योनींमध्ये) अडकले. त्यांना जे अनुभव आले, त्यानुसार त्यांनी आपल्या शास्त्रामध्ये परमात्याचे निराकार असे वर्णन केले आहे. ब्रह्मने (काल) शपथ घेतली आहे की मी आपल्या वास्तविक रूपामध्ये कोणालाही दर्शन देणार नाही. मला सर्व जण अव्यक्त समजतील. (अव्यक्तचा भावार्थ आहे की कोणी आकार स्वरूपात आहे. परंतु व्यक्तिगत रूपाने स्थूल रूपामध्ये दर्शन देत नाही. आकाशामध्ये ढग जमा झाल्यावर दिवसाही सूर्य अदृश्य होतो म्हणजेच आपणाला तो दिसत नाही. परंतु वास्तवामध्ये तो ढगांच्या पलीकडे जसा आहे तसाच आहे. या अवस्थेला अव्यक्त असे म्हणतात). (प्रमाणासाठी गीता च्या ७ व्या अध्यायातील २४ व २५ वा श्लोक आणि ११ व्या अध्यायातील ३२ व ४८ वा श्लोक)

पवित्र गीता चे ज्ञान देणारा ब्रह्म (काल) श्री कृष्णाच्या शरीरात प्रेतवत प्रवेश करून म्हणत आहे की हे अर्जुना, मी मोठा झालेला काल आहे आणि सर्वांना खाण्यासाठी आलो आहे. (गीता च्या अकराव्या अध्यायातील ३२ वा श्लोक). हे माझे वास्तविक रूप आहे. हे रूप तुझ्याव्यतिरिक्त पूर्वी कोणी पाहिलेले नाही आणि तुझ्यानंतर इथून पुढे कोणी पाहू देखिल शकणार नाही. अर्थात, वेदांमध्ये वर्णन असलेल्या यज्ञ-तप-जप, तसेच ओऽम नाम आदी विधींनीही माझ्या या वास्तविक स्वरूपाचे दर्शन होऊ शकणार नाही. (गीता च्या अकराव्या अध्यायातील ४८ वा श्लोक). मी कृष्ण नाही. हे मूर्ख लोक मला अव्यक्तास कृष्ण रूपामध्ये व्यक्त (मनुष्यरूप) मानत आहेत. कारण ते माझ्या नीच (अनुचित) नियमांपासून अपरिचित आहेत. मी कधीही माझ्या या वास्तविक कालरूपामध्ये सर्वांसमक्ष येत नाही. मी आपल्या योगमायेद्वारे गुप्त (लपून) राहतो. (गीता च्या ७ व्या अध्यायातील २४ व २५ वा श्लोक). विचार करा: काल आपल्या गुप्त (लपून) राहण्याच्या विधानाला स्वतः अश्रेष्ठ (अनुत्तम) का म्हणत आहे?


जर पिता आपल्या मुलांना दर्शन देत नसेल, तर त्याच्यात कोणती तरी कमतरता आहे. तो सुविधाही प्रदान करतो. पण गुप्तही राहतो. कालला (ब्रह्म) शापामुळे एक लाख मानव शरीरधारी प्राण्यांचा आहार करावा लागतो, तसेच प्रतिदिन २५ टक्के जे अधिक उत्पन्न होतात, त्यांची स्थिती सुरळीत राखण्यासाठी, तसेच कर्मभोगाचा दंड देण्यासाठी ८४ लक्ष योनींची रचना केलेली आहे. जर सर्वांसमक्ष येऊन एखाद्याची मुलगी, मुलगा, पत्नी, आई-वडील यांना तो भक्षण करू लागला, तर सर्वांना ब्रह्मची घृणा वाटू लागेल. तसेच जेव्हा कधी पूर्ण परमात्मा कविर्देव (कविरग्नि, कबीर परमेश्वर) स्वतः येतील किंवा आपला कोणी संदेशवाहक (दूत) पाठवतील, तेव्हा सर्व प्राणी सत्यभक्ती करून कालच्या जाळ्यातून निघून जातील. त्यामुळे हे आत्मे सतलोकी जाऊ नयेत म्हणून काल ब्रह्म ला फसवून, धोका देऊन येथे मृत्युलोकात ठेवतो. त्यामुळे गीता च्या ७ व्या अध्यायातील १८, २४ व २५ व्या श्लोकांमध्ये त्याने आपल्या साधनेपासून मिळणारी मुक्ती (गती) ही (अनुत्तमाम्) 'अतिअश्रेष्ठ' अगदी हीन दर्जाची आहे असे म्हटले आहे. तसेच त्याने आपल्या विधानालाही (नियम) अश्रेष्ठ (अनुत्तम) म्हटले आहे. (कृपया पहा एका ब्रह्माण्डाचे लहान चित्र ह्यच पुस्तकात पान नंबर २४ वर)


प्रत्येक बह्मांडामध्ये कालने एका महास्वर्गाची निर्मिती केली आहे. त्या महास्वर्गामध्ये एका स्थानी प्रकृति द्वारे (दुर्गा/आदिमाया) प्राण्यांना धोक्यामध्ये ठेवण्यासाठी नकली सतलोक, नकली अलखलोक, नकली अगमलोक आणि नकली अनामीलोक यांची रचना केलेली आहे. कबीर साहेबांचा एक शब्द आहे की 'कर नैनों दीदार महल में प्यारा है' मध्ये वाणी आहे की,

# ब्रह्म लोकाचे लघु चित्र



# ज्योति निरंजन (काल) ब्रह्म चे लोक (२१ ब्रह्मण्ड) चे लघु चित्र






वरती मूळ (जड) खाली शाखा (फांद्या) वाला उलटा लटकलेला संसार रुपी झाडाचे चित्र

'काया भेद किया निरवारा, यह सब रचना पिण्ड मंझारा है। माया अविगत जाल पसारा, सो कारीगार भारा है। आदिमाया किन्ही चतुराई, झुठी बाजी पिण्ड दिखाई, अविगत रचना रचि अण्ड माहि वाका प्रतिबिम्ब डारा है।'

**एका ब्रह्माण्डामध्ये श्री ब्रह्माजींचा लोक, श्री विष्णुजींचा लोक आणि श्री शिवजींचा लोक अशी अन्य लोकांचीही रचना आहे. तेथे विराजित होऊन हे तिन्ही प्रभु खालील तीन लोकांत (स्वर्गलोक म्हणजेच इंद्रलोक, पृथ्वीलोक आणि पाताळलोक) प्रत्येकी एकेक विभागाचे स्वामी बनून प्रभुत्व करतात आणि आपल्या पित्याच्या (काल) आहारासाठी मानव प्राण्यांची उत्पत्ती, स्थिती आणि संहार यांचा कार्यभार सांभाळतात. या तिन्ही प्रभुंचाही जन्म व मृत्यू होत असतो. जेव्हा त्यांचा मृत्यू होतो, तेव्हा काल त्यांनाही भक्षण करतो. याच ब्रह्मांडामध्ये (यालाच 'अंडे' असे देखिल म्हटले जाते. कारण ब्रह्माण्डाची रचना अंडाकार आहे. याला 'पिंड' असेही संबोधले जाते. कारण शरीरामध्ये (पिंड) एका ब्रह्माण्डाची रचना कमळांमध्ये टीव्हीसारखी (संदेश लहरी) पाहिली जाते.) एक मानसरोवर आणि धर्मरायाचाही (न्यायाधीश) लोक आहे, तसेच जसे प्रत्येक देशाचे राजदूत भवन असते, अशा एका गुप्तस्थानी पूर्ण परमात्मा अन्य रूप धारण करून वास्तव्य करतात. तेथे कोणीही जाऊ शकत नाही. ज्यांची सतलोकीची भक्ती अपूर्ण राहिलेली आहे, ते आत्मे तेथे राहतात. जेव्हा भक्तियुग येतो त्यावेळी कबीर परमेश्वर आपल्याकडुन आपला प्रतिनिधी म्हणजे पूर्ण संत सतगुरु या पृथ्वीवर पाठवितात या पुण्यात्म्यांना पृथ्वीवर मानव शरीर प्राप्त होते आणि ते शीघ्रतेने सत्यभक्तीस लागतात व त्यांना पूर्ण मोक्ष प्राप्त होतो. या स्थानावरून ते परत मृत्युलोकी येत नाहीत. या स्थानी वास्तव्य करणाऱ्या हंस आत्म्यांची निजभक्तीची कमाई खर्च होत नाही. परमात्म्याच्या भंडारातून त्यांना सर्व सुविधा उपलब्ध होत असतात. ब्रह्मच्या (काल) उपासकांची मात्र भक्तीची कमाई स्वर्ग-महास्वर्ग यांमध्ये समाप्त होते. कारण या काललोकामध्ये (ब्रह्मलोक), तसेच परब्रह्म लोकामध्ये प्राण्यांना आपण केलेल्या कर्मांचे फळ तेवढेच मिळते. (कृपया पहा एका ब्रह्माण्डाचे व ब्रह्माच्या २१ ब्रह्माण्डाचे लहान चित्र ह्यच पुस्तकात पान नंबर ३६ व ३७ वर)**

क्षर पुरुषाने (ब्रह्म) आपल्या २० ब्रह्माण्डांचे चार महाब्रह्मांडांमध्ये विभाजन केलेले आहे. प्रत्येक महाब्रह्मांडामध्ये पाच ब्रह्माण्डांचा एक समूह बनविला आहे. तसेच ते चारी बाजूंनी अंडाकार वर्तुळात (परिघ) स्थिर केले आहे. याप्रमाणे चारही महाब्रह्मांडांनाही अंडाकार वर्तुळात (परिघ) स्थिर केले आहे. राहिलेल्या एकविसाव्या ब्रह्माण्डाची रचना एका महाब्रह्मांडाएवढे क्षेत्र घेऊन केलेली आहे. या एकविसाव्या ब्रह्माण्डामध्ये प्रवेश होताच, पुढे तीन रस्ते बनविले आहेत. या ब्रह्माण्डामध्येही डाव्या बाजूला नकली सतलोक, नकली अलखलोक, नकली अगमलोक आणि नकली अनामीलोक यांची रचना आदिमायेद्वारे (दुर्गा) प्राण्यांना धोक्यामध्ये ठेवण्यासाठी निर्माण केली आहे. उजव्या बाजूला बारा सर्वश्रेष्ठ ब्रह्म साधकांना (भक्तांना) हा ब्रह्म ठेवतो. नंतर प्रत्येक युगामध्ये त्यांना आपला संदेशवाहक (संत, सतगुरु) बनवून पृथ्वीवर पाठवितो. ते पृथ्वीवर शास्त्रविधिरहित साधना व ज्ञान सांगतात आणि स्वत:ही भक्तिहीन होतात आणि आपल्याबरोबर ते अनुयायांनाही कालच्या जाळ्यामध्ये फसवतात. त्यानंतर ते गुरू व त्यांचे शिष्य दोघेही नरकामध्ये जातात. त्यानंतर पुढे एक मोठे कुलूप आहे. तो रस्ता कालच्या (ब्रह्म) निजलोकी जातो. तेथे हा ब्रह्म (काल) आपल्या वास्तविक मानवसदृश कालरूपामध्ये वास्तव्य करत असतो. या स्थानावर एका दगडापासून बनलेला तवा (तप्तशिला) असतो, जो नेहमी लोह रसा सारखा रस-रसलेला असतो. ज्यावर एक लाख मानव शरीरधारी प्राण्यांचे सूक्ष्म शरीर भाजून त्यातून विकारी घाण काढुन तो प्रतिदिन खातो. त्यावेळी सर्व प्राण्यांना अत्यंत पीडा

सहन कराव्या लागतात आणि तेथे हाहाकार माजतो. काही कालावधीनंतर ते जीव बेशुद्ध होतात. परंतु त्यांचा मृत्यू होत नाही. नंतर धर्मरायाच्या लोकामध्ये गेल्यावर कर्माधारावर त्यांना अन्य जन्म प्राप्त होतो. त्यांचा जन्म–मृत्यूचा फेरा सतत चालू राहतो. समोर लावलेले कुलूप ब्रह्म (काल) केवळ ज्यांचा आहार करायचा आहे, त्या प्राण्यांसाठी काही क्षण उघडतो. असे जरी असले, तरी पूर्ण परमात्म्याच्या सत्यनाम व सारनामाने हे कुलूप आपोआप उघडले जाते. असे हे कालचे जाळे (महाभयंकर चक्रव्यूह) स्वतः पूर्ण परमात्मा कबीर साहेबांनी आपला भक्त धर्मदासला समजावून सांगितले.

## ''परब्रह्मच्या सात संख ब्रह्माण्डांची स्थापना''

कबीर परमेश्वरांनी (कविर्देव) पुढे सांगितले आहे की परब्रह्मने (अक्षर पुरुष) कार्यात चूक केली आहे व तो मानसरोवरामध्ये झोपला, तसेच जेव्हा परमेश्वराने (मी अर्थात कबीर साहेबांनी) या सरोवरामध्ये अंड सोडले, तेव्हा अक्षर पुरुषाने (परब्रह्म) त्या अंड्याकडे क्रोधाने बघितले. या दोन्ही अपराधांमुळे त्यालाही सात संख ब्रह्मांडांसह सतलोकातून बाहेर निष्कासित केले. दुसरे कारण म्हणजे अक्षर पुरुष (परब्रह्म) आपला साक्षीदार, सोबती ब्रह्मपासून (क्षर पुरुष) वेगळा झाल्यामुळे व्याकुळ होऊन परमपिता कविर्देवांना (कबीर परमेश्वर) विसरला आणि केवळ ब्रह्मच्याच आठवणीत गुंतला. तसेच त्याला असेही वाटले की क्षर पुरुष (ब्रह्म) तर तिकडे आनंदात राहत असणार आणि आपणच पाठीमागे राहिलो. तसेच परब्रह्मसोबत जे सात संख ब्रह्माण्डांमध्ये अन्य काही आत्मे जन्म–मृत्यूचा कर्मदंड भोगत आहेत, जे ब्रह्मबरोबर (काल) एकवीस ब्रह्माण्डांमध्ये फसलेले आहेत आणि पूर्ण परमात्म्याचे त्यांना विस्मरण झाले आहे, त्या हंसात्म्यापासून वेगळे (ताटातूट) झाल्याच्या दु:खात (आठवणीत) तो बुडाला. परमेश्वर कविर्देवांनी वारंवार समजावून सांगूनही त्यांच्याबद्दलची त्याची आस्था कमी झाली नाही. परब्रह्मने (अक्षर पुरुष) स्वतंत्र स्थान प्राप्त करणेच योग्य होईल, असा विचार करून राज्यप्राप्तीच्या इच्छेने सारनामाचा जप सुरू केला. अशाप्रकारे अन्य आत्म्यांनी (जे परब्रह्मच्या सात संख्य ब्रह्माण्डांमध्ये फसलेले आहेत.) विचार केला की जे आत्मे ब्रह्मसोबत गेले आहेत ते तेथे मौजमजा करणार आणि आपण मात्र येथे मागे राहिलो. परब्रह्मच्या मनाची अशी धारणा झाली की क्षर पुरुष स्वतंत्र होऊन अत्यंत सुखी असेल. हा विचार करून त्याने अंतरात्म्यापासून भिन्न स्थान प्राप्त करण्याचे ठरविले. परब्रह्मने (अक्षर पुरुष) हठयोग केला नाही. परंतु स्वतंत्र राज्यप्राप्तीसाठी सहजतेने ध्यानयोग विशेष तळमळतेने करू लागला. स्वतंत्र स्थान प्राप्त करण्यासाठी तो वेड्यासारखा विचार करू लागला. त्याने अन्नपाण्याचा त्याग केला. अन्य काही आत्मे त्याच्या वैराग्यावर आसक्त झाले आणि तो त्यांना आवडू लागला. पूर्ण प्रभुंनी (कबीर साहेब) विचारल्यावर परब्रह्मने स्वतंत्र स्थानाची मागणी केली, तसेच काही हंसात्म्यांना आपल्याबरोबर नेण्याची इच्छा व्यक्त केली. ज्या आत्म्यांची तुझ्याबरोबर जाण्याची इच्छा असेल, त्यांना पाठवून देतो, असे कविर्देवांनी सांगितले. जे कोण आत्मे परब्रह्मसोबत जाऊ इच्छितात, त्यांनी आपली सहमती व्यक्त करावी, असे पूर्ण प्रभूंनी विचारले. बऱ्याच कालावधीनंतर एका हंसाने स्वीकृती दिली. नंतर त्याच्यापाठोपाठ एकेक करत त्या सर्वच आत्म्यांनी सहमती व्यक्त केली. सर्वप्रथम स्वीकृती देणाऱ्या हंसात्म्याला परमात्म्याने स्त्री रूप दिले आणि तिचे नाव 'ईश्वरी माया' (प्रकृति सुरती) असे ठेवले. बाकीच्या आत्म्यांना त्या ईश्वरी मायेमध्ये प्रवेशित केले आणि अचिंत्यद्वारे अक्षर पुरुषाकडे (परब्रह्म) पाठविले. (पतिव्रता पदापासून (निष्ठा) ढळल्याची त्यांना शिक्षा मिळाली.) अनेक युगे ईश्वरी माया व परब्रह्म दोघेही

सात संख ब्रह्माण्डांमध्ये एकत्र राहिले. त्या कालात परब्रह्मने कोणतेही गैरवर्तन केले नाही. त्याने ईश्वरी मायेच्या स्वच्छेने तिचा अंगीकार केला आणि आपल्या शब्दशक्तिने नखांनी स्त्री इंद्रीय (योनी) बनवली व ईश्वरी देवीच्या सहमतीने संतान उत्पत्ती केली. यामुळेच परब्रह्मच्या लोकातील (सात संख ब्रह्माण्डांतील) प्राण्यांना तप्तशिलेवरील भयंकर कष्ट नाहीत. तसेच तेथे ब्रह्मलोकीच्या देवांपेक्षाही पशुपक्षी देखिल अधिक चारित्र्यसंपन्न आहेत. तेथील प्राण्यांचे आयुष्य देखिल दीर्घ आहे. परंतु जन्म-मृत्यूच्या कर्मधारावर कर्मदंड आणि परिश्रम करूनच उदरपूर्ती होते. स्वर्ग आणि नरकही असेच बनलेले आहेत. परब्रह्मला (अक्षर पुरुष) सात संख ब्रह्माण्डे त्याच्या सारनामाच्या इच्छारूपी भक्तिध्यान अर्थात सहज समाधी विधीद्वारे मिळवलेल्या कमाईचे प्रतिफल म्हणून प्रदान केलेली आहेत आणि सत्यलोकापेक्षा भिन्न स्थानावर गोलाकार परिघामध्ये (वर्तुळाकार अदृश्य कवचामध्ये) कविर्देवांनी बंदिस्त करून सात संख ब्रह्माण्डांसह अक्षर ब्रह्म व ईश्वरी माया यांना सत्यलोकातून निष्कासित केले आहे.

पुर्ण ब्रह्म (सतपुरुष) असंख्य ब्रह्माण्ड जो सत्यलोक इत्यादी मध्ये आहेत तसेच ब्रह्मची २१ ब्रह्माण्डे तसेच परब्रह्मची सात संख ब्रह्माण्डे या सर्वांचे प्रभु (मालक) आहेत अर्थात परमेश्वर कविर्देव कुळाचे मालक आहेत.

श्री ब्रह्मा, श्री विष्णु आणि श्री शिव यांच्याकडे चार-चार भुजा (हात) आणि सोळा कला आहेत, तर प्रकृतिदेवीकडे (दुर्गा) आठ भुजा (हात) आणि ६४ कला आहेत. ब्रह्मकडे (क्षर पुरुष) एक हजार भुजा आणि एक हजार कला आहेत. तसेच तो २१ ब्रह्माण्डांचा प्रभु आहे. परब्रह्मकडे (अक्षर पुरुष) दहा हजार भुजा आणि दहा हजार कला आहेत. तसेच तो सात संख ब्रह्माण्डांचा प्रभू आहे. पूर्ण ब्रह्म (कविर्देव, परम अक्षर पुरुष म्हणजेच सतपुरुष) यांच्याकडे असंख्य भुजा व असंख्य कला आहेत आणि ते ब्रह्मची २१ ब्रह्माण्डे, परब्रह्मची सात संख ब्रह्माण्डे यांच्यासह असंख्य ब्रह्माण्डांचे प्रभु (स्वामी) आहेत. प्रत्येक प्रभु आपल्या सर्व भुजा एकत्र घेऊन (गुप्त ठेवून) केवळ दोन भुजा देखिल ठेवू शकतात किंवा जेव्हा वाटेल तेव्हा सर्व भुजा प्रगट करू शकतात. जसे फिरता कॅमेरा बाहेर लावला आणि टीव्ही आत ठेवल्यावर बाहेरचे सर्व दृश्य टीव्हीवर दिसते, तसेच दुसरा टीव्ही बाहेर ठेवला आणि आतमध्ये कॅमेरा स्थिर करून ठेवल्यावर टीव्हीवर केवळ आत चाललेल्या घडामोडीच दिसतात. त्यामुळे सर्व कर्मचारी खबरदारी घेत असतात, तसे पूर्ण परमात्मा परब्रह्मच्या प्रत्येक ब्रह्माण्डामध्ये वेगळे स्थान निर्माण करून अन्य रूपामध्ये गुप्त वास्तव्य करतात. असे समजा जसे एक फिरणारा कैमेरा बाहेर लावला तसेच आतमध्ये टी.व्ही (टेलीविजन) ठेवला. टी.व्ही वर बाहेरचे दृश्य दिसते तसेच दुसरा टी.व्ही बाहेर ठेऊन आतमधिल कैमेरा स्थाई करुन ठेवला, त्यामध्ये केवळ आतमध्ये बसलेल्या प्रबंधकाचे चित्र दिसते. ज्यामुळे सर्व कर्मचारी सावधान राहतात.

अशाप्रकारे पूर्ण परमात्म्याने आपल्या सतलोकी विराजमान होऊन सर्वांना नियंत्रित केले आहे तसेच प्रत्येक ब्रह्माण्डामध्ये सतगुरू कविर्देव विद्यमान राहतात जसा सूर्य दूर असूनही अन्य लोकांवर त्याचा प्रभाव आहे.

## ''पवित्र अथर्ववेदामधील सृष्टिरचनेचे प्रमाण''

४ थ्या काण्डातील पहिल्या अनुवाकमधील पहिला मंत्र :-

ब्रह्म जज्ञानं प्रथमं पुरस्ताद वि सीमत: सुरुचो वेन आव:।
स बुध्न्या उपमा अस्य विष्ठा: सतश्च योनिमसतश्च वि व: ।।१।।

ब्रह्म–ज–ज्ञानम्–प्रथमम्–पुरस्तात्–विसिमत:–सुरुचः–वेन:–आव:– स:–बुध्न्या:– उपमा–अस्य–विष्ठा:– सत:–च– योनिम्–असत:– च–वि व:

**अनुवाद :–** **(प्रथमम्) प्राचीन अर्थात सनातन (ब्रह्म) परमात्म्याने (ज) प्रगट होऊन (ज्ञानम्) आपल्या ज्ञानाने पूर्ण विचारपूर्वक (पुरस्तात्) शिखरामधील अर्थात सतलोक आदींना (सुरुच:) स्वेच्छेने अत्यंत तत्परतेने स्वयंप्रकाशित (विसिमत:) सीमारहित म्हणजेच विशाल सीमा असणाऱ्या भिन्न लोकांना/खण्डांना त्या (वेन:) विणकाराने (निर्माता) धाग्यांनी म्हणजेच वस्त्रासारखे विणून (आव:) सुरक्षित केले आहे (च) आणि (स:) तो पूर्ण ब्रह्मच सर्व रचना करतो. (अस्य) यासाठी त्या (बुध्न्या:) मूळ स्वामीने (योनिम्) मूळस्थान सत्यलोकाची रचना केली आहे. (अस्य) त्याच्या/सतलोकांच्या (उपमा) सदृश अर्थात मिळतेजुळते (सत:) अक्षर पुरुष म्हणजेच परब्रह्मचा लोक/खण्ड काही प्रमाणात स्थायी (च) आणि (असत:) क्षर पुरुषाचे अस्थायी लोक इत्यादी (वि व:) वेगवेगळे आवास स्थान (विष्ठा:) स्थापित केले.**

**भावार्थ :– पवित्र वेद सांगणारा ब्रह्म (काल) म्हणत आहे की सनातन परमेश्वराने स्वतः अनामय (अनामी) लोकातून सत्यलोकी प्रगट होऊन आपल्या ज्ञानाने पूर्ण विचाराअंती वस्त्रासारखी रचना करून वरील सतलोक इत्यादींना सीमारहित स्वयंप्रकाशित अजर–अमर म्हणजेच अविनाशी स्थिर केले आणि खालील परब्रह्मची सात संख ब्रह्माण्डे व ब्रह्मची (ज्योति निरंजन) २१ ब्रह्माण्डे व त्यामधील लहानातील लहान (सूक्ष्मातील सूक्ष्म) रचना त्या परमात्म्याने अस्थायी स्वरूपात केली आहे.**

**४ थ्या काण्डातील पहिल्या अनुवाकमधील दुसरा मंत्र :–**

इयं पित्र्या राष्ट्र्येत्वग्रे प्रथमाय जनुषे भुवनेष्ठाः ।
तस्मा एतं सुरुचं ह्वारमह्यं घर्मं श्रीणन्तु प्रथमाय धास्यवे ।।२।।

इयम्–पित्र्या–राष्ट्रि–एतु–अग्रे–प्रथमाय–जनुषे–भुवनेष्ठा:–तस्मा–एतम्–सुरुचम्–हवारमह्यम्–धर्मम्–श्रीणान्तु–प्रथमाय–धास्यवे

**अनुवाद :– (इयम्) याच (पित्र्या) जगतपित्या परमेश्वराने (एतु) या (अग्रे) सर्वोत्तम (प्रथमाय) सर्वांत पहिली माया परानंदनी (राष्ट्रि) राजेश्वरी शक्ती म्हणजेच पराशक्ती, जिला आकर्षण शक्ती असेही संबोधले जाते (जनुषे ) उत्पन्न करून (भुवनेष्ठा:) लोक/स्थान/खण्ड स्थापन केले (तस्मा) त्याच परमेश्वराने (सुरुचम्) मोठ्या प्रसंतेने, आनंदाने स्वइच्छेने (एतम्) या (प्रथमाय) प्रथम उत्पत्ती झालेल्या शक्ती म्हणजेच पराशक्तीद्वारे (हवारमह्यम्) एक दुसऱ्यांच्या वियोगाला/एकापासून दुसऱ्याच्या वियोगास थांबविण्याचा म्हणजेच आकर्षण शक्तीच्या (श्रीणान्तु) गुरुत्वाकर्षणाला परमात्म्याने नित्य राहण्याचा आदेश दिला, जो कधीही समाप्त न होणाऱ्या (धर्मम्) स्वभावाला (धास्यवे) धारण करून धाग्यांनी वस्त्रासारखे विणून स्थिर केले आहे.**

**भावार्थ :– जगतपिता परमेश्वराने आपल्या शब्दशक्तीने राष्ट्री म्हणजेच सर्वांत प्रथम माया राजेश्वरी उत्पन्न केली आणि त्या पराशक्तीद्वारे एक दुसऱ्यांना आकर्षण शक्तीने (गुरुत्वाकर्षण) एकत्र ठेवणाऱ्या (थांबविणाऱ्या) व कधीही समाप्त न होणाऱ्या गुणाने या सर्व ब्रह्माण्डांची स्थापना केली.**

**४ थ्या काण्डातील पहिल्या अनुवाकमधील ३ रा मंत्र :–**

प्र यो जज्ञे विद्वानस्य बन्धुर्विश्वा देवानां जनिमा विवक्ति।

ब्रह्म ब्रह्मण उज्जभार मध्यान्नीचैरुच्चैः स्वधा अभि प्र तस्थौ ।।३।।

प्र-यः-जज्ञे-विद्वानस्य-बन्धुः-विश्वा-देवानाम्- जनिमा- विवक्ति-बह्मः- ब्रह्मणः-उज्जभार-मध्यात्-निचैः-उच्चैः-स्वधा-अभिः-प्रतस्थौ।

**अनुवाद :- (प्र) सर्वप्रथम (देवानाम्) देवता व ब्रह्माण्डे यांच्या (जज्ञे) उत्पत्तीच्या ज्ञानाला (विद्वानस्य) जिज्ञासू भक्ताचा (यः) जो (बन्धुः) वास्तविक साथी/सोबती म्हणजेच पूर्ण परमात्माच आपल्या निजसेवकाला (जनिमा) आपल्याद्वारे सृजन/उत्पन्न केलेल्या (विवक्ति) स्वतःच योग्यप्रकारे विस्तारपूर्वक सांगतात की (ब्रह्मणः) पूर्ण परमात्म्याने (मध्यात्) आपल्या माध्यमातून म्हणजेच शब्दशक्तीने (ब्रह्मः) ब्रह्म-क्षर पुरुष म्हणजेच कालला (उज्जभार) उत्पन्न करून (विश्वा) सर्व संसारास म्हणजेच सर्व लोकांस/धामांस (उच्चैः) वरील सत्यलोक इत्यादी (निचैः) खालील परब्रह्म व ब्रह्म यांची सर्व ब्रह्माण्डे (स्वधा) आपल्या धारण केलेल्या (अभिः) आकर्षण शक्तीने (प्रतस्थौ) दोन्हींना चांगल्या प्रकारे स्थिर केले.**

**भावार्थ :- पूर्ण परमात्मा आपण रचलेल्या सृष्टिचे ज्ञान आणि सर्व आत्म्यांच्या उत्पत्तीचे ज्ञान आपल्या निजदासाला स्वतः योग्य आणि विस्तारपूर्वक सांगत आहेत की पूर्ण परमात्म्याने आपल्या माध्यमातून म्हणजेच शरीरातून आपल्या शब्दशक्तीद्वारे ब्रह्मची (क्षर पुरुष/काल) उत्पत्ती केली आणि सर्व ब्रह्माण्डांच्या वर सतलोक, अलखलोक, अगमलोक, अनामीलोक आदी व खाली परब्रह्मची सात संख ब्रह्माण्डे आणि ब्रह्मची २१ ब्रह्माण्डे यांना आपण धारण केलेल्या आकर्षण शक्तीद्वारे स्थिर केलेले आहे.**

**ज्या प्रकारे पूर्ण परमात्मा कबीर परमेश्वर (कविर्देव) यांनी आपल्या निजसेवक अर्थात सखा श्री धर्मदासजी, आदरणीय गरीब दास जी आदींना आपल्याद्वारे रचल्या गेलेल्या सृष्टिचे ज्ञान स्वतःच सांगितले आहे, तसे हा वेदमंत्र देखिल त्याचेच समर्थन करत आहे.**

**४ थ्या काण्डातील पहिल्या अनुवाकमधील ४ था मंत्र :-**

स हि दिवः स पृथिव्या ऋतस्था मही क्षेमं रोदसी अस्कभायत्।
महान् मही अस्कभायद् वि जातो द्यां सद्म पार्थिवं च रजः ।।४।।

हि-दिवः-स-पृथिव्या-ऋतस्था-मही-क्षेमम्-रोदसी-अकस्भायत्-महान्-मही-अस्कभायद्-विजातः-धाम्-सदम्-पार्थिवम्-च-रजः।

**अनुवाद :- (स) त्याच सर्वशक्तिमान परमात्म्याने (हि) निःसंदेह (दिवः) वरील चारही दिव्य लोकांस- सत्यलोक, अलखलोक, अगमलोक तथा अनामी अर्थत अकहलोक या दिव्य गुणांनी युक्त लोकांस (ऋतस्था) सत्य, स्थिर म्हणजेच अजर-अमर रूपाद्वारे स्थिर केले, (स) त्यांच्यासारखे (पृथिव्या) खाली पृथ्वीवरील सर्व लोक- परब्रह्मची सात संख आणि ब्रह्म/कालची २१ ब्रह्माण्डे (मही) पृथ्वी तत्त्वाने (क्षेमम्) सुरक्षितपणे (अस्कभायत्) स्थिर केले. (रोदसी) आकाश तत्त्व व पृथ्वी तत्त्व या दोन्ही तत्त्वांच्या वरील आणि खालील ब्रह्माण्डांना (जसे आकाश एक सूक्ष्म तत्त्व आहे, आकाशाचा गुण 'शब्द' आहे. पूर्ण परमात्म्याने वरील लोक (खण्ड) शब्दरूपाने रचले जे तेजःपुंजाने बनलेले आहेत, तर खालील परब्रह्मचे (अक्षर पुरुष) सात संख ब्रह्माण्डे व ब्रह्मच्या (क्षर पुरुष) २१ ब्रह्मांडांची रचना पृथ्वी तत्त्वाने अस्थायी केली आहे.) (महान्) पूर्ण परमात्म्याने (पार्थिवम्) पृथ्वीचे (वि) वेगवेगळे (धाम्) लोक (च) आणि (सदम्) आवासस्थान (मही) पृथ्वी तत्त्वाने (रजः) प्रत्येक ब्रह्माण्डामध्ये लहान-लहान लोकांची/धामांची (जातः) रचना करून (अस्कभायत्) स्थिर केले.**

**भावार्थ :- वरील चारही लोक सत्यलोक, अलखलोक, अगमलोक, अनामी म्हणजेच अकहलोक हे तर अजर-अमर स्थायी म्हणजेच अविनाशी रचलेले आहेत आणि खालील ब्रह्म व परब्रह्मच्या लोकांची (धामांची) अस्थायी रचना करून, तसेच अन्य लहान-लहान लोकही त्या परमेश्वराने रचून स्थिर केले.**

**४ थ्या काण्डातील पहिल्या अनुवाकमधील ५ वा मंत्र :-**

स बुध्न्यादाष्ट्र जनुषो भ्यग्रं बृहस्पतिर्देवता तस्य सम्राट।
अहर्यच्छुक्रं ज्योतिषो जनिष्टाथ द्युमन्तो वि वसन्तु विप्राः ।।५।।

स-बुध्न्यात्-आष्ट्र-जुनषेः-अभि-अग्रम्-बृहस्पतिः-देवता-तस्य-सम्राट-अहः-यत्-शुक्रम्-ज्योतिषः-जनिष्ट-अथ-द्युमन्तः-वि-वसन्तु-विप्राः।

**अनुवाद :- (सः) त्या (बुध्न्यात्) मूळ मालक/स्वामीपासून (अभि-अग्रम) सर्वप्रथम स्थानावर (आष्ट्र) अष्टांगी माया-दुर्गा म्हणजेच प्रकृति देवी (जनुषेः) उत्पन्न झाली. कारण खालील परब्रह्म व ब्रह्मच्या लोकांचे प्रथमस्थान सतलोक आहे. याला तिसरे धाम असे देखिल संबोधले जाते. (तस्य) या दुर्गा देवीचेही स्वामी हेच (सम्राट) राजाधिराज (बृहस्पतिः) सर्वश्रेष्ठ पती व जगद्गुरू (देवता) परमेश्वर आहेत. (यत्) ज्यांच्यापासून (अहः) सर्वांचा वियोग झाला (अथ) त्यानंतर (ज्योतिषः) ज्योतिरूप निरंजन म्हणजेच कालच्या (शुक्रम्) वीर्य अर्थात बीजशक्तीने (जनिष्ट) दुर्गेच्या उदरातून उत्पन्न होऊन (विप्राः) भक्त आत्मे (वि) वेगळे/स्वतंत्रपणे (द्युमन्तः) मनुष्यलोक आणि स्वर्गलोकामध्ये ज्योति निरंजनाच्या आदेशानुसार (वसन्तु) दुर्गा म्हणाली की 'निवास करा.' अर्थात, ते निवास करू लागले.**

**भावार्थ :- पूर्ण परमात्म्याने वरील चारही लोकांमधील जे खालील सर्वप्रथम म्हणजेच सत्यलोकामध्ये आष्ट्रा म्हणजेच अष्टांगीची (प्रकृति देवी/दुर्गा) उत्पत्ती केली. हे परमात्मा, राजाधिराज, जगद्गुरू, पूर्ण परमेश्वर (सतपुरुष) आहेत, ज्यांपासून सर्वांचा वियोग झालेला आहे. नंतर सर्व प्राणी ज्योति निरंजनाच्या (काल) बीजापासून (वीर्य) दुर्गा देवीच्या (आष्ट्रा) गर्भातून उत्पन्न होऊन स्वर्गलोक व पृथ्वीलोकावर निवास करू लागले.**

**४ थ्या काण्डातील पहिल्या अनुवाकमधील ६ वा मंत्र :-**

नूनं तदस्य काव्यो हिनोति महो देवस्य पूर्व्यस्य धाम।
एष जज्ञे बहुभिः साकमित्था पूर्वे अर्धे विषिते ससन् नु ।।६।।

नूनम्-तत्-अस्य-काव्यः-महः-देवस्य-पूर्व्यस्य-धाम-हितोनि-पूर्वे-विषिते-एष-जज्ञे-बहुभिः-साकम्-इत्था-अर्धे-ससन्-नु।

**अनुवाद :- (नूनम्) निःसंदेह (तत्) ते पूर्ण परमेश्वर म्हणजेच तत् ब्रह्मच (अस्य) या (काव्यः) भक्त आत्म्यास, जो पूर्ण परमेश्वराची भक्ती विधिवत करतो परत (महः) सर्वशक्तिमान (देवस्य) परमेश्वराच्या (पूर्व्यस्य) पूर्वीच्या (धाम) लोकामध्ये म्हणजेच सत्यलोकी (हिनोति) पाठवितो.**

**(पूर्वे) पूर्वीचे (विषिते) विशेष प्रेमी भक्ताने (एष) या परमेश्वराला व (जज्ञे) सृष्टि उत्पत्तीच्या ज्ञानाला जाणून घेऊन (बहुभिः) अत्यंत आनंद (साकम्) सहित (अर्धे) अर्धी (ससत्) निद्रा घेत (इत्था) विधिवत अशाप्रकारे (नु) खऱ्या आत्म्याने/हृदयाने स्तृती करतो.**

**भावार्थ :- तेच पूर्ण परमेश्वर सत्यसाधना करणाऱ्या साधकाला त्या पूर्वीच्या स्थानी (सत्यलोक/सतलोक) घेऊन जातात, ज्या स्थानावरून वियोग होऊन ते आलेले होते. तेथे**

त्या वास्तविक सुखदायी प्रभुला प्राप्त केल्यानंतर साधक आनंदाने आत्मविभोर होऊन सद्गदित होऊन अंत:करणाने स्तुती करतो की हे परमात्म्या, असंख्य जन्म भरकटलेल्यांना हे वास्तविक स्थान प्राप्त झाले. याचे प्रमाण ऋग्वेदाच्या १० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील १६ व्या मंत्रामध्येही आहे.

आदरणीय गरीब दास जींना अशाप्रकारे पूर्ण परमात्मा कविर्देव (कबीर परमेश्वर) स्वतः सत्यभक्ती प्रदान करून सत्यलोकी घेऊन गेले होते, तेव्हा आपल्या अमृतवाणीमध्ये आदरणीय गरीब दास जी महाराजांनी डोळ्यांनी पाहिलेले सांगतात :-

गरीब, अजब नगर में ले गए, हमकुँ सतगुरू आन। झिलके बिम्ब अगाध गति, सुते चादर तान ।।

**४ थ्या काण्डातील पहिल्या अनुवाकमधील ७ वा मंत्र :**

यो थर्वाणं पित्तरं देवबन्धुं बृहस्पतिं नमसाव च गच्छात्।
त्वं विश्वेषां जनिता यथासः कविर्देवो न दभायत् स्वधावान् ।।७।।

य:-अथर्वाणम्-पित्तरम्-देवबन्धुम्-बृहस्पतिम्-नमसा-अव-च-गच्छात्-त्वम्-विश्वेषाम्-जनिता-यथा-स:-कविर्देव:-न-दभायत्-स्वधावान्

**अनुवाद :-** (य:) जे (अथर्वाणम्) अचल अर्थात अविनाशी (पित्तरम्) जगतपिता (देवबन्धुम्) भक्तांचे वास्तविक सोबती म्हणजेच आत्म्याचे आधार (बृहस्पतिम्) जगद्गुरू (च) आणि (नमसा) विनम्र पुजारी म्हणजेच विधिवत साधकाला (अव) सुरक्षेसह (गच्छात) सतलोकी जाणाऱ्यांना सतलोकी घेऊन जाणारे (विश्वेषाम्) सर्व ब्रह्माण्डांची (जनिता) रचना करणारे जगदंबा म्हणजेच मातेच्या गुणांनीही युक्त (न दभायत्) कालसारखा धोका न देणाऱ्या (स्वधावान्) स्वभावाचे म्हणजेच गुणांचे (यथा) त्याच प्रकारचे/जसेच्या जसे (त्वम्) तुम्ही (कविर्देव:/कविर् देव:) कविर्देव आहात. भाषा-भिन्नत्वामुळे यांनाच कबीर परमेश्वर असेही संबोधले जाते.

**भावार्थ** :- या मंत्राने हे देखिल स्पष्ट केले आहे की त्या परमेश्वराचे नाव कविर्देव म्हणजेच कबीर परमेश्वर आहे, ज्यांनी सर्व रचना केलेली आहे.

जे परमेश्वर अचल म्हणजेच वास्तवामध्ये अविनाशी (गीता च्या पंधराव्या अध्यायातील १६ व १७ व्या श्लोकांमध्येही प्रमाण आहे.) जगद्गुरू, आत्माधार, जे पूर्ण मुक्त होऊन सत्यलोकी गेलेले आहेत, त्यांना सतलोकी घेऊन जाणारे, सर्व ब्रह्माण्डांचे रचनाकार, काल सारखा (ब्रह्म) धोका न देणारे, जसे आहेत तसे, तेच स्वतः कविर्देव अर्थात कबीरप्रभू आहेत. हेच परमेश्वर सर्व ब्रह्माण्डांना व प्राण्यांना आपल्या शब्द शक्तीद्वारे उत्पन्न करतात म्हणूनच त्यांना (जनिता) माता देखिल संबोधले जाते. (पित्तरम) पिता आणि (बन्धु) भाऊ देखिल वास्तवामध्ये हेच आहेत. तसेच (देव) परमेश्वरही हेच आहेत. त्यामुळे याच कविर्देवांची (कबीर परमेश्वर) स्तुती केली जाते की त्वमेव माता च पिता त्वमेव, त्वमेव बंधु च सखा त्वमेव, त्वमेव विद्या च द्रविणम् त्वमेव, त्वमेव सर्व मम् देव देव। या परमेश्वराच्या महिमेचे पवित्र ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलातील २४ व्या सुक्तामध्ये विस्तृत विवरण आहे.

# ''पवित्र ऋग्वेदामधील सृष्टिरचनेचे प्रमाण''

## १० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील पहिला मंत्र

सहस्रशीर्षा पुरुष: सहस्राक्ष: सहस्रपात्।
स भूमिं विश्वतों वृत्वात्यतिष्ठद्दशाङ्गुलम् ।।१।।

सहस्रशिर्षा–पुरुष:–सहस्राक्ष:–सहस्रपात्–स–भूमिम्–विश्वत:–वृत्वा– अत्यातिष्ठत्–दशंगुलम्।

**अनुवाद :–** (पुरुष:) विराटरूपी काल भगवान म्हणजेच क्षर पुरुष (सहस्रशिर्षा) हजार शिरे/मस्तके असणारा, (सहस्राक्ष:) हजार डोळे असणारा (सहस्रपात्) हजार पाय असणारा, (स) तो काल (भूमिम्) पृथ्वीसारख्या २१ ब्रह्माण्डांना (विश्वत:) सर्व दिशांनी/बाजूंनी (दशंगुलम्) दहाही अगुंष्टांनी/बोटांनी म्हणजेच पूर्ण रूपाने ताब्यात घेऊन (वृत्वा) वर्तुळाकार परिघात घेरून (अत्यातिष्ठत) यापेक्षा श्रेष्ठ म्हणजे आपल्या काल लोकामधील सर्वांत वेगळ्या अनोख्या २१ व्या ब्रह्माण्डामध्ये वास्तव्य करतो, राहतो.

भावार्थ :– या मंत्रामध्ये विराटचे (काल ब्रह्म) वर्णन आले आहे (गीता च्या दहाव्या व अकराव्या अध्यायांमध्येही याच काल–ब्रह्मचे असेच वर्णन आहे. ११ व्या अध्यायातील ४६ व्या श्लोकामध्ये अर्जुनाने म्हटले आहे की हे सहस्त्रबाहू म्हणजेच हजार भुजा असणारे तुम्ही आपल्या चतुर्भुज रूपामध्ये दर्शन द्या.)

ज्याचे हजार हात–पाय, हजार डोळे. कान आदी आहेत, तो विराटरूप कालप्रभू आपल्या आधीन सर्व प्राण्यांना पूर्णपणे वश करून म्हणजे वीस ब्रह्माण्डांना गोलाकार परिघामध्ये (वर्तुळाकार कवचामध्ये) थांबवून स्वत: यांच्यापेक्षा वरील (वेगळ्या) २१ व्या ब्रह्माण्डामध्ये बसलेला आहे.

१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील २रा मंत्र

पुरुष एवेंद सर्वं यद्भूतं यच्च भाव्यम्।
उजामृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति ।।२।।

पुरुष–एव–इदम्–सर्वम्–यत्–भूतम्–यत्–च–भाव्यम्–उत्–अमृतत्वस्य–इशान:–यत्–अन्नेन–अतिरोहति।

**अनुवाद :–** (एव) अशाप्रकारे काही योग्यप्रकारचा (पुरुष) भगवान आहे, तो अक्षर पुरुष म्हणजेच परब्रह्म आहे. (च) आणि (इदम्) हा (यत) जो (भूतम्) उत्पन्न झालेला आहे, (यत्) जो (भूतम्) भविष्यामध्ये उत्पन्न होईल (सर्वम्) सर्व (यत्) प्रयत्नांनी म्हणजेच कष्टाद्वारे (अन्नेन) अन्नातून (अतिरोहति) विकसित होतो. हा अक्षर पुरुष देखिल (उत) संदेहयुक्त (अमृतत्वस्य) मोक्षाचा (इशान:) स्वामी आहे. अर्थात, भगवान म्हणून अक्षर पुरुषही काहीअंशी योग्य आहे. परंतु पूर्ण मोक्षदायक नाही.

भावार्थ :– या मंत्रामध्ये परब्रह्मचे (अक्षर पुरुष) विवरण आले आहे, ज्याच्यात भगवानांची काहीअंशी लक्षणे आहेत. परंतु याच्या भक्तीने पूर्ण मोक्ष मिळत नाही. यामुळे त्याला संदेहयुक्त मुक्तिदाता संबोधले जाते. याला काही प्रभुचे गुणयुक्त असल्याचे यासाठी म्हटले आहे, कारण हा कालसारखा तप्तशिलेवर सूक्ष्मदेह भाजून खात नाही. परंतु या परब्रह्मच्या लोकीही प्राण्यांना परिश्रम करून कर्माधारावरच फळ प्राप्त होते आणि अन्नापासूनच सर्व प्राण्यांचे शरीर विकसित होते. जन्म व मृत्यूचा कालावधी जरी कालपेक्षा (क्षर पुरुष) अधिक असला तरीही उत्पत्ती, प्रलय आणि चौऱ्याऐंशी लक्ष योनींमधील यातना भोगाव्याच लागतात.

**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील ३ रा मंत्र**

एतावानस्य महिमातो ज्यायाँश्च पुरुष:।
पादो स्य विश्वा भूतनि त्रिपादस्यामृतं दिवि ।।३।।

एतावान्-अस्य-महिमा-अत:-ज्यायान्-च-पुरुष:-पाद:-अस्य-विश्वा-भूतानि-त्रि-पाद्-अस्य-अमृतम्-दिवि ।

**अनुवाद :- (अस्य) या अक्षर पुरुष म्हणजेच परब्रह्मची तर (एतावान्) एवढीच (महिमा) प्रभुता आहे (च) आणि (पुरुष:) तो परम अक्षर ब्रह्म म्हणजेच पूर्णब्रह्म परमेश्वर तर (अत:) याच्यापेक्षाही (ज्यायान्) कितीतरी मोठा/श्रेष्ठ आहे. (विश्वा) समस्त (भूतानि) क्षर पुरुष आणि अक्षर पुरुष, तसेच यांच्या लोकांमधील/सत्यधामांमधील जेवढेही प्राणी आहेत, ते (अस्य) या पूर्ण परमात्मा परम अक्षर पुरुषाचा (पाद:) एकच पाय आहे. अर्थात, ते एक अंशमात्र आहेत. (अस्य) या पूर्ण परमेश्वराचे (त्रि) तीन (दिवि) दिव्यलोक जसे सत्यलोक, अलखलोक, अगम लोक (अमृतम्) अविनाशी (पाद्) दुसरा पाय आहे. अर्थात, जे काही सर्व ब्रह्माण्डांमध्ये उत्पन्न होते, ते सत्यपुरुष पूर्ण परमात्म्याचाच अंश किंवा अंग आहे.**

**भावार्थ :- या दुसऱ्या मंत्रामध्ये वर्णन आलेल्या अक्षर पुरुषाची (परब्रह्म) एवढीच महिमा आहे आणि ते पूर्णपुरुष कविर्देव तर याच्यापेक्षा कितीतरी पटीने विशाल/श्रेष्ठ आहेत म्हणजेच सर्वशक्तिमान आहेत. सर्व ब्रह्माण्डे त्यांच्याच अंशावर तग धरून आहेत. या मंत्रामध्ये तीन लोकांचे (धामांचे) वर्णन एवढ्यासाठीच आले आहे की चौथे अनामी (अनामय) लोक अन्य रचनेच्या पूर्वीचे आहे. याच तीन प्रभुंचे (क्षर पुरुष, अक्षर पुरुष आणि या दोघांपेक्षा वेगळा परम अक्षर पुरुष) विवरण (गीता च्या १५ व्या अध्यायातील १६ व १७ वा श्लोक) मध्ये आले आहे. {याचे प्रमाण आदरणीय गरीब दास साहेब जी सांगतात की :-** गरीब, जाके अर्ध रुम पर सकल पसारा, ऐसा पूर्ण ब्रह्म हमारा ।।

गरीब, अनंत कोटि ब्रह्माण्ड का, एक रति नहीं भार। सतगुरु पुरुष कबीर है कुल के सृजनहार ।।

**याचेच प्रमाण आदरणीय दादू साहेब जी सांगत आहेत की :-**

जिन मोकुं निज नाम दिया, सोई सतगुरु हमार। दादू दूसरा कोए नही, कबीर सृजनहार ।।

**याचेच प्रमाण आदरणीय नानक साहेब जी देत आहेत की :-**

यक अर्ज गुएतम पेश पेरा तो दर कून करतार। हक्का कबीर करीम तू, बेएब परवरदिगार ।।

**(श्री गुरु ग्रंथ साहेब मधील पान नं. ७२१, महला १, राग तिलंग)**

**कून करतार याचा अर्थ असा आहे की सगळ्याचे रचनकार म्हणजेच शब्द शक्तीद्वारे रचना करणारे शब्दस्वरूपी प्रभु, हक्का कबीरचा अर्थ आहे सत कबीर, करीमचा अर्थ दयाळू, आणि परवरदिगारचा अर्थ परमात्मा असा आहे.}**

**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील ४ था मंत्र**

त्रिपादूर्ध्व उदैत्पुरुष: पादो स्येहाभवत्पुन:।
ततो विष्व ङ्व्यक्रामत्साशनानशने अभि ।।४।।

त्रि-पाद-ऊर्ध्व:-उदैत्-पुरुष:-पाद:-अस्य-इह-अभवत्-पून:-तत:-विश्वङ्-व्यक्रामत्-स:-अशनानशने-अभि।

**अनुवाद :- (पुरुष:) हा परम अक्षर ब्रह्म अर्थात अविनाशी परमात्मा (ऊर्ध्व:) वर**

(त्रि) तीन लोक– सत्यलोक, अलखलोक, अगमलोक रूपी (पाद) पाय म्हणजेच वरील भागामध्ये (उदैत्) प्रगट होतो म्हणजे विराजमान आहे. (अस्य) याच परमेश्वर पूर्ण ब्रह्मचा (पादः) एक पाय म्हणजे एक हिस्सा जगतरूप (पुनर्) पुन्हा (इह) येथे (अभवत्) प्रगट होतो. (ततः) त्यामुळे (सः) तो अविनाशी पूर्ण परमात्मा (अशानानशने) जीवात्म्यांचे सूक्ष्म शरीर खाणाऱ्या कालच्या म्हणजेच क्षर पुरुषाच्या आणि न खाणाऱ्या परब्रह्म म्हणजेच अक्षर पुरुषाच्याही (अभि) वर (विश्वङ्) सर्वत्र (व्यक्रामत्) व्याप्त आहे म्हणजेच त्यांची प्रभुता सर्व ब्रह्माण्डांवर आणि सर्व प्रभुंवर आहे. ते कुळाचे/सर्वांचे स्वामी, मालक आहेत, जे आपल्या शक्तीने सर्वांच्या वर विस्तारलेले आहेत.

भावार्थ :– हेच सर्व सृष्टिचे रचनाकार प्रभु आपल्या रचनेच्या वरील भागामध्ये तीन स्थानांमध्ये (सतलोक, अलखलोक, अगमलोक) तीन रूपांमध्ये स्वतः प्रगट होतात म्हणजेच स्वतः विराजमान आहेत. येथे अनामीलोकाचे वर्णन एवढ्यासाठीच आलेले नाही, कारण अनामीलोकांमध्ये कोणतीही रचना नाही आणि अलख लोक (अनामय) शेष रचनेच्या पूर्वीचे आहे. नंतर म्हटले आहे की त्या परमात्म्याच्या सतलोकापासून विलग होऊन खालील ब्रह्म तथा परब्रह्मचे लोक उत्पन्न होतात आणि तोच पूर्ण परमात्मा खाणारा ब्रह्म अर्थात कालपेक्षा (कारण ब्रह्म/काल विराट शापामुळे एक लक्ष मानव शरीरधारी प्राण्यांचा आहार करतो.) आणि भक्षण न करणाऱ्या परब्रह्म अर्थात अक्षर पुरुष (परब्रह्म प्राण्यांचा आहार करत नाही. परंतु जन्म–मृत्यू, कर्मदंड जसे आहे तसेच राहते.) यांच्याही वर सर्वत्र विस्तारलेला आहे. या पूर्ण परमात्म्याची प्रभुता सर्वांच्यापेक्षा वर प्रस्थापित आहे. कबीर परमेश्वरच कुळाचे/सर्वांचे स्वामी आहेत. त्यांनी आपल्या शक्तिद्वारे सर्वांच्यापेक्षा वर विस्तार केला आहे. जसा सूर्य आपला प्रकाश सर्वांवर पसरवून प्रभावित करतो, तशी पूर्ण परमात्म्याने आपल्या शक्तिरूपी क्षमता (रेंज) सर्व ब्रह्माण्डांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रस्थापित केलेली आहे. मोबाईल फोनचा टॉवर एका स्थानी असूनही आपली शक्ती अर्थात मोबाईल फोनची रेंज (क्षमता) चारही दिशांना पसरवून प्रस्थापित करतो, तशी पूर्ण प्रभुंनी आपली निराकार शक्ती सर्वव्यापक केलेली आहे. त्याद्वारे पूर्ण परमात्मा सर्व ब्रह्माण्डांवर एक स्थानावर विराजित होऊन नियंत्रण ठेवतो.

याचे प्रमाण आदरणीय गरीब दास जी महाराज देतात (अमृतवाणी राग कल्याण)

तीन चरण चिन्तामणी साहेब, शेष बदन पर छाए।<br>
माता, पिता, कुलन न बंधु, ना किन्हें जननी जाये ।।

**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील ५ वा मंत्र**

तस्माद्विराळजायत विराजो अधि पुरुषः।<br>
स जातो अत्यरिच्यत पश्चाद्भूमिमथो पुरः ।।५।।

तस्मात्–विराट्–अजायत–विराजः–अधि–पुरुषः–स–जातः–अत्यरिच्यत–पश्चात्–भूमिम्–अथः– पूरः।

**अनुवाद :–** (तस्मात्) त्यानंतर त्या परमेश्वर सत्यपुरुषाच्या शब्दशक्तीने (विराट्) विराट म्हणजे ब्रह्म/क्षर पुरुष /काल (अजायत) उत्पन्न झालेला आहे. (पश्चात्) त्यानंतर (विराजः) विराट पुरुष अर्थात काल भगवानहून (अधि) अधिक विशाल (पुरुषः) परमेश्वराने (भूमिम्) पृथ्वीवरील लोक, काल ब्रह्म आणि परब्रह्म यांच्या लोकांची (अत्यरिच्यत) चांगल्या/योग्यप्रकारे रचना केली. (अथः) नंतर (पुरः) अन्य लहान–लहान लोक (स) त्या पूर्ण परमेश्वरानेच (जातः) उत्पन्न केले म्हणजेच स्थापित केले.

**भावार्थ :- या ४ थ्या मंत्रामध्ये वर्णन आलेल्या तीन लोकांची (अगमलोक, अलखलोक आणि सतलोक) रचना केल्यानंतर पूर्ण परमात्म्याने ज्योति निरंजनची (ब्रह्म/काल) उत्पत्ती केली. अर्थात, त्याच सर्वशक्तिमान परमात्मा पूर्णब्रह्म कविर्देवांपासून (कबीर प्रभु) विराट म्हणजेच ब्रह्मची (काल) उत्पत्ती झाली. याचे प्रमाण गीता च्या तिसऱ्या अध्यायातील पंधराव्या श्लोकामध्येही आहे की अक्षर पुरुष म्हणजेच अविनाशी प्रभुंपासून ब्रह्म उत्पन्न झाला आहे. अथर्ववेदाच्या ४ थ्या काण्डातील पहिल्या अनुवाकमधील ३ ऱ्या सुक्तामध्येही याचे प्रमाण आहे की पूर्ण ब्रह्मपासून ब्रह्मची उत्पत्ती झाली आणि त्याच पूर्ण ब्रह्मने इतर (भूमिम्) लहान-मोठ्या सर्व लोकांची रचना केली आहे. ते पूर्ण ब्रह्म या विराट भगवान अर्थात ब्रह्म/कालपेक्षाही विशाल आहेत. अर्थात, कालचेही स्वामी, मालक तेच आहेत.**

**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील १५ वा मंत्र :**

सप्तास्यासन्परिधयस्त्रिः सप्त समिधः कृताः।
देवा यद्यज्ञं तन्वाना अबध्नन्पुरुषं पशुम् ।।१५।।

सप्त-अस्य-आसन्-परिधयः-त्रिसप्त-समिधः- कृताः-देवा-यत्-यज्ञम्-तन्वानाः-अबध्नन्-पुरुषम्-पशुम्।

**अनुवाद :- (सप्त) परब्रह्मची सात संख ब्रह्माण्डे आणि (त्रिसप्त) काल ब्रह्मची २१ ब्रह्माण्डे (समिधः) कर्मदंड दुःखरूपी अग्नीने दुःखी (कृताः) करणाऱ्या (परिधयः) वर्तृळाकार परीघरूपी सीमेमध्ये (आसन) विद्यमान आहेत. (यत्) जो (पुरुषम्) पूर्ण परमात्म्याची (यज्ञम्) विधिवत धार्मिक कर्म म्हणजेच पूजा करतो (पशुम) बळी द्यायच्या पशुसमी कालच्या जाळ्यामधील कर्मबंधनामध्ये बांधलेल्या (देवा) त्या भक्तात्म्यांना (तन्वांनाः) कालद्वारे रचलेल्या, फेकलेल्या पापकर्मबंधन जाळ्यातून (अबध्नन) मुक्त करतात. येथे अर्थातच बंधनातून सुटका करणारे म्हणजेच बंदी छोड आहेत.**

**भावार्थ :- परब्रह्मची सात संख ब्रह्माण्डे आणि ब्रह्मची (काल) २१ ब्रह्माण्डे वर्तुळाकार सीमेमध्ये बंद असून, पापकर्माच्या अग्नीमध्ये जळत राहणाऱ्या प्राण्यांना पूर्ण परमात्मा वास्तविक पूजाविधी सांगून योग्य उपासना करवून घेतो. त्यामुळे बळी दिल्या जाणाऱ्या पशुसारख्या जन्म-मृत्यूच्या जाळ्यामध्ये अडकलेल्या, कालच्या (ब्रह्म) आहारासाठी तप्तशिलेच्या कष्टांनी पीडित भक्तात्म्यांना कालचे कर्मबंधनाचे फेकलेले जाळे तोडून बंधनरहित करतात म्हणजेच बंध सोडणारे (बंधनातून मुक्त करणारे) बंदी छोड आहेत. याचे प्रमाण पवित्र यजुर्वेदाच्या पाचव्या अध्यायातील ३२ व्या मंत्रामध्ये आहे की** कविरंघारिसि (कविर्) कबीर परमेश्वर (अंध) पापाचे (अरि) शत्रू (असि) आहेत म्हणजेच पापविनाशक कबीर परमात्मा आहेत. बम्भारिसि (बम्भारि) बंधनाचा शत्रू म्हणजे बंदी छोड कबीर परमेश्वर (असि) आहेत.

**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील १६ वा मंत्र**

यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्।
ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवा ।।१६।।

यज्ञेन-यज्ञम्-अ-यजन्त-देवाः-तानि-धर्माणि-प्रथमानि-आसन्-ते-ह-नाकम्-महिमानः-सचन्त-यत्र-पूर्वे-साध्याः-सन्ति देवाः।

**अनुवाद :- जे (देवाः) निर्विकार, देवस्वरूप भक्तात्मे (अयज्ञम्) अपुऱ्या/अपूर्ण, अयोग्य धार्मिक पूजेच्या स्थानी/बदल्यात (यज्ञेन) सत्यभक्ती धार्मिक कर्माधारावर (यजन्त) पूजा**

करतात (तानि) ते (धर्माणि) धार्मिक शक्तिसंपन्न (प्रथमानि) मुख्य म्हणजेच उत्तम (आसन्) आहेत. (ते ह) तेच वास्तविक (महिमान:) महान भक्ती–शक्तियुक्त होऊन (साध्या:) सफल भक्तजन (नाकम्) पूर्ण सूखदायक परमेश्वराला (सचन्त) भक्तीमुळे म्हणजे सतभक्तीच्या कमाईने प्राप्त होतात. ते तेथे जातात, (यत्र) जेथे (पूर्वे) पूर्वीच्या सृष्टितील (देवा:) पापरहित, देवस्वरूप भक्त आत्मे (सन्ति) वास्तव्य करत आहेत.

भावार्थ :– जे निर्विकार (ज्यांनी मांस, तंबाखू, मद्य यांचा त्याग केलेला आहे आणि इतरही दुष्कर्मे करत नाहीत ते) देवस्वरूप भक्त आत्मे शास्त्रविधिरहित पूजेचा त्याग करून शास्त्रानुकूल साधना करतात, ते भक्तीच्या कमाईने धनी होऊन कालच्या ऋणातून मुक्त होऊन आपल्या सत्यभक्तीच्या कमाईमुळे त्या सर्वसुखदायी परमात्म्याला प्राप्त करतात म्हणजेच सत्यलोकामध्ये जातात, जेथे सर्वप्रथम रचलेल्या सृष्टितील देवस्वरूप अर्थात पापरहित हंसात्मे वास्तव्य करतात.

ज्याप्रमाणे काही आत्मे कालच्या (ब्रह्म) जाळ्यामध्ये फसून येथे आले, काही परब्रह्मसोबत सात संख ब्रह्माण्डांमध्ये आले. तरीही ज्या असंख्य आत्म्यांचा आपल्या पूर्ण परमात्म्यावर अटळ विश्वास राहिला, जे पतिव्रता पदापासून (निष्ठेपासून) दूर झाले नाहीत, ते सर्व पुण्यात्मे तेथेच राहिले. त्यामुळेच पवित्र वेदांमध्येही सत्य सांगितल्याचे येथे वर्णन आले आहे. याच प्रमाणाचे गीता च्या ८ व्या अध्यायातील ८ व्या ते १० व्या श्लोकांमध्ये वर्णन आले आहे की जे साधक पूर्ण परमात्याची सतसाधना शास्त्रविधीनुसार करतात, ते भक्तीच्या कमाईच्या बळावर त्या पूर्ण परमात्म्यास प्राप्त होतात म्हणजेच त्यांच्याजवळ (सतलोकी) जातात. यावरून हे सिद्ध होते की तीन प्रभु आहेत– ब्रह्म, परब्रह्म, आणि पूर्ण ब्रह्म. यांनाच १) ब्रह्म– ईश– क्षर पुरुष २) परब्रह्म– अक्षर पुरुष/अक्षर ब्रह्म ३) पूर्ण ब्रह्म– परम अक्षर ब्रह्म–परमेश्वर– सतपुरुष आदी पर्यायी शब्दांनी ओळखले जाते.

हे प्रमाण ऋग्वेदाच्या ९ व्या मंडलातील ९६ व्या सुक्तामधील १७ ते २० या मंत्रांमध्ये स्पष्ट केले आहे की परमात्मा कविर्देव (कबीर परमेश्वर) शिशुरूप (लहान बालकाचे) धारण करून प्रगट होतात आणि आपले निर्मळ पवित्र ज्ञान म्हणजेच तत्त्वज्ञान (कविगीर्भि:) कबीर वाणीद्वारे आपल्या अनुयायांना वर्णन करून सांगतात. तेच कविर्देव (कबीर परमेश्वर) ब्रह्मच्या (क्षर पुरुष) धामापेक्षा आणि पर ब्रह्मच्या (अक्षर पुरुष) धामापेक्षा भिन्न जे तिसरे ऋतधाम (सतलोक) आहे, तेथे आकारामध्ये विराजमान आहेत. तसेच सतलोकापेक्षा चौथा अनामीलोक आहे, तेथे हेच कविर्देव (कबीर परमेश्वर) अनामी पुरुष रूपामध्ये मनुष्यसदृश आकारामध्ये विराजमान आहेत.

## ''पवित्र श्रीमददेवी महापुराणामध्ये सृष्टिरचनेचे प्रमाण''

''ब्रह्मा, विष्णु आणि शिव यांचे आई व वडिल''

(दुर्गा और ब्रह्म (काल) यांच्या योगातून ब्रह्मा, विष्णु आणि शिव यांचा जन्म)

पवित्र श्रीमद देवी महापुराणाचा ३ रा स्कंद (गीता प्रेस, गोरखपूर येथून प्रकाशित, अनुवादकर्ता श्री हनुमान प्रसाद पोद्दार तथा चिमनलाल गोस्वामीजी पान नं.११४ पासून)

पान नं. ११४ ते ११८ पर्यंत विवरण आले आहे की कित्येक आचार्यांनी (ऋषिंनी) भवानीदेवीस संपूर्ण मनोरथ पूर्ण करणारी असे संबोधले आहे. तिला 'प्रकृति' असे म्हटले जाते. तसेच ब्रह्मसोबत (काल) तिचे अभेद संबंध आहेत, (ज्याप्रमाणे पत्नीस अर्धांगिनीही म्हटले

जाते. अर्थात, दुर्गा ब्रह्मची (काल) पत्नी आहे.) एका ब्रह्माण्डाच्या सृष्टि रचनेविषयी राजा परीक्षिताने श्री व्यासजींना विचारले, त्यावेळी व्यासजी म्हणाले की राजन, मी श्री नारदजींना या प्रश्नाचे उत्तर स्वत:च विचारले होते, तेव्हा श्री नारदजी म्हटले होते की मी आपले (माझे) पिता श्री ब्रह्माजींना हाच प्रश्न विचारला होता की या ब्रह्माण्डाची रचना आपण केली, श्री विष्णुजींनी अथवा शिव जींनी केली? याबाबत जे काही सत्य असेल ते सांगण्याची कृपा करावी. तेव्हा माझे पूज्य पिता श्री ब्रह्मा जी म्हणाले होते की बाळ नारद, मी स्वत: कमळावर बसलेलो होतो. मला ज्ञान नाही, या अथांग जलामध्ये मी कसा उत्पन्न झालो, हे मला देखिल माहीत नाही. एक हजार वर्षांपर्यंत मी पृथ्वीचे निरीक्षण करत राहिलो. पण मला या पाण्याचा अंत सापडला नाही. त्यानंतर 'तप करा' अशी आकाशवाणी झाली. मी एक हजार वर्षे तप केले. तत्पश्चात सृष्टिरचनेची आकाशवाणी झाली. इतक्यात मधू आणि कैटभ नावाचे दोन राक्षस आले आणि त्यांना घाबरून मी कमळाच्या देठाला पकडून खाली उतरलो. तेथे भगवान विष्णु जी शेषशय्येवर चेतनाहीन होऊन पडलेले होते. त्यांच्यामधून एक स्त्री (प्रेतवत प्रविष्ट झालेली दुर्गा) बाहेर पडली. ती आकाशामध्ये आभूषणे परिधान केलेली दिसू लागली. त्यावेळी भगवान विष्णु शुद्धीवर आले. तेथे मी आणि विष्णु जी दोघे होतो. एवढ्यात शंकरजीही तेथे आले. देवीने आम्हाला विमानामध्ये बसविले आणि ब्रह्मलोकी घेऊन गेली. तेथे आणखी एकेक ब्रह्मा, विष्णु आणि शिव दिसले. त्यानंतर आणखी एक देवी दिसली. तिला पाहून विष्णुजींनी विवेकपूर्वक खालीलप्रमाणे वर्णन केले. (ब्रह्मने (काल) भगवान विष्णुंना चेतना प्रदान केली आणि त्यांना आपल्या बाल्यावस्थेतील आठवणी जागृत झाल्या. त्यांनी आम्हाला बाल्यावस्थेतील कहाणी ऐकवली.)

पान नं.११९-१२० वर भगवान विष्णु जी हे श्री ब्रह्मा जी आणि श्री शिवजींना म्हणाले की ही आम्हा तिघांचीही माता आहे. हीच जगज्ञननी प्रकृति देवी आहे. मी या देवीला तेव्हा पाहिले होते जेव्हा मी एक लहान बालक होतो, ही मला पाळण्यामध्ये झोके देत होती.

३ रा स्कंद पान नं.१२३ वर श्री विष्णु जी श्री दुर्गा जी स्तुती करून म्हणाले की तू शुद्धस्वरूप आहेस. हा सर्व संसार तुझ्यापासूनच उद्भासित (निर्माण) होत आहे. मी (विष्णु), ब्रह्मा आणि शंकर आम्ही सर्व तुझ्या कृपेनेच विद्यमान आहोत. आमचा अविर्भाव (जन्म) आणि तिरोभाव (मृत्यू) होत असतो. अर्थात, आम्ही तिन्ही देव नाशवान आहोत. केवळ तूच एक नित्य (अविनाशी) आहेस, जगज्ञननी आहेस, प्रकृतिदेवी आहेस.

भगवान शंकर म्हणाले - की देवी जर महाभाग विष्णु तुझ्यापासून प्रगट (उत्पन्न) झाले आहेत, तर त्यांच्यानंतर उत्पन्न झालेले ब्रह्माही तुझेच बालक आहे आणि या दोघांनंतर उत्पन्न झालेला मी तमगुणी लीला करणारा शंकर काय तुझी संतान (पुत्र) नाही झालो? अर्थात, मलाही उत्पन्न करणारी तूच आहेस.

विचार करा :- या विवरणावरून असे सिद्ध होते की श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी, श्री शिव जी नाशवान आहेत. मृत्युंजय (अजर-अमर) व सर्वेश्वर नाहीत आणि ते दुर्गा देवीचे (प्रकृति) पुत्र आहेत व ब्रह्म (काल-सदाशिव) यांचा पिता आहे.

३ ऱ्या स्कंदातील पान नं.१२५ वर ब्रह्माजींनी हे माते, वेदांमध्ये जे ब्रह्म म्हटले आहे ते आपणच आहात की अन्य कोणी प्रभू आहेत, असे विचारल्यावर दुर्गा म्हणाली की मी आणि ब्रह्म एकच आहे. नंतर याच स्कंदाच्या पान नं.१२९ वर म्हटले आहे की आता माझे कार्य सिद्ध करण्यासाठी तुम्ही तिघे विमानात बसून लगेच या. कोणतेही कठीण कार्य उपस्थित झाले आणि

तुम्ही माझे स्मरण केले, तर मी तुमच्यासमोर प्रगट होईन. हे देवतांनो, तुम्ही माझे (दुर्गा देवीचे) आणि ब्रह्मचे ध्यान सदोदित केले पाहिजे. आमच्या दोघांचे स्मरण करत राहिलात तर तुमचे कोणतेही कार्य सिद्ध होण्यात किंचितही संदेह नाही.

या व्याख्यांवरून असे स्वसिद्ध होते की दुर्गा (प्रकृति) आणि ब्रह्म (काल) हे तिन्ही देवतांचे माता-पिता आहेत. तसेच ब्रह्मा, विष्णु व शिव हे नाशवान आहेत व पूर्ण शक्तियुक्त नाहीत.

तिन्ही देवतांचा (श्री ब्रह्मा, श्री विष्णु, श्री शिव) विवाह दुर्गा देवीने (प्रकृति देवी) केला. (तिसऱ्या स्कंदातील पान नं.१२८ व १२९) .

गीता च्या ७ व्या अध्यायातील १२ वा श्लोक

ये, च, एव, सात्विकाः भावाः, राजसाः, तामसाः, च, ये,
मतः, एव, इति, तान्, विद्धि, न, तु, अहम्, तेषु, ते मयि ।।

अनुवाद :- (च) आणि (एव) देखिल (ये) जो (सात्विकाः) सत्त्वगुण विष्णुजींचा स्थिती (भावाः) भाव आहे आणि (ये) जो (राजसाः) रजगुण ब्रह्मा जींचा उत्पत्ती (च) आणि (तामसाः) तमगुण शिवचा संहार हा आहे. (तान्) ते सर्व तू (मतः, एव) माझ्याद्वारे सुनियोजित नियमानुसार होणारे आहेत. (इति) असे (विद्धि) जाण, (तु) परंतु वास्तविक (तेषु) त्यांच्यामध्ये (अहम्) मी आणि (ते) ते (मयि) माझ्यामध्ये (न) नाहीत.

## ''पवित्र शिव महापुराणामधील सृष्टि रचनेचे प्रमाण''

(काल ब्रह्म व दुर्गा यांच्यापासून विष्णु, ब्रह्मा, व शिव यांची उत्पत्ती)

याचे प्रमाण पवित्र श्री शिवपुराण गीता प्रेस, गोरखपूर येथून प्रकाशित, अनुवादकर्ता श्री हनुमान प्रसाद पोद्दार, यातील ६ वा अध्याय – 'रुद्रसंहिता'मधील पान नं. १०० वर म्हटले आहे की जो मूर्तिरहित परब्रह्म आहे, त्याचीच मूर्ती भगवान सदाशिव आहे. त्यांच्या शरीरातून एक शक्ती प्रकट झाली ती शक्ती अंबिका, दुर्गा (प्रकृति), त्रिदेवजननी (श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी यांना उत्पन्न करणारी माता) संबोधली गेली. तिला आठ भुजा आहेत. सदाशिव जे आहेत, त्यांना शिव, शंभू आणि महेश्वरसुद्धा म्हटले जाते. (पान नं. १०१ वर) ते आपल्या सर्व देहभर भस्म लावतात. त्या कालरुपी ब्रह्मने एक शिवलोक नामक क्षेत्राची निर्मिती केली. नंतर दोघांपासून एक पुत्र उत्पन्न झाला. त्याचे नाव विष्णु ठेवले. (पान नं.१०२)

पुढे रुद्रसंहितेच्या ७ व्या अध्यायातील पान नं.१०३ वर ब्रह्माजींनी म्हटले आहे की माझी उत्पत्ती देखिल भगवान सदाशिव (ब्रह्म काल) आणि प्रकृति (दुर्गा) यांच्यापासून झाली. त्यानंतर मला बेशुद्ध केले गेले.

त्यानंतर रुद्रसंहितेच्या ९ व्या अध्यायातील पान नं. ११० वर म्हटले आहे की अशाप्रकारे ब्रह्मा, विष्णु आणि रुद्र या तीन देवतांमध्ये गुण आहेत. परंतु शिव (काल-ब्रह्म) गुणातित मानला गेला आहे.

येथे चार बाबी सिद्ध होतात अर्थात सदाशिव (काल-ब्रह्म) व प्रकृति (दुर्गा) यांच्यापासून तीन देवांची (ब्रह्मा, विष्णु, महेश) उत्पत्ती झालेली आहे. तिन्ही भगवानांची (श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी) माता दुर्गाजी आहे. या तिघांचा पिता ज्योति निरंजन (काल-ब्रह्म) आहे. हेच तिन्ही प्रभु रजगुण-ब्रह्मा जी, सतगुण-विष्णु जी आणि

तमगुण–शिव जी आहेत.

## ''पवित्र श्रीमद्भगवत गीता मधील सृष्टिरचनेचे प्रमाण''

याचे प्रमाण पवित्र गीता च्या १४ व्या अध्यायातील ३ ऱ्या ते ५ व्या श्लोकांमध्ये आहे. ब्रह्म (काल) म्हणत आहे, की, प्रकृति (दुर्गा) तर माझी पत्नी आहे. मी ब्रह्म (काल) तिचा (दुर्गा) पती आहे. आम्हा दोघांपासून सर्व प्राण्यांसहित तीन गुणांची (रजगुण–ब्रह्मा जी, सतगुण–विष्णु जी, तमगुण–शिव जी) उत्पत्ती झाली. मी (ब्रह्म) सर्व प्राण्यांचा पिता आहे आणि प्रकृति (दुर्गा) त्यांची माता आहे. मी तिच्या (दुर्गा) उदरामध्ये बीज स्थापन करतो, ज्यामुळे सर्व प्राण्यांची उत्पत्ती होते. प्रक्रुति (दुर्गा) मातेपासुन उत्पन्न झालेले तिन गुण (रजगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु व तमगुण शिव) हे सर्वांना कर्माच्या आधारावर शरिरात बांधुन ठेवतात.

याचे प्रमाण पवित्र गीता च्या १५ व्या अध्यायातील पहिला ते ४ था आणि १६ व १७ व्या श्लोकांमध्ये आहे.

गीता च्या १५ व्या अध्यायातील पहिला श्लोक

उर्ध्वमूलम्, अधःशाखम्, अश्वत्थम्, प्राहुः, अव्ययम्,
छन्दांसि, यस्य, पर्णानि, यः, तम्, वेद, सः, वेदवित् ।।

अनुवाद :– (उर्ध्वमूलम्) वरती मूळवाले पूर्ण परमात्मा आदिपुरुष (अधः शाखम्) खालच्या बाजूला शाखा असणारा (अव्ययम्) अविनाशी (अश्वत्थम्) अमर असा पिंपळाचा मजबूत असा वृक्ष आहे. (यस्य) या वृक्षाच्या (छन्दांसि) लहान–लहान भागांना फांद्या (पर्णानि) पाने (प्राहुः) म्हटले आहे. (तम्) त्या संसाररूपी वृक्षाला (यः) जे (वेद) सर्वांगांसहित जाणतात, (सः) ते (वेदवित) पूर्ण ज्ञानी म्हणजेच तत्त्वदर्शी आहेत.

गीता च्या १५ व्या अध्यायातील २ रा श्लोक

अधः, च, ऊर्ध्वम्, प्रसृताः, तस्य, शाखाः, गुणप्रवृद्धाः,
विषयप्रवालाः, अधः,च, मूलानि, अनुसन्ततानि, कर्मानुबन्धीनि, मनुष्यलोके ।।

अनुवाद :– (तस्य) त्या वृक्षाच्या (अधः) खाली (च) आणि (ऊर्ध्वम्) वर (गुणप्रवृद्धाः) तिन्ही गुण ब्रह्मा–रजगुण, विष्णु–सतगुण, शिव–तमगुण रूपी (प्रसृता) पसरलेल्या (विषयप्रवालाः) विकार–काम, क्रोध, मोह, लोभ, अहंकार रूपी (शाखाः) शाखा/फांद्या ब्रह्मा, विष्णु, शिव (कर्मानुबन्धीनि) जीवांना कर्मामध्ये बांधणारी (अपि) देखिल (मूलानि) मुळे मुख्य कारण आहे (च) आणि (मनुष्यलोके) मनुष्यलोक–स्वर्ग–नरकलोक, पृथ्वीलोक यामध्ये (अधः) खाली नरक, चौऱ्याऐंशी लाख योनींमध्ये (ऊर्ध्वम्) वर स्वर्गलोक आदीमध्ये (अनुसन्ततानि) व्यवस्थित केलेले आहेत.

गीता च्या १५ व्या अध्यायातील ३ रा श्लोक

न, रूपम, अस्य, इह, तथा, उपलभ्यते, न अन्तः, न, च, आदिः, न, च,
सम्प्रतिष्ठा, अश्वत्थम्, एनम्, सुविरूढमूलम्, असंगशस्त्रेण, दृढेन, छित्वा ।।

अनुवाद :– (अस्य) या रचनेची (न) नाही (आदि) सुरवात (च) आणि (न) नाही (अन्तः) शेवट आहे (न) नाही (तथा) तसे (रूपम) स्वरूप (उपलभ्यते) प्राप्त होते (च) आणि (इह) येथे विचार कालद्वारे म्हणजेच माझ्याद्वारे दिल्या जाणाऱ्या गीता ज्ञानाची पूर्ण माहिती (ज्ञान) मलाही (न) नाही. (सम्प्रतिष्ठा) कारण सर्व ब्रह्माण्डांची रचना चांगल्या/योग्यप्रकारे

स्थित आहे का, याचे मलाही ज्ञान नाही. (एतम्) या (सुविरुढमलूम्) चांगल्याप्रकारे स्थायी/नित्य स्थिती असणारा (अश्वत्थम्) मजबूत स्वरूपाचा (असंङ्गशस्त्रेण) पूर्ण ज्ञानरूपी (दृढेन) दृढ सूक्ष्म वेद म्हणजेच तत्त्वज्ञानाद्वारे जाणून (छित्वा) छाटून/कापून म्हणजेच निरंजनाच्या भक्तीला क्षणिक अर्थात क्षणभंगूर जाणून ब्रह्मा, विष्णु, शिव, ब्रह्म आणि परब्रह्मच्या पुढे/वरील पूर्ण ब्रह्मचा शोध घेतला पाहिजे.

**गीता च्या १५ व्या अध्यायातील ४ था श्लोक**

ततः पदम्, तत्, परिमार्गितयम्, यस्मिन्, गताः, न, निवर्तन्ति, भूयः,
तम्, एव्, च, आद्यम्, पुरुषम्, प्रपद्ये, यतः, प्रवृतिः, प्रसृता, पुराणी ।।

**अनुवाद :– जेव्हा तत्त्वदर्शी संत भेटतील, (ततः) त्यानंतर (तत्) त्या परमात्याच्या (पदम्) पदस्थानाचा म्हणजेच सतलोकाचा (परिमार्गितव्यम्) पूर्णपणे समजून शुद्ध अंतःकरणाने शोध घेतला पाहिजे. (यस्मिन) जेथे (गताः) गेलेले साधक (भूयः) पुन्हा (न निवर्तन्ति) परतून या संसारामध्ये येत नाहीत. (च) आणि (यतः) ज्या परमात्म्या–परम अक्षर ब्रह्मपासून (पुराणी) आदि/सुरवातीची (प्रवृतिः) रचना–सृष्टि (प्रसृता) उत्पन्न झालेली आहे. (तम्) अज्ञात (आद्यम्) आदियम म्हणजेच मी कालनिरंजन (पुरुषम्) पूर्ण परमात्म्याला (एव) च (प्रपद्ये) मी शरण आहे आणि त्याचीच पूजा करतो.**

**गीता च्या १५ व्या अध्यायातील १६ वा श्लोक**

द्वौ, इमौ, पुरुषौ, लोके, क्षरः, च, अक्षरः, एव, च,
क्षरः, सर्वाणि, भूतानि, कूटस्थः, अक्षरः, उच्यते ।।

**अनुवाद :– (लोके) या संसारामध्ये (द्वौ) दोन प्रकारचे (क्षरः) नाशवान (च) आणि (अक्षरः) अविनाशी (पुरुषौ) भगवान आहेत. (एव) अशाप्रकारे (इमौ) या दोन्ही प्रभुंच्या लोकी (सर्वाणि) संपूर्ण (भूतानि) प्राण्यांचे शरीर तर (क्षरः) नाशवान (च) आणि (कूटस्थः) जीवात्मा (अक्षरः) अविनाशी (उच्यते) आहे असे म्हटले जाते.**

**गीता च्या १५ व्या अध्यायातील १७ वा श्लोक**

उत्तम. पुरुषः, तु, अन्य. परमात्मा, इति, उदाहृतः,
यः, लोकत्रयम्, आविश्य, बिभर्ति, अव्ययः, ईश्वरः ।।

**अनुवाद :– (उत्तमः) उत्तम (पुरुषः) प्रभु (तु) तर (अन्यः) या दोन प्रभुंपेक्षा (क्षर पुरुष आणि अक्षर पुरुष) अन्यच आहे. (इति) वास्तवामध्ये ते (परमात्मा) परमात्मा (उदाहृतः) म्हटले जातात, (यः) जे (लोकत्रयम्) तीनही लोकांमध्ये (आविश्य) प्रवेश करून (बिभर्ति) सर्वांचे पालनपोषण करतात आणि (अव्ययः) अविनाशी, (ईश्वरः) प्रभुंमध्ये श्रेष्ठ म्हणजेच समर्थ प्रभु आहेत.**

भावार्थ :– गीता ज्ञानदात्या प्रभुने केवळ एवढेच सांगितले आहे की हा संसार उलट्या लटकलेल्या वृक्षासारखा आहे. वर जे मूळ आहे, ते पूर्ण परमात्मा आहे. खालील फांद्या (शाखा) आणि इतर विभाग आहेत. या संसाररूपी वृक्षाच्या प्रत्येक भागाचे भिन्न–भिन्न विवरण जो संत जाणतो, त्यांना तत्त्वदर्शी संत म्हणतात. यांच्याविषयी गीता च्या ४ थ्या अध्यायातील ३४ व्या श्लोकामध्ये वर्णन आलेले आहे. गीता च्या १५ व्या अध्यायातील २ऱ्या व ३ऱ्या श्लोकांमध्ये केवळ एवढेच सांगितले आहे की त्रिगुणरूपी शाखा आहेत. येथे विचारकाळात म्हणजेच गीता मध्ये गीता ज्ञानदात्याने म्हटले आहे की मी तुला पूर्ण माहिती (ज्ञान) देऊ शकत नाही. कारण

मलाही या संसाराच्या रचनेचा आदि (सुरुवात) व अंत यांचे ज्ञान नाही. त्यासाठी गीता च्या चौथ्या अध्यायातील ३४ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की कोणी तत्त्वदर्शी संताकडून त्या पूर्ण परमात्म्याचे ज्ञान जाणा. गीता च्या पंधराव्या अध्यायातील पहिल्या श्लोकामध्ये त्या तत्त्वदर्शी संताची ओळख सांगितली आहे की ते या संसाररूपी वृक्षाच्या प्रत्येक भागाचे ज्ञान देतील. याबाबत त्यांनाच विचारा. गीता च्या पंधराव्या अध्यायातील चौथ्या श्लोकामध्ये म्हटले आहे की त्या तत्त्वदर्शी संताच्या प्राप्ती नंतर त्या परमपद परमेश्वराचा शोध घेतला पाहिजे म्हणजेच त्या तत्त्वदर्शी संतांच्या सांगण्यानुसारच साधना केली पाहिजे, ज्यामुळे पूर्ण मोक्ष (अनादि मोक्ष) प्राप्त होतो. गीता च्या १५ व्या अध्यायातील १६ व १७व्या श्लोकांमध्ये स्पष्ट केले आहे की तीन प्रभु आहेत– एक क्षर पुरुष (ब्रह्म/काल), दुसरा अक्षर पुरुष (परब्रह्म) आणि तिसरा परम अक्षर पुरुष (पूर्ण ब्रह्म). क्षर पुरुष आणि अक्षर पुरुष वास्तविक अविनाशी नाहीत. ते अविनाशी परमात्मा तर या दोघांपेक्षा वेगळेच आहेत. तेच परमात्मा तिन्ही लोकांमध्ये प्रवेश करून सर्वांचे पालन–पोषण करतात.

गीता च्या १५ व्या अध्यायातील पहिल्या ते ४ थ्या आणि १६ व १७ व्या श्लोकांमध्ये हे प्रमाणित होते की उलटे लटकलेल्या संसाररूपी वृक्षाचे मूळ म्हणजेच ते परम अक्षर ब्रह्म म्हणजेच पूर्ण ब्रह्म आहेत. ज्यांद्वारे संपूर्ण वृक्षाचे पालनपोषण होते आणि वृक्षाचा जो भाग (पृथ्वीच्या बाहेर) जमिनीलगत दिसतो म्हणजेच खोड जे आहे, त्याला अक्षर पुरुष म्हणजेच परब्रह्म समजावे. त्या खोडापासून पुढे आणखी एक मोठी फांदी निघते तिला ब्रह्म म्हणजेच क्षर पुरुष समजावे. त्या फांदीपासून अन्य तीन लहान शाखा निघतात, त्यांना ब्रह्मा, विष्णु आणि शिव असे समजावे. तसेच त्या लहान शाखांपासून पुढे जी पाने दिसतात, त्यांना सांसारिक प्राणी असे समजावे. गीता च्या १५ व्या अध्यायातील १६ व १७ व्या श्लोकांमध्ये स्पष्ट झाले आहे की क्षर पुरुष (ब्रह्म) आणि अक्षर पुरुष (परब्रह्म), तसेच या दोघांच्या लोकी जितके प्राणी आहेत, त्यांचे स्थूल शरीर नाशवान आहे आणि जीवात्मा अविनाशी आहे म्हणजेच हे दोन्ही प्रभु व त्यांच्या अंतर्गत असणारे प्राणी नाशवान आहेत. जरी अक्षर पुरुषाला (परब्रह्म) अविनाशी म्हटले आहे, तरी वास्तवामध्ये अविनाशी परमात्मा या दोघांपेक्षा वेगळाच आहे. ते वास्तविक परमात्मा तिन्ही लोकांमध्ये प्रवेश करून सर्वांचे पालनपोषण करतात. या विवरणामध्ये तीन प्रभुंचे भिन्न–भिन्न विवरण दिलेले आहे.

## ‘‘पवित्र बायबल आणि पवित्र कुर्आन शरीफमधील सृष्टिरचनेचे प्रमाण‘‘

सृष्टि रचनेचे प्रमाण पवित्र बायबल आणि पवित्र कुर्आन शरीफमध्ये आहे.

कुर्आन शरीफमध्ये पवित्र बायबलमधीलही ज्ञान आहे. त्यामुळे या दोन्ही पवित्र सद्ग्रंथांमध्ये सृष्टिचा रचनाकार कोण आणि कसा आहे आणि त्यांचे वास्तविक नाव काय आहे, याचे मिळतेजुळते प्रमाण आलेले आहे.

पवित्र बायबल (उत्पत्ती ग्रंथाच्या पान नं. २ वर, अ. १:२०–२:५ वर)

सहावा दिवस– प्राणी आणि मनुष्य :

अन्य प्राण्यांची रचना केल्यानंतर (२६) परमेश्वराने म्हटले आहे की मी मानवाला आपल्या स्वरूपाप्रमाणे, आपल्यासारखे बनविले आहे. तो सर्व प्राण्यांना नियंत्रणाखाली (ताब्यात) ठेवेल (२७). तेव्हा परमेश्वराने मानवाला आपल्या स्वरूपाप्रमाणे उत्पन्न केले आणि नर आणि नारी बनवून मनुष्यांची सृष्टि निर्माण केली.

२९. प्रभुने मनुष्याला आहारासाठी जितकी बीज असणारी लहान रोपे आणि बीज असणारी फळे आहेत, ते सर्व प्रदान केले. (मांस खाण्यास सांगितलेले नाही.)

सातवा दिवस– विश्रामाचा दिवस :

परमेश्वराने सहा दिवसांमध्ये सर्व सृष्टिची उत्पत्ती केली आणि सातव्या दिवशी विश्रांती घेतली.

पवित्र बायबलनेही सिद्ध केले आहे की परमात्मा मानवसदृश शरीरामध्ये आहे आणि त्याने सहा दिवसांत सर्व सृष्टिची रचना केली आणि नंतर विश्रांती घेतली.

पवित्र कुर्आन शरीफ (सुरत फुर्कानि २५, आयत नं.५२, ५८, ५९)

आयत ५२ :– फला तुतिअल्– काफिरन्– व जहिद्हुम बिही जिहादन् कबीरा (कबीरन्) ।।५२।

याचा भावार्थ असा आहे की हजरत मुहम्मदजींचा खुदा (प्रभु) म्हणत आहे की हे पैगंबर! तुम्ही काफिरांचे (जे एका प्रभुच्या भक्तीचा त्याग करून अन्य देवी–देवतांची आणि मूर्ती आदींची पूजा करतात) म्हणणे मानू नका, कारण ते लोक कबीरांना पूर्ण परमात्मा मानत नाहीत. तुम्ही मी दिलेल्या या कुर्आनाच्या ज्ञानाच्या आधारावर कबीरच पूर्ण प्रभु आहेत यावर निश्चयी राहा आणि त्या कबीर अल्लाहसाठी संघर्ष करावा (मारामारी/युद्ध नाही) म्हणजेच ठाम राहा.

आयत ५८: व तवक्कल् अलल्–हर्रूिल्लजी ला यमूतु व सब्बिह् बिहम्दिही व कफा बिही बिजुनूबि अिबादिही खबीरा (कबीरा) ।।५८।।

भावार्थ :– हजरत मुहम्मदजी ज्यांना आपले प्रभु मानत आहेत, ते अल्लाह (प्रभु) दुसऱ्या कोणत्या तरी पूर्णप्रभुंकडे संकेत करत आहे की हे पैगंबर, त्या कबीर परमात्म्यावर विश्वास ठेव, जे तुला जिवंत महात्म्याच्या रूपामध्ये येऊन भेटले होते. त्यांचा कधीही मृत्यू होत नाही म्हणजेच वास्तवामध्ये ते अविनाशी आहेत. स्तुतीसह त्यांच्या पाकी (पवित्र महिमेचे) गुणगान कर. ते कबीर अल्लाह (कविर्देव) पूजनीय आहेत आणि आपल्या उपासकांच्या (साधक) सर्व पापांचा विनाश करणारे आहेत.

**आयत ५९** :– अल्लज़ी खलकस्समावाति वल्अर्ज व मा बैनहुमा फी सित्तति अय्यामिन् सुम्मस्तवा अलल्अर्शि अर्रह्मानु फस्अल् बिही खबीरन् (कबीरन्) ।।५९।।

भावार्थ :– हजरत मुहम्मदजी यांना कुर्आन शरीफ सांगणारा प्रभु (अल्लाह) म्हणत आहे की ते कबीर प्रभुच आहेत, ज्यांनी जमीन आणि आकाश यांच्यामध्ये जे विद्यमान आहे, अशा सर्व सृष्टिची रचना सहा दिवसांमध्ये केली आणि सातव्या दिवशी आपल्या सत्यलोकामधील सिंहासनावर जाऊन विराजमान झाले. त्यांच्याविषयीची माहिती कोण्या (बाखबर) तत्त्वदर्शी संताला विचारा.

त्या पूर्ण परमात्म्याची प्राप्ती कशी होईल आणि त्यासंबंधीचे वास्तविक ज्ञान कोण्या तत्त्वदर्शी संताला (बाखबर) विचारा, याबाबत मला काहीही माहिती नाही.

या दोन्ही पवित्र धर्मांच्या (ईसाई आणि मुस्लिम) पवित्र शास्त्रांनी एकच प्रमाणित केले आहे, की, सर्व सृष्टिचा रचनाकार, सर्व पापविनाशक, सर्वशक्तिमान, अविनाशी परमात्मा मानवसदृश शरीराच्या आकारामध्ये असून ते सत्यलोकी वास्तव्य करतात. त्यांचे नाव कबीर आहे आणि त्यांनाच अल्लाहु अकबिरू देखिल म्हटले जाते.

आदरणीय धर्मदासजींनी पूज्य कबीर प्रभुंना विचारले की हे सर्वशक्तिमान, आजपर्यंत हे

तत्त्वज्ञान कोणीही सांगितले नाही. वेदांचे मर्म जाणणाऱ्या ज्ञानींनीही हे सांगितले नाही. यावरून हे सिद्ध झाले आहे की चारही पवित्र वेद आणि चारही पवित्र कतेब (कुर्आन शरीफ आदी) असत्य आहेत. त्यावेळी पूर्ण परमात्मा म्हणाले की :-

कबीर, बेद कतेब झूठे नहीं भाई, झूठे है जो समझे नाहिं।

याचा भावार्थ असा आहे की चारही पवित्र वेद (ऋग्वेद-अथर्ववेद-यजुर्वेद-सामवेद) आणि चारही पवित्र कतेब (कुर्आन शरीफ-जबूर-तौरात-इंजिल) असत्य/अयोग्य नाहीत. परंतु ज्यांना ते समजलेले नाहीत, ते अज्ञानी/खोटे आहेत.

## ''पूज्य कबीर परमेश्वर (कविर् देव) यांच्या अमृतवाणीमधील सृष्टिरचना''

विशेष :- ही अमृतवाणी १४०३ पासून {जेव्हा पूज्य कविर्देव (कबीर परमेश्वर) लीला करत पाच वर्षांचे झाले} ते १५१८ च्या {जेव्हा कविर्देव (कबीर परमेश्वर 'मगहर' स्थानातून सशरीर सतलोकी गेले.) दरम्यान सुमारे सहाशे वर्षांपूर्वी परमूज्य कबीर परमेश्वरजींनी (कविर्देव) आपले निजसेवक (दास, भक्त) आदरणीय धर्मदास साहेबजींना ऐकवली होती आणि धनी धर्मदास साहेबजींनी लिपीबद्ध केली होती. परंतु त्यावेळीच्या पवित्र हिन्दू आणि पवित्र मुस्लिम धर्मातील अज्ञानी गुरू (नीम-हकीम) म्हणाले की हा धाणक (विणकर) कबीर खोटारडा आहे. कोणत्याही सद्ग्रंथामध्ये श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी यांच्या माता-पित्यांचे नाव नाही. हे तिन्ही प्रभु अविनाशी आहेत. त्यांचा जन्म-मृत्यू होत नाही. पवित्र वेद, पवित्र कुर्आन शरीफ आदींमध्ये कबीर परमेश्वरांचे प्रमाण आहे आणि परमात्म्याचे निराकार असे वर्णन केलेले आहे. आम्ही दररोज या सदग्रंथांचे वाचन करतो. भोळ्या आत्म्यांनी त्या विलक्षणी (चतुर) अज्ञानी गुरूंवर विश्वास ठेवला की खरोखरच हा कबीर धाणक (विणकर) अशिक्षित आहे आणि आपले गुरुजी ज्ञानी आहेत. ते सांगतात ते सत्यच असणार. आज कबीर साहेबांनी सांगितलेली तीच वस्तुस्थिती, सत्य प्रकाशामध्ये येत आहे आणि याला आपले सर्व पवित्र धर्मांचे पवित्र सद्ग्रंथ साक्षी आहेत. यावरून असे सिद्ध होते की पूर्ण परमात्मा, सृष्टिचे रचनाकार, कुलस्वामी आणि सर्वज्ञ कविर्देव (कबीर परमेश्वर) हेच आहेत, जे काशीमध्ये (बनारस) कमळाच्या फुलावर प्रगट झाले आणि १२० वर्षांपर्यंत वास्तविक तेजोमय शरीरावर मानवसदृश कमी तेजाचे शरीर धारण करून राहिले. आपण रचलेल्या सृष्टिचे यथायोग्य (वास्तविक ज्ञान) देऊन सशरीर सतलोकी गेले.

कृपया वाचकांनी खालील परमेश्वर कबीर साहेब कडून उच्चारित अमृतवाणी वाचा:-

धर्मदास यह जग बौराना। कोई न जाने पद निरवाना ।।
यहि कारन मैं कथा पसारा । जगसे कहियो राम नियारा ।।
यही ज्ञान जग जीव सुनाओ । सब जीवों का भरम नशाओ ।।
अब मैं तुमसे कहों चिताई । त्रियदेवन की उत्पत्ति भाई ।।
कुछ संक्षेप कहों गुहराई । सब संशय तुम्हरे मिट जाई ।।
भरम गये जग वेद पुराना । आदि रामका का भेद न जाना ।।
राम राम सब जगत बखाने । आदि राम कोइ बिरला जाने ।।
ज्ञानी सुने सो हिरदै लगाई । मूर्ख सुने सो गम्य ना पाई ।।
माँ अष्टंगी पिता निरंजन। वे जम दारुण वंशन अंजन ।।

पहिले कीन्ह निरंजन राई । पीछेसे माया उपजाई ।।
माया रूप देख अति शोभा । देव निरंजन तन मन लोभा ।।
कामदेव धर्मराय सत्ताये।देवी को तुरतही धर खाये ।।
पेट से देवी करी पुकारा।साहब मेरा करो उबारा ।।
टेर सुनी तब हम तहाँ आये। अष्टंगी को बंद छुडाये ।।
सतलोक में कीन्हा दुराचारि, काल निरंजन दिन्हा निकारि ।।
माया समेत दिया भगाई, सोलह संख कोस दूरी पर आई ।।
अष्टंगी और काल अब दोई, मंद कर्म से गए बिगोई ।।
धर्मराय को हिकमत कीन्हा। नख रेखा से भगकर लीन्हा ।।
धर्मराय किन्हाँ भोग विलासा। माया को रही तब आसा ।।
तीन पुत्र अष्टंगी जाये । ब्रह्मा, विष्णु शिव नाम धराये ।।
तीन देव विस्तार चलाये। इनमें यह जग धोखा खाये ।।
पुरुष गम्य कैसे को पावै। काल निरंजन जग भरमावै ।।
तीन लोक अपने सुत दीन्हा। सुन्न निरंजन बासा लीन्हा ।।
अलख निरंजन सुन्न ठिकाना। ब्रह्मा विष्णु शिव भेद न जाना ।।
तीन देव सो उनको धावें। निरंजन का वे पार ना पावें ।।
अलख निरंजन बडा बटपारा। तीन लोक जिव कीन्ह अहारा ।।
ब्रह्मा विष्णु शिव नहीं बचायें। सकल खाय पुन धूर उडाये ।।
तिनके सुत हैं तीनों देवा। आंधर जीव करत हैं सेवा ।।
अकाल पुरुष काहू नहिं चीन्हां । काल पाय सबही गह लीन्हां ।।
ब्रह्म काल सकल जग जाने । आदि ब्रह्मको ना पहिचाने ।।
तीनों देव और औतारा। ताको भजे सकल संसारा ।।
तीनों गुणका यह विस्तारा। धर्मदास मैं कहों पुकारा ।।
गुण तीनों की भक्ति में, भूल परो संसार ।
कहै कबीर निज नाम बिन, कैसे उतरैं पार ।।

**या अमृतवाणीमध्ये परमेश्वर कबीर साहेब जी आपले निजसेवक श्री धर्मदास साहेबजींना सांगत आहेत की धर्मदास, हा सर्व संसार तत्त्वज्ञानाच्या अभावाने विचलित (भटकत/भ्रमित) झालेला आहे. कोणालाही पूर्ण मोक्षाचा मार्ग आणि पूर्ण सृष्टि रचनेचे ज्ञान नाही. यासाठी मी स्वतः रचलेल्या सृष्टिची कथा ऐकवत आहे. बुद्धिमान व्यक्तींना तर हे ज्ञान लगेच समजेल. परंतु जे सर्व निष्कर्ष पाहूनही मानणार नाहीत, विश्वास ठेवणार नाहीत, ते अज्ञानी प्राणी कालाच्या प्रभावाखाली आलेले आहेत. ते भक्तियोग्य नाहीत. आता मी सांगतो, की, या तिन्ही भगवानांची (ब्रह्मा जी, विष्णु जी आणि शिव जी) उत्पत्ती कशी झाली? त्यांची माता तर अष्टांगी (दुर्गा) आहे आणि पिता ज्योति निरंजन (ब्रह्म, काल) आहे. प्रथम अंड्यातून ब्रह्मची उत्पत्ती झाली. त्यानंतर दुर्गा देवीची उत्पत्ती झाली. दुर्गाच्या रूपावर आसक्त होऊन काल (ब्रह्म) गैरवर्तन करू लागला, तेव्हा दुर्गा देवीने (प्रकृति) त्याच्या उदरामध्ये आसरा घेतला. त्यावेळी जेथे ज्योति निरंजन (काल) होता, तेथे मी गेलो आणि भवानीला ब्रह्मच्या (काल) उदरातून बाहेर काढून २१ ब्रह्माण्डांसह १६ संख कोस दूर पाठवले. ज्योति निरंजनाने (धर्मराय) प्रकृति देवीशी (दुर्गा) भोगविलास केला. या दोघांच्या संयोगातून तिन्ही गुणांची (श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी) उत्पत्ती झाली. याच तीन गुणांची (रजगुण-ब्रह्मा जी, सतगुण-विष्णु जी, तमगुण-**

शिव जी) साधना करून सर्व प्राणी कालच्या जाळ्यामध्ये फसलेले आहेत. जोपर्यंत वास्तविक मंत्र मिळत नाही, तोपर्यंत त्यांना पूर्ण मोक्ष कसा मिळेल?

विशेष :- वाचकहो विचार करा- श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी यांची स्थिती अविनाशी सांगितली होती. सर्व हिन्दू समाज आजतागायत या तिन्ही परमात्म्यांना अजर, अमर व जन्म-मृत्यूरहित मानत राहिला आहे. परंतु वास्तविक हे तीनही भगवान नाशवान आहेत. यांचा पिता कालरुपी ब्रह्म आणि माता व दुर्गा (प्रकृति/अष्टांगी) आहे. आपण पूर्व प्रमाणांमध्ये वाचलेले आहे, तेच ज्ञान आपल्या शास्त्रांमध्येही विद्यमान आहे. परंतु हिन्दू समाजातील कलयुग गुरू, ऋषि आणि संतांना याचे ज्ञान नाही. ज्या अध्यापकाला पाठ्यक्रम माहीत नाही, तो अध्यापक योग्य नाही (विद्वान नाही). तो विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा शत्रू आहे. त्याप्रमाणे ज्या गुरूंना अजूनही श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी यांचे माता-पिता कोण आहेत, हे माहीत नाही, ते गुरू, ऋषि, संत ज्ञानहीन आहेत. त्यांनी सर्व भक्त समाजाला शास्त्राविरुद्ध ज्ञान (लोकवेद अर्थात दंतकथा) ऐकवून अज्ञानाने परिपूर्ण करून टाकले. शास्त्रविधीविरुद्ध भक्तिसाधना करवून घेऊन त्यांना परमात्म्याच्या वास्तविक लाभापासून (पूर्ण मोक्ष) वंचित ठेवले. सर्वांचे मानव जीवन व्यर्थ घालविले आहे. जो शास्त्रविधीचा त्याग करून मनमानी आचरण, पूजा करतो त्याला कोणताही लाभ प्राप्त होत नाही, याचे प्रमाण श्रीमद् भगवत गीता च्या १६ व्या अध्यायामध्ये २३ व २४ व्या श्लोकांमध्ये आले आहे. पूर्ण परमात्मा कबीरजींनी सन १४०३ पासूनच सर्व शास्त्रयुक्त ज्ञान आपल्या अमृतवाणीमध्ये (कबीर वाणी) सांगण्यास प्रारंभ केला होता. परंतु त्या वेळच्या अज्ञानी गुरूंनी हे ज्ञान भक्त समाजापर्यंत जाऊ दिले नाही. यावरून हे स्पष्ट होते की कविर्देव (कबीर प्रभु) तत्त्वदर्शी संताच्या रूपामध्ये स्वतः पूर्ण परमात्माच आलेले होते.


## ''आदरणीय गरीब दास साहेबजींच्या अमृतवाणीमध्ये सृष्टिरचनेचे प्रमाण''

### आदि रमैणी (सदग्रन्थ पृष्ठ नं. ६९० ते ६९२ पर्यंत)

आदि रमैणी अदली सारा। जा दिन होते धुंधुकारा ।।१।।
सत पुरुष कीन्हा प्रकाशा। हम होते तखत कबीर खवासा ।।२।।
मन मोहिनी सिरजी माया । सतपुरुष एक ख्याल बनाया ।।३।।
धर्मराय सिरजे दरबानी। चौसठ जुगतप सेवा ठांनी ।।४।।
पुरुष पृथिवी जाकूं दीन्ही। राज करो देवा आधीनी ।।५।।
ब्रह्मण्ड इकीस राज तुम्ह दीन्हा। मन की इच्छा सब जुग लीन्हा ।।६।।
माया मूल रूप एक छाजा। मोहि लिये जिनहूँ धर्मराजा ।।७।।
धर्म का मन चंचल चित धार्या। मन माया का रूप बिचारा ।।८।।
चंचल चेरी चपल चिरागा। या के परसे सरबस जागा ।।९।।
धर्मराय कीया मन का भागी। विषय वासना संग से जागी ।।१०।।
आदि पुरुष अदली अनरागी। धर्मराय दिया दिल सें त्यागी ।।११।।
पुरुष लोक सें दीया ढहाही। अगम दीप चलि आये भाई ।।१२।।
सहस दास जिस दीप रहंता। कारण कौंन कौंन कुल पंथा ।।१३।।
धर्मराय बोले दरबानी । सुनो सहज दास ब्रह्मज्ञानी ।।१४।।
चौसठ जुग हम सेवा कीन्ही। पुरुष पृथिवी हम कूं दीन्ही ।।१५।।
चंचल रूप भया मन बौरा। मनमोहिनी ठगिया भौंरा ।।१६।।

सतपुरुष के ना मन भाये। पुरुष लोक से हम चलि आये ।।१७।।
अगर दीप सुनत बड़भागी। सहज दास मेटो मन पागी ।।१८।।
बोले सहजदास दिल दानी । हम तो चाकर सत सहदानी ।।१९।।
सतपुरुष से अरज गुजारूं। जब तुम्हारा बिवाण उतारूं ।।२०।।
सहज दास को कीया पीयाना। सत्यलोक लीया प्रवाना ।।२१।।
सतपुरुष साहिब सरबंगी। अविगत अदली अचल अभंगी ।।२२।।
धर्मराय तुम्हरा दरबानी। अगर दीप चलि गये प्रानी ।।२३।।
कौंन हुकम करी अरज अवाजा। कहां पठावौ उस धर्मराजा ।।२४।।
भई आवाज अदली एक साचा। विषय लोक जा तीन्यूं बाचा ।।२५।।
सहज विमाँन चले अधिकाई। छिन में अगर दीप चलि आई ।।२६।।
हमतो अरज करी अनरागी । तुम्ह विषय लोक जावो बडभागी ।।२७।।
धर्मराय के चले विमाना। मानसरोवर आये प्राना ।।२८।।
मानसरोवर रहन न पाये। दरै कबीरा थांना लाये ।।२९।।
बंकनाल की विषमी बाटी। तहां कबीरा रोकी घाटी ।।३०।।
इन पाँचों मिलि जगत बंधाना। लख चौरासी जीव संताना ।।३१।।
ब्रह्मा विष्णु महेश्वर माया। धर्मराय का राज पठाया ।।३२।।
यौह खोखा पुर झूठी बाजी । भिसती बैकुण्ठ दगासी साजी ।।३३।।
कृतिम जीव भुलानें भाई । निज घर की तो खबरि न पाई ।।३४।।
सवा लाख उजपें नित हंसा । एक लाख विनशें नित अंसा ।।३५।।
उपति खपति याह प्रलय फेरी । हर्ष शोक जौंरा जम जेरी ।।३६।।
पाँचों तत्त्व हैं प्रलय माँही। सत्त्वगुण रजगुण तमगुण झांई ।।३७।।
आठों अंग मिली है माया । पिण्ड ब्रह्मण्ड सकल भरमाया ।।३८।।
या में सुरति शब्द की डोरी । पिण्ड ब्रह्मण्ड लगी है खोरी ।।३९।।
श्वासा पारस मन गह राखो। खोल्हि कपाट अमीरस चाखो ।।४०।।
सुनाऊं हंस शब्द सुन दासा। अगम दीप है अग है बासा ।।४१।।
भवसागर जम दण्ड जमाना। धर्मराय का है तलबांना ।।४२।।
पाँचो ऊपर पद की नगरी। बाट बिहंगम बंकी डगरी ।।४३।।
हमरा धर्मदाय सों दावा। भवसागर में जीव भरमावा ।।४४।।
हम तो कहैं अगम की बानी। जहाँ अविगत अदली आप बिनानी ।।४५।।
बंदी छोड हमारा नामं । अजर अमर है अस्थीर ठामं ।।४६।।
जुगन जुगन हम कहते आये। जम जौरा सें हंस छुटाये ।।४७।।
जो कोई मानें शब्द हमारा। भवसागर नहीं भरमें धारा ।।४८।।
या में सुरति शब्द का लेखा । तन अंदर मन कहो कीन्ही देखा ।।४९।।
दास गरीब अगम की बानी। खोजा हंसा शब्द सहदानी ।।५०।।

**या अमृतवाणीचा भावार्थ असा आहे कि आदरणीय गरीब दास साहेब जी म्हणत आहेत की सर्वप्रथम येथे केवळ अंधकार होता आणि पूर्ण परमात्मा कबीर साहेब जी सत्यलोकामध्ये तख्तावर (सिंहासन) विराजमान होते. आम्ही तेथे सेवक होतो. परमात्म्याने ज्योनिरंजनाची उत्पत्ती केली. नंतर त्याच्या तपाचे प्रतिफळ म्हणून २१ ब्रह्माण्डे त्याला प्रदान केली. त्यानंतर मायेची (प्रकृति) उत्पत्ती केली. तरुण दुर्गादेवीच्या (प्रकृति) रूपावर मोहित होऊन ज्योति**




योह हरहट का कुआँ लोई, या गल बंध्या है सब कोई।
कीड़ी कुंजर और अवतारा, हरहट डोरी बंधे कई बारा।।

**काल लोका मध्ये जन्म–मरण रुपी हरहट (चक्र)**

**निरंजनने (ब्रह्म) दुर्गा देवीशी (प्रकृति) गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केला. त्याला (काल) त्याची शिक्षा प्राप्त झाली. त्याला सत्यलोकातून हद्दपार करून (निष्कासित) शाप देण्यात आला की तो दररोज एक लाख मानव शरीरधारी प्राण्यांचा आहार करेल आणि सव्वा लाख मानव शरीरधारी प्राण्यांची उत्पत्ती करेल. त्यामुळे येथील सर्व प्राणी जन्म-मृत्यूचे कष्ट सहन करत आहेत. जर कोणी पूर्ण परमात्म्याचे वास्तविक शब्द (सत्य, खरे नाम, जप मंत्र) माझ्याकडून (रामपालजी महराज) प्राप्त करेल, त्याची या कालच्या बंधनातून सुटका होईल. माझे नाव बंदी छोड आहे. आदरणीय गरीब दास साहेब जी आपले गुरू व प्रभु कबीर परमात्मा यांच्या आधारावर म्हणत आहेत की खरा मंत्र म्हणजेच सत्यनाम आणि सारनामाची प्राप्ती करा. त्यामुळे पूर्ण मोक्ष मिळेल, नाही तर खोटा नामोपदेश देणाऱ्या संत आणि महंतांच्या मधूर बोलण्याला फसून शास्त्रविधिरहित साधना करून कालच्या जाळ्यामध्येच अडकून पडाल. आणि कष्टावर कष्ट सहन करत बसाल.**

**।।गरीब दास जी महाराजांची वाणी ।।**
**(सतग्रंथ साहिब पान नं.६९० वरून साभार)**

माया आदि निरंजन भाई, अपने जाऐ आपै खाई।
ब्रह्मा विष्णु महेश्वर चेला, ऊँ सोहं का है खेला ।।
सिखर सुन्न में धर्म अन्यायी, जिन शक्ति डायन महल पठाई।
लाख ग्रास नित उठ दूती,माया आदि तख्त की कुती ।।
सवा लाख घड़िये नित भांडे, हंसा उतपति परलय डांडे।
ये तीनों चेला बटपारी, सिरजे पुरुषा सिरजी नारी ।।
खोखापुर में जीव भुलाये, स्वपना बहिस्त वैकुंठ बनाये।
यो हरहट का कुआ लोई, या गल बंध्या है सब कोई ।।
कीड़ी कुजंर और अवतारा, हरहट डोरी बंधे कई बारा ।।
अरब अलील इन्द्र हैं भाई, हरहट डोरी बंधे सब आई ।।
शेष महेश गणेश्वर ताहिं, हरहट डोरी बंधे सब आहिं ।
शुक्रादिक ब्रह्मादिक देवा, हरहट डोरी बंधे सब खेवा ।।
कोटिक कर्ता फिरता देख्या, हरहट डोरी कहूँ सुन लेखा।
चतुर्भुजी भगवान कहावैं, हरहट डोरी बंधे सब आवैं ।।
यो हैं खोखापुर का कुआ, या में पड़ा सो निश्चय मुवा।

**ज्योति निरंजन (कालबली) च्या वश होऊन या तिन्ही देवता (रजगुण-ब्रह्मा, सतगुण-विष्णु, तमगुण-शिव) आपली महिमा दाखवून जीवांना स्वर्ग नरक तसेच भवसागरात (चौऱ्याऐंशी लाख योनींमध्ये) फिरत राहतात. ज्योति निरंजन आपल्या मायेने नागिनी सारखे जीवांना पैदा करतो आणि पुन्हा मारतो. जशी नागीण आपली कुंडली बनविते आणि त्या कुंडलीमध्ये अंडी घालते. त्यानंतर ती त्या अंड्यांवर आपला फणा मारते. त्यामुळे अंडी फुटतात आणि त्यातून पिल्ली बाहेर पडतात. त्यांना नागीण भक्षण करते. अंडी भरपूर असल्यामुळे फणा मारताना कित्येक अंडी फुटतात. जी अंडी फुटतात, त्यातून नागिणीची पिल्ली बाहेर निघतात. जे पिल्लू कुंडलीच्या (नागिणीच्या शेपटीचा घेरा) बाहेर पडते ते वाचते. अन्यथा कुंडलीमधील पिलांना नागीण सोडत नाही. जेवढी पिल्ली कुंडलीत असतील, त्या सर्वांना ती खाते.**

माया काली नागिनी, आपने जाये खात। कुण्डली में छोड़ै नहीं, सौ बातों की बात ।।

**अशाप्रकारे हे कालबलीचे महाभयंकर जाळे आहे. निरंजनपर्यंतची भक्ति पूर्ण संतांकडून नामोपदेश घेऊन केली, तरीही निरंजनाच्या कुंडलीतून (२१ ब्रह्माण्डे) बाहेर जाता येत नाही. स्वतः ब्रह्मा, विष्णु, महेश, आदिमाया शेरावाली (दुर्गा) हे देखिल निरंजनाच्या कुंडलीतच आहेत. ते बिचारे अवतार धारण करून येतात आणि जन्म-मृत्यूचे फेरे घेत राहतात. म्हणूनच ध्रुव, प्रल्हाद व शुक्रदेव ऋषिंनी 'सोहं' मंत्राचा जप करूनही ते मुक्त होऊ शकले नाहीत. ते काललोकीच राहिले. 'ॐ नम: भगवते वासुदेवाय' या मंत्राचा जप करणारे भक्त देखिल कृष्णापर्यंत पोहोचण्याची भक्ती करत आहेत. ते देखिल ८४ लक्ष योनींच्या फेऱ्यामधून सुटू शकणार नाहीत, याचा विचार करा. हे सर्व परमपूज्य कबीर साहेब जी व आदरणीय गरीब दास साहेब जी महाराज यांच्या वाणीमध्ये प्रत्यक्ष प्रमाणित आहे.**

अनन्त कोटि अवतार हैं, माया के गोविन्द । कर्ता हो हो अवतरे, बहुर पड़े जग फंध ।।

**सतपुरुष कबीर साहेबजींच्या भक्तीनेच जीव मुक्त होऊ शकतो.**

**जोपर्यंत जीव सतलोकी परत जाणार नाही, तोपर्यंत काललोकी असेच कर्म करत राहील आणि नामस्मरण व दानधर्माच्या पूण्याची कमाई स्वर्गरूपी हॉटेलमध्ये उधळून पुन्हा कर्माधारावर ८४ लक्ष प्राण्यांच्या शरीरामध्ये जन्म-मृत्यू रूपी कष्ट सहन कराव्या लागणाऱ्या काललोकी फेऱ्या मारत बसेल. भगवान विष्णुजींना देवर्षी नारदांनी शाप दिला होता. त्यामुळे भगवान विष्णुंना श्री रामचंद्र रूपामध्ये अयोध्येत अवतार घ्यावा लागला. या अवतारात त्यांनी वालीचा वध केला. या कर्माचा दंड भोगण्यासाठी त्यांचा परत श्री कृष्णजींच्या रूपात जन्म झाला. या अवतारावेळी वालीचा आत्मा शिकारी बनला आणि आपला पूर्वजन्मीचा प्रतिशोध त्याने श्री कृष्णजींच्या पायामध्ये विषयुक्त बाण मारून वध करून घेतला, त्याप्रमाणे मायेपासून (दुर्गा) उत्पत्ती होऊन करोडो गोविंदांना (ब्रह्मा-विष्णु-शिव) मृत्यूला सामोरे जावे लागले आहे. भगवानांच्या अवतार रूपात त्यांनी येथे जन्म घेतला. नंतर ते कर्मबंधनामध्ये अडकले आणि ८४ लक्ष योनींमध्ये कर्माचे भोग भोगू लागले. महाराज गरीब दास जी आपल्या वाणीमध्ये म्हणत आहेत की**

ब्रह्मा विष्णु महेश्वर माया, और धर्मराय कहिये।
इन पाँचो मिल परपंच बनाया, वाणी हमरी लहिये ।।
इन पाँचो मिल जीव अटकाये, जुगन-जुगन हम आन छुटाये।
बन्दी छोड हमारा नामं, अजर अमर है अस्थिर ठामं ।।
पीर पैगम्बर कुतुब औलिया, सुर नर मुनिजन ज्ञानी।
येता को तो राह न पाया, जम के बंधे प्राणी ।।
धर्मराय की धूमा-धामी, जम पर जंग चलाऊँ ।
जोरा को तो जान न दूगां, बांध अदल घर ल्याऊँ ।।
काल अकाल दोहूँ को मोसूं, महाकाल सिर मूंडू।
मैं तो तख्त हजूरी हुकमी, चोर खोज कूं ढूंढू ।।
मूला माया मग में बैठी, हंसा चुन-चुन खाई।
ज्योति स्वरूपी भया निरंजन, मैं ही कर्ता भाई ।।
संहस अठासी दीप मुनीश्वर, बंधे मुला डोरी।
ऐत्यां में जम का तलबाना, चलिए पुरुष कीशोरी ।।
मूला का तो माथा दागूं, सतकी मोहर करूंगा ।।

पुरुष दीप कूं हंस चलाऊँ, दरा न रोकन दूंगा ।।
हम तो बन्दी छोड कहावां, धर्मराय है चकवै।
सतलोक की सकल सुनावां, वाणी हमरी अखवै ।।
नौ लख पट्टन ऊपर खेलूं, साहदरे कूं रोकूं।
द्वादस कोटि कटक सब काटूं, हंस पठाऊँ मोखूं ।।
चौदह भुवन गमन है मेरा, जल थल में सरबंगी।
खालिक खलक खलक में खालिक, अविगत अचल अभंगी ।।
अगर अलील चक्र है मेरा, जित से हम चल आए।
पाँचों पर प्रवाना मेरा, बंधि छुटावन धाये ।।
जहाँ ओंकार निरंजन नाहीं, ब्रह्मा, विष्णू वेद नहीं जाही।
जहाँ करता नहीं जान भगवाना, काया माया पिण्ड न प्राणा ।।
पाँच तत्त्व तीनों गुण नाहीं, जोरा काल दीप नहीं जाहीं।
अमर करूं सतलोक पठाँऊ, तातैं बन्दी छोड कहाऊँ ।।

**कबीर परमेश्वरांची (कविर्देव) महिमा गात आदरणीय गरीब दास साहेब जी म्हणत आहेत की आमचे प्रभू कविर् (कविर्देव) बंदी छोड आहेत. बंदी छोड याचा अर्थ कालच्या कारागृहातून सुटका करणारे. कालब्रह्मच्या २१ ब्रह्माण्डांमध्ये सर्व प्राणी हातून पाप घडल्यामुळे कालचे बंदी बनले आहेत. पूर्ण परमात्मा कबीर साहेब (कविर्देव) पापांचा विनाश करतात. ब्रह्म, परब्रह्म, ब्रह्मा, विष्णु, शिव किंवा इतर कोणीही पापांचा विनाश करू शकत नाही. जसे आपले कर्म असेल, त्याप्रमाणे ते आपणाला केवळ फळ देतात. यासाठी यजुर्वेदाच्या ५ व्या अध्यायातील ३२ व्या मंत्रामध्ये म्हटले आहे की 'कविरंघारिरसि' कविर्देव पापांचे शत्रू आहेत. 'बम्भारिरसि' बंधनांचे शत्रू म्हणजेच 'बंदी छोड' आहेत.**

**ब्रह्मा, विष्णु, महेश, माया आणि धर्मराय या पाच जणांच्या वर जे सतलोकाचे स्वामी (मालक) आहेत, ते सतपुरुष परमात्मा (कविर्देव) आहेत. बाकीचे सर्व परब्रह्म, ब्रह्म आणि ब्रह्मा, विष्णु, शिव जी व आदिमाया हे नाशवान परमात्मा आहेत. महाप्रलयामध्ये हे सर्व आणि त्यांचे लोक (धाम) पूर्णपणे नष्ट होतील. सर्वसामान्य जीवांपेक्षा कितीतरी हजार पटीने अधिक यांचे आयुष्य आहे. परंतु जी वेळ ठरलेली आहे, ती एक दिवस नक्कीच पूर्ण होते आणि त्यांना नष्ट व्हावे लागते. याबाबत आदरणीय गरीब दास जी महाराज म्हणतात की :-**

शिव ब्रह्मा का राज, इन्द्र गिनती कहां। चार मुक्ति वैकुंठ समझ, येता लह्या।।
संख जुगन की जुनी, उम्र बड धारिया। जा जननी कुर्बान, सु कागज पारिया।।
येती उम्र बुलंद मरैगा अंत रे। सतगुरू लगे न कान, न भैंटे संत रे ।।

**जरी संख युगांचे दीर्घ आयुष्य प्राप्त झाले, तरी ते एक ना एक दिवस नक्कीच समाप्त होतील. जर सतपुरुष परमात्मा (कविर्देव) कबीर साहेबांचे अनुयायी (नुमाँयदे) पूर्ण संत (गुरू), जे तीन नामांचा मंत्र (ज्यामध्ये ओऽम्+तत्+सत् हे सांकेतिक आहेत.) प्रदान करतात आणि ज्यांना पूर्ण संतांकडून नामोपदेश करण्याचा आदेश आहे, त्यांच्याकडून उपदेश घेऊन नामस्मरणाची पुण्यकमाई केली, तर आपण सत्यलोकीचे अधिकारी हंस होऊ शकतो. सत्यसाधनेशिवाय अतिदीर्घ आयुष्य काहीही कामाचे नाही. कारण या निरंजन लोकी केवळ दु:ख आणि दु:खच आहे.**

कबीर, जीवना तो थोड़ा ही भला, जै सत सुमरन होय।

लाख वर्ष का जीवना, लेखै धरै ना कोय ।।

**कबीर साहेब आपली (पूर्ण ब्रह्म) माहिती स्वतः सांगतात,की या परमात्म्यांच्याही वर असंख्य भुजा असलेला परमात्मा सतपुरुष आहे, जो सत्यलोकामध्ये (सच्च खण्ड/सतधाम) वास्तव्य करतो आणि त्यांच्या अखत्यारित सर्व लोक (ब्रह्मची (काल) २१ ब्रह्माण्डे व ब्रह्मा, विष्णु, शिव-शक्ती (दुर्गा) यांचे लोक आणि परब्रह्मचे सात संख ब्रह्माण्डे व इतर सर्व ब्रह्माण्डे) येतात आणि तेथे जे पूर्ण सतगुरूंकडूनच प्राप्त होते, त्या सत्यनाम-सारनामाचा जप करूनच जाता येते. सच्च खण्डामध्ये (सतलोक) जो आत्मा जातो, त्याचा पुनर्जन्म होत नाही. सतपुरुष (पूर्ण ब्रह्म) कबीर साहेबच (कविर्देव) इतर लोकांमध्येही विराजमान आहेत. अलखलोकी अलखपुरुष, अगमलोकी अगमपुरुष, तसेच अकहलोकी अनामीपुरुष अशा रूपांमध्ये ते विराजमान आहेत. ही तर त्यांची केवळ उपमात्मक नावे आहेत. परंतु या परमेश्वराचे, पूर्ण पुरुषाचे वास्तविक नाव कविर्देव (भाषा भिन्नतेमुळे कबीर साहेबही म्हटले जाते.) असे आहे.**

## ''आदरणीय नानक साहेबजींच्या वाणीमध्ये सृष्टिरचनेचा संकेत''

**श्री नानक साहेबजींची अमृतवाणी, महला १, राग बिलावलु, अंश १ (गु.ग्रं.पृ. ८३९)**

आपे सचु कीआ कर जोड़ि। अंडज फोडि जोडि विछोड़ ।।
धरती आकाश कीए बैसण कउ थाउ। राति दिनंतु कीए भउ-भाउ।।
जिन कीए करि वेखणहारा। (३)
त्रितीआ ब्रह्मा-बिसतु-महेसा। देवीदेव उपाए वेसा ।।(४)
पउण पाणी अगनी बिसराउ। ताही निरंजन साचो नाउ ।।
तिसु महि मनुआ रहिआ लिव लाई। प्रणवति नानकु कालु न खाई ।।(१०)

**या अमृतवाणीचा भावार्थ असा आहे की खऱ्या परमात्म्यांनी (सतपुरुष) स्वतःच आपल्या हातांनी सर्व सृष्टिची रचना केलेली आहे. त्यांनीच अंडे बनविले आणि नंतर ते फोडले व त्यातूनच ज्योति निरंजन बाहेर पडला. त्याच पूर्ण परमात्म्याने सर्व प्राण्यांच्या वास्तव्य साठी धरती, आकाश, पवन, जल, अग्नी ही पंचतत्त्वे निर्माण केली. आपण स्वतः रचलेल्या सृष्टिचे ते स्वतःच साक्षी आहेत. याबाबत दुसरा कोणीही योग्य माहिती देऊ शकत नाही. त्यानंतर अंडे फुटून बाहेर पडलेल्या ज्योति निरंजनानंतर श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी यांची उत्पत्ती झाली, तसेच अन्य देवी-देवता आणि अगणित (असंख्य) जीवांची उत्पत्ती झाली. त्यानंतर अन्य देवांचे जीवनचरित्र आणि अन्य ऋषिंच्या अनुभवांतून सहा शास्त्रे आणि अठरा पुराणे निर्माण झाली. पूर्ण परमात्म्याच्या खऱ्या नामाची (सत्यनामाची) साधना अनन्यभावे केल्यानेच व गुरुमर्यादेमध्ये राहणाऱ्यांना (प्रणवति) काल खात (भक्षण) नाही, असे श्री नानक जी सांगत आहेत.**

**राग मारू (अंश) अमृतवाणी महला १. (गुरू ग्रंथ साहेब मधील पान क्र. १०३७)**

सुनहु ब्रह्मा, बिसनु, महेसु उपाए। सुने वरते जुग सबाए ।।
इसु पद बिचारे सो जनु पुरा। तिस मिलिए भरमु चुकाइदा।।(३)
साम वेदु, रुगु जुजरु अथरबणु । ब्रह्ममें मुख माइआ है त्रैगुण ।।
ता की कीमत कहि न सकै। को तिउ बोले जिउ बुलाईदा ।।(९)

**या अमृतवाणीचा सारांश असा आहे की अंड्याचे दोन भाग होऊन कोण निघाले, त्याने नंतर ब्रह्मलोकीच्या सुन्न म्हणजेच गुप्तस्थानी ब्रह्मा, विष्णु आणि शिव जी यांची उत्पत्ती कशी**

**केली. तसेच ज्याने ब्रह्मच्या (काल) मुखातून चार वेदांचे (पवित्र ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद) यांचे उच्चारण करून घेतले, तो परमात्मा कोण आहे, तो पूर्ण परमात्मा त्याला जसे हवे तसेच प्रत्येक प्राण्याला बोलायला लावतो, या सर्वाबाबत तो संतच पूर्ण सृष्टिरचना ऐकवेल आणि सांगेल. हे सर्व ज्ञान पूर्णपणे सांगणारा संत मिळाला/भेटला, तर त्याच्याजवळ जा. ते सर्व शंकांचे पूर्णपणे निरसन करतात आणि तेच पूर्ण संत म्हणजेच तत्त्वदर्शी आहेत.**

**श्री गुरू ग्रंथसाहेबच्या पान क्र. ९२९ वरील अमृतवाणी श्री नानक साहेबजींची राग रामकली महला १ दखणी ओअंकार.**

ओअंकारि ब्रह्मा उतपति। ओअंकारू कीआ जिनि चित। ओअंकारि सैल जुग भए । ओअंकारि बेद निरमए। ओअंकारि सबदि उधरे । ओंअकारि गुरुमुखि तरे। ओनम अखर सुणहू बीचारु। ओनम अखरु त्रिभवण सारु।

**या अमृतवाणीमध्ये श्री नानक साहेब जी म्हणत आहेत की ओंकार म्हणजेच ज्योति निरंजनापासून (काल) ब्रह्माजींची उत्पत्ती झाली. कित्येक युगे भक्ती करून ओंकाराने (ब्रह्म/काल) जे ब्रह्माजींना प्राप्त झाले, त्या वेदांची उत्पत्ती केली. त्रिलोकीच्या भक्तीचा केवळ एक 'ओऽम्' या मंत्राचा जप करण्यास सांगितले आहे. या 'ओऽम' शब्दाचा पूर्ण संतांकडूनच उपदेश घेऊन म्हणजेच गुरू करून जप केल्यानेच उद्धार होतो.**

**विशेष :- श्री नानक साहेबजींनी तीन मंत्रांचे (ओऽम्+तत्+सत्) ठिकठिकाणी रहस्यात्मक विश्लेषण केले आहे. ते केवळ पूर्ण संत (तत्त्वदर्शी संतच) समजू शकतात आणि तिन्ही मंत्रांच्या जपाचा उपदेश समजावून सांगू शकतात. (पान क्र. १०३८)**

उत्तम सतिगुरु पुरुष निराले, सबदि रते हरि रस मतवाले।
रिधि, बुधि, सिधि, गिआन गुरु ते पाइए, पुरे भाग मिलाईदा ।।१५।।
सतिगुरु ते पाए बीचारा, सुन समाधि सचे घरबारा ।
नानक निरमल नादु सबद धुनि, सचु रामैं नामि समाइदा ।।१७) ।।५।। १७ ।।

**या अमृतवाणीचा भावार्थ असा आहे की वास्तविक ज्ञान देणारे सतगुरु तर वेगळेच आहेत. ते केवळ नामजप करण्यासच सांगतात. अन्य हठयोग साधना ते सांगत नाहीत. जर आपणाला धन-दौलत, पद, बुद्धी अथवा भक्ती शक्ती देखिल हवी असेल, तर त्या भक्तिमार्गाचे सर्व ज्ञान पूर्ण संतच प्रदान करेल. असे पूर्ण संत मोठ्या भाग्यानेच लाभतात. वर आकाशामध्ये (सुन्न) आपले वास्तविक घराची (सतलोक) परमेश्वराने रचना केलेली आहे, असे विश्लेषण तेच पूर्ण संत करतील.**

**त्यामध्ये एका वास्तविक सारनामाची धून (आवाज) उमटत आहे. त्या आनंदात अविनाशी परमेश्वराचा सारशब्द सामावला जातो म्हणजेच त्या वास्तविक सुखदायी स्थानी आपला अधिवास होऊ शकतो. अन्य नामजपापासून आणि अज्ञानी गुरूंपासून होऊ शकत नाही.**

**आंशिक अमृतवाणी महला पहला (गुरू ग्रंथ साहेबमधील पान क्र. ३५९ व ३६०)**

सिव नगरी महि आसणि बैसउ कलप त्यागी वादं। (१)
सिंडी सबद सदा धुनि सोहै अहिनिसि पुरै नादं। (२)
हरि कीरति रह रासि हमारी गुरु मुख पंथ अतीत (३)
सगली जोति हमारी संमिआ नाना वरण अनेकं ।
कह नानक सुणि भरथरी जोगी पारब्रह्म लिव एकं ।।(४)

या अमृतवाणीमध्ये श्री नानक साहेब जी म्हणत आहेत की हे भरथरी योगीजी, आपली साधना भगवान शिवापर्यंत आहे. त्यामुळे आपल्याला शिवनगरीमध्ये (लोक) स्थान प्राप्त झालेले आहे आणि शरीरामध्ये जे 'सिंगी' शब्द आदी होत आहे, तो याच कमळांचा आहे आणि टेलिव्हिजनसारखा प्रत्येक देवाच्या लोकी शरीरामध्ये ऐकू येत आहे.

आम्ही तर एक परमात्मा पारब्रह्म म्हणजेच सर्वांच्या पलीकडे जो पूर्ण परमात्मा आहे, त्या परमात्म्याशी अनन्यभावे एकरूप होतो.

आम्ही बाह्य शरीरावर वरवरचा दिखावा (भस्म लावणे, हातामध्येकाठी घेणे) असे काहीही करत नाही. मी तर सर्व प्राण्यांना त्या एका पूर्ण परमात्म्याची संतान समजतो. सर्व काही त्याच शक्तीने चलायमान आहे. आमचा भाव तर सद्‌गुरुंकडून खरे नाम (सत्यनाम) प्राप्त करून त्याचा जप करण्याचा आहे आणि क्षमा करणे हा आमचा धर्म (बाणा) आहे. मी तर पूर्ण परमात्म्याचा उपासक आहे आणि पूर्ण सद्‌गुरुंचा भक्तिमार्ग यापेक्षा वेगळाच आहे.

**अमृतवाणी राग आसा महला १ (गुरू ग्रंथ साहेबमधील पान क्र. ४२०)**

**।।आसा महला १।।** जिनी नामु विसारिआ दूजै भरमि भुलाई। मुलू छोड़ि डाली लगे किआ पावहि छाई ।।१।।साहिबु मेरा एकु है अवरू नहीं भाई। किरपा ते सुखु पाइआ साचे परथाई ।।३।।गुर की सेवा सो करे जिसु आपि कराए। नानक सिरु दे छुटीऐ दरगह पति पाए ।।८।।१८।।

या वाणीचा भावार्थ आहे कि श्री नानक साहेब जी म्हणत आहेत की जे पूर्ण परमात्म्याचे वास्तविक नाम विसरून अन्य भगवानांच्या नामांचा जप करून भ्रमित झालेले आहेत, ते मूळ (पूर्ण परमात्मा) सोडून फांद्यावरच (त्रिगुणरूपी- रजगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु, तमगुण शिव जी) शिंपण (पूजा) करत आहेत. या साधनेने कोणतेच सुख प्राप्त होऊ शकत नाही म्हणजेच रोपटे सुकले, वाळून गेले तर आपण त्याच्या सावलीमध्ये बसू शकणार नाही. भावार्थ असा आहे की शास्त्रविधिरहित साधना केल्याने सर्वकाही व्यर्थच आहे. त्यातून कोणताही लाभ मिळणार नाही. याचे प्रमाण पवित्र गीता च्या १६ व्या अध्यायातील २३ व २४ व्या श्लोकांमध्येही आहे. या पूर्ण परमात्म्याच्या प्राप्तीसाठी मनमानी साधनेचा त्याग करून पूर्ण सतगुरुदेवांना समर्पण केल्याने आणि खऱ्या नामाचा (सत्यनामाचा) जप केल्यानेच मोक्ष संभव आहे, नाही तर मृत्यूनंतर नरकमध्ये जावे लागेल.

**(श्री गुरू ग्रंथ साहेब मधील पान क्र. ८४३-८४४)**

**।।बिलावलु महला १।।**मैं मन चाहु घणा साचि विगासी राम। मोही प्रेम पिरे प्रभु अबिनासी राम ।।अविगतो हरि नाथु नाथह तिसै भावै सो थीऐ। किरपालु सदा दइआलु दाता जीआ अंदरि तूं जीए। मैं आधारु तेरा तू खसमु मेरा मै ताणु तकीआ तेरओ। साचि सूचा सदा नानक गुरसबदि झगरु निबेरओ ।।४।।२।।

या अमृतवाणीमध्ये श्री नानक साहेब जी म्हणत आहेत की अविनाशी पूर्ण परमात्मा तर नाथांचेही नाथ आहेत म्हणजेच देवांचेही देव आहेत. (सर्व प्रभुंचे श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी, श्री शिव जी आणि ब्रह्म व परब्रह्म यांचेही नाथ आहेत, स्वामी आहेत.) मी तर खरे नाम (सत्यनाम) हृदयामध्ये सामावून घेतले आहे. हे परमात्मा! सर्व प्राणिमात्रांच्या जीवनाचा आधार देखिल आपणच आहात. मी आपलाच आश्रित आहे. आपणच माझे स्वामी (मालक) आहात. आपणच गुरु रूपामध्ये येऊन सत्यभक्तीचे निर्णायक ज्ञान देऊन सर्व वादविवाद नष्ट केले आहेत आणि सर्व शंकांचे समाधान केले आहे.

**(श्री गुरू ग्रंथ साहेबमधील पान क्र. ७२१, राग तिलंग, महला १)**

यक अर्ज गुफतम् पेश तो दर कून करतार।
हक्का कबीर करीम तू बेअब परवरदिगार।
नानक बुगोयद जन तुरा तेरे चाकरां पाखाक।

**या अमृतवाणीमधून स्पष्ट केलेले आहे की हे (हक्का कबीर) आपण सतकबीर (कून करतार) शब्दशक्तीद्वारे रचना करणारे, शब्दस्वरूपी प्रभु म्हणजेच सर्व सृष्टिचे रचनाकार आहात. आपणच वास्तविक निर्विकार (परवरदिगार), सर्वांचे पालनकर्ता, दयाळू प्रभु आहात. मी आपल्या दासांचाही दास आहे.**

**(श्री गुरू ग्रंथ साहेब मधील पान क्र. २४, राग सीरी महला १)**

तेरा एक नाम तारे संसार, मैं ऐहो आस ऐहो आधार।
नानक नीच कहैं बिचार, धाणक रूप रहा करतार ।।

**या अमृतवाणीमध्ये प्रमाणित केले आहे की जे काशीमध्ये धाणक (विणकर) रूपात आहेत, तेच (करतार) कुळाचे सृजनहार (निर्माता) आहेत. अतिभावूक होऊन श्री नानक साहेब जी म्हणत आहेत की मी सत्य सांगत आहे की धाणक (विणकर) म्हणजेच कबीर जुलाहाच (विणकरच) पूर्ण ब्रह्म (सतपुरुष) आहेत.**

**विशेष :- या प्रमाणांच्या सांकेतिक ज्ञानावरून सृष्टि रचना कशी झाली, हे स्पष्ट होते. आता मात्र पूर्ण परमात्म्याची प्राप्ती केली पाहिजे आणि हे पूर्ण संतांकडून नामोपदेश घेऊनच शक्य आहे.**

## ''अन्य संतांद्वारे सृष्टिरचनेची दंतकथा''

**अन्य संतांनी जे सृष्टि रचनेचे ज्ञान सांगितले आहे ते कसे आहे ते कृपया वाचा. सृष्टि रचनेच्या विषयी राधास्वामी पंथातील संतांचे व धन-धन सतगुरु पंथाच्या संतांचे विचार:-**

**पवित्र पुस्तक जीवनचरित्र परम संत बाबा जयमल सिंहजी महाराज पान नं. १०२ व १०३ वरून 'सृष्टि की रचना' (सावन कृपाल पब्लिकेशन, दिल्ली)**

''पहले सतपुरुष निराकार था, फिर इजहार (आकार) में आया तो ऊपर के तीन निर्मल मण्डल (सतलोक-अलखलोक, अगमलोक) बन गया तथा प्रकाश तथा मंडलों का नाद (धुनि) बन गया।''

**पवित्र पुस्तक सारवचन (नसर) प्रकाश राधास्वामी सत्संग सभा, दयालबाग, आगरा, 'सृष्टि की रचना' पृष्ठ ८१.**

''प्रथम धूंधूकार था। उसमें पुरुष सुन्न समाध में थे। जब कुछ रचना नहीं हुई थी। फिर जब मौज हुई तब शब्द प्रकट हुआ और उससे सब रचना हुई, पहले सतलोक और फिर सतपुरुष की कला ये तीन लोक और सबविस्तार हुआ।''

**हे ज्ञान तर असे आहे की कोणी एक तरुण नोकरीच्या मुलाखतीसाठी (इन्टरव्यू) गेला. त्याला अधिकाऱ्याने विचारले की आपण महाभारत वाचले आहे का? तरुणाने उत्तर दिले की ते तोंडपाठ आहे. अधिकारी म्हणाला की पाच पांडवांची नावे सांग. तरुण म्हणाला की एक भीम होता, एक त्याचा मोठा बंधू (भाऊ) होता, एक त्याचा छोटा भाऊ होता, आणखी एक होता आणि आणखी एकाचे नाव मी विसरलो आहे. या सृष्टिरचनेचे ज्ञान तर असेच आहे.**

सतपुरुष व सतलोकाची महिमा सांगणारे व पाच नावे (ओंकार–ज्योति निरंजन–रंरकार–सोहं–सत्यनाम) प्रदान करणारे व तीन नावे (अकालमूर्ती–सतपुरुष–शब्दस्वरूपी राम) देणाऱ्या संतांनी रचलेल्या पुस्तकांमधील काही निष्कर्ष :–

संतमत प्रकाश भाग ३ पान ७६ वर लिहिलेले आहे की ''सच्चखण्ड किंवा सतनाम चौथा लोक (धाम) आहे'', येथे सतनामाला स्थान असे संबोधलेले आहे. नंतर या पवित्र पुस्तकाच्या पान नं. ७९ वर लिहिलेले आहे की एक राम नावाचा दशरथाचा मुलगा, दुसरा राम मन, तिसरा राम ब्रह्म, चौथा राम सतनाम आणि हाच खरा राम आहे. नंतर पवित्र पुस्तक 'संतमत प्रकाश'च्या पहिल्या भागातील पान नं.१७ वर लिहिलेले आहे की ते सतलोक आहे, त्यालाच सतनाम म्हटले जाते. पवित्र पुस्तक 'सारवचन नसर यानि वार्तिक'च्या पान नं. तीनवर लिहिलेले आहे की आता असे समजले पाहिजे की राधा स्वामी पद सर्वांत वरचे (उंच/श्रेष्ठ) स्थान आहे, ज्याला संतांनी सतलोक आणि सच्चखंड आणि सारशब्द आणि सतशब्द आणि सतनाम आणि सतपुरुष म्हटले जाते. आग्रा येथून प्रकाशित पवित्र पुस्तक सार वचन (नसर) यात वार्तिक पान नं. तीनवर लिहिलेले आहे की आता समजले पाहिजे की राधा स्वामी पद सर्वांत उंच मुक्कामी आहे. त्याला संतांनी सतलोक, सच्चखण्ड आणि सारशब्द, सतशब्द आणि सतनाम आणि सतपुरुष असे सांगून प्रमाणित केले आहे. पवित्र पुस्तक सार वचन (नसर) आग्रा येथून प्रकाशित पान नं. चारवरही हे वर्णन जसेच्या तसे आहे. पवित्र पुस्तक 'सच्चखण्ड की सडक'च्या पान नं. २२६ वर वर्णन आहे की संतांचा देश सच्चखण्ड किंवा सतलोक आहे, त्यालाच सतनाम, सतशब्द, सारशब्द असे म्हटले जाते.''

विशेष :– या व्याख्या अशा वाटतात की जसे कोणी जीवनामध्ये शहर पाहिलेले नाही, मोटार, पेट्रोल, ड्रायव्हरचे ज्ञान नाही की ड्रायव्हर कोणाला म्हणतात आणि ती व्यक्ती अन्य सहकाऱ्यांना सांगत आहे की मी शहरामध्ये जातो, मोटारीमध्ये बसून फिरण्याचा आनंद घेतो. यावर त्याच्या मित्रांनी त्याला विचारले की मोटार कशी होती? पेट्रोल कसे होते आणि ड्रायव्हर कसा होता? शहर कसे होते? यावर त्याने उत्तर दिले की शहर म्हणा नाही तर मोटार म्हणा, सगळ्या गोष्टी एकच. शहर हेच मोटार आहे आणि पेट्रोल देखिल मोटारच म्हणतात. ड्रायव्हर देखिल मोटारीलाच म्हणतात. रस्त्याला देखिल मोटारच म्हणतात.

आता विचार करा– सतपुरुष तर पूर्ण परमात्मा आहेत. सतनाम हे दोन मंत्रांचे नाव आहे, ज्यामध्ये एक ॐ+तत् सांकेतिक आहे आणि त्यानंतर सारनाम साधकाला पूर्ण गुरूंकडून दिले जाते. हे सतनाम आणि सारनाम दोन्ही स्मरण करण्याची (जपाची) नावे आहेत. सतलोक हे असे स्थान आहे, जेथे सतपुरुष वास्तव्य करतात. पुण्यात्मांनो, आता तुम्ही स्वत:च नर्णय करा की यातील सत्य काय आणि असत्य काय आहे?

# कोण व कसा आहे विश्वाचा स्वामी?

ज्या-ज्या पुण्यात्म्यांनी परमात्म्यास प्राप्त केलेले आहे, त्यांनी सांगितले आहे की 'कूळ (विश्वाचा) स्वामी (अधिपती) एकच आहे. तो मनुष्यसदृश आणि तेजोमय शरीरयुक्त आहे. ज्यांच्या एका रोम कूपाचा (रंध्राचा) प्रकाश कोटी सूर्य आणि कोटी चंद्र यांच्या प्रकाशापेक्षाही अधिक आहे. त्यांनीच नाना रूपे बनविली आहेत. आपापल्या भाषांमध्ये परमेश्वराचे वास्तविक नाव कविर्देव (वेदांतील संस्कृत भाषेमध्ये), हक्का कबीर (श्री गुरुग्रंथसाहेबमध्ये पान नं. ७२१ वर क्षेत्रीय/स्थानिक भाषेमध्ये), सत कबीर (श्री धर्मदासजीच्या वाणीमध्ये क्षेत्रीय भाषेमध्ये), बंदी छोड कबीर (संत गरीब दास जींच्या सद्ग्रंथामध्ये स्थानिक भाषेमध्ये), कबीरा, कबीरन व खबीरा किंवा खबीरन (श्री कुर्आन शरीफ सूरत फुर्कानि नं. २५, आयत नं.१९, २१, ५२, ५८, ५९ मध्ये क्षेत्रीय अरबी भाषेमध्ये) आहे. याच पूर्ण परमात्म्याची उपमात्मक नावे अनामीपुरुष, अगमपुरुष, अलखपुरुष, सतपुरुष, अकालमूर्ती, शब्दस्वरूपी राम, पूर्ण ब्रह्म, परम अक्षर पुरुष आदी आहेत. जसे देशाच्या प्रधानमंत्र्यांचे खरे नाव काही वेगळे असते. पण उपमात्मक नाव (पदाचे नाव) प्रधानमंत्रीजी असे वेगळे असते. भारताचे प्रधानमंत्री आपल्याजवळ गृह विभाग देखिल घेतात. जेव्हा ते त्या विभागाच्या दस्तऐवजांवर स्वाक्षरी करतात, तेव्हा ते गृहमंत्र्याची भूमिका करत असतात आणि आपले पदही गृहमंत्री असेच लिहितात. पण त्यांचे हस्ताक्षर तेच असते. अशाप्रकारे ईश्वरीय सत्तेला समजले पाहिजे.

ज्या संत व ऋषिंना परमात्म्याची प्राप्ती झालेली नाही, त्यांनी आपला अंतिम अनुभव सांगितला आहे की प्रभुचा केवळ प्रकाश दिसू शकतो. प्रभु दिसत नाही. कारण त्याला कोणताही विशिष्ट असा आकार नाही. तसेच शरीरामध्ये धून (आवाज) ऐकणे आदी अनुभव प्रभुशक्तीबाबत आहेत.

आता विचार करा :- एक अंध दुसऱ्या अंधांना आपण डोळस आहे, असे दाखवण्यासाठी रात्री चंद्राचा प्रकाश अत्यंत सुखदायक व मनमोहक असतो. तो प्रकाश मी दररोज पाहतो, असे सांगू लागला. यावर अन्य अंध शिष्यांनी विचारले की गुरुजी, चंद्र कसा असतो? तो चतुर अंध म्हणाला की चंद्र तर निराकार आहे. तो थोडाच दृष्टिगोचर होईल. कोणी म्हणतात की सूर्य निराकार आहे. तो दिसू शकत नाही. सूर्य स्वयंप्रकाशित आहे. त्यामुळे त्याचा केवळ प्रकाशच दिसतो. गुरुजींच्या सांगण्यानुसार शिष्य सकाळी अडीच तास आणि संध्याकाळी अडीच तास आकाशामध्ये पाहतात. परंतु त्यांना काहीच दिसत नाही. ते स्वतःच विचारविनिमय करतात की गुरुजी सत्य सांगत आहेत. पण आपली साधनाच सकाळी आणि संध्याकाळी अडीच तास पूर्ण होत नाही. त्यामुळेच आपल्याला सूर्य आणि चंद्र यांचा प्रकाश दिसत नाही. येथे त्या चतुर अंधाच्या (ज्ञानहीन) व्याख्येवर विश्वास ठेवून करोडो अंध ज्ञानहीन झालेले आहेत. आता सूर्य आकार स्वरूपात आहे आणि त्यापासूनच प्रकाश निघत आहे, तसेच चंद्रापासूनही प्रकाश निघत आहे. चंद्राशिवाय रात्री प्रकाश कसा पडेल, हे त्यांना एखाद्या डोळस तत्त्वदर्शी संतांनी सांगण्याची आवश्यकता आहे. एखाद्याने मी ट्यूबलाईट बघितली आहे, असे सांगितले आणि दुसऱ्याने त्याला ज्या ट्यूबचा प्रकाश तू पाहिलास ती ट्यूब कशी असते, असे विचारल्यावर पहिल्याने उत्तर दिले की ट्यूब तर निराकार असते, त्यामुळे ती दिसू शकत नाही. केवळ तिचा प्रकाश दिसू शकतो. येथे विचार करा, ट्यूब असल्याशिवाय प्रकाश कसा दिसेल?

जर कोणी एखादा म्हणाला की हिरा स्वयंप्रकाशित असतो आणि हिऱ्याचा केवळ प्रकाश

दिसू शकतो. कारण हिरा निराकार आहे. यावरून हे थोडेच दिसून येणार आहे की ती व्यक्ती हिरा ओळखू शकत नाही, तो व्यर्थच रत्नपारखी बनला आहे. जे परमात्म्यास निराकार म्हणतात आणि केवळ प्रकाश पाहून व धून (अंतर्नाद) ऐकूनच प्रभुप्राप्ती झाली असे मानतात, ते पूर्णपणे प्रभु आणि भक्तीपासून अपरिचित आहेत. तुम्ही काहीही पाहिले नाही, आपल्या शिष्यांना भ्रमित करून तुम्ही दोषी होत आहात, तुमच्या गुरुदेवांना तत्त्वज्ञानरूपी नेत्र नाहीत आणि तुम्हालाही. त्यामुळे तुम्ही जगताला भ्रमित करू नका, अशी जेव्हा त्यांना प्रार्थना केली, तेव्हा या गोष्टीवर सर्व ज्ञानरूपी नेत्रांधांनी प्रखर विरोध केला आणि म्हणू लागले की आम्ही सर्व खोटे आणि तू एकटाच खरा. आज अगदी हीच स्थिती संत रामपालजी महाराजांबाबत आहे.

कोणत्या संतांचा विचार योग्य (सत्य) आहे आणि कोणाचा अयोग्य (असत्य) आहे, या वादाचा निर्णय कसा होईल? समजा, एखाद्या अपराधाविषयी पाच वकील आपापले विचार व्यक्त करत आहेत. पहिला म्हणतो की या अपराधाला संविधान कलम ३०१ लागू होईल. दुसरा म्हणतो ३०२, तिसरा म्हणतो ३०४, चौथ्याचे मत आहे की ३०६ आणि पाचवा वकील म्हणतो की ३०७ कलमच योग्य आहे.

यातील चार वकिलांचे मत योग्य होऊ शकत नाही. ज्याची व्याख्या आपल्या देशाच्या संविधानाशी मिळते, केवळ त्या एकट्याचेच मत योग्य होऊ शकेल. पण जर त्याचीही व्याख्या संविधानाशी विपरीत असेल, तर ते पाचही वकील अयोग्य आहेत. याचा निर्णय जे सर्वांना मान्य असते, ते देशाचे संविधानच करेल. अशाप्रकारे भिन्न भिन्न विचारधारांमध्ये, साधनांमध्ये कोणते विचार शास्त्रानुकूल आहेत आणि कोणते शास्त्राविरुद्ध, याचा निर्णय सर्वांना मान्य असे पवित्र सद्ग्रंथच करतील. (याचे प्रमाण पवित्र श्रीमद् भगवत गीता च्या सोळाव्या अध्यायातील २३ व २४ व्या श्लोकांमध्ये आहे.)

ज्या डोळसांनी (पूर्ण संतांनी) सुर्य (पूर्ण परमात्मा) पाहिला त्यांपैकी काहींची नावे खालीलप्रमाणे आहेत :-

(क) आदरणीय धर्मदास साहेब जी (ख) आदरणीय दादू साहेब जी (ग) आदरणीय मलूक दास साहेब जी (घ) आदरणीय गरीब दास साहेब जी (ड) आदरणीय नानक साहेब जी (च) आदरणीय घीसा दास साहेब जी इत्यादी.

(क) आदरणीय धर्मदास साहेब जी, बांधवगढ मध्य प्रदेश येथील धर्मदास साहेब जी यांना पूर्ण परमात्मा जिवंत महात्म्याच्या रूपामध्ये मथुरेत भेटले आणि त्यांना सतलोकाचे दर्शन घडविले. तेथे सतलोकी दोन रूपे दाखवून जिंदा रूपामध्ये आलेले महात्मा पूर्ण परमात्म्याच्या सिंहासनावर विराजमान झाले आणि आदरणीय धर्मदास साहेबजींना म्हणाले की मीच काशीमध्ये (बनारस) नीरू-नीमाच्या घरी आलेलो आहे. आदरणीय श्री रामानंदजी माझे गुरू आहेत. एवढे सांगितल्यावर श्री धर्मदासजींचा आत्मा परत त्यांच्या शरीरामध्ये पाठवून दिला. श्री धर्मदासजींचे शरीर दोन दिवस बेशुद्धावस्थेत होते. तिसऱ्या दिवशी जेव्हा ते शुद्धीवर आले, त्यावेळी लगेच त्यांनी काशीमध्ये शोध घेतला असता, त्यांना समजले की काशीमध्ये आलेले विणकरच पूर्ण परमात्मा (सतपुरुष) आहेत. आदरणीय धर्मदास साहेबजींनी 'पवीत्र कबीर सागर', 'कबीर साखी', 'कबीर बीजक' हे सद्ग्रंथ प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिले आणि पूर्ण परमात्म्यांच्या पवित्र मुखकमलातून निघालेल्या अमृतवचनरूपी विवरणाद्वारे रचना केली. त्याचे अमृतवाणीमधील प्रमाण :-

आज मोहे दर्शन दियो जी कबीर ।।टेक।।

सत्यलोक से चलकर आए, काटन जम की जंजीर ।।१।।
थारे दर्शन से म्हारे पाप कटत हैं, निर्मल होवै जी शरीर ।।२।।
अमृत भोजन म्हारे सतगुरु, जीमैं, शब्द दूध की खीर ।।३।।
हिन्दु के तुम देव कहाये, मुस्लमान के पीर ।।४।।
दोनों दीन का झगड़ा छिड़ गया, टोहे ना पाये शरीर ।।५।।
धर्मदास की अर्ज गोसांई, बेड़ा लंघाईयो परले तीर ।।६।।

**(ख) आदरणीय दादू साहेब जी (अमृतवाणीमध्ये प्रमाण) कबीर परमेश्वरांचे साक्षी – आदरणीय दादू साहेब जी जेव्हा सात वर्षांचे होते, तेव्हा पूर्ण परमात्मा त्यांना जिंदा महात्म्याच्या रूपात भेटले आणि सत्यलोकी घेऊन गेले. तीन दिवस दादूजी बेशुद्ध होते. शुद्धीवर आल्यानंतर त्यांनी अमृतवाणी उच्चारली :–**

जिन मोकुं निज नाम दिया, सोई सतगुरू हमार । दादू दूसरा कोई नहीं कबीर सृजन हार ।।
दादू नाम कबीर की, जै कोई लेवे ओट। उनको कबहू लागे नहीं, काल वज्र की चोट ।।
दादू नाम कबीर का, सुनकर कांपे काल। नाम भरोसे जो नर चले, होवे न बंका बाल।।
जो जो शरण कबीर के, तरगए अनन्त अपार। दादू गुण कीता कहे, कहत न आवै पार।।
कबीर कर्ता आप है, दूजा नाहिं कोय। दादू पूरन जगत को, भक्ति दृढावत सोय ।।
ठेका पूरन होय जब, सब कोई तजै शरीर। दादू काल गँजे नहीं, जपै जो नाम कबीर।।
आदमी की आयु घटै, तब यम घेरे आय। सुमिरन किया कबीर का, दादू लिया बचाय।
मेटि दिया अपराध सब, आय मिले छनमाँह। दादू संग ले चले, कबीर चरण की छांह ।।
सेवक देव निज चरण का, दादू अपना जान। भृंगी सत्य कबीर ने, कीन्हा आप समान।
दादू अन्तरगत सदा, छिन–छिन सुमिरन ध्यान। वारू नाम कबीर पर, पल–पल मेरा प्रान ।।
सुन–२ साखी कबीर की, काल नवावै भाथ।धन्य–धन्य हो तिन लोक में, दादू जोंड़े हाथ ।।
केहरि नाम कबीर का, विषम काल गज राज। दादू भजन प्रतापते, भागे सुनत आवाज।।
पल एक नाम कबीर का, दादू मनचित लाय । हस्ती के अश्वार को, श्वान काल नहीं खाय।।
सुमरत नाम कबीर का, कटे काल की पीर। दादू दिन दिन ऊँचे, परमानन्द सुख सीर।।
दादू नाम कबीर की, जो कोई लेवे ओट। तिनको कबहुं ना लगई, काल बज्र की चोट।।
और संत सब कूप हैं, केते झरिता नीर। दादू अगम अपार है, दरिया सत्य कबीर।।
अबही तेरी सब मिटै, जन्म मरन की पीर। स्वांस उस्वांस सुमिरले, दादू नाम कबीर।।
कोई सर्गुन में रीझ रहा, कोई निर्गुण ठहराय। दादू गति कबीर की, मोते कही न जाय।।
जिन मोकु निज नाम दिया, सोई सदगुरू हमार। दादू कौन नही दूसरा, कबीर सिरजन हार ।।

**(ग) कविर्देवांचे साक्षी आदरणीय मलूक दास साहेब जी :–**

**४२ वर्षीय श्री मलूक दासजींना पूर्ण परमात्मा भेटले, त्यावेळी दोन दिवस ते अचेत (बेशुद्ध) राहिले. शुद्धीवर आल्यानंतर त्यांनी खालील वाणीचे उच्चारण केले–**

जपो रे मन सतगुरु नाम कबीर ।।टेक।।जपो रे मन परमेश्वर नाम कबीर ।
एक समय गुरु बंसी बजाई कालंद्री के तीर। सुर–नर मुनि थक गए, रुक गया दरिया नीर।।
काँशी तज गुरु मगहर आये, दोनों दीन के पीर।।कोई गाढ़े कोई अग्नि जरावै, ढूंडा न पाया शरीर।
चार दाग से सतगुरू न्यारा, अजरो अमर शरीर। दास मलूक सलूक कहत हैं, खोजो खसम कबीर।।

**(घ) प्रभु कबीर (कविर्देव) यांचे साक्षी छुडानी, जिल्हा झज्जर, हरियाना येथील आदरणीय गरीब दास साहेब जी (अमृतवाणीमध्ये प्रमाण) :–**

आदरणीय गरीब दाससाहेब जी यांचा जन्म १७१७ मध्ये झाला. त्यांना वयाच्या दहाव्या वर्षी १७२७ मध्ये 'नला' नावाच्या शेतामध्ये कबीर साहेबजींचे दर्शन झाले आणि सतलोकवास १७७८ मध्ये झाला. आदरणीय गरीब दास साहेबजींनाही परमात्मा 'कबीर साहेब जी' सशरीर जिंदा रूपामध्ये भेटले. आदरणीय गरीब दास साहेब जी आपल्या नला नावाच्या शेतामध्ये आपल्या सवंगड्यांबरोबर गाई चारत होते. हे शेत कबलाना गावाच्या सीमेलगत आहे. सर्व गवळ्यांनी भोजनाचा आग्रह केल्यावर परमात्म्यांनी सांगितले की मी आपल्या सतलोक गावातून भोजन करून आलेलो आहे. त्यावेळी सर्व गवळ्यांनी जीवित महात्मा रूपात प्रगट झालेल्या कबीर परमेश्वरांना आग्रह केला की आपण भोजन करणार नसाल, तर दुग्धपानाची आमची विनंती मान्य करा. यावर परमेश्वर कबीर साहेब म्हणाले की मी कुमारी गाईचेच दूध प्राशन करतो. बालक गरीब दास जींनी एक कुमारी (न धुपती) गाय परमेश्वर कबीरजींच्या जवळ आणली आणि आश्चर्याने विचारले की बाबाजी, ही कधीही न व्यायलेली/न धुपती (कुमारी) गाय दूध कसे काय दूध देऊ शकेल? तेव्हा कविर्देवांनी (कबीर परमेश्वर) कुमारी गाईच्या पाठीवर (वात्सल्याने) हात ठेवला आणि कुमारी गाईच्या (अधन्या धेनू) आंचळांमधून आपोआप दूध निघू लागले. चरवी भरल्यानंतर दूध यायचे थांबले. ते दूध परमेश्वर कबीरजींनी प्राशन केले. त्यातील थोडे दूध प्रसादरूपाने गरीब दास जींना पाजले आणि सतलोकीचे दर्शन करविले. सतलोकामध्ये आपली दोन रूपे दाखवून ते जिंदावाल्या रूपामध्ये कूळ (विश्वाचा) स्वामी स्वरूपामध्ये सिंहासनावर विराजमान झाले आणि म्हणाले की मीच १२० वर्षे काशीमध्ये धाणक (विणकर) रूपामध्ये राहून आलो आहे. पुढे ते म्हणाले की मी पूर्वी देखिल हजरत मुहम्मदजींना भेटलो होतो. पवित्र कुर्आन शरीफमध्ये जे कबीरा, कबीरन, खबीरा, खबीरन, अल्लाहू अकबर आदी शब्द आहेत ते माझाच बोध करतात. श्री नानक जींना बेई नदीवर जिंदा महात्म्याच्या रूपात मीच भेटलो होतो. (मुस्लिमांमध्ये जिंदा महात्मा असतात. ते काला चौगा (वरील कोटासारखा) गुडघ्यापर्यंत आणि डोक्यावर उंच काला टोप (टोपी) परिधान करतात.) श्री अब्राहिम सुलतान अधमजी आणि श्री दादूजींनाही मीच भेटलो होतो आणि चारी पवित्र वेदांमध्ये जे 'कविर् अग्नि', 'कविर्देव' (कविरंघारिः) आदी नावे आहेत, ती माझीच नावे आहेत. 'कबीर, बेद हमारा भेद है, मैं मिलु बेदों से नाही। जौन बेद से मैं मिलू, वो बेद जानते नाही।' वेदापूर्वीही सतलोकामध्ये मीच विराजमान होतो.

(छुडानी गावामध्ये (जिल्हा झज्जर, हरियाना) आजही जंगलामध्ये जेथे संत गरीब दास जींना मानव शरीरामध्ये पूर्ण परमात्म्याचा साक्षात्कार झाला होता, तेथे एक आठवण आजही आहे.) आदरणीय गरीब दास जींचा आत्मा परमात्मा कबीर, बंदी छोड यांच्यासोबत गेल्यानंतर त्यांना मृत समजून चितेवर ठेवून दहन देण्याची तयारी चालली होती. त्याच वेळी आदरणीय गरीब दास साहेबजींचा आत्मा पूर्ण परमेश्वरांनी त्यांच्या शरीरामध्ये प्रविष्ट केला आणि दहा वर्षीय बालक गरीब दास जिवंत झाले. त्यानंतर त्या पूर्ण परमात्म्याचे प्रत्यक्ष पाहिलेल्या रूपाचे वर्णन आपल्या अमृतवाणीतून 'सद्ग्रंथा'मध्ये केलेले आहे. त्याच अमृतवाणीमधील प्रमाण:

अजब नगर मे ले गया, हमकूं सतगुरु आन। झिलके बिम्ब अगाध गति, सुते चादर तान।।
अनन्त कोटि ब्रह्मंड का एक रति नहीं भार। सतगुरु पुरुष कबीर है कुल के सृजनहार।।
गैबी ख्याल विशाल सतगुरु, अचल दिगम्बर थीर है। भक्ति हेत काया धर आये, अविगत सत कबीर हैं।
हरदम खोज हनोज हाजर, त्रिवैणी के तीर हैं। दास गरीब तबीब सतगुरु, बन्दी छोड कबीर हैं।।
हम सुल्तानी नानक तारें, दादू कूं उपदेश दिया। जात जुलाहा भेद नहीं पाया, काशी माहे कबीर हुआ।।
सब पदवी के मूल हैं, सकल सिद्धि हैं तीर। दास गरीब सतपुरुष भजो, अविगता कला कबीर।

जिंदा जोगी जगत गुरु, मालिक मुरशद पीर। दहूँ दीन झगडा मंड्या, पाया नहीं शरीर।।
गरीब जिस कूं कहते कबीर जुलाहा। सब गति पूर्ण अगम अगाहा ।।

**या वाणीमधून आदरणीय गरीब दास साहेब जी महाराजांनी स्पष्ट केले आहे की काशीमधील धाणकाने (विणकर/कोष्टी) मलाही नामोपदेश देऊन पार केले. हे काशीचे धाणकच (सतपुरुष) पूर्ण ब्रह्म कविर्देव आहेत.**

**परमेश्वर कबीरच सतलोकातून जिंदा महात्म्याच्या रूपामध्ये येऊन जेथे आनंदच आनंद आहे, कोणतीच चिंता नाही, जन्म-मृत्यू, अन्य प्राण्यांचे शरीर घेऊन होणारे कष्ट आदींचे दुःख नाही अशा अजबनगरामध्ये (अद्‌भूतनगर) मला घेऊन गेले.**

**या काशीमध्ये धाणक रूपामध्ये आलेल्या याच सतपुरुषांनी भिन्न भिन्न समयी प्रगट होऊन आदरणीय श्री अब्राहम सुल्तान अधमसाहेब जी, आदरणीय दादूसाहेब जी व आदरणीय नानक साहेब जींनाही सतनाम देऊन पार (मुक्त) केले. तेच कविर्देव ज्यांच्या एक रोम कूपामध्ये कोटी सूर्यांसारखा प्रकाश आहे, जे मानवसदृश आहेत, त्या परमेश्वराचा वास्तविक स्वरूपाचा प्रकाश आपल्या सामान्य चर्मदृष्टीला सहन होऊ शकत नाही म्हणून अतितेजोमय आपल्या वास्तविक शरीरावर कमी तेजःपुंजाचा चोला/वस्त्र (भद्रावस्त्रा म्हणजेच तेजःपुंजाचे शरीर) धारण करून आपणाला मृत्युलोकी भेटतात.**

**आदरणीय गरीब दास साहेब जींनी आपल्या अमृतवाणीमध्ये म्हटले आहे की** 'सर्व कला सतगुरु साहेब कि, हरि आए हरियाणे नुँ।' **भावार्थ आहे कि पूर्ण परमात्मा कविर हरी (कविर्देव) ज्या क्षेत्रामध्ये आले, त्याचे नाव हरियाना आहे. परमात्म्याचे येण्याचे पवित्र स्थळ यावरून आसपासच्या क्षेत्राला हरि+आना (हरियाना) म्हटले गेले. १९६६ मध्ये पंजाब प्रांताचे विभाजन झाल्यानंतर या क्षेत्राचे नाव हरिआणा (हरियाना) असे पडले. सुमारे २३६ वर्षांपूर्वी सांगितलेली वेळ आल्यावर हे क्षेत्र 'हरयाणा' प्रांत या नावाने विख्यात होईल ही वाणी १९६६ मध्ये सिद्ध झाली. याचे प्रत्यक्ष प्रमाण आज आपल्यासमोर आहे.**

**यामुळेच 'गुरु ग्रंथ साहेब'मधील पान नं. ७२१ वर आपली अमृतवाणी महला १ मध्ये श्री नानक जींनी म्हटले आहे की :-**

''हक्का कबीर करीम तू, बेएब परवरदीगार। नानक बुगोयद जनु तुरा, तेरे चाकरां पाखाक।''

**प्रमाण गुरु ग्रंथ साहेब राग 'सिरी' महला १ पा नं.२४ वर शब्द २९ मध्ये आहे की:-**

शब्द :- एक सुआन दुई सुआनी नाल, भलके भौंकही सदा बिआल
कुड़ छुरा मुठा मुरदार, धाणक रूप रहा करतार ।।१।।
मै पति की पंदि न करनी की कार। उह बिगड़ै रूप रहा बिकराल ।।
तेरा एक नाम तारे संसार, मैं ऐहो आस एहो आधार ।
मुख निंदा आखा दिन रात, पर घर जोही नीच मनाति ।।
काम क्रोध तन वसह चंडाल, धाणक रूप रहा करतार ।।२।।
फाही सुरत मलूकी वेस, उह ठगवाडा ठगी देस ।।
खरा सिआणां बहुता भार, धाणक रूप रहा करतार ।।३।।
मैं कीता न जाता हरामखोर, उह किआ मुह देसा दुष्ट चोर।
नानक नीच कह बिचार, धाणक रूप रहा करतार ।।४।।

**गुरुग्रंथसाहेब, राग आसावरी, महला १ चा काही अंश :-**

साहिब मेरा एको है। एको है भाई एको है।

आपे रूप करे बहु भांती नानक बपुडा एव कह।।(पृ.३५०)
जो तिन कीआ सो सचु थीआ, अमृत नाम सतगुरू दीआ।।(पृ. ३५२)
गुरू पुरे ते गति मति पाई। (पृ. ३५३) बूडत जगु देखिआ तउ डरि भागे।
सतिगुरु राखे से बड़ भागे, नानक गुरू की चरणों लागे।।(पृ. ४१४)
मैं गुरु पूछिआ अपणा साचा बिचारी राम । (पृ. ४३९)

**या अमृतवाणीमधून श्री नानक साहेब जी स्वत: साहिब (प्रभु) एकच आहे आणि माझ्या गुरुजींनी मला उपदेश नाम मंत्र दिला, तेच नाना रूपे धारण करत आहेत, अर्थात तेच सतपुरुष आहेत, तेच जिंदा रूप धारण करतात, तेच धाणक (विणकर) रूपामध्येही विराजमान होऊन सर्वसामान्य व्यक्ती म्हणजेच भक्त भक्ताची भूमिका करत आहेत, शास्त्राविरुद्ध पूजा करून सर्व जगतास जन्म-मृत्यू व कर्मफळाच्या अग्नीमध्ये जळताना पाहून, जीवन व्यर्थ होण्याच्या भीतीने मी आपल्या गुरुजींच्या चरणी आलो आहे याचा स्वीकार करत आहेत.**

बलिहारी गुरु आपणे दिउहाड़ी सदवार। जिन माणस ते देवते कीए करत न लागी वार।
आपीनै आप साजिओ आपीनै रचिओ नाउ। दुयी कुदरति साजीऐ करि आसणु डिठो चाउ।
दाता करता आपि तूं तुसि देवहि करहि पसाउ।
तूं जाणोइ सभसै दे लैसहि जिंद कवाउ करि आसणु डिठो चाउ। (पृ.४६३)

**भावार्थ आहे कि पूर्ण परमात्मा जिंदा महात्म्याचे रूप धारण करून बेई नदीवर आले. अर्थात, ते जिंदा संबोधले गेले. तसेच स्वतः दोन जगतांची (सतलोक आदी) आणि खाली (ब्रह्म व परब्रह्मचे लोक) रचना करून त्यांच्यावरील सत्यलोकामध्ये आकार स्वरूपात आसनावर विराजमान होऊन कुतुहलाने (आनंदाने) आपण रचलेल्या या सृष्टिकडे पाहत आहेत. ते स्वयंभू आहेत म्हणजेच मातेच्या गर्भातून जन्म न घेता स्वतः प्रगट होतात. याचे प्रमाण पवित्र यजुर्वेदाच्या ४० व्या अध्यायातील ८ व्या मंडलात आहे की 'कविर् मनीषि स्वयम्भू: परिभू व्यवधाता'. याचा भावार्थ असा आहे की कविर परमात्मा सर्वज्ञ आहेत. (मनीषी याचा अर्थ सर्वज्ञ असा होतो.) तसेच ते स्वत: प्रगट होतात. तेच सतनाम (परिभु) म्हणजेच सर्वप्रथम प्रभु आहेत. तेच सर्व ब्रह्माण्डाचे (व्यवधाता) म्हणजेच भिन्न-भिन्न सर्व धामांचे रचनहार आहेत.**

एहू जीउ बहुते जनम भरमिआ, ता सतिगुरु शबद सुणाइया।।(पृ. ४६५)

**भावार्थ आहे कि श्री नानक साहेब जी म्हणत आहेत की माझा हा जीव (आत्मा) दीर्घकाळापासून जन्म आणि मृत्यूच्या फेऱ्यामध्ये अडकलेला आहे. आता पूर्ण सद् गुरूंनी वास्तविक नाम प्रदान केलेले आहे.**

श्री नानक जींचे सतयुगामध्ये राजा अंबरीश, त्रेतायुगामध्ये राजा जनक असे पूर्वजन्म झालेले होते त्यानंतर नानक जींचा जन्म झाला. अन्य योन्यांतील जन्मांची तर गणतीच नाही.

## ''प्रभु कबीरजींनी स्वामी रामानंदजींना तत्त्वज्ञान समजाविले''

पंडित स्वामी रामानंदजी एक विद्वान पुरुष होते. वेद व गीता चे मर्मज्ञ त्यांना ज्ञान होते, असे मानले जात होते.

## ''पाच वर्षांच्या आयुष्यात रामानंदजींना गुरू म्हणून धारण करणे''

ज्यावेळी कबीर परमेश्वर (कविर्देव) आपल्या लीलामय देहामध्ये पाच वर्षांचे झाले, तेव्हा त्यांनी गुरुमर्यादेत राहण्यासाठी लीला केली. अडीच वर्षांच्या बालकाचे रूप धारण करून पहाटे-पहाटे अंधारामध्ये जेथून स्वामी रामानंदजी दररोज स्नानासाठी जात असत, तेथे पंचगंगा घाटाच्या एका पायरीवर झोपले. त्यावेळी श्री रामानंदजी पवित्र चारही वेदांचे ज्ञाता आणि

पवित्र गीता चे विद्वान मानले जात होते. त्यावेळी स्वामी रामानंदजी १०४ वर्षांचे होते. काशीमध्ये दुसऱ्या पंडितांनी जी पाखण्ड पूजा चालविलेली होती, ती त्यांनी बंद केली होती. रामानंदजी शास्त्रानुकूल साधना सांगत होते आणि पूर्ण काशीमध्ये त्यांचे स्वत:चे ५२ दरबार लागत होते. रामानंदजी पवित्र गीता जी व पवित्र वेदांच्या आधारावर विधिवत साधना सांगत होते. ते 'ओऽम' नामजपाचा उपदेश देत असत.

त्या दिवशीही ते जेव्हा स्नानासाठी पंचगंगा घाटावर गेले, तेव्हा कबीर साहेब पायरीवर झोपले होते. पहाटे ब्रह्ममुहूर्ताच्या अंधारामध्ये स्वामी रामानंदजींना कबीर साहेब दिसले नाहीत. कबीर साहेबजींच्या डोक्याला रामानंदजींच्या पायातील खडावा लागल्या. कविर्देवांनी जसे लहान मूल रडते, तसे रडण्यास सुरवात केली. रामानंदजी लगबगीने खाली वाकले आणि बालकाला कोठे जखम झाली नाही ना, हे पाहण्यासाठी त्यांनी त्याला प्रेमाने उचलून घेतले. त्यावेळी रामानंदजींच्या गळ्यातील माळ निघून परमेश्वर कविर्देवांच्या गळ्यामध्ये पडली. रामानंदजी म्हणाले की हे बाळा, राम-राम बोल. रामाच्या नावाने दु:ख दूर होते. बाळा, राम-राम म्हण, असे म्हणत त्यांनी कबीर साहेबांच्या डोक्यावर हात ठेवला. शिशू रूपातील कबीर साहेब जी शांत झाले. स्नान करताना रामानंदजींनी विचार केला की या बालकाला आश्रमामध्ये घेऊन जावे आणि ज्यांचे ते असेल त्यांच्याजवळ पाठवून द्यावे. स्नान करून आल्यावर रामानंदजींनी पाहिले तर तेथे बालक नव्हते. तेथून कबीर साहेब जी अंतर्धान पावून आपल्या झोपडीमध्ये आले होते. चालत कोठे तरी गेले असेल. त्यास कोठे शोधायचे? असे रामानंदजींना वाटले.

### ''कबीर प्रभुद्वारा स्वामी रामानंदजींच्या आश्राममध्ये दोन रूपे धारण करणे''

एके दिवशी स्वामी रामानंदजींचा कोणी एक शिष्य, एके ठिकाणी सत्संग करीत होता. कबीर साहेब जी तेथे गेले. तो शिष्य (ऋषि जी) श्री विष्णुपुराणाची कथा ऐकवत होता. ते म्हणत होते की भगवान विष्णु जी सर्व सृष्टिचे रचनाहार आहेत, तेच पालनकर्ता आहेत, तेच राम आणि कृष्ण रूपामध्ये अवतार घेणारी परमशक्ती आहे. ते अजन्मा आहेत, श्री विष्णु जींचे कोणी माता- पिता नाहीत. कविरश्वरांनी (कबीर) ही सर्व चर्चा ऐकली. सत्संग संपल्यानंतर कबीर परमेश्वर म्हणाले की ऋषि जी, मी एक प्रश्न विचारू शकतो काय? ऋषि जी म्हणाले की बाळ, तुला काय विचारायचे असेल ते विचार. तेथे शेकडो भक्तजन उपस्थित होते. कविर्देव म्हणाले की आपण विष्णुपुराणामधून सत्संग सांगत होता की श्री विष्णु जी परमशक्ती आहेत आणि त्यांच्यापासून ब्रह्मा व शिव यांची उत्पत्ती झालेली आहे, हे सांगत होता? ऋषि जी म्हणाले की मी जे सांगत आहे ते विष्णुपुराणामध्ये तसेच लिहिलेले आहे. कबीर साहेब जी म्हणाले की ऋषि जी, मी तर आपणास संशय निवारणासाठी प्रार्थना केली आहे. कृपया आपण प्रक्षुब्ध होऊ नका. एक दिवस मी शिवपुराण ऐकले होते. त्यामध्ये ते महापुरुष ऐकवत होते की भगवान शिवांपासून विष्णु आणि ब्रह्मा यांची उत्पत्ती झालेली आहे. (प्रमाण- गीता प्रेस, गोरखपूर येथून प्रकाशित पवित्र शिवपुराण, रुद्रसंहितामधील सहावा व सातवा अध्याय) तसेच देवी भागवताच्या तिसऱ्या स्कंदामध्ये लिहिले आहे की देवी हीच तिन्ही देवांची (ब्रह्मा-विष्णु-शिव) माता आहे. हे तिघेही नाशवान आहेत, अविनाशी नाहीत. ऋषि जी निरुत्तर झाले. क्रोधित होऊन ते म्हणाले की तू कोण आहेस? कोणाचा पुत्र आहेस? कबीर साहेबजींनी काही सांगण्यापूर्वीच दुसरे भक्तजन म्हणू लागले की हा तर नीरू विणकराचा मुलगा आहे. स्वामी रामानंदजींचा शिष्य म्हणू लागला की तू गळ्यामध्ये कंठी (माळ) कशी काय घातली आहेस? (वैष्णव साधू तुळशीच्या मण्यांची माळ गळ्यामध्ये धारण करतात. यारून असे सिद्ध होते की त्यांनी विष्णु परंपरेनुसार उपदेश घेतलेला आहे.) तुझा गुरुदेव कोण आहे? कबीर साहेब म्हणाले की माझे गुरुदेव तर तेच

आहेत, जे आपले गुरुदेव आहेत. तो ऋषि अत्यंत क्रोधित झाला आणि म्हणाला की अरे मूर्खा, तू नीच कोष्ट्याचा (विणकराचा) पुत्र आहेस आणि माझ्या गुरुदेवांना स्वत:चे गुरुदेव म्हणतोस. माझे गुरुदेव कोण आहेत, हे तुला माहित आहे काय? माझे गुरुदेव आहेत श्री श्री १००८ पंडित रामानंदजी आचार्य आणि तू विणकराचा बालक. ते तर तुझ्या सारख्या नीचांचे दर्शनही करत नाहीत आणि तू म्हणत आहेस की त्यांच्याकडून नामदीक्षा घेतली आहे. भक्तजनहो, बघा हा किती खोटारडा आणि कपटी आहे. मी आताच्या आता गुरुदेवांकडे जातो आणि त्यांना तुझी सर्व हकीकत सांगतो. तू नीच जातीचा बालक आमच्या गुरुदेवांना बेइज्जत करतोस? कविरग्नि म्हणाले की ठीक आहे, गुरुदेवजींना सांगा. त्या ऋषिने जाऊन श्री रामानंदजींना सांगितले की गुरुदेव, एक नीच जातीचा मुलगा आहे. त्याने तर आमचे नाकच कापले आहे. तो म्हणतो की स्वामी रामानंदजी माझे गुरुदेव आहेत. हे भगवान! आम्हाला तर बाहेर तोंड दाखवणे अवघड झाले आहे. स्वामी रामानंदजी म्हटले की उद्या सकाळी त्याला बोलवून घेऊन ये आणि उद्याच बघ, तुझ्यासमोर मी त्याला कसा दंड देतो ते.

## ''स्वामी रामानंदजींच्या मनातील गोष्ट सांगणे''

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा अज्ञानी व्यक्तींनी कबीर साहेबजींना पकडून श्री रामानंदजींसमोर हजर केले. आपण कधी नीच (अधम) जातीच्या व्यक्तीचे दर्शन देखिल करत नाही आणि त्यांनी दीक्षा दिली हे तो खोटे बोलत आहे, हे दाखवून देण्यासाठी स्वामीजींनी समोर पडदा लावला आणि पडद्याआडून म्हणाले की तू कोण आहेस आणि तुझी जात काय आहे? कबीर साहेब जी म्हणाले की :-

रामानंद अधिकार सुनि, जुलहा अक जगदीश। दास गरीब बिलंब ना, ताहि नवावत शीश ।।४०७।।
रामानंद कूं गुरू कहै, तनसै नहीं मिलात। दास गरीब दर्शन भये, पैडे लगी जुं लात ।।४०८।।
पंथ चलत ठोकर लगी, रामनाम कहि दीन। दास गरीब कसर नहीं, सीख लई प्रबीन ।।४०९।।
आडा पडदा लाय करि, रामानंद बूझंत। दास गरीब कुलंग छबि, अधर डाक कूदंत ।।४१०।।
कौन जाति कुल पंथ है, कौन तुम्हारा नाम । दास गरीब अधीन गति, बोलत है बलि जांव ।।४११।।

**उत्तर कबीर साहेबजींचे :-**

जाति हमारी जगतगुरू, परमेश्वर पद पंथ । दास गरीब लिखति परै, नाम निरंजन कंत ।।४१२।।

**रामानंदजीं बोलले :-**

रे बालक सुन दुर्बध्दि, घट मठ तन आकार। दास गरीब दरद लग्या, हो बोले सिरजनहार ।।४१३।।
तुम मोमन के पालवा, जुलहै के घर बास। दास गरीब अज्ञान गति, एता दृढ विश्वास ।।४१४।।
मान बडाई छांडि करि, बोलौ बालक बैंन। दास गरीब अधम मुखी, एता तुम घट फैंन ।।४१५।।
तर्क तलूसै बोतलै, रामानंद सुर ज्ञान। दास गरीब कुजाति है, आखर नीव निदान ।।४२३।।

**परमेश्वर कबीर साहेबजींनी (कविर्देव) प्रेमूर्वक उत्तर दिले :-**

महके बदन खुलास कर, सुनि स्वामी प्रबीन। दास गरीब मनी मरै,मैं आजिज आधीन ।।४२८।।
मैं अविगत गति सैं परै, व्यारि बेद सैं दूर। दास गरीब दशौं दिशा, सकल सिंध भरपूर ।।४२९।।
सकल सिंध भरपूर हूँ, खालिक हमरा नाम। दासगरीब अजाति हूँ, तै जूं कह्या बलि जांव ।।४३०।।
जाति पाति मेरे नहीं, नहीं बस्ती नहीं गाम। दासगरीब अनिन गती नहीं हमारे नाम ।।४३१।।
नाद बिंद मेरे नहीं, नहीं गुंदा नहीं गात। दासगरीब शब्द सजा, नहीं किसी का साथ ।।४३२।।
सब संगी बिछरू नहीं, आदि अंत बहु जांहि। दासगरीब सकल वंसु, बाहर भीतर माँहि ।।४३३।।

ए स्वामी सृष्टा मैं, सृष्टि हमारै तीर। दास गरीब अधर बसूं, अविगत सत्य कबीर ।।४३४।।
पौहमी धरणि आकाश मैं, मैं व्यापक सब ठौर। दास गरीब न दूसरा, हम समतुल नहीं और ।।४३६।।
हम दासन के दास हैं, करता पुरूष करीम। दासगरीब अवधूत हम, हम ब्रह्मचारी सीम ।।४३९।।
सुनि रामानंद राम हम, मैं बावन नरसिंह । दास गरीब कली कली, हमही से कृष्ण अभंग ।।४४०।।
हमही से इंद्र कुबेर है, ब्रह्मा विष्णु महेश । दास गरीब धरम ध्वजा, धरणि रसातल शेष ।।४४७।।
सुनि स्वामी सति भाखहूँ, झूठ न हमरै रिंच। दास गरीब हम रूप बिन, और सकल प्रपंच ।।४५३।।
गोता लाऊँ स्वर्ग सैं, फिरि पैठूं पाताल। गरीबदास ढूंढत फिरूं, हीरे माणिक लाल ।।४७६।।
इस दरिया कंकर बहुत, लाल कहीं कहीं ठाव। गरीबदास माणिक चुगैं, हम मुरजीवा नांव ।।४७७।।
मुरजीवा माणिक चुगैं, कंकर पत्थर डारि। दास गरीब डोरी अगम, उतरो शब्द अधार ।।४७८।।

**जर माझी जात विचारत असाल तर मी जगद्गुरू आहे. (वेदांमध्ये लिहिले आहे की जगद्गुरू सर्व सृष्टिचे ज्ञान प्रदान करणारे कबीर प्रभु आहेत.) माझा पंथ काय आहे? (कोणत्या परमेश्वराचे मार्गदर्शन करतो आहे?) परमेश्वर हाच माझा पंथ आहे. ईश, ईश्वर, परमेश्वर (बह्म, परबह्म, पूर्ण बह्म आणि क्षर पुरुष, अक्षर पुरुष, परम अक्षर पुरुष) या सर्वोच्च शक्ती परमेश्वराचे मार्गदर्शन करण्यासाठी मी आलो आहे, जे अनंत कोटी ब्रह्माण्डांचे रचयिता आणि पालनपोषण करणारे आहेत. वेदांमध्ये ज्यांना कविर्देव, कविरग्नि आदी नावांनी संबोधित आहे.**

**ईश व क्षर पुरुष तर जो केवळ २१ ब्रह्माण्डांचा स्वामी आहे, त्या ब्रह्मला म्हटले जाते. परब्रह्म किंवा अक्षर पुरुष जो सात संख ब्रह्माण्डांचा स्वामी आहे त्याला ईश्वर म्हटले जाते आणि परम अक्षर पुरुषाला जे असंख्य ब्रह्माण्डांचे स्वामी आहेत म्हणजेच कुळाचे (विश्वाचा) मालक (स्वामी) आहेत, त्यांना पूर्ण ब्रह्म किंवा परमेश्वर म्हटले जाते. आणि यासाठीच कबीरजी स्वामी रामानंदजींना म्हणाले की माझा पंथ परमेश्वराच्या प्राप्तीचा आहे.**

**गीता च्या १५ व्या अध्यायातील १७ व्या श्लोकामध्ये लिहिले आहे की वास्तवामध्ये अविनाशी परमेश्वर तर कोणी वेगळाच आहे आणि तेच तिन्ही लोकांमध्ये प्रवेश करून सर्वांचे पालनपोषण करतात. तेच अविनाशी परमात्मा 'परमेश्वर' या नावाने संबोधले जातात. तो 'परमेश्वर' मीच आहे. कबीर प्रभुंचे हे बोल ऐकून स्वामी रामानंदजी अत्यंत प्रक्षुब्ध झाले आणि म्हणाले की अरे मूर्खा, तू नीच (अधम) जातीचा, लहान तोंडी मोठा घास घेऊन तू स्वतःलाच भगवान बनून बसलास. रामानंदजींनी कबीर साहेबजींना अत्यंत घाणेरड्या शिव्याही दिल्या. कबीर साहेब जी म्हणाले की गुरुदेव, आपण माझे गुरुजी आहात. आपण मला शिव्या देत आहात आणि त्यातही मला आनंद वाटत आहे. तथापि, मी जे आपणास सांगत आहे, मी जसा आहे तसा पूर्ण ब्रह्मच आहे, यात कोणताही संशय नाही. हे ऐकून रामानंदजी म्हणाले की थांब, तुझे तर आता हे अति झाले. तू असा मानणार नाहीस. मी आधी माझी नित्यपूजा करून घेतो. रामानंदजींनी शिष्यांना सांगितले की याला बसवून ठेवा. मी आधी माझी पूजाविधी करून घेतो आणि नंतर याला बघून घेतो. स्वामी रामानंदजी काय क्रिया करत होते? भगवान विष्णुजींची एक काल्पनिक मूर्ती निर्माण करत. समोर मूर्ती दिसू लागे. (जसे कर्मकाण्ड करतात, भगवानाच्या मूर्तीचे पूर्वीचे सर्व वस्त्र उतरवून त्या मूर्तीस जलस्नान करवून, नंतर स्वच्छ वस्त्र भगवानास परिधान करतात आणि गळ्यामध्ये माळ घालून, तिलक (टिळा) लावून मुकुट ठेवला जातो.) रामानंदजी मानसपूजा करत होते. कल्पना करून त्यांनी भगवानाची काल्पनिक मूर्ती निर्माण केली आणि श्रद्धेने अनवाणी जाऊन गंगाजल आणले, अशी स्वत:ची भावना बनवली. भगवानाच्या त्या काल्पनिक मूर्तीवरील वस्त्रे उतरली, स्नान घातले आणि नवीन वस्त्रे परिधान केली. मनोमन मूर्तीला तिलक लावला आणि मुकुट परिधान केला. यात ते मूर्तीला माला**

परिधान करायचे तेवढे विसरले. आता माळ चढवली नाही, तर पूजा अपूर्ण राहिली आणि मुकुट एकदा चढवल्यानंतर पुन्हा उतरवला जाऊ शकत नाही. मुकुट उतरवला तर पूजा खंडित होत होती. एवढे जीवन व्यतित झाले माझे, पण कधीही अशी चूक जीवनात झालेली नाही. प्रभु आज काय चूक झाली माझी या पाप्याची? जर मुकुट उतरवला तर पूजा खंडित होते, याबद्दल स्वामी रामानंदजी स्वत:लाच दोष देऊ लागले. मुकुटाच्या वरून माळ चढवून पाहावी, असा त्यांनी विचार केला. (हे सगळे ते कल्पनेने करत आहेत. समोर कोणतीच मूर्ती नाही आणि लावलेल्या पडद्याच्या दुसऱ्या बाजूला कबीर साहेब जी बसलेले आहेत.) मुकुटामध्ये माळ अडकली आणि ती खाली जाईना, तेव्हा आता काय करायचे? भगवान आज माझा सर्व दिवसच व्यर्थ गेला, असा रामानंदजी विचार करू लागले. (कारण जसे एखाद्याचे पैसे चोरीला गेल्यावर त्याला जसा अत्यंत पश्चात्ताप होत असतो, तसे ज्याला परमात्म्याविषयी खरी ओढ असते, त्याचा एक जरी नित्यनियम चुकला अथवा राहिला तर त्याला अत्यंत दु:ख होत असते. अशीच प्रभुच्या खऱ्या भक्तांची ओढ असते.) एवढ्यात कबीर साहेब जी म्हणाले की स्वामीजी, माळेची गाठ सोडा आणि गळ्यामध्ये परिधान करा. त्यानंतर पुन्हा गाठ बांधा. त्यामुळे आपणाला मुकुट उतरावा लागणार नाही. आता रामानंदजी कशाला मुकुट उतरवतात आणि कसली गाठ सोडणार होते? मधला पडदा त्यांनी स्वत:च्या हाताने काढून फेकून दिला आणि उपस्थित सर्व ब्राह्मण समाजासमोर त्या कबीर साहेब परमेश्वरास त्यांनी छातीशी धरले. रामानंदजी सद्गदित होऊन म्हणाले की हे भगवान! आपले शरीर तर इतके कोमल आहे की कापूसच जणू आणि माझे हे शरीर दगडासारखे कठीण आहे. एका बाजूला साक्षात परमात्मा उभे आहेत आणि दुसऱ्या बाजूला जातिधर्माची भिंत! प्रभुप्रेमी पुण्यात्मे धर्माच्या खोट्या भिंती पाडणे श्रेयस्कर समजतात. स्वामी रामानंदजींनीही तेच केले. समोर पूर्ण परमात्म्याला बघून त्यांनी ना जात पाहिली, ना धर्म किंवा अस्पृश्यता. त्यांनी केवळ आत्मकल्याण पाहिले आणि यालाच ब्राह्मण म्हणतात.

बोलत रामानंदजी हम घर बडा सुकाल। गरीबदास पूजा करैं, मुकुट फही जदी माल ।।४७९।।
सेवा करौं संभाल करि, सुनि स्वामी सूर जान। गरीबदास शिर मुकुट धरि माला अटकी जान ।।४८०।।
स्वामी घुंडी खोलि करि, फिरि माला गल डार। गरीबदास इस भजन कू जानत है करतार।।४८१।।
ड्यौढी पडदा दूरि करि, लीया कंठ लगाय।गरीबदास गुजरी बौहत, बदनैं बदन मिलाय ।।४८२।।

स्वामी रामानंदजी म्हणाले के हे प्रभु! आपण खोटे का बोललात? कबीर साहेबांनी विचारले कोणते खोटे स्वामीजी? स्वामी रामानंदजी म्हणाले की आपण म्हणत होता, आपण माझ्याकडून नामोपदेश घेतला आहे. आपण माझ्याकडून कधी उपदेश घेतला? कबीर साहेब म्हणाले, ''एकदा स्नानासाठी आपण पंचगंगा घाटावर गेले होता. मी तेथे झोपलो होतो. आपल्या पायातील खडावा माझ्या डोक्याला लागल्या होत्या. तेव्हा आपण म्हटला होता की 'राम नाम बोला.' रामानंदजी म्हणाले की आता थोडेफार आठवत आहे, परंतु ते तर अत्यंत लहान बालक होते. (त्या काली पाच वर्षांचे बालक फार मोठे होत होते आणि पाच वर्षांच्या बालकाचे शरीर अडीच वर्षांच्या बालकाच्या शरीरापेक्षा दुप्पट होते.) कबीर साहेब म्हणाले की स्वामीजी हे पाहा, त्यावेळी मी असा होतो. स्वामी रामानंदजींसमोर कबीर साहेब उभे देखिल होते आणि एका अडीच वर्षीय बालकाचे दुसरे रूप बनवून कोण्या एका सेवकाच्या तेथे टाकलेल्या खाटेवर कबीर साहेब विराजमान झाले. आता रामानंदजींनी सहा वेळा तिकडे पाहिले आणि सहा वेळा इकडे पाहिले. आपणाला कोणती नजरबंदी तर होत नाही ना, असे समजून त्यांनी डोळे चोळून पाहिले. पण सत्य समोर होते. ते असे पाहत असतानाच कबीर साहेबांचे लहान अडीच वर्षीय

**बालकाचे रूप उठून कबीर साहेबांच्या मोठ्या पाच वर्षीय स्वरूपामध्ये सामावले गेले. आणि तेथे फक्त पाच वर्षीय स्वरूपामध्ये कबीर साहेब राहिले.**

मनकी पूजा तुम लखी, मुकुट माल परवेश। गरीबदास गतिको लखै, कौन वरण क्या भेष।।४८३।।
यह तौ तुम शिक्षा दई, मानि लई मनमोर। गरीबदास कोमल पुरुष, हमारा बदन कठोर ।।४८४।।

**तेव्हा रामानंदजी म्हणाले कि माझ्या मनातील संपूर्ण संशय नाहीसा झाला आहे. हे परमेश्वर, मी आपणास कसे ओळखू शकणार. आपण कोणत्या जातीमध्ये व वेशभूषेमध्ये उभे आहात. आम्ही अज्ञानी प्राणी आपल्याशी वादविवाद करून दोषी झालेलो आहे. हे पूर्ण परमेश्वर कविर्देव, कृपया मला क्षमा करा. मी आपला अज्ञानी बालक आहे.**

## ''स्वामी रामानन्दजीना सत्यलोक दर्शन''

सुनि बच्चा मैं स्वर्ग की कैसैं छांडौं रीती। गरीबदास गुदरी लगी, जनम जात है बीत ।।४८६।।
च्यारि मुक्ति बैकुंठ मैं, जिन की मोरै चाह। गरीबदास घर अगम की, कैसैं पाऊं थाह ।।४८७।।
हेम रूप जहाँ धरणि है, रतन जडे बौह शोभ। गरीबदास बैकुंठ कूं, तन मन हमरा लोभ ।।४८८।।
शंख चक्र गदा पदम हैं, मोहन मदन मुरारि। गरीबदास मुरली बजै, सुरगलोक दरबारि ।।४८९।।
दूधौं की नदियां बगैं, सेत वृक्ष सुभान। गरीबदास मंदल मुक्ति, सुरगापुर अस्थान ।।४९०।।
रतन जडाऊ मनुष्य हैं, गण गंधर्व सब देव। गरीबदास उस धाम की कैसैं छाडूं सेव ।।४९१।।
ऋग युज साम अथर्वणं, गांवै चारौं वेद। गरीबदास घर अगम की, कैसैं जानो भेद ।।४९२।।
च्यारि मुक्ति चितवन लगी, कैसैं बंचूं ताहि। गरीबदास गुप्तारगति, हमकूं द्यौ समझाय ।।४९३।।
सुरग लोक बैकुंठ है, यासैं परै न और। गरीबदास षट्शास्त्र, च्यारि बेदकी दौर ।।४९४।।
च्यारि बेद गावैं तिसैं, सुरनर मुनि मिलाप। गरीबदास ध्रुव पोर जिस, मिटि गये तीनूं ताप ।।४९५।।
प्रहलाद गये तिस लोककूं, सुरगा पुरी समूल। गरीबदास हरि भक्ति की, मैं बचत हूँ धूल ।।४९६।।
बिंद्रावन गये तिस लोककूं, सुरगा पुरी समूल। गरीबदास उस मुक्ति कूं, कैसैं जाऊ भूल ।।४९७।।
नारद ब्रह्मा तिस रटैं, गावैं शेष गणेश। गरीबदास बैकुंठ सैं, और परै को देश ।।४९८।।
सहंस अठासी जिस जपैं, और तेतीसौं सेव। गरीबदास जासैं परै, और कौंन है देव ।।४९९।।
सुनि स्वामी निज मूल गति, कहि समझाऊं तोहि, गरीबदास भगवान कूं, राख्या जगत समोहि ।।५००।।
तीनि लोक के जीव सब, विषय वास भरमाय। गरीबदास हमकूं जपैं, तिसकूं धाम दिखाय ।।५०१।।
जो देखैंगा धाम कूं, सो जानत है मुझ। गरीबदास तोसैं कहूँ, सुनि गायत्री गुझ ।।५०२।।
कृष्ण विष्णु भगवान कूं, जहडायें हैं जीव। गरीबदास त्रिलोक मैं, काल कर्म शिर शीव ।।५०३।।
सुनि स्वामी तोसैं कहूँ, अगम दीप की सैल। गरीबदास पूठे परे, पुस्तक लादे बैल ।।५०४।।
पौहमी धरणि अकाश थंभ, चलसी चंदर सूर। गरीबदास रज बिरजकी, कहाँ रहैगी धूर ।।५०५।।
तारायण त्रिलोक सब, चलसी इन्द्र कुबेर। गरीबदास सब जात है, सुरग पाताल सुमेर ।।५०६।।
च्यारि मुक्ति बैकुठ बट, फना हुआ कई बार। गरीबदास अलप रूप मघ, क्या जानैं संसार ।।५०७।।
कहौ स्वामी कित रहौगे, चौदा भुवन बिहंड। गरीबदास बीजक कह्या, चलत प्राण और पिंड ।।५०८।।
सुन स्वामी एक शक्ति है, अरधंगी ॐकार। गरीबदास बीजक तहां, अनंत लोक सिंघार ।।५०९।।
जैसे को तैसा रहै, परलो फना प्रान, गरीबदास उस शक्तिकूं, बार बार कुरबांन ।।५१०।।
कोटि इन्द्र ब्रह्मा जहाँ, कोटि कृष्ण कैलास। गरीबदास शिव कोटि हैं, करौ कौंनकी आश ।।५११।।
कोटि विष्णु जहाँ बसत हैं, उस शक्ति के धाम। गरीबदास गुल बौहत हैं, अलफ बस्त निहकाम ।।५१२।।
शिव शक्ति जासै हुए, अनंत कोटि अवतार। गरीबदास उस अलफकूं,लखै सो होय करतार ।।५१३।।
अलफ हमारा रूप है, दम देही नहीं दंत। गरीबदास गुलसैं परै, चलना है बिन पंथ ।।५१४।।

बिना पंथ उस कंतकै, धाम चलन है मोर। गरीबदास गति ना किसी, संख सुरग पर डोर ।।५१५।।
संख सुरगपर हम बसैं, सुनि स्वामी यह सैंन। गरीबदास हम अलफ हैं, यौह गुल फोकट फैंन ।।५१६।।
जो तै कहया सौ मैं लहया, बिन देखै नहीं धीज। गरीबदास स्वामी कहै, कहाँ अलफ वौ बीज ।।५१७।।
अनंत कोटि ब्रह्माण्ड फण, अनंत कोटि उदगार। गरीबदास स्वामी कहै, कहां अलफ दीदार ।।५१८।।
हद बेहद कहीं ना कहीं, ना कहीं थरपी ठौर। गरीबदास निज ब्रह्मकी, कौंन धाम वह पौर ।।५१९।।
चल स्वामी सर पर चलैं, गंग तीर सुन ज्ञान। गरीबदास बैकुंठ बट, कोटि कोटि घट ध्यान ।।५२०।।
तहां कोटि वैकुंठ हैं, नक सरवर संगीत। गरीबदास स्वामी सुनैं, जात अनन्त जुग बीत ।।५२१।।
प्राण पिंड पुरमैं धसौ, गये रामानंद कोटि। गरीबदास सर सुरगमैं, रहौ शब्दकी ओट ।।५२२।।
तहां वहाँ चित चक्रित भया, देखि फजल दरबार। गरीबदास सिजदा किया, हम पाये दीदार ।।५२३।।
तुम स्वामी मैं बाल बुध्दि, भर्म कर्म किये नाश। गरीबदास निज ब्रह्म तुम, हमरै दृढ विश्वास ।।५२४।।
सुन्न-बेसुन्न सैं तुम परै, उरैं से हमरै तीर । गरीबदास सरबंगमैं, अविगत पुरूष कबीर ।।५२५।।
कोटि कोटि सिजदे करैं, कोटि कोटि प्रणाम। गरीबदास अनहद अधर,हम परसै तुम धाम ।।५२६।।
सुनि स्वामी एक गल गुझ, तिल तारी पल जोरि। गरीबदास सर गगन मैं,सूरज अनंत करोरि ।।५२७।।
सहर अमान अनन्तपुरं, रिमझिम रिमझिम होय। गरीबदास उस नगर का,मरम न जाने कोय ।।५२८।।
सुनि स्वामी कैसैं लखौ, कहि समझाऊं तोहि। गरीबदास बिन पर उडैं, तन मन शीश न होय ।।५२९।।
रवनपुरी एक चक्र है, तहाँ धनजय बाय। गरीबदास जीते जन्म, याकूँ लेत समाय ।।५३०।।
आसन पदम लगायकर, भिरंग नाद को खैंचि। गरीबदास अवचन करैं, देवदत्त को ऐचि ।।५३१।।
काली ऊन कुलीन रंग, जाकै दो फुन धार। गरीबदास कुरंभ शिर, तास करे उद्गार ।।५३२।।
चिश्में लाल गुलाल रंग, तिनि गिरह नभ पेंच। गरीबदास वह नागनी कूँ, हौने न देवे रेच ।।५३३।।
कुंभक रेचक सब करै, ऊन करत उद्गार। गरीबदास उस नागनी कूँ, जीतै कोई खिलार ।।५३४।।
कुंभ भरै रेचक करै, फिर टुटत है पौन। गरीबदास गगन मण्डल, नहीं होत है रौन ।।५३५।।
आगे घाटी बंद है, ईग्ला-पिंगला दोय। गरीबदास सुषमन खुले, तास मिलावा होय ।।५३६।।
चंदा के घर सूर रखि, सूरज के घर चंद। गरीबदास मध्य महल है, तहाँ वहाँ अजब आनन्द ।।५३७।।
त्रिवेणी का घाट है, गंग जमन गुपतार। गरीबदास परबी परखि, तहाँ सहंस मुख धार ।।५३८।।
मध्य किवारी ब्रह्मरंद्र, वाह खोलत नहीं कोय। गरीबदास सब जोग की, पेज पीछाडै होय ।।५३९।।
आसन सम्पट सुधि कर, गुफा गिरद गति ढोल। गरीबदास पल पालड़ै, हीरे मानिक तोल ।।५४०।।
पान अपान समान सुध, मंदा चल महकंत। गरीबदास ठाठी बगै, तो दीपक बात बुंझत ।।५४१।।
घंटा टुटे ताल भंग, संख न सुनिए टेर। गरीबदास मुरली मुक्ति, सुनि चढ़ी हंस सुमेर ।।५४२।।
खुलहै खिरकी सहज धुनि, दम नहीं खैंच अतीत। गरीबदास एक सैन है, तजि अनभय छंद गीत ।।५४३।।
धीरैं धीरैं दाटी है, सुरग चढैंगे सोय। गरीबदास पग पंथ बिन, ले राखौं जहाँ तोय ।।५४४।।
सुन स्वामी सीढी बिना, चढौं गगन कैलास। गरीबदास प्राणायाम तजि, नाहक तोरत श्वास ।।५४५।।
गली गली गलतान है, सहर सलेमाबाद। गरीबदास पल बीचमैं, पूरण करौं मुराद ।।५४६।।
ज्यूंका त्यूंही बैठि रहो, तजि आसन सब जोग। गरीबदास पल बीच पद, सर्व सैल सब भोग ।।५४७।।
पनग पलक नीचै करौ, ता मुख सहंस शरीर। गरीबदास सूक्ष्म अधरि, सूरति लाय सर तीर ।।५४८।।
सुनि स्वामी यह गति अगम, मनुष्य देंवसैं दूर। गरीबदास ब्रह्मा थकै, किन्हैं न पाया मूर ।।५४९।।
मूल डार जाकै नहीं, है सो अनिन अरंग। गरीबदास मजीठ चलि, ये सब लोक पतंग ।।५५०।।
सुतह सिधी परकाशिया, कहा अरघ असनान। गरीबदास तप कोटि जुग, पचि हारे सुर ज्ञान ।।५५१।।
श्याम सेत नहीं लाल है, नाहीं पीत पसाव। गरीबदास कासैं कहूँ, चलै नीर बिन नाव ।।५५२।।
कोटि कोटि बैकुंठ हैं, कोटि कोटि शिव शेष। गरीबदास उस धाममैं, ब्रह्मा कोटि नरेश ।।५५३।।

अवादान अमानपुर, चलि स्वामी तहां चाल। गरीबदास परलो अनंत, बौहरि न झपै काल ।।५५४।।
अमर चीर तहां पहरि है, अमर हंस सुख धाम। गरीबदास भोजन अजर, चल स्वामी निजधाम ।।५५५।।
बोलत रामानंदजी, सुन कबीर करतार। गरीबदास सब रूपमैं, तुमहीं बोलन हार ।।५५६।।
तुम साहिब तुम संत हौ, तुम सतगुरू तुम हंस। गरीबदास तुम रूप बिन और न दूजा अंस ।।५५७।।
मैं भगता मुक्ता भया, किया कर्म कुन्द नाश। गरीबदास अविगत मिले, मेटी मन की बास ।।५५८।।
दौहूँ ठौर है एक तूं, भया एक से दोय। गरीबदास हम कारणैं, उतरे हैं मघ जोय ।।५५९।।
गोष्टी रामानंदसैं, कांशी नगर मंझार। गरीबदास जिंद पीरके, हम पाये दीदार ।।५६२।।
बोलै रामानंदजी, सुनौं कबीर सुभांन। गरीबदास मुक्ता भये, उधरे पिंड अरू प्राण ।।।५६७।।

**कबीर साहेबांनी (कविर्देव) स्वामी रामानंदजींना विचारले की स्वामीजी, आपण कोणती पूजा करता आहात? स्वामी रामानंदजी म्हणाले की मी वेद व गीता च्या आधारावर साधना करतो. यावर कबीर साहेबजींनी विचारले की वेद व गीता यांच्या आधारावर तुम्ही कोठे जाल? स्वामी रामानंदजी म्हणाले की मी स्वर्गामध्ये जाईन. कबीर साहेब जींनी पुढे विचारले, स्वर्गामध्ये काय कराल दाता? रामानंदजी म्हणाले की तेथे अत्यंत प्रिय, प्रेमळ विष्णु जी भगवान आहेत. त्यांचे दर्शन करीन आणि तेथे दुधाची नदी वाहते, तेथे कोणतीही चिंता नाही, कालजी नाही. मी तेथे आनंदाने वास्तव्य करेन. कबीर साहेबांनी विचारले की स्वामीजी, आपण स्वर्गामध्ये किती दिवस राहाल? (विद्वान पुरुष असल्याने स्वामीजींना ज्ञान होते. दोनच मिनिटांमध्ये त्यांना याबाबत समजले.)**

**स्वामी रामानंद म्हणाले की माझी जेवढी भक्तीची कमाई असेल तोपर्यंत वास्तव्य करेन. कबीर साहेबांनी विचारले की त्यानंतर कोठे जाल? रामानंदजी उत्तरले, कर्माच्या आधारावर कोठे जाईन कुणास ठाऊक? कबीर साहेब जी म्हणाले की स्वामीजी, हीच साधना आपण असंख्य वेळा केलेली आहे. जीव मुक्त होऊ शकत नाही. आपण श्री विष्णुजींची साधना करून स्वर्गलोकी जाऊ इच्छिता. जे साधक ब्रह्मसाधना करून ब्रह्मलोकी जातात, ते देखिल जन्म-मृत्यूच्या फेऱ्यामध्येच राहतात. कारण ब्रह्मलोकी जो महास्वर्ग बनलेला आहे, तोही एक दिवस नष्ट होऊन जाईल. गीता च्या ८ व्या अध्यायाचा १६ वा श्लोक हेच सांगतो आहे. स्वामी रामानंदजी विद्वान पुरुष होते, त्यामुळे त्यांना तर श्लोक बोटांवर पाठ होते. स्वामी रामानंदजी म्हणाले की आपण जे सांगत आहात, ते योग्य आहे. गीता मध्ये असेच लिहिलेले आहे. कबीर साहेब जी म्हणाले की मग सांगा कोठे राहाल? आपले श्री कृष्ण मुरारी राहणार नाहीत आणि ब्रह्मलोक, विष्णुलोक आदी ठिकाणच्या सर्व प्राण्यांसह श्री विष्णु जी आदी तिन्ही देवता देखिल नष्ट होतील. मग आपण कोठे वास्तव्य कराल गुरुदेवजी? रामानंदजी विचार करण्यास विवश झाले. परमेश्वर कबीर साहेबांनी विचारले की स्वामीजी, गीता चे ज्ञान कोणी सांगितले? रामानंदजी उत्तरले की श्री कृष्णजींनी. परमेश्वर कबीर साहेब जी म्हणाले की स्वामीजी, संक्षिप्त महाभारताच्या द्वितीय खंडात (पान नं. १५३१ जुन्यावर आणि ६६७ नवीनवर) लिहिले आहे की श्री कृष्णजी तर म्हणत आहेत की अर्जुना, मला आता ते गीता चे ज्ञान आठवत नाही. मी पुन्हा ते ज्ञान सांगू शकत नाही. याबाबत परमेश्वर कबीर साहेबजींनी सर्व प्रमाण सांगितले.,**

**गीता अध्याय ८ श्लोक १३ मध्ये गीता ज्ञानदाता (ब्रह्म) म्हणत आहे की :-**

'ओम इति एकाक्षरम ब्रह्म, व्याहरन माम् अनुस्मरन्,
य: प्रयाति त्यजन् देहम् स: याति परमाम् गतिम्।।१३।।

**याचा शब्दार्थ असा आहे की गीता सांगणारा ब्रह्म म्हणजेच काल म्हणत आहे, की, (माम ब्रह्म) ब्रह्मचे तर (इति) हे (ओम एकाक्षरम) ओम (ॐ) एक अक्षर आहे. (व्याहरन्)**

उच्चारण करून (अनुस्मरन्) स्मरण करण्याचे (य:) जो साधक (त्यजन् देहम्) शरीराचा त्याग करेपर्यंत म्हणजेच अंतिम श्वासापर्यंत (प्रचाति) स्मरण साधना करतो, (स:) तो साधकच माझ्या (परमाम् गतिम्) परमगतीस (याति) प्राप्त होतो.

याचा भावार्थ असा आहे की श्री कृष्णजींच्या शरीरामध्ये प्रेतवश प्रवेश करून ब्रह्म म्हणजेच हजार भुजा असणारा ज्योति निरंजन (काल) म्हणत आहे की माझी (ब्रह्म) साधना केवळ ओम (ॐ) नामाचा जप मृत्यूपर्यंत करणारा साधकच माझ्याकडून मिळणारा लाभ प्राप्त करतो. माझ्या भक्तीचा अन्य कोणताच मंत्र नाही.

गीता च्या ८ व्या अध्यायातील ५ व्या ते ७ व्या आणि १३ व्या श्लोकांमध्ये गीता ज्ञानदात्याने आपल्याविषयी साधना करण्यास सांगितलेले आहे. तो म्हणतो आहे की जो ओम (ॐ) नामाचे स्मरण अंतिम श्वासापर्यंत करत माझी साधना करतो, तो मलाच प्राप्त होईल. यासाठी तू युद्ध देखिल कर आणि माझे 'ओऽम' नामाचे स्मरणही कर. कारण युद्ध हे गर्जना करत केले जाते. यासाठी म्हटले आहे की ओम (ॐ) नामाचा उच्चार (मोठ्या स्वरांचा आवाज) करत स्मरणही कर आणि युद्धही कर.

गीता च्या ८ व्या अध्यायातील ६ व्या श्लोकामध्ये असे विधान आहे की अंतसमयी जो ज्या प्रभुचे स्मरण करत शरीराचा त्याग करतो, तो त्या प्रभुलाच प्राप्त होतो. गीता ज्ञानदाता प्रभु गीता च्या ८ व्या अध्यायातील ८ व्या ते १० व्या श्लोकांपर्यंतच्या तीन श्लोकांमध्ये ब्रह्मपेक्षा (काल) वेगळ्या पूर्ण परमात्म्याविषयी (परमदिव्य पुरुष परमेश्वर म्हणजेच पूर्ण ब्रह्म) म्हणत आहे की जर कोणी त्यांची साधना करत शरीराचा त्याग करतो, तो तर त्याच पूर्ण परमात्म्याला (परमेश्वर) प्राप्त करतो. त्यांच्यापासूनच पूर्ण मोक्ष, सत्यलोकप्राप्ती आणि परमशांती प्राप्त होते. यासाठी त्या परमेश्वराला शरण जा. (गीता च्या १८ व्या अध्यायातील ६२ ते ६६ आणि १५ व्या अध्यायातील ४ था श्लोक). मी देखिल (गीता ज्ञानदाता ब्रह्म) त्या पूर्ण परमात्म्यालाच शरण आहे.

हे सर्व प्रमाण पाहिल्यानंतर रामानंदजींसमोर आश्चर्यचकित होऊन तोंडात बोटे घालण्या शिवाय पर्यायच राहिला नाही. सत्याचा स्वीकार करून ते म्हणाले की बेटा, जे सत्य आहे त्या शास्त्रांचे तू योग्य वक्तव्य करत आहेस. आम्हाला कोणीही असे ज्ञानच दिले नाही, तर आम्ही काय करणार? कबीर साहेब जी म्हणाले की हे सर्व पवित्र गीता मध्ये लिहिलेले आहे. ८ व्या अध्यायातील ८, ९ व १० वा श्लोक आणि १८ व्या अध्यायातील ६२ वा श्लोक वाचून पाहा.

पवित्र गीता आणि वेद सांगणारा ब्रह्म (काल) म्हणत आहे की अर्जुना, त्या परमात्म्याला शरण जा. त्यामुळे तुला पुन्हा मृत्यू येणार नाही. यासाठी (४ थ्या अध्यायातील ३४ वा श्लोक) त्या संतांना शोध, जे त्या परमात्म्याचे परमतत्त्व जाणतात. त्यांना दंडवत घालून विनम्र व निष्कपट भावाने त्यांचा सत्कार कर, तेव्हाच ते प्रसन्न होतील. त्यानंतर त्यांच्याकडून दीक्षा (नाम) घे. त्यानंतर तुला पुन्हा जन्म-मृत्यू भोगावे लागणार नाहीत. पवित्र गीता च्या १५ व्या अध्यायातील पहिल्या ते ४ थ्या श्लोकांमध्ये म्हटले आहे की हा उलटा लटकलेला संसाररूपी वृक्ष आहे. वरच्या बाजूचे मूळ म्हणजे आदिपुरुष अर्थात सनातन परमात्मा आहे. खालच्या बाजूला तीन गुण (रजगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु, तमगुण शिव) शाखा (फांद्या) आहेत. हा पूर्ण संसाररूपी वृक्ष म्हणजे पूर्ण सृष्टिरचना मी (ब्रह्म-काल) जाणत नाही. येथे काल विचारामध्ये म्हणजेच गीता च्या ज्ञानाविषयी तुला मी पूर्ण ज्ञान देऊ शकत नाही. त्यासाठी तू तत्त्वदर्शी संताचा शोध घे. (गीता च्या ४ थ्या अध्यायातील ३४ वा श्लोक) त्यानंतर ते तत्त्वदर्शी संत

तुला सर्व सृष्टिच्या रचनेचे ज्ञान आणि सर्व प्रभुंची स्थिती योग्यप्रकारे सांगतील. त्यानंतर त्या परमपद परमेश्वराचा शोध घेणे आवश्यक आहे. त्यांच्याकडे गेलेल्या साधकाचा पुन्हा जन्म-मृत्यू होत नाही म्हणजेच त्याला पूर्ण मोक्ष होतो. ज्या परमेश्वराने संसाररूपी वृक्षाची म्हणजेच सर्व ब्रह्माण्डांची रचना केलेली आहे, त्या परमात्मा परमेश्वरला मी देखिल (ब्रह्म-काल) शरण आहे. त्यामुळे तू त्या परमेश्वराची पूजा कर. स्वामी रामानंदजी म्हणाले की बाळा, लिहिले तर अगदी असेच आहे. परंतु सतलोकाबाबत कोणाकडून ऐकले नसल्यामुळे तू सांगतोस ते सत्य असेल यावर विश्वास ठेवायला माझे मन तयार नाही. कबीर साहेबजींनी विचारले की आपण कशी साधना करता? स्वामी रामानंदजी म्हणाले की मी सर्व शरीर योगाने सिद्ध केलेले आहे. योग अभ्यासाद्वारे मी आतील कमळांतून जाऊन त्रिकुटीपर्यंत (त्रिवेणी) पोहोचतो. कबीर साहेब जींनी त्यांना पुन्हा एकदा त्रिवेणीपर्यंत पोहोचण्यास सांगितले, तेव्हा रामानंदजी समाधिस्त झाले. कबीर साहेब जींनी सांगितले की त्रिवेणीच्या पुढे तीन मार्ग आहेत. प्रत्येक ब्रह्माण्डामध्ये निर्मित ब्रह्मलोकामध्ये प्रवेश करताच तीन रस्ते निर्माण होतात. अशाप्रकारे वीस ब्रह्माण्डांच्या वर एकविसाव्या ब्रह्माण्डामध्येही अशीच व्यवस्था आहे. एक मार्ग समोर ब्रह्मलोकामध्ये निर्मित तीन गुप्तस्थानी जातो, तेथे ज्योति निरंजन तीन रूपे घेऊन वास्तव्य करतो. समोरचे जे ब्रह्मरंध्र आहे ते तुझ्या या नामाने उघडणार नाही. ते सतनामाने उघडेल. कबीर साहेबजींनी श्वासाद्वारे आपल्या सतनामाचा उच्चार केला आणि समोरचे द्वार उघडले. कबीर साहेब जी म्हणाले की आता ज्याला आपण निराकार म्हणत आहात, जो गीता मध्ये म्हणत आहे की मी सर्वांना खाईन, अर्जुना, मी कधीही कोणालाही दर्शन देत नाही. मी कधी कोणाच्याही समक्ष प्रत्यक्ष येत नाही, तो काल भगवान (ब्रह्म) मी आपणास दाखवितो. प्रथम एका ब्रह्माण्डामध्ये निर्मित ब्रह्मलोकामधील ब्रह्मने (काल) ब्रह्मा, विष्णु व शिव यांचे रूप धारण केलेले होते, ते गुप्तस्थान दाखविले. त्यानंतर ब्रह्मलोक पार करून द्वारातून एकविसाव्या ब्रह्माण्डामध्ये रामानंदजींना घेऊन गेले. ब्रह्मलोकाच्या पुढे जाणाऱ्या मार्गावरही जे जटा कुंडली सरोवर आहे, त्यावर ब्रह्म आपली नजर ठेवतो. त्यातून कोणी सुटून जाऊ नये, हाच त्याचा हेतू असतो. एकविसाव्या ब्रह्माण्डाचा जो अंतिम लोक येतो ते काल-ब्रह्मचे (क्षर पुरुष) स्वतःचे स्थान आहे. तेथे तो त्या भयंकर रूपामध्ये विराजित आहे आणि ते त्याचे वास्तविक रूप आहे. कबीर साहेब म्हणाले, की, ज्याला आपण निराकार म्हणता, तो तुझा भगवान समोर बसला आहे बघ. (योगी ऋषिंनी वेदांच्या आधारावर ओऽम नामाची साधना केली. परमात्मा तर त्यांना मिळालाच नाही आणि सिद्धी मात्र प्राप्त झाल्या. ते स्वर्गात गेले, महास्वर्गामध्ये गेले, नंतर पशू बनले. जो दिसत नाही यावरून त्या सर्वांनी त्याला निराकार मानले आहे. परंतु वेदांमध्ये लिहिलेले आहे की भगवान आकार स्वरूपात आहेत.) जेव्हा ते पुढे कालजवळ पोहचले, तेव्हा कबीर साहेबांनी आपल्या सारनामासहित सतनामाचा उच्चार केला. त्यासमयी कालचे शिर खाली झुकले आणि जेथून सतलोकामध्ये जाता येते आणि परब्रह्मच्या लोकामध्ये प्रवेश होतो, ते द्वार कालच्या डोक्याच्या वर आहे. त्यानंतर एक भोवऱ्यासारखी गुहा सुरू होते. (एक भोवऱ्यासारखी गुहा कालच्या लोकी देखिल आहे.) कालच्या डोक्यावर पाय ठेवून कबीरजींचे हंस (निर्विकारी साधक) वर जातात. हा काल त्यांच्या पायरीचे काम करतो. परब्रह्मचा लोक पार करून कबीर साहेब श्री रामानंदजींच्या आत्म्याला सतलोकामध्ये घेऊन आले. (येथेही एक भोवऱ्यासारखी गुहा आहे.) सतलोकामध्ये गेल्यानंतर श्री रामानंदजींनी पाहिले की कबीर साहेब (कविर्देव) आपल्या वास्तविक रूपामध्ये विराजित झालेले आहेत. तेथे कबीर साहेबांचे एवढे तेज आहे की एक रोम कूपामध्ये (रोमरंध्र) कोटी सूर्य आणि कोटी चंद्रांनी मिळून होणाऱ्या प्रकाशापेक्षाही

अधिक प्रकाश आहे. परंतु उष्णता नाही. कबीर साहेब तेथे गेले आणि आपल्याच दुसऱ्या स्वरूपावर चवर घालू लागले. श्री रामानंदजींना वाटले की भगवान तर हे आहेत आणि हा कबीर येथील कोणी तरी सेवक (गण) असेल, परंतु हा लोक सर्वांहून निराळा आहे. परमात्म्याचे तेज फार मोठे आहे. ते असा विचार करत असतानाच परमात्म्याचे तेजोमय रूप उभे राहिले आणि पाच वर्षीय बालकाच्या रूपामधील कबीर साहेब सिंहासनावर विराजमान झाले. परमेश्वराचे जे वास्तविक तेजोमय रूप दिसत होते, ते रूप बालकरूपी कबीर साहेबांवर चवर घालू लागले. त्यानंतर कबीर साहेबांचे दुसरे तेजोमय रूप बालक असलेल्या कबीर साहेबांच्या रूपामध्ये सामावले गेले आणि एकटे पाचवर्षीय बालक रूपामधील कबीर परमेश्वर सिंहासनावर विराजमान होते. चवर आपोआप फिरत होत्या. इतक्यात रामानंदजींचा आत्मा त्यांच्या शरीरामध्ये पाठविला गेला. त्यांची समाधी भंग झाली आणि त्यांनी समोर पाहिले, तर कबीर साहेब जी पाच वर्षीय बालकाच्या रूपामध्ये बसलेले आहेत. तेव्हा स्वामी म्हणाले की :-

तहा वहाँ चित चक्रित भया, देखि फजल दरबार। गरीबदास सिजदा किया, हम पाये दीदार ।।५२३।।
तुम स्वामी मैं बाल बुद्धि, भर्म कर्म किये नाश। गरीबदास निज ब्रह्म तुम, हमरै दृढ़ विश्वास ।।५२४।।
सुन्न-बेसुन्न सैं तुम परै, उरैं से हमारै तीर। गरीबदास सरबंगमैं, अविगत पुरुष कबीर ।।५२५।।
कोटि कोटि सिजदे करैं, कोटि कोटि प्रणाम । गरीबदास अनहद अधर, हम परसैं तुम धाम ।।५२६।।
बोलत रामानंदजी, सुन कबीर करतार । गरीबदास सब रुपमैं, तुमहीं बोलन हार ।।५५६।।
तुम साहिब तुम संत हौ, तुम सतगुरु तुम हंस। गरीबदास तुम रूप बिन और न दुजा अंस ।।५५७।।
मैं भगता मुक्ता भया, किया कर्म कुन्द नाश। गरीबदास अविगत मिले, मेटी मन की बास ।।५५८।।
दोहूँ ठौर है एक तूं, भया एक से दोय। गरीबदास हम कारणैं, उतरे हैं मघ जोय ।।५५९।।
बोलत रामानन्द जी, सुन कबीर करतार। गरीबदास सब रूप में तू ही बोलन हार।।

रामानंदजी म्हणतात की हे परमेश्वर, हे कबीर परमात्मा, हे कबीर करतार (सर्व सृष्टि रचनाहार) आपणच सर्वव्यापक पूर्ण परमेश्वर आहात.

दहूँ ठोड़ है एक तूं, भया एक से दो। गरीबदास हम कारणे, आए हो मग जो ।।

हे परमेश्वर कबीर ! सत्यलोक आणि माझ्यासमोर दोन्ही स्थानी आपणच आहात आणि एकापासून दोन रूपे घेऊन आम्हा तुच्छ जीवांसाठी आपण येथे आला आहात.

मैं भक्ता मुक्ता भया, कर्म कुण्द भये नाश। गरीबदास अविगत मिले, मिट गई मनकी बांस ।।

रामानंदजी १०४ वर्षीय महापुरुष आणि पाच वर्षीय बालक कबीर परमेश्वरांना म्हणत आहेत की मी आपला दास मुक्त झालो आणि माझ्या मनाचे भ्रमण- भटकणे समाप्त झालेले आहे. मला परमात्म्याच्या वास्तविक स्वरूपाचे दर्शन झाले. हे पूर्ण परमात्मा कबीर साहेब, चारही पवित्र वेद व गीता आपलेच गुणगान गात आहेत. स्वतः कविर्देव म्हणाले की :-

बेद हमारा भेद है, मैं बेदन के माहीं। जिस बेद से मैं मिलू बेद जानते नाही।

याचा भावार्थ असा आहे की चारही पवित्र वेदांमधील ज्ञान पूर्ण परमात्म्याचेच आहे. परंतु पूजेची जी विधी आहे, ती केवळ ब्रह्मपर्यंतचीच (ज्योति निरंजन) आहे. परमेश्वर कबीर (कविर्देव) यांच्या पूजाविधीचे ज्ञान व तत्त्वज्ञानाविषयी पवित्र वेद आणि पवित्र गीता मध्ये म्हटले आहे की ते कोणी तत्त्वदर्शी संतच सांगू शकतात, जे स्वतःच परमेश्वर असतात अथवा त्यांनी पाठविलेला वास्तविक प्रतिनिधी असतो. त्यांच्यापासून उपदेश प्राप्त करून पूर्ण मोक्ष व परमशांती प्राप्त होते.

## पवित्र शास्त्रदेखिल कविर्देव (कबीर परमेश्वर) यांचे साक्षीदार

अशाप्रकारचे कविर्देव (कबीर परमेश्वर) यांनी पवित्र मुस्लिमांना अयोग्य (वाईट) म्हटलेले नाही आणि 'पवित्र कुर्आन शरीफ' या धर्मग्रंथासही अयोग्य म्हटले नाही. जे काजी व मुल्ला सर्व समाजास कुर्आन शरीफच्या वास्तविक ज्ञानाच्या विपरीत मनमानी साधना करवून घेत आहेत केवळ त्यांना झिडकारले आहे.

जसे पवित्र वेदांमध्ये बोलणारा ब्रह्म पूर्ण परमात्मा कविर्देव यांच्याविषयी म्हणत आहे की कोणी जन्म घेऊन अवतार रूपामध्ये न येणारा मानतात, तर कोणी कधीही जन्म न घेणारा 'निराकार' म्हणतात. त्यांची माहिती फक्त (धीराणाम्) तत्त्वदर्शी संतच सांगेल. त्याबाबत मी देखिल (ब्रह्म) जाणत नाही. (यजुर्वेदाच्या ४० व्या अध्यायातील १० वा मंत्र). याचे प्रमाण पवित्र गीता च्या चौथ्या अध्यायातील ३४ वा श्लोक व १५ व्या अध्यायातील पहिल्या ते ४ थ्या श्लोकांमध्येही आहे. जोपर्यंत ते तत्त्वदर्शी संत भेटत नाहीत, तोपर्यंत जीवाचे कल्याण असंभव आहे. ते संत आता आलेले आहेत. या तत्त्वदर्शी संत रामपालजींना ओळखा.


## ''पवित्र कुर्आन शरीफमधील प्रमाण''

अशाचप्रकारे पवित्र कुर्आन शरीफच्या अध्याय सूरत फुर्कानि सं. २५, आयत ५२, ५८-५९ मध्ये म्हटले आहे की वास्तवामध्ये पूजा करण्यायोग्य कबीर अल्लाह (इबादह कबीरा) आहेत. हे कबीर जे आहेत, तेच पूर्ण परमात्मा आहेत, ज्यांनी सहा दिवसांमध्ये सृष्टिची रचना केली आणि ७ व्या दिवशी तख्तावर जाऊन विराजमान झाले. त्यांची माहिती कोणी तत्त्वदर्शी संताला (बाखबर) विचारा.

पवित्र कुर्आन शरीफ सांगणारा अल्लाह स्वतः कोण्या वेगळ्या कबीर नामक प्रभुकडे संकेत करत आहे. तसेच तो म्हणत आहे की पूर्ण परमात्मा कबीर यांच्याविषयी मला देखिल माहिती नाही. त्यांच्याविषयी कोण्या तत्त्वदर्शी संताला (बाखबर) विचारा.

कविर्देवांनी हेच म्हटले होते की मी स्वतःच आलेलो आहे, मला ओळखा. परंतु अशा अज्ञानी आचार्यांनी पूर्वीही परमेश्वराचे वास्तविक ज्ञान जनतेपर्यंत जाऊ दिलेले नाही. ते म्हणत असत की कबीर अशिक्षित आहे. त्याला संस्कृत समजत नाही. आम्ही शिक्षित आहे. अशा भाकड कथा ऐकून सुरवातीला भक्तजन संभ्रमामध्ये पडले होते. परंतु आता सर्व समाज शिक्षित झालेला आहे. आता या भ्रष्ट आचार्यांची डाळ शिजत नाही, समाजही हे खपवून घेणार नाही.

**सलि अल्ला** :- ज-स-दि मुहम्मदिन फिल् अज्सादि अल्लाहुम म सल्लि अला कबिर् (कबीर) मुहम्मिद फिल् कुबूरि० फजाईले जिक्र


عن أبي هريرة رضي الله عنه قال قال رسول الله صلى الله عليه وسلم ما
قال عبد لا إله إلا الله قط مخلصا إلا فتحت له أبواب السماء حتى يفضي إلى العرش
ما اجتنب الكبائر رواه الترمذي وهكذا في المشكوة لكن ليس فيها
حسن بل غريب فقط قال القاري ورواه النسائي وابن حبان وعزاه
السيوطي في الجامع إلى الترمذي ورقم له بالحسن وحكاه السيوطي في
الدر من طريق ابن مردويه عن أبي هريرة وليس فيه ما اجتنب الكبائر
وفي الجامع الصغير برواية الطبراني عن معقل بن يسار لكل شيء مفتاح
ومفتاح السماوات قول لا إله إلا الله ورقم له بالضعف.

५. हुजूरे अक्दस सल्लल्लाहु अलैहि व सल्लम का इर्शाद है कि कोई बन्दा ऐसा नहीं कि 'लाइला–ह–इल्लल्लाहह' कहे और उसके लिए आसमानों के दरवाजे न खुल जायें, यहाँ तक कि यह कलिमा सीधा अर्श तक पहुँचता है, बशर्ते कि 'कबीरा' गुनाहों से बचाता रहे।

फ–कितनी बडी फजीलत है और कुबूलियत की इन्तिहा है कि यह कलिमा बराहे रास्त अर्शे मुअल्ला तक पहुँचता है और यह अभी मालूम हो चुका है कि अगर कबीरा गुनाहों के साथ भी कहा जाये, तो नफा से उस वक्त भी खाली नहीं।

मुल्ला अली कारी रह० फरमाते हैं कि कबाइर से बचने की शर्त कुबूल की जल्दी और आसमान के सब दरवाजे खुलने के एताबर से है, वरना सवाब और कूबूल से कबाइर (कबीर) के साथ भी खाली नहीं।

बाज उलेमा ने इस हदीस का यह मतलब बयान फरमाया है की ऐसे शख्स के वास्ते मरने के बाद उस की रुह के ,एजाज में आसमान के सब दरवाजे खुल जायेंगे।

एक हदीस में आया है, दो कलिमे ऐसे हैं कि उनमें से एक के लिए अर्श के नीचे कोई मुन्तहा नहीं।' दूसरा आसमान और जमीन को (अपने नूर या अपने अज्र से) भर दे – एक 'लाइला ह इल्लल्लाह' है, दूसरा 'अल्लाहु अकबर' (कबीर) है,

## ''पवित्र वेदांमध्ये प्रमाण''

कविर्देव आपल्या ज्ञानाचे दूत बनून स्वत:च येतात आणि आपले वास्तविक ज्ञान (सत्यज्ञान) स्वतःच स्पष्ट करतात.

स्वतः कविर्देवांनी (कबीर परमेश्वर) आपल्या अमृतवाणीमध्ये म्हटले आहे की,

**शब्द :–** अविगत से चल आए, कोई मेरा भेद मर्म नहीं पाया। (टेक) न मेरा जन्म न गर्भ बसेरा, बालक हो दिखलाया। काशी नगर जल कमल पर डेरा, वहाँ जुलाहे ने पाया ।।मात–पिता मेरे कुछ नाहीं, ना मेरे घर दासी (पत्नी) । जुलहा का सुत आन कहाया, जगत करें मेरी हाँसी।।पाँच तत्व का धड़ नहीं मेरा, जानु ज्ञान अपारा। सत्य स्वरूपी (वास्तवीक) नाम साहेब (पूर्ण प्रभु) का सोई नाम हमारा।।अधर द्वीप (ऊपर सत्य लोक में) गगन गुफा में तहां निज वस्तु सारा। ज्योत स्वरूपी अलख निरंजन (ब्रह्म) भी धरता ध्यान हमारा।।हाड चाम लहु ना मेरे कोई जाने सत्यनाम उपासी। तारन तरन अभय पद दाता, मै हूँ कबीर अविनाशी ।।

या शब्दांमध्ये कबीर परमेश्वर म्हणत आहेत की माझी कोणी माता नाही की पिता, माझी कोणी पत्नी नाही आणि माझे शरीर पंचतत्त्वापासून (अस्थी–मांस, रक्त अर्थात नाड्यांनी जोडून बनवलेली काया म्हणजेच पंच महाभूते–पृथ्वी, आप, तेज वायू, आकाश या तत्त्वांपासून) निर्माण झालेले नाही. मी स्वयंभू आहे. मी काशीमधील 'लहरतारा' नावाच्या तलावातील पाण्यामध्ये कमळाच्या फुलावर स्वयं प्रकट होऊन बालक रूप धारण केले होते. तेथून मला नीरू नावाच्या विणकराने आपल्या घरी नेले होते. वास्तविक ते नाव माझे म्हणजेच परमेश्वराचे आहे. (वेदांमध्ये कविर्देव, गुरुग्रंथसाहेबमध्ये हक्का कबीर आणि कुर्आन शरीफमध्ये अल्लाह कबीरन्). तेच माझे नाव आहे. मी सर्वांत वर असलेल्या ऋतुधामामध्ये वास्तव्य करतो आणि तुमचा भगवान ज्योति निरंजन देखिल (ब्रह्म) माझीच पूजा करतो. याचे प्रमाण 'सत्यार्थ प्रकाश सातवे समुल्लास'मध्येही (पान नं. १५२–१५३, दीनानगर, पंजाब येथून प्रकाशित) आहे. त्यामध्ये वेद सांगणारा ब्रह्म म्हणत आहे की (मंत्र नं. ५ व ६ मध्ये) हे मनुष्यजनांनो, जो सृष्टिच्या अगोदर सगळ्याची उत्पत्ती करत होता आणि सर्वांचा स्वामी होता, आहे व पुढेही राहील, तोच सर्व

**सृष्टिची निर्मिती करून तिचे धारण करीत आहे. त्या सुखस्वरूप परमात्म्याची भक्ती जशी आम्ही (ब्रह्म आणि अन्य देवही) करित आहे, तशीच तुम्ही सर्वांनी करावी.**

**प्रमाण– १. पवित्र यजुर्वेदाच्या २९ व्या अध्यायातील २५ वा मंत्र**

समिद्धोऽअद्य मनुषो दुरोणे देवो देवान्यजसि जातवेदः।
आ च वह मित्रमहश्चिकित्वान्त्वं दूतः कविरसि प्रचेताः ।।२५।।

समिद्धः–अद्य–मनुषः–दुरोणे–देवः–देवान्–यज्–असि–जात–वेदः–आ–च–वह–मित्रमहः–चिकित्वान्–त्वम्–दूतः–कविर्–असि–प्रचेताः।

**अनुवाद :– (अद्य) आज म्हणजेच वर्तमानात (दुरोणे) शरीररूपी महालामध्ये दुराचारपूर्वक (मनुषः) खोट्या पूजेमध्ये लीन, मननशील व्यक्तींना (समिद्धः) लावलेला अग्नी म्हणजेच शास्त्रविधिरहित वर्तमान पूजा जी हानिकारक म्हणजेच जाळून भस्मासात करते अशा साधकांचे जीवन शास्त्राविरुद्ध साधना करून व्यर्थ जाते. त्या स्थानी (देवान्) देवतांचे (देवः) देवता (जातवेदः) पूर्ण परमात्मा सतपुरुष यांची वास्तविक (यज्) पूजा (असि) आहे. (आ) दयाळू (मित्रमहः) जीव/आत्म्याचा वास्तविक साथी, सोबती पूर्ण परमात्म्याच्या (चिकित्वानः) सत्यज्ञान म्हणजेच यथार्थ भक्तीस (दूतः) संदेशवाहक रूपामध्ये (वह) घेऊन येणारे (च) आणि (प्रचेताः) बोध करणारे (त्वम्) आपण (कविर्) कबीर (असि) आहेत.**

**भावार्थ :– ज्या वेळी भक्त समाजाकडुन शास्त्रविधीचा त्याग करुन मनमानी आचरण (पुजा) करुन घेतली जाते. त्यावेळी कविर्देव तत्वज्ञान सांगण्यासाठी प्रकट होतात.**

**प्रमाण–२. पवित्र सामवेदाच्या संख्या १४०० मध्ये**

**संख्या नं. ३५९, सामवेद अध्याय नं. ४ च्या खण्ड नं. २५ चा श्लोक नं. ८ :–**

पुरां भिन्दुर्युवा कविरमितौजा अजायत। इन्द्रो विश्वस्य कर्मणो धर्ता वज्री पुरुष्टुतः ।।४।।

पुराम्–भिन्दुः–युवा–कविर्–अमित–मौजा–अजायत–इन्द्रः–विश्वस्य–कर्मणः– धर्ता–वज्री–पुरुष्टुतः।

**शब्दार्थ :– (युवा) पूर्ण समर्थ (जशी लहान मुले आणि वृद्ध सर्व कार्ये करण्यास समर्थ नसतात आणि तरुणांमध्ये मात्र सर्व कार्ये करण्याची क्षमता असते, तसेच परब्रह्म–ब्रह्म व त्रिलोकीय ब्रह्मा–विष्णु–शिव आणि अन्य देवी–देवतांना लहान मुले किंवा वृद्ध समजा. यासाठीच कबीर परमेश्वरांना 'युवा' अशी उपमा वेदांमध्ये दिलेली आहे.) परमेश्वर (कविर्) कबीर (अमितऔ जा) विशाल शक्तियुक्त म्हणजेच सर्व शक्तिमान (अजायत) तेजःपुंजाचे शरीर निर्माण करून, (धर्ता) प्रगट होऊन म्हणजेच अवतार धारण करून (वज्री) आपल्या सत्यशब्द व सत्यनामरूपी शस्त्राने (पुराम) काल–ब्रह्मच्या पापरूपी बंधनरूपी किल्ल्याला (भिन्दुः) तोडणारे– भेदणारे– तुकडे तुकडे करणारे, (इन्द्रः) सर्व सुखदायक परमेश्वर (विश्वस्थ) सर्व जगतांच्या सर्व प्राण्यांना (कर्मणः) काया, वाचा, मनाने म्हणजेच पूर्ण निष्ठेने, शुद्ध मनाने धार्मिक कर्माद्वारे सत्यभक्तीने (पुरुष्टुतः) स्तुती उपासना करण्यायोग्य आहेत.**

**{जसे लहान मुल व वयस्कर व्यक्ति सर्व कार्य करण्यास समर्थ नसतात परतु तरुण व्यक्ति सर्व कार्य करण्याची क्षमता ठेवतात. असेच परब्रह्म–ब्रह्म व त्रिदेव (ब्रह्मा–विष्णु– महेश) व अन्य देवी देवता याना लहान मुल अथवा वयस्कर व्यक्ति समजावे त्यासाठी वेदांमध्ये कबीर परमेश्वर तत्वज्ञान याना तरुण व्यक़्तीची उपमा दिली आहे.}**

**भावार्थ :– जे कविर्देव (कबीर परमेश्वर) तत्वज्ञान घेउन या ससारात येतात. ते सर्व शक्तिमान आहेत तसेच कालाच्या (ब्रह्म) कर्मरुपी किल्यास तोडणारा व सर्व सुखदाता तसेच**

सर्वजण त्यांची पुजा करण्यायोग्य आहे.

**संख्या नं. १४०० सामवेद उतार्चिक अध्याय नं १२ खण्ड नं. ३ श्लोक नं. ५**

भद्रा वस्त्रा समन्या३वसानो महान् कविर्निवचनानि शंसन्।
आ वच्यस्व चम्वो: पूयमानो विचक्षणो जागृविर्देववीतौ ।।५।।

भद्रा–वस्त्रा–समन्या–वसअन:–महान्–कविर्–निवचनानि–शंसन्–आवच्यस्व–चम्वो:–पूयमान:–विचक्षण:–जागृवि:–देव–वीतौ।

**अनुवाद :– (विचक्षण:) चतुर व्यक्तींनी (आवच्यस्व) आपल्या वचनांद्वारे पूर्ण ब्रह्मांची पूजाविधी न सांगता दुसऱ्याच अशास्त्रीय उपासना पद्धतीचे मार्गदर्शन करून अमृत स्थानावर (पूयमान:) अन्य उपासना {जशा भूत–प्रेत पूजा, पितृपूजा, तिन्ही गुणांची (रजगुण–ब्रह्मा, सतगुण–विष्णु, तमगुण–शिव शंकर) आणि ब्रह्म–कालपर्यंतची पूजा} रूपी फोड–जखमेतून वाहणाऱ्या पू/घाणीला (चम्वो:) आदरपूर्वक आचमन करविणाऱ्या चुकीच्या/अयोग्य ज्ञानाला (भद्रा) परमसुखदायक (महान् कविर्) पूर्ण परमात्मा कबीर (वस्त्रा) सशरीर साधारण वेशभूषेमध्ये (येथे वस्त्रचा अर्थ आहे वेशभूषा, संतभाषेमध्ये याला चोला/शरीर देखिल म्हटले जाते. जेव्हा एखाद्या संताचा मृत्यू होतो, तेव्हा चोला छोड गये असे म्हणतात.) (समन्या) आपल्या सतलोकीच्या शरीरासारखे अन्य शरीर तेज:पुंजाचे धारण करून (वसअन:) सामान्य व्यक्तीसारखे जीवन व्यतित करून काही दिवस संसारामध्ये वास्तव्य करून (निवचनानि) आपल्या शब्दावली आदींच्या माध्यमातून सत्यज्ञान (शंसन्) वर्णन करून (देव) पूर्ण परमात्म्याच्या (वीतौ) लपलेल्या सगुण–निर्गुण ज्ञानास (जागृवि:) जागृत करतात.**

**भावार्थ :– शास्त्रविरुद्ध साधना अथवा घातक साधना नुसार भक्त समाजास तत्वज्ञान समजावण्यासाठी कविर्देव (कबीर परमेश्वर) ह्या संसारात प्रकट होतात. त्यावेळी आपले तेजपुंज शरीरावर अन्य शरीर रुपी वस्त्र (कमी तेजाचे शरीर) धारण करून येतात. (कारण परमेश्वराच्या मुळ तेजपुंज शरीरास आपल्या डोळ्यांनी पाहीले जाउ शकत नाही) काही दिवस साधारण व्यक़्ती सारखे जिवन व्यतीत करुन परमेश्वरास (स्वत:स) प्राप्त करण्याचे ज्ञान दिले.**

**ऋग्वेद मण्डल नं. ९ सुक्त नं. ९६ मन्त्र १७**

**शिशुं जज्ञानं हर्यतं मृजन्ति शुम्भन्ति वह्नि मरुतो गणेन ।**

**कविर्गीर्भि: काव्येना कवि: सन्त्सोम: पवित्रमत्येति रेभन् ।।१७।।**

शिशुम् जज्ञानम् हर्य तम् मृजन्ति शुम्भन्ति वाहिन मरुत: गणेन।
कविर्गीर्भि काव्येना कविर् सन्त सोम: पवित्रम् अत्येति रेभन् ।।

**अनुवाद :– पूर्ण परमात्मा (हर्य शिशुम्) विलक्षण बालकाच्या रूपामध्ये (जज्ञानम्) जाणूनबुजून प्रगट होतो. आपल्या तत्त्वज्ञानाचा (तम्) त्यावेळी (मृजन्ति) निर्मळतेसह (शुभन्ति) उच्चार करतो. (वह्नि:) प्रभुप्राप्तीचा विरहाग्नी लागलेल्या (मरुत:) भक्त (गणेन) समूहासाठी (काव्येना) कवितांद्वारे, कवित्वाने (पवित्रम् अत्येति) अत्यंत निर्मळतेच्या वाणीतून (कविरगीर्भि) कबीरवाणी म्हणजेच कबीरवाणीद्वारे (रेभज्) उंच/मोठ्या स्वरात संबोधन करून वक्तव्य करतो/बोलतो. (कविर सन्त सोम:) ते अमरपुरुष म्हणजेच सतपुरुषच संत म्हणजेच ऋषिरूपामध्ये स्वतः कविर्देवच असतात. परंतु त्या परमात्म्यास न ओळखता 'कवि' म्हणू लागतात. परंतु ते पूर्ण परमात्माच असतात. त्यांचे वास्तविक नाव कविर्देव असे आहे.**

**भावार्थ :– ऋग्वेद मण्डल नं. ९ सुक्त नं. ९६ मन्त्र १६ मध्ये म्हटले आहे की या पूर्ण**

**परमात्म्याच्या वास्तविक नावास (नामास) जाणा. याच १७ व्या मंत्रामध्ये त्या परमात्म्याचे नाव व परिपूर्ण परिचय दिलेला आहे. वेद बोलणारा ब्रह्म म्हणत आहे की पूर्ण परमात्मा विलक्षण मनुष्याच्या बालक रूपामध्ये प्रकट होऊन कविर्देव आपले वास्तविक ज्ञान हंसात्म्यांना अर्थात पुण्यात्मा अनुयायींना कविता, लोकोक्तींद्वारे संबोधन करून म्हणजेच उच्चारण करून वर्णन करतात. या तत्त्वज्ञानाच्या अभावाने त्यावेळी प्रगट परमात्म्याला न ओळखता केवळ ऋषि, संत अथवा कवी मानतात. ते परमात्मा स्वतःच म्हणतात की मी पूर्ण ब्रह्म आहे. परंतु लोकवेदांच्या आधाराने परमात्म्याला निराकार मानत असलेले प्रजाजन पूर्ण परमात्म्यास ओळखत नाहीत. गरीब दास जी महाराजांनी काशीमध्ये प्रगट परमात्म्यास ओळखून त्यांची महिमा सांगितली आणि त्या परमात्म्याद्वारे आपली महिमा सांगितलेली होती, त्याचे जसेच्या तसे वर्णन आपल्या वाणीमध्ये केले आहे.**

गरीब, जाति हमारी जगत गुरु, परमेश्वर है पंथ। दास गरीब लिख पड़े नाम निरंजन कंत ।।
गरीब, हम ही अलख अल्लाह है, कुतूब गोस और पीर। गरीबदास खालिफ धनी हमारा नाम कबीर।।
गरीब, सृष्टा मैं, सृष्टि हमरे तीर, दास गरीब अधर बसू। अविगत सत कबीर ।।

**एवढे सर्व स्पष्ट करूनही त्यांना (पूर्ण परमात्मा कविर्देव–कबीर साहेब जी) कवी, संत, भक्त किंवा सामान्य विणकर (कोष्टी) म्हणतात. परंतु ते पूर्ण परमात्माच आहेत. त्यांचे नाव कविर्देव असे आहे. ते स्वतः सतपुरुष कबीरच ऋषि किंवा संत रूपामध्ये असतात. तत्त्वज्ञानहीन ऋषि व संत गुरुंच्या अज्ञान सिद्धांताच्या आधारावर अवलंबून असलेली प्रजा त्या समयी अतिथी रूपामध्ये प्रगट परमात्म्याला ओळखत नाही, कारण त्या अज्ञानी ऋषि, संत व गुरुंनी त्यांना परमात्मा निराकार आहे, असे अयोग्य सांगितलेले असते.**

**ऋग्वेद मण्डल नं. ९ सुक्त नं. ९६ मन्त्र १८**

**ऋषिमना य ऋषिकृत्स्वर्षा: सहस्त्रणीथ: पदवी: कवीनाम् ।**
**तृतीयं धाम महिष: सिषासन्त्सोमो विराजमनु राजति ष्टुप् ।।१८।।**

ऋषिमना य ऋषिकृत स्वर्षा: सहस्त्राणीथ: पदवी: कवीनाम् ।
तृतीयम् धाम महिष: सिषा सन्त सोम: विराजमानु राजति स्टुप् ।।

**अनुवाद :– वेद सांगणारा ब्रह्म सांगत आहे की (य) जे पूर्ण परमात्मा विलक्षण बालकाच्या रूपामध्ये येऊन (कवीनाम) प्रसिद्ध कवीची (पदवी:) उपाधी/पद प्राप्त करून म्हणजेच एखाद्या संत किंवा ऋषिची भूमिका करतात, त्या (ऋषिकृत) संतरूपामध्ये प्रगट झालेल्या प्रभुद्वारे रचलेल्या (सहस्त्राणीथ:) हजार वाण्या (ऋषिमना) संत स्वभावाच्या व्यक्तींना म्हणजेच भक्तांसाठी (स्वर्षा:) स्वर्गतुल्य आनंददायक असतात. (सोम) ते अमरपुरुष म्हणजेच सतपुरुष (तृतीया) तिसरे (धाम) मुक्तिलोक म्हणजेच सत्यलोकाच्या (महिष:) सुदृढ पृथ्वीस (सिषा) स्थापित करून (अनु) नंतर (सन्त) मानवसदृश संतरूपामध्ये (स्टुप) उंच पहाडरूपी सिंहासनावर (विराजमानु राजति) उज्ज्वल स्थूल आकारामध्ये म्हणजेच मानवसदृश तेजोमय शरीरामध्ये विराजमान आहेत.**

**भावार्थ :– १७ व्या मंत्रामध्ये म्हटले आहे की कविर्देव शिशू रूप धारण करतात आणि लीला करत वृद्धिंगत (मोठे) होतात. कवितांतून तत्त्वज्ञानाचे वर्णन करण्यासाठी कवी अशी पदवी प्राप्त करतात. त्यामुळे त्यांना ऋषि, संत, कवी असे म्हणू लागतात. वास्तविक ते पूर्ण परमात्मा कविर्च असतात. त्यांनी रचलेली अमृतवाणी कबीरवाणी (कविर्वाणी) म्हणून संबोधली जाते. ती अमृतवाणी भक्तांसाठी स्वर्गतुल्य सुखदायी असते. तेच परमात्मा तिसऱ्या मुक्तिधामाची म्हणजेच सत्यलोकाची स्थापना करून तेजोमय मानवसदृश शरीरामध्ये आकार स्वरूपात**

विराजमान आहेत.

या मंत्रामध्ये तिसरे धाम सतलोकास म्हटले आहे. जसे ब्रह्मचे लोक हे २१ ब्रह्माण्डांचे क्षेत्र आहे. दुसरे परब्रह्मचे लोक हे सात संख ब्रह्माण्डांचे क्षेत्र आहे आणि तिसरे परम अक्षर ब्रह्म म्हणजेच पूर्ण ब्रह्मचे सतलोक आहे. कारण पूर्ण परमात्म्याने सत्यलोकामध्ये सत्यपुरुष रूपामध्ये विराजमान होऊन खालील लोकांची (धामांची) रचना केली. यासाठी गणना केली.

प्रत्यक्ष डोळ्यांनी बघीतलेले प्रमाण संत गरिबदास महाराजांनी सांगितले की अर्स कुर्स पर सफेद गुम्बज है जहा सतगुरु का डेरा। भावार्थ असा आहे की, वरती आकाशाच्या देखील वरती कबीर परमेश्वराचा एक सफेद घुमट (गुम्बज) आहे तेथे ते राहतात.

ऋग्वेद मण्डल नं. ९ सुक्त नं. ९६ मन्त्र १९

चमूषच्छ्येनः शकुनो विभृत्वा गोविन्दुर्द्रप्स आयुधानि बिभ्रत् ।
अपामूर्भि सचमानाः समुद्रं तुरीयं धाम महिषो विवक्ति ।।१९।।

चमूसत् श्येनः शकुनः विभृत्वा गोबिन्दुः द्रप्स आयुधानि बिभ्रत् ।
अपामूर्भिः सचमानः समुद्रम् तूरीयम् धाम महिषः विवक्ति ।।

अनुवाद :- (च) आणि (मृषत्) पवित्र (गोविन्दुः) कामधेनू रूपी सर्व मनोकामना पूर्ण करणारे पूर्ण परमात्मा कविर्देव (विभृत्वा) सर्वांचे पालन करणारे आहेत. (श्येनः) श्वेत (पांढरा) रंगयुक्त (शकुनः) शुभलक्षणयुक्त (चमुसत्) सर्वशक्तिमान आहेत. (द्रप्सः) जसे दुधापासून दही निर्माण करण्याची विधी असते, तसे शास्त्रानुकूल साधनेने दहीरूपी पूर्ण मुक्तिदाता (आयुधानि) तत्त्वज्ञान रूपी काल जाळ्याचे विनाशक धनुष्ययुक्त सारंगपाणी प्रभु आहेत. (सचमानः) वास्तविक (विभ्रत्) तेच सर्वांचे पालनपोषण करतात. (अपामूर्तिः) अथांग, अत्यंत खोल जलयुक्त (समुद्रम्) सागरासारखे गहन गंभीर म्हणजेच विशाल (तुरीयम) ४ थ्या (धाम) लोकात म्हणजेच अनामीलोकामध्ये (महिषः) उज्ज्वल सुदृढ पृथ्वीवर (विवक्ति) वेगळ्या स्वतंत्र स्थानी भिन्न स्वरूपामध्ये वास्तव्य करतो. ही माहिती स्वतः कविर्देवच विस्ताराने देतात.

**भावार्थ** :- १८ व्या मंत्रामध्ये म्हटले आहे की पूर्ण परमात्मा कविर्देव (कबीर परमेश्वर) तिसऱ्या मुक्तिधामामध्ये म्हणजेच सतलोकामध्ये वास्तव्य करतात. या १९ व्या मंत्रामध्ये म्हटले आहे की पांढराशुभ्र रंग असणारे पूर्ण प्रभु, जे कामधेनूसारखे सर्व मनोकामना पूर्ण करणारे आहेत, वास्तविक तेच सर्वांचे पालनकर्ता आहेत. तेच कविर्देव जे मृत्युलोकात शिशुरूप धारण करून येतात. ज्याप्रमाणे दुधापासून दही तयार करण्याची प्रक्रिया असते, त्याप्रमाणे पूर्ण मोक्ष प्राप्त करण्याची शास्त्रविधीनुसार साधना सांगून पूर्ण मोक्षरूपी दही प्रदान करणारे आहेत. तत्त्वज्ञानरूपी शस्त्र म्हणजेच धनुष्ययुक्त असल्याने ते सारंगपाणी आहेत आणि समुद्राच्या सर्व जलाचा स्त्रोत जसा आहे, तशी पूर्ण परमात्म्याकडून सर्वांची उत्पत्ती झालेली आहे. गीता च्या १५ व्या अध्यायातील ३ ऱ्या श्लोकामध्ये म्हटले आहे की संसाररूपी वृक्षाला तत्त्वज्ञानरूपी शस्त्राद्वारे कापून म्हणजेच तत्त्वज्ञानाद्वारे संशय समाप्त करून, त्यानंतर त्या परमपद परमेश्वराचा शोध केला पाहिजे, जेथे गेल्यानंतर साधक पुन्हा या संसारामध्ये येत नाही म्हणजेच पूर्ण मोक्ष प्राप्त होतो. ज्या परमेश्वराद्वारे सर्व संसाररूपी वृक्षाची प्रवृत्ती विस्तारलेली आहे, ते पूर्ण प्रभु ४ थ्या धामामध्ये म्हणजेच अनामी लोकांमध्ये वास्तव्य करतात. पहिले सतलोक, दुसरे अलखलोक, तिसरे आगमलोक आणि चौथे अनामीलोक आहे. म्हणूनच या १९ व्या मंत्रामध्ये स्पष्ट केलेले आहे की कविर्देवच (कबीर परमेश्वर) अनामीपुरुष रूपामध्ये चौथ्या धामात म्हणजेच अनामीलोकामध्ये अन्य तेजोमय रूप धारण करून वास्तव्य करतात.

**ऋग्वेद मण्डल नं. ९ सुक्त नं. ९६ मन्त्र २०**

**मर्यो न शुभ्रस्तन्व' मृजानोऽस्तो न सृत्वा सनये धनानाम् ।**
**वृषेव यूथा परि कोशमर्षनकनिक्रदच्चम्बोऽरा विवेश ।।२०।।**

मर्य: न शुभ्र स्तन्वम् मृजान: अत्य: न सृत्वा सनये धनानाम्।
वृषेव यूथा परिकोशम् अर्षन् कनिक्रदत् चम्वो: इरा विवेश ।।।

**अनुवाद :- पूर्ण परमात्मा कविर्देव जे चौथ्या धाम म्हणजेच अनामीलोकामध्ये आणि तिसऱ्या धामामध्ये म्हणजे सतलोकामध्ये वास्तव्य करतात, तेच परमात्मा (न मर्य:) मनुष्यासारखे, परंतु नाशरहित म्हणजेच अमर (मृजान:) निर्मळ मुखमंडलयुक्त आकार स्वरूपात (अत्य:) अत्यंत (शुभ्रस्तन्वम्) विशाल श्वेत शरीर धारण करून वरील लोकांमध्ये /धामांमध्ये विराजमान आहेत. तेथे (सृत्वा) गती घेऊन कोणालाही थांगपत्ता लागत नाही अशा स्वरूपात परमात्मा (इरा) पृथ्वीवर (विवेश) अन्य वेशभूषेत म्हणजेच भिन्न रूप (चम्वो:) धारण करून येतात आणि सतलोक व पृथ्वी लोकावर लीला करतात. (यूथा) फार मोठ्या समूहावर वास्तविक (सनये) सनातन पूजेचा (वृषेव) वर्षाव करून (न धनानाम्) त्या रामनामाच्या कमाईने निर्धनांना (कनिक्रदत्) मंद स्वराने म्हणजेच श्वासोच्छ्वासाने मनातल्या मनात उच्चार करून पूजा करवून घेतो. त्यामुळे असंख्य अनुयायांचा पूर्ण संघ/समूह (परिकोशम्) पूर्वीचा सुखसागररूपी अमृत खजिना म्हणजेच सत्यलोक (अर्षन्) पूजा करून प्राप्त करवून घेतो.**

**भावार्थ :- पूर्ण परमात्मा कविर्देव (कबीर परमेश्वर) वरील तिसऱ्या धामामध्ये म्हणजेच सतलोकामध्ये वास्तव्य करतात आणि तेच परमेश्वर अन्य मनुष्यरूप धारण करून चौथ्या धामामध्ये म्हणजे अनामीलोकामध्ये वास्तव्य करतात. तेच परमात्मा मनुष्यसदृश सुंदर मुखमंडलयुक्त श्वेत शरीरयुक्त आकारामध्ये येथे पृथ्वीलोकावरही येतात आणि फार मोठ्या भक्तसमूहाला म्हणजेच पूर्ण संघ/समूहास सत्यभक्तीचे धनी बनवितो. असंख्य अनुयायांचा पूर्ण संघ सत्यभक्तीच्या कमाईने पूर्वीचा सुखमय लोक म्हणजेच पूर्ण मुक्तीचा खजिना म्हणजेच सत्यलोक साधना करून प्राप्त करवून घेतो.**

**अथर्ववेद काण्ड नं. ४, अनुवाक नं.१, मंत्र ७ (संत रामपालजीद्वारे भाषा भाष्य):-**

योऽ थर्वाणं पित्तरं देवबन्धुं बृहस्पतिं नमसाव च गच्छात्।
त्वं विश्वेषां जनिता यथास: कविर्देवो न दभायत् स्वधावान् ।।७।।

य:-अथर्वाणम्-पित्तरम्-देवबंन्धुम्-बृहस्पतिम्-नमसा- अव-च-गच्छात्-त्वम्-विश्वेषाम्-जनिता-यथा-स:-कविर्देव:-न दभायत्-स्वधावान्।

**अनुवाद :- (य:) जे (अथर्वाणम्) अचल म्हणजेच अविनाशी (पित्तरम्) जगतपिता (देवबन्धुम) भक्तांचे वास्तविक सोबती म्हणजेच आत्म्याचा आधार (बृहस्पतिम्) जगद्गुरू (च) आणि (नमसा) विनम्र पुजारी म्हणजेच विधिवत साधना करणाऱ्या साधकास (अव) सुरक्षेसह (गच्छात्) जे सतलोकी गेलेले आहेत, त्यांना सतलोक घेऊन जाणारे (विश्वेषाम्) सर्व ब्रह्माण्डांची (जनिता) रचना करणारे/ निर्माण करणारे (न दभायत) कालसारखा धोका न देणाऱ्या (स्वधावान) स्वभाव म्हणजेच गुणांनी युक्त (यथा) जसेच्या तसे म्हणजेच त्याचप्रमाणे (स:) ते (त्वम्) आपण (कविर्देव: कविर्-देव:) कबीर परमेश्वर म्हणजेच कविर्देव आहात.**

**भावार्थ :- ज्या परमेश्वराविषयी म्हटले जाते- 'त्वमेव माता च पिता त्वमेव, त्वमेव बन्धु च सखा त्वमेव, त्वमेव विद्या च द्रविणम् त्वमेव् सर्वम् मम् देव देव।।ते जे अविनाशी परमात्मा, सर्वांचे माता-पिता आणि बंधू व सखा, जगद्गुरू रूपामध्ये सर्वांना सत्यभक्ती प्रदान करून सतलोकी घेऊन जाणारे, कालसारखे धोका न देणारे, सर्व ब्रह्माण्डांची रचना करणारे कविर्देव (कबीर परमेश्वर) हेच आहेत.**

# कबीर साहेब चारही युगांमध्ये येतात

सतगुरु पुरुष कबीर हैं, चारों युग प्रवान । झुठे गुरुवा मर गए, हो गए भूत मसान ।।

## ‘सतयुगामध्ये कविर्देव (कबीर साहेब) यांचे सतसुकृत नावाने प्रकटन’

तत्त्वज्ञानाच्या अभावाने भक्तजन अशी शंका व्यक्त करतात की विणकर (कोष्टी) रूपात कबीरजी तर वि.सं.१४५५ (सन १३९८) मध्ये काशीमध्ये आलेले आहेत. वेदांमधील ‘कविर्देव’ हे काशीचे विणकर (कोष्टी) कसे काय पूर्ण परमात्मा असू शकतील?

या विषयी संत रामपाल दास जींची प्रार्थना आहे की हेच पूर्ण परमात्मा कविर्देव (कबीर परमेश्वर) वेदांच्या ज्ञानाच्याही पूर्वी सतलोकामध्ये विराजमान होते आणि आपले वास्तविक ज्ञान (तत्त्वज्ञान) प्रदान करण्यासाठी चारही युगांमध्येही स्वतः प्रगट झालेले आहेत. सतयुगामध्ये सतसुकृत नावाने, त्रेतायुगामध्ये मुनिंद्र नावाने, द्वापारयुगामध्ये करुणामय नावाने आणि कलयुगामध्ये वास्तविक कविर्देव (कबीर प्रभु) नावाने प्रगट झालेले आहेत. याशिवाय ते अन्य रूप धारण करून कधीही प्रगट होऊन आपली लीला करून अंतर्धान पावतात. सर्व महर्षी व संत म्हणवून घेणाऱ्यांनी प्रभुला निराकार म्हटलेले असल्यामुळे लीला करण्यासाठी आलेल्या परमेश्वराला अज्ञानी प्रजानन ओळखू शकत नाहीत. वास्तवामध्ये परमात्मा आकारामध्ये आहे, मनुष्य सदृश शरीरयुक्त आहे. परंतु त्यांचे शरीर पंचतत्त्वाने निर्माण झालेले नाही. त्यांचे शरीर एक नूर (तेज) तत्त्वाने बनलेले आहे. जेव्हा इच्छा होईल, तेव्हा ते येथे प्रगट होतात. तेच सर्वांचे उत्पत्तीकर्ता असल्यामुळे ते कधी मातेपासून जन्म घेत नाहीत.

पूर्ण प्रभु कबीरजी (कविर्देव) सतयुगामध्ये सतसुकृत नावाने स्वतः प्रगट झालेले होते. त्यावेळी गरुड, श्री ब्रह्मा आदींना त्यांनी सतज्ञान समजावून सांगितले होते. श्री मनू महर्षींनाही त्यांना तत्त्वज्ञान समजावून सांगायचे होते. परंतु श्री मनूजी परमेश्वराचे ज्ञान सत्य न समजता श्री ब्रह्माजींकडून ऐकलेल्या वेदज्ञानावर आधारीत होऊन आणि आपण निर्माण केलेल्या वेदांच्या निष्कर्षावरच अवलंबून राहिले. याउलट आपण सर्वकाही विपरीत ज्ञान सांगत आहात, असा ते परमेश्वर सतसुकृतजींचा उपहास करू लागले. त्यामुळेच परमेश्वर सतसुकृतांना वामदेव या पर्यायी दुसऱ्या नावाने संबोधले गेले. (वाम याचा अर्थ उलटे, विपरीत. डाव्या हाताला वाम म्हणजेच उलटा हात असे म्हटले जाते आणि उजव्या हाताला सुलटे मानले जाते.)

अशाप्रकारे सतयुगामध्ये परमेश्वर कविर्देवजी सतसुकृत नावाने आले होते. त्यावेळच्या ऋषि व साधकांना त्यांनी वास्तविक ज्ञान समजावून सांगितले होते. परंतु ऋषिंनी ते स्वीकारले नाही आणि सतसुकृतजींना अज्ञानामुळे ते ‘‘वामदेव’’ म्हणू लागले.

यासाठी यजुर्वेदाच्या १२ व्या अध्यायातील ४ थ्या मंत्रामध्ये विश्लेषण आले आहे की यजुर्वेदातील वास्तविक ज्ञान वामदेव ऋषिंनी योग्यप्रकारे जाणले आणि इतरांना समजावून सांगितले. पवित्र वेदांचे ज्ञान समजून घेण्यासाठी कृपया विचार करा– यजुर्वेद जे आहे, ते एक पवित्र पुस्तक आहे. याविषयी कोठे संस्कृत भाषेमध्ये विश्लेषण केलेले आहे, जेथे ‘यजु:’ किंवा ‘यजुम्’आदी शब्द आलेले असतील, तर त्यावरूनही पवित्र पुस्तकाचाच बोध होतो. अशाप्रकारे पूर्ण परमात्म्याचे वास्तविक नाव कविर्देव आहे. या नावाला वेगवेगळ्या भाषांमध्ये कबीर साहेब, कबीर परमेश्वर म्हटले गेलेले आहे. बहुतेक श्रद्धाळू शंका व्यक्त करतात की ‘कविर’ यांना ‘कबीर’ कसे सिद्ध केले? व्याकरणाच्या दृष्टिकोनातून ‘कवि:’चा अर्थ सर्वज्ञ असा होतो. या दासाची (पूर्ण संत रामपालजी

महाराज) प्रार्थना आहे की प्रत्येक शब्दाला कोणता ना कोणता तरी अर्थ असतोच. राहिली गोष्ट व्याकरणाची, भाषा प्रथम निर्माण झाली आहे. कारण वेदवाणी प्रभुद्वारे सांगितली गेली आहे आणि व्याकरण हे नंतर ऋषिंनी निर्माण केलेले आहे आणि त्याच्यात काही त्रुटी देखिल असू शकतात. वेदांच्या अनुवादामध्ये (भाषा-भाष्य) व्याकरण हे व्यत्यय आहे म्हणजेच असंगत व विरुद्ध भाव आहे. कारण वेदवाणी ही मंत्रांमधील पद्यरचना आहे. पलवल शहराच्या आसपासच्या व्यक्ती पलवलचा उच्चार 'परवर' असा करतात. आता एखादा कोणी म्हणू लागला की पलवल शब्दावरून 'परवर' कसे काय सिद्ध होणार, तर त्याला काय समजावून सांगणार? त्याप्रमाणेच कविर्वरून कबीर कसे काय सिद्ध केले, असे म्हटल्यासारखे आहे. जसे स्थानिक भाषेमध्ये पलवल शहराला परवर म्हणतात, तसे कविर् यांना कबीर म्हटले जाते आणि वास्तविक प्रभू तेच आहेत. महर्षी दयांनदजींनी 'सत्यार्थ प्रकाश' समुल्लास '४'च्या पान नं. १०० वर (दयानंद मठ, दीनानगर, पंजाब येथून प्रकाशित) 'देवृकामा'चा अर्थ 'देवर की कामना करना' म्हणजेच दिराची कामना करणे असा केला आहे. यातील देवृमधील 'वृ' अक्षरातील '- ृ -' याचा पूर्ण 'र' असा अर्थ लिहून 'देवर' असे केले आहे. अशाप्रकारे कविर्चे 'कविर' आणि नंतर भाषाभिन्नतेमुळे कबीर लिहण्यामध्ये व बोलण्यामध्ये कोणतीच आपत्ती अथवा व्याकरणातील त्रुटी नाही. पूर्ण परमात्मा हे कविर्देव आहेत. हेच प्रमाण यजुर्वेदाच्या २९ व्या अध्यायातील २५ वा मंत्र आणि सामवेदमधील संख्या १४०० मध्येही आहे. ते खालीलप्रमाणे :-

यजुर्वेदच्या अध्याय नं २९ चे श्लोक नं. २५ (संत रामपाल दास द्वारा भाषा-भाष्य) :-

समिद्धोऽअद्य मनुषो दुरोणे देवो देवान्यजसि जातवेद:।
आ च वह मित्रमहश्चिकित्वान्त्वं दूत: कविरसि प्रचेता: ।।२५।।

समिद्ध.-अद्य-मनुष:-दुरोणे-देव:-देवान्-यज्-असि-जात-वेद:-आ-च-वह-मित्रमह:-चिकित्वान्-त्वम्-दूत:-कविर्-असि-प्रचेता:।

**अनुवाद :-** (अद्य) आज म्हणजेच वर्तमानात (दुरोणे) शरीररूपी महालामध्ये दुराचारपूर्वक (मनुष्य:) असत्य पूजेमध्ये लीन मननशील व्यक्तींना (समिद्ध:) लावलेला अग्नी म्हणजेच शास्त्रविधिरहित वर्तमान पूजा जी हानिकारक आहे, त्या स्थानावर (देवान्) देवतांची (देव:) देवता (जातवेद:) पूर्ण परमात्मा सतपुरुषांची वास्तविक (यज्) पूजा (असि) आहे. (आ) दयाळू (मित्रमहा:) जीवांचे वास्तविक सोबती पूर्ण परमात्माच आपल्या (चिकित्वान ) स्वस्थ ज्ञानास म्हणजेच यथार्थ भक्तीस (दूत:) संदेशवाहक रूपामध्ये (वह) घेऊन येणारे (च) आणि (प्रचेता) बोध करून देणारे (त्वम) आपण (कविरसि) कविर्देव म्हणजेच कबीर परमेश्वर आहात.

भावार्थ :- ज्यावेळी पूर्ण परमात्मा प्रगट होतात, त्यावेळी सर्व ऋषि व संतजन शास्त्रविधीचा त्याग करून मनमानी आचरण करतात म्हणजेच पूजेद्वारे सर्व भक्त समाजाला अयोग्य मार्गदर्शन करत असतात. तेव्हा आपल्या तत्त्वज्ञानाचे म्हणजेच शास्त्रोक्त विधीचे स्वस्थ ज्ञानाचे संदेशवाहक बनून स्वतः कविर्देव म्हणजे कबीर प्रभूच येतात.

संख्या नं. १४०० सामवेद उतार्चिक अध्याय नं. १२ खण्ड नं. ३ श्लोक नं. ५ (संत रामपाल दासद्वारा भाषा-भाष्य:) :-

भद्रा वस्त्रा समन्याऽवसानो महान् कविर्निवचनानि शंसन् ।
आ वच्यस्व चम्वोः पूयमानो विचक्षणो जागृविर्देववीतौ ।।५।।

भद्रा–वस्त्रा–समन्या–वसानः–महान्–कविर–निवचनानि्–शंसन्–आवच्यस्व–चम्वोः–पूयमानः–विचक्षणः–जागृविः–देव–वीतौ

**अनुवाद :– (विचक्षणः) चतुर व्यक्तींनी (आवच्यस्व) आपल्या वचनांद्वारे म्हटलेले असते की जे आम्ही प्रवचन करतो त्याचे अनुसरण करा. त्या चतुर व्यक्तींनी पूर्ण ब्रह्मची पूजा न सांगता अन्य उपासनेचे मार्गदर्शन करून अमृताच्या स्थानी (पूयमानः) अन्य उपासनारूपी पू/घाणीस (जसे भूत–प्रेतपूजा, पितृपूजा, तीन गुणांची (रजगुण–ब्रह्मा, सतगुण–विष्णु, तमगुण–शिवशंकर) आणि ब्रह्म–कालपर्यंतची पूजा) यांचे (चम्वोः) आदरयुक्त आचमन करवून घेत आहेत. अर्थात, शास्त्राविरुद्ध अयोग्य ज्ञान समाप्त करण्यासाठी (भद्रा) परमसुखदायक (महान कविर्) महान कविर म्हणजेच पूर्ण परमात्मा कबीर (वस्त्रा) सशरीर साधारण वेशभूषेमध्ये (वस्त्र याचा अर्थ वेशभूषा असा आहे. संतभाषेमध्ये याला चोला असेही म्हणतात. चोला याचा अर्थ शरीर असा होतो. एखाद्या संताचा देहांत झाल्यावर चोला/शरीररूपी वस्त्राचा त्याग करून गेले, असे म्हणतात.) (समन्या) आपल्या सतलोकीच्या शरीरासारखे दुसरे कमी तेजःपुंजाचे शरीर धारण करून (वसानः) सर्वसामान्य व्यक्तीसारखे जीवन जगून काही दिवस या संसारामध्ये अतिथीसारखे वास्तव्य करून (निवचनानि) आपल्या शब्दावली, कबीरवाणी आदींच्या माध्यमातून सत्यज्ञानाचे (शंसन्) वर्णन करून (देव) पूर्ण परमात्म्याच्या (वीतौ) लपून राहिलेल्या सगुण–निर्गुण ज्ञानरूपी धनास (जागृविः) जागृत करतात.**

भावार्थ :– यजुर्वेदाच्या ५ व्या अध्यायातील पहिल्या मंत्रामध्ये म्हटले आहे की 'अग्नेः तनुः असि' म्हणजे परमेश्वर सशरीर आहे. 'विष्णवे त्वा सोमस्य तनुः असि' म्हणजे त्या अमर प्रभूचे पालनपोषण करण्यासाठी अन्य शरीर आहे, जे अतिथी रूपामध्ये काही दिवस या संसारामध्ये येतात. तत्त्वज्ञानाच्या अज्ञानामुळे झोपलेल्या प्रभुप्रेमींना जागे करतात, हेच प्रमाण या मंत्रामध्ये आहे की काही कालावधीसाठी पूर्ण परमात्मा कर्विदेव म्हणजे कबीर प्रभु आपले रूप बदलून सर्वसामान्य व्यक्तीसारखे रूप घेऊन पृथ्वी मंडलावर प्रगट होतात आणि 'कविर्निवचनानि' शंसन म्हणजे कविर्वाणी सांगतात. या माध्यमातून ते तत्त्वज्ञानास जागे करतात व त्यावेळी महर्षी म्हणवून घेणारे चतुर प्राणी मिथ्या ज्ञानाच्या आधारावर शास्त्रविधिनुसार सत्यसाधनारूपी अमृताच्या जागी शास्त्रविधिरहित पूजारूपी पू/घाणीस श्रद्धेसह आचमन करवून म्हणजे पूजा करवून घेत असतात. त्यावेळी पूर्ण परमात्मा स्वतः प्रगट होऊन तत्त्वज्ञानाद्वारे शास्त्रविधिनुसार साधनेचे ज्ञान प्रदान करतात.

पवित्र ऋग्वेदाच्या खालील मंत्रामध्येही परमात्म्याची ओळख सांगितलेली आहे की जे पूर्ण परमात्मा काही कालावधीसाठी संसारामध्ये लीला करण्यासाठी येतात, तेव्हा शिशुरूप धारण करतात. त्या पूर्ण परमात्म्याचे पालनपोषण (अध्न्य धेनवः) कुमारी/न व्यायलेल्या) गाईद्वारे होते. नंतर ते लीला करून मोठे होतात, तेव्हा आपल्या प्राप्तीचा व सतलोकी जाण्याच्या म्हणजे पूर्ण मोक्षमार्गाचे तत्त्वज्ञान (कविर्गिभिः) कबीरवाणीद्वारे, कवितांद्वारे सांगतात. त्यामुळे त्यांना प्रसिद्ध कवी म्हणून संबोधले जाते. परंतु तेच स्वयं कविर्देव, पूर्ण परमात्माच असतात, जे तिसऱ्या मुक्तिधामी सतलोकी वास्तव्य करतात.

**ऋग्वेद मण्डल ९ सूक्त १ मंत्र ९ तसेच सूक्त ९६ मंत्र १७-१८ :-**

**ऋग्वेद मण्डल ९ सूक्त १ मंत्र ९**

अभी इमं अध्न्या उत श्रीर्णान्ति धेनवः शिशुम । सोममिन्द्राय पातवे ।।९।।
अभी इमम्-अध्न्याः उत श्रीणन्ति धेनवः शिशुम् सोमम् इन्द्राय पातवे ।।

**अनुवाद :- (उत) विशेषकरून (इमम्) या (शिशुम्) बालक रूपामध्ये प्रगट (सोमम्) पूर्ण परमात्मा अमर प्रभुच्या (इन्द्राय) सुख-सुविधांद्वारे म्हणजेच खाण्या-पिण्याद्वारे ज्या शरीराची वृद्धी होते, त्याचे (पातवे) वृद्धीसाठी (अभि) पूर्णपणे (अध्न्या धेनवः) कधीही न व्यायलेल्या गाईच्या म्हणजेच कुमारी गाईच्या (श्रीणन्ति) दुधाने पालनपोषण होते.**

**भावार्थ :- पूर्ण परमात्मा अमरपुरुष जेव्हा लीला करणारे बालक रूप धारण करून स्वतः प्रगट होतात, त्या वेळी कुमारी गाय आपोआप दूध देते आणि त्याने पूर्ण प्रभुंचे पालनपोषण होते.**

**ऋग्वेदाच्या ९ व्या मंडलातील ९६ व्या सुक्तामधील १७ वा मंत्र**

शिशुम् जज्ञानम् हर्य तम् मृजन्ति शुम्भन्ति- वहि्नमरूतः गणेन।
कविर्गीर्भि काव्येना कविर् सन्त् सोमः पवित्रम् अत्येति रेभन् ।।१७।।

**अनुवाद :- पूर्ण परमात्मा (हर्य शिशुम) मनुष्याच्या बालकाच्या रूपामध्ये (जज्ञानम) जाणूनबुजून प्रगट होतात आणि आपल्या तत्त्वज्ञानाचे (तम्) त्यावेळी (मृजन्ति) निर्मळपणे (शुभन्ति) उच्चारण करतात. (वहि्न) प्रभुप्राप्तीचा विरहाग्नी लागलेल्या (मरुतः) वायूसारख्या शीतल भक्त (गणेन) समूहासाठी (काव्येना) कवितांद्वारे, काव्याने (पवित्रम् अत्येति) अत्यधिक वाणी निर्मळतेसह (कविर गीर्भि) कविर वाणी म्हणजेच कबीरवाणीद्वारे (रेभन्) उंच स्वरात संबोधन करून सांगतात. (कविर सन्त् सोम.) ते अमरपुरुष म्हणजे सतपुरुषच संत अर्थात ऋषिंच्या रूपामध्ये स्वतः कविर्देवच असतात. परंतु त्या परमात्म्यास न ओळखता कवी असे म्हणू लागतात.**

**भावार्थ :- वेद बोलणारा ब्रह्म म्हणत आहे की विलक्षण मनुष्याच्या बालक रूपामध्ये प्रगट होऊन पूर्ण परमात्मा कविर्देव आपल्या वास्तविक ज्ञानास आपल्या 'कविर्गिर्भिः' म्हणजेच कबीरवाणीद्वारे निर्मळ ज्ञानास, आपल्या हंसात्म्यांना म्हणजेच पुण्यात्मे अनुयायांना कवी रूपामध्ये कवितांच्या लोकोक्तींद्वारे संबोधन करून म्हणजेच उच्चारण करून वर्णन करतात. ते स्वतः सतपुरुष कबीरच असतात.**

**ऋग्वेदाच्या ९ व्या मंडलातील ९६ व्या सुक्तामधील १८ वा मंत्र**

ऋषिमना य ऋषिकृत् स्वर्षाः सहस्राणीथः पदवीः कवीनाम् ।
तृतीयम् धाम महिषः सिषा सन्त् सोमः विराजमानु राजति स्टुप् ।।

**अनुवाद :- वेद सांगणारा ब्रह्म म्हणत आहे की (य) जे पूर्ण परमात्मा विलक्षण बालकाच्या रूपामध्ये येऊन (कवीनाम) प्रसिद्ध कवींची (पदवी) उपाधी प्राप्त करून म्हणजेच एखाद्या संत किंवा ऋषिची भूमिका करतात. त्या (ऋषिकृत) संत रूपामध्ये प्रगट झालेल्या प्रभुंद्वारे रचलेल्या (सहस्राणीथः) हजारो वाणी (ऋषिमना) संत स्वभावाच्या व्यक्ती म्हणजे भक्तांसाठी (स्वर्षाः) स्वर्गतुल्य आनंददायक होतात. (सन्त् सोमः) ऋषि-संत रूपामध्ये प्रगट झालेले ते अमरपुरुष म्हणजेच सतपुरुषच असतात. ते**

पूर्ण प्रभु (तृतीया) तिसरे (धाम) मुक्तिलोक म्हणजेच सतलोकीच्या (महिष:) सुदृढ पृथ्वीला (सिषा) स्थापित करून (अनु) त्यानंतर मानवसदृश संत रूपामध्ये (स्तुप्) उंच किल्ल्यासारख्या सिंहासनावर (विराजमनु रार्जात) उज्ज्वल स्थूल आकारामध्ये म्हणजे मानवसदृश शरीरामध्ये विराजमान आहेत.

भावार्थ :- १७ व्या मंत्रामध्ये म्हटले आहे की कविर्देव शिशुरूप धारण करून येतात. लीला करत मोठे (वृद्धिंगत) होतात. कवितांद्वारे तत्त्वज्ञानाचे वर्णन करण्यासाठी कवीची पदवी प्राप्त करतात म्हणजे त्यांना कवी असे संबोधले जाऊ लागते. वास्तविक ते पूर्ण परमात्मा कविरच (कबीर प्रभु) आहेत. त्यांनी रचलेली अमृतवाणी कबीरवाणी (कविर्गिभि: म्हणजे कविर्वाणी) म्हणून संबोधली जाते. ती भक्तांसाठी स्वर्गतुल्य सुखदायी होते. तेच परमात्मा तिसरे मुक्तिधाम म्हणजे सतलोकाची स्थापना करून तेजोमय मानवसदृश शरीरामध्ये आकार स्वरूपात विराजमान आहेत.

या मंत्रामध्ये तिसरे धाम असे सतलोकास म्हटले आहे. जसे पहिले ब्रह्मलोक जे २१ ब्रह्माण्डांचे क्षेत्र आहे, दुसरे परब्रह्माचे लोक जे सात संख ब्रह्माण्डांचे क्षेत्र आहे आणि तिसरे परम अक्षर ब्रह्म म्हणजे पूर्ण ब्रह्म यांचे ऋतुधाम म्हणजे सतलोक आहे.

## ''त्रेतायुग मध्ये कविर्देवांचे (कबीर साहेब) मुनिंद्र नावाने प्राकाट्य''

### ''नल तथा नील यांना शरणामध्ये घेणे''

त्रेतायुगामध्ये स्वयंभू कविर्देव (कबीर परमेश्वर) रूपांतर करून मुनिंद्र ऋषिंच्या नावाने आले होते. एक दिवस अनल म्हणजेच नल व अनिल म्हणजे नीलने मुनिंद्रसाहेब जींचा सत्संग ऐकला. ते दोघेही एकमेकांचे मावसभाऊ होते. त्यांच्या मात्या-पित्यांचे निधन झाले होते. नल व नील दोघेही शारीरिक व मानसिक रोगाने अत्यंत पीडित होते. सर्व ऋषि व संतांना त्यांनी कष्ट निवारणाची प्रार्थना केली होती. सर्वच संतांनी सांगितले होते की हा तुमच्या प्रारब्धानुसार आलेला पापकर्मांचा दंड आहे. तो तुम्हाला भोगावाच लागेल. याचे कोणतेच समाधान नाही, कोणताच उपाय नाही. दोघेही मित्र जीवनात नैराश्य येऊन मृत्यूची वाट पाहत होते.

एक दिवस दोघांनाही मुनिंद्र नावाने प्रकट झालेल्या पुर्ण परमात्माचा सत्संग ऐकण्याचा मोका मिळाला. सत्सगांनंतर दोघांनीही परमेश्वर कविर्देव (कबीर साहेब जी) ऊर्फ मुनिंद्र ऋषिजींच्या चरणांना स्पर्श केला. परमेश्वर मुनिंद्रजींनी त्यांच्या डोक्यावर हात ठेवताक्षणी दोघांचेही असाध्य रोग बरे झाले आणि नील व नल दोघेही स्वस्थ झाले. हा अद्‌भुत चमत्कार पाहून प्रभुंच्या चरणी तासन् तास अश्रू ढाळू लागले. ते म्हणू लागले की ज्यांचा आम्हाला शोध होता, ते प्रभु आज आम्हाला भेटले. मुनिंद्रसाहेबजींच्या कृपेने प्रभावित होऊन दोघांनीही त्यांच्याकडून नामदीक्षा घेतली आणि मुनिंद्रसाहेबजींच्या सोबतच सेवेमध्ये राहू लागले. पूर्वी संतांचा समागम पाण्याची व्यवस्था पाहून नदीच्या किनारी होत असे. नल आणि नील दोघेही अत्यंत प्रभुप्रेमी व भोळे आत्मे होते. परमात्म्यावर त्यांची दृढ श्रद्धा होती. ते खूप आत्मीयतेने सेवा करायचे. सत्संगामध्ये रोगी, वृद्ध व विकलांग भक्तजन यायचे, तेव्हा ते त्यांची वस्त्रे धुवायचे आणि भांडी घासायचे. ते भोळ्या मनाचे होते. कपडे धुताना सत्संगामध्ये प्रभुंची जी कथा ऐकलेली असेल, त्यावर चर्चा करायचे. प्रभुंविषयीच्या चर्चेमध्ये ते अत्यंत गुंग होऊन जायचे.

त्यामुळे नदीच्या पाण्यात वस्तू धुताना त्यातील काही पाण्यात हरवायच्या. त्यांना ते कळायचेदेखील नाही. एखाद्याच्या चार वस्तू घेऊन जायचे आणि त्यातील दोनच परत आणून द्यायचे. भक्तजन म्हणायचे, 'भाऊ, तुम्ही सेवा खूप करता. परंतु आमचे सगळे काम बिघडवून टाकता. आता या हरवलेल्या वस्तू आम्ही कोठून घेऊन येणार? तुम्ही आमची सेवा करायची सोडून द्या. आमची व्यवस्था आम्हीच बघतो.' हे ऐकून नल व नील रडायला लागायचे. म्हणायचे, 'आमची सेवा नाकारू नका. परत आम्ही तुमची कोणतीच वस्तू हरवणार नाही.' परंतु नंतरही तेच व्हायचे. ते पुन्हा प्रभु चर्चेमध्ये लागायचे आणि वस्तू बुडायच्या. भक्तजनांनी मुनिंद्रजींना प्रार्थना केली की भगवंत, कृपा करा आणि नल व नील यांना समजावून सांगा. ते दोघेही आमचे ऐकत नाहीत आणि आम्ही काही बोललो तर लगेच रडू लागतात. धुवायला नेलेल्या आमच्या निम्म्या वस्तू देखिल परत येत नाहीत. हे दोघे तर बघेन तेव्हा भगवानांच्या चर्चेमध्ये मग्न होतात आणि पाण्यात वस्तू बुडलेल्या यांच्या लक्षातही येत नाही. मुनिंद्रसाहेबांनी एक-दोन वेळा त्यांना समजावून सांगितले, त्यावेळी साहेब, आमची ही सेवा आमच्यापासून हिरावून घेऊ नका, असे म्हणत ते रडू लागले. सतगुरु मुनिंद्रसाहेबांनी त्यांना आशीर्वाद दिला आणि म्हणाले की बाळांनो, भरपूर सेवा करा. यापुढे तुमच्या हातून कोणतीही वस्तू, अगदी दगड किंवा लोखण्ड देखिल पाण्यात बुडणार नाही.

आपण रामायण ऐकले आहेच. रावणाने सीतेला फसवून पळवून नेले. सीतेला कोणी पळवून नेले, हे भगवान रामचंद्रांना माहीत नव्हते. त्यांनी अनेक ठिकाणी सीतेचा शोध घेतला. शेवटी हनुमानाने शोध घेऊन सांगितले की सीतामाता लंकापती रावणाच्या कैदेमध्ये आहे. हे कळाल्यावर भगवान रामांनी रावणाजवळ शांतिदूत पाठविला आणि सीतेला परत करण्याची प्रार्थना केली. परंतु रावणाने ती मान्य केली नाही. युद्धाची तयारी झाली, तेव्हा समुद्रातून वानरसेना पलीकडे कशी न्यायची, ही समस्या उभी राहिली?

भगवान श्री रामचंद्रांनी तीन दिवस गुडघ्यापर्यंत पाण्यामध्ये उभे राहून हात जोडून मार्ग मोकळा करून द्या, अशी समुद्राला प्रार्थना केली. परंतु समुद्राने काही एक ऐकले नाही. समुद्र मानत नाही, हे पाहून श्रीरामांनी त्याला अग्निबाणाने भस्म करायचा विचार केला. भयभीत समुद्र ब्राह्मणाच्या रूपामध्ये समोर येऊन श्रीरामांना म्हणाला की भगवान, प्रत्येकाला आपापल्या मर्यादा आहेत. तुम्ही मला जाळू नका. माझ्यामध्ये कितीतरी जीवजंतू सामावलेले आहेत. जरी आपण मला जाळून टाकले, तरीही आपण मला पार करू शकणार नाही. कारण अग्निबाणाने येथे अत्यंत खोल खड्डा निर्माण होईल आणि तुम्ही तो कधीही पार करू शकणार नाही.

भगवान, सापही मरेल आणि काठीही तुटणार नाही, असे काही तरी करा. त्यातून माझी मर्यादाही अभंग राहील आणि आपल्यासाठी पूल देखिल बनेल.भगवान श्रीरामांनी समुद्राकडे याबाबत सविस्तर विचारणा केली, तेव्हा ब्राह्मण रूपातील समुद्र म्हणाला की आपल्या सेनेमध्ये नल आणि नील नावाचे दोन सैनिक आहेत. त्या दोघांजवळ त्यांच्या गुरुदेवांपासून प्राप्त झालेली अशी एक शक्ती आहे की त्यांच्या हातून पडलेले दगड पाण्यावर तरंगतात. कोणतीही वस्तू, अगदी लोखण्डही त्यांनी पाण्यात टाकले तरी ते तरंगते. श्री रामचंद्रांनी नील व नल यांना बोलावले आणि तुमच्याजवळ अशी कोणती शक्ती आहे काय, असे विचारले. त्या दोघांनीही याला होकार दिला. ते

म्हणाले की आम्ही टाकलेले दगड पाण्यामध्ये बुडत नाहीत. श्रीराम म्हणाले, ''मला याचे प्रात्यक्षिक दाखवा.''

त्या मूर्खांनी (नल-नील) विचार केला की आज सर्वांसमोर आपली महिमा गायिली जाईल. या विचारात त्या दिवशी त्यांनी आपले गुरुदेव मुनिंद्र (कबीर साहेब जी) यांचे स्मरणही केले नाही. जर आपण गुरुदेवांचे स्मरण केले तर कदाचित आपल्याजवळ शक्ती नाही, आपण दुसऱ्या कोणाकडे तरी शक्ति मागत आहे, असा श्रीराम विचार करतील असे त्यांना वाटले. या विचारात त्यांनी दगड उचलून पाण्यामध्ये टाकला. परंतु तो पाण्यामध्ये बुडला. दोघांनीही खूप प्रयत्न केला. परंतु त्यांच्या हातून दगड तरंगला नाही. तेव्हा या दोघांमध्ये कोणतीही शक्ती नाही. आपण खोटे सांगत आहात, अशा नजरेने भगवान रामचंद्रांनी समुद्राकडे पाहिले. त्यावेळी समुद्राने नल आणि नील यांना आज त्यांनी आपल्या गुरुदेवांचे स्मरण केले नसल्याचे सांगितले. समुद्रदेव त्यांना म्हणाले, ''मूर्खांनो, आधी आपल्या गुरुदेवांचे स्मरण करा.'' आपल्या दोघांच्याही हातून आज चूक घडली आहे, हे त्यांना उमगले. त्यांनी सतगुरु मुनिंद्रसाहेब जींचे स्मरण केले. सतगुरु मुनिंद्र (कबीर साहेब) तेथे प्रगट झाले. भगवान रामचंद्रजी त्यांना म्हणाले की हे ऋषिवर, माझे दुर्भाग्य आहे की आपल्या सेवकांकडून दगड तरंगत नाहीत.' मुनिंद्रसाहेब जी म्हणाले की 'आता त्यांच्या हातून ते तरंगणार नाहीत. कारण त्यांना अभिमान झालेला आहे.' सद्गुरूंच्या वाणीमध्ये प्रमाण आहे की :-

गरीब, जैसे माता गर्भ को, राखे जतन बनाय। ठेस लगे तो क्षीण होवे, तेरी ऐसे भक्ति जाय।

त्या दिवसापासून नल आणि नील यांची ती शक्ती नाहीशी झाली. श्री रामचंद्रजी परमेश्वर मुनिंद्रसाहेबजींना म्हणाले की 'हे ऋषिवर, माझ्यावर मोठी आपत्ती आलेली आहे. कृपया दया करा. काहीही करून सैन्य पलीकडे गेले पाहीजे.' मुनिंद्रसाहेब म्हणाले की 'हा जो समोरचा डोंगर आहे, त्याच्या चारही दिशांनी मी एक रेखा (रेषा) आखलेली आहे. त्या रेषेमधील दगड उचलून घेऊन या. ते बुडणार नाहीत.' श्रीरामाने परीक्षणासाठी दगड मागविला. तो पाण्यावर ठेवताच तरंगू लागला. नल व नील कारागीरही (शिल्पकार) होते. हनुमानजी दररोज भगवंतांचे स्मरण करत असत. त्यांचा आपला दिनक्रमही चालू होता, त्याचबरोबर भक्तीने राम राम असे लिहून डोंगरचे डोंगरही उचलून आणत होते. ते डोंगर फोडून, त्यातील दगड घडवून नल आणि नील पुलामध्ये बसवत होते. अशाप्रकारे पूल तयार झाला. धर्मदासजी म्हणत आहेत की :-

रहे नल नील जतन कर हार, तब सतगुरू से करी पुकार।
जा सत रेखा लिखी अपार, सिन्धु पर शिला तिराने वाले।
धन-धन सतगुरु सत कबीर, भक्त की पीर मिटाने वाले।

काही जण म्हणतात की हनुमानजींनी दगडांवर रामाचे नाव लिहिलेले होते, त्यामुळेच दगड तरंगले, काही जण म्हणतात, नल आणि नील यांनी पूल बांधला होता, तर कोणी म्हणतात, श्रीरामांनी पूल बनविला होता. परंतु यासंबंधीची जी सत्यकथा अशी आहे, ती आपणास वर सांगितलेली आहे.

**(सतकबीर की साखी - पान नं. १७९ ते १८२ पर्यंत)**

**-: पीव पिछानास अंग :-**

कबीर- तीन देव को सब कोई ध्यावै, चौथे देव का मरम न पावै।

चौथा छाड़ पंचम को ध्यावै, कहै कबीर सो हम पर आवै ।।३।।
कबीर- ओंकार निश्चय भया, यह कर्ता मत जान।
साचा शब्द कबीर का, परदे मांही पहचान ।।५।।
कबीर- राम कृष्ण अवतार हैं, इनका नांही संसार।
जिन साहेब संसार किया, सो किन्हूं न जन्म्या नार ।।१७।।
कबीर- चार भुजा के भजन में, भूलि परे सब संत।
कबिरा सुमिरो तासु को, जाके भुजा अनंत ।।२३।।
कबीर- समुद्र पाट लंका गये, सीता को भरतार।
ताहि अगस्त मुनि पीय गयो, इनमें को करतार ।।२६।।
कबीर- गिरवर धारयो कृष्ण जी, द्रोणागिरि हनुमंत।
शेष नाग सब सृष्टि सहारी, इनमें को भगवंत ।।२७।।
कबीर- काटे बंधन विपति में, कठिन किया संग्राम।
चिन्हों रे नर प्राणियां, गरूड बड़ो की राम ।।२८।।
कबीर- कह कबीर चित चेतहूं, शब्द करौ निरूवार।
श्रीरामहि कर्ता कहत हैं, भूलि परयो संसार ।।२९।।
कबीर- जिन राम कृष्ण व निरंजन कियो, सो तो करता न्यार।
अंधा ज्ञान न बूझई, कहे कबीर विचार ।।३०।।

## ''द्वापारयुगामध्ये कविर्देव (कबीर साहेब) करुणामय नावाने प्राकाट्य''

परमेश्वर कबीर (कविर्देव) द्वापारयुगामध्ये करुणामय नावाने प्रकट झाले होते. त्यावेळी वाल्मीक जातीमध्ये जन्मलेला एक भक्त सुदर्शन सुपच (हरिजन) त्यांचा शिष्य झालेला होता. याच सुदर्शनजींनी पांडवांचा यज्ञ यशस्वी केला होता. हा यज्ञ श्री कृष्णजींच्या भोजन करण्याने सफल झालेला नव्हता, तसेच तेहतीस कोटी देवता. ८८ हजार ऋषि, १२ कोटी ब्राह्मण, नवनाथ, ८४ सिद्ध आदींच्या भोजनानेही हा यज्ञ यशस्वी झालेला नव्हता. भक्त सुदर्शन सुपच वाल्मीक पूर्ण गुरुजींपासून वास्तविक तीन-मंत्र प्राप्त करून सतसाधना गुरुमर्यादेमध्ये राहून करत होते. त्यांच्या भोजनामुळेच पांडवांचा यज्ञ सफल झाला.

## ''द्वापारयुगात इन्द्रमतीला शरण मध्ये घेणे''

द्वापारयुगामध्ये चंद्रविजय नावाचा एक राजा होऊन गेला. त्याची पत्नी इन्द्रमती अत्यंत धार्मिक प्रवृत्तीची होती. ती संत-महात्म्यांचा अत्यंत आदर करत असे. तिने एक गुरुदेवही केले होते. तिच्या गुरुदेवांनी तिला सांगितले होते की मुली, साधुसंतांची सेवा करणे आवश्यक आहे. संतांना भोजन दिल्याने फार फायदा होतो. एकादशीचे व्रत, मंत्रजप आदी साधना ज्या गुरुदेवांनी सांगितल्या होत्या, त्यामध्ये, भगवत भक्तीमध्ये ती अत्यंत दृढ झाली होती. गुरुदेवांनी सांगितले होते की संतांना भोजन करवशील तर तू पुढेही राणी बनशील आणि तुला स्वर्गप्राप्ती होईल. राणी इंद्रमतीने ठरविले की दररोज एका संतास भोजन अवश्य करवायचे. तिने मनामध्ये ही प्रतिज्ञा बिंबवली की आधी संतांना भोजन करवायचे आणि मग आपण आहार घ्यायचा. त्यामुळे आपली प्रतिज्ञा नेहमी आठवणीत राहील, कधीही विसरणार नाही. राणी दररोज आधी एका संतास

भोजन द्यायची आणि नंतरच आपण घ्यायची. अनेक वर्षे हा उपक्रम चालू होता.

पुढे एकदा हरिद्वारला कुंभमेळा भरला होता. जितके त्रिगुणी मायेचे उपासक संत होते, ते सर्व गंगा नदीमध्ये स्नानासाठी गेले होते. त्यामुळे कित्येक दिवस राणीला भोजन करवण्यासाठी कोणी संतच मिळाला नाही. राणी इंद्रमतीने स्वतःही भोजन केले नाही. चौथ्या दिवशी ती आपल्या दासीला म्हणाली की कोणी संत भेटतो का, बघ तरी. नाही तर आज तुझी ही राणी जिवंत राहणार नाही. आज माझी प्राणज्योत मालवली तरी चालेल. पण मी भोजन करणार नाही. ते दीनदयाळ कबीर परमेश्वर आपल्या पूर्वीच्या भक्ताला शरण घेण्यासाठी कोणते कारण बनवतील, काहीच सांगता येत नाही. दासीने महालाच्या गच्चीवर जाऊन पाहिले तर समोरून एक संत येत होते. त्यांनी श्वेत वस्त्र परिधान केलेले. द्वापारयुगामध्ये परमेश्वर कबीर 'करुणामय' नावाने प्रकट झाले होते. दासीने खाली येऊन राणीस सांगितले की साधूसारखी एक व्यक्ती दृष्टीस पडत आहेत. राणी म्हणाली की लवकर जाऊन त्यांना बोलावून आण. दासी महालाबाहेर गेली आणि तिने प्रार्थना केली की 'साहेब, आपणास आमच्या राणीने स्मरण केलेले आहे.' करुणामय साहेब म्हणाले की 'राणी माझे का स्मरण करत आहे? माझा आणि राणीचा काय संबंध?' दासीने त्यांना सर्व हकीकत सांगितली. करुणामयसाहेब (कबीर) म्हणाले की राणीला जर आवश्यकता असेल, तर तिने येथे यावे. मी येथेच उभा आहे. मी तिथे गेलो आणि तुला कोणी बोलवलंय, असे ती म्हणाली किंवा तिचा पती राजाने काही अपशब्द काढले तर? बेटी, संतांचा अनादर अत्यंत पापदायक ठरतो. यावर दासी परत आली आणि तिने राणीला सर्व वार्ता ऐकवली. राणी दासीला म्हणाली की माझा हात पकड आणि चल तिकडे. तेथे जाताच राणीने दंडवत घातला आणि प्रार्थना केली, 'हे परवरदिगार, मला वाटते की आपणाला खांद्यावर बसवून घेऊन जावं.' करुणामयसाहेब जी म्हणाले, ''हे मुली, तुझ्यामध्ये कोणता श्रद्धा भाव आहे की अशीच उपाशी मरत आहेस, हे मी पाहत होतो.'' राणीने आपल्या हाताने स्वयंपाक बनविला. करुणामय रूपामध्ये आलेले कविर्देव म्हणाले की मी भोजन करत नाही. माझे हे शरीर आहार करण्याचे नाही. यावर राणी म्हणाली की मग मी देखिल भोजन करणार नाही. शेवटी करुणामयसाहेब जी म्हणाले, ''ठीक आहे मुली, आण मी भोजन करतो.'' समर्थ त्यांनाच म्हटले जाते, जे इच्छा असेल तेच करतात. करुणामयसाहेबांनी भोजन केले. त्यांनी राणीला विचारले की ही जी साधना तू करतेस, ती तुला कोणी सांगितली आहे? राणी म्हणाली, की माझ्या गुरुदेवांनी हा आदेश दिलेला आहे. कबीर साहेब जी म्हणाले, ''काय आदेश दिलेला आहे तुझ्या गुरुदेवांनी?'' इंद्रमती म्हणाली, ''ब्रह्मा-विष्णु-महेश यांची पूजा, एकादशीचे व्रत, तीर्थभ्रमण, देवपूजा, श्राद्ध घालणे, मंदिरामध्ये जाणे, संतांची सेवा करणे आदी गुरुदेवांनी सांगितले आहे.'' करुणामय कबीर साहेब म्हणाले, ''जी साधना तुला तुझ्या गुरुदेवांनी सांगितलेली आाहे, त्याद्वारे तू जन्म-मृत्यू, स्वर्ग-नरक व ८४ लक्ष योनींमधील कष्टातून मुक्त होऊ शकत नाहीस.'' राणी म्हणाली की महाराज, जेवढे संत आहेत, ते आपापली प्रभुता स्वतःच बनवून येतात. मी मुक्त होऊ अथवा न होऊ, आपण माझ्या गुरुदेवांविषयी काहीही बोलू नका.

तेव्हा करुणामयसाहेब (कबीर) विचार करू लागले की या भोळ्या जीवाला कसे समजावून सांगावे? तिने जे शेपूट पकडले आहे, ते ती मेली तरी सोडू शकणार नाही. करुणामयसाहेब जी म्हणाले, ''मुली, तुझी काय इच्छा आहे? मी कोणाची निंदा करत

नाही. मी तुझ्या गुरुदेवांबद्दल काही अपशब्द काढला का अथवा काही वाईट बोललो का? मी तर भक्तिमार्ग सांगत आहे. तुझी ही पूर्वीची भक्ती शास्त्राविरुद्ध आहे. ती तुला मुक्त करणार नाही आणि तुझा कोणताही येणारा कर्मदंड नष्ट करू शकणार नाही. आणि माझे ऐक, आजपासून तिसऱ्या दिवशी तुझा मृत्यू होईल. त्यावेळी तुला तुझे गुरुदेव वाचवू शकणार नाहीत की तुझी ही असत्य साधना.'' (जेव्हा मरणाची वेळ येते, तेव्हा जीवास भीती वाटू लागते. त्याशिवाय ते कोणतीही गोष्ट मान्य करत नाहीत.)
राणीने विचार केला की संत कधी खोटे बोलत नाहीत. खरोखरच तिसऱ्या दिवशी मला मृत्यू येईल, हे देखिल शक्य आहे. या भीतीने तिने करुणामयसाहेबांना विचारले की साहेब जी, माझा जीव (मृत्यू) वाचू शकतो? कबीर साहेब (करुणामय) म्हणाले, ''वाचू शकतो. जर तू माझ्याकडून उपदेश घेशील, माझी शिष्या बनशील आणि पूर्वीच्या सर्व पूजांचा त्याग केलास, तर तुझा जीव वाचू शकतो.'' इंद्रमती म्हणाली की मी ऐकले आहे की गुरुदेव बदलू नये. तसे केल्यास पाप लागते. कबीर साहेब (करुणामय) म्हणाले की नाही पुत्री, हा देखिल तुझा भ्रम आहे. एका वैद्याकडून औषधाचा गुण आला नाही, तर आपण दुसऱ्या डॉक्टरांकडून औषध घेत नाही का? पाचवी इयत्तेतील विद्यार्थ्यांना एक शिक्षक शिकवतो आणि त्याच्या पुढच्या इयत्तांना दुसराच शिक्षक असतो. पुत्री, शिकत-शिकत पुढच्या इयत्तेमध्ये जावे लागते. तसे केले नाही, तर आयुष्यभर पाचवी इयत्तेमध्येच शिकत बसणार का? ते सोडावेच लागेल. आता तू पुढील शिक्षण घे. मी शिकवण्यासाठी आलेलो आहे. तरीही तिने ते मान्य केले नसते. परंतु मृत्यूचा दृष्टांत झाल्यावर तिला वाटले की संत म्हणत आहे तर काही बिघडू नये. विचारांती ती म्हणाली, ''जसे आपण म्हणता आहात, तसेच मी करेन.'' करुणामयसाहेबजींनी (कबीर) तिला नामोपदेश प्रदान केला आणि म्हणाले, ''तिसऱ्या दिवशी माझ्या रूपामध्ये काल येईल. तू त्याच्याबरोबर संभाषण करू नकोस, मी जे नाम (गुरुमंत्र) दिलेले आहे, त्याचा दोन मिनिटे जाप कर. दोन मिनिटांनंतर त्याच्याकडे बघ. त्यानंतर त्यांचा सत्कार कर. तसे पाहिल्यास गुरुदेव येताच शीघ्रातिशीघ्र त्यांच्या चरणी पडून दंडवत घालणे अत्यावश्यक असते. हा केवळ माझा या वेळचा आदेश आहे.'' राणी म्हणाली, ''ठीक आहे.''

आता राणीला चिंता लागून राहिली होती. ती श्रद्धेने जप करत होती. करुणामयसाहेबजींचे (कबीर) रूप धारण करून गुरुदेवांच्या रूपामध्ये काल आला. त्याने तिला इंद्रमती, इंद्रमती अशा हाका मारल्या. पहिल्यापासूनच तिच्या मनात भीती दाटली होती, तरीही ती नामजप करत राहिली. कालकडे तिने पाहिले नाही. दोन मिनिटांनंतर जेव्हा तिने समोर पाहिले, तेव्हा कालचे स्वरूप बदलले होते. त्याचा वास्तविक चेहरा दिसू लागला होता. त्याचे करुणामयसाहेबांचे स्वरूप राहिले नाही. जेव्हा आपले स्वरूप बदलून गेलेले आहे, हे कालने पाहिले, तेव्हा त्याला समजले इंद्रमतीजवळ कोणता तरी शक्तियुक्त मंत्र आहे. 'आता तर तू वाचलीस. पण मी तुला नंतर पाहून घेईन,' असे म्हणून काल निघून गेला. राणी अत्यंत खूश झाली. 'माझा मृत्यू होणार होता. पण माझ्या गुरुदेवांनी मला वाचवले, असे ती आपल्या दासीला म्हणू लागली. राजाजवळ जाऊन म्हणाली, ''आज माझा मृत्यू होणार होता. माझ्या गुरुदेवांनी माझे रक्षण केले. मला नेण्यासाठी काल आलेला होता.'' राजा म्हणाला, ''तू अशीच काही तरी नाटके (स्वप्ने) रंगवत असतेस. काल आला असता तर तो काय तुला सोडून गेला असता? हे

संत तर नुसते गारुड करतात.'' राजाची गोष्ट राणी कसी काय मान्य करणार? आनंदाच्या भरात राणी झोपी गेली. काही वेळाने काल पुन्हा सर्प बनून आला आणि त्याने राणीला दंश केला. याची तिला लगेच जाणीव झाली आणि ती मला साप चावला, मला साप चावला अशी किंचाळू लागली. सर्व नोकर-चाकर पळत आले. बघतात तर मोरीच्या छिद्रातून साप निघून गेला. आपल्या गुरुदेवांचा धावा करून राणी बेशुद्ध पडली. करुणामयसाहेब (कबीर) तेथे लगेच प्रगट झाले. जमलेल्या लोकांना दाखवण्यासाठी त्यांनी मंत्रोच्चार केला (ते तर कोणत्याही मंत्राशिवाय जिवंत करू शकतात. त्यांना कोणत्याही मंत्र-तंत्राची आवश्यकता नाही.) आणि इंद्रमतीला जिवंत केले. ''हे बंदी छोड, जर आज मी आपणास शरण आले नसते, तर आज नक्कीच माझा मृत्यू झाला असता, असे राणी अत्यंत कृतज्ञतेने आळवू लागली. साहेब जी म्हणाले, ''इंद्रमती, मी कालला तुझ्या घरात घुसू देखिल दिले नसते. तुझ्यावर या कालने सर्प रूपात हल्ला देखिल केला नसता. परंतु तुझा विश्वास बसला नसता. आपल्यावर कोणतीच आपत्ती आली नाही, असे तुला वाटले असते आणि तू असा विचार केला असतास की गुरुजींनी मला फसवून नामोपदेश दिला आहे. यासाठीच तुला थोडासा झटका दाखविला. नाही तर मुली, तुझा विश्वास बसला नसता.''

'धर्मदास यहाँ घना अंधेरा, बिन परचय जीव जम का चेरा ।।'

कबीर साहेबांनी (करुणामय) म्हणाले, ''आता जेव्हा माझी इच्छा होईल, तेव्हाच तुझा मृत्यू होईल.'' गरीब दास जी म्हणतात की :-

'गरीब, काल डरै करतारसे, जय जय जय जगदीश। जौरा जौरी झाड़ती, पग रज डारे शीश ।।

हा काल, कबीर भगवानांना (कबीर परमेश्वर) घाबरतो आणि मृत्यू कबीर साहेबजींच्या पायातील पादत्राणे झाडतो. तो त्यांच्या नोकरासारखा आहेत. त्यांची पादत्राणे झाडल्यानंतर ती धूळ आपल्या मस्तकी लावून म्हणतो की 'साहेब जी आपण ज्याला मरण्याचा आदेश द्याल, त्याच्याजवळच मी जाईन. अन्यथा जाणार नाही.'

गरीब, काल जो पीसै पीसना, जौरा है पनिहार। ये दो असल मजूर है, मेरे साहेब के दरबार ।।

हा काल जो येथील २१ ब्रह्माण्डांचा भगवान (ब्रह्म) आहे, तो ब्रह्मा, विष्णु, महेश यांचा पिता आहे. तो माझ्या कबीर साहेबांचे दळण दळतो म्हणजे कायमचा नोकर आहे आणि जौरा म्हणजे मृत्यू माझ्या कबीर साहेबजींचे पाणी भरते म्हणजे मोलकरीण आहे. हे दोघेही माझ्या साहेबांच्या दरबारामधील कायमस्वरूपी नोकर आहेत. काही दिवसांनंतर साहेब जी (करुणामयजी) परत आले आणि त्यांनी राणी इंद्रमतीस सतनाम प्रदान केले.

काही कालावधीनंतर तिची दृढ श्रद्धा पाहून करुणामयसाहेबांनी सारनाम दिले. शब्द उपलब्ध करून दिले. जेव्हा साहेबांची जायची वेळ येई, तेव्हा साहेब जी, माझ्या पतिराजाला समजावून सांगा. त्यांचे देखिल मतपरिवर्तन होईल आणि आपल्या चरणी ते आल्यास माझे जीवन सफल होईल, अशी इंद्रमती प्रार्थना करायची. राजा चंद्रविजयला तू देखिल नामोपदेश घे. हे राज्य आणि थाटमाट केवळ दोन दिवसांचा आहे. नंतर चौऱ्याऐंशी लक्ष योन्यांमध्ये भ्रमण करावे लागेल, असे कबीर साहेबांनी समजावून सांगितले. पण राजा म्हणाला की 'हे भगवान, मी तर नामोपदेश घेणार नाही. पण आपली शिष्या इंद्रमतीने सगळा खजिना संपेपर्यंत दानधर्म केला, तरी मी तिला विरोधही

करणार नाही. तिची इच्छा असेल तसा ती सत्संग करू दे, त्यात मी कोणतीच आडकाठी आणणार नाही.' आपण नामोपदेश का घेणार नाही, असे कबीर साहेबांनी (करुणामय) विचारल्यावर चंद्रविजय राजा म्हणाला की साहेब जी, मला मोठमोठ्या राजांच्या मेजवानीला जावे लागते. करुणामयसाहेब जी (कबीर) म्हणाले, ''मेजवाणीला जाण्यात नाम कोणती बाधा आणणार आहे? तू सभेत जा, तेथे काजू खा, दूध पी, सरबत (फळांचा रस) पी, फक्त मद्यपान करू नको. मद्यपान करणे महापाप आहे.'' एवढे सांगूनही राजा तयार झाला नाही.

कबीर साहेबांनी (करुणामय) राणीच्या प्रार्थनेवरून राजाला नामाशिवाय हे जीवन व्यर्थच जाईल. नामोपदेश घे, असा खूप समजवण्याचा प्रयत्न केला. तरीही तो म्हणाला की गुरुजी, कृपया मला नामोपदेशाचा आग्रह करू नका. आपल्या शिष्येने कितीही दान केले, कितीही सत्संग केला, तरी मी त्याला नकार देणार नाही. शेवटी साहेब जी म्हणाले, ''मुली, हे दोन दिवसांचे सुख पाहून त्याची बुद्धी भ्रष्ट झालेली आहे. तू प्रभुचरणी लीन राहा आणि आपले कल्याण करून घे. येथे कोण कोणाचा पती नाही की कोण कोणाची पत्नी नाही. हा फक्त दोन दिवसांचा संबंध आहे. मुली, तू तुझे संचित बनव.'' चाळिसाव्या वर्षी मृत्यूच्या दारात गेलेली इंद्रमती ऐंशी वर्षांची वृद्धा झाली. जेव्हा तिचे शरीर वृद्धत्वाने कंप पावू लागले, तेव्हा करुणामय साहेब म्हणाले, ''इंद्रमती, आता तुला काय हवे आहे सांग. सतलोकी जाण्याची तुझी इच्छा आहे?'' इंद्रमती म्हणाली, ''होय साहेब, मी तयार आहे. आता मी पूर्णपणे तयार आहे.'' करुणामय साहेबांनी विचारले की तुझे नातू-नाती यांच्याविषयीच्या मोह-ममतेत तर तू अडकून पडलेली नाहीस ना? राणी म्हणाली, ''अजिबात नाही साहेब जी, आपण मला ज्ञानच असे निर्मळ प्रदान केले आहे की या गलिच्छ लोकामध्ये (धाम) वास्तव्याची मी कशाला इच्छा धरू?'' कबीर साहेब जी (करुणामय) म्हणाले, ''मुली, मग चल माझ्याबरोबर.'' राणीने देह त्याग केला. साहेब कबीरजी (करुणामय) राणी इंद्रमतीचा आत्मा घेऊन वर गेले. याच ब्रह्माण्डामध्ये एक मानसरोवर आहे. या मानसरोवरावर जाऊन आत्म्याला स्नान करावे लागते. साहेब जी काही कालावधीसाठी प्राण्याला तेथे ठेवतात. तेथे करुणामयसाहेब जींनी (कबीर) तिला परत विचारले, ''आता मी तुला पुन्हा विचारतो, तुझी काही इच्छा अपूर्ण आहे काय सांग. तसे असेल तर तुला पुन्हा जन्म घ्यावा लागेल. मनामध्ये कोणतीही इच्छा राहिली असेल, तर सतलोकामध्ये जाऊ शकत नाही. इंद्रमती म्हणाली, ''साहेब, आपण तर अंतर्यामी आहात. माझी आता कोणतीही इच्छा राहिलेली नाही. आहे ती फक्त आपल्या चरणांची इच्छा. परंतु माझ्या मनामध्ये एक शंका निर्माण झालेली आहे की माझ्या पतीने माझ्या कोणत्याही धार्मिक कर्मास कधीच नाकारले नाही. आजकालचे पती बघितले, तर आपल्या पत्नीच्या असल्या कार्यात बाधाच आणत असतात. जर माझ्या पतीने मला विरोध केला असता, तर मी आपल्या चरणांपर्यंत येऊ देखिल शकले नसते. माझे आत्मकल्याणही झाले नसते. त्यांच्या या शुभकर्मामधील सहयोगाचा त्यांना काही लाभ मिळत असेल, तर हे दाता, कधी तरी त्यांच्यावरही दया करा.'' आता साहेब जींनी विचार केला की ही मूर्ख तिच्या पतीमध्ये पुन्हा अडकलेली आहे. ते म्हणाले, ''ठीक आहे मुली, तू आणखी दोन-चार वर्षे येथेच वास्व्यव्य कर.''

पुढे दोन वर्षांनंतर राजाही मरणासन्न झाला. कारण त्याने नामोपदेश घेतला

नव्हता. यमाचे दूत आले. राजा चौकामध्ये चक्कर येऊन पडला. यमाच्या दूतांनी त्याचा गळा दाबला. राजाने मल–मूत्राचे विसर्जन केले. करुणामयसाहेब (कबीर) राणीला म्हणाले, ''तुझ्या राजाचे काय हाल (स्थिती) होत आहेत बघ.'' साहेबांनी तेथून तिला सर्वकाही दाखविले. राणी म्हणाली, ''दाता, जर माझ्या भक्तीमधील सहयोगाचे त्यांचे काही फळ असेल, तर दया करा.'' राणीमध्ये पुन्हा थोडीशी ममता जागृत झाली. ही पुन्हा कालच्या जाळ्यामध्ये फसेल, असा कबीर साहेबजींनी (करुणामय) विचार केला. कबीर साहेब जी (करुणामय) मानसरोवरातून जेथे आपल्या महालामध्ये राजा चंद्रविजय अचेत (बेशुद्ध) पडला होता, तेथे गेले. कबीर साहेब जी येताच मृत जनावराजवळची गिधाडे जशी उडून जातात, तसे यमदूत आकाशात उडून गेले. चंद्रविजय शुद्धीवर आला. समोर करुणामयसाहेब जी उभे होते. ते केवळ चंद्रविजयलाच दिसत होते. अन्य कोणालाही दिसत नव्हते. मला क्षमा करा दाता, माझा जीव वाचवा, अशी चंद्रविजय त्यांच्या चरणी पडून याचना करू लागला. त्याने आता आपला जीव जाणार आहे, हे पाहिले होते. (जेव्हा जीवाचे असे डोळे उघडतात, तेव्हाच त्याला समजते की आपल्या हातून फार मोठी चूक झाली आहे.) 'मालक, स्वामी, मला क्षमा करा दाता, माझा जीव वाचवा, असे राजा पुनःपुन्हा बडबडू लागला.' कबीर साहेब जी म्हणाले, ''राजा, आजही तेच सांगतो आणि त्या दिवशीही तेच सांगितले होते– नामोपदेश घ्यावा लागेल.'' राजा म्हणाला, ''घेईन, या क्षणीच मी नामोपदेश घेईन.'' कबीर साहेबजींनी नामोपदेश दिला आणि सांगितले की आता मी तुला आणखी दोन वर्षांचे आयुष्य देत आहे. जर यामधील एक श्वास जरी वाया गेला तर पुन्हा कर्मदंड भोगावा लागेल.

कबीर, जीवन तो थोडा भला, जै सत् सुमरण हो। लाख वर्ष का जीवना, लेखे घरे ना को ।।

शुभ कर्मामध्ये सहयोग दिलेले पूर्वीचे कर्म आणि श्रद्धेने दोन वर्षांचे स्मरण, तसेच तिन्ही नाम प्रदान करून कबीर साहेबांनी (करुणामयजी) चंद्रविजयला पार (मुक्त) केले. ।।बोला (कबीर परमेश्वर) कविर्देव की जय ।।'जय बंदी छोड!'

या उदाहरणावरून हेच सिद्ध होते की परमेश्वर कबीर साहेब जी खऱ्या (सत्य) श्रद्धाळूंचे आयुष्य वृद्धिंगत करतात आणि त्यांच्या परिवाराचेही रक्षण करतात. ही उदाहरणे फार पूर्वीची आहेत. वर्तमान स्थितीत सर्वसामान्य व्यक्ती विश्वास ठेवत नाहीत. वर्तमानातील पूज्य कबीर परमेश्वरांच्या शक्तीने सतगुरु रामपालजी यांच्याद्वारे झालेले कष्टनिवारण आणि आयुवृद्धीची भरपूर उदाहरणे याच 'भक्तीच्या सौदागरास संदेश' पुस्तकात 'भ्रमितांना मार्गदर्शन' या लेखात आहेत.

## ''कबीर साहेबांचे (कविर्देव) कलियुगामधील अवतार''

विक्रमी संवत १४५५ (सन १३९८) ज्येष्ठ महिन्यातील पौर्णिमेला पहाटे ब्रह्ममुहूर्तावर पूर्ण परमेश्वर कबीर साहेब (कविर्देव) स्वतः आपल्या मूळ स्थान सतलोकातून आले. काशीमध्ये 'लहरतारा' तलावातील कमळाच्या फुलावर बालकाचे रूप धारण करून ते प्रगट झाले. प्रथम मी आपणास नीरू–नीमा हे कोण होते याविषयी सांगू इच्छितो. नीरू आणि नीमा हे दोघे गौरीशंकर आणि सरस्वती नावाचे ब्राह्मण होते. ते भगवान शिवांचे उपासक होते. ते निःस्वार्थ भावाने भक्तांना 'शिवपुराणा'मधील भगवान शिवांची महिमा ऐकवायचे. ते कोणाकडूनही धन घेत नव्हते. ते एवढे पवित्र आत्मे होते की जर कोणी त्यांना स्वतःहून दक्षिणा दिली, तर त्यातली आपल्या भोजनापुरती ठेवत आणि

उरलेल्या पैशात प्रसाद करत. (द्वापारयुगामध्ये नीरू-नीमा हे सुपच सुदर्शनाचे माता-पिता होते. त्यांनी त्यावेळी कबीर साहेबांचे म्हणणे स्वीकारलेले नव्हते. शेवटी सुदर्शनने करुणामय रूपात आलेल्या कबीर साहेबांना प्रार्थना केली होती की प्रभु, आपण मला उपदेशाद्वारे सर्वकाही प्रदान केलेले आहे. आपण माझ्या सर्व मनोकामना पूर्ण केल्या आणि जे वास्तविक भक्तिधन आहे त्यामध्येही परिपूर्ण केले. त्यामुळे आजपर्यंत आपणाकडे काही मागण्याची गरजच पडली नाही. आता या दासाची फक्त एकच प्रार्थना आहे. जर आपणाला योग्य वाटले तर तिचा स्वीकार करा. हे परमात्मा, जन्म-मृत्यूच्या चक्रात फिरताना जेव्हा माझे माता-पिता मनुष्य शरीर प्राप्त करतील, त्यावेळी त्यांचा सांभाळ करावा प्रभु. आज त्यांची बुद्धी विपरीत झालेली आहे. ते परमात्म्याची वाणी मानत नाहीत. परंतु हे दोघेही फार पुण्यात्मा आहेत. कबीर साहेब जी म्हणाले, ''चिंता करू नकोस. आता तू आपल्या माता-पित्यांच्या मोहबंधनामुळे येथेच अडकशील. वेळ येईल तेव्हा त्यांनाही सांभाळून घेईन, त्यांना कालच्या जाळ्यातून पार (मुक्त) करेन. तू निश्चिंत होऊन सतलोकी जा.'' यानंतर प्रभुकृपेने सुदर्शनजी सतलोकी निघून गेले.

सुदर्शनजींच्या या माता-पित्यांचे कलयुगामधील नीरू-नीमाच्या जन्मापूर्वीही ब्राह्मण घरांमध्ये दोन जन्म झाले. त्यावेळीही ते नि:संतानच राहिले. नंतर हा तिसरा जन्म काशीमध्ये झाला. त्यावेळीही ते ब्राह्मण आणि ब्राह्मणी (गौरीशंकर आणि सरस्वती या नावाने) होते. पण निःसंतानच होते.

नीरु तसेच निमा दोघेही गौरी शंकर आणि सरस्वती नावाचे ब्राह्मण जातितुन होते. ते भगवान शिव चे उपासक होते. भगवान शिव ची महिमा शिव पुराण तुन नि:स्वार्थ भावाने कथा सांगायचे. कोणाकडुनही पैसे घेत नव्हते. इतके नेक आत्मा होते कि जर कोणी त्यांना स्वत:हुन दक्षिणा देऊन जात असे, त्यामधुन आपल्या भोजन योग्य ठेवत होते आणि जे शिल्लक राहत होते त्याचा भंडारा करत होते.

इतर स्वार्थी ब्राह्मण गौरीशंकर व सरस्वती यांच्याशी ईर्षा करत होते कारण गौरी शंकर नि:स्वार्थ भावाने कथा सांगायचे. पैशाच्या लालसेने ते भक्तांना भ्रमित करत नव्हते, फसवत नव्हते. त्यामुळे ते प्रशंसेस पात्र बनलेले होते. तिथल्या मुस्लिमांना यांच्याबरोबर कोणीही ब्राह्मण-हिंदू नाहीत, हे समजल्यावर त्यांनी याचा फायदा उठवला. गौरीशंकर व सरस्वती या दोघांनाही त्यांनी जबरदस्तीने मुसलमान बनविले. मुस्लिमांनी आपल्या घरातील पाणी त्यांच्या सर्व घरामध्ये, वस्त्रांवर शिंपडले आणि पाजलेही. त्यामुळे हिन्दू ब्राह्मणांनी जाहीर केले की आता हे मुस्लिम बनलेले आहेत आणि आजपासून यांचे आमच्याशी कोणतेच बंधुत्वाचे नाते राहणार नाही.

## ''नीरू-नीमा विणकराची उपाधी तसेच परमेश्वर प्राप्ती''

बिचारे गौरीशंकर आणि सरस्वती विवश झाले. मुस्लिमांनी पुरुषाचे (गौरीशंकरचे) नाव नीरू आणि स्त्रीचे (सरस्वती) नाव नीमा असे ठेवले. पूर्वी ते जे पौरोहित्य करत होते, त्यावर त्यांचा उदरनिर्वाह चालायचा. त्यातून जे धन शिल्लक राहील, त्याचा ते कधी दुरुपयोग करत नव्हते. शिल्लक राहिलेल्या धनातून धर्म-भंडारा करत होते. आता पौरोहित्य बंद झाले. आता कोणते काम करायचे, हा प्रश्न निर्माण झाला. त्यांनी एक वस्त्र विणायचा हातमाग आणला आणि काम सुरू केले. त्यावेळीही ते आपला उदरनिर्वाह करून शिल्लक धनाचा भंडाऱ्यामध्ये उपयोग करत होते. हिन्दू ब्राह्मणांनी नीरू-नीमा यांना गंगा नदीत स्नान करायला बंदी घातली. ते म्हणायचे की आता तुम्ही दोघे

मुसलमान झाला आहात.

गंगा नदीचे पाणी लहरींद्वारे उसळून काशीमधील लहरतारा नावाच्या मोठ्या सरोवरात साठले होते. हे पाणी अतिशय स्वच्छ आणि निर्मळ होते. त्यामधे कमळाची फुले उगवली होती. सन १३९८ मध्ये (विक्रमी संवत १४५५) ज्येष्ठ महिन्यातील शुद्ध पौर्णिमेला ब्रह्ममुहूर्तावर (साधारणतः सूर्योदयाच्या आधी दीड तास) आपल्या सतलोकातून (ऋतधाम) परमेश्वर कबीर (कविर्देव) सशरीर येऊन बालक रूपात लहरतारा तलावातील कमळ पुष्पावर विराजमान झाले. याच लहरतारा तलावावर नीरू-नीमा पहाटे ब्रह्ममुहूर्तावर स्नानासाठी जात होते. एक अत्यंत तेजःपुंज चमकणारा गोळा (बालक रूपातील परमेश्वर कबीर साहेब जी तेजोमय शरीरासह आले होते. अंतर जास्त असल्यामुळे फक्त प्रकाशपुंजच दिसत होता.) वरून (सत्यलोकातून) आला आणि कमळ पुष्पावर विसावला. त्या प्रकाशाने सर्व लहरतारा तलाव उजळून निघाला होता. नंतर एका कोपऱ्यामध्ये जाऊन तो गोळा अदृश्य झाला. हे दृश्य स्वामी रामानंदजींचे शिष्य ऋषि अष्टानंदजी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहत होते. अष्टानंदजी देखिल दररोज एकांतस्थानी स्नान करण्यासाठी जात होते. तेथे बसून ते गुरुदेवांनी दिलेल्या मंत्राचा जप करत असत आणि निसर्गाचा आनंद घेत असत. एवढा तेजोमय, डोळे दिपवून टाकणारा प्रकाश पाहिल्यावर हे माझ्या भक्तीचे फळ आहे की दृष्टिभ्रम, या विचारात त्यासंबंधी जाणून घेण्यासाठी स्वामी अष्टानंदजी आपल्या गुरुदेवांजवळ गेले.

आदरणीय रामानंदजींना अष्टानंदजींनी विचारले की हे गुरुदेव, आज मी माझ्या जीवनात कधीही पाहिलेला नाही, असा तेजोमय प्रकाश पाहिला. त्यांनी सर्व वृत्तांत कथन केला. 'आकाशामधून एक प्रकाशसमूह येत होता. तो पाहिल्यावर माझे डोळे त्या प्रकाशाचे तेज सहन करू शकले नाहीत. त्यामुळे माझे डोळे बंदच झाले. मिटलेल्या डोळ्यांसमोर एक शिशुरूप दृष्टीस पडले. (सूर्याकडे पाहिल्यांतर सूर्याचा फक्त एक गोलच दिसतो, तसे बालक दिसत होते.) हे माझ्या भक्तीचे फळ आहे की माझा दृष्टिभ्रम होता?' स्वामी रामानंदजी म्हणाले की हे पुत्रा, अशी लक्षणे जेव्हा होतात, तेव्हा वरील लोकांमधून कोणी तरी अवतार येत असतात. ते कोणाच्या तरी ठिकाणी प्रगट होतील, कोणा मातेच्या उदरातून जन्म घेतील आणि नंतर आपल्या लीला करतील. या ऋषिंना केवळ मातेपासूनच जन्म होतो, एवढेच ज्ञान आहे. त्यामुळे जेवढे ऋषिंना ज्ञान होते, तेवढेच सांगून रामानंदजींनी आपल्या शिष्याच्या शंकेचे समाधान केले.

त्या दिवशी नीरू व नीमा स्नानासाठी जात होते. जाता-जाता वाटेमध्ये नीमाने प्रभुंना प्रार्थना केली की हे भगवान शिव, (ते जरी मुस्लिम झाले असले, तरी एवढी वर्षे करत असलेली आपली पूर्वीची भक्तिसाधना हृदयातून काढून टाकू शकले नव्हते.) आम्हाला एका बालकाची उणीव भासावी, एवढा तुझ्या येथे अंधार माजला आहे काय? आम्हालाही एखादा लाल दिला असतास, तर आमचे जीवन देखिल सफल झाले असते. या विचारांनी गलबलून जाऊन ती हुंदक्यावर हुंदके देत रडू लागली. तिचा पती नीरू तिला म्हणाला, ''प्रभूची जशी इच्छा असेल त्यावर आपण समाधानी राहावे, त्यातच आपले हित असते. जर तू अशी रडत राहिलीस तर तुला अशक्तपणा येईल. तुझ्या डोळ्यांसमोर अंधारी पसरेल. आपल्या नशिबातच संतान नाही.'' ते दोघे बोलत-बोलत लहरतारा तलावावर पोहोचले. अजून उजाडले नव्हते. नीमा स्नान करून बाहेर आली वस्त्रे बदलली. नीरू तलावामध्ये स्नान करू लागला. नीमा आपली वस्त्रे धुण्यासाठी पुन्हा

तलावाच्या किनारी गेली. झुंजूमुंजू होऊ लागले होते. सूर्योदयाची वेळ जवळ आली होती. नीमाने तलावाच्या दिशेने पाहिले तर समोर कमळ पुष्पांवर काही तरी हालत असल्यासारखे दिसले. कबीर साहेब जी बालक रूपामध्ये एका पायाचा अंगठा चोखत होते आणि दुसरा पाय हलवत होते. सुरवातीला तिला वाटले, तो साप आहे आणि तो आपल्या पतीकडे येत आहे. नंतर स्पष्टपणे पाहिले तर ते एक चिमुरडे बालक आणि तेही कमळाच्या फुलावर! तिने एकदम आपल्या पतीला आवाज दिला, ''अहो, बघा-बघा ते बालक. पाण्यात बुडेल, त्याला वाचवा. नीरू म्हणाला, ''अगं, तू नुसता बाळाचा विचार करत बसतेस, त्यात वेडी झाली आहेस. तुला आता पाण्यामध्येही बाळ नजरेस पडू लागले आहे.'' ती म्हणाली, ''अहो, असे काय करता, त्या समोरच्या कमळावर तर बघा.'' तिच्या या जोरदार आवाजाचा त्याच्यावर प्रभाव पडला. ती इशारा करत असलेल्या दिशेला नीरूने पाहिले. एक बालक कमळावर नवजात शिशू रूपामध्ये झोपले होते. त्याने फुलासह त्या बालकाला उचलून बाहेर आणले. नीमाकडे त्याला सोपवून तो स्नान करू लागला. अंघोळ करून बाहेर आल्यावर पाहतोय, तर नीमा त्या बालक रूपातील परमेश्वरावर माया करत होती. सद्गदित होऊन ती शिवप्रभूंची प्रशंसा आणि स्तुती करत होती की हे प्रभु, आपण माझी वर्षानुवर्षांची मनोकामना पूर्ण केलीत. (ती शिवभक्त होती). आजच मी अंतःकरणातून तुम्हाला हाक दिली होती आणि तुम्ही ती ऐकली. माझी मनोकामना पूर्ण केली.

ज्या कबीर परमेश्वरांचे केवळ नाम घेतले तरी आपला ऊर भरून येतो, अंतःकरणात एक वेगळीच हालचाल होते, त्यांच्या प्रेमाने अंगावर रोमांच उभे राहतात, आपला आत्मा संतुष्ट होऊन जातो, अशा आनंददायी परमेश्वराला जिने छातीशी कवटाळून पुत्रवत प्रेम केले असेल, त्या मातेला होणारा आनंद किती अवर्णनीय असेल! ती त्या बालकाचे पटापट मुके घेत होती, त्याला उराशी कवटाळत होती आणि वात्सल्याने त्याचे रूप न्याहाळत होती. इतक्यात नीरू स्नान करून बाहेर आला. (कारण की, मनुष्य समाजाकडे अधिक लक्ष देत असतो.) त्याच्या मनात अचानक विचार आला, अद्याप मुस्लिमांशी आपला विशेष स्नेह जुळलेला नाही आणि हिन्दू ब्राह्मण तर आपला द्वेषच करतात. याचाच फायदा उठवून आपणाला मुसलमान बनविले गेले. आपले येथे कोणच सोबती नाही. आता जर आपण या बालकाला घेऊन गेलो तर आधी या बालकाचे माता-पिता कोण आहेत सांग. तुम्ही कुणाचे बाळ चोरून आणले आहे? याची आई बिचारी रडत बसली असेल, असा लोकांचा प्रश्नांचा भडिमार सुरू होईल. आपण काय उत्तर देऊ शकणार? लोकांना काय आणि कसे समजावून सांगायचे? हे बालक कमळाच्या फुलावर आम्हाला सापडले, असे सांगितले तर त्यावर कोण विश्वास ठेवणार? याचा सारासार विचार करून नीरू म्हणाला, ''नीमा, या बालकाला येथेच सोडून दे.'' ती आश्चर्याने त्याच्याकडे बघू लागली. म्हणाली, ''मी नाही सोडणार या बाळाला. माझे प्राण गेले तरी बेहत्तर, मी तडफडून मरून जाईन. पण कदापि सोडणार नाही. या बाळाने माझ्यावर काय जादू केली आहे, हे तुम्हाला काय माहिती असणार?'' आपल्यावर कोणते संकट येऊ शकते, हे समजावून सांगण्याचा नीरूने हरप्रकारे प्रयत्न केला. पण नीमा म्हणाली, ''या बालकासाठी मी देश (गाव) सोडून जाणेही स्वीकारीन, परंतु याला सोडणार नाही.'' तिची मूर्खता पाहून ही तर आता वेडी झालेली आहे. समाज काय म्हणेल, याचे देखिल तिला भान राहिलेले नाही, असा

नीरूने विचार केला. तो तिला म्हणाला, ''आपल्याला बाळ नव्हते, त्यामुळे मी आजपर्यंत तुझ्या कोणत्याही गोष्टीची अवहेलना केलेली नाही. तू जे म्हणशील ते मी स्वीकारत होतो. परंतु आज मात्र मी तुझी ही बाब कदापि मान्य करणार नाही. झटकन या बाळाला खाली ठेव, नाही तर दोन थोबाडीत देईन.'' त्या महापुरुषाने आयुष्यात पहिल्यांदाच आपल्या पत्नीच्या दिशेने हात उगारला होता. त्याच वेळी शिशुरूपामधील कबीर साहेब (कर्विदेव) म्हणाले, ''नीरू, मला तुझ्या घरी घेऊन चल. तुझ्यावर कोणतीच आपत्ती येणार नाही.'' बालक रूपामधील परमेश्वराचे हे बोल ऐकून नीरू भयभीत झाला. हे बालक, कोणी फरिश्ता (महान पुरुष) अथवा कोणी सिद्ध पुरुष तर नाही ना आणि त्यामुळे माझ्यावर कोणती आपत्ती येणार नाही ना, असा विचार करत नीरू गुमान चालू लागला.

जेव्हा बालकाला घेऊन घरी आले, तेव्हा त्याला बघूनच सर्व जण हे बालक कोठून आणले, असे विचारायचे विसरून गेले. काशीतील सर्व स्त्री व पुरुष बालकाला बघायला आले आणि म्हणू लागले की हे बालक तर कोणी देवता दिसतेय. एवढे सुंदर शरीर आणि असे तेजोमय बालक आपण यापूर्वी कधीही पाहिलेले नाही. कोण म्हणायचे की हा तर ब्रह्मा, विष्णु, महेश यांच्यामधीलच एक कोणी तरी प्रभु आहे. हे बालक म्हणजे वरील लोकातून आलेली कोणती तरी शक्ती आहे. असे सर्व जण आपापले मत व्यक्त करत होते.

गरीब, चौरासी बंधन कटे, कीनी कलप कबीर।
भवन चतुरदश लोक सब, टूटे जम जंजीर ।।३७६।।
गरीब, अनंत कोटि ब्रह्माण्ड में, बंदी छोड कहाय।
सो तौ एक कबीर हैं, जननी जन्या न माय ।।३७७।।
गरीब, शब्द स्वरूप साहिब धनी, शब्द सिंध सब माँहि।
बाहर भीतर रमि रह्या, जहाँ तहां सब ठांहि ।।३७८।।
गरीब, जल थल पृथ्वी गगन में, बाहर भीतर एक।
पूरणब्रह्म कबीर हैं, अविगत पुरूष अलेख ।।३७९।।
गरीब, सेवक होय करि ऊतरे, इस पृथ्वी के माँहि।
जीव उधारन जगतगुरू, बार बार बलि जांहि ।।३८०।।
गरीब, काशीपुरी कस्त किया, उतरे अधर अधार।
मोमन कूं मुजरा हुवा, जंगल में दीदार ।।३८१।।
गरीब, कोटि किरण शशि भान सुधि, आसन अधर बिमान।
परसत पूरणब्रह्म कूं, शीतल पिंडरू प्राण ।।३८२।।
गरीब, गोद लिया मुख चूंबि करि, हेम रूप झलकत।
जगर मगर काया करै, दमकैं पदम अनंत ।।३८३।।
गरीब, काशी उमटी गुल भया, मोमन का घर घेर।
कोई कहैं ब्रह्मा, विष्णु है कोई कहै इन्द्र कुबेर ।।३८४।।
गरीब, कोई कहै छल ईश्वर नहीं, कोई किंनर कहलाय।
कोई कहै गण ईश का, ज्यूं ज्यूं मात रिसाय ।।३८८।।
गरीब, कोई कहै वरूण धर्मराय है, कोई कोई कहते ईश।
सोलह कला सुभांन गति, कोई कहै जगदीश ।।३८५।।

गरीब, भक्ति मुक्ति ले ऊतरे, मेटन तीनूं ताप।
मोमन के डेरा लिया, कहै कबीरा बाप ।।३८६।।
गरीब, दूध न पीवै न अन्न भखै, नहीं पलने झूलंत।
अधर अमान धियान में, कमल कला फूलंत ।।३८७।।
गरीब, काशी में अचरज भया, गई जगत की नींद।
ऐसे दुल्हे ऊतरे, ज्यूं कन्या वर बींद ।।३८९।।
गरीब, खलक मुलक देखन गया, राजा प्रजा रीत।
जंबूदीप जिहाँन में, उतरे शब्द अतीत ।।३९०।।
गरीब, दुनी कहै योह देव है, देव कहत हैं ईश।
ईश कहे पारब्रह्म है, पुरण बीसवे बीस ।।३९१।।

**परमेश्वर कबीर जीच अनादि परमगुरू आहेत. तेच रुपांतर करुन संत व ऋषि वेशात वेळो-वेळी (स्वयंभु) स्वत: प्रकट होतात. कालच्या दुतांद्वारा बिघडलेल्या तत्वज्ञानाला व्यवस्थित करतात. कबीर साहेबांनीच ब्रह्मा, विष्णु, शिव आदी देवता, ऋषिमुनी व संतांना वेळा-वेळी आपल्या सतलोकातून येऊन नामोपदेश प्रदान केला. आदरणीय गरीब दासजी महाराजांनी आपल्या वाणीमध्ये लिहलेले आहे की जे कबीर जींनी स्वत: सांगितले की :-**

आदि अंत हमरा नहीं, मध्य मिलावा मूल। ब्रह्मा ज्ञान सुनाईया, धर पिंडा अस्थुल ।।
श्वेत भूमिका हम गए, जहां विश्वम्भरनाथ। हरियम हीरा नाम दे, अष्ठ कमल दल स्वांति ।।
हम बैरागी ब्रह्म पद, सन्यासी महादेव।सोहं मंत्रदिया शंकर कूं, करत हमारी सेव ।।
हम सुल्तानी नानक तारे, दादू कूं उपदेश दिया।
जाति जुलाहा भेद न पाया, काशी माहे कबीर हुआ।
सतयुग में सत सुकृत कहैं टेरा, त्रेता नाम मुनिन्द्र मेरा।
द्वापर में करूणामय कहलाया, कलयुग में नाम कबीर धराया।।
चारों युगों में हम पुकारैं, कूक कह्या हम हेल रे।
हीरे मानिक मोति बरसें, ये जग चुगता ढेल रे ।।

**या वाणीवरून असे सिद्ध होते की कबीर परमेश्वरच अविनाशी परमात्मा आहेत. तेच अजर-अमर आहेत. हेच परमात्मा चारही युगांमध्ये स्वतः येऊन आपला सत्यभक्तीचा मार्ग प्रदान करतात.**

# पूर्ण संतांची ओळख

**(पवित्र सद्ग्रंथाद्वारे पूर्ण संतांची ओळख)**

**चारही वेद, गीता आदी पवित्र सद्ग्रंथांमध्ये प्रमाण (पुरावे) मिळते की जेव्हा जेव्हा धर्माची हानी होते व अधर्माची वृद्धी होते आणि वर्तमानातील खोटे संत, महंत आणि गुरुंद्वारे भक्तिमार्गाचे स्वरूप बिघडवले गेले आहे, त्यावेळी परमेश्वर स्वतः येऊन किंवा आपल्या परमज्ञानी संतास पाठवून सत्यज्ञानाद्वारे धर्माची पुन्हा स्थापना करतात. ते शास्त्रांनुसार भक्तिमार्ग समजावून सांगतात. वर्तमानातील धर्मगुरू त्यांचा विरोध करून त्यांच्याविरुद्ध उभे राहून राजा व प्रजेला भ्रमित करून त्यांच्यावर अत्याचार करवितात, हीच त्यांची ओळख असते. कबीर साहेब जी आपल्या वाणीमध्ये म्हणतात की :-**

जो मम संत सत उपदेश दृढावै (बतावे) वाके संग सभि राड़ बढ़ावै।
या सब संत महंतन की करणी, धर्मदास मैं तो से वर्णी ।

**कबीर साहेब जी आपला प्रिय शिष्य धर्मदासजींना या वाणीमध्ये समजावत आहेत की जो माझा संत सतभक्तिमार्ग सांगेल त्याच्याशी सर्व संत व महंत भांडण करतील. हीच त्याची ओळख असेल.**

**दुसरी ओळख म्हणजे तो संत सर्व धर्मग्रंथांचा पूर्ण माहीतगार (ज्ञाता) असेल. याचे प्रमाण सतगुरु गरीब दासजींच्या वाणीमध्ये :-**

सतगुरु के लक्षण कहूं, मधरे बैन विनोद। चार वेद षट शास्त्र, कहै अठरा बोध ।।

**सद्गुरू गरीब दास जी महाराज आपल्या वाणीमध्ये पूर्ण संतांची ओळख सांगत आहेत की ते चारही वेद, सहा शास्त्रे, अठरा पुराणे आदी सर्व ग्रंथांचे पूर्ण माहीतगार असतील. अर्थात ते त्यातील सार काढून सांगतील. यजुर्वेद अध्याय १९ मंत्र २५,२६ मध्ये लिहिलेले आहे की वेदांतील अपूर्ण वाक्ये म्हणजेच सांकेतिक शब्द व एक चतुर्थांश श्लोक पूर्ण करून विस्ताराने सांगतील आणि तीन वेळेची पूजा सांगतील. सकाळी पूर्ण परमात्म्याची पूजा, दुपारी विश्वातील देवतांचा सत्कार व संध्याकाळी आरती असे स्वतंत्रपणे सांगतील तेच जगाला उपकारक संत असतात.**

**यजुर्वेदाच्या १९ व्या अध्यायातील २५ वा मंत्र**

सन्धिछेद: अर्द्ध ऋचैः उक्थानाम् रुपम् पदैः आप्नोति निविदः ।
प्रणवैः शस्त्राणाम् रूपम् पयसा सोमः आप्यते।(२५)

**अनुवाद :- जे संत (अर्द्ध ऋचैः) वेदांतील अर्धी वाक्ये म्हणजेच सांकेतिक शब्द पूर्ण करून (निविदः) पूर्ण करतात (पदैः) श्लोकाच्या चौथ्या भागाला म्हणजेच आंशिक वाक्ये (उकथानम्) स्तोत्रांच्या (रुपम्) रूपामध्ये (आप्नोति) वापरतात म्हणजेच आंशिक विवरण पूर्णपणे समजतात व समजवतात (शस्त्राणाम्) जसे शस्त्रे चालविणारा त्यांना (रुपम) पूर्णपणे वापरू शकतो, तसेच पूर्ण संत (प्रणवैः) ओंकार म्हणजेच ओम्-तत्-सत् मंत्रांना पूर्ण रूपाने समजून व समजावून (पयसा) दूध व पाणी वेगळे करतात म्हणजेच जलरहित दुधासारखे तत्त्वज्ञान प्रदान करतात, त्यामुळे (सोमः) अमरपुरुष म्हणजेच अविनाशी परमात्म्याला (आप्यते) प्राप्त करवून देतो, तो पूर्ण संत वेद जाणणारा, असे संबोधले जातात.**

**भावार्थ :- तत्त्वदर्शी संत तो असतो जो वेदांतील सांकेतिक शब्द पूर्ण विस्ताराने**

**वर्णन करतो ज्यामुळे पूर्ण परमात्म्याची प्राप्ती होते आणि त्यालाच वेद जाणणारा असे संबोधले जाते.**

**यजुर्वेदाच्या १९ व्या अध्यायातील २६ वा मंत्र**

संन्धिछेद :- अश्विभ्याम् प्रात: सवनम् इन्द्रेण ऐन्द्रम् माध्यन्दिनम्
वैश्वदैवम् सरस्वत्या तृतीयम् आप्तम् सवनम्। (२६)

**अनुवाद :- ते पूर्ण संत तीन वेळेची साधना सांगतात. (अश्विभ्याम्) सूर्योदय आणि अस्तामुळे बनलेल्या एका दिवसाच्या आधारावर (इन्द्रेण) प्रथम श्रेष्ठतेने सर्व देवांचे स्वामी पूर्ण परमात्म्याची (प्रात: सवनम्) पूजा प्रात:काळी करण्यास सांगतात, जी पूजा (ऐन्द्रम) पूर्ण परमात्म्यासाठी असते. दुसरी (माध्यन्दिनम्) दिवसाच्या मध्यान्ही (दुपारी) करण्यास सांगतात, जी पूजा (वैश्वदेवम्) सर्व देवतांच्या सत्कारासंबंधित (सरस्वत्या) अमृतवाणीद्वारे साधना करण्यास सांगतात आणि (तृतीयम्) तिसरी (सवनम्) पूजा संध्याकाळी (आप्तम्) प्राप्त करवतात. अर्थात, तिन्ही वेळच्या साधना वेगवेगळ्या करण्यास सांगतात आणि तेच जगताचे उपकारक संत आहेत.**

**भावार्थ :- ज्या पूर्ण संतांविषयी २५ व्या मंत्रामध्ये सांगितलेले आहे, ते दिवसात तीन वेळा (प्रात: म्हणजे सकाळी, मध्य म्हणजे दुपारी आणि संध्याकाळी) साधना करण्यास सांगतात. सकाळी पूर्ण परमात्म्याची पूजा, मध्यान्हास (दुपारी) सर्व देवतांच्या सत्कारासाठी आणि संध्याकाळी संध्या आरती आदी अमृतवाणीद्वारे सांगतात आणि तेच सर्व संसारावर उपकार करणारे संत असतात.**

**यजुर्वेदाच्या १९ व्या अध्यायातील ३० वा मंत्र**

संधिछेद :- व्रतेन दीक्षाम् आप्नोति दीक्षया आप्नोति दक्षिणाम् ।
दक्षिणा श्रद्धाम् आप्नोति श्रद्धया सत्यम् आप्यते (३०)

**अनुवाद :- (व्रतेन) दुर्व्यसनांपासून दूर राहिल्याने म्हणजेच भांग, मद्य, मांस, तंबाखू आदींच्या सेवनावर संयम ठेवणारा साधक (दीक्षाम्) पूर्ण संतांकडून दीक्षा (आप्नोति) प्राप्त करतो म्हणजेच तो पूर्ण संतांचा शिष्य बनतो. (दीक्षया) पूर्ण संत दीक्षित शिष्यापासून (दक्षिणाम्) दान (आप्नोति) घेतात. अर्थात, संत त्याच्याकडूनच दक्षिणा घेतात, जो त्यांच्याकडून नामोपदेश घेतो. अशाप्रकारे विधिवत (दक्षिणा) गुरुदेवांनी सांगितल्याप्रमाणे जो श्रद्धेने दान (दक्षिणेने) धर्म करतो, त्यामुळे (श्रद्धाम्) श्रद्धेस (आप्नोति) प्राप्त होतो. (श्रद्धया) श्रद्धेने भक्ती केल्याने (सत्यम्) नित्य राहणारे सुख व परमात्मा म्हणजेच अविनाशी परमात्म्यास (आप्यते) प्राप्त होतो.**

**भावार्थ :- पूर्ण संत त्याच व्यक्तीस शिष्य बनवतात, जो सदाचारी राहील व अभक्ष्य सेवन व अमली पदार्थांचे सेवन न करण्याचे आश्वासन देतो. पूर्ण संत केवळ त्याच्याकडूनच दान स्वीकारतात, जो त्यांचा शिष्य बनतो आणि नंतर गुरुदेवांकडून दीक्षा घेऊन नंतर दान-दक्षिणा करतो. त्यामुळे श्रद्धा वाढते. श्रद्धेने सत्यभक्ती केल्यामुळे अविनाशी परमात्म्याची प्राप्ती होते म्हणजेच पूर्ण मोक्ष मिळतो. पूर्ण संत भिक्षा व देणगी (धन) मागत फिरत नाहीत.**

कबीर, गुरु बिन माला फिरते गुरु बिन देते दान।
गुरु बिन दोनों निष्फल है पूछो वेद पुराण ।।''

**तिसरी ओळख म्हणजे तीन प्रकारचे मंत्र (नाम) तीन वेळा उपदेश करतील, ज्याचे वर्णन कबीर सागर ग्रंथामधील पान नं. २६५ 'बोध सागर' या शीर्षकाचच्या पाठात मिळते**

**आणि पवित्र गीता अध्याय १७ श्लोक २३ व सामवेदाच्या संख्या नं. ८२२ मध्ये मिळते.**

**कबीर सागरमध्ये अमर मूल बोध सागर पान नं. २६५**

तब कबीर अस कहेवे लीन्हा, ज्ञानभेद सकल कह दीन्हा।।
धर्मदास मैं कहो बिचारी, जिहिते निबहै सब संसारी ।।
प्रथमहि शिष्य होय जो आई, ता कहैं पान देहु तुम भाई ।।१।।
जब देखहु तुम दृढ़ता ज्ञाना, ता कहैं, कहु शब्द प्रवाना ।।२।।
शब्द मांहि जब निश्चय आवै, ता कहैं ज्ञान अगथ सुनावैं ।।३।।

**पुन्हा एकदा समजावून सांगितले आहे,**

बालक सम जाकर है ज्ञाना। तासों कहहू वचन प्रवाना ।।१।।
जा को सूक्ष्म ज्ञान है भाई। ता को स्मरन देहू लखाई ।।२।।
ज्ञान गम्य जा को पुनि होई।।सार शब्द जा को कह सोई ।।३।।
जा को होए दिव्य ज्ञान परवेशा, ताको कहे तत्व ज्ञान उपदेशा ।।४।।

**या वाणीवरून हे स्पष्ट होते की कडिहार गुरू (पूर्ण संत) तीन स्थितींमध्ये सारनाम पर्यंत प्रदान करतात आणि चौथ्या स्थितीमध्ये सारशब्द प्रदान करतात. कारण कबीर सागर मधील प्रमाण तर नंतर पाहिले होते आणि उपदेश विधी पूर्वीच पूज्य दादा गुरुदेव म्हणजेच परमेश्वर कबीर साहेब जींनी आमच्या पूज्य गुरुदेवांना (सतगुरु रामपालजी महाराजांना) प्रदान केली होती जे आपणाला सुरवातीपासूनच तीन वेळा नामदानाची दीक्षा देत आले आहेत.**

**आमचे गुरुदेव रामपालजी महाराज प्रथम श्री गणेशजी, श्री ब्रह्मा-सावित्री, श्री लक्ष्मी-विष्णु, श्री शंकर-पार्वती व माता शेरावाली यांचा नामजप प्रदान करतात. कारण त्यांचा वास (निवास) आपल्या मानव शरीरांतर्गत चक्रांमध्ये असतो. मूलाधार चक्रामध्ये श्री गणेश, स्वाद चक्रामध्ये ब्रह्मा-सावित्रीचा वास, नाभी चक्रामध्ये लक्ष्मी-विष्णुजींचा वास, हृदय चक्रामध्ये शंकर-पार्वतीचा वास, कंठ चक्रामध्ये शेरावाली माता यांचा वास असतो आणि या सर्व देवी-देवतांचे आदिअनादी नाममंत्र असतात. अर्थात, या मंत्राचे सध्याच्या गुरूंना ज्ञान नसते. ही चक्रे उघडल्यानंतर मनुष्य भक्ती करण्यायोग्य बनतो. सतगुरु गरीब दास आपल्या वाणीमध्ये प्रमाण देतात की :-**

पांच नाम गुझ गायत्री आत्म तत्व जगाओ। ॐ किलियं हरियम् श्रीयम् सोहं ध्याओ ।।

**भावार्थ :- गुझ गायत्री हे पाच नाम आहेत, त्यांचा जप करून आत्मा जागृत करा.**

**दुसऱ्या वेळी दोन अक्षरांचा जप देतात ज्यामध्ये एक ओम् आणि दुसरा तत् (हे गुप्त आहेत असे जो उपदेश घेतो त्याला सांगितले जाते) यांचा श्वासाबरोबर जप केला जातो.**

**तिसऱ्या वेळी सारनाम देतात जे पूर्ण रूपाने गुप्त आहे.**

## तीन वेळेच्या नामजपाचे प्रमाण

### गीता च्या १७ व्या अध्यायातील २३ वा श्लोक

ॐ, तत्, सत्, इति, निर्देशः, ब्रह्मणः, त्रिविधः, स्मृतः,
ब्राह्मणाः, तेन, वेदाः, च, यज्ञाः, च, विहिताः, पुरा ।।२३।।

**अनुवाद :- (ॐ) ब्रह्मचा (तत्) हा सांकेतिक मंत्र परब्रह्मचा (सत्) पूर्ण ब्रह्मचा (इति) असे हे (त्रिविधः) तीन प्रकारचे (ब्रह्मणः) पूर्ण परमात्म्याच्या नामस्मरणाचा (निर्देशः)**

संकेत (स्मृत:) सांगितला आहे (च) आणि (पुरा) सृष्टिच्या आदिकाळामध्ये (ब्राह्मणा:) विद्वानांनी सांगितले आहे की (तेन) त्याच पूर्ण परमात्म्याने (वेदा:) वेद (च) आणि (यज्ञा:) यज्ञादींची (विहिता:) रचना केली आहे.

**संख्या नं. ८२२ सामवेद उतार्चिक अध्याय ३ खण्ड नं. ५ श्लोक नं. ८ (संत रामपाल दास जी यांच्याद्वारे भाषा-भाष्य) :-**

मनीषिभि: पवते पूर्व्य: कविर्नृभिर्यत: परि कोशां असिष्यदत्।
त्रितस्य नाम जनयन्मधु क्षरन्निन्द्रस्य वायुं सख्यास वर्धयन् ।।८।।

मनीषिभि:-पवते-पूर्व्य:-कविर्-नृभि:-यत:-परि-कोशान्-असिष्यदत्-त्रि-तस्य-नाम-जनयन्-मधु-क्षरन:-न-इन्द्रस्य-वायुम्-सख्याय-वर्धयन्।

**शब्दार्थ :- (पूर्व्य:) सनातन म्हणजेच अविनाशी (कविर नृभि:) कबीर परमेश्वर मानव रूप धारण करून म्हणजेच गुरुरूपामध्ये प्रगट होऊन (मनीषिभि:) अंत:करणातून इच्छा असणाऱ्या, श्रद्धेने भक्ती करणाऱ्या भक्तात्म्याला (त्रि) तीन (नाम) मंत्र म्हणजेच नामोपदेश प्रदान करून (पवते) पवित्र करून (जनयन्) जन्म व (क्षरन:) मृत्यूपासून (न) रहित करतात आणि (तस्य) त्याचे (वायुम्) प्राण म्हणजेच जीवनश्वासांची संस्कारित श्वास अशी मोजदाद केली जाते. त्याला (कोशान्) आपल्या भांडारातून (सख्याय) मित्रत्वाच्या आधारावर (परि) पूर्णपणे (वर्धयन्) वृद्धिंगत करतात. (यत:) त्यामुळे (इन्द्रस्य) परमेश्वराचा (मधु) वास्तविक आनंद (असिष्यदत्) आपल्या आशीर्वादरूपी प्रसादाने मिळवून देतात.**

**भावार्थ :- या मंत्रामध्ये स्पष्ट केलेले आहे की पूर्ण परमात्मा कविर म्हणजेच कबीर साहेब मानव शरीरामध्ये गुरु रूपात प्रगट होऊन प्रभु प्रेमींना तीन प्रकारचे नामजप (मंत्र) देऊन त्यांच्याकडून सत्यभक्ती करवून घेतात आणि त्या मित्र भक्ताला पवित्र करून आपल्या आशीर्वादाने पूर्ण परमात्म्याची प्राप्ती करवून देऊन पूर्ण सुख मिळवून देतात. ते साधकाचे आयुष्य वाढवतात. याचेच प्रमाण गीता च्या १७ व्या अध्यायातील २३ व्या श्लोकामध्ये असे आहे की** ओम्-तत्-सत् इति, निर्देश: ब्रह्मण: त्रिविद्य स्मृत:। **याचा भावार्थ असा आहे की पूर्ण परमात्म्यास प्राप्त करण्याचे (१) ॐ (२) तत् (३) सत् हे मंत्रजपाचे स्मरण करण्याचा निर्देश केला आहे. हे नाम तत्त्वदर्शी संतांकडूनच प्राप्त करा. तत्त्वदर्शी संतांविषयी गीता च्या चौथ्या अध्यायातील ३४ व्या श्लोकामध्ये विश्लेषण आलेले आहे आणि गीता च्या १५ व्या अध्यायातील पहिल्या व ४ थ्या श्लोकांमध्ये तत्त्वदर्शी संतांची ओळख सांगितलेली आहे आणि म्हटले आहे की तत्त्वदर्शी संतांकडून तत्त्वज्ञान जाणून घेऊन, त्यानंतर त्या परमपद परमेश्वराचा शोध घेतला पाहिजे, जेथे गेल्यानंतर साधक परत पुन्हा या संसारामध्ये येत नाही म्हणजेच पूर्णपणे मुक्त होतो. त्याच पूर्ण परमात्म्याने संसाराची रचना केलेली आहे.**

**विशेष :- या विश्लेषणावरून हे स्पष्ट होते की पूर्ण परमात्माच पूजा योग्य आहेत याचे पवित्र चारही वेद देखिल साक्षी आहेत. त्यांचे वास्तविक नाव कविर्देव (कबीर परमेश्वर) आहे आणि तीन मंत्रांचा नामजप केल्यानेच पूर्ण मोक्ष प्राप्त होतो.**

परमेश्वर कबीर साहेबजींनी धर्मदासजींना सार शब्द देण्यास मनाई केली होती. जर सार शब्द एखाद्या कालच्या (ब्रह्म) दूताच्या हाती लागला, तर मधल्या पिढीतील हंसात्मे मुक्त होऊ शकणार नाहीत. कलयुगाच्या सुरवातीला पहिल्या पिढीतील भक्त अशिक्षित, अज्ञानी होते आणि कलियुगाच्या शेवटच्या पर्वातील अंतिम पिढीतील भक्त कृतघ्न होतील. आता सन १९४७ पासून भारत स्वतंत्र झाल्यानंतर मधल्या पिढीचा प्रारंभ झालेला आहे.

**सन १९५१ मध्ये सद्गुरू रामपालजी महाराजांना तत्त्वदर्शी संत म्हणून पाठविले आहे. आता सर्व भक्तजन शिकले सवरलेले आहेत. शास्त्र आपल्याला उपलब्ध आहे. आता हा सतमार्ग-सतसाधना संसारात पसरेल आणि खोटे गुरू संत-महंत यांना तोंड लपवायची पाळी येईल.**

**यासाठीच कबीर सागर, जीव धर्म बोध, बोध सागर, पाठ नं. १९३७ वर :-**

धर्मदास तोहि लाख दुहाई, सार शब्द कहीं बाहर नहीं जाई।
सार शब्द बाहर जो परि है, बिचली पीढी हंस नहीं तरि है।

**'धनी धर्मदास जीवनदर्शन एवं वंश परिचय' या पुस्तकाच्या पान नं. ४६ वर लिहिलेले आहे की अकराव्या पिढीला गादी प्राप्त झाली नाही. या पिढीतील महंतजी 'धीरजसाहेब' होते आणि ते कवर्धा या गावी राहत होते. त्यानंतर बारावे महंत उग्रसाहेब यांनी दामाखेडा या गावी गादीची स्थापना केली आणि स्वतःच महंत बनले. त्यापूर्वी दामाखेडा येथे वंशपरंपरेची गादी नव्हती. यावरून असे स्पष्ट होते की पूर्ण विश्वामध्ये सतगुरु रामपालजी महाराज यांच्याशिवाय वास्तविक भक्तिमार्ग नाही. सर्व प्रभुप्रेमी श्रद्धाळूंना प्रार्थना आहे की पूर्ण प्रभुंनी पाठवलेल्या दासाला ओळखून आपले कल्याण करून घ्यावे.**

यह संसार समझदा नाहीं, कहन्दा श्याम दोपहरे नूं।
गरीबदास यह वक्त जात है, रोवोगे इस पहरे नूं ।।

**बाराव्या पंथाविषयी ('कबीर सागर'मधील कबीर चरित्र बोध पाठातील पान नं. १८७० वर गरीब दासजींचा पंथ बारावा आहे असे लिहिलेले आहे.) 'कबीर सागर' कबीरवाणी पान नं. १३६ व १३७ वर वाणी लिहिलेली आहे, की-**

सम्वत् सत्रासै पचहत्तर होई, तादिन प्रेम प्रकटें जग सोई।
साखी हमारी ले जीव समझावै, असंख्य जन्म ठौर नहीं पावै।
बारवें पंथ प्रकट दै बानी, शब्द हमारे की निर्णय ठानी।
अस्थिर घर का मरमन पावैं, ये बारा पंथ हमही को ध्यावैं।
बारवें पंथ हम ही चलि आवैं, सब पंथ मेटि एक ही पंथ चलावे।
धर्मदास मोरी लाख दोहाई, सार शब्द बाहर नहीं जाई।
सार शब्द बाहर जो परही, बिचली पीढी हंसत नहीं तरहीं।
तेतिस अर्ब ज्ञान हम भाखा, सार शब्द गुप्त हम राखा।
मूल ज्ञान तब तक छुपाई,जब लग द्वादश पंथ मिट जाई।

**येथे कबीर साहेब जी आपला शिष्य धर्मदासजींना समजवून सांगतात की सन १७७५ मध्ये माझ्या ज्ञानाचा प्रचार होईल आणि तो बारावा पंथ असेल. बाराव्या पंथामध्ये आमची वाणी प्रकट होईल. परंतु भक्तिमार्ग योग्य नसेल. त्यानंतर बाराव्या पंथामध्ये आम्ही स्वतःच प्रगट होऊ आणि इतर सर्व पंथ नष्ट करून केवळ भक्तिमार्गाचा एकच पंथ चालवू. परंतु हे धर्मदास, तुला लाख शपथा आहेत की हा सार शब्द कोणत्याही कुपात्र व्यक्तिला देऊ नकोस. नाही तर मधल्या पिढीतील हंस (पवित्र आत्मे) मुक्त होऊ शकणार नाहीत. म्हणूनच जोपर्यंत बारावा पंथ नष्ट होऊन केवळ एकच पंथ होत नाही, तोपर्यंत मी हे मूळ ज्ञान गुप्त ठेवेन.**

**संत गरीब दासजी महाराजांच्या वाणीमध्ये नामाचे महत्त्व :-**

नाम अभैपद ऊंचा संतो, नाम अभैपद ऊंचा।

राम दुहाई साच कहत हूँ, सतगुरु से पुछा।
कहै कबीर पुरुष बरियामं, गरीबदास एक नौका नांम ।।
नाम निरंजन नीका संतों, नाम निरंजन नीका।
तीर्थ व्रत थोथरे लागे, जप तप संजम फीका ।।
गज तुरक पालकी अर्था, नाम बिना सब दानं व्यर्था।
कबीर, नाम गहे सो संत सुजाना, नाम बिना जग उरझाना।
ताहि ना जाने ये संसारा, नाम बिना सब जम के चारा ।।

**संत नानक साहेबजींच्या वाणीमध्ये नामाचे महत्त्व :-**

नानक नाम चढ़दी कलां, तेरे भाणे सबदा भला।
नानक दु:खिया सब संसार, सुखिया सोय नाम आधार ।।
जाप ताप ज्ञान सब ध्यान, षट शास्त्र सिमरत व्याख्यान।
जोग अभ्यास कर्म धर्म सब क्रिया, सगल त्यागवण मध्य फिरिया।
अनेक प्रकार किए बहुत यत्ना, दान पूण्य होमै बहु रत्ना।
शीश कटाये होमै कर राति, व्रत नेम करे बहु भांति ।।
नहीं तुल्य राम नाम विचार, नानक गुरुमुख नाम जपिये एक बार ।।

**(परम पूज्य कबीर साहेब (कविर् देव) यांची अमृतवाणी)**

संतो शब्दई शब्द बखाना।। टेक।।शब्द फांस फँसा सब कोई नहीं पहचाना।।प्रथमहिं ब्रह्म स्वं ईच्छा ते पाँचौ शब्द उचारा। सोहं, निरंजन, रंरकार, शक्ति और ओंकारा।।पाँचो तत्व प्रकृति तीनों गुण उपजाया। लोक द्वीप चारों खान चौरासी लख बनाया।।शब्दइ काल कलंदर कहिये शब्दइ भर्म भुलाया।।पाँच शब्द की आशा में सर्वस मूल गवांया।।शब्दइ ब्रह्म प्रकाश मेंट के बैठे मूंदे द्वारा। शब्दइ निरगुण शब्दइ सरगुण शब्दइ वेद पुकारा। शुध्द ब्रह्म काया के भीतर बैठ करे स्थाना। ज्ञानी योगी पंडित औ सिध्द शब्द में उरझाना।।पाँचई शब्द पाँच हैं मुद्रा काया बीच ठिकाना। जो जिहसंक आराधन करता सो तिहि करत बखाना। शब्द निरंजन चांचरी मुद्रा है नैनन के माँही। ताको जाने गोरख योगी महा तेज तप माँही।।शब्द ओंकार भूचरी मुद्रा त्रिकुटी है स्थाना। व्यास देव ताहि पहिचाना चांद सूर्य तिहि जाना।।सोहं शब्द अगोचरी मुद्रा भंवर गुंफा स्थाना। शुकदेव मुनी ताहि पहिचाना सुन अनहद को काना।।शब्द रंरकार खेचरी मुद्रा दसवें द्वार ठिकाना।।ब्रह्मा विष्णु महेश आदि लो रंरकार पहिचाना।।शक्ति शब्द ध्यान उनमुनी मुद्रा बसे आकाश सनेही। झिलमिल झिलमिल जोत दिखावे जाने जनक विदेही।।पाँच शब्द पाँच हैं मुद्रा सो निश्चय कर जाना। आगे पुरूष पुरान नि:अक्षर तिनकी खबर न जाना।।नौ नाथ चौरासी सिध्दी लो पाँच शब्द में अटके। मुद्रा साध रहे घट भीतर फिर ओंधे मखु लटके।।पाँच शब्द पाँच है मुद्रा लोक द्वीप यमजाला। कहैं कबीर अक्षर के आगे नि:अक्षर का उजियाला ।।

**जसे कि या शब्दामध्ये 'संतो शब्दई शब्द बखाना' लिहिलेले आहे की सर्व संतजन शब्दाची (नाम) महिमा गातात. पूर्ण ब्रह्म कबीर साहेबजींनी म्हटले आहे की शब्द सतपुरुषाचाही आहे जो सतपुरुषांचे प्रतीक आहे व ज्योति निरंजन (काल) याचे प्रतीकही शब्दच (नाम) आहे. जसे शब्द ज्योति निरंजन हा चांचरी मुद्रा प्राप्त करवून देतो. तो गोरखनाथांनी खूप मोठे तप करून प्राप्त केला होता. ही सर्वसामान्य व्यक्तीच्या आवाक्यातील गोष्ट नाही आणि नंतर गोरखनाथ कालपर्यंतचीच साधना करून सिद्ध बनले. परंतु मुक्त होऊ शकले नाहीत. जेव्हा कबीर साहेबांनी सत्यनाम म्हणजेच सारनाम प्रदान**

केले, तेव्हाच गोरखनाथांची कालापासून सुटका झाली. म्हणूनच ज्योति निरंजन नामाचा जप करणारे कालच्या जाळ्यापासून सुटू शकत नाहीत. शब्द ओंकाराचा (ओऽम) जप करण्याने साधक भूंचरी मुद्रेच्या स्थितीमध्ये येतो. ही साधना वेद व्यासांनी केली आणि तेही कालच्या जाळ्यातच राहिले. सोहं नामाच्या जपाने अगोचरी मुद्रेची स्थिती प्राप्त होते आणि यातून साधक काललोकी बनलेल्या भंवर गुफेमध्ये पोहचतो. ही साधना सुखदेव ऋषिंनी केली आणि ते केवळ श्री विष्णुलोकी बनलेल्या स्वर्गापर्यंतच पोहोचले गेले. शब्द ररंकारची साधना केल्याने खैचरी मुद्रा प्राप्त होते आणि साधक दहाव्या द्वारापर्यंत (सुष्मणा) पोहोचतो. ब्रह्मा, विष्णु, महेश हे तिघेही ररंकार शब्दच सत्य मानून कालच्या जाळामध्ये अडकून राहिले. शक्ती (श्रीयम्) शब्द हा उनमनी मुद्रा प्राप्त करवून देतो. हा जनक राजाने प्राप्त केला होता. परंतु त्यालाही मुक्ती मिळाली नाही. कित्येक संतांनी पाच नामांमध्ये शक्तीच्या जागी सत्यनाम जोडलेले आहे आणि सत्यनाम हे कोणताच जप नाही. हे तर सत्य (खऱ्या) नामाकडे इशारा आहे. सत्यलोकाला सच्च खण्ड देखिल (सत्यखण्ड) म्हणतात. असे हे सत्यनाम व सच्चा (खरे) नाम आहेत. केवळ सत्यनाम-सत्यनाम असा जप करून उपयोग नाही. या पाच शब्दांची साधना करणारे नवनाथ व चौऱ्याऐंशी सिद्ध देखिल इथपर्यंत सीमित राहिले आणि शरीरामध्ये (घटामध्ये) ध्वनी ऐकूनच आनंद घेत राहिले. वास्तविक सत्यलोक स्थान तर शरीरापासून (पिंड), ब्रह्माण्डापासून (अंड) पलीकडे आहे. त्यामुळेच नंतर ते सर्व मातेच्या गर्भामध्ये पुन्हा आले (उलटे लटकलेले झाड) म्हणजेच त्यांचे जन्म-मृत्यूचे कष्ट संपले नाहीत. शरीरामध्ये जे काही उपलब्ध होईल, ते कालपर्यंतचेच (ब्रह्म) आहे. कारण पूर्ण परमात्म्याचे निजस्थान (सत्यलोक) आणि त्यांच्या शरीराचा प्रकाश तर परब्रह्म वगैरेपेक्षाही अत्यंत पुढे आहे. त्यासाठी पूर्ण संतच संपूर्ण साधना सांगतील आणि ती पाच नामांपेक्षा (शब्द) पूर्णपणे वेगळी आहे.

संतों सो सत्गुरु मोहे भावै, जो नैनन अलख लखावै।।
ढोलत ढिगै ना बोलत बिसरै, सत उपदेश दृढावै।।
आंख ना मूंदै कान ना रुदैं ना अनहद उरझावै।
प्राण पूंज क्रियाओं से न्यारा, सहज समाधी बतावै ।।

**घट रामायणचे लेखक आदरणीय तुलसी दास साहेब जी (हाथरस वाले) स्वतः म्हणतात की- (घट रामायणाच्या पहिल्या भागातील पान नं. २७)**

पाँचो नाम काल के जानौ तब दानी मत संका आनौ।
सुरति निरत लै लोक सिधाऊँ। आदिनाथ ले काल गिराऊँ।
सतनाम ले जीव उबारी, अस चल जाऊँ पुरुष दरबारी।।
कबीर, कोटि नाम संसार में, इनसे मुक्ति न हो।
सार नाम मुक्ति का दाता, वाको जाने न कोए ।।

**गुरु नानक जींच्या वाणीमध्ये तीन नामांचे प्रमाण :-**

पूरा सतगुरु सोए कहावै, दोय अखर का भेद बतावै।
एक छुड़ावै एक लखावै, तो प्राणी निज घर जावै।
जै पंडित तु पढ़िया, बिना दउ अखर दउ नामा।
परणवत नानक एक लंघाए, जे कर सच समावा।
वेद कतेब सिमरित सब सांसत, इन पढि मुक्ति न होई।।

एक अक्षर जो गुरुमुख जापै, तिस की निरमल होई ।।

**भावार्थ :- गुरु नानक जी महाराज आपल्या वाणीतून समजवून सांगू इच्छितात की पूर्ण सतगुरु तेच असतात, ज्यांना दोन अक्षरांच्या जपाविषयी माहिती असते. त्यातील एक काल व माया यांच्या बंधनातून सोडवते व दुसरे परमात्म्याचे दर्शन घडविते आणि तिसरे जे अक्षर आहे ते परमात्म्याला भेटवते.**

**संत गरीब दास महारांजाच्या अमृतवाणीमध्ये श्वासाच्या नामाचे प्रमाण :-**

गरीब स्वांसा पारस भेद हमारा, जो खोजे सो उतरे पारा।
स्वांसा पारा आदि निशानी, जो खोजे सो होए दरबानी।
स्वांसा ही में सार पद, पद में स्वांसा सार।
दम देही का खोज करो, आवागमन निवार।।
गरीब, स्वांस सुरति के मध्य है, न्यारा कदे नहीं होय।।
सतगुरू साक्षी भूत कूं, राखो सुरति समोय।।
गरीब, चार पदार्थ उर में जोवै, सुरति निरति मन पवन समोवै।
सुरति निरति मन पवन पदार्थ (नाम), करो इक्तर यार।
द्वादस अन्दर समोय ले, दिल अंदर दीदार।
कबीर, कहता हूँ कहि जात हूं, कहूं बजा कर ढोल।।स्वांस जो खाली जात है, तीन लोक का मोल।।
कबीर, माला स्वांस उस्वांस की, फेरेंगे निज दास।चौरासी भ्रमे नहीं, कटैं कर्म की फांस ।।

**गुरु नानक देवजींच्या वाणीमध्ये प्रमाण :-**

चहऊं का संग, चहुऊं का मीत जामै चारि हटावे नित ।
मन पवन को राखै बंद, लहे त्रिकुटी त्रिवेणी संध।।
अखण्ड मण्डल में सुन्न समाना, मन पवन सच्चखण्ड टिकाना ।।

**पूर्ण सतगुरु तेच आहेत, जे तीन वेळेमध्ये नाम प्रदान करतात आणि श्वास उच्छ्वासाच्या क्रियेसह संस्मरणाची पद्धत सांगतात आणि तेव्हाच जीवाला मोक्ष शक्य आहे. जसा परमात्मा सत्य आहे, त्याप्रमाणेच परमात्म्याचा साक्षात्कार व मोक्ष प्राप्त करण्याची पद्धतदेखील आदिअनादी व सत्य आहे. ती कधीही बदलत नाही. गरीब दास जी महाराज आपल्या वाणीमध्ये म्हणतात की :-**

भक्ति बीज पलटै नहीं, युग जांही असंख। सांई सिर पर राखियो, चौरासी नहीं शंक।
घीसा आए एको देश से, उत्तरे एको घाट। समझों का मार्ग एक है, मुर्ख बारह बाट।
कबीर भक्ति बीज पलटै नहीं, आन पड़ै बहु झोला। जै कंचन बिष्ठा परै, घटै न ताका मोल।

**किती तरी महापुरुषांना सत्यनामाविषयी माहितीच नाही. ते मनमुखी नाम देतात, ज्याने सुख प्राप्त होत नाही किंवा मुक्तीही मिळत नाही. कोणी सांगतो की तप, हवन, यज्ञ आदी करा, तर कोणी महापुरुष नाक, कान डोळे बंद करून ध्यानधारणा करण्यास सांगतात. हे सर्व त्यांच्या मनमुखी साधनेचे प्रतीक आहे. परंतु कबीर साहेब जी, संत गरीब दास जी महाराज, गुरु नानक देवजी आदी परम संतांनी हे सर्व कर्मकाण्ड व्यर्थ ठरवले व या क्रियांना मज्ञाव करून केवळ एक नामजप करण्यास सांगितले आहे.**

**नॉस्ट्राडेमस नावाचा एक भविष्यवेत्ता होऊन गेला. सुमारे चारशे वर्षांपूर्वी त्याने भविष्यवाणी लिहिलेली आहे आणि ती सर्व आता खरी ठरत आहे. त्याने म्हटले आहे की**

सन २००६ मध्ये एक हिन्दू संत प्रगट होईल व संसारामध्ये त्याचीच चर्चा असेल. तो संत मुस्लिम किंवा ख्रिश्चन नसेल, तर तो केवळ हिन्दूच असेल. त्याने सांगितलेला भक्तिमार्ग इतर सर्वांच्यापेक्षा वेगळा आणि सत्यांवर आधारित असेल. ज्ञानामध्ये त्याला कोणीही हरवू शकणार नाही. सन २००६ मध्ये त्या संताचे वय ५० ते ६० वर्षांच्या दरम्यान असेल. (संत रामपालजी महाराजांचा जन्म ८ सप्टेंबर १९५१ रोजी झाला. जुलै २००६ मध्ये त्यांचे वय बरोबर ५५ वर्षे झाले आहे आणि ते नॉस्ट्राडेमसच्या भविष्यवाणीशी तंतोतंत जुळते.) त्या हिन्दू संताने सांगितलेले ज्ञान सर्व संसार स्वीकारेल. त्याच्या अधिपत्याखाली सर्व संसारात भारत वर्षाचे शासन येईल आणि त्या संताच्या आज्ञेने सर्व कार्ये होतील. त्यांची महिमा अवकाशाच्याही वर दुमदुमेल. नॉस्ट्राडेमसने सांगितलेला सांकेतिक इशारा पूर्ण संत सतगुरु रामपालजी महाराज यांच्याकडे आहे, जे २००६ मध्येच प्रसिद्धीस आले आहेत. अज्ञानी लोकांनी वाईट टीका करून प्रसिद्ध केलेली असली तरीही या पूर्ण संतांमध्ये कोणताही दोष नाही.

ही जी लक्षणे सांगितलेली आहेत ती सर्व तत्त्वदर्शी संत रामपालजी महाराजांमध्ये दिसून येतात.

# संतांच्या विटंबनेची शिक्षा

आदरणीय गरीब दास साहेबजींचा जन्म छुडानी गावातील (जिल्हा– झज्जर) श्री बलरामजी धनखड (जाट) यांच्या घरी झाला. पूर्ण ब्रह्म कविर्देव (कबीर साहेब जी) काशीमध्ये १२० वर्षे वास्तव्य करून १५१८ मध्ये सतलोकी गेले. पूर्ण ब्रह्म कबीर परमेश्वर (कविर्देव) सतलोकातून (ऋतधाम) पुन्हा १७२७ मध्ये सशरीर येऊन गरीब दास जींच्या जीवात्म्यास सत्यलोकी घेऊन गेले होते. आदरणीय गरीब दास साहेबजींना मृत जाणून क्रियाकर्म करण्यासाठी चितेवर ठेवले होते. त्याच वेळी त्यांचा जीवात्मा कबीर साहेबजींनी परत त्यांच्या शरीरामध्ये घातला होता. त्यानंतर आदरणीय गरीब दासजीही परमपूज्य कर्विदेव (कबीर परमेश्वर) यांची महिमा जनसमुदायाला ऐकवू लागले. जो कोणी दु:खी प्राणी गरीब दास जींकडून उपदेश प्राप्त करे, तोच सुखी होई. गरीब दासजींची वाढती महिमा आणि तत्त्वज्ञानासमोर अन्य गुरूंचे (आचार्य) अपूर्ण ज्ञान उघडे पडायचे. त्यामुळे आसपासचे सर्व अपूर्ण ज्ञानी गुरू (आचार्य) त्यांच्याशी खूप ईर्षा करू लागले. त्यांच्या आसपासच्या लोकांनी मुख्य चौधरींना त्यांच्याविषयी खोटेनाटे सांगून त्यांचे कान भरले होते. त्यामुळे आसपासच्या गावांतील सर्वसामान्य व्यक्तीही प्रभु कबीर साहेबांचे प्रिय बालक आदरणीय गरीब दासजींची घृणा करू लागले.

दिल्लीच्या वाजीदपूर गावामध्ये त्यांचा एक शिष्य होता. त्याच्याशीही पूर्ण गाव ईर्षा करायचे. त्याने प्रार्थना केल्यावर गरीब दास साहेब जी काही दिवस वाजीदपूरामध्ये येऊन राहिले होते. त्याच वेळी टोळ धाडीत आसपासच्या क्षेत्रामधील बाजरीचे पीक नष्ट झाले. परंतु गरीब दास जींच्या सेवकाच्या पिकाची कोणतीही हानी झाली नाही. सर्व ग्रामस्थ गरीब दास जींच्या महिमेने अत्यंत प्रभावित झाले आणि गरीबजींकडून त्यांच्या ज्ञानाचा स्वीकार करून आपले आत्मकल्याण करवून घेतले.

गरीबजींच्या आदेशाने त्यांच्या त्या भक्ताने त्याच्या शेतातील बाजरी पूर्ण गावामध्ये वाटून टाकली. गरीब दास जींनी वारंवार मनाई करूनही काही बाजरी बैलगाडीमध्ये ठेवली आणि म्हणाला, ''प्रत्येक पोर्णिमेस आपण भंडारा (महाप्रसाद) करता. त्यासाठी काही प्रमाणात दान आपल्या दासाकडूनही होईल.'' भक्ताची श्रद्धा पाहून गरीब दास जींनी स्वीकृती दिली. (आदरणीय गरीब दासजींचा चार पुत्र व दोन कन्या असा परिवार होता आणि ते सुमारे १३०० एकर जमिनीचे मालक होते.) त्याच बैलगाडीमध्ये बसून आपजी छुडानी गावाकडे निघाले. वाटेत काणौंदा गावाजवळ पोहोचताच स्वार्थी गुरूंनी (आचार्य) संत गरीब दास जींना घेरले आणि सर्व बाजरी लुटली आणि त्या गावचा चौधरी छाजूराम छिक्कारा याला हिन्दू धर्मद्रोह्याला आम्ही पकडलेले आहे, असा निरोप पाठवला. चौधरी छाजूरामच्या आदेशाने गरीब दासजींना वेशीमध्ये बांधले गेले. चौधरी छाजूरामजीला सरकारातर्फे काही शासकीय न्यायिक अधिकार मिळालेले होते. सहा महिन्यांची शिक्षा, पाचशे रुपये दंड, महादोषीस कोठडीत टाकणे आदी अधिकार त्याला मिळाले होते.

त्या धर्म अज्ञानी गुरूंद्वारे पूर्वीच चौधरी छाजूराम छिक्काराजीचे विपरीत ज्ञान सांगून कान भरले गेल्यामुळे त्याने आदरणीय गरीब दासजी महाराजांना तुरुंगामध्ये (काठमध्ये) टाकले. (काठमध्ये बंद करणे ही एक प्रकारची कठीण कारागाराची शिक्षा होती, ज्यात दोन्ही गुडघ्यांच्या वर दोन मोठे खांब बांधून दोन्ही हातही मागे बांधले जात असत.) बैल गाडीवान मोकळी गाडी घेऊन कौणांदापासून सुमारे दहा किलेमीटर लांब असलेल्या वाजीदपूरला

पोहोचला. सर्व प्रकार समजताच वाजीदपूर गावातील काही मुख्य व्यक्ती तत्काळ कौणांदा गावी पोहोचल्या. त्यांनी चौधरी छाजूरामजींना प्रार्थना केली आणि हे कोणी सामान्य व्यक्ती नसून परम शक्तिसंपन्न आहेत. आपण क्षमा करा, असे खूप समजवण्याचा प्रयत्न केला. चौधरी छाजूरामजी अत्यंत पवित्र आत्मा, अत्यंत दयाळू व नम्र हृदयाचे व्यक्ती होते. परंतु त्या स्वार्थी व प्रभुतेच्या उपाशी गुरूंनी छाजूराम छिक्काराजींना खोटेनाटे सांगून प्रभुप्रिय बालक आदरणीय गरीब दास जींबद्दल त्यांच्या मनात अत्यंत घृणा निर्माण करून ठेवली होती. त्यामुळेच चौधरी छाजूरामजींनी कोणतीही शहानिशा न करता शिक्षा दिली होती. वाजीदपूरच्या भक्तांची विनंती मान्य करून आदरणीय गरीब दास जी महाराजांना त्यांनी मुक्त केले. आदरणीय गरीब दास साहेब काहीही न बोलता आपल्या छुडानी गावी आले.काही दिवसांनंतर चौधरी छाजूरामजी प्रात:विधीसाठी जोहड तलावावर गेले होते, तेव्हा त्यांचे दोन्ही हात घोडेस्वारांनी तोडून टाकले आणि त्यांच्यासमक्ष ते घोडेस्वार अदृश्य झाले. हे दृश्य तलावाच्या काठावरील काही व्यक्तींनीही पाहिले. बरेच उपचार केले, तरीही वेदना व रक्तस्राव थांबला नाही. अनेक दिवस ते वेदनेने तडफडून ओरडत होते. नंतर एका व्यक्तीने सांगितले की तुम्ही आदरणीय गरीब दास जींकडे जाऊन क्षमायाचना करा, ते अत्यंत दयाळू आहेत. त्यांच्या परिवाराने चौधरींना घोड्यावर बसवून छुडानी गावी आणले. तेथे जाताच छाजुरामजी आदरणीय गरीब दास जींच्या चरणी लोळले आणि क्षमायाचना केली. संत गरीब दास जींनी आशीर्वाद दिला आणि नामोपदेश देऊन आजीवन भक्ती करण्यास सांगितले. चौधरी छाजुरामजी म्हणाले दाता मला आपल्याविषयी अत्यंत भ्रमित करून ठेवले होते.

आपण पूर्ण परमात्मा आहात हे मला माहीत नव्हते. आदरणीय गरीब दास जी म्हणाले मी पूर्ण परमात्मा कबीर साहेब (कविर्देव) विणकर यांनी पाठविलेला दास आहे. त्यांच्याच शक्तीने आपण बरे झालात. मी आपणास कोणता शाप दिलेला नव्हता. आपल्या कर्माचे फळ आपणास प्राप्त झाले आहे. जर आपण येथे आले नसता, तर आपल्या परिवारावर पापाचा आणखी प्रभाव पडला असता. आता आपण नामेपदेश घेतलेला आहे. त्यामुळे तो प्रभाव राहणार नाही. चौधरी छाजूरामजींनी आपल्या सर्व परिवाराला नामोपदेश घ्यायला लावला. आजही त्या पुण्यात्मा छाजूरामजींचे वंशज आदरणीय गरीब दासजींची परंपरागत पूजा करत आहेत. अशी सुमारे शंभरभर कुटुंबे तेथे आहेत, त्यांना 'छाजूवाडा' असे म्हटले जाते. कारण की :- तुमने उस दरगाह का महल ना देख्या। धर्मराय के तिल-२ का लेख।।राम कहै मेरे साध को, दु:ख ना दीजो कोए। साध दुखाय मैं दु:खी, मेरा आपा भी दु:खी होय।।हिरण्यकश्यप उदर (पेट) विदारिया, मैं ही मार्या कंश। जो मेरे साधु को सतावै, वाका खो-दूं वंश।।साध सतावन कोटि पाप है, अनगिन हत्या अपराधं। दुर्वासा की कल्प काल से, प्रलय हो गए यादव ।।

या वाणीतून सतगुरु गरीब दास साहेब जी प्रमाण देत आहेत- परमेश्वर म्हणतात की माझ्या संताला दु:खी करू नकोस. जो माझ्या संताला दु:खी करतो, तो मलाच दु:खी करत आहे असे समजा. जेव्हा माझ्या भक्त प्रल्हादाला दु:खी केले, तेव्हा मी हिरण्यकश्यपूचे पोट फाडले आणि मीच कंसाला मारले. जो माझ्या साधूला दु:खी करेल, त्याचा मी वंश नष्ट करेन. त्यामुळेच संताला त्रास दिल्यास लागणाऱ्या पापाची मोजदाद करता येत नाही. ते अगणित हत्या केल्यासारखे आहे. हे अज्ञानी लोक परमात्म्याचे संविधान ओळखत नाहीत. त्यामुळेच त्यांच्याकडून भयंकर मोठी चूक होते आणि ते दंडाचे भागीदार बनतात. साधूस त्रास दिल्यास खालीलप्रमाणे दंड मिळतो.

जर एक मनुष्याने दुसऱ्या मनुष्याची हत्या केली, तर त्याचा दंड त्याची पुढील जन्मी हत्या होऊन पूर्ण होतो. परंतु संताला त्रास देण्याचा दंड अनंत जन्म घेऊनही पूर्ण होत नाही. सतगुरु आपल्या वाणीमध्ये म्हणतात की :-

अर्धमुखी गर्भवास में हरदम बारम्बार, जूनी भूत पिशाच की, जब लग सृष्टि संहार ।।

अशी चूक करणाऱ्यास परमेश्वर वारंवार मातेच्या गर्भामध्ये प्रस्थापित करून वारंवार मृत्यू भोगावा लागतो. जोपर्यंत सृष्टिप्रलय होत नाही, तोपर्यंत भूत-पिशाच्च योनीमध्ये व मातेच्या गर्भामध्ये ठेवले जाते. हे अत्यंत दु:खदायक ठरते आणि जोपर्यंत तो संत माफ करत नाहीत, तोपर्यंत क्षमा मिळत नाही.

एकदा दुर्वास ऋषिंनी अभिमान झाल्यामुळे अंबरिश ऋषिंना मारण्यासाठी आपल्या शक्तीने सुदर्शन चक्र सोडले. ते चक्र अंबरिश ऋषिंच्या चरणांना स्पर्श करून परत दुर्वास ऋषिंना मारण्यासाठी त्यांच्या दिशेने येऊ लागले. आपण फार मोठी चूक केलेली आहे, याची दुर्वास ऋषिंना जाणीव झाली. परंतु ती वेळ विचार करत बसण्याची नसल्यामुळे दुर्वास ऋषिं सुदर्शन चक्राच्या पुढे पुढे धावू लागले. पळत पळत ते श्री ब्रह्माजींजवळ गेले आणि म्हणाले, ''भगवान, कृपया मला या सुदर्शन चक्रापासून वाचवा.'' ब्रह्मा जी म्हणाले, ''ऋषिवर, ही क्षमता माझ्यात नाही.'' आपल्यावर आलेले संकट टाळत ते म्हणाले, ''तुम्ही भगवान शंकराजवळ जावे. तेच आपणास वाचवू शकतील.'' हे ऐकून दुर्वास ऋषि भगवान शंकराजवळ गेले आणि म्हणाले, ''हे भगवान, कृपा करून आपण मला या सुदर्शन चक्रापासून वाचवा.'' भगवान शिवही ब्रह्माजींसारखे टाळत म्हणाले, ''आपण श्री विष्णु भगवानजींकडे जावे. तेच आपणास वाचवू शकतील.'' दुर्वास ऋषि लगेच भगवान विष्णुंजवळ गेले आणि म्हणाले, ''भगवान, आपणच मला या सुदर्शन चक्रापासून वाचवू शकता, नाही तर माझे तुकडे-तुकडे होऊन जातील.'' भगवान विष्णु जी म्हणाले, ''हे ऋषिवर, हे सुदर्शन चक्र आपल्या पाठीमागे का लागले आहे?'' दुर्वास ऋषिंनी सर्व वृतांत कथन केला. विष्णु जी म्हणाले, ''हे दुर्वास ऋषि, जर आपण अंबरिश ऋषिंचे चरण पकडून माफी मागितली, तरच या सुदर्शन चक्रापासून आपली सुटका होईल. अन्यथा मीच काय, कोणीही देव तुम्हाला वाचवू शकत नाही, यात काहीच शंका नाही. तुम्ही मृत्यूला सामोरे जाणार की अंबरिश ऋषिंची माफी मागणार?'' दुर्वास ऋषि परत मागे वळले. अंबरिश ऋषिंचे चरण पकडून ते रडू लागले. त्यांनी अंतःकरणातून त्यांची माफी मागितली. अंबरिश ऋषिंनी सुदर्शन चक्र आपल्या हाताने पकडले आणि दुर्वास ऋषिंना परत दिले. ते म्हणाले, ''संत/ऋषिंशी कधीही गैरवर्तन कधीही करू नये. अन्यथा त्याचा परिणाम अत्यंत वाईट होतो.''

'श्रीकृष्ण गुरु कसनी हुई और बचेगा कौन'

जर श्री कृष्णजींचे गुरू श्री दुर्वास ऋषिंसारख्यांची अशी वाईट स्थिती होते, तर आपल्यासारख्या सर्वसामान्य मनुष्याची काय गत होणार?

# भटकलेल्यांना मागर्दशन

## ''कबीर परमेश्वर जींच्या शरणमध्ये आल्याने भक्तांना झालेले लाभ''

## ''लग्नाच्या चौदा वर्षांनंतर परमात्म्याने संतान दिले''

मी सुखबिरदास पुत्र श्री जगमाल सिंह, गाव भुरवस, जिल्हा झज्जर येथील स्थायी निवासी आहे. आता मी गाव-मौजूखेडा (तहसील-ऐलनाबाद जिल्हा-सिरसा) येथे राहतो. माझे लग्न सन १९९३ मध्ये झाले. लग्नानंतर मी झज्जरचुंगी रोहतक येथे क्लिनिक थाटले. त्यानंतर माझ्या पत्नीला सन १९९९ मध्ये A.N.M. च्या पदावर नौकरी लागली. त्यानंतर आम्ही ऐलनाबादला राहू लागलो. आम्हाला मूळबाळ नव्हते. काही काळानंतर मुळबाळासाठी एकडे-तिकडे जाऊ लागलो. महाज्योती कार्यालय D.L.F. कॉलनी रोहतक येथे दाखवले. तसेच रोहतक मध्ये कितीतरी जाणकार झाडफुक करणाऱ्यांना दाखवले. डॉक्टरांना देखील दाखवले. परंतु काहीही फायदा झाला नाही. नंतर एकाने आम्हाला रामतीर्थ सिताकुंडात स्नानासाठी पाठवले. तेथे आम्ही अमृतसर येथील गुरुद्वारा आणि दुर्गा मंदिरात देखील गेलो. हरिद्वार, अग्रोंहाधाम, सीतलामाता मंदिर, गुडगाँव देखील गेलो. तसेच प्रत्येक पोर्णिमेला सालासार (राजस्थान) व दो जाटी धामास देखील जात होतो. मी हनुमानाची पूजा तसेच बाबा हरिदासाची पूजा देखील करत होतो तसेच आजीवन मंगळवारचा उपवास करायचो. यामुळे देखील काहीच फायदा न झाल्यामुळे आम्ही सिरसा येथील तलवाड नर्सिंग होम मध्ये ट्यूब तपासणी केली, तिथे आम्हाला कळाले कि अंडाच तयार होत नाही. नंतर एपेक्स हॉस्पिटल मध्ये दाखवले. त्यांनी टेस्ट ट्यूब बेबी साठी पाठवले व सांगितले कि एका वेळेस एकदीड लाखाचा खर्च येईल. एका वेळेस देखील सफल होईल किंवा दोन वेळेस देखील करावे लागेल. आमच्या जवळ एव्हडे पैसे नव्हते.

नंतर आम्ही संत शरणास जाण्याचा विचार केला. मौजुखेडा येथे एका बिट्टू सेठची दुकान होती. ते मागच्या आठ वर्षापासून राधास्वामी व्यास चे सेवक होते. त्यांच्याशी सल्लामसलत केली व नामदान घेण्यास तयार झालो. परंतु पत्नीने तेथून नामदान घेण्यास विरोध केला. तिने सांगितले कि सच्चा सौदा सिरसा येथून नामदान घेऊयात, म्हणजे लवकर जाता येईल. कारण राधास्वामी चा डेरा तर खूपच लांब आहे. परंतु सच्चा सौदा येथून नाम घेण्याची माझी इच्छा नव्हती. आम्ही ३-४ दिवस आपसात चर्चा करत होतो, इतक्यात चार दिवसानंतर दैनिक भास्कर मध्ये संत रामपालजी महाराजानी लिहिले कि हे सच्चा सौदावाले शास्त्रविरोधी ज्ञान देवून भक्तांचे अनमोल जीवन वाया घालवतात. मी माझ्या पत्नीला सांगितले कि शास्त्रविरूद्ध साधना म्हणजे मनमाना आचरण आहे ज्यामुळे कसलाच फायदा होणार नाही आणि हे खरेच लिहिले आहे. नंतर मी सतलोक आश्रम येथे संपर्क साधून पुस्तक मागवले. पुस्तक लक्षपूर्वक वाचले व विचार केला कि आम्ही इतक्या जागी फिरलो पण काहिच फायदा झाला नाही. आम्हाला जर इथून लाभ झाला तर आम्ही सर्व देवी देवतांना सोडू, कारण आमच्यासाठी तर तोच भगवान आहे जो आम्हाला लाभ देईल. नंतर मी २५-७-२००५ ला करौथा आश्रमात जावून नाम उपदेश घेतला. नाम घेण्याअगोदर मी पायरीया रोगाने ग्रस्त होतो. सर्व दात दाढा हालत होत्या. दुखत होत्या. मी जेव्हा नाम घेण्यासाठी गेलो तेव्हा मी सोबत औषधाची गोळी घेण्याचे विसरलो होतो. नाम घेतल्यानंतर मला कळलच नाही कि माझा दात-दाढाचे दुखणे कुठे गेले? अस वाटल कि दुखणं कधी नव्हतच. नंतर मी आश्रमात जेवण घेतले तरीही दात दुखत नव्हते. दातांना हात लावून बघितले तर ते हालत होते पण पहिल्या पेक्षा कमी. आताही

हलतात पण तकलीफ नाही. त्यानंतर दर्शनासाठी गेलो तर सतगुरुदेव चरण फोमच्या रुई पेक्षा देखिल नरम होते. मी तर असा बेफिकीर झालो कि ना कोणती चिंता ना कसला त्रास. मी खूप आनंदित झालो. आपोआप मनात येत राहिले कि यांच्यापेक्षा वर कोणतीही शक्ति नाही. घरी गेल्यानंतर, मी सर्व देवी देवतांच्या मुर्त्या/फोटो जलप्रवाहीत करण्याच्या उदेशाने घेतल्या. हे बघून पत्नी नाराज झाली व म्हणाली कि मी मंगळवारची हनुमान जींची ज्योत कुठे लाऊ? बरेच समजाऊन सांगितल्या नंतर पत्नीने तिच्या मनात दोन संकल्प केले व म्हणाली कि ह्या दोन कामापैकी एक काम जरी सफल झाले तर मी तुमच्या गुरुजींना मानेल नाहीतर नाही. त्यानंतर पाचव्या दिवशी एक काम पूर्ण झाले. पण नंतर नाम घेण्यासाठी दोन महीने उलटले. नंतर ११ महिन्यांनंतर आमच्या शेजारची काकू आली. तिच्या समोर आमच्या कुलरला आग लागली. आम्ही विचार केला कि आता तर हिवाळा लागला उन्हाळ्यात ठीक करून घेऊ. मार्च महिन्यात दुकानदारास म्हणालो कि मला कूलरची मोटर पाहिजे. तो म्हणाला कि आता नाही सात दिवसांनंतर या. चौथ्या दिवशी झोपेत असताना काय पाहतो कि, गुरुजी हातात स्क्रू-ड्रायवर व इतर सामान घेवून कुलरची मोटर बसवू लागले. मी उठलो तेवड्यात गुरुजी मोटर बसवून अंतरध्यान झाले. मी फोटोसमोर दण्डवत प्रणाम केला व रडू लागलो कि हे गुरुजी असे असे काम देखिल करत आहात. हे परमात्मा! आम्ही आत्तापर्यंत कोठे झोपलो होतो. सकाळी मी पत्नीस ते सांगत असताना त्या काकू देखील औषध घेण्याच्या उद्देशाने आल्या. म्हणु लागल्या की भाऊ काय गोष्ट आहे? मी म्हटले कि काकू आपल्या समोर आमच्या कुलरला आग लागली होती. आता आमच्या कुलरला आमचे गुरुजी ठिक करुन गेले. काकू ने म्हटले कि भाऊ कूलर चालवून दाखव. मग मी कुलरची खिडकी खोलली संपुर्ण कुलर धुळ मातीने भरलेला होता. जेव्हा साफ करुन चालवला तर नव्यापेक्षा देखिल जोरात व थंड हवे बरोबर चालला आणि आत्ता देखिल चालू आहे. मग परम्यातम्याने TATA AIG Insurance च्या हप्त्यात सूट दिली. तीन-चार वेळेस आमच्या घरात रुपये आपोआप वाढले.

अगोदर चौदा वर्षांनंतर आम्हाला संतान नव्हती आणि आता बन्दी छोड सतगुरु रामपाल जी महाराजांकडून उपदेश घेतल्यानंतर साडेतीन वर्षातच परमात्म्याने तीन संतान दिल्या. पूर्ण परमात्मा जे पाहिजे ते करू शकतात. आता आम्हाला हे पक्के ज्ञान झाले आहे कि बंन्दी छोड सतगुरु रामपालजी महाराजांच्या रुपामध्ये पुर्ण परमात्मा कबीर साहेब आहेत.

भक्त सुखबीर दास मोबाइल: ९४६६५९००४४.

## ''अद्भुत करिश्मा''

पूजनीय गुरुदेवजी दंडवत प्रणाम,

मी माझ्या परिवाराचा आनंद आदरपूर्वक सूचित करू इच्छितो की जानेवारी २००० मध्ये आपला सत्संग (प्रवचन) दिल्लीमधील ताजपूर गावातील श्री मुरारी भक्त यांच्या निवासस्थानी सुरू होता. तेव्हा एका भक्ताची मुलगी माझी पत्नी श्रीमती विमलादेवीस (छावला) म्हणाली की काकी, शेजारच्या गावामध्ये जो सत्संग सुरू आहे, त्या महाराजांकडून तुम्ही जर नामोपदेश घेतला, तर तुमचा असाध्य रोग (गुडघ्याच्या अस्थींमधील एका इंचाचे अंतर) पूर्णपणे बरा होऊ शकतो. माझ्या पत्नीने त्या मुलीला विचारले की ऑल इंडिया मेडिकल इन्स्टिटयूट ऑफ रिसर्च सेंटर ऑफ सायन्स, दिल्ली येथे अडीच वर्षे उपचार घेऊन काहीही फरक पडलेला नाही, ते आजारपण बरे करण्याची त्या एका नामात अथवा शब्दामध्ये कोणती शक्ती आहे? त्या दोघींचे हे संभाषण बराच वेळ चालू

होते. शेवटी माघार घेऊन माझ्या पत्नीने सत्संगामध्ये जाण्याचा निर्णय घेतला. परमपूज्य संत रामपालजी महाराजांचे प्रवचन/अमृतवाणी ऐकून मध्येच तुटलेली भक्तीची तार पुन्हा बंदी छोड यांच्याशी जोडली गेली आणि अडीच वर्षे उपचार करून कोणताही फरक न पडलेला असाध्य रोग केवळ नामस्मरणाने पाच दिवसांच्या आतच नष्ट झाला. यापूर्वी डॉक्टरांनी तिला बसण्यास व उभे राहण्यास सक्त मनाई केलेली होती. डॉक्टरनी तसे ट्रीटमेंट स्लिपवरही लिहिलेले आहे. तिच्या गुडघ्याच्या हाडांमध्ये एक इंच अंतर पडल्याचा एक्स-रेही माझ्याजवळ आहेत. तिला बसून स्वयपांक करता येत नव्हता आणि हात धुवायच्या वेळी जरा जरी वाकले लागले, तरी दहा-पंधरा मिनिटे एवढ्या कळा सुटायच्या की तिला रडूच कोसळायचे, ही तिची फार मोठी समस्या होती. आता ती परमपूज्य सतगुरु रामपालजी महाराजांच्या आशीर्वादाने ५० किलोचे वजन एकटी देखिल उचलू शकते आणि पूर्ण स्वस्थ, समाधानी आहे. माझी सर्व भक्तांना (वाचकांना) प्रार्थना आहे की परमेश्वरतुल्य पूर्ण संत रामपालजी महाराज जे कविर्देवजींचे (कबीर परमेश्वर) पूर्ण कृपापात्र आहेत, त्यांच्याकडून विनाविलंब मोफत नामोपदेश घेऊन सर्व परिवाराचे कल्याण करून घ्यावे व पूर्ण मोक्ष म्हणजेच सतलोक (शाश्वतम् स्थानम्) प्राप्त करावे.

आपला सेवक, भक्त नथुराम
गाव-छावला, दिल्ली. फोन - ९८११९५७९१२

## ''परमेश्वराने अशक्य ते शक्य केले''

मी भक्त सुरेन्द्रदास, गांधरा गावचा तालुका-सांपला, जिल्हा-रोहतक, हरियाणाचा रहिवासी आहे. माझे वय ३१ वर्षे आहे आणि लहानपणापासूनच मी परमात्म्याच्या शोधामध्ये व्यस्त होतो. मनमानी पूजा (मंदिरामध्ये जाणे, व्रत करणे, श्राद्ध घालणे आदी) करत होतो. परंतु शारीरिक कष्ट व मानसिक अशांती यांनी नेहमीप्रमाणेच ग्रासलेले होते. तरीही परमात्म्यावरचा विश्वास व परमात्माप्राप्तीची तळमळ, तीव्र इच्छा नेहमीच ज्वलंत होती. ही तळमळच मला सन १९९५ मध्ये संत आसारामबापू यांच्याकडे घेऊन गेली. मी त्यांच्याकडून नामोपदेश घेतला व बापूजींनी जसा भक्तिमार्ग सांगितला, त्याच जिद्दीने आणि मनापासून भक्तिसाधना केली. परंतु शारीरिक कष्ट दूर झाले नाहीत की कोणतीही आध्यात्मिक प्राप्त झाली नाही. कष्ट मात्र वाढतच गेले. मी आसारामबापूंच्या सांगण्यानुसारच साधना करायचो. त्यांच्या सांगण्याप्रमाणे दररोज सकाळी आणि संध्याकाळी २५० ग्रॅम दूध पीत होतो. माझ्या मंत्रामध्ये जेवढे अक्षर होते, तेवढे लक्ष मंत्रजप करणे, समाधी लावणे आदी ४० दिवसांची क्रिया होती. हे एक अनुष्ठान होते. अशी मी १४ अनुष्ठाने केली.

एकदा मी बापूजींच्या सत्संगामध्ये ऐकले की सलग सात दिवस विनाआहाराचा मंत्रजप करणे, समाधी लावणे, प्राणायाम करण्याने ईश्वरप्राप्ती होते. मी हे वचन सत्य मानून तसेच केले. परंतु परमात्म्याच्या प्राप्तीऐवजी आहाराविना राहिल्याने मरणासन्न झालो. तसेच प्राणायाम केल्याने मानसिक संतुलन बिघडले आणि मी वेडसर होऊ लागलो.

दरम्यान माझ्यावर सद्गुरू पूर्ण संत रामपालजी महाराजांची कृपादृष्टी झाली. मला सप्टेंबर २००० मध्ये पूज्य गुरुदेव संत रामपालजी महाराजांकडून नामोपदेश मिळाला. उपदेश मिळताच असे वाटू लागले की कोणी तरी माझ्या अंतःकरणातील दीपकामध्ये घृत (तूप) घातले आहे आणि माझे जीवन शांत व्यवस्थित चालू लागले.

पूर्ण संत पाप कर्मांना नष्ट करू शकतात. याचे प्रमाण माझ्या जीवनामध्ये स्पष्ट रूपाने

तेव्हाच घडले, जेव्हा मी मे २००४ मध्ये औरंगाबाद (महाराष्ट्र) येथे संत रामपालजी महाराज यांच्या सत्संगासाठी मंडप उभारण्याची सेवा करताना २५ फूट वरून खाली खडकाळ जमिनीवर पडलो. त्यावेळी काललला काही दुसरेच मंजूर होते आणि माझ्या गुडघ्याखालील हाड तुटले आणि शरीराचा खालचा भाग चेतनाहीन झाला. त्याच वेळी मी सतगुरुदेवजी संत रामपालजी महाराजांचे स्मरण केले आणि माझ्या गुरुदेवांच्या कृपेने तत्काळ दोन्ही पाय व्यवस्थित काम करू लागले.

गरीब, काल डरै करतार से, जै जै जगदीश। जौरा जौरी झाडती, पग रज डारै शीश।।

त्यानंतर मला औरंगाबादच्या खासगी पटवर्धन हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले. तेथे डॉ. डी. जी. पटवर्धनांनी माझी तपासणी केली. माझ्या गुडघ्याच्या खालच्या हाडाचा एक्स-रे काढला. तो रिपोर्ट पाहून डॉक्टर अत्यंत आश्चर्यचकित होऊन म्हणू लागले की आपल्या गुडघ्याखालील हाड तुटलेले आहे आणि त्याचा एक तुकडा तुटून वेगळा झालेला आहे. डॉ.वारंवार माझ्या पायाला हात लावून बघत राहिले आणि म्हणाले की आपणावर परमात्म्याची विशेष कृपाच आहे. आपले पाय व्यवस्थित काम करत आहेत. हे रिपोर्ट बघितले तर आपणास अर्धांगवायूचीच लक्षणे दिसतात. पटवर्धन हॉस्पिटलमध्ये तीन दिवस उपचार घेतले. त्यानंतर सुट्टी घेऊन आपल्या घरी पुन्हा हरियानाला आलो. येथे रोहतकमध्ये मी माझा उपचार प्रसिद्ध अस्थीरोग तज्ञ (हाडांचे डॉक्टर) डॉ.चड्डांपासून करण्यास गेलो. डॉ. चड्डा देखिल माझे रिपोर्ट पाहून आश्चर्यचकित झाले आणि म्हणाले की तुम्हाला चालायला-फिरायला कसे काय येते? रिपोर्टनुसार तर अर्धांगवायूचीच लक्षणे दिसतात. डॉ.चड्डांनी पुन्हा रंगीत एक्स-रे काढला आणि म्हणाले की यावर उपचार करणे असंभव आहे. हाड पुन्हा तुटू नये म्हणून ऑपरेशन करून आता आहे त्या स्थितीमध्येच ठेवले जाऊ शकते. त्यांनी हाडांना मजबुती येण्यासाठी इंजेक्शन सुरू केले. तीन महिन्यांचा इंजेक्शनचा कोर्स पूर्ण केला. त्यानंतरही डॉक्टर म्हणाले की ऑपरेशन तर करावेच लागेल. अन्यथा चांगले आहे ते हाड देखिल तुटू शकते. त्यांनी ऑपरेशनचा खर्च दोन लाख रुपये सांगितला. त्याच वेळी डॉक्टरांनी असेही सांगितले की रिपोर्टनुसार बघितले तर तुमची जगण्याची तीन महिन्यांची खात्री देता येईल. आज तुम्ही परमात्म्याच्या विशेष कृपेनेच जिवंत आहात. ऑपरेशनचा एवढा दोन लाख रुपये खर्च देण्याची माझी परिस्थिती नव्हती. त्यामुळे मी दुसऱ्या डॉक्टरांकडे उपचारासाठी गेलो. ते देखिल माझा रिपोर्ट पाहून आश्चर्यचकित झाले आणि म्हणाले की ऑपरेशन करण्यास जर वेळ झाला तर हाड आणखी तुटेल. त्यांनीही सांगितले की रिपोर्टनुसार तुम्हाला अर्धांगवायू होण्याचीच लक्षणे दिसतात. तरीही आपण चालत-फिरत कसे काय आहात?

शेवटी माघार घेऊन मी माझे गुरुदेव संत रामपालजी महाराजांच्या चरणी प्रार्थना केली, तेव्हा पूज्य गुरुदेवांनी माझ्यावर दया केली आणि डोक्यावर हात ठेवून म्हणाले, ''बाळा, तू नक्की पूर्णपणे बरा होशील. जर परमेश्वर कबीर साहेबजींच्या चरणी नसता तर कर्माचे भोग भोगावे लागले असते. तुझे आयुष्य शिल्लक नव्हते. आता पुन्हा एकदा डॉक्टरना दाखव'' मी गुरुजींच्या आदेशानुसार दुसऱ्या दिवशी डॉक्टरांना दाखविले. त्यांनी पुन्हा एकदा एक्स-रे काढला आणि एक्स-रे पाहून आश्चर्यचकितच झाले. ते म्हणाले की जे हाड तुटून वेगळे झालेले होते, ते आपोआप वर येऊन कसे काय जोडले गेले? एखादी गाडी मोठ्या चढावर जात असताना गाडीच्या इंजिनमध्ये बिघाड झाला, तर ती गाडी परत खाली येऊ लागते किंवा पहिला गिअर टाकून, चाकांना दगड लावून तेथेच थांबवता येऊ शकते, पण परत पुढे चढ चढू शकतच नाही. तुमचे हाड देखिल असेच वर चढून जोडले गेलेले आहे आणि ते बरे करणे डॉक्टरी

शास्त्राच्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे. ऑपरेशननेही ते बरे होऊ शकत नव्हते. ऑपरेशन करू न हाडात एक पदार्थ भरून तो गॅप भरून काढला जाऊ शकला असता. पण जर तुम्ही एखादे वजन उचलले असते, तर पुन्हा हाड निसटून मोडले असते आणि खाटेवर त्रास सहन करत मृत्यूच आला असता. डॉक्टरांच्या काहीच लक्षात येत नव्हते. मी म्हणालो की पूर्ण ब्रह्म कबीर साहेबस्वरूप माझ्या पूज्य गुरुदेव संतरामपालजी महाराजांनी माझे पापकर्म नष्ट केले आणि माझा मृत्यू टाळून आपल्या कोट्यातून मला नवीन जीवन प्रदान केलेले आहे. परमेश्वर कबीर साहेबांची वाणी आहे, की–

''जो मेरी भक्ति पीछो डी होई, तो हमरा नाम न लेवे कोई।''

आता मी पूर्णपणे बरा झालेलो आहे. तसेच सद्‌गुरूंच्या चरणी आत्मकल्याणासाठी निःस्वार्थपणे सेवा करीत आहे. आता मी पन्नास किलोचे वजन स्वत:च उचलून घेऊन चालू शकतो. आमच्या गुरुदेवांचा वास्तविक उद्देश भक्ती करवून घेऊन जीवांना विकाररहित करून आपल्या परमधामी सतलोकामध्ये घेऊन जाणे हाच आहे. येथील मिळणारे लहान–मोठे सुख आमचे गुरुदेव त्यांच्या स्वत:च्या खजिन्यातून प्रदान करत आहेत. कारण त्यामुळे जीव भक्तिमार्गामध्ये लागून राहतील. यासाठीच सर्व समाजाला प्रार्थना आहे की आमच्या गुरुदेवांच्या चरणी येऊन सत्यभक्ती करा व सांसारिक सुखांबरोबर आत्मकल्याणाचाही मार्ग प्राप्त करून घ्या. सत साहेब!

विशेष :– ऋग्वेदाच्या १० व्या मंडलातील १६१ सुक्तामधील २ रा मंत्र यामध्ये पूर्ण परमात्म्याने म्हटलेले आहे की हे शास्त्रानुकूल साधना करणाऱ्या साधका, तू सर्वस्व भावाने माझे शरण ग्रहण कर म्हणजेच संशयरहित होऊन माझी भक्ती कर. मी तुझ्या असाध्य रोगालाही समाप्त करून टाकीन. जरी तुझे आयुष्य शिल्लक नसेल, तर तुझ्या आयुष्याचे श्वास वाढवून शंभर वर्षे करून देईन. ही सत्यकथा प्रभुची समर्थता तसेच स्वयंसाधना प्रमाणित करीत आहे.

भक्त सुरेंद्र दास

मोबा. नं. ९९९२६००८२६

## ''प्रभुंनी गरिबांचे ऐकले''

मी कर्मवीर, पुत्र श्री घासीराम, पुत्र श्री छोटुराम, गाव–भराण, जिल्हा–रोहतक, हरियाना येथील कायमचा रहिवासी आहे. सर्वप्रथम मी व माझ्या पूर्ण परिवाराने १९८६ मध्ये निरंकारी बाबा हरदेव सिंहजी महाराजांकडून नाम घेतले. त्यावेळी मी महिलांना बांगड्या भरण्याचे काम करीत होतो. आर्थिक स्थितीही चांगली होती. हळूहळू परिस्थिती बिघडू लागली. काही दिवसांनंतर माझ्या पत्नीला अनेक व्याधी जडल्या. तिला मुळव्याध हा आजार व पित्ताच्या पिशवीमध्ये खडे झाले. डॉक्टरांनी ऑपरेशनसाठी वीस हजार रुपये लागतील, असे सांगितले. या दासाच्या घरी त्यावेळी वीस हजार धान्याचे दाणेही नव्हते आणि मला दम्याच्या व्याधीने ग्रासलेले होते. माझी पत्नी आणि मी कष्टी होऊन दु:खी मनाने ऑटो रिक्षातून बस स्टँडकडे जाताना आपल्याजवळ पैसे नाहीत, आता ऑपरेशन कसे काय होईल? आपण आता मरूनच जाऊ या, अशी चर्चा करीत होतो. त्याच रिक्षामध्ये एक भगिनी बसलेली होती. तिने आम्हाला सर्व गोष्टी विचारल्या आणि म्हणाली की तुम्ही करौंथा गावी जावा. तेथे एक महाराजजी आहेत आणि ते व्याधींवरील औषध फुकट देतात. माझी पत्नी भक्तमती मेवादेवी २७ जुलै २००३ रोजी सतलोक आश्रम, करौंथा येथे गेली आणि बंदी छोड सतगुरु रामपालजी

महाराज यांची भेट घेऊन आपल्या सर्व आजारांची व घरामधील वस्तुस्थिती सांगितली. सतगुरुदेवांनी अत्यंत प्रेमाने सर्व गोष्टी ऐकल्या आणि म्हणाले, ''मुली, येथे कोणती औषधी वगैरे दिली जात नाही. केवळ आत्मकल्याणाचा मार्ग समजावून दिला जातो. तसेच भक्ती करण्याची विधी पवित्र वेद व पवित्र गीता जी यांच्या आधारावर शास्त्रानुकूल सांगितली जाते. पूर्ण परमात्मा कबीर साहेबजींच्या कृपेने केवळ नामजप करूनच सर्व कष्ट दूर होतात. तसेच मूळ लाभ म्हणजे जन्म-मृत्यूपासून पूर्णरूपाने जीवाची मुक्तता करण्याचा आहे. समाजसुधार आणि अन्य सुख तर निःशुल्क आपोआपच होऊन जातात.'' राम नामाचे औषध देऊन सतगुरु रामपालजी महाराजांनी माझ्या सर्व परिवारास कृतार्थ केले. आता आम्ही प्रेमपूर्वक जीवन व्यतित करीत आहोत. नामस्मरण व गुरुदेवांच्या आशीर्वादाने सर्व व्याधी समाप्त झाल्या. आम्ही बंदी छोड यांच्याकडे विनंती करतो की परमात्म्याने जसे सुखी जीवन आम्हास दिलेले आहे, तसेच सर्वांना प्रदान करावे.

भक्त कर्मवीर दास पुत्र श्री घासीराम,
गाव-भराण, ता. महम, जि. रोहतक, हरियाणा.

## ''भगवान असावा तर असा''

मी भक्त महावीर सिंह, पुत्र श्री केहर सिंह, गाव- ढराणा जिल्हा-झज्जर (हरियाना) येथील रहिवासी आहे. पूर्वी मी शिवजींचा कट्टर भक्त होतो. माझ्या यकृत आणि मूत्रपिंडामध्ये जखमा होऊन पू झालेला होता. माझे बंधू भक्त महेंद्र सिंह मला औषधोपचारासाठी हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले. यापूर्वीही बराच पैसा खर्च केलेला होता. पण कोणताच गुण आला नव्हता. हॉस्पिटलमध्ये अल्ट्रासाऊंड सोनोग्राफी केल्यानंतर तीन ऑपरेशन करावी लागतील, असे सांगितले. मी घाबरलो. ऑपरेशनला मी नकार दिला. अन्न तर जातच नव्हते. प्रकृति अगदी नाजूक झाली होती. माझा ज्येष्ठ बंधू महेंद्र म्हणत असे की आपण संत रामपालजी महाराजांकडून उपदेश घ्या. ते पूर्ण परमात्म्याचे अवतार आलेले आहेत. कबीर परमेश्वर पूर्ण ब्रह्म आहेत. मी म्हणत होतो की शिव भगवानासमोर तुझ्या कबीर विणकराची (कोष्ट्याची) काय पात्रता आहे? कबीर तर एक कवी होता, तो भगवान होऊ शकत नाही.

बंधू महेंद्र सिंह याचा परिवार उघड्यावर पडला होता. संत रामपाल महाराज यांना शरण गेल्यानेच ते पूर्ण सुखी आहेत. त्यांनी पूर्वीच्या सर्व पूजांचा त्याग केला होता. तरीही ते अत्यंत सुखी आहेत. हे मलाही मान्य होते. परंतु तरीही मी आपल्या भगवान शिवजींपेक्षा श्रेष्ठ अन्य कोणालाही मानत नव्हतो. बंधू महेंद्र मला म्हणत असे की महावीर, हीच चूक सर्वांची होत आहे. पूर्ण ब्रह्म कविर्देव (कबीर परमेश्वर) हेच आहेत. त्यांच्या शक्तीसमोर ब्रह्मा-विष्णु-महेश, ब्रह्म आणि परमब्रह्म तर अत्यंत न्यून शक्तियुक्त आहेत. देशाचे प्रधानमंत्री व राष्ट्रपती यांच्यासमोर प्रांताच्या मंत्र्याची शक्ती असते, तसेच परमेश्वर कबीरजी म्हणजे राष्ट्रपती अथवा प्रधानमंत्री समज व शिव जी म्हणजे एक विभागीय मंत्री आहे. आता तुम्ही स्वतःच विचार करा की कोठे ठांठां (कविर्देव/कबीर परमेश्वर) आणि कोठे म्यां म्यां (भगवान शिव जी). हे म्हणजे सिंह आणि बकरे यांची तुलना झाली. पूर्ण संत रामपालजी महाराजांनी सर्व सद्ग्रंथांचे गहन (सखोल) अध्ययन केलेले आहे आणि भक्तिशक्तीने स्वानुभवाने भक्तियोग्य ज्ञान निर्माण केलेले आहे. आपल्या ज्युनिअर इंजिनिअर या नोकरीचा त्याग करून ते भक्तीच्या मैदानामध्ये उतरलेले आहेत. आज सर्व संत व महंत, तसेच आचार्यांना त्यांनी मागे टाकलेले आहे. सर्व पंथ व महर्षी दयानंदसारख्यांनाही त्यांच्या लेखांनी असफल केलेले आहे. त्यांनी वर्तमानपत्रांमधूनही

जाहीररीत्या सर्वांना आव्हान दिले आहे. तरीही कोणीही काहीही बोलू शकत नाही. आर्य समाजाच्या काही अज्ञानींनी विरोध केलेला होता, पण त्यांना माघार घ्यावी लागली. कारण पूर्ण संत रामपालजी महाराज प्रमाणांसहित वक्तव्य करतात. बाकीचे केवळ निराधार दंतकथांच्या आधारावरच मार्गदर्शन करत आहेत. सत्यासमोर असत्य टिकूच शकत नाही. जेष्ठ बंधू महेंद्रचे हे वक्तव्य ऐकून मनामध्ये यायचे की त्यांच्याशी वाद घालावा, परंतु ते मोठे असल्याने मी काहीच बोलत नव्हतो. दुसरा कोणी म्हटला असता की कोठे ठांठां (कबीर परमेश्वर) आणि कोठे म्यांम्यां (भगवान शिव जी), तर मी नक्कीच भांडण केले असते. परंतु आता समजले की खरोखरच कबीरजी पूर्ण परमेश्वरच आहेत. मृत्यू समोर दिसल्यावर काय करणार नाही? त्या दिवशी मी बंधू महेंद्रला म्हणालो की माझा जीव वाचवा. ते म्हणाले की करौंथा आश्रमात चल, तुझा जीव (प्राण) तेथेच वाचू शकतो. मला ऑपरेशन थिएटरमध्ये घेऊन जाण्यासाठी ट्रॉलीवर झोपवले गेले. ऑपरेशन करताना रुग्णाला घालतात ती वस्त्रे मला घातली गेली. मी उठून ती वस्त्रे काढली आणि माझी वस्त्रे परिधान करून बंधूला म्हणालो की मी नाम घेणार. आम्ही गाडी करून रोहतकमधील हॉस्पिटलपासून सरळ बंदी छोड सतगुरु रामपालजी महाराजांच्या चरणी आलो. मी नामोपदेश घेतला. त्यावेळी आश्रमामध्येच भोजन केले. नंतर मी पुन्हा हॉस्पिटलमध्ये गेलो आणि तपासणी करून घेतली. तपासणीनंतर डॉक्टर आश्चर्यचकित झाले. त्यांना माझ्यामध्ये कोणताच आजार आढळून आला नाही. मी स्वस्थ झोपलेलो होतो. आश्रमामध्ये मी काहीच खर्च केला नाही. नाम आणि मंत्रजपाची पुस्तिका मोफत मिळाली होती. माझा सर्व परिवार अन्य देव-देवातांची पूजा करत असे, परंतु उपदेश घेतल्यानंतर त्या सगळ्याचा त्याग केला. पूर्वीपेक्षा आम्ही अधिक सुखी व स्वस्थ झालो आहोत. बंदी छोड पूर्ण परमात्मा सतगुरु रामपालजी महाराजांचे रात्रंदिवस आम्ही गुणगान करीत आहोत.

संत रामपालजी महाराज यांचा उद्देश तर नामोपदेश देऊन भक्ती करवून कालच्या जाळ्यामधून जीवास मुक्त करणे असा आहे. समाजसुधार व अन्य सुख तर आपोआपच मिळतात. ''सतसाहेब''

भक्त महावीर

## ''लुटले गेलेल्यांना आधार''

मी भक्त जियाराम (राजू), पुत्र श्री गणेशी राम, गाठ-ढराणा येथील रहिवासी आहे. मला आणि माझ्या पत्नीला असाध्य रोग झाला होता. काही जण आरोप-प्रत्यारोप करत होते. डॉक्टरांनी टीबी (क्षयरोग) म्हणून सांगितले होते. आम्ही डॉक्टरांकडून बरेच औषधोपचार करून घेतले. तसेच देवी-देवतांचे पूजापाठ खूप केले. उत्तर प्रदेश, हरियाना, राजस्थान येथील बालाजी आदी स्थानांवर भक्ती, तसेच उपचारांसाठी गेलो. खूप पैसाही खर्च केला. जवळजवळ दोन लाख रुपये खर्च केले असतील. पण कोणत्याच उपचाराने गुण आला नाही. आम्ही वैतागून गेलेलो होतो. मी पूर्णपणे निर्धन झालो. पन्नास रुपये मिळवायचो आणि शंभर रुपये खर्च व्हायचे. अनेक वेळा मनामध्ये आत्महत्या करण्याचा विचार आला. होमहवनही करवून घेतले. हवन करतेवेळी पंडित घाबरला आणि म्हणाला की याच्या शरीरात मोठे पिशाच्च (जिंद) आहे. मी पुन्हा होमहवन करेन आणि त्यानंतरच काय ते सांगेन. भक्त महेंद्र, पुत्र श्री केहर सिंह (जो माझ्या गावचा रहिवासी आहे) याने संत रामपालजी महाराजांकडून नामोपदेश घेतलेला होता. मला नेहमी म्हणत असे की जियाराम, कोठे पाहिजे तिकडे जा आणि ठगांपासून (अयोग्य महाराजांकडून) स्वत: लुटून घे. संत रामपालजी महाराजांविना कष्टनिवारण होऊच शकणार

नाही. मी देखिल सर्व ठिकाणी भटकलो आणि लुटलो गेलो. शेवटी पूर्ण संत रामपालजी महाराजांच्या आशीर्वादाने व त्यांनी प्रदान केलेल्या नामोपदेशाने स्वस्थ आणि सुखी झालो आहे. मी भक्त महेंद्रला म्हणत असे की करौंथा येथील आश्रम तर आताआताचा आहे. मी मोठमोठ्या मंदिरांमध्ये जाऊन आलेलो आहे. परंतु एक दिवस त्रासाने वैतागून मी भक्त महेंद्रची भेट घेतली. दुसऱ्या दिवशीच आम्ही भक्त महेंद्रसोबत करौंथा येथील सतलोक आश्रमात जाऊन सतगुरु रामपालजी महाराजांकडून विनामूल्य नामोपदेश घेतला आणि त्यानंतर आम्ही पूर्णपणे स्वस्थ झालो. सन २००५ मध्ये आम्ही नामोपदेश घेऊन सुमारे दोन वर्षे झाली आहेत. आता आमचा संपूर्ण परिवार स्वस्थ आहे. आम्ही रात्रंदिवस पूर्ण परमात्मा बंदी छोड सतगुरु रामपालजी महाराज यांचेच गुणगान गात आहोत.

पूर्ण संत रामपालजी महाराज यांचा मुख्य उद्देश तर नामोपदेश देऊन भक्ती करवून घेणे आणि कालच्या जाळ्यातून मुक्त करण्याचा आहे. समाजसुधारणा व अन्य सुखे आपोआपच प्राप्त होतात. 'सत साहेब'.

भक्त जियाराम

## ''संत असावा तर असा''

मी शशी प्रभा प्रधानाचार्या (प्रिन्सिपल) राजकीय वरिष्ठ माध्यमिक विद्यालय डिगाना, जिल्हा जिंद, हरियाना येथे कार्यरत आहे. मी माझ्या घरातील भांडणे, मानसिक तणाव यामुळे सुमारे ३५ वर्षे चिंताग्रस्त होते. पती मारत असे. सर्व वेतन हिसकावून घेत असे आणि जेवढा त्रास देता येईल तेवढा देत असे. ३२ किल्ले जमिनीचे मालक असून आम्हाला नेहमी कुत्र्यासारखी भाकरी टाकत असे. मी त्याच्या आणि माझ्या सर्व नातलगांकडे मदत मागितली. समाजातील पंचायतीच्या सदस्यांकडेही मदत मागितली. पण मला कोणीही साथ दिली नाही. बिघडलेले कार्य संत सावरतात, असा विचार करून मी आनंदपूर (बीना), मध्य प्रदेश येथील गुरू करून घेतले. परंतु घरामध्ये तोच क्लेश होता. माझ्या मुलींना परमात्म्याच्या दयेने स्वत:च्या हिमतीवर शिक्षण दिले. त्यांचा विवाहाचा योग जुळून येत नव्हता. त्यांच्या वडिलांनी विवाहस्थळे पाहण्याचे बंद केले. याच त्रासाने मी बालाजीला गेले. बगड (राजस्थान), धौलीधार (हिमाचल प्रदेश) येथेही गेले. पीर-फकीर, गुरुद्वारे यांचा आधार घेतला. घरामध्ये जेव्हा एकटी असे, तेव्हा भरल्या डोळ्यांनी म्हणत असे की या धरतीवर कोणी परमात्मा आहे की नाही? अन्याय आणि जुलूम सहन करता करता माझी स्थिती वेड्यासारखी झाली होती.

त्यानंतर एक दिवस हा दु:खी आत्मा त्या परमात्म्याच्या दरबारापर्यंत पोहोचला, जे दु:खनिवारण करतात. आमच्या शेजारी सदगुरूंचा पाठ झाला. माझी शेजारीण मला प्रसादाचे निमंत्रण देण्यासाठी माझ्या घरी आली. तिथे गेल्यानंतर बरेच बोलणे झाले. पाठाविषयी (पूजा) सांगितले की हा पाठ परमात्म्याची सत्यवाणी आहे, याच्यामुळे दु:ख नष्ट होतात. परंतु हा पाठ केवळ संत रामपालजींच्या आज्ञेनुसार केल्यानेच लाभ होतो. अन्य कोणाकडून पाठ केल्याने कोणताच लाभ होत नाही. जशी राजा परीक्षिताला कथा ऐकवताना कोणत्याही ऋषिने पाठ (कथा) करण्याची हिंमत केली नाही. कारण त्यांच्याजवळ तेवढे अधिकार नव्हते. तसेच सातव्या दिवशी परिणाम दिसून येणार होता. यासाठीच स्वर्गातून ऋषि सुखदेवजी आले. त्यांनी राजा परीक्षिताला नाम देऊन (शिष्य बनवून) सात दिवस कथा (पाठ) ऐकवली, तेव्हा राजा परीक्षिताला थोडीशी विश्रांती मिळाली. वर्तमानामध्ये कोणालाही वास्तविक ज्ञान व सत्यसाधना माहिती नाही. त्यामुळे कोणीही पाठ केला, तरी त्याने साधकाला कोणताच लाभ होणार नाही.

ज्या भगिनीशी माझी चर्चा झाली, ती संत रामपालजी महाराजांचे विचार ऐकवत असे. तिने अशिक्षित असूनही शास्त्राचे गूढ रहस्य संत रामपालजी महाराजांकडून ऐकले आणि ऐकवले. मी प्रधान आचार्या (प्रिन्सिपल) असूनही अचंबित झाले. मला असे वाटले की परमात्मा माझा हात पकडत आहेत. त्या भगिनीनी सांगितले की आमचे गुरुजी दु:खांचे निवारण करतात. मी तिला विचारले, ''तुम्ही मला गुरुजींचे दर्शन घडवू शकता?'' परमात्म्याच्या दयेने दुसऱ्याच दिवशी सतगुरु रामपालजी महाराजजींना खुर्चीवर बसलेले पाहिले. संत काय असतात आणि त्यांची महिमा काय असते, याविषयी मला काहीच माहिती नव्हती. जे जेवढे उच्च असतात, तितकेच साधारण दिसतात. आमचे स्थान तर धरतीच्याही खाली आहे. आम्हाला परमात्म्याची महिमा काय समजणार? माझ्या गुरुजींनी माझी व्यथा ऐकली आणि म्हणाले, ''तुम्ही नामोपदेश घ्या. सर्व काही ठीक होईल.'' दुसऱ्याच दिवशी मला नामोपदेश मिळाला. एका महिन्याच्या आतच मुलीसाठी चांगले स्थळ आले आणि नंतर विवाहही झाला. जे अशक्य होते ते शक्य कसे काय झाले, याचाच मी विचार करू लागले. ज्याने आधी माझ्या मुलीला नकार दिलेला होता, तोच वर आज चक्क विवाहच करत आहे, ही फार मोठी चमत्कारिक गोष्ट होती. काही दिवसांनंतर माझ्या मोठ्या मुलीच्या पोटामध्ये कॅन्सरची व्याधी जडली. अजून तिला मूलबाळही नव्हते. त्यामुळे चिंता वाटू लागली. मी माझ्या मुलग्याला म्हणाले की जेव्हा आपण चित्रपट पाहत असतो, तेव्हा इकडे परमात्म्याची प्रार्थना केली जाते आणि तिकडे एखाद्या व्यक्तीचे ऑपरेशन यशस्वी होते, हे तू पाहिलेले आहे ना? तो माझ्या गोष्टीशी सहमत झाला आणि मी ताजपूर (दिल्ली) सद्गुरूंच्या सत्संगामध्ये सेवेसाठी गेले. तेथून मी हॉस्पिटलमध्ये मुलीजवळ गेले. ऑपरेशन ठीक झाले. कॅन्सरची शंका होती, तोच आजार बरा झाला. नंतर मुलगी गर्भवतीही झाली. त्यातच जावयाच्या ट्रॅक्टर व मोटारसायकल दुर्घटनेची बातमी कळाली. मला तर माझ्या पूज्य गुरुदेवजींशिवाय दुसरे काहीच सुचत नव्हते. परमात्म्याची जेवढी महिमा गावी तेवढी थोडीच आहे. लोकांना या मुखातून जेवढी महिमा मी सांगू तेवढी थोडीच आहे. दीड महिन्याच्या आत जावई बरे होऊन घरी आले. माझी प्रार्थना परमात्मा ऐकतात हे जगाला काय समजणार?

ज्या दिवशी मी उपदेश घेतला, तेव्हाच मी खोट्या संतांच्या प्रतिमा अंगणात टाकून भस्म केल्या. त्या दिवसापासून माझ्या जीवनाची गाडीही रुळावर आली. २३ सप्टेंबर २००३ रोजी मी माझ्या उघड्या डोळ्यांनी सुमारे चार-पाच वाजता एक भयानक आकृती पाहिली. ती आकृती एवढी भयंकर होती की जर नामोपदेश घेतलेला नसता तर माझे हृदय फाटले असते. परंतु त्या वेळी मला कोणतीही भीती वाटली नाही. मनोमनी फक्त एवढाच विश्वास पटला की हा यमदूत आहे. दुसऱ्याच दिवशी मी हे गुरुजींना सांगितले. त्यांनी स्पष्ट केले की त्या वेळीच माझे श्वास पूर्ण झालेले होते. आता मी आपल्या परमात्मास्वरूप गुरुजींच्या दयेनेच जीवन जगत आहे. त्यांच्याच कृपेने धाकट्या मुलीचे लग्न इंजिनिअर मुलाशी गेल्या वर्षी झाले. दोन-तीन वेळा माझी नोकरी जाण्याचीही शक्यता होती. परंतु माझ्या परमात्म्याने मला सांभाळले. मला दोन पदोन्नती मिळाल्या. संत रामपालजी महाराज म्हणतात की राजा देखिल प्रभुचेच बालक असतो. त्याच्यामध्ये देखिल प्रभुची शक्ती कार्य करीत असते. परमेश्वरच आपल्या साधकासाठी राजामध्ये प्रेरणा निर्माण करून सर्व फेरबदल करीत असतात. मात्र कर्म करताना राजा दृष्टीस पडतो. कर्ता-करविता परमात्माच आहे. कोणीही माझ्या सतगुरु रामपालजी महाराजांचा आधार घेऊन पाहा, त्यांचेही अशाप्रकारेच काटे (कष्ट) निघतील (नष्ट होतील), जसे माझे कष्ट नष्ट झालेले आहेत. परमात्मा खरोखरच निराधारांना आधार देतात, आत्म्याचा आवाज ऐकतात. माझ्याबाबतीत गेल्या काही वर्षांत जे काही घडले आहे, ते केवळ परमात्माच

करू शकतात. माझ्या सद्‌गुरूंची महिमा वर्णन करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत. हे स्वयम कबीर साहेबांचे अवतार आहेत. ज्यांना परमात्म्याच्या कृपेची इच्छा आहे, त्यांनी करौंथा आश्रम, जिल्हा-रोहतक, बरवाला आश्रम, जिल्हा-हिसार, हरियाणा येथे यायला विसरू नये. माझ्या या भोळ्याभाबड्या जीवाला तुम्ही कशी काय उभारी दिली? कोणत्या शब्दांत मी आपली महिमा गाऊ? वाचकांनो, हे शब्द आपल्या ह्रदयामध्ये उतरवून घ्या आणि लाभ प्राप्त करून घ्या.

अत्यंत तुच्छ प्राणी, भक्तमती शशी

मोबा. नं. +९१८६८४९००६०७

## ''आपल्या भक्ताला धर्मराजाच्या दरबारातून मुक्त केले''

मी भक्त ओमप्रकाश सुपुत्र श्री मातादीन, नजफगड, दिल्ली येथील रहिवासी आहे. मला परमपूज्य संत रामपालजी महाराज यांच्याकडून नामोपदेश घेऊन दीड वर्ष झाले आहे. माझे नजफगडमध्ये मिठाईचे दुकान आहे. १९ मे २००५ रोजी रात्री साडेनऊ वाजता दुकानामध्येच माझ्या पोटात अचानक वेदना सुरू झाल्या. वेदनांमुळे माझी अवस्था एकदमच वाईट झाली होती. मी गुरुजींनी दिलेल्या नामाचा जप करतच घरी पोहोचलो. घरामध्ये प्रवेश करताच समोरील सदगुरुजींच्या प्रतिमेपुढे दंडवत घातला. दंडवत घालून उभा राहिलो तर मला उदरवेदना जाणवायच्या बंद. नंतर मी कॉटवर झोपलो आणि तेथेच बेशुद्ध पडलो. माझ्या चारही बाजूंनी यमदूत फेऱ्या मारून मला भीती दाखवत होते. मी भीतीनेच बेशुद्ध पडलो होतो. लगेच माझ्यावर पांढरी चादर टाकून मला उचलून यमराजाच्या दरबारामध्ये घेऊन गेले. तेथे मी पाहिले की रांगच लागलेली होती. जेव्हा माझा नंबर आला तेव्हा यमराजा म्हणाला, ''याला तलावामध्ये फेकून द्या.'' मी तलावाकडे बघितले तर तलावात मगरीच मगरी दिसल्या. ते पाहून मी भयभीत झालो. आपल्या परमपूज्य सतगुरु रामपालजी महाराजांचे स्मरण केले. धर्मराजाचे दूत मला तलावामध्ये फेकण्यासाठी तयार झाले होते. मी गुरुजींचा धावा केला- 'गुरुजी, मला वाचवा.' समोर पाहिले तर माझे गुरुजी कबीर साहेबांच्या रूपामध्ये आले आणि मला तलावात पडण्यापूर्वीच बाहेर काढले. यमराजाने कबीर साहेबांच्या चरणी दंडवत घातला. नंतर गुरुजी आपल्या रूपामध्ये आले आणि मला म्हणाले, ''आता मी तुझ्याबरोबर आहे.'' तेव्हाच माझी भीती दूर झाली. 'आपण याला वारंवार का वाचवत आहात? हा माझे भोजन आहे. पूर्वीही दोन वेळा आपण यास वाचविलेले आहे, असा धर्मराजाने गुरुजींशी वाद घातला. पहिल्या वेळी स्कूटर आणि जीप यांची समोरासमोर धडक होऊनही मला साधे खरचटले देखिल नव्हते आणि दुसऱ्या वेळी मोटारसायकल स्लिप झाली आणि मी चालत्या ट्रक खाली येऊन पडलो होतो. गुरुदेवजींनी मला त्या ट्रकखाली सापडण्यापासून वाचविले होते.

गुरुदेवजी धर्मराजाला म्हणाले, ''याने माझी पूर्वजन्मी भक्ती केलेली होती. त्यामुळेच मी याला वाचविले.'' धर्मराजा म्हणाले, ''यावेळी आपण याला का वाचविले? मी तर याचे नाम तोडून ठेवलेले होते.'' गुरुजी म्हणाले, ''त्याचे नाम तुम्ही तोडलेले होते. याने आपल्या मर्जीने तोडलेले नाही. त्यामुळेच मी याला वाचविले. हा माझी भक्ती करत आहे.'' धर्मराज (काल) म्हणाला, ''आपण याला कुठपर्यंत वाचवता, हेच मी बघतो.'' गुरुजी म्हणाले, ''मी क्षणोक्षणी याच्यासोबतच आहे. तू याचे काहीच बिघडवू शकत नाहीस.''

नंतर सतगुरुदेवजी धर्मराजाला म्हणाले की यापुढे जर याला कोणत्याही प्रकारचे कष्ट दिलेस, तर तू जसे लोकांना सतावतोस त्यापेक्षाही वाईट तुझे हाल करेन.

सतगुरुदेवांनी मला धर्मराजाच्या दरबारातून खाली घेऊन आणले आणि सांगितले की तू लवकरात लवकर आपल्या घरच्यांना सांग की तू एकदम ठीक आहेस. मला घरी घेऊन जावे. दोन डॉक्टरांनी तर मान्यच केले होते की ही आमच्या क्षमतेच्या बाहेरची गोष्ट आहे. माझे कुटुंबीय मला हॉस्पिटलमध्ये नेत होते. तेव्हाच मी त्यांना सांगितले, 'मला ताबडतोब घरी घेऊन चला, मी एकदम ठीक आहे.' जे माझ्यासोबत होते ते एकदम आश्चर्यचकित झाले. हा तर मेलाच होता. आता याला कशी काय शुद्ध आली? हा बोलू कसा काय शकला? माझे कुटुंबीय वाटेतूनच मला पुन्हा घराकडे नेऊ लागले, तेव्हा मला सतगुरु कमळावर विराजमान झालेले दिसले. कधी गुरुजींच्या, तर कधी कबीर साहेबांच्या रूपामध्ये मला ते दिसत होते आणि माझ्याकडे हात हालवत जात असल्याचा इशारा करताना दिसले. नंतर मी 'माझे गुरुजी येऊन गेले, माझे गुरुजी येऊन गेले,' असे म्हणत जोरजोराने रडायला लागलो. हा असा काय करत आहे, म्हणून घरचे पुन्हा भयभीत झाले. मला परत दवाखान्याच्या दिशेने घेऊन जाऊ लागले. तेव्हा गुरुजींनी मला आवाज दिला की भक्ता, तू हे काय करीत आहेस? मी तर तुला घरी ताबडतोब जायला सांगितलेले आहे. मी घरच्यांना समजावून सांगितले की मी एकदम ठीक आहे. मला माझ्या गुरुजींचे दर्शन झाले होते. त्यामुळे माझ्या घरचे मला घेऊन घरी आले. पण घरचे सर्व जण आश्चर्यचकित होऊन विचारात पडले की हा तर मेलेलाच होता आणि जिवंत कसा काय झाला? माझ्याबाबत असे असे घडले आणि माझ्या सतगुरुदेवांनी मला वाचवून घरी सोडून गेले, हे मी घरच्यांना घडलेल्या सर्व घटनेसह सांगितले.

भक्त ओमप्रकाश दास

**RZ-15, B Block** गल्ली नं.२, मकसुदा

बाद कॉलनी,नजफगढ, नवी दिल्ली. मोबा. नं. – ९७१६९२७१९१

## ''पूर्ण परमात्मा साधकाला भयंकर रोगातून मुक्त करून आयुष्य वाढवून देतात''

भक्त डॉ. ओमप्रकाश हुड्डा (C.M.O.) यांचे प्रमाण

ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील १६१ व्या सुक्तामधील पहिल्या, दुसऱ्या आणि पाचव्या मंत्रांमध्ये परमेश्वर म्हणतात की जर कोणास प्रत्यक्ष किंवा गुप्तपणे क्षयरोग झालेला असेल, तर त्यालाही ठीक करतो. तसेच जर एखाद्या रोग्याची प्राणशक्ती क्षीण झाली असेल, ज्याचे आयुष्य शिल्लक राहिलेले नसेल, त्याच्या प्राणांचे रक्षण करतो, तसेच त्या व्यक्तीला शंभर वर्षे आयुष्य प्रदान करतो आणि सर्व सुख प्रदान करतो. पाचव्या मंत्रामध्ये म्हटलेले आहे की हे पुनर्जीवन प्राप्त प्राण्या, तू सर्वस्व भावाने माझे शरण ग्रहण कर. जर पापकर्माच्या दंडाने तू अंध होणार असलास, तर मी तुला पुन्हा आजीवन नेत्रदान करून देतो. तुझे रोग संपवून सर्व अवयव प्रदान करतो आणि मी तुला प्राप्त होईल म्हणजे भेटेन.''

जम जौरा जासे डरें, मिटें कर्म के लेख।
अदली अदल कबीर है, कुल के सतगुरु एक ।।

या ओळी माझ्या जीवनामध्ये पूर्णपणे सत्य ठरलेल्या आहेत.

मी भक्त डॉ. ओमप्रकाश हुड्डा (**C.M.O. M.B.B.S., M.S. Eye specialist**), **18 A**, सरकुलर रोड, रोहतक येथील रहिवासी आहे. माझा जन्म १२ एप्रिल १९५३ रोजी किलोई गावात (जिल्हा– रोहतक) झाला. माझे पाचवी ते बारावीपर्यंतचे शिक्षण **D.A.V.** हायस्कूल व **D.A.V.** महाविद्यालय अमृतसर येथे झाले. अमृतसरमध्ये माझे मोठे भाऊ **D.A.V.** हायस्कूलमध्ये

**Librarian** ग्रंथपालपदी कार्यरत होते. तेथील ओळखीचे लोक त्यांना मास्तरजी आणि मला प्रेमाने छोटे मास्तरजी असे म्हणत. जेव्हा मी सहावी इयत्तेत शिकत होतो, तेव्हा दुरग्याना मंदिर, अमृतसर येथे सेवक असलेल्या एका महात्म्याने माझ्या हस्तरेषा पाहून सांगितले होते की छोटे मास्तरजी, आपण डॉक्टर होणार आणि तुमचे आयुष्य केवळ पन्नास वर्षेच आहे. हे सांगितल्यावर आपण लहान मुलाला सत्य सांगून चूक केली, असे समजून ते घाबरले. मी मात्र त्या महात्म्यांचे भाष्य एखाद्या बालकाप्रमाणे ऐकले न ऐकल्यासारखे केले आणि सोडून दिले. मी मोठा झाल्यावर डॉक्टरच झालो. तसेच मी **M.B.B.S.** आणि **M.S. (Eye specialist)** हे शिक्षण **P.G.I.M.S.** रोहतक येथे घेतले.

मला बरोबर ५० वर्षे पूर्ण होणार होती तेव्हा १०/११ एप्रिल २००३ च्या रात्री बाराच्या सुमारास मी सहपरिवार रोहतकमध्येच होतो. तेव्हा माझ्या दोन्ही हातांमध्ये वेदना सुरू झाल्या आणि हृदयामध्ये जडत्व आल्यासारखे वाटू लागले. आम्ही उपचारासाठी **P.G.I.M.S.** पी.जी.आय.एम.एस. हॉस्पिटलमध्ये गेलो. यापूर्वी कधीही मला ब्लडप्रेशरचा त्रास नव्हता की मधुमेह देखिल नव्हता. मी नामोपदेश घेण्यापूर्वी सतत धूम्रपान करत होतो.

तेथे ड्यूटीवर असलेल्या डॉक्टरना मी माझा **H.C.M.S.I. (Group A)** श्रेणीमध्ये त्यामध्ये **(S.M.O.** वर्तमान मध्ये **C.M.O.)** पदावर कार्यरत आहे, असा परिचय करून दिला. त्यानंतर डॉक्टरनी लगेच योग्य तपासण्या करून माझ्यावर उपचार सुरू केले आणि **Intensive Care Unit** मध्ये हलवले. इथपर्यंत मला सर्व जाणीव होती. परंतु **I.C.U.** आयसीयूमध्ये शिफ्ट केल्यानंतर पुढे काय काय झाले, हे मला माहीत नाही. जवळजवळ दीड ते दोन तासांनंतर मला जाणवले की मला कालचे (यमाचे) दूत चारी बाजूंनी घेरून उभे आहेत. चल, तुझी येथील वेळ आता संपली आहे आणि आम्ही तुला नेण्यासाठी आलेलो आहोत, असे ते म्हणू लागले. मी त्यांना काहीच बोलू शकलो नाही. एवढ्यात पूर्ण परमेश्वर कबीर साहेब माझ्या सतगुरु तत्त्वदर्शी संत रामपालजी महाराजांच्या रूपामध्ये बेडजवळ प्रगट झाले आणि ज्यांचे चेहरे प्रथमत: भयानक शरीर भयंकर अफाट होते, ते कालचे दूत महाराजजींना पाहून अदृश्य झाले.

माझ्या सतगुरुदेवांनी मला आशीर्वाद दिला आणि म्हणाले, ''कबीर परमेश्वरांनी तुझे आयुष्य त्यांच्या कोठ्यातून (त्यांच्या शक्तीने) वाढवून दिलेले आहे. कारण तू सतभक्ती पूर्ण करून सतलोकी जाऊ शकशील.'' मी रडत म्हणालो, ''मालक, स्वामी, आपणच स्वयं परमेश्वर आहात. आपण या चोल्यामध्ये (शरीररूपी वस्त्रामध्ये) स्वत:ला लपवलेले आहे. परमेश्वराची भक्तीही आपणच करून घेणार आहात. भक्ती करणारा मी असा कोण लागून गेलो आहे?'' एवढे बोलल्यावर माझे डोळे उघडले आणि डोळ्यात अश्रूंशिवाय दुसरे काहीही नव्हते. तीन दिवसांनंतर जेव्हा **I.C.U.** मधून मला जनरल वॉर्डमध्ये आणले जात होते, तेव्हा मी उठून चालू लागलो. त्यावेळी एका डॉक्टरांनी पळत येऊन मला पकडले आणि म्हणाले की हे काय करत आहात? तुम्ही अजिबात चालायचे नाही. तुम्हाला हार्ट ॲटॅक येऊन गेला आहे.

स्पेशल वॉर्डमध्ये शिफ्ट केल्यानंतर डॉक्टरांनी सांगितले, की १०/११ तारखेच्या रात्री तुमचा **E.C.G./B.P** आदी रिपोर्ट सांगत होते, तुम्ही वाचणारच नाही आणि सकाळी **E.C.G.** आदी रिपोर्ट पुन्हा सामान्य आहेत हे बघून आम्ही हैराण झालो आहे.

मी २५ डिसेंबर १९९९ रोजी संत रामपालजी महाराजांकडून नामोपदेश घेतला. यापूर्वीही मी ब्रह्माकुमारी, जैनी राधास्वामी यांचा शिष्य होतो. तसेच **D.A.V. School / College** चा विद्यार्थी असल्याने आर्य समाजाचा माझ्यावर पगडा होता. मी गायत्री मंत्रांचा जप कित्येक

लाख केला असेन. घरामध्ये सर्व देवी-देवतांचे शंभरभर फोटो होते. नामदीक्षेनंतर देवदेवतांच्या त्या सर्व प्रतिमा पाण्यामध्ये विसर्जित केल्या आणि सर्वप्रकारची अन्य उपासना बंद केली. सतगुरु रामपालजी महाराजांच्या आदेशानुसार पूर्ण परमात्मा कबीर परमेश्वर (कविर्देव) यांची भक्ती सुरू केलेली आहे. कारण सद्गुरूंनी म्हटले आहे की :-

एकै साधै सब सधै, सब साधै सब जाए । माली सींचैं मूल को, फले-फूले अघाए ।।

एका कबीर परमेश्वरांच्या भक्तीमध्ये, तेही केवळ तत्त्वदर्शी संतांकडून नाम ग्रहण केल्यानंतर लाभ हा झाला की संत रामपालजी महाराजांनी आपल्या कोट्यामधून माझे आयुष्य वाढवून दिले. ही गोष्ट मी आणि माझ्या परिवारातील व्यक्तींनी **P.G.I.M.S** मधील डॉक्टर तसेच इतर कर्मचाऱ्यांना सांगितली. परंतु त्यांना काहीच समजले नाही. या गोष्टी त्यांनाच समजू शकतात, ज्यांची परमेश्वराशी तार जुळलेली आहे अन्यथा हे ज्ञान समजणे असंभव आहे.

मी २५ डिसेंबर १९९९ रोजी तत्त्वदर्शी संत रामपालजी महाराजजींकडून नामोपदेश घेतला, तेव्हा मला माहीत नव्हते की हेच सतगुरुजी पूर्ण ब्रह्म कबीर साहेबांचे वास्तविक अवतार घेऊन आलेल आहेत. जेव्हा माझ्याबरोबर अशी घटना घडली तेव्हा माझा विश्वास बसला की-

माँसा घटे न तिल बढे, विधना लिखे जो लेख। साचा सतगुरु मेट कर ऊपर मारें मेख ।

कबीर परमेश्वर सशरीर संत रामपालजी महाराजांच्या रूपामध्ये आलेले आहेत, जे वास्तविक खरे सतगुरु आहेत आणि भाग्यातील पापकर्मरूपी लेख नष्ट करून आपल्या शक्तीने नवीन लेख लिहित आहेत.

## ''भक्तमती सुशीलाचा डोळा बरा केला''

माझी धर्मपत्नी श्रीमती शीला हुड्डा हिला ६ डिसेंबर २००४ पासून उजव्या डोळ्याने एका वस्तूच्या दोन-दोन प्रतिमा दिसू लागल्या. **P.G.I.M.S** रोहतक हॉस्पिटलमधील सर्व तपासण्या, **M.R.I** तसेच **M.R.I. Angiography** आदी तपासण्या करून घेतल्या. सर्व मोठ्या डॉक्टरांना दाखवून उपचारही करून घेतले. परंतु काहीच लाभ झाला नाही. खासगी डॉक्टर ईश्वरसिंह आदींनाही दाखविले. पण काहीच लाभ झाला नाही. हे सर्व आम्ही सतगुरुजींकडून आज्ञा घेतल्यानंतर केलेले होते. परंतु जेव्हा औषधोपचारापासूनच काहीच लाभ झाला नाही, त्यावेळी आम्ही सद्गुरूंना प्रार्थना केली की परमेश्वर, आपण आयुष्य देखिल वाढवून देता आणि ही गोष्ट आपल्यासाठी काय कठीण आहे? कृपया आपण आपल्या या बालकावर ही कृपा देखिल करावी. सद्गुरूंनी कृपा केली. डोळ्यावर हात ठेवताच उजवा डोळा एकदम बरा झाला आणि एका वस्तूच्या दोन-दोन प्रतिमा दिसणे बंद झाले. जसे पूर्वी दिसायचे तसेच दिसू लागले. आता त्यांना पूर्ण परमात्मा, पापकर्मांना जाळून नष्ट करणारे, भगवान नाही म्हणायचे तर काय म्हणायचे? वाचकांनो, कृपया हे वाचा आणि निर्णय घ्या व अतिशीघ्र आपणही आपले मान, गर्व, अहंकार व शास्त्रविधिरहित साधनांचा त्याग करून सतलोक आश्रम, करौंथा येथे येऊन परमपूज्य पूर्ण सतगुरु रामपालजी महाराजजींकडून नामोपदेश घेऊन आपले व आपल्या परिवाराचे कल्याण करून घ्यावे. 'सतसाहेब'.

प्रार्थी-भक्त डॉ. ओमप्रकाश हुड्डा

## ''तिन्ही ताप पूर्ण परमात्माच समाप्त करू शकतो''

भक्त राजकुमार ढाका (निवृत्त मुख्याध्यापक, एम.ए., बी.एड.) यांचे प्रमाण.

मी राजकुमार ढाका निवृत्त मुख्याध्यापक, दिल्ली (एम.ए.,बी.एड.) गाव- सुंडाना, जिल्हा- रोहतक, हरियाना. सध्याचा पत्ता- आजादनगर, रोहतक येथील रहिवासी आहे. सन १९९६ पासून माझी पत्नी व दोन्ही मुलांना एक अत्यंत भयंकर व्याधी जडली होती. या व्याधीने ते एवढे त्रस्त झाले होते की दोन्ही मुलगे या आजारामुळे नोकरी करू शकत नाही, असे म्हणत होते. या व्याधीत त्यांचा घसा कोरडा पडत होता. तोंडातून शब्द बाहेर पडत नव्हता आणि श्वासही घेणे बंद होत होते. अशा वेळी डॉक्टरांना आणून झोपेचे इंजेक्शन द्यावे लागायचे. परंतु रात्री ड्यूटी असताना ते इंजेक्शन कसे घेऊन जाणार? जीवाला खूप घोर लागायचा. अधिकारीही मला बोलावून घेत होते. मी त्यांना सर्वकाही सांगितले, तेव्हा ते म्हणाले की उपचार करून घ्या. मुले जेव्हा घरी असतील, त्यावेळी कधी एकाला, तर कधी दुसऱ्यावर उपचार करण्यासाठी डॉक्टरना रात्रीत दोन-दोन वेळा यावे लागत होते. याबाबत जर कोणाला संशय वाटत असेल, तर त्यांनी डबल फाटक येथे डॉ. सचदेव यांचा दवाखाना आहे. तेथे डॉ. सचदेवसाहेबांना मास्तरजीच्या घरी काय स्थिती होती, हे विचारावे.

कोण कोठे जायला सांगेल तेथे आम्ही गेलो. उत्तर प्रदेशमधील 'कराना शामली', खेखडा, राजस्थानमधील बालाजी येथे तर बऱ्याच वेळा, खाटू श्यामजी आणि कित्येक स्थानच्या मांत्रिकांकडे गेलो. हरियानामधील तर मी कोणतेच स्थान सोडले नाही. परंतु काहीच फरक पडला नाही. करेलाजवळील खेडा कंचनी, बोहतावाला, गोहानाजवळील गाव, समचाना, सिकंदरपूर, खिडवाली आदी अनेक ठिकाणी गेलो. यात जवळजवळ तीन लाख रुपये खर्च केले. पण कोणताच लाभ झाला नाही.

मी थकलो आणि माझा परिवार रसातळाला जाऊ लागला. माझी पत्नी मला म्हणाली की मी आता जगण्याची आशा सोडली आहे. आता भक्त सुभाष, पुत्र महेंद्र जो पोलीस आहे, तो ज्या संत रामपालजी महाराजांची महिमा सांगत असतो, त्याच संतांकडून मला नामोपदेश द्या. पूर्वी मी असल्या कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवत नव्हतो आणि गुरू करणे तर फारच कमीपणाचे समजत होतो. मी तिला म्हणत असे की तुझा गुरू तर मीच आहे. मी एम.ए., बी.एड. झालो आहे. माझ्यापेक्षा मोठा कोण गुरू असेल? परंतु परिस्थितीने मला विवश केले आणि मी पत्नीला नामोपदेश घेण्यास संमती दिली. तिला म्हणालो की आता तुझे आयुष्य अजून शिल्लक असेल असे वाटत नाही. तुझी इच्छा असेल, तर नामोपदेश जरूर घे. त्या वेळी माझ्या पत्नीचे वजन ५० किलो एवढेच राहिलेले होते. पूर्वी तिचे वजन ८० किलो इतके होते. उठणे-बसणे देखिल अवघड झाले होते. चालायची-फिरायची गोष्ट तर फार दूरची होती.

मी म्हणालो, ''आता मरतच आहेस, तर नाम घेऊन देखिल बघ. तुझ्या मनाची ही आणखी एक इच्छा करून बघ. आता मी तुला विरोध करणार नाही. नामोपदेश घे, नाही तर आणखी काहीही कर.'' संत रामपालजींकडून नाम घ्यावे असे सांगण्यासाठी दोन-तीन महिन्यांनी आमचा भाचा सुभाष सतत येत होता. तो म्हणायचा की ताई नाम घ्या, नाही तर मराल. मी म्हणत असे की कोणताही डॉक्टर सोडलेला नाही. आम्ही बालाजी आदी सर्व तांत्रिकांकडेही डोके आपटून घेतले आणि आता तुमचा संत काय करणार?

शेवटी वैतागून कोठेच कोणताही लाभ झाला नाही म्हणून नाम घेण्यासाठी तिला पाठविले. तसा मी आपल्या परिवाराने आश्रमात जाण्याच्या सक्त विरुद्ध होतो. १६ जानेवारी २००३ रोजी माझ्या पत्नीने नामोपदेश घेतला आणि 'गहरी नजर गीता में' नावाचे पुस्तक घेऊन घरी आली. एका महिन्यात दिव्यात तेल घातल्यानंतर प्रकाश होतो, तसा घरभर प्रकाश झाला. प्रत्येक महिन्याला तिचे तीन किलो वजन वाढू लागले. मोठ्या मुलग्याने नामोपदेश घेतलेला

नव्हता, तरीही त्याच्या आईने नामोपदेश घेतल्याने त्याला चांगली झोप येऊ लागली. त्याने आपल्या पत्नीला नामोपदेश घेऊ दिला. नंतर मी 'गहरी नजर गीता में' पुस्तक वाचले. जेव्हा मी खोलवर जाऊन विचार केला, तेव्हा समजले की असे सत्यज्ञान कधीच वाचलेले नाही आणि ऐकलेलेही नाही. मग मी एप्रिल २००३ मध्ये नामोपदेश घेतला. आज माझ्या घरी मोठ्यांपासून बालकापर्यंत सर्वांनी नामोपदेश घेतलेला आहे.

जेव्हा ती व्याधी होती, तेव्हा सर्व घर भीतीने, त्रासाने, थरथरायचे. भांडण-तंटे, नोकरीमधील वाद, डॉक्टरांचे येणे-जाणे, तसेच उपचारासाठी तातडीने दवाखान्यामध्ये घेऊन जाणे या सगळ्याला तोंड द्यावे लागत होते. आज आमचे घर स्वर्गासारखे आहे आणि सर्वांची सतलोकी जाण्याचीच इच्छा आहे.

एक महिन्यापूर्वी स्वप्नामध्ये येऊन परमेश्वर कबीर साहेब गुडगाव सेक्टर ५७ मध्ये प्लॉट आरक्षित करून गेले. जेव्हा ड्रॉ काढला तेव्हा तोच प्लॉट नंबर मिळाला, जो स्वप्नामध्ये कबीर परमेश्वरांनी सांगितलेला होता. सकाळी वर्तमानपत्र वाचले तर तोच प्लॉट नं. मंजूर झालेला होता. आमच्या येथे अशी व्याधी होती की जेवढे आम्ही सहन केले, तेवढे कोणीही दु:खी असणार नाही. आता संत रामपालजी महाराजांकडून नामोपदेश घेतल्यानंतर खूप कमी दिवसांत आम्ही अत्यंत सुखी झालो आहोत.

माझ्या घरी 'जिंद' (पिशाच्च) प्रगट झाले. त्याने सांगितले की मी तुमच्या आश्रमामध्ये जातो. सर्वकाही पाहून येतो. परंतु मी काचेपलीकडे जात नाही, जेथे संतजी विराजित होऊन सत्संग करतात. कारण मला सर्व गोष्टी माहिती आहेत. जर मी तेथे गेलो, तर माझी चांगलीच पिटाई होईल. यामुळे पुन्हा बाहेर येतो आणि तुम्ही कित्येक तांत्रिकांकडे गेला किंवा बालाजीला गेला, तेम्हा मी आत जातच नव्हतो. बाहेरच थांबत होतो. मला बांधू शकणारा कोणीही नाही. माझे साथीदार भित्रे होते. ते पळून गेले, परंतु मी जाणार नाही. मला तसे शिकवून पाठविले आहे की मला तुझे घर व तुझ्या मुलीच्या घराचा नाश करायचा आहे. तुम्ही कोठेही पळून जा, त्यानंतर एकापाठोपाठ एक सर्वांची विनाशाची पाळी येईल.

काही दिवसांनंतर ते पिशाच्च घरामध्ये प्रगट झाले आणि जोरजोरात ओरडू लागले की कोठे आहेत तुझे गुरू रामपाल?' कोठे आहेत तुझे स्वामी कविर्देव (कबीर परमेश्वर) ? जेव्हा पिशाच्च प्रगट झाले, तेव्हा माणसासारखे बोलत होते. माझ्या पत्नीने घरातील पूजास्थळी जाऊन दंडवत घातला, तेव्हा पिशाच्चाची पिटाई सुरू झाली आणि ते म्हणू लागले, या भिंतीच आता पाडून टाकतो. त्याची चांगलीच पिटाई झाली, तेव्हा ते म्हणू लागले की ही तर भिंत नाही. लोखण्डाचे जाळे आहे. हे मालिक रामपालजी कोठून आले? ते तर बरवाला येथे सत्संग करण्यासाठी गेलेले होते. (त्या दिवशी संत रामपालजी महाराज बरवाला, जिल्हा-हिसार येथे सत्संग करण्यासाठी गेले होते.) मालिक (स्वामी) येथे नाहीत असे समजूनच मी आलो होतो.

पिशाच्चाने सांगितले, की मी तर तुमचा पूर्णत: विध्वंस करायला आलो होतो. परंतु माझाच नाश झाला. आता मला नरकामध्ये टाकतील. त्यापेक्षा मी जातो, मला मुक्त करा. करौंथा आश्रमामध्ये संत रामपालजी बसलेले आहेत. त्यांना मनुष्य समजू नका. तेच पूर्ण परमात्मा आहेत. त्यांना अजिबात सोडू नका, नाही तर नुकसानच नुकसान करून घ्याल.

असेच उपचार कचनी या खेड्यातील पंडितही करीत होता. जेव्हा मी कचनी येथे गेलो होतो, तेव्हा त्या पंडिताने सांगितले की एकापाठोपाठ एकाचा मृत्यू होऊन आपला परिवार नष्ट होईल. मी ते मानले नाही. परंतु शाहपूरमध्ये माझ्या भावाच्या मुलीचा विवाह होता. ते पंडितही

शाहपूरचेच आहेत. त्या पंडितांनी आमच्या चौधरीस सांगितले की रोहतकच्या चौधरी रामकुमारच्या येथे अत्यंत भयंकर आजार आहे आणि त्यात त्यांचा सर्व परिवार नष्ट होऊन जाईल. त्यांना बोलवून आणा. तेव्हा आमच्या चौधरीसाहेबांनी त्यांच्या मुलग्याला माझ्याकडे पाठवून दिले. आमचा वाटेकरी जिलेसिंहने सर्व सत्यता कळविली आणि आम्हाला सोबत नेले. बोलवणे सोपे होते. परंतु उपचार अत्यंत अवघड होते. त्या पंडितजींच्या ते आवाक्यात नव्हते. मंगळवार व शनिवारच्या रात्री पाच-पाच झटके (पिशाच्च बाधा) येत असत. पंडितजी आमच्यावरून उतरून शेजारील तलावात उतारा टाकायचे. हा कार्यक्रम चार वर्षांपर्यंत चालला. नंतर त्या पंडितजीने हात वर केले (माघार घेतली).

मी बोहतावाला या तांत्रिकाकडे गेलो. त्याने सांगितले की हा तुमचा आजार मी नष्ट करेन. तुमच्या आजाराची मला माहिती आहे. तो कित्येक वेळा आम्हाला बालाजीलाही घेऊन गेला. पण ते पिशाच्च त्याच्या मुठीत आले नाही की त्याच्या त्या मंदिरात आले नाही. मंगळवारी व शनिवारी पिशाच्चाच्या झटक्यांनी त्यालाही अगदी वैतागून सोडले आणि त्यानेही हात वर केले. कारण जेव्हा झटके यायचे, तेव्हा माझ्याजवळ देखिल संदेश यायचा की रात्री नऊपासून दोन वाजेपर्यंत अग्नी पेटवून, पाण्याचा तांब्या आणि काठी घेऊन जागायचे आहे. हे सर्व १९९६ ते २००२ पर्यंत चालू होते. बोहता येथील त्या तांत्रिकाकडे घेऊन गेल्यानंतर जेव्हा पिशाच्चाचा झटका आला, तेव्हा त्यातून एक चिठ्ठी मिळाली. त्यात त्या बोहताच्या तांत्रिकाला सांगितलेले होते की यातून तू बाजूला हो, तुला पन्नास हजार रुपये दिले जातील. अन्यथा तुझेही काही खरे नाही. तांत्रिकाने घाबरून नकार दर्शविला. मला दिवसा दिल्लीमध्ये नोकरीला जावे लागे आणि रात्री पहरा द्यायचो. कधी-कधी रात्रीत डॉक्टरांना बोलवून आणायचो. माझी अत्यंत दुर्दशा झाली होती. मी माझे काम आणि सर्व परिवाराच्या आजाराने अत्यंत वैतागून गेलो होतो. कोणाला सांगायला गेले, तर ते चेष्टा करत होते. कोणीही साथ दिली नाही. पुष्कळ पैसा (जवळजवळ तीन लाख रुपये) खर्च झालेला होता.

माझी पत्नी चांदकौर हिला थॉयरॉईडची (गलगंड) व्याधीही झालेली होती. जानेवरी २००३ मध्ये डॉक्टर ओ. पी. गुप्ता यांनी थॉयराईडसाठी तिमारपूर दिल्ली येथील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यास सांगितले. परंतु तेथे न जाता मी डॉ. चुग जे या आजारावर विशेषतज्ञ होते, त्यांच्याकडे उपचार करून घेतले. त्यांनी सांगितले की आयुष्यभर औषधे खावी लागतील.परंतु आता २००३ मध्ये नामोपदेश घेतल्यानंतर औषधे खाण्याचे पूर्ण बंद झाले. मी डॉक्टर चुग यांच्याकडेही पुन्हा तपासणी करून पाहिली, तर ते अचंबित झाले आणि म्हणाले की हे कसे काय झाले? त्यांना मी सर्व गोष्टी सांगितल्या.

आता माझ्या मुलांचे व पत्नीचे सर्व आजार बंदी छोड सद्गुरू रामपालजी महाराजांनी नष्ट केले आहेत. मोठ्या मुलग्याचे नाव सुरेंद्र कुमार आणि धाकट्याचे नाव मनोज कुमार असे आहे. दोघेही हरियाना पोलीसामध्ये नोकरी करतात. ते दोघेही त्या जिंद पिशाच्चाने ग्रस्त झालेले होते. तसेच झटके तर कित्येक वेळा आले. परंतु नामोपदेश घेतला असल्याने परमात्मा कबीर साहेबजींनी त्यांना वाचविले.

तत्त्वदर्शी जगतगुरू संत रामपालजी महाराजजी जसे काय आमच्यासाठीच अवतरले आहेत. कारण ज्या परिवारामधील दोन्ही मुलगे नोकरी करणारे, परंतु दोघांनाही पिशाच्चबाधा झाल्यास त्या घरामध्ये काय होईल आणि ज्या स्त्रीचा दोन्ही मुलांसह असा वाईट खेळ होत असेल आणि तिच्या स्वत:मध्येही पिशाच्च असेल तर तिचे काय जीवन असेल? जे लोक करौंथा

आश्रमाविषयी ज्ञान मिळवत नाहीत, ते लोक अजूनही अंधारामध्ये आहेत. कारण वाचण्यासाठी बुद्धी दिलेली आहे. वाचा आणि विचार करा– वास्तविकता काय आहे?

आमच्या परिवाराचा सत्यानाश झालेला होता. जेव्हा माझे मुलगे आणि माझी पत्नी बरे झाले, तेव्हा लगेच मी स्वत:ला सतगुरु रामपालजी महाराजजींच्या चरणी समर्पित केले. आता माझे असे काही नाही. हे तन–मन–धन सर्व काही गुरुजींच्या चरणी समर्पित करीत आहे.

माझ्या मुलगीने व जावयानेही नामोपदेश घेतलेला आहे. आज माझ्या मुलीच्या घरीही स्वर्गसुख आहे. माझा जावई मद्यपान करत असे. त्यानेही मद्यपान सोडलेले आहे. माझ्या मुलीला प्रमोशन, प्लॉट, घर आदी काही दिवसांमध्येच प्राप्त झालेले आहे.

सन २००३ मध्ये बंदी छोड गुरू रामपालजी महाराजांनी आमच्या पापकर्मरूपी वाळलेल्या गवताच्या गंजीला सतनामरूपी अग्नीने जाळून नष्ट केले. आता कोणता गंडा नाही, कोणता दोरा नाही, भस्म नाही, ताईत आदी काहीच नाही. फक्त बंदी छोड यांनी दिलेल्या नामाने (मंत्र) सर्व रोग नष्ट झाले आहेत. मंत्र तर मोक्षप्राप्तीसाठी सर्व बंधनांतून मुक्त करून सतलोकामध्ये जाण्याचा आहे. हे सर्व रोग तर आपोआपच कविर्देवांच्या कृपेने समाप्त होतात. जर असे होत नसेल, तर भक्तीवरचा विश्वास उडतो. आता आम्ही अत्यंत सुखी आहे. आता कोणी वाटेल ते केले, तरी आमच्या घरी काहीही होत नाही. कारण आम्ही बंदी छोड कबीर साहेबजींचे हंस असून, त्यांच्या चरणी आहोत. आधी मला हे मान्य नव्हते. या गोष्टींना पाखण्ड समजत होतो. परंतु जेव्हा एकापाठोपाठ एकाला डॉक्टरांकडे घेऊन जावे लागले, उपचारासाठी पुष्कळ पैसा लागला, त्रासही झाला, तेव्हा कोठे डोळे उघडले की मी जाळ्यामध्ये गुरफटत चाललो आहे. यामुळे भूत–प्रेत नसतात, असले भ्रम विसरून जा. मी म्हणतो ते खोटे नाही. वास्तविक आहे, कारण त्या त्रासाने मी माझे घर उद्ध्वस्त करून टाकले असते. यासाठी सर्व वाचकांना प्रार्थना आहे की आपणही आपल्या समस्त दु:खापासून मुक्त होण्यासाठी व सत्यभक्ती करण्यासाठी सतलोक आश्रम, करौंथामधील परमपूज्य संत रामपालजी महाराजांकडून विनामूल्य उपदेश प्राप्त करून आपले मनुष्य जीवन सफल करा.

– प्रार्थी, मुख्याध्यापक राजकुमार (एम.ए.,बी.एड.)
मोबा. नं. ८६८४८६९०५१

या काही भक्तात्म्यांच्या आत्मकथा आपण वाचल्या. असे हजारो–लाखो भक्त आहेत, ज्यांची आपली आत्मकथा पुस्तकांमध्ये छापण्याची इच्छा आहे. परंतु येथे जागेच्या अभावी आम्ही काहीच भक्तांच्या आत्मकथा देऊ शकलो. जर सर्व भक्तांच्या आत्मकथा लिहायच्या म्हटले, तर कदाचित शंभर पुस्तके छापली जातील. यासाठी समजदार व्यक्तीला फक्त इशाराच पुरेसा आहे.

भक्तीमधील फरक :– भक्ती–भक्तीमध्ये बराच फरक असतो. आपण कोणत्याही देवी/ देवतांची भक्ती करा, त्याचे फळ अवश्य मिळेल, जे नाशवान असेल. परंतु मुक्ती मिळणार नाही आणि पापकर्मे देखिल समाप्त होणार नाहीत. ती भोगण्यासाठी वारंवार जन्म घ्यावा लागेल. मुक्ती तर केवळ पूर्ण संतांना शरण जाऊनच म्हणजेच त्यांच्याकडून नामोपदेश घेऊन पूर्ण परमात्म्याची भक्ती केल्यानेच प्राप्त होईल, अन्यथा नाही.

ये संसार समझदा नांही, कहंदा श्याम दुपहरे नूं ।
गरीबदास ये वक्त जात है, रोवेगो इस पहरे नूं ।।

# कबीर साहेबांचा कालाशी संवाद

जेव्हा परमेश्वराने (कबीर साहेब) सर्व ब्रह्माण्डांची रचना केली आणि आपल्या लोकी (सतलोक) विश्राम करू लागले, त्यानंतर आपण सर्व जण कालच्या ब्रह्माण्डामध्ये राहून आपले कर्मदंड भोगू लागलो आणि अत्यंत दु:खी झालो, सुख व शांतीच्या शोधामध्ये भटकू लागलो. आपल्याला आपले निजघर सतलोकाची आठवण येऊ लागली. तसेच तेथे जाण्यासाठी भक्ती करण्यास आपण सुरवात केली. कोणी चारही वेदांचे पाठांतर केले, तर कोणी उग्र तप करू लागले, हवन, यज्ञ, ध्यान, समाधी आदी साधना आपण सुरू केल्या. परंतु आपल्या निजघरी-सतलोकी जाऊ शकलो नाही. कारण या साधना करून आपणाला त्या पुढच्या जन्मात चांगले समृद्ध जीवन प्राप्त झाले. (राजा-महाराजा, मोठा व्यापारी, अधिकारी, देव-महादेव, स्वर्ग, महास्वर्ग आदी) आणि नंतर पुन्हा आपण ८४ लाख योनींमधील कर्मे भोगू लागलो. अत्यंत कष्टामध्ये राहू लागलो आणि परमपिता परमेश्वराची प्रार्थना करू लागलो की 'हे दयाळू परमात्मा! आम्हास निजधामाचा रस्ता दाखवा. आम्ही अंतःकरणापासून आपली भक्ती करत आहोत. आपण आम्हाला दर्शन का देत नाही?'

कबीर साहेब हा वृत्तांत धर्मदासजींना सांगताना म्हणाले की हे धर्मदास, या जीवांची हाक ऐकून मी आपल्या सतलोकातून सहजदासाचे रूप घेऊन काललोकामध्ये आलो. तेव्हा २१ ब्रह्माण्डामध्ये जेथे कालचे निजघर आहे, तेथे पोहोचलो. तेथे तप्त शिलेवर जीवांना भाजून त्यांच्या सूक्ष्म शरीरातील गंध मळ (घाण) काढला जात होता. मी तेथे पोहोचल्यानंतर त्या जीवात्म्यांचे जळणे समाप्त झाले. मला बघून त्यांनी विचारले, हे पुरुष! आपण कोण आहात? आपल्या निव्वळ दर्शनानेच आम्हाला मोठ्या सुख व शांतीचा आभास होत आहे. मी म्हणालो, ''मी पूर्ण ब्रह्म (पारब्रह्म) परमेश्वर कबीर आहे. आपण सर्व जीव माझ्या लोकातून (सतलोक) येऊन काल ब्रह्म लाच्या लोकामध्ये फसलेले आहात. हा काल दररोज एक लक्ष मानवाच्या सूक्ष्म शरीराचा गंध (मळ) काढून खातो आणि नंतर नाना प्रकारच्या योनींमध्ये दंड भोगण्यासाठी सोडतो.'' तेव्हा हे जीवात्मे म्हणू लागले की हे दयाळू परमेश्वर, आम्हाला या कालच्या तुरुंगातून मुक्त करा. मी (कबीर साहेब) सांगितले की ही ब्रह्माण्डे कालने तीन वेळा भक्ती करून माझ्यापासून प्राप्त केलेली आहेत. येथील ज्या सर्व वस्तूंचा तुम्ही वापर करत आहात, त्या सर्व कालच्या (ब्रह्म) आहेत आणि तुम्ही सर्व जण आपल्या इच्छेने येथे फिरण्यासाठी आला आहात.

त्यामुळे आता तुमच्यावर काल ब्रह्म लाचे फार मोठे ऋण झाले आहे आणि ते ऋण माझ्या खऱ्या (सत्यनाम) नामाचा जप केल्याशिवाय उतरू शकणार नाही. जोपर्यंत या ऋणातून आपण मुक्त होत नाही, तोपर्यंत काल ब्रह्म लाच्या तुरुंगातून बाहेर जाऊ शकत नाही. यासाठी तुम्हाला माझ्याकडून नामोपदेश घेऊन भक्ती करावी लागेल. त्यानंतरच मी तुम्हाला मुक्त करून सतलोकी, तुमच्या निजधामी घेऊन जाईन. आमचा हा संवाद चालू होता, तेवढ्यात तेथे काल ब्रह्म ला प्रगट झाला आणि त्याने अत्यंत क्रोधित होऊन माझ्यावर हल्ला केला. मी माझ्या शब्दशक्तीने त्याला बेशुद्ध केले. काही वेळानंतर तो शुद्धीवर आला आणि माझ्या चरणी पडून क्षमायाचना करू लागला. तो म्हणू लागला की आपण माझ्यापेक्षा मोठे आहात. माझ्यावर दया करा आणि कृपया आपण माझ्या लोकामध्ये का आला आहात, हे सांगा. मी कालपुरुषाला म्हणालो , ''काही जीवात्म्यांची भक्ती करून आपल्या निजधामी- सतलोकी परत जाण्याची इच्छा आहे. त्यांना सतभक्तिमार्ग मिळत नाही. त्यामुळे ते भक्ती केल्यानंतरही याच लोकामध्ये

(काललोक) राहतात. मी त्यांना सतभक्तीचा मार्ग सांगण्यासाठी आणि तू काल आहेस, दररोज तू एक लाख जीवांचा आहार करतोस व सव्वा लाख जीवांची उत्पत्ती करतोस. तसेच तू येथे भगवान बनून बसलेला आहेस, हा तुझा रहस्यभेद करण्यासाठी आलो आहे. मी जीवात्म्यांना सांगेन की तुम्ही ज्याची भक्ती करता तो भगवान नाही, तर काल आहे.'' हे ऐकताच कालपुरुष म्हणाला, ''जर सर्व जीवात्मे परत सतलोकी गेले तर माझ्या आहाराचे काय होईल? मी भुकेने व्याकूळ होऊन मरून जाईन. माझी आपल्या चरणी प्रार्थना आहे, की, तीन युगांमध्ये थोडेच जीवात्मे घेऊन जावे आणि मी काल (निरंजन) आहे, सर्वांना खाणारा आहे, हे माझे रहस्य सर्वांना समजू देऊ नये. जेव्हा कलयुग येईल, तेव्हा आपणास वाटेल तितक्या जीवात्म्यांना आपण घेऊन जावे.'' कालने माझ्याकडून (कबीर साहेब) हे वचन प्राप्त करून घेतले. कबीर साहेबांनी धर्मदासजींना पुढे सांगितले की सतयुग, त्रेतायुग आणि द्वापरयुगामध्येही मी आलो होतो आणि बऱ्याच जीवांना सतलोकी घेऊन गेलो. परंतु त्याचे रहस्य सांगितले नाही. आता मी कलियुगामध्ये आलेलो आहे आणि कालबरोबर माझा संवादही झालेला आहे. कालब्रह्म मला म्हणाला आहे की आता तुम्ही कितीही शक्ती पणाला लावली, तरी आपले म्हणणे कोणीही ऐकणार नाही. प्रथम सांगायचे तर मी जीवांना भक्तीच्या लायकच सोडलेले नाही. बिडी, सिगारेट, मद्यपान, मांसाहार आदी दुर्व्यसने लावून त्यांची वृत्ती बिघडवलेली आहे. नाना प्रकारच्या पाखण्ड पूजांमध्ये जीवात्म्यांना गुंतवून ठेवलेले आहे. दुसरी गोष्ट अशी की जेव्हा आपण आपले ज्ञान देऊन त्यांना आपल्या सतलोकी परत जाल, तेव्हा मी माझे दूत पाठवून आपल्या भक्तिपंथास मिळतेजुळते बारा पंथ चालवून जीवात्म्यांना भ्रमिष्ट करून टाकेन. ते सतलोकीची महिमा गातील, आपले ज्ञान देतील. परंतु नामजप मात्र फक्त माझाच करतील. परिणामस्वरूपी ते माझेच भोजन बनतील. हे ऐकून कबीर साहेब जी म्हणाले, ''तू तुझ्यापरीने प्रयत्न कर. मी सतमार्ग सांगून परत जाईन आणि जे माझे ज्ञान ऐकतील ते तुझ्या फसव्या जाळ्यात कधीही अडकणार नाहीत.''

सद्गुरू कबीर साहेब जी म्हणाले, ''हे निरंजन, जर मी मनात आणले, तर तुझा हा सर्व खेळ क्षणात समाप्त करू शकतो. परंतु असे केल्यास माझ्याकडून वचनभंग होईल, याचा विचार करून मी माझ्या प्रिय हंसात्म्यांना यथार्थ ज्ञान देऊन, 'शब्दा'चे बळ प्रदान करून सतलोकी घेऊन जाईन.'' पुढे त्यांनी सांगितले, की–

सुनो धर्मराया, हम संखो हंसा पद परसाया ।
जिन लीन्हा हमरा प्रवाना, सो हंसा हम किए अमाना ।।

(पवित्र 'कबीर सागर' पुस्तकामध्ये जीवांना धोक्यामध्ये ठेवण्यासाठी आणि आपली भूक शमवण्यासाठी नाना तऱ्हेच्या युक्त्यांचे वर्णन केलेले आहे.)

द्वादस पंथ करूं मैं साजा, नाम तुम्हारा ले करूं अवाजा।
द्वादस यम संसार पठहो, नाम तुम्हारे पंथ चलैहो ।।
प्रथम दूत मम प्रगटे जाई, पीछे अंश तुम्हारा आई ।।
यही विधि जीवनको भ्रमाऊं, पुरुष नाम जीवन समझाऊं ।।
द्वादस पंथ नाम जो लैहे, सो हमरे मुख आन समै है ।।
कहा तुम्हारा जीव नहीं माने, हमारी ओर होय बाद बखानै ।।
मैं दृढ फंदा रची बनाई, जामें जीव रहे उरझाई ।।
देवल देव पाषान पूजाई, तीर्थ व्रत जप-तप मन लाई ।।

यज्ञ होम अरू नेम अचारा, और अनेक फंद में डारा ।।
जो ज्ञानी जाओ संसारा, जीव न मानै कहा तुम्हारा ।।

**(सद्गुरू वचन)**

ज्ञानी कहे सुनों अन्याई, काटो फंद जीव ले जाई ।।
जेतिक फंद तुम रचे विचारी, सत्य शबद तै सबै बिंडारी ।।
जौन जीव हम शब्द दृढावे, फंद तुम्हारा सकल मुकावै ।।
चौका कर प्रवाना पाई, पुरुष नाम तिहि देऊं चिन्हाई ।।
ताके निकट काल नहीं आवै, संधि देखी ताकहं सिर नावै ।।

**या विश्लेषणावरून हे सिद्ध होते की सद्यःस्थितीत जे अनेक पंथ अस्तित्वात आहेत, त्यातील ज्यांच्याजवळ सतगुरु कबीर साहेबजींनी सांगितलेला सत्यभक्तिमार्ग नाही, ते सर्व कालपासून प्रेरित आहेत. त्यामुळे बुद्धिमान व्यक्तिंनी पूर्ण विचाराअंती भक्तिमार्ग स्वीकारावा. कारण मनुष्य जन्म अनमोल आहे, हा जन्म वारंवार प्राप्त होत नाही. कबीर साहेब म्हणतात की–**

कबीर मानुष जन्म दुर्लभ है, मिले न बारम्बार।
तरूवर से पत्ता टूट गिरे, बहुर न लगता डारि ।।

# ''विश्व विजेता संत''

## (संत रामपालजी महाराज यांच्या अध्यक्षतेखाली हिन्दुस्थानाचे (भारत) पूर्ण विश्वामध्ये शासन होईल.)

## ''संत रामपालजींच्या विषयामध्ये ''नॉस्ट्राडेमस'' यांची भविष्यवाणी''

फ्रेंच (फ्रान्स) देशातील 'नॉस्ट्राडेमस' नावाच्या प्रसिद्ध भविष्यवेत्त्याने सन १५५५ मध्ये एक हजार श्लोकांमध्ये भविष्याची सांकेतिक सत्य भविष्यवाणी लिहिलेली आहे. शंभर-शंभर श्लोकांचे असे दहा शतक बनविलेले आहेत, ज्यातील आतापर्यंतची भविष्यवाणी सिद्ध झालेली आहे. हिंदुस्थानामध्ये सत्य झालेल्या भविष्यवाणीमधील :

१. भारताची प्रथम महिला प्रधानमंत्री स्व. श्रीमती इंदिरा गांधी यांचा मृत्यू त्यांच्या निकटतम (जवळील) रक्षकाद्वारा होईल, असे लिहिलेले होते, जे सत्य झाले.

२. त्यानंतर त्यांचा पुत्र त्यांचा उत्तराधिकारी होईल आणि तो अत्यंत कमी कालावधीपर्यंत राज्य करेल, तसेच त्याचा आकस्मिक मृत्यू होईल, जे सत्य सिद्ध झाले. (पूर्वप्रधानमंत्री स्व. राजीव गांधीजींविषयी)

३. संत रामपालजी महाराजांविषयी भविष्यवाणी नॉस्ट्राडेमसद्वारा विस्तारपूर्वक लिहिलेली आहे.

(क) आपल्या भविष्यबाबीच्या पाचव्या शतकाच्या शेवटी, तसेच सहाव्या शतकाच्या प्रारंभामध्ये नॉस्ट्राडेमस यांनी लिहिलेले आहे की आज अर्थात इ.स. १५५५ पासून ठीक ४५० वर्षांनंतर, अर्थात सन २००६ मध्ये एक हिन्दू संत (शायरन) प्रकट होईल. त्या समयी त्या हिन्दू धार्मिक संताचे (शायरन) वय ५० ते ६० वर्षे या दरम्यान असेल. परमेश्वराने नॉस्ट्राडेमसला संत रामपालजी महाराजांच्या मध्यम वयातील शरीराचा साक्षात्कार करवून चलचित्रासमान सर्व घटनांना दाखविले अन् त्यास समजावले. नॉस्ट्राडेमस याचा जन्म पंधराव्या शतकामध्ये झाला. त्याने भविष्यामध्ये होणाऱ्या घटनांना आपल्या जन्माच्या वेळेपासून भविष्याचे एकेक शतक बनवून सांगितले आहे. जसे इ. सन १५०० हे प्रथम शतक आणि याच प्रकारे एकोणिसावे शतक हे त्याच्यानुसार पाचवे शतक (सदी) म्हटले गेलेले आहे. याच प्रकारे विसाव्या शतकास (सदी) सहावे शतक म्हटलेले आहे. नॉस्ट्राडेमस याने म्हटलेले आहे की तो धार्मिक हिन्दू नेता, अर्थात संत (CHYREN - शायरन) पाचव्या शतकाच्या शेवटच्या वर्षांमध्ये, अर्थात सन १९९९ मध्ये घरोघरी सत्संग करणे त्यागून, अर्थात चौकटींना बांधून बाहेर येईल. तसेच आपल्या अनुयायांना (शिष्यांना) शास्त्रविधीनुसार भक्तिमार्ग सांगेल. त्या महान संताने सांगितलेल्या मार्गाने अनुयायांना अद्वितीय आध्यत्मिक अन् भौतिक संकेताचा लाभ होईल. त्या तत्त्वद्रष्ट्या हिन्दू संताद्वारे सांगितलेल्या शास्त्र प्रमाणित तत्त्वज्ञानास समजून परमात्म्यावर प्रेम करणारे, हृदयाने इच्छिणारे श्रद्धाळू असे अचंबित होतील, जसे काय गहिऱ्या-गाढ निद्रेतून जागे झालेले आहेत. या तत्त्वद्रष्ट्या हिन्दू संताद्वारे सन १९९९ मध्ये चालवली गेलेली आध्यात्मिक क्रांती २००६ पर्यंत चालेल. तोपर्यंत बहुसंख्येने परमात्म्यास हृदयाने इच्छिणारे भक्त तत्त्वज्ञान समजून, अनुयायी (शिष्य) बनून सुखी होतील. त्यानंतर त्या स्थानाच्या चौकटीला उल्लंघून बाहेर जातील. त्यानंतर २००६ पासून सुवर्णयुगाचा प्रारंभ होईल.'

टीप :- प्रिय पाठकजन, कृपया खालील भविष्यवाणी वाचा, जी फ्रान्स देशवासी नॉस्ट्राडेमस याने सन १५५५ मध्ये लिहिलेली होती- सन १९९८ मध्ये महाराष्ट्रामधील एक

जोतिषशास्त्री नॉस्ट्राडेमसच्या भविष्यवाणीमधील अंकित सांकेतिक भाषेचे स्पष्टीकरण करून त्यामध्ये लिहिलेल्या भविष्य घटनांचा अर्थ देऊन आपला भविष्य ग्रंथ प्रकाशित करेल. त्याच ज्योतिषशास्त्राद्वारे यथार्थ अनुवादित केलेल्या पुस्तकातील भविष्य अनुवादकाच्या शब्दांमध्ये वाचा.

१. (पृष्ठ ३२, ३३ वर) थांबा, सुवर्णयुग (रामराज्य) येत आहे. एक अर्धे आयुष्य झालेला मध्यम वयाचा, औदार्यात (उदार) अजोड, महासत्ताधिकारी व्यक्ति भारतच नाही, तर सर्व पृथ्वीवर सुवर्णयुग आणेल आणि आपल्या सनातन धर्माचे पुनरुत्थान करून यथार्थ भक्तिमार्ग सांगून सर्वश्रेष्ठ हिन्दू राष्ट्र बनवेल. त्यानंतर ब्रह्मदेश, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ तिब्बत (तिबेट), अफगाणिस्तान, मलाया (मलेशिया) आदी देशांमध्ये त्या नेत्याची (शायरन) सत्ताधारी चांडाळ चौकडीवर सत्ता होईल. तो नेता जगताला अद्याप माहिती व्हायचा आहे, फक्त पाहत राहा.

२. (पृष्ठ ४० वर पुन्हा लिहिलेले आहे.) थांबा :- रामराज्य (सुवर्णयुग) येत आहे. जून १९९९ पासून २००६ पर्यंत चालणाऱ्या उत्क्रांतीमध्ये सुवर्णयुग उदयास येईल. उदय होणारा तारणहार 'शायरन' जगतामध्ये सुख, समद्धी व शांती निर्माण करेल. नॉस्ट्राडेमस याने नि:संदेहपणे म्हटले आहे की प्रकट होणारा (CHYREN) शायरन अजून ज्ञात नाही, परंतु तो ख्रिश्चन अथवा मुस्लिम कदापि नाही. तो हिन्दूच असेल अन् मी नॉस्ट्राडेमस, त्याचा छातीठोकपणे गौरव करून सांगतो, कारण त्या दिव्य स्वतंत्र सूर्य शायरनचा उदय होताच पूर्वीचे विद्वान म्हणवून घेणारे सर्व महान नेते निष्प्रभ होऊन त्यांच्यासमोर त्यांना नतमस्तक व्हावे लागेल. तो हिंदुस्थानी महान तत्त्वद्रष्टा संत सर्वांना अभूतपूर्व राज्य प्रदान करेल. तो समान कायदा, समान नियम बनवेल, स्त्री-पुरुष, श्रीमंत-गरीब, जाती-धर्म यांमध्ये कोणताही भेदभाव ठेवणार नाही. कोणावरही अन्याय होऊ देणार नाही. त्या तत्त्वदर्शी संताचा सर्व जनता विशेष सन्मान करेल. माता-पिता तर आदरणीय असतातच, परंतु पवित्रतेच्या आधारावर त्या शायरनचे (तत्त्वदर्शी संत) माता-पित्यापेक्षाही वेगळे स्थान असेल. नॉस्ट्राडेमस स्वयं ज्यू वंशाचा होता. त्याने ख्रिश्चन धर्म स्वीकारलेला होता. तरीही नॉस्ट्राडेमसने नि:संदेह म्हटले आहे की प्रकट होणारा शायरन केवळ हिंदूच असेल.

३. (पृष्ठ ४१ वर) सर्वांना समान कायदा, नियम, अनुशासन पालन करून सत्यपथावर आणेल. मी (नॉस्ट्राडेमस) एक गोष्ट निर्विवाद सिद्ध करतो आहे की तो शायरन (धार्मिक नेता) नवीन ज्ञानाचा आविष्कार करेल. तो सत्य ज्ञानदर्शन करणारा तारणहार आशिया खण्डामध्ये, ज्या देशाच्या नावाचा महासागर (हिंद महासागर) आहे, त्या देशामध्ये जन्म घेईल. तो ना ख्रिश्चन, ना मुस्लिम, ना ज्यू असेल, तर तो नि:संदेहपणे हिंदूच असेल. अन्य भूतपूर्व धार्मिक नेत्यांपेक्षा महत्तम बुद्धिमान असेल आणि अजिंक्य असेल. नॉस्ट्राडेमसने लिहिलेल्या भविष्यवाणीच्या शतक सहावे, श्लोक क्रमांक ७० मध्ये महत्त्वपूर्ण संकेत व संदेश सांगितला आहे की त्याच्यावर सर्व जण प्रेम करतील, त्याचाच बोलबाला असेल, त्याचे भय देखिल असेल, जेणेकरून कोणीही अपकृत्य करण्यास धजणार नाही. त्याचे नाव व कीर्ती त्रिखण्डांमध्ये गर्जत राहील. आतापर्यंत अज्ञानाच्या गाढ निद्रेमध्ये असलेल्या समाजास तो तत्त्वज्ञानाच्या प्रकाशाने जागवेल. सर्व मानव जात खडबडून जागी होईल आणि त्याच्याच तत्त्वज्ञानाच्या आधाराने भक्तिसाधना करेल. सर्व समाजाकडून तो सत्यसाधना करवून घेईल, ज्यामुळे सर्व साधकांना आपल्या आदिअनादी स्थानामध्ये (सत्यलोक) आपल्या पूर्वजांजवळ घेऊन जाऊन, तेथे स्थायी (नित्य) स्थान प्राप्त करवून देईल (वारस बनवेल). या क्रूर भूमीपासून (काललोक)

मुक्त करेल, अशी सर्वत्र चर्चा होईल.

४. (पृष्ठ ४२, ४३ वर) हा हिंसक क्रूरचंद्र (महाकाल) कोण आहे, कोठे आहे, ही बाब शायरनच (तत्त्वदर्शी संत) सांगेल. त्या क्रूरचंद्रापासून (CHYREN) शायरनच भक्तांना मुक्त करेल. शायरनच्या (तत्त्वदर्शी संत) कारकिर्दीमध्ये या भूतलावरील पवित्र भूमीवर (हिंदुस्थानामध्ये) सुवर्णयुग अवतरेल. नंतर त्याचा पूर्ण विश्वामध्ये प्रसार होईल. त्या विश्वनेत्याची आणि त्याच्या सद्गुणांची त्याच्यानंतरही महिमा गायिली जाईल. त्याच्या मनाची शालीनता, विनम्रता, उदारता यांचा एवढा दबदबा होईल की यापूर्वी नमूद केलेले शतक सहावे, श्लोक ७० च्या शेवटच्या पंक्तिमध्ये केलेला उल्लेख आपला शब्द स्वयंच सिद्ध करतो आणि शायरनच सांगेल की 'जनतेने त्याच्याबद्दल केलेला उल्लेख फक्त 'एक विजयी ज्ञाता' या तीन शब्दांमध्ये करायचा असेल, तर करावा. आणखी विशेषणे माझ्या नावाला चिकटवणे मला मान्य नाही.' (याचा उल्लेख पृष्ठ क्रमांक ४२ वर ४ उल्लेख वाणी, ६ व्या शतकातील ७० व्या श्लोकात आहे.) हिन्दू शायरन आपल्या ज्ञानाने देदीप्यमान उत्तुंग स्वरूपाचे विधान (तत्त्वज्ञान) पुन्हा बिनशर्त प्रगट करेल **(Chyren will be chief of the world, Loved, Feared and unchallanged)** आणि मानवी संस्कृती निर्धोकपणे वाढेल, यामध्ये संदेह नाही. हे अद्याप कोणासही माहीत नाही, परंतु योग्य समयी जसे नरसिंह अचानक प्रकट झाले, तसाच तो विश्व महान नेता (Great Chyren) आपल्या तर्कशुद्ध, अचूक ज्ञान व भक्तितंत्राने विख्यात होईल. मी (नॉस्ट्राडेमस) अचंबित आहे. मी त्याच्या देशास (जेथून अवतरित होणार आहे, अर्थात सतलोक) जाणत नाही आणि त्यालाही जाणत नाही. तो माझ्या नजरेसमोर आहे, पण त्याची महिमा मी शब्दबद्ध करू शकत नाही. फक्त त्यास महान धार्मिक नेता **(Great Chyren)** म्हणतो आहे. आपल्या धर्मबंधूंच्या सध्याच्या दयनीय अवस्थेने बेचैन होणारा, स्वतंत्र ज्ञानरूपी सूर्याचा उदय करणारा, आपल्या भक्ति तेजाने जगाचे तारण करणारा, (पाचवे शतक– एकोणिसाव्या शतकाच्या अंतिम वर्षी म्हणजेच इ.स. १९९९ मध्ये) मध्यम वयाचा विश्वाचा महान नेता, जसा की तेजस्वी सिंहरूपी मानव **(Great Chyren)** उद्विग्न अवस्थेमध्ये चौकट उल्लंघून माझ्या (नॉस्ट्राडेमसच्या) मनाचा भेद घेत आहे. मी त्याचे स्वागत करताना आश्चर्यचकित होत आहे, तसेच उदासही होत आहे, कारण त्याचे जगाला ज्ञान न झाल्याने माझा शायरन (तत्त्वदर्शी संत) उपेक्षेस पात्र होत आहे.

माझ्या (नॉस्ट्राडेमस) चित्तभेदक भविष्यवाणीची व त्या वैश्विक सिंह मानवाची उपेक्षा करू नका. त्याच्या प्रकट होण्याने, तसेच त्याच्या तेजस्वी तत्त्वज्ञानरूपी सूर्योदयाने आदर्शवादी श्रेष्ठ व्यक्तिंचे पुनरुत्थान तथा सुववर्णयुगाच्या उदयानंतर (सहाव्या शतकामध्ये म्हणजेच आजच्या इ.स. १५५५ पासून ४५० वर्षांनंतर (१९५५+४५०=२००५) अर्थात २००६ मध्ये सुरवात होईल. या कृतार्थ सुरवातीकडे मी (नॉस्ट्राडेमस) माझ्या नजरेतून पाहत आहे.

५. पृष्ठ ४४, ४५, ४६ वर नॉस्ट्राडेमस पुन्हा प्रमाणित करत आहे की तिन्ही बाजूंनी सागरांनी वेढलेल्या द्विपामध्ये त्या महान संताचा जन्म होईल. त्यावेळी तत्त्वज्ञानाच्या अभावामुळे अज्ञानाचा अंधार पसरलेला असेल. नैतिकतेचे अध:पतन झाल्यामुळे सगळीकडे हाहाकार माजलेला असेल. तो शायरन (धार्मिक नेता) गुरुवर अर्थात गुरुजींना श्रेष्ठ मानून आपली साधना करेल आणि करवूनही घेईल. तो धार्मिक नेता (तत्वदर्शी संत) आपल्या धर्माच्या बळावर अर्थात भक्ति की शक्ति ने तसेच तत्वज्ञान द्वारा सर्व राष्ट्रांना नतमस्तक करेल. एशिया मध्ये त्यांना थांबवणे अर्थात त्यांच्या प्रचारामध्ये बाधा करणे वेडेपणा होईल. (शतक श्लोक ५०)

(टीप :- नॉस्ट्राडेमसची भविष्यवाणी फ्रान्स देशाच्या भाषेमध्ये लिहिली गेली होती. त्यानंतर एका पॉल ब्रन्टन नावाच्या इंग्रजाने नॉस्ट्राडेमसची ही 'सेंच्युरी' ग्रंथातील भविष्यवाणी फ्रान्समध्ये काही वर्षे राहून समजून घेतली आणि नंतर तिचा इंग्रजी भाषेमध्ये अनुवाद केला. त्याने गुरुवर शब्दाचा अर्थ गुरुवार (Thursday) मानून लिखाण केले, जेणेकरून तो आपल्या पूजेचा आधार 'बृहस्पतिवार' म्हणजेच गुरुवारी बनवेल. वास्तवात 'गुरुवर' या शब्दाचा अर्थ सर्व गुरूंमधील तत्त्वज्ञान जाणणारी श्रेष्ठ व्यक्ति, जिला मुख्य गुरू मानून साधना करावयाची असते. वेदांमध्ये बृहस्पती या शब्दाचा भावार्थ सर्वोच्च स्वामी म्हणजेच परमेश्वर आणि दुसरा अर्थ जगद्‌गुरू असाही होतो. जगद्‌गुरू किंवा परमेश्वर यामधून देखिल बृहस्पती शब्दाचा बोध होतो.)

तो मध्यमवयीन तत्त्वज्ञान जाणणारा ज्ञानदाता (ज्ञेय) सत्संगाद्वारे त्रिखण्डांमध्ये कीर्तिमान होईल. मला (नॉस्ट्राडेमस) त्याचा नवीन साधना मंत्र इतका जालिम वाटत आहे की गारुडी मंत्राने महाविषारी सापाला वश करत आहे. तो नवा उपाय, नवा कायदा बनविणारा तत्त्ववेत्ता जगासमोर उदयास येईल, त्यालाच मी (नॉस्ट्राडेमस) आश्चर्यचकित होऊन 'ग्रेट शायरन' म्हणून संबोधत आहे. त्याच्या ज्ञानाच्या दिव्य तेजप्रभावाने त्या द्विपकल्पात (भारतवर्ष) आक्रमक तुफान येईल, खळबळ उडेल. त्यामुळे अज्ञानी संतांकडून विद्रोह केला जाईल. पण जसे जालिम नागिणीला वश केले जाते, त्याप्रमाणे त्या विद्रोहाला शांत करण्याचा उपाय देखिल त्यालाच माहिती असेल. त्याचे व्यक्तित्व सिंहासारखे शक्तिशाली व तेजःपुंज असेल. मी (नॉस्ट्राडेमस) स्पष्ट शब्दांमध्ये सांगत आहे की त्याने कुंडलिनी शक्ती धारण केलेली आहे. पुढे स्पष्ट शब्दांत असेही सांगितले आहे की तो शायरन ज्या महासागरामध्ये तो द्विपकल्प आहे, त्याच देशाच्या नावानेच त्या महासागराचे (हिंद महासागर) नाव देखिल आहे. विशेषत :- त्या देशाच्या भुजंग सर्पिणी शक्तिशी (कुंडलिनी शक्ति) तो पूर्ण परिचित (True Master) असेल. तो शायरन (महान धार्मिक नेता) उदार, कृपाळू, दयाळू, देदीप्यमान, सनातन साम्राज्याचा अधिकारी, आदिपुरुषाचा (सतपुरुष) अनुयायी असेल. त्याची सत्ता सार्वभौम असेल. त्याची महिमा, उपाय हे गुरुश्रद्धा, गुरुभक्ति यांच्याशिवाय म्हणजेच गुरूंशिवाय सफल होत नाही, हा सिद्धांत दृढ करेल. तत्त्वज्ञानाचा सत्संग करून अज्ञानाच्या निद्रेत असलेल्या धर्मबंधूंना (हिंदूंना) जागृत करून अंधविश्वासाच्या आधारावर करत असलेल्या शास्त्रविधिरहित साधनेचा बुरखा फाडून गूढ गहिरे ज्ञान (तत्त्वज्ञान) प्रकाशित करेल. आपल्या सनातन धर्माचे पालन करायला लावून समृद्ध शांतीचा अधिकारी बनवेल. त्याच्या (महान तत्त्वदर्शी संत) ज्ञानाची बरोबरी कोणीही करू शकणार नाही. अर्थात, त्याचा कोणीही प्रतिस्पर्धी नसेल. त्याच्या गूढ ज्ञानासमोर (तत्त्वज्ञान) सूर्याचे तेज देखिल कमी पडेल. यामुळेच तो वैश्विक सिंह महामानव इतका महान असेल की त्याची महिमा मी (नॉस्ट्राडेमस) शब्दांमध्ये वर्णन करु शकत नाही. मी (नॉस्ट्राडेमस) त्या थोर महामानवास (शायरन) पाहत आहे.

या विवरणाचा भावार्थ असा आहे की त्या विश्वनेत्याला ५० वर्षांमध्ये तत्त्वज्ञान शास्त्रांमध्ये प्रमाणित होईल. अर्थात, ५० वर्षांमध्ये म्हणजेच सन २००१ पर्यंत सर्व धर्मांच्या शास्त्रांचा अभ्यास करून तो तत्त्वज्ञानी होईल. त्यानंतर त्या तत्त्वज्ञानाचा ज्ञेय (इतरांना ज्ञान देणारा) होईल, तसेच त्याचा आध्यात्मिक जन्म अमावास्येला होईल. त्यावेळी त्याचे वय तरुण म्हणजेच १६ ते २५ वर्षे या दरम्यान नसेल, तर तो प्रौढ असेल. जेव्हा तो जगाच्या नजरेसमोर येईल, तेव्हा त्याचे वय ५० ते ६० वर्षांच्या दरम्यान असेल.

६. पृष्ठ ४६ व ४७ :- नॉस्ट्राडेमस म्हणत आहे की विश्वामध्ये श्रेष्ठ तत्त्वज्ञात्याच्या (ग्रेट शायरन) बाबतीत माझ्या भविष्यवाणीतील शब्दोशब्दी तर्कवितर्क कोणत्याही नेत्यांबरोबर

जोडून पाहिला, तर नि:संदेहपणे कोणीही खरा उतरणार नाही. मी (नॉस्ट्राडेमस) छातीठोकपणे सांगत आहे की माझ्या शायरनचे कर्तृत्व आणि गूढ, अनाकलनीय ज्ञानच सर्वांचे पितळ उघडे पाडेल. फक्त २००६ वर्ष येऊ दे. या विधानातील प्रत्येक शब्दाचे खरेखुरे समर्थन शायरनच देईल.

७. पृष्ठ ५२ :- वर नॉस्ट्राडेमसने आपल्या भविष्यवाणीमध्ये म्हटले आहे, की, एकविसाव्या शतकाच्या सुरवातीस जगाच्या क्षितिजावर शायरनचा उदय होईल. जे काही परिवर्तन होईल, ते माझ्या (नॉस्ट्रेडेमस) इच्छेने होणार नाही, तर ते सर्व शायरनच्या आज्ञेने निसर्ग नियमांप्रमाणे नक्कीच होईल. त्यामध्ये नवीन परिवर्तनाचा अर्थ म्हणजे हिंदुस्थान हे सर्वश्रेष्ठ राष्ट्र होईल. अनेक युगांपासून न पाहिलेले असे हिंदूंचे सुखी साम्राज्य दृष्टिपथात येईल. त्या देशामध्ये जन्मलेला धार्मिक संतच तत्त्वद्रष्टा, तसेच जगाचा तारणहार, जनज्ञेता होईल. आशिया खण्डामध्ये रामायण, महाभारत इत्यादींचे ज्ञान जे हिंदूमध्ये प्रचलित आहे, त्याहूनही भिन्न आणि प्रगत सत्यज्ञान या तत्त्वदर्शी संताचे असेल. तो सतपुरुषाचा अनुयायी असेल, तसेच तो एक अद्वितीय संत असेल.

८. (पृष्ठ ७४) :- अनेक संत, नेते येतील आणि जातील, पण ते सर्व जण परमात्म्याशी द्रोह करणारे, तसेच अभिमानी असतील. मला (नॉस्ट्राडेमस) त्या शायरनचा आंतरिक साक्षात्कार झालेला आहे. नास्त्रेदमस म्हणतात की, त्या महान हिन्दु धार्मिक नेत्यास न ओळखता त्यावर देशद्रोहाचा आरोप देखील लावला जाईल. मला (नास्त्रेदमस यांना) दुख: वाटते की, तो महान धार्मिक नेता (Chyren) उपेक्षा योग्य बनवला जाईल. परंतु हिंदुस्थानाच्या हिन्दू संताला आगामी अंधकारी (भक्तिज्ञानाच्या अभावाने अंधळे झालेले), प्रलयकारी (स्वार्थातून भावाभावात होणारी मारहाण, पित्याचे तोंड न बघणारा पुत्र, हिंदू-हिंदूंचेच शत्रू, मुस्लिम-मुस्लिमांचेच शत्रू झालेले आहेत.), बेधुंद (मायेच्या प्रभावाने अंधाधुंद झालेला समाज) जगतास नवा प्रकाश देणाऱ्या सर्वश्रेष्ठ जगज्ञेत्या, धार्मिक विश्वनेत्याला आपल्या औदासिन्याशिवाय कोणतीही अभिलाषा नसेल. मानवाच्या उद्धारासाठी लागलेल्या चिंतेशिवाय त्याचा काहीही स्वार्थ नसेल किंवा तो त्याचा अभिमानही बाळगणार नाही. माझ्या भविष्यवाणीतील गौरवाची गोष्ट अशी की तो तत्त्वदर्शी संत भूतलावर अवश्य प्रगट होईल. त्याने सांगितलेल्या तत्त्वज्ञानाचा अंमल युगानुयुगे जगावर असेल. तो संत आध्यात्मिक चमत्काराने आधुनिक वैज्ञानिकांना आश्चर्यचकित करून त्यांना भुवया उंचावयाला लावेल. त्याचे सर्व ज्ञान शास्त्र प्रमाणित असेल. मी (नॉस्ट्राडेमस) असे स्पष्ट करतो की बुद्धिवादी व्यक्तिंनी त्याची उपेक्षा करू नये. त्याला लहानसा ज्ञानदीप समजू नका. त्या तत्त्ववेत्त्या महामानवास (शायरनास) सिंहासनस्थ करून (आसनावर बसवून) त्यास आराध्य देव मानून पूजा करा. तो आदिपुरुषाचा (सतपुरुष) अनुयायी जगाचा तारणहार असेल.

## ''संत रामपालजी महाराज यांचे समर्थनार्थ अन्य भविष्यवक्त्यांची भविष्यवाणी''

१) इंग्लंडचा ज्योतिषी ''किरो'' याने सन १९२५ मध्ये लिहिलेल्या पुस्तकात भविष्यवाणी केली आहे की विसाव्या शतकाच्या म्हणजे इ. स. २००० च्या उत्तरार्धात (सन १९५० नंतर) प्रगट होणारा संत संपूर्ण विश्वात पसरेल अशी 'एक नवी सभ्यता' आणेल. भारतातील ती एक व्यक्ती साऱ्या संसाराला ज्ञानक्रांती देईल.

२) भविष्यवक्ता ''श्री वेजीलेटिन'' याच्या मतानुसार विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात विश्वात आपापसात प्रेमाचा अभाव, मानवतेचा ऱ्हास, माया संग्रहासाठी लागलेली शर्यत, लूट,

राज्य नेत्यांचा अन्याय आदी अनेक उत्पात बघायला मिळतील. परंतु भारतात उत्पन्न झालेली शांती, बंधुभावावर आधारित नवी सभ्यता, संसारात देश, प्रांत आणि जातीच्या सीमा तोडून विश्वभरात सुख शांती उत्पन्न करेल.

३) अमेरिकेची महिला भविष्यवक्ता ''जीन डिक्सन '' यांच्या मतानुसार, विसाव्या शतकाचा शेवट होण्यापूर्वी विश्वामध्ये घोर हाहाकार माजेल आणि मानवतेचा संहार होईल. वैचारिक युद्धानंतर आध्यात्मिकतेवर आधारित एक नवी सभ्यता संभवत: भारताच्या ग्रामीण परिवारातील एका व्यक्तीच्या नेतृत्वाखाली निर्माण होईल आणि युद्धाला या संसारातून कायमची हद्दपार करेल.

४) अमेरिकेतील ''श्री एण्डरसन'' यांच्या मतानुसार, विसाव्या शतकाच्या शेवटी किंवा एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात विश्वात असभ्यतेचा नंगा नाच सुरू असेल. या दरम्यान भारताच्या एका प्रांतातील एक धार्मिक व्यक्ती, एक मानव, एक भाषा आणि एका ध्वजाच्या रूपरेषेचे संविधान बनवून संसाराला सदाचार, उदारता, मानव सेवा आणि प्रेमाची शिकवण देईल. तो मसिहा सन १९९९ मध्ये भावी हजारो वर्षांसाठी धर्म आणि सुख शांती भरून देईल.

५) हॉलंडचा भविष्यद्रृष्टा ''गेरार्ड क्राईसे'' यांच्या मतानुसार, विसाव्या शतकाचा शेवट होण्यापूर्वी आणि एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात भयंकर युद्धामुळे अनेक देशांचे अस्तित्वच नष्ट होईल. परंतु भारतातील एक महापुरुष सर्व विश्वाला मानवतेच्या एकसूत्रतेत बांधेल आणि हिंसा, दुही, दुराचार, कपट आदी संसारातून कायमचे नष्ट करेल.

६) अमेरिकेचा भविष्यवक्ता ''चार्ल्स क्लार्क'' यांच्या मतानुसार, विसावे शतक संपण्यापूर्वी एक देश विज्ञानाच्या उन्नतीमध्ये इतर सर्व देशांना मागे टाकेल. परंतु भारताची प्रतिष्ठा विशेषकरून त्याच्या धर्म आणि दर्शनाने होईल, ज्याला सारे विश्व आपलेसे करेल. ही धार्मिक क्रांती एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात साऱ्या विश्वाला प्रभावित करेल आणि मानवाला आध्यात्मिक मार्गावर चालण्यासाठी विवश करेल.

७) हंगेरी येथील महिला ज्योतिषी ''बोरिस्का'' हिच्या मतानुसार, सन २००० च्या सुरवातीला हत्या, लूटमार अशी उग्र परिस्थिती असतानाच एका भारतीय फरिश्त्याकडून भौतिकवादाच्या सफल संघर्षाचे फलस्वरूप मानवी सद्‌गुणांचा विकास होईल. तो चिरस्थायी असेल. त्या आध्यात्मिक व्यक्तीचे लहानसहान लोकही मोठ्या संख्येने अनुयायी बनून भौतिकवादाला आध्यात्मिकतेत बदलतील.

८) फ्रान्सचे ''डॉ. जूलर्वन'' यांच्या मतानुसार, सन १९९० नंतर युरोपीय देश भारताच्या धार्मिक सभ्यतेच्या दिशेने गतीने झुकतील. सन २००० पर्यंत जगाची लोकसंख्या ६४० कोटींच्या आसपास असेल. भारतात उठलेली ज्ञानाची धार्मिक क्रांती नास्तिकतेचा नाश करून तुफानासारखी संपूर्ण विश्वाला व्यापून टाकेल. त्या महान भारतीय आध्यात्मिक व्यक्तीचे अनुयायी बघता बघता एका संस्थेच्या रूपात आत्मशक्तीने साऱ्या विश्वावर प्रभाव टाकतील.

९) फ्रान्सच्या ''नॅस्ट्रोडेमस'' यांच्या मतानुसार, विश्वभरात सैनिकी क्रांतीनंतर जे थोडेफार चांगले लोक राहतील, तेच हा संसार चांगला बनवतील. त्यांचा महान धर्मनिष्ठ विश्वविख्यात नेता विसाव्या शतकाच्या शेवटी आणि एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी एका पूर्वेकडील देशात जन्म घेऊन भ्रातृवृत्ती (बंधुभाव) आणि सौजन्यतेने साऱ्या विश्वाला एकतेच्या

सूत्रात बांधेल. (नॅस्ट्रोडेमस पहिल्या शतकातील ५० व्या श्लोकात हे स्पष्ट करत आहे.) तिन्ही बाजूंनी सागराने घेरलेल्या द्वीपामध्ये त्या महान संताचा जन्म होईल. त्यावेळी तत्त्वज्ञानाच्या अभावाने सर्वत्र अज्ञानाचा अंधार पसरलेला असेल. नैतिकतेचे पतन होऊन सगळीकडे हाहाकार माजलेला असेल. तो शायरन (धार्मिक नेता) गुरुवर म्हणजे गुरुजींना श्रेष्ठ मानून आपली साधना करेल आणि इतरांकडून करवून घेईल. तो धार्मिक नेता (तत्त्वदर्शी संत) आपल्या धर्मबलाने म्हणजे भक्तीच्या शक्तीने आणि तत्त्वज्ञानाद्वारे सर्व राष्ट्रांना नतमस्तक करेल. (शतक १ श्लोक ५०) (सेंच्युरी १, कन्ना ५०)

१०) इस्रायलचे ''प्रो. हरार'' यांच्या मतानुसार, भारत देशातील एक दिव्य महापुरुष इ.स. २००० च्या प्रारंभी मानवतावादी विचारांनी आध्यात्मिक क्रांतीची पाळेमुळे घट्ट करेल आणि साऱ्या विश्वाला त्याचे विचार ऐकण्याशिवाय गत्यंतर राहणार नाही. भारताच्या जास्तीत जास्त राज्यांमध्ये राष्ट्रपती राजवट असेल. परंतु नंतर एका धार्मिक संघटनेच्या आश्रयाखाली असलेल्या धर्मनिष्ठ वीर लोकांवर नेतृत्व असेल.

११) नॉर्वे येथील ''आनंदाचार्य'' यांच्या भविष्यवाणीनुसार, सन १९९८ नंतर अशी एक शक्तिशाली धार्मिक संघटना भारतामध्ये प्रकाशात येईल, जिचा स्वामी एका गृहस्थ व्यक्तीच्या आचारसंहितेचे पालन साऱ्या विश्वात करेल. हळूहळू भारत देश औद्योगिक, धार्मिक आणि आर्थिकदृष्टचा साऱ्या जगाचे नेतृत्व करेल आणि त्याचे विज्ञान (आध्यात्मिक तत्त्वज्ञान) संपूर्ण विश्वाला मान्य असेल.

या वर दिलेल्या भविष्यवाणीनुसारच आज जगात घटना घडत आहेत. युग परिवर्तन हा प्रकृतिचा अटळ सिद्धांत आहे. वैदिक दर्शनानुसार सतयुग, त्रेतायुग, द्वापारयुग आणि कलयुग अशा चार युगांची व्यवस्था आहे. जेव्हा पृथ्वीवर पापी लोकांचे एकछत्री साम्राज्य प्रस्थापित होते, तेव्हा भगवान मानव रूपात प्रगट होतात.

मानवतेच्या पूर्ण विकासाचे हे कार्य अनादी कालापासून भारतच करत आला आहे. या पूण्यभूमीवर अनादी कालापासून अवतार प्रगट होत आले आहेत.

परंतु दुर्दैव असे की ऋषिमुनी, महापुरुष आणि अवतारांच्या जीवन कालात त्यावेळी शासन व्यवस्था आणि जनतेने त्यांचे दिव्य विचार आणि आदर्शांकडे लक्ष दिले नाही आणि ते अंतर्धान पावल्यानंतर दुहेरी उत्साहाने त्यांची पूजाअर्चा सुरू केली. आणखी एक दुर्दैव म्हणजे आपण ते जिवंत आणि त्यावेळी वेळ असताना त्यांना मानत नाही, उलट त्यांना विरोध करतो आणि अपमानित करतो. काही स्वार्थी तत्त्वे जनतेला भ्रमित करून परमसंतांना बदनाम करतात आणि सतभक्तीमध्ये बाधक बनतात. प्रत्येक युगात चरितार्थासाठी हा प्रकार होत आलेला आहे आणि आजही होत आहे.

जे महापुरुष हजारो प्रकारचे कष्ट झेलून आपली तपस्या आणि सत्यावर अटळ राहतात, त्यांची कोणतीही गोष्ट असत्य असू शकत नाही. सत्यावर अटळ राहत ईसा मसिहाने आपल्या शरीरात ठोकलेल्या खिळ्यांची भयंकर पीडा झेलली, सुकरातने विषाचा प्याला प्राशन केला, श्रीराम आणि श्री कृष्णजींनाही यातनांचे शिकार व्हावे लागले.

ईसा मसिहाने सांगितले आहे की, 'पृथ्वी आणि आकाश टळू शकतात, उदय आणि अस्त हा सूर्याचा अटळ सिद्धांत असूनही तो निरस्त होऊ शकतो. परंतु मी सांगितलेले कधीही खोटे ठरणार नाही.'

सज्ञन हो! जर आजचे करोडो मानव त्या परमतत्त्वाच्या ज्ञात्या संताला शोधून, त्याचा

स्वीकार करून त्याने सांगितलेल्या मार्गानुसार आपली जीवनशैली बदलतील, तर साऱ्या विश्वात सद्भावना, आपापसात बंधुभाव, दया आणि सद्भक्तीचे वातावरण निर्माण होईल. सध्याचा मानव बुद्धिजीवी आहे. त्यामुळे तो त्या संताचे विचार अवश्य स्वीकारेल आणि धन्य होईल. ते संत आहेत जगद्गुरू तत्त्वदर्शी संत रामपालजी महाराज. कृपया भविष्यवाणीनुसार खरे ठरलेले संत रामपालजी महाराजांचे संक्षिप्त जीवन चरित्र वाचा.

## '' संत रामपालजी महाराजांचा संक्षिप्त परिचय''

संत रामपालजी महाराजांचा जन्म ८ सप्टेंबर १९५१ मध्ये हरियाना राज्यातील सोनीपत जिल्ह्यामधील धनाना गावात एका शेतकरी कुटुंबामध्ये झाला. शिक्षण पूर्ण झाल्यावर हरियाना प्रांतामधील सिंचन विभागामध्ये कनिष्ठ अभियंतापदावर ते १८ वर्षे कार्यरत राहिले. सन १९८८ मध्ये त्यांनी परमसंत रामदेवानंदजी महाराजांकडून दीक्षा घेतली. त्यांनी सांगितलेल्या भक्तिमार्गाने साधना केली आणि रामपालजी महाराजांना परमात्म्याचा साक्षात्कार झाला.

संत रामपालजी यांना १७ फेब्रुवारी १९८८ रोजी तिथीप्रमाणे फाल्गुन महिन्याच्या अमावास्येच्या रात्री नामदीक्षा प्राप्त झाली. त्यावेळी संत रामपालजी महाराजांचे वय ३७ वर्षे होते. संत मतानुसार, उपदेश दिवस (दीक्षा दिन) त्या उपदेशी भक्ताचा आध्यात्मिक जन्मदिन मानला जातो.

हे विवरण नॉस्ट्राडेमसच्या त्या भविष्यवाणीशी पूर्ण मिळतेजुळते आहे. त्याचा उल्लेख त्याने पृष्ठ ४४ व ४५ वर केलेला आहे. येथे नमूद केले आहे की ज्यावेळी त्या तत्त्वद्रष्ट्या शायरनचा आध्यात्मिक जन्म होईल, त्या दिवशी अंधारमय अमावास्या असेल. त्यावेळी विश्वनेत्याचे वय १६, ते २५ वर्षांच्या दरम्यान नसेल. तो तरुण नसेल, तर तो प्रौढ असेल आणि वयाच्या ५० ते ६० वर्षांच्या दरम्यान तो जगामध्ये प्रगट होईल. ते वर्ष असेल २००६.

स्वामी रामदेवानंदजी महाराजांनी सन १९९३ मध्ये रामपालजी महाराजांना सत्संग करण्याची आज्ञा दिली. तसेच सन १९९४ मध्ये नामदान करण्याची आज्ञा प्रदान केली. भक्तिमार्गाशी एकरूप झाल्याने त्यांनी कनिष्ठ अभियंतापदाचा राजीनामा दिला. हरियाना सरकारने १६ मे २००० चे पत्र क्रमांक ३४९२-३५०० ने तो स्वीकारला आहे. सन १९९४ पासून १९९८ पर्यंत संत रामपालजी महाराजांनी घरोघरी, गावोगावी, नगरोनगरी जाऊन सत्संगाचा प्रसार केला. त्यामुळे अनेक जण त्यांचे अनुयायी बनले. त्याचबरोबर स्वतःला ज्ञानी समजणाऱ्या संतांचा विरोधही वाढत गेला. सन १९९९ मध्ये हरियानामधील रोहतक जिल्ह्यातील करौंथा या गावी सतलोक आश्रम, करौंथाची स्थापना केली. तसेच एक ते सात जून १९९९ या कालावधीत परमेश्वर कबीर साहेबजींच्या प्रगटदिनानिमित्त सात दिवसीय विशाल सत्संगाचे आयोजन करून आश्रमाचा प्रारंभ केला. तसेच प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमेस तीन दिवसांच्या सत्संगास प्रारंभ केला. सत्संग ऐकण्यासाठी दूरदूरवरून श्रद्धाळू येऊ लागले आणि तत्त्वज्ञान समजून घेऊन बहुसंख्येने अनुयायी बनू लागले. काही दिवसांतच संत रामपालजी महाराजांच्या अनुयायांची संख्या लाखावर पोहोचली. स्वतःला ज्ञानी समजणाऱ्या संत व ऋषिंचे अनुयायी संत रामपालजी महाराजांकडे येऊन त्यांचे अनुयाची बनू लागले. हे अनुयायी त्या अज्ञानी संतांना म्हणू लागले की तुम्ही सर्व ज्ञान आपल्या सद्ग्रंथांच्या विपरीत सांगत आहात.

यजुर्वेदाच्या आठव्या अध्यायामधील तेराव्या मंत्रामध्ये लिहिले आहे की पूर्ण परमात्मा

आपल्या भक्तांचे सर्व अपराध (पाप) नाश (क्षमा) करतो आणि आपल्याकडून जो ग्रंथ आम्ही खरेदी केला आहे, त्यामध्ये लिहिलेले आहे की परमात्मा आपल्या भक्ताचे पाप क्षमा (नाश) करत नाही. आपल्या पुस्तकामध्ये लिहिले आहे की, पृथ्वीवर मनुष्य व अन्य प्राणी जसे वास करत आहेत, त्याप्रमाणे सूर्यावरही आहेत. पृथ्वीप्रमाणे सूर्यावरही सर्व पदार्थ, जसे की बागबगीचे, नदी, झरे इत्यादी आहेत. काय हे संभव आहे.? पवित्र यजुर्वेदाच्या पाचव्या अध्यायातील पहिल्या मंत्रात लिहिलेले आहे की परमात्मा शरीरयुक्त आहे. 'अग्ने तनुः असि। विष्णवै त्वां सोमस्य तनुर् असि ।।' या मंत्रामध्ये दोन वेळा स्पष्ट केले आहे की परमेश्वर शरीरयुक्त आहे. सर्वांचे पालन पोषण करण्यासाठी त्या अमर पुरुष परमात्म्याचे शरीर आहे. अर्थात, परमात्मा जेव्हा आपल्या भक्तांना तत्त्वज्ञान समजवण्यासाठी काही कालावधीकरिता अतिथी स्वरूपामध्ये जगामध्ये येतो, तेव्हा तो आपल्या मूळ तेजोमय शरीरावर सौम्य तेजःपुंजाचे शरीर ओढून येतो. यासाठी वरील मंत्रांमध्ये दोन वेळा याबाबत प्रमाण दिलेले आहे. अशाप्रमाणे तर्कानुसार निरुत्तर होऊन आपल्या अज्ञानाचा पडदा फाडला जाण्याच्या भयाने त्या अज्ञानी संत, महंत व आचार्यांनी सतलोक आश्रम, करौंथाच्या आसपासच्या गावांमध्ये संत रामपालजी महाराजांना बदनाम करण्यासाठी दुष्प्रचार सुरू केला. १२ जुलै २००६ रोजी संत रामपालजी महाराजांना जीवे मारण्याचा आणि सतलोक आश्रम नष्ट करण्याच्या उद्देशाने त्या अज्ञानी संतांनी त्यांच्या अनुयायांकडून सतलोक आश्रमावर आक्रमण केले. पोलिसांनी यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. यामुळे काही उपद्रवकारी चिडले. सरकारने सतलोक आश्रम, करौंथा आपल्या अधिपथ्याखाली घेतला आणि संत रामपालजी महाराज व त्यांच्या काही अनुयायांवर खोटे गुन्हे दाखल करून तुरुंगात टाकले. अशाप्रकारे २००६ मध्ये संत रामपालजी महाराज प्रसिद्धीस आले. अज्ञानी लोकांनी जरी संतांवर खोटे आरोप केले, तरी संत रामपालजी महाराज निर्दोष आहेत. प्रिय वाचकहो, नॉस्ट्राडेमसची भविष्यवाणी वाचून तुम्हालाही वाटेल की संत रामपालजी तर जेलमध्ये पडले आहेत, त्यांच्याकडे कोणताही आश्रम नाही आणि ते विश्वात ज्ञानाचा प्रचार करतील, हे कसे काय संभव असेल? या वाचकांना प्रार्थना आहे की 'परमात्मा क्षणामध्ये सर्व परिस्थिती बदलू शकतो.'

कबीर, साहेब से सब होत है, बंदे से कछु नांहि। राई से पर्वत करे, पर्वत से फिर राई ।।

परमेश्वर कबीरजी आपल्या पाल्यांचा उद्धार करण्यासाठी त्वरित तत्त्वज्ञानाद्वारे समाजास वास्तवातून परिचय करवून देतील. नंतर सर्व विश्वाला संत रामपालजी महाराजांच्या ज्ञानातील घनता समजून येईल.

संत रामपालजी महाराज २००३ पासून वर्तमानपत्रे व टीव्ही चॅनेल या माध्यमांद्वारे सत्यज्ञानाचा प्रचार करत आहेत की इतरांचे ज्ञान शास्त्रविरुद्ध आहे. अर्थात, ते भक्त समाजाकडून शास्त्ररहित पूजा करवून दोषी बनत आहेत. जर मी अयोग्य सांगत असेन तर त्याचे प्रतिउत्तर द्यावे, परंतु आजपर्यंत कोणत्याही संताने उत्तर देण्याची हिंमत केलेली नाही.

संत रामपालजी महाराजांनी २००१ मधील ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या गुरुवारी अचानक झालेल्या प्रेरणेप्रमाणे सर्व धर्मांच्या सद्ग्रंथांचा सखोल अभ्यास करून त्या आधारावर सर्वप्रथम पवित्र श्रीमद् भगवद्गीता चे अध्ययन केले आणि 'गहरी नजर गीता में' या पुस्तकाची रचना केली. या पुस्तकाच्या आधारावरच त्यांनी सर्वप्रथम मार्च २००२ मध्ये राजस्थानमधील जोधपूर शहरात सत्संगाचा प्रारंभ केला. यासाठीच नॉस्ट्राडेमस म्हणत आहे की विश्वात्मक स्वरूपाचा धार्मिक हिन्दू संत (शायरन) वयाच्या पन्नासाव्या वर्षी म्हणजेच २००१ मध्ये ज्ञानदाता होऊन प्रचार करेल. संत रामपालजी महाराजांचा जन्म पवित्र हिन्दू धर्मामध्ये ८

सप्टेंबर १९५१ रोजी हरियाना राज्यात सोनिपत जिल्ह्यातील धनाना या गावी एका शेतकरी परिवारामध्ये झाला. त्यानुसार २००१ मध्ये संत रामपालजी महाराजांचे वय ५० वर्षे होते, जे नॉस्ट्राडेमसच्या मताशी तंतोतंत जुळते. यावरून तो विश्व धार्मिक नेता संत रामपालजी महाराजच आहेत, ज्यांच्या अध्यक्षतेखाली भारतवर्ष पूर्ण विश्वावर राज्य करेल. पूर्ण विश्वामध्ये एकच ज्ञान (भक्तिमार्ग) चालेल, एकच कायदा होईल, कोणीही दु:खी राहणार नाही. विश्वामध्ये शांती नांदेल. जे विरोध करतील, त्यांना देखिल शेवटी पश्चात्ताप होईल आणि तत्त्वज्ञानाचा स्वीकार करण्यास विवश होतील. सर्व मानव समाज मानवधर्माचे पालन करेल आणि मोक्ष प्राप्त करून सतलोकी जाईल.

ज्या तत्त्वज्ञानाविषयी नॉस्ट्राडेमसने आपल्या भविष्यवाणीमध्ये उल्लेख केलेला आहे, त्या विश्वविजेत्या संताद्वारे सांगितल्या गेलेल्या सत्य शास्त्रप्रमाणित तत्त्वज्ञानासमोर पूर्वीचे सर्व संत निष्प्रभ (असफल) ठरतील. त्या सर्वांना नम्र होऊन झुकावे लागेल. याविषयी परमेश्वर कबीर साहेब बंदी छोडजींनी आपल्या अमृतवाणीतून पवित्र 'कबीर सागर' ग्रंथामध्ये (जो संत धर्मदासजींनी सुमारे ५५० वर्षांपूर्वी लिपीबद्ध केला आहे) म्हटले आहे की एक वेळ अशी येईल की त्यावेळी पूर्ण विश्वामध्ये माझेच ज्ञान चालेल. सर्व विश्व शांतिपूर्वक भक्ति करेल. आपापसांत विशेष प्रेम निर्माण होईल. सतयुगासारखी वेळ (सुवर्णयुग) येईल. परमेश्वर कबीर साहेब जी बंदी छोड यांनी सांगितलेले ज्ञान संत रामपालजी महाराजांना समजलेले आहे. या ज्ञानाविषयी कबीर साहेबजींनी आपल्या पवित्र वाणीमध्ये म्हटले आहे की :-

कबीर, और ज्ञान सब ज्ञानडी, कबीर ज्ञान सो ज्ञान। जैसे गोला तोब का, करता चले मैदान ।।

याचा भावार्थ असा की हे तत्त्वज्ञान एवढे प्रबल आहे की त्याच्यासमोर अन्य संत व ऋषिंचे ज्ञान टिकणार नाही. जसे तोफेचा गोळा जेथे पडतो. तेथे त्या गोळ्याच्या परिघात येणाऱ्या काही एकरांतल्या सर्व गोष्टी भस्मसात होऊन मोकळे मैदान बनते.

हेच प्रमाण संत गरीब दास जी (छुडानी, जिल्हा झज्जर, हरियाना) यांनी दिलेले आहे की सतगुरु (तत्त्वदर्शी संत परमेश्वर कबीर साहेब जी बंदी छोड यांनी पाठविलेला) दिल्ली मंडलामध्ये येईल.

''गरीब, सतगुरू दिल्ली मण्डल आयसी, सूती धरणी सूम जगायसी''

परमात्म्याच्या भक्तित कंजूसपणा दाखविणाऱ्या व्यक्तिंना जागवेल. सोनीपत जिल्ह्यातील धनाना गाव पूर्वी दिल्लीशासित क्षेत्रामध्ये येत होते. यासाठी संत गरीब दास जी महाराजांनी म्हटले आहे की 'सद्गुरू (वास्तविक ज्ञान जाणणारा संत म्हणजेच तत्त्वद्रष्टा संत) दिल्ली मंडलात येईल.' पुढे म्हटले आहे की,

''साहेब कबीर तख्त खवासा, दिल्ली मण्डल लीजै वासा''

याचा भावार्थ असा आहे की परमेश्वर कबीर साहेब जी बंदी छोड यांच्या दरबारातील (तख्त) नोकर (खवासा) अर्थात परमेश्वराचा प्रतिनिधी दिल्ली मंडलामध्ये वास करेल, तेथे प्रगट होईल. प्रथम आपल्या हिन्दू बांधवांना तत्त्वज्ञानाचा परिचय करून देईल. त्यामुळे बुद्धिमान हिन्दू खडबडून जागे होतील. अर्थात, त्या संताने सांगितलेले तत्त्वज्ञान समजून त्याचा स्वीकार करतील आणि शरण येतील. त्यानंतर सर्व विश्व त्या तत्त्वदर्शी संताचे ज्ञान स्वीकारेल. ही भविष्यवाणी नॉस्ट्राडेमसनेही केलेली आहे. नॉस्ट्राडेमसने हे देखिल नमूद केले आहे की त्याचा परिचय न झाल्याने माझा शायरन (तत्त्वद्रष्टा संत) उपेक्षेस पात्र बनेल, याचे मला दु:ख वाटते. हे बुद्धिमान मानवा, त्याची उपेक्षा करू नको. तो तर सिंहासनस्थ करून (आसनावर

बसवून) अराध्य देवाचे (इष्ट देव) रूप मानण्यायोग्य आहे. तो हिन्दू धार्मिक संत शायरन आदिपुरुषाचा (पूर्ण परमात्मा) अनुयायी जगताचा तारणहार आहे.

नॉस्ट्राडेमस या भविष्यवक्त्याने (डॉ. रामचंद्र जोशी यांच्या 'नॉस्ट्राडेमसची भविष्यवाणी' या पुस्तकाच्या पृष्ठ ४१-४२ वर) तीन शब्दांचा उल्लेख केलेला आहे. त्यात म्हटले आहे की तो विश्वविजेता तत्त्वद्रष्टा संत क्रूरचंद्र अर्थात कालाच्या दु:खदायी भूमीतून सोडवून आपल्या आदिअनादि पूर्वजांचा वारसदार बनवेल आणि मुक्ती देईल. येथे उपदेश मंत्रातून असा संकेत होते की तो शायरन केवळ तीन शब्दांचा म्हणजेच मंत्रांचा (ओम-तत्-सत्) जप देईल. या तीन शब्दांना मुक्तिचा इतर कोणताही शब्द जोडणार नाही. हेच प्रमाण पवित्र ऋग्वेदाच्या १० व्या मंडलातील ९० व्या सुक्तातील १६ व्या मंत्रामध्ये, सामवेदातील ८२२ व्या श्लोकात, तसेच श्रीमद् भगवद्गीता च्या सतराव्या अध्यायातील २३ व्या श्लोकात आहे. या ग्रंथांमध्येही असेच म्हटले आहे की पूर्ण संत (तत्त्वदर्शी संत) तीन मंत्र (ओम-तत्-सत्, ज्यामध्ये तत् आणि सत् सांकेतिक आहेत.) प्रदान करून पूर्ण परमात्म्याची (आदिपुरुष) भक्ति करवून घेऊन सकल जीवांना, आत्म्यांना कलिकाळाच्या मोहजालातून मुक्त करतो. जे जीव आपल्या पूर्वजांना सोडून क्रूरचंद्राबरोबर (काल प्रभु) येऊन या दु:खदायी लोकांमध्ये अडकले आहेत, फसलेले आहेत, कष्टावर कष्ट सहन करत आहेत, तेथून तो साधक भक्तिच्या सामर्थ्याच्या जोरावर जेथे आदिसृष्टिवरील सतलोकांचा वास आहे, तेथे जातो. नॉस्ट्राडेमसने हे देखिल स्पष्ट केलेले आहे की मध्य काल म्हणजेच मधली पिढी हिंदू धर्माचे आदर्श जीवन जगेल. शायरन (तत्त्वद्रष्टा संत) आपल्या ज्ञानाने देदीप्यमान उत्तुंग स्वरूपात म्हणजेच सर्वश्रेष्ठ शास्त्रानुकूल भक्तिविधान पुन्हा विनाअट प्रदान करेल आणि मानवी संस्कृती अर्थात मानव धर्माचे लक्षण निर्धोक (निष्कपटभावाने) सावरून धरेल. मधल्या कालात हिन्दू धर्माचे व हिंदूंचे आदर्शवत जीवन जगणाऱ्या मधल्या पिढीचा शायरन उद्धार करेल. (हा उल्लेख हिंदी भाषेतील पुस्तकामध्ये पृष्ठ ४२ वर करण्याचा राहून गेलेला आहे.) हेच प्रमाण स्वयंपूर्ण परमात्मा कबीरजी यांनी सांगितले आहे की,

'धर्मदास तोहे लाख दुहाई, सारज्ञान व सारशब्द कहीं बाहर न जाई।
सारनाम बाहर जो परही, बिंचकी पिढी हंस नहीं तर ही।।
सारज्ञान तब तक छुपाई। जब तक द्वादस पंथ न मिट जाई ।।

जसे की, इ.स.१९४७ मध्ये भारत इंग्रजांपासून स्वतंत्र झाला. त्यापूर्वी हिंदुस्थानातील सामान्य नागरिक सुशिक्षित नव्हता. सन १९५१ मध्ये संत रामपालजी महाराजांना परमेश्वराने पृथ्वीवर पाठविले. सन १९४७ च्या पूर्व पिढीला कलयुगातील पहिली पिढी समजूया, म्हणजेच १९४७ पासून मधल्या पिढीला सुरवात झाली. ही पिढी एक हजार वर्षांपर्यंत सत्य भक्ति करेल. या दरम्यान जो पूर्ण निश्चयाने भक्ति करेल, तो सतलोकास जाईल. जे सतलोकी जाऊ शकले नाहीत, तसेच ज्यांची भक्तित धरसोड वृत्ती असेल, परंतु गुरुद्रोही झाले नाहीत, त्यांना या कलयुगामध्ये पुन्हा हजारो वेळा मनुष्य जन्म घ्यावा लागेल. कारण तो शास्त्रविधीनुसार त्यांच्या साधनेचा परिणाम (लाभ) असेल. अशाप्रकारे काही हजार वर्षांपर्यंत कलयुगाचा कालावधी वर्तमानापेक्षाही चांगला सुरळीत चालेल. त्यानंतर शेवटची पिढी भक्तरहित उत्पन्न होईल. कारण शुभ कमाई, जी भक्ति युगामध्ये केलेली असेल, ती वारंवार जन्म प्राप्त करण्यात खर्च (समाप्त) होऊन जाईल. अशाप्रकारे कलियुगाची अंतिम पिढी कृतघ्न असेल. ती भक्ति करू शकणार नाही. यासाठी म्हटले आहे की कलियुगाची मधली पिढी आता चालू आहे (१९४७ पासून). सन २००६ पासून तो शायरन सर्वांसमक्ष प्रकट झालेला आहे, ते म्हणजेच 'संत रामपालजी

महाराज!'

सदर ज्ञान जे मधली पिढी, पहिली पिढी, प्रथम तसेच अंतिम पिढीचे ज्ञान संत रामपालजी महाराज आपल्या प्रवचनांतून वर्षानुवर्षे सांगत आलेले आहेत, ते आता नॉस्ट्राडेमसच्या भविष्यवाणीतूनही स्पष्ट होत आहे. यामुळेच संत गरीब दास जी महाराजांनी म्हटले आहे की कबीर परमेश्वराची भक्ति पूर्ण संताद्वारे उपदेश (नामदीक्षा) घेऊन करा, नाहीतर ही सुवर्णसंधी हातातून निघून जाईल.

'गरीब, समझा है तो सिर धर पांव, बहुर नहीं रे ऐसा दाव ।।

याचा भावार्थ असा आहे की जर तुम्हाला तत्त्वज्ञान समजले असेल, तर डोक्यावर पाय ठेवा म्हणजेच अतिशीघ्रतेने तत्त्वदर्शी संत रामपालजी महाराजांकडून उपदेश घेऊन आपले कल्याण साधा. ही सुवर्णसंधी पुन्हा मिळणार नाही. जसा हा मधल्या पिढीचा (मध्यकाल) कालावधी आणि आपले मानव शरीर, तसेच तत्त्वद्रष्टा संत प्रगट आहे, हे सर्व एकाच वेळी आलेले आहे, जे अत्यंत दुर्मिळ आहे. एवढे असूनही भक्तिमार्गावर लागणार नसाल, तर त्या विषयी म्हटलेले आहे की :-

यह संसार समझदा नहीं कहंदा श्याम दुपहरे नूं। गरीबदास यह वक्त जात है, रोवोगे इस पहरे नूं ।।

याचा भावार्थ असा की संत गरीब दास जी महाराज म्हणतात, हे भोळे जग शास्त्रविधिरहित साधना करत आहे. जे अति दुःखदायी आहे, पण त्यालाच ते सुखदायी म्हणत आहे. जसे जून महिन्यातल्या माध्यान काली (दिवसाच्या बारा वाजता) कडक उन्हात उभ्याउभ्या तळपत असूनही त्या वेळेला तो सायंकाळ म्हणत आहे. याचा अर्थच असा की एखादी दारूडी व्यक्ति मद्यधुंद अवस्थेत रस्त्यावर पडली आहे आणि त्याला कोणीतरी म्हणत आहे की अरे बाबा, असल्या दुपारच्या कडक उन्हात का तळपत पडला आहेस, त्यापेक्षा एखाद्या गार सावलीच्या ठिकाणी जाऊन बस. अशा वेळी ती दारूडी व्यक्ति नशेमध्ये म्हणते की कोण म्हणतोय की आता दुपार आहे? ही वेळ तर सायंकाळचीच आहे. या उपमेप्रमाणे जे साधक शास्त्रविधीचा त्याग करून मनमानी आचरण करत आहेत, ते आपले जीवन नष्ट करत आहेत. ते आपली मनमानी सोडतच नाहीत, परंतु त्याच गोष्टींना सर्वश्रेष्ठ मानून काललोकीच्या वणव्यात जळत आहेत. संत गरीब दास जी महाराज म्हणत आहेत की एवढे प्रमाण मिळाल्यानंतरही पूर्ण संताद्वारे सांगितल्याप्रमाणे सतसाधना करत नसाल, तर हे अनमोल मानव शरीर, तसेच मधल्या पीढीचे भक्तियुग हातातून निसटून जाईल. ही सुवर्णसंधी गमावल्यानंतर अत्यंत पश्चात्तापाने रडत बसाल. परमेश्वर कबीर जी बन्दी छोड ने म्हटले आहे कि :-

आच्छे दिन पाछे गये गए, सतगुरु से किया ना हेत। अब पछतावा क्या करे, जब चिडिया चुग गई खेत।।

सर्व मानव समाजास पार्थना करण्यात येते की, पूर्ण संत रामपाल जी महाराज यांना ओळखा व आपले व आपल्या संपुर्ण परिवाराचे कल्याण करा. आपले नातेवाइक तथा मित्रपरिवारास देखिल सांगा व पूर्ण मोक्ष मिळवा. सुवर्ण युगाची सुरवात झाली आहे. लाखो पुण्य आत्मा संत रामपाल जी महाराज (तत्वदर्शी संत) यांना ओळखुन सत्य भक्ति करुन सुखी झाले आहेत. सर्व विकार सोडुन स्वच्छ जिवन जगत आहे.

क्रुपया पुढे वाचा महाराष्ट्राचे ज्योतिष शास्त्राचे मराठी भाषेत नास्त्रदेमस यांच्या भविष्यवाणीचा अनुवाद.

## प्रमाणासाठी पहा फोटोकॉपी



होते ही वे फिर से विश्व में योग्यमार्ग से भ्रमण करके शत्रुत्व के भाव से भारत को त्रस्त करेंगे। देखिए, प्रथम मुस्लिम समाज रूप से शुक्र भारत पर आक्रमण करके उस भूमि को तहस-नहस कर देगा। उसके बाद भारत में घुसकर वे सत्ता पर कब्जा करेंगे, अंधश्रद्धालु और दुर्बल भारतीय जनता को सतायेंगे और उन्हें मुस्लिम धर्म की दीक्षा देंगे। उसके कारण महान् भारतमाता मुस्लिमों की दासी बनेगी। भारतीय प्रदेश और समाज भ्रष्ट होगा। यह कार्य इ.स. 1291 से 1999 तक चलेगा।

इसी काल में भारत माता का (कामदुहिता का) बंधु गुरु पिंगल सम शत्रुत्व भाव धारण करके पश्चिम यूरोप के क्रिश्चनों को व्यापारी और नाविक बनाकर भारत की ओर भेज देगा। वे प्रथम व्यापारी बनकर भारतमाता को लूटेंगे। उसके बाद एक-एक प्रदेश हाथ में लेकर उन्हें और वहाँ की जनता को भ्रष्ट क्रिश्चन बनाकर उन पर शासन करेंगे। धीरे-धीरे अपना प्रभाव बढ़ाकर वे संपूर्ण भारत माता को अपने कब्जे में ले लेंगे। उसी समय भारतीय गुलाम दुर्बल जनता मोक्षप्राप्ति के लिए मंदिर बाँधकर देवी-देवता के भजन-कीर्तन करती रहेगी।

इसी काल में धोखेबाज क्रिश्चन गुरु का भ्रष्टाचारी रूप लेकर आयेंगे। यहाँ के प्राचीन ज्योतिष शास्त्रों का अध्ययन कर किरो जैसे यूरोपीयन विश्व प्रसिद्ध ज्योतिषी होंगे। लेकिन भारतीय अंध और झूठे ज्योतिषियों को अपने ज्योतिष-ग्रंथों का अर्थ नहीं समझेगा। वे गुलाम होंगे। उन्हें अपनी मानसिकता और प्रवृत्ति के कारण अंग्रेजी भाषा में मौजूदा ज्ञान ही सत्य लगेगा। लेकिन कीरोसम भारतीय ज्योतिषशास्त्र का अध्ययन करके महान् विद्वताधारक लेखकों द्वारा लिखित अंग्रेजी पुस्तक के आधार पर ज्योतिषशास्त्र नहीं समझेगा अन्त में वे शापित होंगे और उसके कारण उनमें मूर्खता और क्रूरता होगी।

उसके कारण महापरिवर्तन काल का आरंभ होगा। वह काल होगा इ.स. 1905 से 2028 तक। सबसे पहले भारत को स्वातंत्र्य प्राप्त करने के लिए काँग्रेस की स्थापना होगी। भारतीय जनता महान् राक्षस कुंभकर्ण के अनुसार गहरी नींद में से जागृत होने लगेगी। झूठा ज्योतिषशास्त्र नष्ट करके अचूक भविष्य ज्ञान देने के लिए मद्रास में के.एस.कृष्णमूर्ति का जन्म होकर वे भारतीय जनता को कृष्णमूर्ति पद्धति का ज्ञान देंगे। 1998 में महाराष्ट्र में एक ज्योतिषशास्त्री नॉस्ट्रॅडॅमस की भविष्यवाणी में अंकित सांकेतिक भाषा का स्पष्टीकरण कर उसमें लिखित भविष्य घटनाओं का अर्थ देकर अपना भविष्यग्रंथ प्रकाशित करेगा। उस समय वह भारत में अज्ञात ज्योतिष द्वारा कलियुग के विषय में दिये गए महान् सांकेतिक भाषा में अर्थ को सुलझाकर उसमें लिखित महान् भविष्यवाणी का अर्थ स्पष्ट करेगा। लेकिन भारतीय जनता पर और सत्ताधारियों पर झूठे प्रचंड ज्योतिषियों का प्रभुत्व होगा। वे इन नये महान् ज्ञानी ज्योतिषियों को प्रकाश में नहीं आने देंगे। लेकिन उन पर स्वार्थ के अंधकार से, झूठे धर्म जाति का भूत सवार हुआ होगा। अब भी वे मातंग (गारुड़ी) कार्य में मग्न होकर सत्य का, मानवता धर्म का, ज्योतिष ज्ञान का खून करते रहेंगे।



२१ व्या शतकात झेपावताना जगातील
सर्व श्रेष्ठ भविष्यवेत्ता

# नॉस्ट्राडेमस्

## यांचे जागतिक स्तरावरचे भविष्य

- डॉ. रामचंद्र ज. जोशी

२१ व्या शतकाकडे झेपावतांना
जगातील सर्वश्रेष्ठ भविष्यवेत्ता!

# मायकेल द नॉत्रदेम (नॉस्ट्राडेमस)

यांचे जागतिक स्तरावरचे भाविष्य

डॉ. रामचंद्र ज. जोशी.

**ग्रंथ मिळण्याचे ठिकाण**

| | |
|---|---|
| **जोशी ब्रदर्स**<br>अप्पा बळवंत चौक,<br>पुणे २.<br>फोनः ४४५९४२४ | **श्री गजानन बुक डेपो**<br>भरत नाट्य मंदिरासमोर,<br>पुणे ३०.<br>फोन : ४४७३३०४ |
| **श्री गजानन बुक डेपो**<br>कबुतरखाना, दादर,<br>मुंबई २८.<br>फोन: ४२२७५८४ | **श्री गजानन बुक डेपो**<br>बिल्डिंग नं. १३२, पहिला माळा,<br>पंतनगर, घाटकोपर, मुंबई ७५.<br>फोन: ५१३८००९ |

...(32)...

आफ्रिकेला वळसा घालण्याचा द्राविडी-प्राणायाम त्या सुवेज कालव्याच्या निर्मितीने कमी झाला हे खरेच, पण त्या कालव्याच्या निर्मितीची कल्पना नॉस्ट्राडेमसच्या विलक्षण भाकिताने फ्रेंच वास्तुशास्त्रविशारद लेसेप्स याला सुचलेली आहे ही वस्तुस्थिती आहे.

पाहिल्या प्रकरणातच स्पष्ट केले आहे की, १९९९ साली छेडल्या जाणाऱ्या तिसऱ्या जागतिक महायुध्दात, आज वरवर पाहता परस्पर विरोधी राष्ट्रे मित्र बनून, अमेरिका व रशिया यांचे एकत्रित बळ प्रचंड असेल. नॉस्ट्राडेमसच्या मृत्यूनंतर २०९ वर्षांनी जन्माला आलेली अमेरिका आपल्या सामर्थ्याच्या शिखरावर असेल असे, शतक २, श्लोक ४९ मध्ये हा द्रष्टा ज्योतिर्विद सांगतो हे सत्य किती चित्तथरारक आहे?

## 'भारत' सर्वश्रेष्ठ हिंदु राष्ट्र?

या पूर्वीच्या लेखात कै. इंदिरा गांधींचा नॉस्ट्राडेमसने केलेला उल्लेख आपण वाचला. त्या संदर्भात हेन्री सी रॉबर्टस 'कंप्लीट प्रोफेसीज ऑफ नॉस्ट्राडेमस' या १९४२ साली प्रसिध्द झालेल्या आपल्या पुस्तकात लिहितो- 'डॉमिनन्ट प्रिमियर' (म्हणजेच प्रभावी पंतप्रधान) इंदिराजी गांधी यांच्या आकस्मिक खुनानंतर दोन बदल होतील. त्यातील क्रमांक पहिल्या बदलाप्रमाणे त्यांचे पुत्र राजीव गांधी जरी पंतप्रधान झाले असले तरी दुसरा जो बदल होणार आहे तो म्हणजे एक मध्यम वयाचा नेता पाकिस्तान, ब्रह्मदेश, बांगला देश, श्रीलंका, नेपाळ, तिबेट, अफगाणिस्तान, मलाया आदी देश जिंकून हिंदुस्थानाला जगातील सर्वश्रेष्ठ हिंदुराष्ट्र म्हणून निर्माण करणार आहे. तो सार्वभौम असेल. औदार्यात अजोड व आपल्या सनातन धर्माला पुनरुज्जीवन देईल आणि भारत खंडातच नव्हे तर साऱ्या पृथ्वीवर सुवर्णयुग आणील. (सेंच्युरी शतक ५, श्लोक ४१ वा). या श्लोकाबद्दल सर्वच भाष्यकारांत एकमत आहे. वरील दोन बदलांच्या दरम्यानच्या काळात सत्ताधारी मंडळीत वावरणारी चांडाळ चौकडी सत्ताकेंद्र आपल्या ताब्यात ठेवून बराच काळ मनमानी करील. वर उल्लेख केलेला नेता फक्त जगाला अद्याप माहीत व्हायचा आहे!

...(33)...

# : ४ :

# थांबा, इ. स. २००६ मध्ये रामराज्य येतेय!

## हिंदु जगज्जेता भूतलावर सुवर्ण-युग आणणार आहे!

### ज्योतिष हे हि एक शास्त्र आहे

'शितावरून भाताची परीक्षा' या वाकप्रचारानुसार नॉस्ट्राडेमस यांनी वर्तविलेल्या अनेक भाकितांचे खरेपण आपण गेल्या प्रकरणात पाहिले. नॉस्ट्राडेमस यांना हे सर्व ज्ञान आगामी पिढीला देणे आवश्यक वाटले; व त्याने 'सेंच्युरीं' मंध्ये दहा शतके (१००० श्लोक) लिहिलीं व १५५५ साली तें पुस्तक प्रसिध्द झाले. या पुस्तकातील श्लोकांची वर्गवारी केली तर असे आढळते की पहिले सुमारे १०० श्लोक फ्रान्स व युरोपसाठी, म्हणजे नॉस्ट्राडेमसच्या काळातील घटनांबद्दल केलेल्या भाकितांवरच खर्च झाले आहेत. त्यानंतर ३५० - ४०० श्लोक १९ - २० व्या शतकातील घटनांच्या भाकितांचा ऊहापोह करण्यात लागले असून उरलेल्या ४५० - ५०० श्लोकांत २१ व्या शतकापासून इ. स. ३७९२ पर्यंतच्या कालखंडात होऊ घातलेल्या भाकितांचे विवरण आलेले आहे.

-ज्योतिष शास्त्र हे असे चमत्कारिक शास्त्र आहे की सर्वसामान्य माणसांपासून अधिकारी वर्ग, देशा-राष्ट्रांचे शास्ते, धनाढ्य, श्रीमंत, राजेरजवाड्यापर्यंत सर्वांनाच त्याचे आकर्षण आहे. उघडरीत्या त्या शास्त्राचा निषेध, परंतु खाजगीरीत्या त्याची चाचपणीच केवळ नव्हे तर आवर्जून त्या शास्त्राच्या पारंगत ज्योतिर्विदाची मनधरणी करण्याची प्रथा सर्वकाली व सर्व देशांतून रूढ असल्याचे दिसते. ज्योतिष हे शास्त्र आहे, त्याचे आकाशस्थ ग्रहांच्या गतीनुसार ठरलेले आडाखे आहेत. इथून तिथून निसर्ग हा सारखाच असल्याने त्या त्या काळच्या ग्रहस्थितीनुसार व्यक्ति, समाज, देश नि त्यांचे धर्म, संस्कृती यावर परिणाम घडत असतात. ज्योतिषी फक्त त्याने केलेल्या शास्त्राभ्यासाच्या आधाराने मिळविलेल्या ज्ञानाने जे परिणाम घडायचे असतात त्याची आगाऊ माहिती सांगतो, त्याचे आनंददायी, सुखसंवर्धक बदल स्पष्ट करतो. ते बदल केव्हा कसे होतील त्याबद्दल भाकित वर्तवतो. त्याचप्रमाणे दुःख वर्धक उलथापालथी काय होतील त्याचीही नोंद करीत असतो. जे घडायचे असते ते ज्योतिषाला टाळता येत नाही - किंवा तो ते घडवीतही नाही. म्हणून नॉस्ट्राडेमससारखे जगप्रसिध्द ज्योतिर्विद आत्मविश्वासाने म्हणतात की, 'मी लिहिले, सांगितले - त्यात काहीही बदल करण्याची माझी इच्छा नाही.'

...(40)...

गेली नऊ वर्षे इराकबरोबर विध्वंसक युध्दात गेली. जवळ जवळ एक हजार किलोमीटर प्रदेश इराकने सोडलेला नाही. युध्दकैदी सोडविता आले नसल्याने युध्द थांबले, परंतु इराणची मानहानी संपलेली नाही. या युध्दात पेट्रोलियमच्या उद्योगाची महत्त्वाची साधने उद्ध्वस्त झाली, अर्थव्यवस्था, उद्योगधंदे, रोजगार यांची झालेली हानी फार मोठी आहे. शाह यांच्या पदच्युतीच्या सुमारास जी स्थिती होती त्यापेक्षा कितीतरी पटीने सध्याची इराणची आर्थिक स्थिती ढासळली आहे.

आपले घरदार, कौटुंबिक सुख व सुरक्षितता या बाबींचा विचार टाळता येणे अशक्य झाले आहे; आणि त्याबद्दल बहुजनसमाज बोलू लागला आहे. इराणी राष्ट्रांच्या समस्यांना तोंड फुटू लागले आहे आणि त्या समस्यांची सोडवणूक करायला इस्लामची अथवा धर्माची वाढ पुरेशी पडणार नाही याची जाणीव बहुजन समाजालाच नव्हे तर सत्तारूढ पक्षातल्या मवाळांनाही होऊ लागली आहे.

नॉस्ट्राडेमस यांनी शतक १ श्लोक ७० मध्ये असे स्वच्छ लिहून ठेवले आहे की, खोमेनीच्या कडव्या हेकटपणाला विरोधकच कडवेपणाने मोडून काढतील नि खोमेनी विरोधकांची सरशी होईल; त्यांचा विजय होईल. अखेरीस फ्रान्सच मध्यस्थी करून खोमेनी व त्याचे साथीदार यांना दया दाखवावी असे सांगेल व बंडखोर फ्रान्सचा सल्ला मानतीलही! नॉस्ट्राडेमस या सर्व घडामोडींचे वर्णन करून सांगतोय. 'थांबा, रामराज्य येतेय!' जुलै १९९९ ते इ. स. २००६ पर्यंत चालणाऱ्या या सर्व संहारक युध्दाच्या शेवटी सुवर्णयुग अवतरेल; हिंदुस्थानात उगवणारा तारणहार शायरन व फ्रेंच नेता मार्स यांची युति होईल. त्यानंतर ७५ वर्षे जगात सुख-समृध्दि, व शांतता नांदेल. (१० /८९)

नॉस्ट्राडेमसने निःसंधिग्धपणे म्हटलेय, की नव्याने प्रकट होणारा शायरन (CHYREN) आजच्या घटकेला अज्ञान आहे. परंतु तो ख्रिश्चन वा मुस्लिम नसेल. पाश्चात्य विद्वानांनीही हे विधान मान्य केले आहे.

नॉस्ट्राडेमस स्वतः ज्यू वंशाचा, ख्रिश्चन धर्म स्वीकारलेला, फ्रान्सचा नागरिक. तो ४५० वर्षांनी अवतरणारा विश्वनेता हिंदूच असेल असे छातीठोकपणे सांगतो, त्या हिंदु नेत्याचा गौरव करतो तो ह्याच कारणांनी की त्या स्वातंत्र्यसूर्य शायरनच्या उदयाबरोबर आधीते नेते निष्प्रभ होऊन नम्र होतील. 'तो' शायरन तिसऱ्या जागतिक युध्दाच्या काळानंतर वाचलेल्या नागरिकांना कायद्याचे राज्य देईल. कुणावरही अन्याय होणार नाही. 'गुणाः पूजास्थानं नच लिंगम् नच वयः' बरोबरच 'नच श्रध्दास्थानः' ही त्या लोकशाही राज्याची वेदी असे. सामाजिक रचना 'गुणकर्मविभागशः' असेल. जन्मदात्या मातापित्याच्या श्रध्दास्थानांवर ती आधारलेली असणार नाही. राखीव जागा, खास हक्क ही भाषा असणार नाही. त्याचप्रमाणे दलित, मागासलेला समाज अशी विभागणीही या साम्रांज्यात असणार नाही. प्रत्येकाच्या वैयक्तिक गतिशील प्रयत्नांना प्रोत्साहन दिले जाईल; त्याच्या प्रगमनशील कर्तृत्वाला भरपूर संधि व वाव दिला जाईल, सरसकट आमिषांची खिरापत वाटली जाणार नाही. यामुळे जो मेहनत करील

...(41)...

त्याला 'संधि' मिळेलच मिळेल अशी आश्वासक खात्री पटल्याने राष्ट्रसंवर्धनाला आवश्यक असणारी चढाओढ समाजात मानवाला कार्यप्रवण करील. शासन अमानवी वागणारांना वठणीवर आणीलच, शिवाय त्यांच्यातील अतिरेक्यांचा निःपात केला गेला जाईल. सर्वांना लागू पडणारा समान कायदा राज्यभर कसोशीने पाळण्यात येईल.

आता एक गोष्ट निर्विवादपणे सिध्द झाली आहे की तिसऱ्या अतिसंहारक महायुध्दातून नव्याने दर्शन घडविणारा तारणहार 'आशिया खंडात जन्म घेतलेला असेल, (शतक २० श्लोक २५).' युरोपात नाहीच नाही! तो ख्रिश्चन नसेल, मुसलमान तर नसेलच नसेल. ज्यूही असणार नाही. तर हिंदूच असेल असे जे नॉस्ट्राडेमसने निःसंदिग्धपणे म्हटलेय् ते पाश्चात्य विद्वानांनाहि मान्य आहे. तो हिंदू-नेता अन्य सर्व भूतपूर्व नेत्यांपेक्षा महत्तर असेल, बुध्दिमान असेल, अजिंक्यही! नॉस्ट्राडेमसचा शतक ६ श्लोक ७० फार महत्त्वाचा मानावा लागेल.

The grest CHYREN will be
chief of the world.
Loved feard and unchallenged
even at the death
His name and praise will reach
beyond the skies.
And he will be content to be
known only as Victor.

महान् शायरन जगाचा प्रमुख नियंता होई ल. त्याच्यावर सर्वसामान्य जनता प्रेम करील; त्याचबरोबर त्याचा वचक येवढा असेल की प्रजाजन काहीही अपकृत्य करायला धजणार नाहीत. त्याच्या मृत्युनंतरही त्याचा दबदबा कायम राहील, त्याचे नाव आणि पराक्रम नागरिकांच्या मनावर इतके खोलवर परिणाम करतील की त्याची कीर्ति त्रिखंड पसरेल. सामर्थ्य इतके प्रचंड असेल की शत्रू त्याच्या देशाला घाबरतील, त्याच्या राज्याची, नव्हे साम्राज्याची दहशत मानतील. तो सार्वभौम असेल, त्याच्या कर्तृत्वाचा प्रभाव संपूर्ण जगावर पडेल. हा महान् हिंदु नेता भारताला भूमि आणि सागर यावर अजिंक्यपद प्राप्त करून देईल. आतापर्यंत निद्रिस्त असलेल्या हिंदूंना खडबडून जागृत करून त्यांच्याकरवी अशी काही चिरंतन कामगिरी करवील की ज्याने ते आपल्या पूर्वजांचे सार्थ वारस ठरतील.

शतक २, श्लोक ७९ द्वारा फ्रेंच द्रष्टा नॉस्ट्राडेमस स्वच्छपणे सांगतोय की, शायरन क्रूर आणि हिंसक जमातीतल्यांना ठिकाणावर आणिल आणि चंद्रकोरीच्या ताब्यातील भूमि मुक्त करील. त्याचे हे शब्दच पहा किती बोलके आहेत!

फ्रेंच - Subjuguva 10 gent crelle add fiere Le grand chyren ostera du longin Tous les captifs par seline baniaet.

...(42)...

इंग्लिशमध्ये स्वैर भाषांतरित शब्दात सांगायचे तर -

1) Will subjugate the cruel and
violent freed,
The great CHYREN will
take from distance,
All those held captive by
crescent moon

वरील श्लोकातील Cruel and Violent held captive by crescent moon म्हणजेच - हिंसक आणि क्रूरचंद्र हे शब्द इतके अर्थवाही आहेत की वरील उल्लेख मुसलमानांना उद्देशूनच आहेत याबाबत दुमत न व्हावे.

थोडक्यात सांगायचे तर शायरनच्या कारकीर्दीत या भूतलावर सुवर्णयुग अवतरेल. त्याच्या मृत्यूनंतरही त्याच्या महानतेचे व सद्‌गुणांचे आवर्जून गुणगान होत राहिल. पण त्याच्या मनाची शालिनता, विनम्रपणा व औदार्य इतके ढळढळीतपणे दिसते की यापूर्वी नमूद केलेल्या शतक ६ श्लोक ७० व्या श्लोकाच्या शेवटच्या ओळीत त्याबद्दल केलेला उल्लेख फार बोलका आहे. (शायरन म्हणतोय) 'जनतेने त्याच्याबद्दलचा उल्लेख फक्त' एक विजयी नेता या तीन शब्दात करायचा तर करावा आणखी विशेषणे त्याच्या नावाला चिकटवू नयेत.

मधल्या काळात हिंदूधर्माचे व हिंदूंच्या आदर्शवत् जीवनाचे पुसट झालेले क्षणचित्र, पुन्हा आपल्या देदिप्यमान उत्तुंग स्वरूपात प्रस्थापित होणारच, आणि मानवी संस्कृती निर्धोक बनेल हे नॉस्ट्राडेमसने पुरेशा स्पष्टपणे सुचविले आहे. त्यात संदिग्धता कुठेही नाही. हे सर्व घडवून आणणारा आज अज्ञात असणारा परंतु योग्य समयी प्रकट होणारा महापुरुष तथा शायरन हा हिंदुधर्मीयच असेल असेही नॉस्ट्राडेमस निखालसपणे सांगतो, नव्हे नव्हे, जवळ जवळ साडेचारशे वर्षापूर्वी अक्षरबध्द करतो. त्याने या शायरनच्या मनाचा घेतलेला वेधही इतका काही तर्कशुध्द व अचूक आहे की नॉस्ट्राडेमसच्या द्रष्टेपणाचे आश्चर्य वाटते! नॉस्ट्राडेमसने म्हटलेय की, शायरन बेचैन मनाने खूप प्रवास करील. या बेचैनीचे कारण काय असणे शक्य आहे? आपल्या धर्मबांधवांच्या समस्या आणि त्यांची सद्यःकालीन दयनीय अवस्था हे असू शकेल! त्या बेचैन अस्वस्थ मनाचा कानोसा आपण पुढच्या प्रकरणात घेऊ!

...(43)...

## : ५ :

# नॉस्ट्राडेमसच्या भाकितांना दुजोरा देणारी आणखी कांही भाकिते

उभ्या आयुष्यात भारताला कधीही भेट न दिलेल्या महर्षी नॉस्ट्राडेमसने, सुमारे ४००-४५० वर्षांपुर्वी,'२००१ साली प्रलयंकारी विनाशाच्या उंबरठ्यावर असलेल्या जगाला शायरन (CHYREN) हा हिंदू नेता आपल्या क्षात्रतेजाने तारणहार होईल.' या स्वातंत्र्यसूर्याच्या आगमनाने बलाढ्य हिंदू राष्ट्राचा उदय होऊन हिंदूंचे पुनरुत्थान होईल, हिंदू साम्राज्य स्थापन होऊन 'सुवर्णयुग अवतरेल' असे भविष्य शब्दबध्द केले आहे.

१९९९ साली सुरू होणाऱ्या व इ. स. २००६ ला संपणाऱ्या महायुध्दासंबंधी अनेक श्लोकात नॉस्ट्राडेमस लिखित, 'सेंच्युरी' मध्ये 'शायरन' या टोपण नावाचा उल्लेख 'विश्वनेता' म्हणून ठिकठिकाणी केलेला आढळतो. गेली जवळ जवळ २०० वर्षे या 'शायनर' चा शोध घेण्याचे काम नॉस्ट्राडेमस विषयातील तज्ञ हिरीरीने करीत आहेत. गेल्या प्रकरणांत या विश्वनेत्याबद्दल नॉस्ट्राडेमसच्या कित्येक अभ्यासकांनी लढविलेले तर्क-कुतर्क किती विसंगत आहेत हे दाखविले; आणि त्या संदर्भात सध्याचा इराणचा धर्मनेता आयातुल्ला खोमेनीचे नाव आग्रहाने घेतले जाते ते तर किती असंबध्द आहे त्याचीही चर्चा केली.

नॉस्ट्राडेमसच्या भविष्यवाणीत 'क्रम' नसतो-सकारण नसतो, त्यामुळे हे तर्काधिष्ठित घोटाळे होतात हे जरी खरे असले तरी नॉस्ट्राडेमस वेगवेगळ्या लोकांमधून शायरन् बाबत जे विखुरलेले उल्लेख करतो त्यावरून येऊ पाहाणाऱ्या ३ऱ्या जागतिक युध्दकालातील क्षितिजावर नव्याने उगवणारा पण आज जगाला अज्ञात असलेला जगज्जेता कोण असेल, कुठचा असेल याबाबत सुसंगत तर्ककरायला अडचण पडू नये.

पृष्ठसंख्येचे बंधन लक्षांत घेऊन आतापर्यंत नॉस्ट्राडेमसच्या श्लोकांचे 'शतक अमुक व श्लोक क्रमांक अमुक' एवढाच निर्देश करून त्याने वर्तविलेल्या भाकितांचा मागोवा घेत घेत गूढार्थांची उकल केली. परंतु, आता यापुढे महान् शायरनच्या कर्तृत्वाचा प्रकाश पाडणाऱ्या भाकितांबद्दलचे लेखन, नुसतेच शतक 'श्लोक' क्रमांक अशा संदर्भात न देता, आवश्यक तेवढे मूळ श्लोक, जसेच्या तसे, उध्दृत केल्याशिवाय वाचकांचेही समाधान होणार नाही म्हणून ते प्रसिध्द करण्याचे योजिले आहे. मूळ फ्रेंच भाषेतील श्लोक देणे अशक्य नाही. तरी ती भाषा अत्यल्प लोकांना समजणारी असल्याने त्या श्लोकांचे इंग्रजीत भाषांतर उध्दृत केले जाईल. त्यावरून नॉस्ट्राडेमसच्या एकेका विधानाचे निरुपण करणे सोपे होईल.

...(44)...

यापूर्वीच्या २ ऱ्या प्रकरणांत नॉस्ट्राडेमसचा जीवनवृतांत देतांना, त्याने गूढ भाषेत भविष्यकथन कसे केले आहे त्याचे उदाहरण म्हणून, 'सेंच्युरी' च्या शतक ४ श्लोक १४ चा पूर्वार्ध मूळ फ्रेंच व त्याचेच इंग्रजीत रुपांतरित भाग उध्दृत करून त्याबद्दल विवरण केले. तिसरे प्रकरण नॉस्ट्राडेमसच्या तंतोतंत खऱ्या झालेल्या भाकितांची ओळख वाचकांना व्हावी म्हणून लिहीले, त्यात पुन्हा वरील शतका-श्लोकाच्या आधारे भारताच्या 'डॉमिनंट प्रिमिअर' कै. इंदिरा गांधी यांच्यां अकस्मात (इंग्रजी शब्द आहे Sudden) हत्येने 'भारत' सर्वश्रेष्ठ हिंदुराष्ट्र घडविण्याच्या संभाव्य दोन बदलांचा उल्लेख केला तो असा- इंदिराजींचे पुत्र राजीव गांधी हे पंतप्रधान होतील (श्लोकातील शब्द shall cause change) हा पहिला बदल तर, वरील शब्दांपाठोपाठ त्याच श्लोकात आलेल्या 'and put another in the reign soon' या अधोरेखित शब्दांनी ध्वनित होणारे राजीव गांधींच्या पाठोपाठ २० व्या शतकाचा अस्त होण्याचे काळी उगवणारे दुसरे सत्ताधारी म्हणजेच नॉस्ट्राडेमसना अभिप्रेत असलेला 'शायरन' असेल हे सुसंगत वाटते. हेन्री सी. रॉबर्टस् नामक नॉस्ट्राडेमसचे एक प्रसिध्द भाष्यकार आहेत यांनीही वरील विधान उचलून धरले आहे.

नॉस्ट्राडेमस येवढ्यावरच थांबत नाही तर विश्वनेत्याबद्दल आणखी काही महत्त्वाच्या खुणा दाखवतो.

शतक ५ श्लोक ४१ मध्ये नॉस्ट्राडेमसने स्पष्टच सांगितले आहे की, रात्री अंधाऱ्या वेळी (त्यांचे शब्द आहेत - Noctural time) 'तो' जन्माला येईल. तो सर्वभौम असेल आणि औदार्यात त्याच्याशी कुणीही बरोबरी करू शकणार नाही. तो आपल्या सनातन धर्माचे पुनरुज्जीवन करील आणि या अवनीतलावर सुवर्णयुग आणील!

'अंधाऱ्या वेळी' या शब्दाचे अनेक अर्थ संभवतात. पैकी एक म्हणजे श्रीकृष्णाच्या जन्माचे वेळेप्रमाणे 'तो' शायरन रात्रीच केवळ नव्हे तर अमावास्येच्या अंधःकारमय रात्रीहि जन्म पावला असेल! दुसरा असाही अर्थ होऊ शकतो की, भोवतालचे जगात जेव्हा त्या जगास 'अंधार-युग' म्हणण्याइतकी काळ्या कृत्यांची बेबंदशाही माजली असेल तशा भयंकर कालावधीत 'शायरन'ने या जगात पदार्पण केले असावे. तिसराही अर्थ या 'रात्री'च्या उल्लेखाला चिकटवला जातो, तो म्हणजे, या अवनीतलावर चालू असलेल्या 'जगा'मध्ये आणीबाणी जाहीर होऊन (उदा. २ ऱ्या महायुध्दाचे वेळी जशी अंमलात होती तशी) ब्लॅक आऊट असेल तेव्हा जन्माला आलेले हे मूल असावे! या सर्व लेखनाचा इतकाच इत्यर्थ निघतो की आगामी महासंहारक तिसऱ्या महायुध्दात अमेरिका-रशियाच्या युतिसह 'शायरन' ही तिसरी भारतीय शक्ती महान कार्य करील. आज ती अज्ञात असली तरी ती व्यक्ती आजच्या जगात वावरत असेल. अमावस्येसारख्या कुठल्या तरी अंधेऱ्या रात्री जन्म घेतलेली व आगामी महान नेता ठरणारी ही व्यक्ती तरुण १६ते२०-२५ वर्षाची तरी असेल किंवा पन्नाशीसाठी गाठलेली अनुभवी ध्येयैकशरण प्रौढ व्यक्तीही असू शकेल; यापेक्षा शायरनच्या वयावर प्रकाश पाडणारा उल्लेख नॉस्ट्राडेमसने कुठे केल्याचे आढळत नाही.

...(45)...

नाही म्हणायला नॉस्ट्राडेमस हे मात्र नमुद करतो की या नेत्याच्या नेतृत्वाखाली भारत हा जगातील सर्व-श्रेष्ठ देश बनेल. इतकेच नव्हे तर दूरवर पसरलेले हिंदूंचे साम्राज्य नव्याने आकारास येईल.

शतक १, श्लोक ५० मध्ये त्या पुरुषाचा पुन्हा उल्लेख आढळतो तो असा-

'From Peninsula of three seas will be born one who will make Thursday his day of worship. His fame praise and rule will form mighty by land, sea. There will be a tempest of India.'

तीन सागरांनी बनलेल्या व्यापक द्वीपकल्पात तो जन्म घेईल; त्याचा गुरुवार हा प्रार्थनेचा दिवस असेल. त्याची कीर्ति त्रिखंडात पसरेल. त्याचे सामर्थ्य इतके प्रभावी असेल की त्याच्या आक्रमक घोडदौडीमुळे उत्पन्न झालेल्या त्याच्या प्रभावाने वादळी वातावरण उत्पन्न होईल. द्वीपकल्प, गुरुवार प्रार्थनेचा दिवस (या संदर्भात असेही म्हटले गेले आहे की शायरनचा विश्रांती घेण्याचा दिवस सोमवार असेल). या तिन्ही लाक्षणिक शब्दांद्वारे नॉस्ट्राडेमसला काय सुचवायचे असावे त्याबद्दल यापूर्वीच्या प्रकरणांतून स्पष्टीकरण केलेच आहे. या सर्वांचा निःसंदिग्धपणे आशय स्पष्ट होतो तो हा की शायरन हा महाम नेता भारतात जन्मलेला हिंदू नेताच असेल.

वरील भाकिताला दुजोरा देणारे भाष्य नॉस्ट्राडेमसने स्वतःच शतक ५, श्लोक २५ मध्ये केले आहे तेच पहा ना -

The Arab Primer, Mars, Sol, Venus, Leo,Rule of Church will surrender to the sea towards Persia, close to a million, True serpent power invade Turkey and Egypt.'

मागे उल्लेख केलेल्या हेन्री रॉबर्टस्ने याही श्लेकाखाली, आपल्या पुस्तकात टीप दिली आहे की -

'Christian Ideal will be overcome by Oriental Ideology where serpent meaning True serpent.....'

(म्हणजेच कुंडलिनी शक्ति धारण करणारी व्यक्ति). नॉस्ट्राडेमस भविष्याचा वेध घेऊन, वरील श्लोकात स्वच्छपणे सांगून टाकतो की सागराच्या नावाचा धर्म ज्याचा आहे (म्हणजेच हिंदी महासागर त्या अनुषंगाने हिंदुधर्म-तथा हिदुस्थान!) - कुठल्याहि प्रादेशिक भूमीकडे अंगुली निर्देश करण्याकरिता असा उल्लेख कुठल्याही भौगोलिक वाङमयात आढळत नाही-तो ज्याचा आहे त्याच्या पुढाकाराने युरोपमधील नव्हेत तर ख्रिश्चन व यावनी संस्कृतीचा खातमा केला जाईल. त्यांची सारी केन्द्रे ज्या ज्या राष्ट्रात विखुरलेली आहेत ती राष्ट्रेही पादाक्रांत केली जातील. इतर, कोणत्याही धर्मात ज्याप्रमाणे गुरुवार हा प्रार्थनेचा दिवस म्हणून पाळला जात नाही त्याचप्रमाणे कुंडलिनी शक्ति कुणाही बिगर हिंदूला ज्ञात नाही. हिंदूंचे ते खास शक्तिस्थान आहे, ते हिंदुच इजिप्त, तुर्कस्तान इत्यादी मध्यपूर्वेत असलेल्या सत्ताधाऱ्यांना दूर फेकून तिथे हिंदु संस्कृति केवळ नांदू लागेल असे नाही तर तिचा अम्मल सुखेनैव चालू राहील.

...(46)...

वरील भाकितावर आणखी झगझगीत प्रकाश टाकणारे भाकीत नॉस्ट्राडेमसने शतक १०, श्लोक ९६ मध्ये प्रसिध्द केले आहे ते असे -' Religion of the name of sea will against the sect of Caliphs of the Moon vanquish. The deplorably obstinate sect shall br afraid of wounded by Alef and Alef.'

फ्रेंच द्रष्ट्या ज्योतिषवर्यांने केलेले वरील भविष्य फार महत्त्वाचे आहे. कारण, यात जास्तच स्पष्टपणे सांगितले आहे की समुद्राचे (तथा हिंदी महासागराचे) नाव असलेला देश - हिंदुस्थान - खलिफाच्या प्रशंसित पंथाचा नाश करील. वरच्या श्लोकातील २ ऱ्या ओळीतील Sect हा शब्द महत्त्वाचा व नॉस्ट्राडेमसच्या मार्मिक शब्दयोजनांचा निदर्शक आहे. त्या शब्दाचा एक अर्थ जसा 'पंथ' होऊ शकतो तसाच तो शब्द फ्रेंच भाषेत वापरला जातो तो 'श्रध्दा' या अर्थाने! या दृष्टीने या काव्यपंक्तीचा अर्थ लावावयाचा तर समुद्राचे नाव असलेल्यांची श्रध्दा तथा धर्म, हा सद्धर्म आहे तर खलिफा प्रशंसित धर्म ही केवळ अंधश्रध्दा आहे. या वाक्याचा आणखी स्पष्टार्थ करायचा तर नॉस्ट्राडेमसला हिंदू हा 'धर्म' तर इस्लामला तो अंधश्रध्दा म्हणून अभिप्रेत आहे. Obstinate हे विशेषण खलिफाच्या पंथाला लावून नॉस्ट्राडेमसने हेही आडपडदा न ठेवता सांगून टाकले आहे की, 'खलिफ-प्रशंसित पंथ अपरिवर्तनशील, अतिरेकी आहे!'

या पूर्वीच्या प्रकरणात 'शायरन' म्हणून आयातुल्ला खोमेनीबद्दल लिहितांना सध्या जगभर चालू असलेल्या रश्दींच्या 'सॅटॅनिक व्हर्सेस' या कादंबरीवरून उसळलेल्या सैतानी उद्रेकाचा उल्लेख केलाच आहे. त्याला आणखी दुजोरा देणारी बातमी नुकतीच वाचण्यात आली, तीही या संदर्भात बरेच काही सांगून जाते असे वाटते म्हणून येथे तिचा उल्लेख करतो - पॅरिसहून आलेली ही सत्यकथा आहे. प्रसिध्द फ्रेंच गायिका व्हेरोनिक सान्साँ, आपल्या कार्यक्रमात 'अल्ला' हे गीत सादर करीत असे. (म. गांधी ज्याप्रमाणे त्यांच्या रामनामात - 'ईश्वर अल्ला तेरे नाम' असे खादीचे ठिगळ लावून म्हणत त्याप्रमाणे!) परंतु, गीत - गायकाला ठार मारू अशी धमकी त्यांना देण्यात आल्यावर त्यांनी ते गीत न गाण्याचे ठरविले. नभोवाणीवरील एका मुलाखतीत ही माहिती देऊन पुढे स्पष्टीकरणही केले की, 'वास्तविक या गीतात इस्लामचा अवमान करणारे काहीही नाही, ती एक प्रार्थना आहे. पण 'ज्ञानलव दुर्विदग्धं ब्रह्मापि नरं न रंजयति।।' हे जास्त अनुभवसिध्द वाक्य कुणाच्या खिजगणतीत आहे?

मुस्लिम धर्माच्या तत्त्वांना खोमेनीसारखे धर्मांध त्यांना अभिप्रेत असलेला वेगळाच रंग देण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यामुळे होते काय तर काही मुस्लिम मूळ ग्रंथ न वाचताच विनाकारण कडवे धर्मांध बनत चाललेले आहेत. मशिदीमध्ये ठिय्या मारून बसलेले मुल्ला - मौलवी नि इमाम आपापले राजकारण पुढे रेटण्याचे मनसुबे उभारण्यात मश्गूल झाले आहेत. भारतीय शिक्षण यंत्रणेतून इस्लाम विरोधी (हेही त्यांनीच ठरवायचे) सारे उल्लेख काढून टाकावेत, पाठ्यपुस्तकांचे शुध्दीकरण (!) केले

...(47)...

जावे अशी मागणी करायला सुरुवात झाली आहे. या सर्वांची परिणती कशात होईल हे सांगणे आतापर्यंतच्या अतिरेकी अनुभवावरून जाणता येण्यासारखे असले तरी ज्या वेगाने १९९९ चा झंझावात समीप येत आहे त्या वेगाशी सुसंगत असा अत्याचारांचा नेहमी उसळणारा डोंब लक्षात आला की हीच वावटळ आगामी तिसऱ्या महायुध्दाची नांदी ठरण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

१७ व्या शतकात ज्याप्रमाणे मुसलमानांच्या अत्याचारांनी हिंदुस्तानांत मर्यादा गाठली, तेव्हा मूठभर मावळ्यांना एकत्र करून परिस्थितीशी मुकाबला करणे अपरिहार्य झाले.

तेव्हा बाल शिवरायांनी विजापूर सोडून पुण्याच्या आपल्या जहागिरीत राहायला सुरुवात केली व आपल्या सवंगड्यांसह करंगळीचे बोट कापून श्रीशंकरावर (रोहिडोश्वर?) रक्ताचा अभिषेक करून स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. हाताशी असलेले सीमित मनुष्यबळ, युध्दमान शस्त्रांचा तुटवडा, अर्धपोटी जेवण, आणि एकंदर समाजावर मुसलमानी अंमलाची खोलवर रूजलेली दहशत व त्यामुळे रूळलेली अगतिकता यामुळे गनिमी काव्याने या सत्तेशी दोन हात करावे लागले. पारतंत्र्याचा एक अवश्यमेव भाग असा असतो की त्याविरुध्द प्रथम उठाव करणाराला नामोहरम करणे, घरच्यापेक्षा बाहेरचा सत्ताधारी आपलासा वाटणे! घरभेदीपणा सत्कर्माचा रंग घेतो. प्रत्येक कृतीला धर्मांधता म्हणण्यात येते, जातीयतेचा छाप मारला जातो. सूर्याजी पिसाळाची अवलाद उत्तम होऊन फंद - फितुरी वाढते - या सर्वांवर मात करून शिवरायांनी राजगडावर तोरण बांधून, राज्याभिषेक करविला तेव्हाच भूषण कवींनी त्यांचा गौरव केला तो या शब्दांनी - 'शिवाजी न होता तो सब की होती सुन्ता'. इतिहासाची पुनरावृत्ती होत असते असे म्हणतात त्यानुसार आजही शायरनच्या नेतृत्त्वाने हिंदुत्वाची द्वाही फिरवण्याची नेमकी वेळ आली आहे. शिवरायांनी अनुसरलेला मार्ग धर्मांधतेचा नव्हता तर 'स्वत्व' टिकविण्याचा होता. त्याकरिता प्राणांची बाजी लावून मराठमोळ्यांनी लढा दिला होता. ती स्फूर्ति नंतर १९ व्या शतकापर्यंत कार्यरत होती. मराठ्यांचा भगवा जरिपटका अटकेपार लागला, दिल्लीचे तक्त फोडून आपल्या शौर्याची मुद्रा भारतभर पसरलेल्या भारतीयावर उमटवली. एवढी मर्दुमकी असूनही दिल्लीच्या सिंहासनावर - तक्तावर - .शेवटपर्यंत 'मराठा' न बसविता, मोगल बादशाहीच चालू राहिली. हे विषयांतर एवढ्यासाठीच केले की हिंदूंची युध्दप्रविणता ते सत्ताधीश होण्याइतकी बलशाली असूनही, त्यांच्या विशिष्ट मानसिक ठेवणीनुसार ते आक्रमक सत्ताधारी केव्हाच झाले नाहीत हे स्पष्ट व्हावे!

भारतीय हिंदू हे निसर्गतः व त्यांना मिळालेल्या धार्मिक व अध्यात्मिक वारसानुसार प्रवृत्तीने सौम्य प्रकृतीचे आहेत, आक्रमक नाहीत. परंतु, या आधी उध्दृत केलेल्या नॉस्ट्राडेमसच्या शतक १, श्लोक ५० प्रमाणे, 'शायरन' हा हिंदू नेता अखिल हिंदुविश्वाला जागृति आणून स्वतःच्या वादळी व्यक्तिमत्वाने, आपल्या भूमि नि सागरी सामर्थ्याचे दर्शन घडविणार आहे. अजिंक्य हिंदुनेता ही आपली प्रतिमा सर्व

...(52)...

प्रारंभी जगाच्या क्षितीजावर उगवणार आहे. हा जो बदल घडणार आहे तो नॉस्ट्राडेमसच्या इच्छेने घडणार नसून नियतीच्या इच्छेने हा सारा बनाव घडणार आहे. त्यातून नवीन जे घडणार आहे ते म्हणजे हिंदुस्थान हा सर्वश्रेष्ठ देश होणार आहे. आज कित्येक शतके न दिसलेले, दृष्टिआड झालेले हिंदुंचे साम्राज्य अवतरणार आहे.

आजच्या विज्ञानयुगात अणुशास्त्राचा जो अभ्यास चालू आहे, व अणु-अस्त्रे बनविण्याची वा संग्रही ठेवण्याची जी चढाओढ सर्व जगभर चालू आहे त्यावरून आगामी युध्दाची भीषणता स्पष्ट होत आहे. संयुक्त राष्ट्रसंघातर्फे तज्ज्ञांनी केलेल्या अभ्यासानंतर जो अहवाल प्रसिध्द झाला आहे त्यावरून निःसंदिग्ध शब्दात प्रामुख्याने सांगितले आहे की, आगामी युध्द हे अणुयुध्द झाल्यास - आणि आज, त्या दृष्टीने जी पावले पडत आहेत त्यानुसार ३ हे महायुद्ध अणुयुध्दच होणार याबद्दल दुमत होण्यासारखेही नाही - प्रत्यक्ष परिणाम प्रचंड मनुष्यहानी, उद्ध्वस्त झालेले देश, भस्मसात झालेली मालमत्ता व शेती या दृष्यांनी दिसतील हे तर खरेच, पण त्याहीपेक्षा त्याचे जे अप्रत्यक्ष परिणाम प्रदीर्घ कालपर्यंत जाणवतील ते मात्र फारच भयंकर स्वरूपाचे असतील.

या अणुयुध्दाने जगातील हवामानात बदल होईल. ज्या गोलार्धातील शहरांवर अणुबॉंब किंवा रॉकेट्स यांचा मारा होईल - आणि उत्तर गोलार्धातील मोठ्या शहरांवर असा वर्षाव होण्याचा संभव जास्त - त्या गोलार्धातील तपमान शून्य अंश सेल्शिअस् खाली जाईल. सूर्यप्रकाश पुरेसा मिळणार नाही. पाऊस कमी पडेल. त्यामुळे शेती, वनस्पती उगवण्या - उत्पन्न होण्यावर विपरित परिणाम होईल. ओझोनचा संरक्षक थर कमी होत आहे, अशी आजच आवई उठली आहे. तो संरक्षक थरही अणुयुध्दाने आणखी कमी होऊन अतिनील किरण रोखले जाण्याचे प्रमाण कमी होईल.

नॉस्ट्राडेमसला हे सर्व प्रलयंकारी दृष्य दिसत असूनही त्याने केलेल्या ग्रहगणिताच्या आधारे तो म्हणतो की, या तिसऱ्या महायुध्दात अनेक तथाकथित प्रगत देश बेचिराख होतील. तरी त्यातून मानववंश टिकून राहील; हिंदुस्थान - म्हणजे हिंदुराष्ट्र - आणि त्या देशात जन्मलेला द्रष्टा नेताच, सर्व जगाचा तारणहार जगज्जेता असेल!

भगवान् श्री रामकृष्ण परमहंस यांचे एक फ्रेंच भक्त रीनकोर्ट नामक लेखक आहेत. त्यांनी परमहंसांचा निर्वाणापूर्वी जे सांगितले ते श्री रामकृष्णांचे शब्द उद्धृत करून म्हटले आहे की रामकृष्णांची ती भविष्यवाणी नॉस्ट्राडेमसच्या भाकितांना पुष्टीच देते. भगवान रामकृष्ण परमहंस म्हणाले होते की त्यांचा 'पुढचा जन्म भारताच्या वायव्येला होईल' हेच दुसऱ्या भाषेत विशद करून सांगायचे तर परमहंस रशियांत हिंदु संत म्हणून पुनः जन्म घेतील, नि हिंदुत्वाचे पुनरुत्थापन होईल. 'शक-हूण' आदि जमातींप्रमाणे रशियाहि हिंदुत्ववादी झालेला दिसेल, त्या जीवनपद्धतीचा स्वीकार करील कारण या आकाशाखाली सर्वकश विचारस्वातंत्र्य असलेली दुसरी जीवनपद्धतीच नाही. रशिया,

...(74)...

हिंदु संस्कृति, धर्म, व त्यांचे राष्ट्रप्रेम याबद्दल, नॉस्ट्राडेमस स्वतः ज्यू वा ख्रिश्चन असूनहि, जे उत्कटतेने उद्‌गार काढतो, ते त्याला काही आंतरिक साक्षात्कार झाल्यामुळें काढीत असावा असे वाटण्याइतके खणखणीत आहेत. भारतांतील हिंदु हे खरे हिंदुस्तानचे रहिवासी, भारतांतील मुस्लिम हे घुसखोर तरी किंवा बाटगे मुसलमान, त्यामुळें त्यांना, नॉस्ट्राडेमस, राष्ट्रद्रोही. म्हणतो. हिंदु धर्माशिवाय हिंदुस्तान अशक्य, आणि हिंदुस्तानची हिंदु संस्कृतीहि अशक्यच! आगामी प्रलयंकारी युद्धांतून जगाला नवा प्रकाश देणारा जगज्जेता म्हणून हिंदूच नेता असेल याबद्दल 'नॉस्ट्राडेमस' ठाम आहे!

# ''यथार्थ ज्ञान प्रकाश विषय''

## ''परमेश्वराविषयी शास्त्र काय सांगते?''

प्रभु – स्वामी – ईश – राम – खुदा – अल्लाह – रब – मालिक – साहेब – देव – भगवान – गॉड हे सर्व शक्तिबोधक शब्द आहेत, जे भिन्नभिन्न भाषांमध्ये उच्चारले व लिहिले जातात.

परमसुखदायक व कष्टनिवारक अशी प्रभु नावाची जी शक्ती आहे, तिच्या महिमेने प्रत्येक भूतमात्र प्रभावित झाला आहे. तो प्रभु कोण? कसा आहे? कोठे आहे? कसा प्राप्त होईल, हे प्रश्नवाचक चिन्ह आतापर्यंत पूर्णपणे नष्ट झालेले नाही. या पुस्तकाच्या माध्यमातून या शंकेचे निरसन पूर्णपणे होईल.

जी शक्ती अंधाला दृष्टी प्रदान करते, मुक्याला आवाज, बहिऱ्याला श्रवणशक्ती, वंध्यत्व स्त्रीला पुत्र देते, निर्धनास धनवान करते, रोग्याला रोगमुक्त करते, ज्याच्या दर्शनाने अत्यानंद होतो, सर्व ब्रह्मांडांचा निर्माता, पूर्ण शांतिदायक जगद्‌गुरू व सर्वज्ञ आहे, ज्याच्या आज्ञेविना झाडाचे पानही हालत नाही अशा सर्व शक्तिमानासमोर काहीच असंभव नाही, असे गुण ज्याच्यामध्ये आहेत तो म्हणजेच प्रभु (स्वामी, ईश, राम, भगवान, खुदा, अल्लाह, रहीम, मालिक, रब, गॉड) गणला जातो.

येथे एक गोष्ट विशेष विचार करण्यासारखी आहे की कोणत्याही शक्तीचे ज्ञान विशिष्ट शास्त्रानेच होते. त्याच शास्त्राच्या आधारावर गुरुजन आपल्या अनुयायांना मार्गदर्शन करतात. ते शास्त्र म्हणजेच धार्मिक पुस्तके. उदाहरणार्थ– चार वेद (ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद, अथर्ववेद), श्रीमद् भागवत गीता, श्रीमद् भागवत सुधासागर, अठरा पुराणे, महाभारत, बायबल, कुराण इत्यादी प्रमाणित पवित्र शास्त्रे आहेत. स्वयंपूर्ण परमात्म्याच्या आदेशाने ज्योति निरंजनने (काल) चारही वेद समुद्रात आपल्या श्वासाद्वारे गुप्त ठिकाणी लपवून ठेवले आणि पहिल्या सागरमंथनाच्या वेळी हे चारही वेद श्री ब्रह्मांना प्राप्त झाले. त्या वेदांचा ब्रह्माजींनी (क्षर पुरुषाचे ज्येष्ठ पुत्र) अभ्यास केला. त्यातून त्यांना जे समजले त्याच्या आधारावर त्यांनी आपल्या वंशजांद्वारे (ऋषि) जगतामध्ये ज्ञानाचा प्रचार करवला. पूर्ण परमात्म्याने पाचवा 'स्वसम' (सूक्ष्म) वेदही ब्रह्माला (काल) दिलेला होता, जो ज्योती निरंजनने (काल) आपल्याजवळ गुप्त ठेवला आणि नष्ट केला.

काही काळानंतर म्हणजेच एक कल्पानंतर (एक हजार चतुर्युग) तिन्ही लोकीचे (पृथ्वीलोक, स्वर्गलोक, पाताळलोक) सर्व प्राणी विनाश पावतात. त्यानंतर ज्योति निरंजनाच्या (काल) निर्देशाने ब्रह्मा आपली रात्र समाप्त झाल्यानंतर (ब्रह्माची रात्र एक हजार चतुर्युगाची असते आणि तेवढाच दिवस असतो.) जेव्हा दिवस प्रारंभ होतो, तेव्हा रजोगुणाने प्रभावित करून तीन लोकांमध्ये प्राण्यांची उत्पत्ती सुरू करतो.

त्यावेळी सतयुगाच्या सुरवातीस तेच चार वेद काल (ब्रह्म) स्वतः ब्रह्माला पुन्हा प्रदान करतो. त्यानंतर पुन्हा प्राकृतिक उलथापालथ झाल्यामुळे चारही पवित्र वेदांचे ज्ञान लोप पावते. त्यानंतर पुन्हा काळानुसार अन्य ऋषिमध्ये प्रवेश करून पुन्हा लिहून घेतो. समयोचितपणे प्राकृतिक उलथापालथीनंतर स्वार्थी लोकांद्वारे वेदांमध्ये वेळोवेळी बदल करून वास्तविक ज्ञान जगतातून लुप्त केले जाते. त्याच कालाने (ब्रह्म–ज्योतिनिरंजन) महाभारतातील युद्धावेळी श्री कृष्णामध्ये प्रवेश करून चारही वेदांचे संक्षिप्त विवरण श्रीमद् भागवत गीतेच्या रूपाने दिले व

सांगितले, हे अर्जुना, हे ज्ञान मी पूर्वी सूर्यास सांगितले होते. त्याने आपल्या 'पुत्र वैवश्वत' म्हणजेच मनूला आणि मनूने त्याचा पुत्र इक्ष्वाकू याला सांगितले होते, परंतु मध्यंतरी हे उत्तम ज्ञान लवकरच समाप्त झाले होते.

या कालाने (ब्रह्म-ज्योति निरंजन) श्री 'वेदव्यास' ऋषिंच्या शरीरामध्ये प्रवेश करून चारही वेद, महाभारत, अठरा पुराणे, श्रीमद् भागवत गीता, श्री सुधासागर पुन्हा संस्कृत भाषेमध्ये लिपीबद्ध केले, जे आजही आपणा सर्वांना उपलब्ध आहे. हे सर्व शास्त्र श्रेष्ठ आहे. आता या सर्व शास्त्रांना कलयुगी ऋषिंनी भाषांतरे म्हणजेच हिंदी अनुवाद करताना आपले विचार त्यामध्ये मिळवण्याचा प्रयत्न केलेला आहे, जे स्पष्टपणे अयोग्य आहे व व्याख्यानुरूप नाही. ही सर्व शास्त्रे महर्षी व्यासजी यांच्याकडून सुमारे पाच हजार तीनशे वर्षांपूर्वी पुन्हा लिहिली गेली आहेत. त्यावेळी हिंदू, ईसाई, मुस्लिम, सिक्ख असे कोणतेही धर्म नव्हते. फक्त वेदांना मानणारे आर्यच तेवढे होते. कर्माच्या आधारावर जातिरचना होती. तसेच केवळ चार वर्ण (क्षत्रिय, वैश्य, ब्राह्मण, शूद्र) हेच होते.

यावरून हे स्पष्ट होते की ही सर्व शास्त्रे कोणताही एक धर्म किंवा व्यक्तिसाठी नाहीत, तर ते केवळ मानवाच्याच कल्याणासाठी आहेत. दुसरे हे सिद्ध होते की आपले सर्वांचे पूर्वज एकच होते, ज्यांचे संस्कार आपल्याशी मिळते जुळते आहेत.

आता सर्वप्रथम पवित्र शास्त्र गीता जीवर विचार करू.

## ''पवित्र भगवत गीता जीचे ज्ञान कोणी सांगितले?''

पवित्र गीता चे ज्ञान त्यावेळी सांगितले गेले, जेव्हा महाभारतातील युद्ध होणार होते आणि अर्जुनाने युद्ध करण्यास नकार दिलेला होता. युद्ध का होणार होते? या युद्धाला धर्मयुद्धाची संज्ञा देखिल दिली जाऊ शकत नाही, कारण तो दोन परिवारांमधील संपत्तीच्या वाटणीचा विषय होता. कौरव आणि पांडव यांच्यात संपत्तीची वाटणी होत नव्हती. कौरवांनी पांडवांना अर्धे राज्य देण्यास नकार दिलेला होता. दोन्ही पक्षांत मध्यस्थी करून रक्षण करण्यासाठी प्रभु श्री कृष्ण तीन वेळा शांतिदूत बनून गेले, परंतु दोन्हीही पक्ष आपापल्या हट्टावर अडून बसले. युद्धापासून होणाऱ्या हानीची माहिती देऊन श्री कृष्ण म्हणाला की, 'न जाणे किती भगिनी विधवा होतील? न जाणे किती बालके अनाथ होतील? महापापाशिवाय काही मिळणार नाही. युद्धामध्ये कोण मारले जातील आणि कोण वाचेल, काहीच सांगता येत नाही.' श्री कृष्ण जेव्हा तिसऱ्या वेळी वाटाघाटी करण्यासाठी गेले, तेव्हा दोन्ही पक्षांनी 'एवढे एवढे राजा आमच्या पक्षामध्ये आहेत,' असे सांगत आपापल्या पक्षाच्या राजांच्या सेनेसह सूचिपत्र दाखवले. दोन्हीही पक्ष आपल्या भूमिकेवर तटस्थ आहेत, दोघेही युद्धाला सज्ज झाले आहेत हे पाहिल्यावर श्री कृष्णाने असा विचार केला की वाटाघाटीसाठी आणखी एक डाव आहे. तो देखिल आज आपण येथे खेळून बघू या. त्याने विचार केला की पांडव माझे संबंधी असल्यामळे (श्री कृष्णाची बहीण सुभद्राचा विवाह अर्जुनाशी झालेला होता.) ते आपली जिद्द सोडत नाहीत. यामुळे आपण त्यांच्याबरोबर आहे असे समजून त्यांचाच विजय होईल असे तर त्यांना वाटत नसेल ना? त्यावेळी श्री कृष्णाने स्पष्ट केले की 'या युद्धात एका बाजूला माझी सर्व सेना असेल आणि दुसऱ्या पक्षात मी असेन. तसेच मी असा वचनबद्ध होतो की या युद्धात मी शस्त्र हाती धरणार नाही.' श्री कृष्णाच्या या घोषणेने पांडवांच्या पायाखालची जमीन सरकली. त्यांना वाटले की आता आपला पराजय निश्चित आहे. त्यावेळी पाचही पांडव विचारविनिमय करण्यासाठी सभेतून बाहेर आले. काही वेळानंतर त्यांनी श्री कृष्णाला बाहेर

येण्याची विनंती केली. तो बाहेर येताच पांडव म्हणाले की 'हे भगवान, आम्हाला फक्त पाच गावे मिळवून द्या. युद्ध करण्याची आमची इच्छा नाही. यातून आमची इज्जत सुरक्षित राहील आणि युद्ध होऊ नये अशी आपली जी इच्छा आहे, त्याप्रमाणे युद्ध देखिल टळेल.'

पांडवांच्या या निर्णयाने श्री कृष्ण अत्यंत प्रसन्न झाले. त्यांनी असाही विचार केला की युद्धाची जी वाईट वेळ आली होती ती टळली. पांडवांच्या या निर्णयाने सभेमध्ये केवळ कौरव व त्यांचे समर्थक शिल्लक होते. तेथे येऊन श्री कृष्ण म्हणाले की 'हे दुर्योधना, आता युद्ध टळले आहे. माझीही तशी हार्दिक इच्छा होती. आता तुम्ही पांडवांना फक्त पाच गावे द्या. ते म्हणत आहेत की युद्ध करण्याची त्यांची इच्छा नाही.' यावर दांभिकपणे दुर्योधन म्हणाला की 'सुईच्या टोकाएवढीही जमीन पांडवांना देणार नाही. जर त्यांना ती पाहिजे असेल, तर युद्धासाठी कुरुक्षेत्राच्या मैदानामध्ये यावे.' त्याच्या या वक्तव्याने श्री कृष्णजी नाराज झाले. ते म्हणाले, ''दुर्योधना, तू मनुष्य नाहीस, राक्षस आहेस. कोठे अर्धे राज्य आणि कोठे पाच गावे? माझे म्हणणे ऐक. त्यांना पाच गावे देऊन टाक.'' श्री कृष्णाच्या या वक्तव्यावर नाराज होऊन दुर्योधनाने सभेमध्ये उपस्थित योद्ध्यांना श्री कृष्णास पकडून कारागारामध्ये बंदिस्त करण्याची आज्ञा केली. त्यासरशी योद्ध्यांनी श्री कृष्णजींना चारी बाजूंनी घेरले. यावेळी श्री कृष्णाने आपले विराट रूप दाखविले. त्यामुळे उपस्थित सर्व योद्धे व कौरव भयभीत होऊन आसनांच्या खाली लपले. श्री कृष्णजींच्या तेजस्वी प्रकाशासमोर डोळे उघडणे त्यांना दुरापास्त झाले आणि श्री कृष्णजी तेथून बाहेर पडले.

आता यावर आपण विचार करू या :- हे विराट रूप दाखविण्याचे प्रमाण गीता प्रेस, गोरखपूर येथून प्रकाशित करण्यात आलेल्या 'संक्षिप्त महाभारत'मध्ये प्रत्यक्ष आहे. जेव्हा कुरुक्षेत्रावर पवित्र गीता चे ज्ञान ऐकवताना (११ व्या अध्यायातील ३२ वा श्लोक) प्रभु म्हणतात, की 'हे अर्जुना, मी मोठा काल आहे. आता सर्व लोकांना खाण्यासाठी प्रगट झालो आहे.' आता येथे जरा विचार करा की श्री कृष्णजी तर पूर्वीपासूनच अर्जुनाच्या सोबत होते. जर श्री कृष्णजी पवित्र गीता चे ज्ञान सांगत होते, तर मी आता प्रगट झालो आहे असे म्हटले असते का? श्री कृष्णजी काल नव्हते. केवळ त्यांच्या दर्शनाने मनुष्य, पशू (उदाहरणार्थ गाय) प्रसन्न भावनेने श्री कृष्णजींजवळ येऊन प्रेम मिळवत असत. त्यांच्या दर्शनाशिवाय गोपिकांचे खाणे-पिणे बंद व्हायचे. म्हणूनच काल ही कोणती तरी अन्य शक्ति आहे. त्या शक्तिनेच श्री कृष्णजींच्या शरीरामध्ये प्रेतवत (भुतासारखा) प्रवेश करून पवित्र श्रीमद् भागवत गीता च्या ज्ञानरूपामध्ये चारही पवित्र वेदांचा सार सांगितला आहे. त्या कालाचे एक हजार हात (सहस्त्रभुज) आहेत. चार हात असणाऱ्या (चतुर्भुज) श्री विष्णुजींचा श्री कृष्णजी अवतार होते. यानंतर ११ व्या अध्यायातील २१ व ४६ श्लोकांमध्ये अर्जुन म्हणत आहे की 'भगवान! जे पवित्र वेदांतील मंत्र उच्चारून तुमचे गुणगान करत आहेत, तसेच स्वत:च्या जीवनरक्षेसाठी मंगल कामना करत आहेत, अशा ऋषि, देवता व सिद्ध पुरुषांनाही तुम्ही खात आहात. काही जण आपल्या दाढीमध्ये लटकत आहेत, तर काही जण आपल्या मुखीचा घास बनलेले आहेत. हे सहस्त्रबाहू अर्थात हजार हात असणाऱ्या भगवंता, आपण आता आपल्या चतुर्भुज रूपामध्ये यावे. आपले विक्राळ रूप पाहून माझा धीर सुटत आहे.'

पवित्र गीता च्या अकराव्या अध्यायातील ४७ व्या श्लोकामध्ये बोलणारा प्रभु काल म्हणत आहे की 'हे अर्जुन, हेच तर माझे वास्तविक काल रूप आहे, जे तुझ्याव्यतिरिक्त पूर्वी कोणीही पाहिलेले नाही.'

आता यावरून असे सिद्ध होते की कौरवांच्या सभेमध्ये श्री कृष्णाने विराट रूप

दाखविले होते आणि रणांगणात कालाने (श्री कृष्णजींच्या शरीरामध्ये प्रेतवत प्रवेश करून) विराट रूप दाखविले होते. अन्यथा श्री कृष्णाने कौरवांच्या सभेत अगोदर विराट रूप दाखविलेले असताना युद्धभूमीवरील हे विराट रूप तुझ्याव्यतिरिक्त पूर्वी कोणीही पाहिलेले नाही, याचा उल्लेख आला नसता.

श्री कृष्णाच्या दर्शनासाठी दूरदूरचे स्त्री-पुरुष तडफत असत, पण 'मी काल आहे' असे श्री कृष्णाने पूर्वी कधीही म्हटले नाही किंवा नंतरही कधीही म्हटलेले नाही. यावरूनही असे सिद्ध होते की पवित्र गीता बोलणारा काल (ब्रह्म-ज्योति निरंजन) हा आहे, श्री कृष्णजी नव्हेत.

टीप :- विराट रूप म्हणजे काय?

विराट रूप :- दिवसा किंवा चांदण्या रात्री जेव्हा आपल्या शरीराची सावली छोटी म्हणजेच शरीराएवढी किंवा शरीरापेक्षा थोडी मोठी असते, त्या वेळी डोळ्यांतून पाणी आले तरी त्या सावलीच्या छातीच्या स्थानावर दोन मिनिटांपर्यंत एकटक पाहा. त्यानंतर समोर आकाशाकडे पाहा. त्यावेळी पांढऱ्या रंगाच्या आकाशास स्पर्श करत असलेले आपलेच विराट रूप आपल्याला दिसू लागेल. अशाप्रकारे प्रत्येक मनुष्य आपले स्वतःचे असे विराट रूप राखून ठेवतो. येथे एक मात्र लक्षात घ्या की ज्यांची भक्तिची ताकद जास्त होते, त्यांचे तेज तितकेच अधिक होत जाते.

अशाप्रकारेच श्री कृष्णजीही आपल्या पूर्व भक्तीच्या शक्तिद्वारे सिद्धियुक्त बनलेले होते. त्यांनीही आपल्या सिद्धी शक्तिद्वारे आपले विराट रूप प्रगट केले, जे कालाच्या तेजोमय शरीरापेक्षा (विराट रूप) जास्त तेजोमय नव्हते. तिसरी गोष्ट ही सिद्ध होते की पवित्र गीता बोलणारा प्रभु काल (ज्योति निरंजन) हजार भुजा (हात) असलेला अर्थात सहस्त्रबाहूयुक्त आहे आणि श्री कृष्णजी तर श्री विष्णुजींचा अवतार आहेत. म्हणजेच श्री विष्णुंसारखे चार हात असणारे (चतुर्भुज) आहेत. श्री विष्णु जींकडे सोळा कला आहेत, तर ज्योति निरंजन काल भगवान एक हजार कलांनी युक्त आहे. बल्ब ६० वॅट असो, १०० वॅटचा किंवा १००० वॅटचा, सर्वच बल्ब प्रकाशमान होतात, परंतु त्यांच्या प्रकाशमान होण्यात भिन्नता दिसून येते. ठीक अशाचप्रकारे दोन्ही प्रभुंची शक्ति व विराट रूपाचे तेज भिन्न स्वरूपाचे होते.

हे तत्त्वज्ञान प्राप्त होण्यापूर्वी जे गीता चे ज्ञान समजवणारे महात्माजी होते, त्यांना हा दास (रामपाल दास) प्रश्न करत होता की आधी श्री कृष्णजी तीन वेळा शांतिदूत बनून गेले होते, त्यावेळी म्हणाले होते की युद्ध करणे महापाप आहे. जेव्हा अर्जुनाने स्वतः युद्धाला नकार देत म्हटले होते की 'हे देवकीनंदना, युद्ध करण्याची माझी इच्छा नाही. समोर उभे असलेले स्वजन, नातेवाईक व सैनिकांचा विनाश पाहून मी असा दृढ निर्णय घेतला आहे की मला तिन्ही लोकीचे राज्य प्राप्त झाले, तरीही मी युद्ध करणार नाही. माझी तर अशी इच्छा आहे की मी निशस्त्र असताना दुर्योधन आणि त्याच्या समर्थकांनी माझ्यावर बाणांचा वर्षाव करून मारुन टाकावे, जेणेकरून माझ्या मृत्यूने युद्धामध्ये होणारा विनाश टाळेल. हे श्री कृष्णा, युद्धापेक्षा भिक्षा मागून आपला उदरनिर्वाह करणे मला उचित वाटते. हे कृष्णा, स्वजनांना मारून माझ्या पदरात पापच पडणार आहे. माझी बुद्धी आता चालत नाही. आपण आमचे गुरू आहात. मी आपला शिष्य आहे. आपण जो आमच्या हितामध्ये असेल, तोच सल्ला द्या, परंतु मला असे वाटत नाही की आपले कोणतेही मार्गदर्शन मला युद्धास राजी करू शकेल. त्यामुळे मी युद्ध करणार नाही.' (पवित्र गीता मधील पहिल्या अध्यायातील ३१ ते ३९, ४६ वा श्लोक व २ ऱ्या अध्यायातील ५ ते ८ श्लोक या प्रमाणानुसार)

यानंतर मात्र श्री कृष्णजींमध्ये प्रवेशित काल वारंवार सांगत आहे की 'हे अर्जुना, भित्रा बनू नकोस, युद्ध कर. युद्धामध्ये मारला गेलास तर तुला स्वर्ग प्राप्त होईल किंवा युद्ध जिंकून पृथ्वीवर राज्य करशील.' हे आणि असे बरेच काही सांगून असा भयंकर विनाश घडवून आणला, जो आजपर्यंतच्या संत महात्मे व सभ्य लोकांच्या चरित्रांमध्ये शोधूनही सापडत नाही. त्यावेळी अज्ञानी गुरू (नीम हकीम) म्हणत होते की अर्जुन क्षत्रिय धर्माचा त्याग करत होता. त्यामुळे क्षत्रित्वाला हानी पोहोचली असती व शूरवीरतेचा कायमचा नाश झाला असता. अर्जुनाकडून क्षत्रिय धर्माचे पालन व्हावे यासाठी हे महाभारताचे युद्ध श्री कृष्णजींनी घडवून आणले होते. मलाही स्वत:ला त्यावेळी याचे ज्ञान नव्हते, त्यामुळे सुरवातीला मी त्यांच्या या अज्ञानाकडे पाहून गप्प बसायचो.

आता पुन्हा विचार करा :– की भगवान श्री कृष्णजी स्वतः क्षत्रिय होते. कंसवधानंतर अग्रसेनजींनी मथुरेचा राज्यकारभार श्री कृष्णाकडे सांभाळण्यास दिला. एक दिवस नारदजींनी श्री कृष्णाला सांगितले की जवळच्याच एका गुहेमध्ये मुचकंद नावाचा एक सिद्धी प्राप्त झालेला राक्षसांचा राजा निद्रिस्त अवस्थेत पडलेला आहे. तो सहा महिने झोपतो व सहा महिने जागा राहतो. जागा झाल्यानंतर तो सहा महिने युद्ध करतो, पण सहा महिने निद्रावस्थेत असताना जर कोणीही त्याचा निद्राभंग केला, तर त्याच्या डोळ्यांतून अग्निबाण सुटतात व समोरच्या व्यक्तिवर मृत्यू ओढावतो. त्यामुळे आपण सावधान राहा, असे सांगून श्री नारदजी निघून गेले.

काही कालावधी गेल्यानंतर लहान वयातच श्री कृष्णजींना मथुरेच्या सिंहासनावर विराजमान केलेले पाहून काल्यवन नावाच्या राजाने अठरा करोड सेना घेऊन मथुरेवर आक्रमण केले. श्री कृष्णजींनी पाहिले की शत्रूचे सैन्य अफाट आहे. जर युद्ध झाले तर किती सैनीक मृत्युमुखी पडतील कोण जाणे. काल्यवनाचा वध मुचकंदाकडून का घडवून आणू नये, असा विचार करून भगवान श्री कृष्णजींनी काल्यवनास युद्धाचे आव्हान दिले आणि युद्धभूमी सोडून (क्षत्रिय धर्मास विसरुन, विनाश टाळणे आवश्यक जाणून) पळून गेले. तेथून पळून आल्यानंतर त्यांनी त्या गुहेमध्ये प्रवेश केला, जेथे मुचकंद निद्रावस्थेत होता. मुचकंदच्या शरीरावर आपले पीतांबर टाकून श्री कृष्णजी गुहेमध्येच लपून बसले. पाठोपाठ काल्यवनानेही त्या गुहेमध्ये प्रवेश केला. मुचकंदास श्री कृष्ण समजून त्याने त्याचा पाय पकडून पिरंगळला आणि म्हणाला की 'घाबरटा, तू लपून बसलास म्हणून मी थोडाच सोडणार आहे. वेदनेने मुचकंदाचा निद्राभंग झाला. त्याच्या नेत्रांतून अग्निबाणांचा वर्षाव झाला आणि त्यातच काल्यवन मृत्युमुखी पडला. काल्यवनाचे सैनिक, मंत्री आपल्या राजाचा मृतदेह घेऊन परत निघून गेले, कारण युद्धामध्ये राजाचा मृत्यू ही सैन्याची हार मानली जाते. परत जाताना मात्र ते असे सांगून गेले की हे श्री कृष्णा, नवीन राजाची नियुक्ती करून आम्ही लवकरच परत येऊ. आम्ही आता तुला सोडणार नाही.

श्री कृष्णजीने आपला मुख्य स्थापत्यविशारद श्री विश्वकर्माजीस बोलावून सांगितले, की 'असे एखादे स्थान तत्काळ शोधा, ज्याच्या तिन्ही बाजूंनी समुद्र असेल आणि आत जाण्यासाठी एकाच बाजूने वाट असेल. तेथे लवकरात लवकर एक द्वारिका (एक द्वार असणारी) नगरी तयार करा. आम्ही तत्काळ येथून प्रस्थान करू. हे मूर्ख लोक येथे आम्हाला आनंदाने जगू देणार नाहीत.' श्री कृष्णजी एवढे सरळमार्गी युद्धाच्या बाबतीत निष्पक्ष होते की आपल्या क्षत्रित्वासही डावावर लावून त्यांनी युद्ध टाळले. आता असा विचार करा की तेच श्री कृष्णजी आपल्या प्रिय सग्यासोयऱ्यांना युद्ध करण्याचा चुकीचा आणि वाईट सल्ला देतील काय? आणि स्वतः युद्ध न करण्याचे वचन घेणारे दुसऱ्याला युद्ध करण्यासाठी प्रेरणा देऊ शकतील का?

अर्थात, हे शक्य नाही. भगवान श्री कृष्णांच्या रूपामध्ये स्वतः श्री विष्णु जीच अवतार धारण करून आलेले होते.

एकदा श्री भृगू ऋषिंनी आरामात बसलेल्या भगवान श्री विष्णु जी (श्री कृष्णजी) यांच्या छातीवर लाथ मारली. तरीही श्री भृगू ऋषिजींच्या पायास कुरवाळत श्री विष्णु जी प्रेमाने म्हणाले की 'हे ऋषिवर, आपल्या कोमल पायास जखम तर झाली नाही ना, कारण की, माझी छाती कठीण दगडासारखी आहे.' जर श्री विष्णु जी (श्री कृष्णजी) युद्धप्रिय असते, तर त्यांनी सुदर्शनचक्राने श्री भृगूजींचे इतके तुकडे केले असते की त्यांची मोजदाद देखिल करता आली नसती.

यातील वास्तव हेच आहे की काल भगवान जो २१ ब्रह्माण्डांचा प्रभु आहे, त्याने प्रतिज्ञा केलेली आहे की मी आपल्या देहयुक्त (मानवसदृश आपल्या वास्तविक) रूपामध्ये सर्वांसमक्ष येणार नाही. त्यानेच सूक्ष्म शरीर धारण करून प्रेताप्रमाणे श्री कृष्णजींच्या शरीरामध्ये प्रवेश केला आणि पवित्र गीता तील योग्य ज्ञान (वेदांचा सार) तर सांगितलेच, परंतु युद्ध करण्यासाठी अटळ भूमिकेमध्ये कोणतीही कसर सोडली नाही. काल (ब्रह्म) कोण आहे, हे समजून घेण्यासाठी सृष्टिरचना पुस्तक 'ज्ञान गंगा'मधील पान क्रमांक २१ पासून ७० पर्यंत वाचा.

जोपर्यंत महाभारताचे युद्ध चालू होते, तोपर्यंत ज्योति निरंजन (काल-ब्रह्म-क्षर पुरुष) श्री कृष्णजींच्या शरीरामध्ये प्रवेश करून राहिला. त्याने अश्वत्थामा मरण पावला, भीमाच्या नातवाचे व घटोत्कचाचा पुत्र बबरुमानचे शिर कापले, असे युधिष्ठीराला खोटे बोलायला लावले. नि:शस्त्रतेची प्रतिज्ञा केली असताना स्वतः रथाचे चाक शस्त्ररूपाने उचलेले. हा सर्व कालाने केलेलाच उपद्रव होता, प्रभु श्री कृष्णजींचा नाही. महाभारताचे युद्ध समाप्त होताच काल भगवान श्री कृष्णजींच्या शरीरातून निघून गेला. श्री कृष्णजींनी युधिष्ठीराला इंद्रप्रस्थाच्या (दिल्ली) सिंहासनावर बसवून स्वतः द्वारकेला जाण्याचा निर्णय घेतला, तेव्हा अर्जुनाने त्यांना प्रार्थना केली की हे श्री कृष्णजी, तुम्ही आमचे पूज्य गुरुदेव आहात. आम्हाला एखादा सत्संग ऐकवून जावा, ज्याच्या आधारावर, आपल्या सद्वचनावर चालून आम्ही आमचे आत्मकल्याण करू शकू.

ही प्रार्थना स्वीकारून श्री कृष्णजींनी तिथी, वेळ व स्थान निश्चित केले. निश्चित तिथीला अर्जुनाने भगवान श्री कृष्णांना विनंती केली की प्रभु, आज तेच पवित्र गीता मधील ज्ञान जसेच्या तसे ऐकवा, कारण मी बुद्धिदोषाने ते विसरून गेलेलो आहे. त्यावेळी श्री कृष्णजी म्हणाले, की 'हे अर्जुना, तू निश्चितच मोठा श्रद्धाहीन आहेस. तुझी बुद्धी चांगली नाही. अशा पवित्र ज्ञानास तू का विसरलास?' त्यानंतर श्री कृष्णजी म्हणाले, की त्या गीता तील पूर्ण ज्ञान मी सांगू शकणार नाही, कारण मला त्याचे ज्ञान नाही. त्यावेळी तर मी योगयुक्त होऊन बोललो होतो. येथे विचार करण्यासारखा विषय हा आहे, की जर भगवान श्री कृष्णजी युद्धाच्या वेळी योगयुक्त होते, तर शांती प्रस्तावावेळी योगयुक्त होणे त्यांना कठीण नव्हते. जसे की श्री व्यासजींनी त्याच पवित्र गीता चे ज्ञान अनेक वर्षांनंतर जसेच्या तसे लिपीबद्ध केले. त्यावेळी त्या ब्रह्मने (काल-ज्योति निरंजन) श्री व्यासजींच्या शरीरामध्ये प्रवेश केला आणि पवित्र श्रीमद् भगवत गीता त्यांच्याकडून लिपीबद्ध करवून दिली, जी आता आपल्या करकमळांमध्ये आहे.

प्रमाणासाठी 'संक्षिप्त महाभारत' पृष्ठ नं. ६६७ व जुन्या पुस्तकातील पृष्ठ नं. १५३१ वर

न शक्यं तन्मया भूयस्तथा वक्तुमशेषतः ।।

परं हि ब्रह्म कथितं योगयुक्तेन तन्मया। (महाभारत आश्रव १६१२-१३)

भगवान म्हणाले, ''**ते सर्वच्या सर्व त्याच रूपामध्ये पुन्हा सांगणे आता माझ्या क्षमतेची गोष्ट नाही**. त्यावेळी मी योगयुक्त होऊन परमात्मातत्त्वाचे वर्णन केलेले होते.

संक्षिप्त महाभारत द्वितीय भागातील पृष्ठ नं. १५३१ वरून सहाभार :

(श्री कृष्णाचे अर्जुनाला गीता चा विषय विचारणे सिद्ध महर्षी वैशंपायन व काश्यप यांचा संवाद) :– पांडुनंदन अर्जुन श्री कृष्णासोबत असल्यामुळे अत्यंत प्रसन्न होते. 'अर्जुनाने एक वेळ त्या रमणीय सभेकडे नजर टाकून भगवान श्री कृष्णाला हे वचन म्हटले की :– 'देवकीनंदना, जेव्हा युद्धाची वेळ आली होती, त्यावेळी मला आपल्या महात्म्याचे ज्ञान आणि **ईश्वरीय स्वरूपाचे दर्शन झालेले होते**, परंतु केशव, आपण स्नेहाने प्रथमत: मला जो ज्ञानाचा उपदेश केलेला होता, तो सर्व आता बुद्धिदोषाने विसरला आहे. तो विषय वारंवार ऐकण्याची माझ्या मनामध्ये उत्कंठा निर्माण होत आहे. इकडे तुम्ही लवकरच द्वारिकेला जाणार आहात म्हणून तुम्ही तो सर्व विषय मला ऐकवा.''

वैशंपायनजी म्हणतात, अर्जुनाच्या या बोलण्यावर वक्त्यांमध्ये श्रेष्ठ, महातेजस्वी भगवान श्री कृष्णाने त्याला छातीशी लावून असे उत्तर दिले,

श्री कृष्ण म्हणाले, 'अर्जुना, त्यावेळी मी तुला अत्यंत गोपनीय विषयाचे श्रवण करविले होते, आपल्या स्वरूपभूत धर्म सनातन पुरुषोत्तम तत्त्वाचा परिचय दिलेला होता आणि (शुक्ल कृष्ण गतिकेचे निरुपण करत) नित्य लोकांचेही वर्णन केले होते, परंतु तू आपल्या अज्ञानामुळे लक्षात ठेवले नाहीस, हे जाणून मला अत्यंत खेद वाटतो. त्या गोष्टींचे आता पूर्णपणे स्मरण होणे संभव वाटत नाही. पांडुनंदन! निश्चितच तू अत्यंत श्रद्धाहीन आहेस, तुझी बुद्धियोग्य वाटत नाही. आता मला तो उपदेश जसाच्या तसा पुन्हा सांगणे कठीण आहे, कारण त्या वेळी मी योगयुक्त होऊन परमात्म तत्त्वाचे वर्णन केलेले होते. (अधिक माहितीसाठी संक्षिप्त महाभारताचा दुसरा भाग वाचा.)

विचार करा :– वरील महाभारताच्या लेखांच्या व श्री विष्णुपुराणाच्या लेखांच्या व श्रीमद् भगवत गीता जींच्या लेखांच्या प्रमाणांनी हे सिद्ध झाले आहे की श्री कृष्णजींनी श्रीमद् भगवत गीता चे ज्ञान सांगितलेले नाही, तर ते कालरुपी ब्रह्म (ज्योति निरंजन) अर्थात महाविष्णुजींनी प्रेतवश श्री कृष्णजींच्या शरीरामध्ये प्रविष्ट होऊन सांगितले होते.

अन्य प्रमाण :– १. 'श्री विष्णुपुराण' (गीता प्रेस, गोरखपूर यांच्याकडून प्रकाशित) चतुर्थ अंश, २ ऱ्या अध्यायातील २६ व्या श्लोकात पृष्ठ २३३ वर विष्णु जी (महाविष्णु अर्थात कालरूपी ब्रह्म) यांनी देव व राक्षसांच्या युद्धाच्या वेळी देवतांच्या प्रार्थनेचा स्वीकार करून म्हणाले की मी राजऋषि शशादाचा पुत्र पुरन्ज्य याच्या शरीरामध्ये अंशमात्र अर्थात काही कालाकरिता प्रवेश करून राक्षसांचा नाश करीन.

२. श्री विष्णु पुराण (गीता प्रेस, गोरखपूर यांच्याकडून प्रकाशित) चतुर्थ अंश अध्याय नं. ३ श्लोक ६ मध्ये पृष्ठ २४२ वर श्री विष्णुजींनी गंधर्व व नाग यांच्यामध्ये झालेल्या युद्धात नागांची बाजू घेऊन म्हटले की मी (महाविष्णु अर्थात कालरुपी ब्रह्म) मानधाताचा पुत्र पुरुकुत्स याच्या शरीरामध्ये प्रविष्ट होऊन सर्व दुष्ट गंधर्वांचा नाश करेन.

अन्य प्रमाण :– काही कालानंतर युधिष्ठीराला भयंकर स्वप्ने पडू लागली. श्री कृष्णजींनी सांगितले की 'तू युद्धामध्ये जी पापे केलेली आहेस, तो नरसंहाराचा दोष तुला दु:खदायी होत आहे. यासाठी एक यज्ञ कर.' श्री कृष्णजींच्या मुखकमलातून निघालेले हे वचन ऐकून अर्जुनाला अत्यंत दु:ख झाले. मनातल्या मनात तो विचार करू लागला की पवित्र गीता

सांगतेवेळी भगवान श्री कृष्णजी म्हणत होते की 'अर्जुना, तुला कोणतेही पाप लागणार नाही. तू युद्ध कर (पवित्र गीता अध्याय २ श्लोक ३७, ३८). जरी युद्धामध्ये मरण आले तरी स्वर्गसुख भोगशील किंवा युद्धामध्ये जिंकून पृथ्वीच्या राज्याचा आनंद घेशील.' अर्जुनाने विचार केला की ज्येष्ठ बंधू युधिष्ठीराचे कष्ट निवारण होण्यासाठी, दु:खनिवारणासाठी श्री कृष्णजींनी जो पर्याय सांगितला आहे, त्यात करोडो रुपये व्यर्थ जातील. जर मी श्री कृष्णजींशी वादविवाद करून विचारले की आपण पवित्र गीता चे ज्ञान देताना तर सांगत होता की तुला कोणतेच पाप लागणार नाही. आता त्याच्या विपरीत कसे सांगत आहात? यातून माझ्या ज्येष्ठ बंधूंनी असा विचार करू नये की करोडो रुपये खर्च करण्यास अर्जुन मागेपुढे बघत आहे. माझे कष्ट निवारण्यात त्याला कोणतेही स्वारस्य नाही. यापेक्षा काही न बोलणे उचित समजून त्याने सहर्ष स्वीकृती दिली की 'जसे आपण म्हणाल तसेच होईल.' श्री कृष्णजींनी त्या यज्ञाची तिथी ठरवली. तो यज्ञ देखिल श्री सुदर्शन सुपच यांच्या भोजनाने सफल झाला.

काही काळानंतर ऋषि दुर्वासाजींच्या शापामुळे सर्व यादव कुळाचा विनाश झाला. श्री कृष्ण भगवानांच्या पायाच्या तळव्यावर एका शिकाऱ्याने (जो त्रेतायुगामध्ये सुग्रीवाचा बंधू बाली याचा आत्मा होता.) विषारी बाण मारला, तेव्हा पाच पांडव घटनास्थळी आल्यावर श्री कृष्णजी म्हणाले की ' तुम्ही माझे शिष्य आहात, मी तुमचा धार्मिक गुरू आहे. यासाठी माझी अंतिम आज्ञा ऐका. एक तर ही आज्ञा आहे' की अर्जुना, द्वारिकानगरीत कोणीही पुरुष शिल्लक राहिलेला नाही. त्यामुळे येथील सर्व स्त्रियांना इंद्रप्रस्थला (दिल्ली) घेऊन जा. दुसरे असे की तुम्ही सर्व पांडवांनी राज्याचा त्याग करून हिमालयामध्ये साधना करून शरीराचा त्याग करा. कारण महाभारताच्या युद्धावेळी तुम्ही ज्या हत्या केल्या, त्याचे अत्यंत भयंकर असे पाप तुमच्या शिरावर आहे. त्यावेळी अर्जुन स्वत:ला रोखू शकला नाही. तो म्हणाला, ''प्रभू, आता तुम्ही अशा स्थितीमध्ये आहात की मी अशा गोष्टीची वाच्यता केली नाही पाहिजे, पण प्रभु, जर आज माझ्या शंकेचे समाधान झाले नाही तर मी सुखाने मरूही शकणार नाही. आयुष्यभर मला रडतच राहावे लागेल.'' यावर श्री कृष्णजी म्हणाले की 'हे अर्जुना, तुला जे काय विचारायचे असेल ते तू विचार. आता माझे अंतिम क्षण आहेत.' अश्रुपूर्ण नयनांनी अर्जुन म्हणाला की 'प्रभू, वाईट मानून घेऊ नका. जेव्हा आपण पवित्र गीता चे ज्ञान सांगितले, त्यावेळी मी युद्धाला नकार देत होतो. त्यावेळी तुम्ही म्हटला होता की हे अर्जुना, तुझ्या दोन्ही हातांमध्ये लाडू आहेत. जर युद्धामध्ये मारला गेलास तर स्वर्गप्राप्ती होईल आणि जर विजयी झालास तर पृथ्वीवर राज्य भोगशील व तुला कोणतेही पाप लागणार नाही. आम्ही तर तुमच्याच देखरेखीखाली व आज्ञेनुसार युद्ध केले. (प्रमाण पवित्र गीता अध्याय २ श्लोक ३७, ३८). हे भगवान, आता तर आमच्या एकाही हातामध्ये लाडू राहिलेला नाही. एक तर वीरगती मिळून स्वर्गप्राप्ती झाली नाही आणि आता युद्ध जिंकूनही आपण राज्याचा त्याग करण्याचा आदेश देत आहात. त्यामुळे पृथ्वीवर राज्य करण्याचा आनंदही आम्ही भोगू शकलो नाही. असा कपटी व्यवहार करण्यामध्ये आपला काय स्वार्थ होता?' अर्जुनाचे हे बोल ऐकून युधिष्ठीर म्हणाला, ''अर्जुना, भगवान अंतिम घटिका मोजत आहेत आणि अशा स्थितीत तुझा हा शिष्टाचाररहित व्यवहार तुला शोभा देत नाही.'' यावर श्री कृष्णजी म्हणाले की 'अर्जुना, आज मी शेवटच्या घटकेत आहे. तू मला अत्यंत प्रिय आहेस, तरीही आज यातील वास्तविकता सांगतो की अशी कोणती तरी खलनायकासारखी (दुष्ट) आणखी एक शक्ति आहे, जी आपणास यंत्रासारखी नाचवते. मी गीता सांगताना काय बोललो होतो, मला काहीच माहीत नाही, परंतु आता मी जे काही सांगत आहे ते तुझ्या हिताचे आहे.' हे वचन अश्रुयुक्त नयनांनी

सांगून श्री कृष्णजींनी प्राणाचा त्याग केला. यावरून असे सिद्ध होते की पवित्र गीता चे ज्ञान श्री कृष्णजींनी सांगितलेले नाही, तर ते २१ ब्रह्माण्डांचे स्वामी म्हणजेच ब्रह्म (ज्योति निरंजन-काल) यांचे बोल होते. काल (ब्रह्म) कोण आहे, हे जाणण्यासाठी कृपया हयाच पुस्तकातील पृष्ठ २१ पासून ७० पर्यंतचा भाग वाचावा.

श्री कृष्ण सहित सर्व यादवांचा अंतिम संस्कार करुन अर्जुनास सोडुन चारही भाउ इद्रप्रस्थ (दिल्ली) येथे गेले. पाठीमागुन अर्जुन द्वारीकाच्या सर्व स्त्रीयांना घेउन येत होता. रस्त्यात जंगली लोकांनी सर्व गोपिकांना लुटले व काहींना पळवुन नेले तसेच अर्जुनाला पकडुन मारले. अर्जुनाच्या हातात तोच गांडिव धनुष्य होता ज्याने महाभारत युध्दात अगणित हत्या केल्या पण तोही नाही चालला. तेव्हा अर्जुन म्हणाला कि हा श्री कृष्ण खरोखरच खोटारडा व कपटी आहे. जेव्हा युध्दात पाप करावयाचे होते तेव्हा मला शक्ति दिली एक बाण सोडला की शेकडो योद्धे मारले जात होते व आज ती शक़्ती काढुन घेतली, उभे उभे मार खात आहे. ह्या विषयावर पुर्णब्रह्म कबीर साहेब (कविर्देव म्हणतात की श्री कृष्ण खोटारडा व कपटी नव्हता. हा सर्व अत्याचार काल (ज्योती निरंजन) करत आहे. जो पर्यंत ही आत्मा पुर्ण संताच्या (तत्वदर्शी) माध्यमातुन कबीर परमेश्वर (सतपुरुष) यांच्या शरणात येणार नाही तो पर्यंत हा काल असेच कष्ट देत राहणार. संपुर्ण माहीती तत्वज्ञानाने होती. ह्यासाठी काल कोण आहे? हे माहित करण्यासाठी क्रपया ह्याच पुस्तकातील पान संख्या २१ ते ७० पर्यंत वाचा.

विशेष विचार :- या प्रमाणांवरून असे सिद्ध होते की श्रीमद् भगवत गीता चे ज्ञान श्री कृष्णाने सांगितलेले नाही. ते तर श्री कृष्णजींच्या शरीरामध्ये प्रेतवत (भुतासारखा) प्रवेश करून ब्रह्म (काल अर्थात ज्योति निरंजन) यांचे बोल आहेत.

## ''श्रीमद् भगवत गीता सार''

जशी तहानेने व्याकूळ झालेल्याला पाण्याची इच्छा असते, तसा आत्मा युगानुयुगे परमेश्वराचा शोध घेत आहे. परमात्म्यापासून विलग झाल्यापासून जीवात्मा कष्ट झेलत आहे. एखादा करोडपती असो, पृथ्वीपती (सर्व पृथ्वीचा राजा) असो, सुरपती (स्वर्गाचा राजा इंद्र) असो किंवा श्री ब्रह्मा, श्री विष्णु व श्री शिव असे त्रिलोकपती असो, जे सुख पूर्णब्रह्माच्या (सतपुरुष) सतलोकात (ऋतधाम) होते, ते येथे काल (ब्रह्म) प्रभुच्या लोकात नाही. कारण जन्म, मृत्यू किंवा केलेल्या कर्माचे भोग हे मिळतातच. (प्रमाण गीता अध्याय २, श्लोक १२, अध्याय ४, श्लोक ५) म्हणून पवित्र श्रीमद् भगवत गीता चे ज्ञानदाता प्रभुने (काल भगवान) १५ व्या अध्यायातील १ ते ४ श्लोकांत व १८ व्या अध्यायातील ६२ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे, की 'हे अर्जुना, सर्व भावाने त्या परमेश्वराला शरण जा. त्याच्या कृपेनेच तुला परमशांती मिळेल व तू सतलोकास (शाश्वतम् स्थानम्) प्राप्त होशील. त्या परमेश्वराचे तत्त्वज्ञान व भक्तिमार्ग मी (गीता ज्ञानदाता) जाणत नाही. त्या तत्त्वज्ञानास, तत्त्वदर्शी संतांजवळ जाऊन त्यांना दंडवत घाल आणि विनम्र भावाने प्रश्न कर, तेव्हाच ते तत्त्वद्रष्टा संत तुला परमेश्वराचे तत्त्वज्ञान सांगतील. त्यानंतर त्यांच्या सांगितलेल्या भक्तिमार्गावर सर्वस्व भावाने लाग.' (प्रमाण गीता अध्याय ४ था, श्लोक ३४) तत्त्वदर्शी संताची ओळख गीता च्या १५ व्या अध्यायातील पहिल्या श्लोकामध्ये सांगून म्हटले आहे, की हा संसार उलटे लटकलेल्या वृक्षासारखा आहे, ज्याच्या वरच्या बाजूला मुळे व खाली शाखा आहेत. जो या संसाररूपी वृक्षाविषयी जाणतो, तो तत्त्वदर्शी संत आहे. गीता च्या १५ व्या अध्यायातील २ ते ४ श्लोकांमध्ये म्हटले आहे की त्या संसाररूपी वृक्षाच्या तीन गुणरूपी (रजगुण-ब्रह्मा, सतगुण-विष्णु, तमगुण-शिव) या

शाखा आहेत, ज्या स्वर्ग, पाताळ व पृथ्वी या तीन लोकांमध्ये वर व खाली पसरलेल्या आहेत. या संसाररूपी उलटे लटकलेल्या वृक्षाविषयी म्हणजेच सृष्टिच्या रचनेविषयी मी गीता च्या ज्ञानामधून सांगणार नाही. येथे विचार कालातून (गीता ज्ञान) जे ज्ञान मी तुम्हाला सांगत आहे, ते पूर्ण ज्ञान नाही. त्यासाठी गीता च्या ४ थ्या अध्यायातील ३४ व्या श्लोकामध्ये संकेत केलेला आहे, ज्यामध्ये म्हटलेले आहे की पूर्ण ज्ञानासाठी (तत्त्वज्ञान) तत्त्वदर्शी संताजवळ जा. तेच त्याबद्दल सांगतील. मला त्याचे पूर्ण ज्ञान नाही. गीता च्या पंधराव्या अध्यायातील ४ थ्या श्लोकामध्ये म्हटले आहे की तत्त्वदर्शी संताच्या प्राप्तीनंतरच त्या परमपद परमेश्वराचा, ज्या पूर्ण परमात्म्याच्या उलट्या संसाररूपी वृक्षाची प्रवृत्ती विस्तारत गेलेली आहे, (ज्याच्याविषयी गीता च्या १८ व्या अध्यायातील ६२ व्या श्लोकामध्ये म्हटलेले आहे.) त्याचा शोध घेतला पाहिजे. तेथे गेल्यानंतर साधक पुन्हा परत येत नाही, म्हणजेच त्याला पूर्ण मोक्ष प्राप्त होतो. भावार्थ असा आहे की ज्या परमेश्वराने सर्व ब्रह्माण्डाची रचना केलेली आहे, तो मी (गीता ज्ञानदाता ब्रह्म) स्वतः देखिल आदिपुरुष परमेश्वर म्हणजेच पूर्ण परमात्म्याला शरण आहे. त्याची साधना केल्याने अनादी मोक्ष (पूर्ण मोक्ष) प्राप्त होतो.


तत्त्वदर्शी संत तोच आहे, जो वर मूळ व खाली तीन गुणरूपी (रजगुण-ब्रह्मा जी, सतगुण-विष्णु जी व तमगुण-शिव जी) शाखा व खोड यांची पूर्ण माहिती देतो. (कृपया उलटे लटकलेले संसाररूपी वृक्षाचे चित्र पाहा.)

स्वतः रचलेल्या सृष्टिचे पूर्णज्ञान (तत्त्वज्ञान) स्वतःच पूर्ण परमात्मा कविर्देव (कबीर परमेश्वर) यांनी तत्त्वदर्शी संताची भूमिका घेऊन (कविगीर्भि:) कबीर वाणीद्वारे सांगितलेली आहे. (प्रमाण :- ऋग्वेद मंडल ९, सुक्त ९६, मंत्र १६ ते २० पर्यंत व ऋग्वेद मंडल १०, सुक्त ९०, मंत्र १ ते ५ व अथर्ववेद काण्ड ४, अनुवाक १, मंत्र १ ते ७ मध्ये.)

कबीर, अक्षर पुरुष एक पेड है, ज्योति निरंजन वाकी डार।<br>
तीनो देवा शाखा हैं, पात रूप संसार ।।

पवित्र गीता मध्ये देखिल तीन प्रभु (क्षर पुरुष अर्थात ब्रह्म, अक्षर पुरुष अर्थात परब्रह्म व परम अक्षर पुरुष अर्थात पूर्णब्रह्म) यांच्या विषयी वर्णन आलेले आहे. प्रमाण गीता तील पंधराव्या अध्यायातील १६ व १७ वा श्लोक, ८ व्या अध्यायातील पहिल्या श्लोकाचे उत्तर ३ ऱ्या श्लोकामध्ये आहे की ते परमअक्षर ब्रह्म आहे. तीन प्रभुंचे आणखी एक प्रमाण गीता च्या ७ व्या अध्यायातील २५ व्या श्लोकामध्ये गीता ज्ञानदाता काल (ब्रह्म) यांनी आपल्याविषयी म्हटले आहे की मी अव्यक्त आहे. हा झाला प्रथम अव्यक्त प्रभु. नंतर गीता च्या आठव्या अध्यायातील १८ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की 'हे जगत दिवसा अव्यक्तापासून (परब्रह्म) निर्माण झाले आहे. नंतर रात्रीच्या वेळी त्यामध्ये लीन होऊन जाते.' हे झाले दुसरे अव्यक्त. ८ व्या अध्यायातील २० व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की त्या अव्यक्तापेक्षाही दुसरे जे अव्यक्त (पूर्ण ब्रह्म) आहे, तो परम दिव्य पुरुष सर्व प्राणी नष्ट झाले तरीही नष्ट होत नाही. हेच प्रमाण गीता च्या २ ऱ्या अध्यायातील १७ व्या श्लोकामध्येही आहे की 'नाशरहित त्या परमात्म्याला जाणून घ्या, ज्याचा नाश करण्यास कोणीही समर्थ नाही.' आपल्याविषयी गीता ज्ञानदाता (ब्रह्म) प्रभुने ४ थ्या अध्यायातील ५ वा श्लोक व २ ऱ्या अध्यायातील १२ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की 'मी तर जन्म-मृत्यूमध्ये आहे म्हणजेच नाशवान आहे.'

या जगतरूपी वृक्षाचे मूळ तर परम अक्षर पुरुष म्हणजेच पूर्णब्रह्म 'कविर्देव' आहे. त्यालाच ३ रा अव्यक्त प्रभु म्हटले आहे. वृक्षाच्या मूळापासूनच सर्व वृक्षाला आहार मिळतो.




वरती मूळ (जड) खाली शाखा (फांद्या) वाला उलटा लटकलेला संसार रुपी झाडाचे चित्र

यासाठी गीता च्या १५ व्या अध्यायातील १७ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की वास्तविक परमात्मा हा क्षर पुरुष म्हणजेच ब्रह्म व अक्षर पुरुष म्हणजेच परब्रह्म यांच्यापेक्षाही वेगळाच आहे, जो तिन्ही लोकांमध्ये प्रवेश करून सर्वांचे पालनपोषण करतो आणि तोच वास्तवामध्ये अविनाशी आहे.

१. क्षर याचा अर्थ आहे नाशवान, कारण ब्रह्म अर्थात गीता ज्ञानदात्याने स्वतः म्हटले आहे की 'अर्जुना, तू आणि मी तर जन्म-मृत्यूमध्ये आहे.' (प्रमाण गीता अध्याय २, श्लोक १२, अध्याय ४ श्लोक ५ मध्ये)

२. अक्षर याचा अर्थ आहे अविनाशी. येथे परब्रह्मालाही स्थायी म्हणजेच अविनाशी म्हटलेले आहे, परंतु हा देखिल वास्तवामध्ये अविनाशी नाही, जसा एक मातीचा पांढऱ्या रंगाचा कप आहे, जो चहा पिण्याच्या कामी येतो, पण तो खाली पडताच फुटतो. अशीच स्थिती ब्रह्म (काल अर्थात क्षर पुरुष) यांची समजा. दुसरा पेला स्टीलचा आहे, जो मातीच्या कपाच्या तुलनेत अधिक स्थायी (अविनाशी) वाटतो, परंतु काही कालानंतर त्यालाही गंज लागतो व नष्ट होतो. त्यामुळे वास्तवामध्ये हा देखिल अविनाशी नाही. तिसरा ग्लास सोन्याचा आहे. सोने हा धातू वास्तवामध्ये अविनाशी आहे, ज्याचा नाश होत नाही.

जसे परब्रह्मास (अक्षर पुरुष) अविनाशी म्हटलेले आहे आणि वास्तवामध्ये अविनाशी तर या दोहोंहून अन्य आहे. त्यामुळे अक्षर पुरुषास अविनाशी देखिल म्हटलेले नाही. कारण :- सात रजगुण ब्रह्मांच्या मृत्यूनंतर एका सतगुण विष्णुचा मृत्यू होतो. सात सतगुण विष्णुंच्या मृत्यूनंतर एका तमगुण शिवाचा मृत्यू होतो. जेव्हा तमगुण शिवाचा ७० हजार वेळा मृत्यू होतो, तेव्हा एका क्षर पुरुषाचा (ब्रह्म) मृत्यू होतो. हे परब्रह्माचे (अक्षर पुरुष) एक युग असते. अशा एक हजार युगांचा परबह्माचा एक दिवस व एवढ्याच रात्री होतात. तीस दिवस-रात्रीचा एक महिना, बारा महिन्यांचे एक वर्ष व शंभर वर्षांचे परब्रह्म अक्षर पुरुषाचे आयुष्य असते. तेव्हा हे परब्रह्म व सर्व ब्रह्माण्ड जे सतलोकाच्या खाली आहे, ते सर्व नष्ट होते. काही कालानंतर खालील सर्व ब्रह्माण्डांची (ब्रह्म व परब्रह्म यांच्या लोकांची) रचना पूर्णब्रह्म अर्थात परम अक्षर पुरुष करतो. अशाप्रकारे हे तत्त्वज्ञान समजायचे आहे, परंतु परम अक्षर पुरुष अर्थात पूर्णब्रह्म (सतपुरुष) व त्याचे सतलोकासहित (ऋतधाम) वरच्या भागातील अलखलोक, अगमलोक व अनामीलोक कधीही नष्ट होत नाहीत.

यासाठी गीता च्या १५ व्या अध्यायातील १७ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की वास्तवामध्ये उत्तम प्रभु म्हणजेच पुरुषोत्तम तर ब्रह्म (क्षर पुरुष) तसेच परब्रह्म (अक्षर पुरुष) यांच्यापेक्षा वेगळाच आहे, जे पूर्णब्रह्म (परम अक्षर पुरुष) आहे आणि तेच वास्तव अविनाशी आहेत. तेच सर्वांचे पालनपोषण करणारे जगतरूपी वृक्षाचे मूळरूपी पूर्ण परमात्मा आहेत. वृक्षाचा जो भाग जमिनीच्या लगेच बाहेर नजरेत येतो, ज्याला खोड म्हणून संबोधले जाते. त्यास अक्षर पुरुष (परब्रह्म) समजा. खोडालाही आहार (पोषण) मुळापासून (जड) प्राप्त होतो. नंतर खोडापासून पुढे वृक्षाच्या कित्येक फांद्या असतात. त्यामधील एक फांदी ब्रह्म (क्षर पुरुष) आहे. त्यालाही पोषण (आहार) मुळापासून प्राप्त होते. त्या फांदीच्या (क्षर पुरुष/ब्रह्म) तीन गुणरूपी (रजगुण-ब्रह्मा, सतगुण-विष्णु व तमगुण शिव) शाखा (लहान फांद्या) आहेत. यांनाही आहार (पोषण) मुळापासून (परम अक्षर पुरुष अर्थात पूर्णब्रह्म) प्राप्त होतो. या तीन शाखांपासून पर्णरुपामध्ये अन्य प्राणी आश्रित आहेत. त्यांनाही आहार (पोषण) मुळापासून (परम अक्षर पुरुष अर्थात पूर्णब्रह्म) प्राप्त होतो. त्यामुळे सर्वांना पूज्य असा पूर्ण परमात्माच आहे, हे सिद्ध होते. असे देखिल म्हणता येत नाही की पानांपर्यंत आहार पोहोचविण्यात खोड,

मोठी फांदी व फांदीच्या शाखा यांचे काहीच योगदान नाही. यामुळे सर्वच आदरणीय आहेत, परंतु पुजनीय मात्र केवळ मूळच (परम अक्षर पुरुष म्हणजेच पूर्ण ब्रह्म) आहे. आदर व पूजा यामध्ये अंतर आहे. जसे मोठ्या दिराचा मोठ्या भावासारखा, लहान दिराचा लहान भावासारखा असा सर्वांचा पतिव्रता स्त्री सत्कार करते, आदर करते, परंतु पूजा मात्र फक्त आपल्या पतीचीच करते. म्हणजेच जे भाव आपल्या पतीबद्दल तिच्या मनात असतात, तसे अन्य पुरुषांबद्दल असू शकत नाहीत.

दुसरे एक उदाहरण– एकदा हरियाना प्रांतामध्ये पूर आला होता. त्यावेळी सहाशे कोटी रुपयांचे नुकसान झाले होते. त्याची भरपाई हरियाना सरकार करू शकत नव्हते. कारण हरियाना सरकारचा वार्षिक अर्थसंकल्पच नऊशे कोटी रुपयांचा होता. देशाच्या प्रधानमंत्र्यांनी अर्थसाह्यातून ती नुकसानभरपाई दिली होती. त्या सहाशे कोटी रुपयांचे वितरण हरियाना सरकारच्या अधिकारी–कर्मचाऱ्यांनी केले होते. याबद्दल ज्यांना मदत मिळाली त्यांना काहीच ज्ञान नाही. ते त्या वितरणकर्त्यालाच मदतकर्ता मानतात. ते त्यांच्याकडून भविष्यामध्येही अशा मदतीची आशा करत राहतात, ते त्यांची पूजा (लाच देणे आदी प्रकारांतून) करत बसतात. यात कर्मचाऱ्यांचे किती योगदान आहे, हे सुशिक्षित मात्र जाणतात. ते त्यांचा आदर करतात, परंतु पूजा मात्र (लाच देणे) करत नाहीत किंवा अन्य कार्यसिद्धीची त्यांच्याकडून अपेक्षाही करत नाहीत.

पूर निधीच्या वितरणानंतर त्या क्षेत्रामध्ये प्रांताचे मंत्री आले. त्यांनी सांगितले, की, 'मी आपल्या क्षेत्रासाठी दहा लाख रुपये दिले. रामअवतारला दहा हजार रुपये...' अशी त्यांनी गावातील यादी वाचून दाखवली. नंतर त्या भागाचे मुख्यमंत्री त्या गावी आले. त्यांनीही तीच यादी वाचून दाखवली आणि म्हणाले की मी आपल्या गावासाठी दहा लाख रुपये दिले. त्यानंतर गावात देशाचे प्रधानमंत्री आले. त्यांनीही मी आपल्या गावास दहा लाख रुपये दिले असे सांगून तीच यादी वाचून दाखवली, जिच्यात लिहिले होते की रामअवतार यांना दहा हजार रुपये दिले. रामअवतार म्हणत होता की हे सगळे खोटे बोलत आहेत. मला तर पटवाऱ्याने म्हणजेच अधिकाऱ्याने पैसे दिले आहेत. तो अज्ञानी रामअवतार अज्ञानामुळे गावच्या अधिकाऱ्यांची पूजा करून आपल्या अन्य सर्व कार्यांची सिद्धी इच्छितो. जे शिक्षित आहे ते जाणतात की प्रधानमंत्र्यांनी मदत दिली नसती, तर मुख्यमंत्री, मंत्री व अधिकारी काहीच देऊ शकले नसते. जर मुख्यमंत्र्यांनी आपल्या कोट्यातून मदत दिली असती, तर पूरग्रस्तांना जास्तीत जास्त शंभर–शंभर रुपये मिळू शकले असते, जे नाममात्रच असते. अशाप्रकारे समजदार व्यक्ति हे जाणते की कोणाची किती पात्रता (क्षमता) आहे. त्या प्रमाणातच त्यांच्यामध्ये आस्था असते. त्यांना अनादरणीय कोणीच नसते, परंतु पूजेसाठी मात्र विचार करूनच पाऊल उचलतात. अशाच प्रकारे गीता च्या दुसऱ्या अध्याय तील ४६ व्या श्लोकात म्हटले आहे की 'हे अर्जुना, अत्यंत विशाल जलाशयाच्या (ज्याच्यातील पाणी दहा वर्षे पाऊस पडला नाही, तरीही समाप्त होत नाही.) प्राप्तीनंतरही लहान जलाशयामध्ये (ज्याचे पाणी एखाद्या वर्षी पाऊस पडला नाही तरी समाप्त होते.) जशी आस्था राहते, तशीच पूर्ण परमात्म्याच्या प्राप्तीच्या लाभाचे ज्ञान परिचित झाल्यानंतरही तुझी आस्था अन्य प्रभुंमध्ये तशीच राहून जाईल.' त्या लहानशा जलाशयाबद्दल आपले वाईट मत होत नाही, परंतु त्याची क्षमता म्हणजे काम चालवण्याइतकाच तो उपयुक्त आहे, हे आपल्या लक्षात येते.

गीता च्या ७ व्या अध्यायातील १२ ते १५ श्लोकांमध्ये म्हटले आहे की तीन गुणांमुळे जे काही होत आहे, (जसे रजगुण–ब्रह्मापासून जीवांची उत्पत्ती, सतगुण–विष्णुपासून स्थिती

व तमगुण–शिवापासून संहार) त्याचे मुख्य कारण मीच (ब्रह्म–काल) आहे. जे साधक तीन गुणांची (रजगुण–ब्रह्मा, सतगुण–विष्णु, तमगुण–शिव) पूजा करतात, ते राक्षस स्वभाव धारण केलेले, मानव जातीत नीच, दुष्कर्म करणारे मूर्ख माझी, या ब्रह्मची भक्ति देखिल करत नाहीत. त्यानंतर आपल्या भक्तिलाही अतिनीच (अनुत्तमाम) म्हटलेले आहे. गीता च्या ७ व्या अध्यायातील १८ वा श्लोक, तसेच १५ व्या अध्यायातील ४ था श्लोक व १८ व्या अध्यायातील ६२ व्या श्लोकामध्ये म्हटलेले आहे की पूर्ण परमात्म्याची भक्ती केल्यानेच पूर्ण लाभ, पूर्ण मोक्ष प्राप्त होतो, जी शास्त्रविधीनुसार भक्ती आहे व अन्य प्रभुंची इष्ट रूपामध्ये साधना शास्त्रविधीविरुद्ध असल्याने व्यर्थ आहे. (प्रमाण गीता अध्याय १६ श्लोक २३,२४ मध्ये).

जसे आंब्याचे रोप नर्सरीतून आणून त्याचे मूळ जमिनीत खड्डा खोदून गाडले. त्यानंतर मुळाला (पाणी घालून इत्यादी) पूजा केली, तर ते रोप मोठा वृक्ष बनेल. नंतर त्याच्या फांद्यांना फळे लागतील. जर एखाद्याने फांद्या जमिनीमध्ये गाडून मूळ वर केले आणि रोपास पाणी घालत असेल, तर ते रोप सुकून जाईल. (कृपया सरळ लावलेल्या व उलटे लावलेल्या भक्तिरूपी रोपाचे चित्र ह्याच पुस्तकाच्या पृष्ठ नं. २०१ व २०२ वर पाहा.)

भावार्थ असा की साधकाने पूर्ण परमात्म्याची (मूळ) साधना (पूजा) इष्ट रूपामध्ये केली, तर त्याचे फळ तिघेही ब्रह्मा, विष्णू, शिवच (या फांद्या) प्रदान करतील. कारण हे भगवान केलेल्या कर्माचे फळ जसे आहे तसेच देतात.

जर आपणाला एखाद्या कंपनीमध्ये नोकरी मिळवायची असेल, तर कंपनीच्या (फॅक्टरी) मालकाची पूजा करायला हवी. प्रार्थनापत्राद्वारे याचना करून नोकरी मिळवावी लागते, पण नोकरी (पूजा) मालकाचीच करायची असते. जे काम त्या नोकरास सांगितले जाते, ते तो आपल्या सेवाकाळात करतो. ही मालकाचीच पूजा (नोकरी) झाली. नोकरीचा (पूजा) पगार त्या मालकाचे अन्य नोकर (कर्मचारी किंवा अधिकारी) शिफ्ट ऑफिसर व कॅशिअर देतात. ते केवळ त्यांना दिलेले कर्मच करतात. त्यामध्ये कोणतेच परिवर्तन करू शकत नाहीत. ते तुमच्या पगारात एक रुपयाही वाढवू शकत नाहीत अथवा कमी करू शकत नाहीत. जर तो कंपनीच्या मालकाचा नोकर (पुजारी) पवित्र नीतीने नोकरी (पूजा) करत असेल, तर मालकच त्याच्या सेवेच्या धनराशीमध्ये वृद्धी करतो किंवा वरून वेगळी बक्षीसरूपी धनराशी अधिक देतो. जर कोणी मालकाची नोकरी (पूजा त्यागून) अन्य अधिकाऱ्याची नोकरी (पूजा) करू लागला, तर त्याला मालकाकडून मिळणारा धनलाभ बंद होतो, ज्यामुळे तो अज्ञानी निर्धन होतो. अधिकारी त्यास तेवढा सेवेचा पगार देऊ शकत नाहीत. फॅक्टरी मालकाच्या तुलनेमध्ये अत्यंत कमी सुविधा मिळल्यामुळे अन्य अधिकाऱ्यांचा सेवक अर्थात एका मालकाचा त्याग करून दुसऱ्याचीच उपासना करतो तो महादु:खी होऊन जातो. कृपया अशाप्रकारे तत्त्वज्ञानाच्या आधाराने पवित्र श्रीमद् भगवत गीता तील ज्ञान समजून घ्या.

पूर्णब्रह्म कूळ मालक, स्वामी यांच्या पूजेचा त्याग करून अन्य देवतांची पूजा करण्याने साधकास पूर्ण लाभ प्राप्त होत नाही, तर साधक साधना करून करून महाकष्ट सहन करत राहतो.

यासाठी पवित्र गीता च्या ७ व्या अध्यायातील श्लोक १२ ते १५ व २० ते २३ पर्यंत तीन गुण अर्थात तीन देवतांची (रजगुण–ब्रह्मा, सतगुण–विष्णु व तमगुण–शिव) पूजा करणारे राक्षस स्वभाव धारण केलेले, मनुष्यांमध्ये नीच, दुष्कर्म करणारे मूर्ख म्हटले गेलेले आहेत,

कारण ते माझी (ब्रह्म–क्षर पुरुष) अर्थात फॅक्टरीचा मालकाच्या शिफ्ट ऑफिसरची पूजा (नोकरी) करत नाहीत. भावार्थ असा की जे तीन देवता व अन्य देवतांची पूजा करतात, (कॅशिअर असणाऱ्याची नोकरी करतात.) त्यांना मूर्ख व राक्षस स्वभावाचे राक्षस म्हटले आहे. जसे ज्या व्यक्तीची मिळकत कमी असते, ती काही तरी अफरातफर अवश्य करणारच. तो कधी तरी चोरी अथवा भेसळ आदी छळ–कपटाचा मार्ग स्वीकारतो, ज्यामुळे समाजात निकृष्ट मानला जातो व दरिद्री बनतो. अशाप्रकारे तीन देवतांची पूजा करण्याने पूर्ण लाभ प्राप्त होत नाही. ज्या कारणाने साधक कपट व अन्य विकारही करत राहतो. नंतर पाप कर्माचा दंड देखिल भोगावा लागतो. म्हणून ब्रह्म अर्थात क्षर पुरुष (शिफ्ट ऑफिसर) म्हणत आहे की हे अज्ञानी साधक माझी पूजा देखिल (नोकरी) करत नाहीत. मी या ब्रह्मा, विष्णु व शिव यांच्यापेक्षाही अधिक सेवाधन पगार (केलेल्या कर्माचे धन) देऊ शकतो, जे बाकीच्या प्रभुंच्या सेवाधनापेक्षा जास्त आहे. नंतर गीता च्या ७ व्या अध्यायातील १८ व्या श्लोकात म्हटलेले आहे की 'माझी पूजा देखिल (नोकरी) पूर्ण लाभदायक नाही.' यासाठी आपल्या पूजेलाही गीता ज्ञानदात्या (ब्रह्म/क्षर पुरुष) प्रभुने (अनुत्तमाम्) अतिनीच अर्थात अति खालच्या स्तराची म्हटले आहे. यासाठी गीता च्या १५ व्या अध्यायातील ४ था श्लोक व १८ व्या अध्यायातील ६२ व्या श्लोकामध्ये म्हटलेले आहे की त्या परमेश्वराला शरण जा, ज्यांच्या कृपेने तुला परमशांती व सतलोक (शाश्वत स्थान) प्राप्त होईल. तेथे गेल्यानंतर साधकाचा पुनर्जन्म होत नाही. अर्थात, अनादि मोक्ष (पूर्ण मोक्ष) प्राप्त होतो. गीता ज्ञानदाता प्रभु (क्षर पुरुष/ब्रह्म) म्हणत आहे की 'मी देखिल त्याच आदिपुरुष परमेश्वरालाच शरण आहे.' गीता च्या ७ व्या अध्यायातील १२ ते १५, १८ व २० ते २३ श्लोक समजण्यासाठी कृपया खालील विवरण ध्यानपूर्वक वाचा.

## ''तीन गुण काय आहेत? प्रमाणासहित''

'तीन गुण रजगुण ब्रह्मा जी, सतगुण विष्णु जी, तमगुण शिव जी हे आहेत. ब्रह्म (काल) व प्रकृति (दुर्गा) यांच्यापासून ते उत्पन्न झालेले आहेत व ते तिन्हीही नाशवान आहेत.'

प्रमाण :– गीता प्रेस, गोरखपूर यांच्याकडून प्रकाशित 'श्री शिव महापुराण' ज्याचे संपादक आहेत श्री हनुमान प्रसाद पोद्दार, पृष्ठ संख्या ११०, अध्याय ९, रुद्रसंहिता. अशाप्रकारे 'ब्रह्मा, विष्णु व शिव या तिन्ही देवतांमध्ये गुण आहेत, परंतु शिव (ब्रह्म–काल) गुणातीत म्हटला गेलेला आहे.'

दुसरे प्रमाण :– गीता प्रेस गोरखपूर यांच्याकडून प्रकाशित 'श्रीमद् देवी भागवत पुराण' ज्याचे संपादक आहेत श्री हनुमान प्रसाद पोद्दार, चिमनलाल गोस्वामी. याच्या ३ ऱ्या स्कंदातील ५ व्या अध्यायातील १२३ व्या पानावर भगवान विष्णुंनी दुर्गेची स्तुती करताना म्हटले आहे की 'मी (भगवान विष्णु), ब्रह्मा व शंकर यांचे अस्तित्व तुझ्याच कृपेने आहे. आमचा तर अविर्भाव (जन्म) व तिरोभाव (मृत्यू) होतो. आम्ही नित्य (अविनाशी) नाही. तूच नित्य आहेस, जगतजननी आहेस, प्रकृति आणि सनातनी देवी आहेस.' भगवान शंकर म्हणतात, की 'जर भगवान ब्रह्मा व भगवान विष्णु तुझ्यापासून उत्पन्न झालेले आहेत, तर त्यांच्यानंतर उत्पन्न होणारा मी तमगुणी लीला करणारा शंकर तुझीच संतान झाली नाही काय? अर्थात मलाही उत्पन्न करणारी तूच आहेस. या जगताच्या सृष्टि–स्थिती–संहारामध्ये तुझे गुण सदासर्वदा आहेत. याच तीन गुणांनी उत्पन्न आम्ही ब्रह्मा, विष्णु व शंकर नियमानुसार कार्यतत्पर राहतो.

हे विवरण केवळ हिंदीमध्ये अनुवादित श्री देवी महापुराणामधील आहे, ज्यामध्ये काही

**तथ्ये लपविलेली आहेत. यासाठी श्रीमद् देवी भागवत महापुराण सभाषटिकम् समहात्यम्, खेमराज श्री कृष्णदास प्रकाशन, मुंबई यामध्ये संस्कृतसहित हिंदी अनुवाद केलेला आहे हेच प्रमाण पाहावे. तिसऱ्या स्कंदातील चौथा अध्यायातील पान १० वर ४२ वा श्लोक.**

ब्रह्मा – अहम् महेश्वरः फिल ते प्रभवात्सर्वे वयं जनि युता न यदा तू नित्योः के अन्ये सुराः शतमख प्रमुखाः च नित्या नित्या त्वमेव जननी प्रकृतिः पुराणा (४२) ।

**मराठी अनुवाद :– (विष्णु जी म्हणतात) की हे माते!, ब्रह्मा, मी व शिव तुझ्याच प्रभावाने जन्मलो आहोत. आम्ही नित्य नाही अर्थात अविनाशी नाही. मग अन्य इंद्रादी दुसरे देव कसे नित्य असू शकतील? तूच अविनाशी आहेस. आमच्या सर्वांची जननी अर्थात उत्पन्न करणारी माता प्रकृति व सनातन देवी तूच आहेस. (४२)**

**पृष्ठ ११–१२, अध्याय ५ श्लोक ८ :–** यदि दयार्द्रमना न सदांऽ बिके कथमहं विहितः च तमगुणः कमलजश्च रजगुणसंभवः सुविहितः किमु सत्त्वगुणोंहरिः ।(८)

**अनुवाद :– भगवान शंकर म्हणाले की 'हे माते, जर आमच्यावर तू दयायुक्त आहेस, तर मला तमगुणयुक्त का बनविलेस? कमलातून उत्पन्न झालेल्या ब्रह्मास रजगुणी का बनविलेस व विष्णुस सतगुणी का बनविलेस? म्हणजेच जीवांना जन्म–मृत्युरूपी दुष्कर्मांमध्ये का लावलेस?'**

**श्लोक १२ :–** रमयसे स्वपतिं पुरुषं सदा तव गतिं न हि विह विद्म शिवे (१२)

**मराठी अनुवाद :– आपला पती पुरुष अर्थात काल भगवानासोबत सदा भोगविलास करत राहतेस. तुझी गती कोणीही जाणत नाही.**

**तिसरा स्कंद पृष्ठ १४, अध्याय ५ श्लोक ४३ :–** एकमेवा द्वितीयं यत ब्रह्म वेदा वदंति वै। सा किंत्वम् वा प्यसौ वा किं संदेह विनिवर्तय (४३)

**अनुवाद :– वेदांमध्ये अद्वितीय केवळ एक पूर्णब्रह्म जो म्हटला आहे, तो तूच आहेस की कोणी दुसरा आहे? माझ्या या शंकेचे निवारण करावे. ब्रह्मा जींच्या प्रार्थनेवर देवी म्हणाली :–**

देव्युवाच सदैकत्वं न भेदो ऽस्ति सर्वदैव ममास्य।।यो सौ सा हमहं यो सौ भेदो स्ति मतिविभ्रमात् ।।२।।आवयोरंतरं सूक्ष्मं यो वेद मतिमान्हि सः ।।विमुक्तः स तू संसारान्मुच्यते नात्र संशयः ।।३।।

**अनुवाद – देवी ने म्हटले :– हे जे आहे ते मी आहे आणि जे मी आहे ते हे आहे. मतीचा विभ्रम झाल्याने भेद भासत आहे. ।।२।।आम्हा दोघांमधले जे सूक्ष्म अंतर आहे, ते जो जाणतो तोच मतिमान अर्थात तत्त्वदर्शी आहे. तो जगतापासून पृथक (वेगळा) होऊन मुक्त होतो, यामध्ये संदेह नाही. ।।३।।**

सुमरणाद्दर्शनं तुभ्यं दास्ये हं विषमे स्तिथे ।।स्वर्तव्या ऽहं सदा देवाः परमात्मा सनातनः ।।८०।।उभयोः सुमरणादेवकार्यसिद्धिर संशयम्।।ब्रह्मेवाच।।इत्यक्त्वा विससर्जास्मान्द त्वा सक्ति–सुसंस्कृतान् ।।८१।।विष्मवे थ महालक्ष्मी महाकालीं शिवाय च ।।महासरस्वतीं मह्यं स्थानात्तस्माद्विसर्जिताः ।।८२।।

**भाषांतर :– हे देवतांनो, संकट आल्यानंतर सुमरणानेच (नामजपाने) मी तुम्हाला दर्शन देईन. सनातन देवाच्या शक्तिरूपाने माझे सदा सुमरण करा. ।।८०।।दोघांच्या सुमरणाने अवश्य कार्यसिद्धी होईल. ब्रह्मा जी म्हणाले की अशाप्रकारे संस्कार करून शक्ती देऊन आम्हाला देवीने पाठवले. ।।८१।।विष्णुंच्या निमित्ताने महालक्ष्मी, शिवांच्या निमित्ताने महाकाली आणि मला**

महासरस्वती देऊन पाठवले. ।।८२।।

मम चैव शरीरं वै सुत्रमित्यभिधीयते।।स्थूलं शरीरं वक्ष्यामि ब्रह्मण: परमात्मन: ।।८३।।

भाषांतर :- 'माझे शरीर सूत्ररूप म्हटले जाते. परमात्मा ब्रह्माचे स्थूल शरीर म्हटले आहे.' ।।८३।।

## ''वरील पुराणवाक्यांचे सार''

यावरून हे स्पष्ट होते की श्री ब्रह्मा जी रजगुण आहेत, श्री विष्णु जी सतगुण आहेत व श्री शिव जी तमगुण आहेत. हे तिन्ही प्रभु नाशवान आहेत व त्यांचा जन्म-मृत्यू होतो. दुर्गा देवीस प्रकृति देखिल म्हटले जाते. दुर्गेचा पती ब्रह्म (क्षर पुरुष/काल) आहे. ती त्यांच्यासोबत पती-पत्नी व्यवहार (रमण/विलास) करत राहते. दुर्गा व ब्रह्म दोन्ही स्थूल शरीरामध्ये आकारमान आहेत.

हेच प्रमाण गीता च्या चौदाव्या अध्यायातील ३ ते ५ श्लोकांमध्ये आहे. गीता ज्ञानदाता ब्रह्म (क्षर पुरुष/काल) म्हणत आहे की 'प्रकृति (दुर्गा) तर माझी पत्नी आहे. मी तिच्या योनीमध्ये (गर्भाधान स्थान) बीजाची स्थापना करतो, ज्यामुळे सर्व प्राण्यांची उत्पत्ती होते. मी सर्वांचा (२१ ब्रह्माण्डांतील प्राणी) पिता आहे व प्रकृति (दुर्गा/अष्टांगी) या सर्वांची माता आहे.' याच दुर्गेपासून (प्रकृति/अष्टांगी) उत्पन्न झालेले तिन्ही गुण (रजगुण- ब्रह्मा, सतगुण- विष्णु व तमगुण- शिव) अन्य प्राण्यांना कर्माच्या बंधनामध्ये बांधतात.

### ।।त्रिगुण माया (रजगुण ब्रह्मा जी, सतगुण विष्णु जी तसेच तमगुण शिव जी) जीवांना मुक्त होऊ देत नाहीत. ।।

पवित्र गीता च्या सातव्या अध्यायातील पहिल्या व दुसऱ्या श्लोकामध्ये ब्रह्म म्हणत आहे की 'हे अर्जुना, आता तुला ते ज्ञान ऐकवतो, जे जाणल्यानंतर दुसरे काही जाणून घ्यायचे शिल्लक राहत नाही.'

पवित्र गीता च्या सातव्या अध्यायातील पहिल्या व दुसऱ्या श्लोकांमध्ये गीता ज्ञानदाता ब्रह्म (क्षर पुरुष/काल) म्हणत आहे की तीन गुणांनी जे काही होत आहे, ते माझ्यापासूनच झालेले आहे असे समज. रजगुणांपासून (ब्रह्मा) उत्पत्ती, सतगुणांपासून (विष्णू) पालनपोषण स्थिती व तमगुणांपासून (शिव) प्रलय (संहार) होत आहे याचे कारण काल भगवान हेच आहे. त्यानंतर म्हटले आहे की मी यांच्यामध्ये नाही. कारण काल (ब्रह्म) अत्यंत दूर (एकविसाव्या ब्रह्माण्डामध्ये निज (स्वत:च्या) लोकामध्ये वास्तव्य करतो.) आहे, परंतु मनाच्या रूपामध्ये कालच मौजमजा करतो आहे आणि रिमोटने सर्व प्राणिमात्रांना व ब्रह्मा जी, श्री विष्णु जी व श्री शिव जी यांना यंत्रासारखा चालवतो आहे. गीता सांगणारा ब्रह्म म्हणत आहे की 'माझ्या एकवीस ब्रह्माण्डांतील प्राण्यांना माझ्या पूजेपासूनच शास्त्रास अनुकूल साधनेचा प्रारंभ होतो, जिचे वेदांमध्ये वर्णन केलेले आहे. माझ्या अखत्यारित जेवढे प्राणी आहेत, त्यांची बुद्धी माझ्या हातामध्ये आहे. मी केवळ एकवीस ब्रह्माण्डांचा मालक (स्वामी) आहे. त्यामुळे (गीता अध्याय ७ श्लोक १२ ते १५ पर्यंत) जे या तिन्ही गुणांपासून (रजगुण-ब्रह्मापासून जीवांची उत्पत्ती, सतगुण-विष्णुजींपासून स्थिती व तमगुण- शिव जीपासून संहार) जे काही होत आहे, त्याचे मुख्य कारण मीच (ब्रह्म/काल) आहे. (कारण कालास एक लाख मानव शरीरधारी प्राण्यांचे शरीर मारून मळ खाण्याचा शाप लागलेला आहे.) जे साधक माझी (ब्रह्म/काल) साधना न करता त्रिगुणमयी मायेची (रजगुण-ब्रह्मा जी, सतगुण-विष्णु जी, तमगुण-शिव जी) साधना

करून क्षणिक लाभ मिळवतात, ज्यामुळे ते जास्त कष्ट सहन करतात. त्यासोबतच असा संकेत दिला आहे की यापेक्षा जास्त लाभ मी (ब्रह्म/काल) देऊ शकतो, परंतु हे मूर्ख साधक तत्त्वज्ञानाच्या अभावाने याच तीन गुणांपर्यंतची (रजगुण-ब्रह्मा जी, सतगुण-विष्णु जी, तमगुण-शिव जी) साधना करत राहतात. त्यांची बुद्धी याच तिन्ही प्रभुंपर्यंत सीमित आहे. यामुळे हे राक्षस स्वभाव धारण केलेले, मनुष्यांमध्ये नीच, शास्त्राविरुद्ध साधनारूपी दुष्कर्म करणारे, मूर्ख मला (ब्रह्म/काल) भजत/पूजत नाहीत.' याचेच प्रमाण गीता च्या १६ व्या अध्यायातील ४ ते २० व २३, २४ श्लोकांमध्ये व १७ व्या अध्यायातील २ ते १४ व १९, २० श्लोकंमध्येही आहे.

विचार करा :- रावणाने भगवान शिवांना मृत्युंजय, अजर अमर सर्वेश्वर मानून भक्ती केली, दहा वेळा शिश (मस्तक) छाटून समर्पित केले. त्याच्या बदल्यात युद्धावेळी त्याला दहा शिश (मस्तके) प्राप्त झाली, परंतु मुक्ती मिळाली नाही. तो राक्षस गणला गेला. हा दोष रावणाच्या गुरुदेवांचा आहे, ज्या अज्ञान्याने (साधू-ऋषि) वेदांना व्यवस्थित समजून न घेता आपल्या विचाराने तमगुणयुक्त भगवान शिव पूर्ण परमात्मा आहे असे सांगितले व भोळा आत्मा रावणाने खोट्या गुरुदेवांवर विश्वास ठेवून स्वतःचे जीवन व कुळाचा नाश करवून घेतला.

१. एक भस्मागिरी नावाचा साधक होता. त्याने शिवजींनाच (तमगुण) इष्ट मानून शीर्षासन (वर पाय खाली डोके) करून बारा वर्षांपर्यंत साधना केली आणि भगवान शिवांना वचनबद्ध करून भस्मकंडा (भस्मसात करणे) मिळवले व भगवान शिवांनाच मारू लागला. त्याचा उद्देश हा होता की भस्मकंडा प्राप्त करून भगवान शिवांनाच भस्मसात करायचे आणि पार्वतीला पत्नी बनवायचे. भगवान श्री शिव जी भयभीत होऊन पळत होते. त्यानंतर श्री विष्णुजींनी त्या भस्मासुराला गंडस्थ नृत्य करायला लावून त्याच भस्मकंडाने त्याला भस्मसात केले. त्या शिवजींच्या (तमगुण) साधकास शेवटी राक्षसच संबोधले गेले. हरिण्यकशिपूने भगवान ब्रह्माजींची (रजगुण) साधना केली व तोही राक्षसच संबोधला गेला.

२. एकदा आजपासून (सन २००६) सुमारे ३३५ वर्षांपूर्वी हरिद्वारमध्ये हरच्या (शंकर) भक्तिसाधनेवर (शास्त्रविधिरहित साधना करणाऱ्यांच्या) कुंभपर्वाचे (मेळाव्याचे) आयोजन करण्यात आले होते. तेथे सर्व (त्रिगुण उपासक) महात्माजन स्नानासाठी पोहोचले. गिरी, पुरी, नाच, नागा इत्यादी भगवान श्री शिवजींचे (तमगुण) उपासक व वैष्णव भगवान श्री विष्णुजींचे (सतगुण) उपासक आले. प्रथम स्नान कोणी करायचे, या कारणावरून नागा व वैष्णव साधूंमध्ये घनघोर युद्ध झाले. त्यात सुमारे २५ हजार त्रिगुण उपासकांचा मृत्यू झाला. ज्या व्यक्ती शुल्लक कारणावरून नरसंहार करत असतील, तर त्या साधू आहेत की राक्षस, याचा स्वतः विचार करा. एखादी सर्वसामान्य व्यक्ति कोठेही स्नान करत असेल आणि दुसरी एखादी व्यक्ति येऊन म्हटली की मलाही थोडे स्नान करण्याची संमती देण्याची कृपा करावी, तर अशा वेळी शिष्टाचाराच्या नात्याने ती सर्वसाधारण व्यक्ति देखिल म्हणते की या, आपण देखिल स्नान करा. अशाप्रकारे आयत्या वेळी येणाऱ्यांना स्नानासाठी स्थान देण्यात येते. म्हणूनच पवित्र गीता च्या सातव्या अध्यायातील १२ ते १५ या श्लोकांमध्ये म्हटले आहे की जे माझ्या त्रिगुणमयी मायेच्या (रजगुण-ब्रह्मा जी, सतगुण-विष्णु जी, तमगुण-शिव जी) पूजेद्वारे ज्ञान हरवून बसलेले (नष्ट झालेले) आहेत, त्यांनी केवळ मानसन्मानासाठी भुकेलेल्या राक्षसाचा स्वभाव धारण केलेला आहे. हे मनुष्यांमध्ये नीच म्हणजेच सामान्य व्यक्तिंपेक्षाही पतित स्वभावाचे, दुष्कर्म करणारे मूर्ख माझी भक्ती देखिल करत नाहीत. पवित्र गीता च्या सातव्या अध्यायातील १६ ते १८ या श्लोकांमध्ये पवित्र भगवद् गीता बोलणारा (ब्रह्म) प्रभु म्हणत आहे की माझी

भक्ति देखिल (ब्रह्मसाधना) चार प्रकारचे साधक करतात. एक अर्थार्थी (धनलाभ इच्छिणारे) जे वेदमंत्रांनीच जंत्र-मंत्र, हवन इत्यादी करत राहतात, दुसरे आर्त (संकट निवारणासाठी वेदांच्या मंत्रांचे जंत्र-मंत्र हवन इत्यादी करतात.), तिसरे जिज्ञासू, जे परमात्म्याच्या ज्ञानास जाणण्याची इच्छा ठेवणारे केवळ ज्ञानसंग्रह करून वक्ता बनतात व इतरांमध्ये ज्ञानश्रेष्ठतेच्या आधारावर उत्तम बनून ज्ञानी बनून अभिमानामुळे भक्तिहीन होतात आणि चौथे ज्ञानी. या साधकांना हे ज्ञान होते, की मानव शरीर वारंवार मिळत नाही. त्यामुळे प्रभुसाधना पूर्ण झाली नाही, तर जीवन व्यर्थ होऊन जाईल. त्यानंतर वेद वाचले, ज्यामुळे याचे ज्ञान मिळाले की ब्रह्मा, विष्णु महेश या तीन गुणांची व ब्रह्म (क्षर पुरुष) म्हणजेच परब्रह्म (अक्षर पुरुष) यांच्याही वर जो पूर्ण ब्रह्म आहे, त्याची भक्ती केली पाहिजे, इतर देवतांची नाही. त्या ज्ञानी उदार आत्म्यांना मी चांगला वाटतो व मलाही ते यासाठी चांगले वाटतात की ते तीन गुणांच्या (रजगुण-ब्रह्मा, सतगुण-विष्णु, तमगुण-शिव जी) यांच्या वर जाऊन माझी (ब्रह्म-काल) साधना तरी करू लागले, जी अन्य देवतांच्या साधनेपेक्षा उत्कृष्ट आहे, परंतु वेदांमध्ये 'ओऽम' नामाचा जो केवळ ब्रह्मसाधनेचा मंत्र आहे, त्यालाच वेद वाचणारे विद्वान आपल्या स्वत:च्याच विचारविनिमयाने पूर्ण ब्रह्मचा मंत्र समजून अनेक वर्षांपर्यंत साधना करत राहिले. पण त्यांना प्रभुची प्राप्ती झाली नाही. अन्य सिद्धी मात्र प्राप्त झाल्या. याला कारण, पवित्र गीता च्या ४ थ्या अध्यायातील ३४ वा श्लोक, तसेच पवित्र यजुर्वेदातील ४० व्या अध्यायातील १० व्या मंत्रामध्ये वर्णन केलेली पूर्ण ब्रह्मची साधना तीन मंत्रांद्वारे सांगणारा तत्त्वदर्शी संत प्राप्त झाला नाही. यामुळे ज्ञानी देखिल ब्रह्म (काल) साधना करून जन्म-मृत्यूच्या चक्रामध्ये फिरत राहिले.

एक ज्ञानी उदारात्मा महर्षी चुणकजी यांनी वेद वाचले व एका पूर्ण प्रभुच्या भक्तीचा मंत्र 'ओऽम' असा समजून याच नामजपाने अनेक वर्षांपर्यंत साधना केली. एक मानधाता नावाचा चक्रवर्ती राजा होता. (चक्रवर्ती राजा त्यास म्हणतात, ज्याचे पूर्ण पृथ्वीवर शासन असेल.) चक्रवर्ती होण्यापूर्वी त्याने आपल्या अंतर्गत राजांना युद्धाचे आव्हान दिले. एका घोड्याच्या गळ्यामध्ये पत्र बांधून त्याला सर्व राज्यांमध्ये फिरवले. शर्त अशी होती की ज्यास राजा मानधाता याची गुलामी स्वीकार नसेल, त्याला युद्ध करावे लागेल आणि त्याने त्या घोड्याला पकडून बांधावे, परंतु कोणीच घोडा पकडला नाही. महर्षी चुणकजींना ही गोष्ट समजली की राजाला अत्यंत गर्व झालेला आहे. त्यांनी राजाच्या युद्धाचे आव्हान स्वीकारले व युद्ध सुरू झाले. मानधाता राजाकडे ७२ करोड सैन्य होते. त्यांचे चार भाग करून एक भाग (१८ करोड) सैन्याकरवी महर्षी चुणकांवर आक्रमण केले. इकडे महर्षी चुणकजींनी आपल्या भक्तिसाधनेच्या कमाईने चार बाँब बनवले व राजाच्या चार भागात विभागलेल्या संपूर्ण सैन्याचा विनाश केला.

विशेष :- श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी, श्री शिव जी, तसेच ब्रह्म व परब्रह्म यांच्या भक्तीने पाप व पुण्य दोन्हींचे फळ भोगावे लागते. पुण्य स्वर्गामध्ये नेते, तर पापाने नरकामध्ये व चौऱ्याऐंशी लाख प्राण्यांच्या शरीरामध्ये नाना यातना भोगाव्या लागतात. जसे ज्ञानी आत्मा श्री चुणकजींना ज्या ओऽम नामाच्या जपाची कमाई केल्यामुळे महर्षी म्हटले गेले, त्यातील काही त्यांनी सिद्धी शक्तिमध्ये (चार बाँब बनवून) समाप्त केली. त्यामुळे त्यांची काही साधना फळास येऊन ते महास्वर्गामध्ये भोग घेतील व त्यानंतर नरकामध्ये जातील. त्यानंतर ज्या ७२ कोटी प्राण्यांचा (सैनिकांचा) संहार शपथेद्वारे केला, त्याचा भोग देखिल ८४ लक्ष प्राण्यांचे शरीर धारण करून, अनेक कष्टप्रद यातना सहन करून भोगावा लागेल. कोणी शस्त्राने हत्या केलेली असो किंवा वचनरूपी तलवारीने, प्रभु दोन्हींचा समान दंड देतो. जेव्हा महर्षी चुणकजींचा


जीव कुत्र्याच्या शरीरामध्ये असेल, तेव्हा त्याच्या डोक्यावर जखमा होतील आणि त्यामध्ये किडे बनून त्या सैनिकांचे जीव आपला प्रतिशोध घेतील. कधी टांग (पाय) तुटेल, कधी मागच्या पायास अर्धांगवायू होऊन केवळ पुढील पायांवर घासून चालावे लागेल, तर कधी ऊन, थंडीच्या कष्टाने असहनीय पीडा नानाप्रकारे भोगाव्या लागतील.


म्हणून पवित्र गीता बोलणारा ब्रह्म (काल) गीता च्या ७ व्या अध्यायातील १८ व्या श्लोकामध्ये स्वतः म्हणतो की हे सर्व ज्ञानी आत्मे उदार (प्रामाणिक) आहेत, परंतु पूर्ण परमात्म्याची तीन मंत्रांची वास्तविक साधना सांगणारा तत्त्वदर्शी संत न मिळण्यामुळे हे सर्व जण माझीच (अनुत्तमाम्) अति अश्रेष्ठ (नीच) मुक्तीच्या (गती) आशेमध्येच आश्रित राहिले. अर्थात, माझी साधनाही अश्रेष्ठ (नीच) आहे. यासाठी पवित्र गीता च्या १८ व्या अध्यातील ६२ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की हे अर्जुना, ज्यांच्या कृपेनेच तू परमशांती व सनातन परमधामास (सतलोकास) प्राप्त होशील, त्या पूर्ण परमात्म्याला तू सर्वस्व भावाने शरण जा.श्री कृष्णाच्या शरीरामध्ये प्रेतवत प्रवेश करून ब्रह्मने (काल) पवित्र गीता सांगितली. त्यानंतर अनेक वर्षांनंतर पवित्र गीता व पवित्र चारही वेद महर्षी व्यासजींच्या शरीरामध्ये प्रेतवत प्रवेश करून ब्रह्मद्वारे (क्षर पुरुष) स्वतः लिपीबद्ध केले. यामध्ये परमात्मा कसा आहे, त्याची भक्ति कशी करायची व त्यामुळे काय लाभ होईल, या ज्ञानाचे पूर्णपणे वर्णन केलेले आहे, परंतु पूजाविधी केवळ ब्रह्म (क्षर पुरुष) अर्थात ज्योति निरंजन–कालापर्यंतची सांगितलेली आहे.

पूर्ण ब्रह्मच्या भक्तीसाठी पवित्र गीता च्या ४ थ्या अध्यायातील ३४ व्या श्लोकामध्ये पवित्र गीता बोलणारा (ब्रह्म) स्वतः म्हणत आहे की पूर्ण परमात्म्याच्या भक्ती व प्राप्तीसाठी एखाद्या तत्त्वज्ञानी संताचा शोध घेऊन तो जसा सांगेल तसाच विधी कर. पवित्र गीता बोलणारा प्रभु सांगत आहे की पूर्ण परमात्म्याचे पूर्ण ज्ञान व भक्तिविधी मला माहीत नाही. आपल्या साधनेविषयी पवित्र गीता च्या ८ व्या अध्यातील १३ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की माझ्या भक्तीचा तर केवळ एक 'ओऽम' अक्षर आहे, ज्याचा उच्चार करून अंतिम श्वासापर्यंत (त्यजन् देहम्) जप करण्याने परमगतीला प्राप्त होईल. नंतर गीता च्या ७ व्या अध्यायातील १८ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की प्रभुची आस असणाऱ्या ज्या आत्म्यांना पूर्ण ब्रह्माची साधना जाणणारा तत्त्वदर्शी संत मिळाला नाही, ते उदारात्मे माझ्या (अनुत्तमाम्) अति अनुत्तम (अति अश्रेष्ठ, अति नीच) परमगतीमध्येच आश्रित आहेत. (पवित्र गीता बोलणारा प्रभु ब्रह्म (काल) स्वतः म्हणत आहे की माझ्या साधनेने मिळणारी गती अर्थात मुक्ती देखिल अति अश्रेष्ठ (अति नीच) आहे.)

## ''अन्य देवता (रजगुण ब्रह्मा जी, सतगुण विष्णु जी, तमगुण शिव जी) यांची पूजा बुद्धिहीनच करतात.''

गीता च्या ७ व्या अध्यातील २० व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की ज्याचा संबंध गीता च्या ७ व्या अध्यायातील १५ व्या श्लोकाशी सारखा येतो. १५ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की त्रिगुण मायेद्वारे (जी रजगुण– ब्रह्मा जी, सतगुण–विष्णु जी, तमगुण–शिव जी यांच्या पूजेपर्यंत सीमित आहे व यांच्यापासून क्षणिक सुख मिळते.) ज्यांचे ज्ञान हरले गेले आहे, अशा असुर (राक्षस) स्वभावास धारण केलेल्या नीच व्यक्ति, दुष्कर्म करणारे मूर्ख मला भजत (पूजत) नाहीत. गीता च्या ७ व्या अध्यातील २० व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की त्या त्या भोगांच्या कामनेमुळे ज्यांचे ज्ञान हरलेले आहे, ते आपल्या स्वभावाप्रमाणे प्रेरित होऊन अज्ञान अंधकाराच्या नियमांच्या आश्रित असणाऱ्या अन्य देवतांची पूजा करतात. गीता च्या ७ व्या


गीता अध्याय नं. 15
श्लोक नं. १ ते २ तसेच
श्लोक नं. १६ व १७
चा आशय
मूळ(जड)=परम अक्षर पुरुष
अर्थात पूर्ण ब्रह्म (कबीर साहेब जी)
कबीर–अक्षर पुरुष एक पेड है,
निरंजन (क्षर पुरुष) वाकी डार।
तीनों देवा शाखा हैं,
पात रुप संसार।।
खोड = अक्षर पुरुष (परब्रह्म)
फांदी (डार) = ब्रह्म (क्षर पुरुष)
तिन्ही शाखा = ब्रह्मा, विष्णु, शिव
विष्णु
ब्रह्मा
शिव
शास्त्र विरुद्ध साधना
अर्थात उलटे पेरलेले भक्ती रुपी रोपटे


गीता अध्याय नं. 15
श्लोक नं. १ ते ४ तसेच
श्लोक नं. १६ व १७
चा आशय
कबीर-अक्षर पुरुष एक पेड है,
निरंजन (क्षर पुरुष) वाकी डार।
तीनों देवा शाखा हैं,
पात रुप संसार।।
ब्रह्मा
विष्णु
शिव
तिन्ही शाखा = ब्रह्मा, विष्णु, शिव
फांदी (डार) = ब्रह्म (क्षर पुरुष)
खोड (तना) = अक्षर पुरुष
(परब्रह्म)
मूळ (जड) = परम अक्षर पुरुष
अर्थात पूर्ण ब्रह्म (कबीर साहेब जी)
शास्त्रानुकूल साधना
अर्थात सरळ पेरलेले भक्ती रुपी रोपटे

अध्यातील २१ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की जे जे भक्त ज्या ज्या देवतेच्या स्वरूपाची श्रद्धेने पूजा करू इच्छितात, त्या त्या भक्ताची श्रद्धा मी (ब्रह्म/काल) त्या त्या देवतांच्याप्रती स्थिर करतो.

गीता च्या ७ व्या अध्यायातील २२ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की जो (भक्त) ज्या श्रद्धेने एखाद्या देवतेची पूजा करतो, त्यामुळे त्या देवतेपासून माझ्याद्वारेच विधान केलेल्या इच्छित भोगांना तो प्राप्त करतो. जसे मुख्यमंत्री म्हणतात की हे खालचे अधिकारी माझेच नोकर आहेत. मी त्यांना काही अधिकार देऊन ठेवलेले आहेत, त्यामुळे जे त्यांच्याही (अधिकाऱ्यांच्या) आश्रित आहेत, त्यांना देखिल माझ्याद्वारेच लाभ दिले जातात. पण तो पूर्ण लाभ नाही. गीता च्या ७ व्या अध्यायातील २३ व्या श्लोकामध्ये वर्णन केले आहे की त्या मंद बुद्धी असणाऱ्यांचे ते फळ नाशवंत असते. देवतांची पूजा करणारे देवतांनाच प्राप्त होतात. (मदभक्त) मतावलंबी, जे वेदांमध्ये वर्णन केलेल्या भक्तिविधीनुसार भक्ती करणारे देखिल मलाच (ब्रह्म/काल) प्राप्त होतात. अर्थात, कालाच्या जाळ्यातून कोणी बाहेर (येत) नाही.

विशेष :- गीता च्या ७ व्या अध्यायातील २० पासून २३ व्या श्लोकांमध्ये म्हटले आहे की जी साधना कोणत्याही पितृ, भूत, देवी-देवता आदींची पूजा जे स्वाभाविकपणे करतात, मी देखिल (ब्रह्म/काल) त्या मंदबुद्धी लोकांना (भक्तांना) त्या त्या देवतांच्या प्रति आसक्त करतो. ते अज्ञानी साधक देवतांपासून जो लाभ प्राप्त करतात, त्या देवतांना मीच (काल) काही शक्ति दिलेली आहे. त्याच्या आधारावरच त्यांचे (देवतांचे) पुजारी देवतांना प्राप्त होतील, परंतु त्या बुद्धिहीन साधकांची ती पूजा ८४ लक्ष योनींमध्ये लवकरात लवकर घेऊन जाणारी आहे. पण, जे भक्त मला (काल/ब्रह्म) भजतात (पुजतात), ते तप्त शिलेवरून नंतर माझ्या महास्वर्गामध्ये (ब्रह्मलोकामध्ये) जातात आणि त्यानंतर देखिल जन्म-मरणामध्येच राहतील. मोक्ष मात्र मिळणार नाही. याचा भावार्थ असा आहे की देवी-देवतांना व ब्रह्मा, विष्णु, शिव व माता दुर्गा यांच्या साधनेपेक्षा भगवान ब्रह्मची साधना अधिक लाभदायक आहे. महास्वर्गामध्ये गेलेल्या साधकाचा स्वर्ग कालावधी एक महाकल्पापर्यंत देखिल असला, तरी महास्वर्गामध्ये शुभ कर्मांचे सुख भोगून नंतर नरक व अन्य प्राण्यांच्या शरीरामध्ये येऊन कष्ट सहन करावे लागणारच. पूर्ण मोक्ष मात्र मिळणार नाही. अर्थात, त्यामुळे कालाच्या जाळ्यातून मुक्ती मिळणार नाही.

## ''अन्य प्रमाण''

पवित्र गीता व पवित्र वेदांमध्ये अन्य देवतांची पूजा व पितृपूजा (श्राद्ध) करणे, तसेच भूतपूजा (अस्थी विसर्जन किंवा फुले वाहणे, पिंडदान, प्रेतपूजा) करण्यास मनाई आहे.

## ''पवित्र वेदानुसार साधनेचा परिणाम केवळ स्वर्ग-महास्वर्गाची प्राप्ती, मुक्ति नाही.''

गीता च्या ९ व्या अध्यायातील २० व २१ व्या श्लोकांमध्ये म्हटले आहे की जे (भक्त) मनोकामना (सकामना) सिद्धीसाठी तिन्ही वेदांमध्ये वर्णित साधना,शास्त्र अनुकूल माझी पूजा करतात, ते आपल्या कर्माच्या आधारावर महास्वर्गामध्ये आनंद लुटून पुन्हा जन्म-मरणाच्या चक्रामध्ये येतात. अर्थात, जोपर्यंत तीन मंत्र (ओऽम तसेच तत् व सत् सांकेतिक) पूर्ण संताकडून प्राप्त होत नाहीत, तोपर्यंत यज्ञ जरी शास्त्रानुकूल असला, तरी त्याचा सांसारिक भोग, स्वर्ग व नंतर नरक व चौऱ्याऐंशी लक्ष योनी भोगणे हाच एक लाभ आहे. गीता च्या नवव्या अध्यायातील २२ व्या श्लोकांमध्ये म्हटले आहे की जे निष्काम भावनेने माझी

शास्त्रानुकूल पूजा करतात, त्यांच्या पूजेच्या साधनेची रक्षा मी स्वतः करतो, परंतु मुक्ती देऊ शकत नाही.

## ''शास्त्रविधीविरुद्ध साधना पतनाचे कारण''

गीता च्या ९ व्या अध्यायातील २३ व २४ व्या श्लोकांमध्ये म्हटले आहे की ज्या व्यक्ती अन्य देवतांची पूजा करीत आहेत, ते माझीच (कालाच्या जाळ्यामध्ये राहणारी) पूजा करीत आहेत, परंतु ह्या पूजा अविधीपूर्वक आहेत. (अर्थात शास्त्रविरुद्ध आहे. भावार्थ असा की अन्य देवतांची पूजा करू नये.) कारण संपूर्ण यज्ञांचा भोक्ता व स्वामी मीच आहे. ते भक्त मला पूर्णपणे समजत नाहीत. त्यामुळे ते पतनास प्राप्त होतात, नरक आणि ८४ लक्ष योनींमधील कष्ट भोगत राहतात. जसे गीता च्या ३ ऱ्या अध्यायातील १४ व १५ व्या श्लोकांमध्ये म्हटले आहे की सर्व यज्ञांमध्ये प्रतिष्ठित म्हणजेच सन्मानित ज्यास यज्ञ समर्पण केला जातो, तो परमात्मा (सर्व गतम् ब्रह्म) पूर्णब्रह्म आहे. तोच कर्माधार बनवून सर्व प्राण्यांना प्रदान करतो, परंतु पूर्ण संत न मिळेपर्यंत सर्व यज्ञांचा भोग (आनंद) कालच (मनाच्या रूपामध्ये) भोगतो. त्यामुळेच तो म्हणत आहे की मी सर्व यज्ञांचा भोक्ता व स्वामी आहे.

## ''श्राद्ध घालणारे (पितरांची पूजा करणारे) पितरच बनतील, मुक्ति नाही''

गीता च्या ९ व्या अध्यायातील २५ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की देवतांना पूजणारे देवतांना प्राप्त होतात, भुतांना पूजणारे (पिंडदान करणारे) भुतांना प्राप्त होतात म्हणजेच ते भूत बनतात. शास्त्रानुकूल (पवित्र वेद व गीता नुसार) पूजा करणारे मलाच (ब्रह्म-काल) प्राप्त होतात. अर्थात कालद्वारा निर्मित स्वर्ग व महास्वर्ग आदींमध्ये कमी-जास्त काल मजा करतात.

विशेष :- एखादा तहसीलदाराच्या हाताखाली नोकरी (सेवा-पूजा) करत असेल, तर तो तहसीलदार बनू शकत नाही. फक्त त्यापासून मिळालेल्या धनावर त्याचा उदरनिर्वाह चालेल म्हणजेच तो तहसीलदाराच्या अधीनच असेल. अगदी याचप्रकारे जो देवांची (श्री ब्रह्मा, श्री विष्णु व श्री शिव अर्थात त्रिदेव) पूजा (नोकरी) करतो, तो त्यांच्याकडून मिळणारे लाभच प्राप्त करेल. त्रिगुणमयी माया अर्थात तिन्ही गुणांची (रजगुण- ब्रह्मा जी, सतगुण-विष्णु जी, तमगुण शिव जी) पूजा करण्याचा निषेध गीता च्या ७ व्या अध्यायातील १२ ते १५ तसेच २० ते २३ व्या श्लोकांमध्येही आहे. त्याप्रमाणे कोणी पितरांची पूजा (नोकरी, सेवा) करत असेल, तर तो पितरांच्या जवळ लहान पितर बनून त्यांच्याजवळच कष्ट भोगेल. अशाप्रकारे एखादा भुतांची (प्रेतांची) पूजा (सेवा) करत असेल, तर तो भूत बनेल. कारण सर्व जीवन ज्यामध्ये आसक्त बनते आणि शेवटी त्यातच मनही फसत राहते. त्यामुळे त्याला त्यांच्याजवळच निघून जावे लागते. काहींचे म्हणणे असे आहे की पितर-भूत, देवपूजाही करू व आपला उपदेश घेऊन साधनाही करत राहू, परंतु असे चालणार नाही. ज्या साधनेला पवित्र गीता मध्ये व पवित्र चारही वेदांमध्ये मनाई केलेली आहे, ती करणे म्हणजे शास्त्राविरुद्ध झाले. ज्याला पवित्र गीता च्या १६ व्या अध्यायातील २३ व २४ व्या श्लोकांमध्ये अमान्य केलेले आहे, त्या शास्त्रविधीचा त्याग करून मनमानी आचरण (पूजा) करतात, त्यांना सुखही मिळत नाही, परमगती देखिल प्राप्त होत नाही किंवा एखादी कार्य सफल करणारी सिद्धी देखिल मिळत नाही. म्हणजेच ते जीवन व्यर्थ घालवतात. म्हणूनच हे अर्जुना, तुझ्यासाठी कर्तव्याच्या (जे साधनेचे कर्म करण्यायोग्य नाही.) व्यवस्थेमध्ये (नियमात) शास्त्रच प्रमाण आहे. इतर साधना वर्ज्य आहेत.

याचे प्रमाण मार्कण्डेय पुराणामध्ये देखिल (गीता प्रेस, गोरखपूर यांच्याकडून प्रकाशित

पृष्ठ २३७ वर आहे. यामध्ये मार्कण्डेय पुराण व ब्रह्म पुराण यांचे एकत्र वर्णन केलेले आहे.) एक रुची नावाचा साधक (भक्त) ब्रह्मचारी राहून वेदांनुसार साधना करीत होता. जेव्हा तो चाळीस वर्षे वयाचा झाला, तेव्हा त्यास आपले चार पूर्वज दिसले, जे शास्त्राविरुद्ध साधना करून पितर झाले होते व अत्यंत कष्ट भोगत होते. ते पितर त्याला म्हणाले की बेटा रुची, विवाह करून आमचे श्राद्ध घाल. आम्ही दु:खी होत आहोत. रुची ऋषिने म्हणाले की हे पित्रमहो, वेदांमध्ये कर्मकाण्डाचा मार्ग (श्राद्ध, पिंडदान इत्यादी) मूर्खांच्या साधना असल्याचे म्हटले आहे. मग आपण मला का या चुकीच्या (शास्त्र- विधिरहित) साधना करायला सांगत आहात. पितर म्हणाले की मुला, तुझी ही गोष्ट तर सत्य आहे की वेदांमध्ये पितरपूजा, भूतपूजा, देव-देवतांची पूजा (कर्मकाण्ड) यांना अविद्याच म्हटलेले आहे. यामध्ये किंचितही मिथ्या नाही. याच मार्कण्डेय पुराणामध्ये पितरांनी म्हटले आहे की परंतु पितर काही तरी लाभ देतात.

विशेष :- येथे आपल्याला अडकवणाऱ्या शर्ती पितरांनी लावलेल्या आहेत. त्या आपण पालन करायच्या नाहीत. कारण पुराणांमध्ये आदेश कोण्या ऋषिचा आहे, जो पित्र पुजण्याचा, भूत किंवा अन्य देव पुजण्याचा सांगितलेला आहे. त्याचे वेदांमध्ये प्रमाण नसल्यामुळे मात्र तो प्रभुचा आदेश नाही. त्यामुळे कोण्या संत अथवा ऋषिच्या सांगण्याने प्रभुच्या आज्ञेचे उल्लंघन करण्याने शिक्षेचे (दंडाचे) भागी व्हाल.

एकदा एका व्यक्तीची एका पोलीस ऑफिसरशी मैत्री झाली. ती व्यक्ति आपल्या मित्र पोलीस ठाणेदारास म्हणाली की माझा शेजारी मला अत्यंत त्रास देत आहे. पोलीस मित्र म्हणाला की तू त्याला काठीने मार. त्यानंतर जे काय होईल ते मी स्वत: निपटून घेईन. पोलीस मित्रांच्या आज्ञेचे पालन करून त्या व्यक्तीने आपल्या शेजाऱ्यास काठीने मार दिला. डोक्यावर जखम झाल्याने शेजाऱ्याचा मृत्यू झाला. त्या क्षेत्राचा पोलीस अधिकारी दुसरा असल्याने त्या पोलीस अधिकाऱ्याने त्या व्यक्तिला पकडले व तुरुंगात टाकले. नंतर त्या व्यक्तिला मृत्युदंड मिळाला. त्याचा मित्र पोलीस अधिकारी असूनही त्याला काहीच मदत करू शकला नाही. कारण राजाचा कायदाच आहे की जर कोणी एखाद्याची हत्या केली, तर त्याला मृत्युदंड दिला जाईल. त्या अज्ञानी मूर्ख व्यक्तिने आपल्या मित्र पोलीसाची आज्ञा मानून राजाच्या कायद्याचा भंग केला, ज्यामुळे तो आयुष्याला मुकला. अगदी असेच पवित्र गीता जी व पवित्र वेद हे प्रभुचे संविधान आहेत. यामध्ये केवळ एका पूर्ण परमात्म्याच्या पूजेचेच विधान आहे. अन्य देवता, पितर-भूत यांची पूजा करणे अमान्य आहे. पुराणांमध्ये ऋषिंचा (पोलीस अधिकाऱ्यांचा) आदेश आहे. त्यांच्या आज्ञेचे पालन करण्याने प्रभुच्या संविधानाचा भंग होईल आणि कष्टावर कष्ट सहन करावे लागतील. त्यामुळेच अन्य उपासना पूर्ण मोक्षास बाधक आहेत.

## ''सत्यकथा''

माझे सतगुरु स्वामी रामदेवानंद महाराज सुमारे १६ वर्षांचे असताना पूर्ण परमात्म्याच्या प्राप्तीसाठी अचानक घराचा त्याग करून निघून गेले. नेहमीचे वापरातले कपडे ते आपल्याच शेताजवळील गर्द जंगलामध्ये एका मृत पशूच्या अस्थींवर टाकून गेले. संध्याकाळी घरी न आल्यामुळे घरच्यांनी जंगलामध्ये भरपूर शोध घेतला. वेळ रात्रीची होती. त्यांच्या कपड्यावरून घरच्यांना वाटले की आपल्या मुलाला जंगलामध्ये एखाद्या हिंस्र प्राण्याने मारून खाल्ले. दु:खी मनाने त्यांनी त्या हिंस्र पशूच्या अस्थी आपल्या मुलाच्या समजून उचलून आणल्या व त्यावर अंतिम संस्कार केले. सर्व दहावा, तेरावा, वर्षश्राद्ध इत्यादी क्रियाही केल्या. प्रत्येक वर्षी श्राद्ध घालू लागले. सुमारे १०४ वर्षांनंतर स्वामीजी अचानक आपले गाव मोठे पैंतावास, जिल्हा

भिवानी, तालुका चरखीदादरी, हरियाना येथे पोहोचले. स्वामीजींचे बालपणीचे नाव श्री हरिद्वारीजी असे होते आणि पवित्र ब्राह्मण कुळामध्ये त्यांचा जन्म झाला होता. माझ्यासारख्या दासाला हे समजल्यावर मी देखिल तेथे दर्शनासाठी गेलो. त्यावेळी स्वामीजींच्या वहिनींचे वय सुमारे ९२ वर्षे होते. मी त्या वृद्ध स्त्रीला विचारले की आमच्या गुरुजींनी घराचा त्याग केल्यानंतर आपल्याला काय वाटले? त्या वृद्धेने सांगितले की जेव्हा माझा विवाह झाला, तेव्हा मला सांगितले गेले होते की माझ्या पतींचा हरिद्वारी नावाचा एक भाऊ होता, ज्याला जंगलामध्ये हिंस्र प्राण्याने फाडून खाल्ले आहे. आजही त्यांचे श्राद्ध घातले जाते. मलाही त्यांचे श्राद्ध घालण्यास सांगितले गेले आहे. त्या वृद्धेने सांगितले की त्यांची ७० श्राद्ध तर मी माझ्या स्वत:च्या हातांनी घातली आहेत. जेव्हा जेव्हा पीक चांगले यायचे नाही अथवा घरचा एखादा सदस्य आजारी पडला आणि आपल्या पुरोहितास त्याचे कारण विचारले तर ते म्हणायचे की हरद्वारी पितर बनलेला आहे आणि तोच तुम्हाला दु:खी करत आहे. श्राद्ध घालण्यामध्ये काही तरी अशुद्धी राहिलेली आहे. यापुढे सर्व क्रिया मी स्वतःच्या हाताने करेन. एकाच दिवशी अनेक ठिकाणी श्राद्ध घालायला जायला लागल्यामुळे मागच्या वेळी मला वेळच मिळाला नाही. त्यामुळे मी पुत्रास पाठविले होते. तोपर्यंत काही तरी भेट चढव, ज्यामुळे पितर शांत होईल. त्या वेळी त्याला २१ किंवा ५१ रुपये तो जे काही सांगेल ते देखिल भयामुळे भेट देत होते. नंतर श्राद्धाच्या वेळी पुरोहित स्वतः श्राद्ध घालत होते. तेव्हा त्या वृद्धेचे (स्वामीजींच्या वहिनीचे) हे सर्व ऐकून मी (सद्गुरू रामपालजी महाराज) म्हणालो की माताजी, आता तरी या गीता विरुद्धच्या साधना करायचे सोडा, नाही तर तुम्हीही प्रेत बनाल. गीता च्या ९ व्या अध्यायातील २५ वा श्लोक ऐकवला तेव्हा ती वृद्ध स्त्री म्हणू लागली की मी देखिल गीता वाचते. दास (संत रामपालजी महाराज) म्हणाले की आपण गीता वाचली, परंतु समजून घेतली नाही. इथून पुढे तर ही अज्ञान साधना बंद करा. वृद्धा म्हणाली की नाही रे भाऊ, श्राद्ध घालण्याची परंपरा तर शतकानुशतके चालत आली आहे आणि ती कशी काय सोडून देऊ? हा दोष भोळ्या आत्म्यांचा नाही, तर ज्या कारणाने कोणतेही कार्य सिद्ध होत नाही किंवा परमगती अथवा कोणतेही सुख प्राप्त होत नाही असे मनमानी आचरण (पूजेचा मार्ग) पवित्र शास्त्र समजून घेतल्याशिवाय ज्यांनी सांगितला, त्या मूर्ख गुरूंचा (अज्ञानी, साधू, ऋषि) आहे. प्रमाण पवित्र गीता च्या १६ व्या अध्यायातील २३ व २४ वे श्लोक.

आता दासजींची प्रार्थना आहे की ज्याने पूर्ण मोक्ष व परमशांती प्राप्त होते, ती शास्त्रविधिनुसार साधना शिक्षित वर्गाने ध्यान देऊन करावी आणि पूर्ण परमात्म्याचे सनातन परमधाम (शाश्वतम् स्थानम्) अर्थात सतलोक प्राप्त करून घ्यावा. (गीता च्या १८ व्या अध्यायातील ६२ वा श्लोक). यासाठी तत्त्वदर्शी संताचा शोध घ्यावा. (गीता च्या ४ थ्या अध्यायातील ३४ वा श्लोक) .

एक श्रद्धाळू भक्त म्हणाला की मी आपणाकडून नामदीक्षा (उपदेश) घेऊन आपण सांगाल ती भक्तिसाधना करत राहीन आणि श्राद्धही घालत राहीन. तसेच माझ्या घरातील देवी-देवतांनाही उच्च मानून त्यांची पूजा करत राहीन. यामध्ये दोष काय आहे?

या दासाची प्रार्थना :- संविधानाच्या कोणत्याही मार्गाचे (कलम) उल्लंघन केल्यावर शिक्षा (दंड) मिळणारच. त्यामुळे पवित्र गीता व पवित्र चारही वेदांमध्ये वर्णन केलेल्या व वर्जित विधीच्या विपरीत साधना करणे व्यर्थ आहे. (प्रमाण पवित्र गीता च्या १६ व्या अध्यायातील २३ व २४ वा श्लोक). रामाचे नाव असलेल्या गाडीचे पंक्चर काढण्यास मनाई आहे, त्यामुळे मी पंक्चर वरच्या मनाने काढून देतो, असे जर कोणी एखादा म्हणाला तर चालेल? अगदी

अशाचप्रकारे शास्त्राविरुद्ध भक्तिसाधना हानिकारकच आहे.

एक श्रद्धाळू म्हणाला की मी दुसरे कोणतेही व्यसन (दारू, मांस इत्यादी) करत नाही. केवळ तंबाखूचे (बिडी, सिगारेट, हुक्का) सेवन करतो. आपण सांगितलेली पूजा व ज्ञान अतिउत्तम आहे. मी गुरू देखिल केला आहे, परंतु हे ज्ञान आजपर्यंत कोणत्याही संताकडून मिळाले नाही. मी २५ वर्षांपासून फिरत आहे आणि तीन गुरू देखिल केले आहेत. मला सर्व नियम मान्य आहेत. फक्त मला तंबाखूच्या व्यसनात सूट द्या. तंबाखूमुळे भक्तिमध्ये बाधा येते?

दासांची प्रार्थना :- दासांनी प्रार्थना केली की आपल्या शरीरास ऑक्सिजनची आवश्यकता आहे. तंबाखूचा धूर म्हणजे कार्बन डायऑक्साईड, जो फुफ्फुसांना कमजोर करतो व रक्त दूषित करतो. मानव शरीर हे प्रभुप्राप्ती व आत्मकल्याणासाठीच प्राप्त झाले आहे. यामध्ये परमात्मा प्राप्तीचा मार्ग सुष्मना नाडीपासून सुरू होतो. नाकाची जी दोन छिद्रे आहेत, त्यामधील उजव्या छिद्राला ईडा व डाव्या छिद्रास पिंगळा म्हटले जाते. या दोन्हींच्या मध्ये सुष्मना नाडी आहे. त्यामध्ये लहान सुईमध्ये धागा गुंफण्यइतक्या छिद्रासारखे द्वार असते. ते द्वार तंबाखूच्या धुराने व तंबाखू सेवनाने बंद होते. यामुळे प्रभुप्राप्तीच्या मार्गामध्ये अवरोध होतो. जर प्रभुप्राप्तीचा रस्ताच बंद झाला, तर मनुष्य शरीर व्यर्थच झाले. म्हणूनच प्रभुभक्ति करणाऱ्या साधकास प्रत्येक नशावान व अखाद्य (मांस इत्यादी) पदार्थ कायमचे निषेध आहेत.

एक श्रद्धाळू म्हणाला की मला तंबाखूचे व्यसन नाही, पण मांस व मदिरा (दारू) यांचे सेवन नेहमी करतो. यामुळे भक्तिमध्ये काय बाधा येणार? हे तर खाण्यापिण्यासाठीच बनवलेले आहे. वनस्पती, रोपांमध्येही जीव असतोच ना? मग ते खाणे देखिल मांसभक्षणासारखेच झाले.

दासांची प्रार्थना :- जर एखादा आपली आई, वडील, भाऊ, बहीण किंवा मुलाला मारून खात असेल तर कसे वाटेल? 'जैसा दर्द आपने होवै, वैसा जान बिराने। कहै कबीर वे जाएं नरक में, जो काटें शिश खुरांने.' ज्या व्यक्ति पशूला मारताना त्याचे खूर व मस्तक अमानुषपणे कापून त्याचे मास खातात, ते नरकाचे भागीदार होतात. जसे दु:ख आपले बालक व संबंधीयांच्या हत्येमुळे होते, तसेच दुसऱ्यांच्या (प्राण्यांच्या) बाबतीतही समजले पाहिजे. आता राहिली गोष्ट वनस्पती, रोपे यांची. त्यांचा आहारात समावेश करण्याचा प्रभुचा आदेश आहे व त्यांची निर्मिती मुळांपासून झालेली आहे. इतर चेतन प्राण्यांचा वध करणे हे प्रभुच्या आदेशाविरुद्ध आहे. यामुळे तो अपराधच (पाप) आहे.

मद्याचे (दारू) सेवन करण्याचा प्रभुचा आदेश नाही. त्याला स्पष्टपणे मनाई केलेली आहे, कारण त्यामुळे मानवी जीवन उद्ध्वस्त होते. दारूचे सेवन केलेल्या व्यक्तिकडून काहीही चूक होऊ शकते. मद्यपान हे धन, तन व पारिवारिक शांती व समाज सभ्यतेचे महाशत्रू आहे. प्रेमळ बालकांच्या भावी चरित्रावर त्याचे दुष्परिणाम होतात. मद्यसेवन करणारी व्यक्ति कितीही सज्जन असली, तरी त्याची अब्रू राहत नाही किंवा विश्वासही.

एकदा हा दास एका गावामध्ये सत्संग करण्यासाठी गेला होता. त्या दिवशी त्याने नशेचा (मद्य इत्यादी) निषेध यावर सत्संग केला. सत्संगानंतर एक अकरा वर्षीय मुलगी हमसून हमसून रडत होती. तिच्याकडे विचारणा केल्यानंतर तिने सांगितले की 'महाराजजी, माझे वडील पालम विमानतळावर चांगल्या नोकरीत आहेत, परंतु सर्व मिळकत ते दारूमध्ये उडवतात. माझ्या आईने मज्जाव केला तर ते तिला एवढे मारतात, की तिच्या शरीरावर काले-निळे वळ उठतात. एक दिवस माझे वडील माझ्या आईला मारू लागले, तेव्हा मी माझ्या आईच्या अंगावर पडून तिला वाचवू लागले, तर त्यांनी मलाही मारले. त्यात माझा ओठ सुजला. दहा दिवसांनंतर तो

बरा झाला. माझी आई आम्हाला सोडून मामाच्या घरी निघून गेली. सहा महिन्यांनंतर माझी आजी तिला इकडे घेऊन आली. तोपर्यंत आम्ही आमच्या आजीजवळच राहिलो. वडिलांनी औषधेही आणली नाहीत. लवकर उठून कामाला निघून जायचे. संध्याकाळी येताना दारू पिऊनच यायचे. आम्ही तिघी बहिणी आहोत. दोघी जणी माझ्यापेक्षा लहान आहेत. सध्या जेव्हा संध्याकाळी वडील येतात, तेव्हा आम्ही तिघीही कॉटखाली लपून बसतो.'

हे पुण्यात्म्यांनो, आता येथे विचार करा की त्या बाळांना पित्याने छातीशी धरले पाहिजे, बालकांनीही वडील घरी येण्याची वाट पाहिली पाहिजे. त्यांना वाटले पाहिजे की वडील घरी येताना खाऊ, फळे आणतील. येथे मात्र विपरीत स्थिती आहे. आज मानव समाजाची शत्रू असलेल्या दारूने त्या घराची दुर्दशा झाली आहे. दारू पिणारी व्यक्ति स्वतःची हानी तर करतेच, पण त्याचबरोबर अनेक व्यक्तिंचे आत्मे दुखवण्याचे पापही डोक्यावर घेते. दारूड्या व्यक्तिच्या पत्नीच्या दु:खाने तिचे माता-पिता, बंधू-भगिनी, आजी-आजोबा मुलेबाळे सारे दु:खी होतात, त्रस्त होतात. दारू पिणारी व्यक्ति शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या अशांतीचे कारण बनते, कारण घरामध्ये आल्यानंतर तो नेहमीच भांडण करतो. त्याची पत्नी व मुलाबाळांचे ओरडणे ऐकून एखादा शेजारी वाचवण्यासाठी मध्ये पडला तर दारूडा त्यालाच शिवीगाळ करेल. तो शेजारी मध्ये पडला नाही, तर त्या सज्जनाला रात्रभर झोप येणार नाही. या दासपासून उपदेश घेतल्यानंतर मद्यसेवन करणाऱ्या सुमारे एक लाख व्यक्तिंनी सर्व नशायुक्त पदार्थ व मांसाहाराचा पूर्णपणे त्याग केला आहे. त्यांच्या मद्यसेवनाने संध्याकाळी मद्यभुतनीचे नृत्य होत होते, तेथे आता ते पुण्यात्मे आपल्या बालकांसह संध्या आरती करत आहेत. हरियाना, तसेच आसपासच्या प्रांतातील सुमारे दहा हजार गावे व शहरांमध्ये प्रत्येक प्रदेशामध्ये आजही अशा चार-पाच अस्सल दारूड्यांची उदाहरणे आहेत, जे सर्व विकारांचा त्याग करून स्वतःचे मानवी जीवन सफल करत आहेत. काही जण म्हणतात की आम्ही दररोज दारू कधीच पीत नाही, केव्हा तरीच सेवन करतो. थोडे जरी असले तरी विष ते विषच. ते भक्ति व मुक्तीला बाधकच आहे.

समजा, दोन किलोग्रॅम तुपाचा हलवा बनवला (सतभक्तिचा). नंतर त्यात २५० ग्रॅम वाळू, माती (तंबाखू, मांस, मद्यसेवन यासारखे) टाकली, तर ते केलेले सर्व व्यर्थच जाणार. यासाठीच पूर्ण परमात्म्याची (परम अक्षर ब्रह्म) पूजा पूर्ण संताद्वारे प्राप्त करून आजीवन मर्यादेमध्ये राहून भक्ति करण्यानेच पूर्ण मोक्षांचा लाभ प्राप्त होईल.

## ''तत्त्वज्ञानाच्या प्राप्तीनंतरच भक्तीचा प्रारंभ होतो''

गीता च्या ९ व्या अध्यायातील २६, २७, २८ श्लोकांचा भाव असा आहे की जे काही आध्यात्मिक किंवा सांसारिक काम (कार्य) करायचे आहे, ते माझ्या मतानुसार, वेदांमध्ये वर्णित पूजा विधीनुसारच करावे. त्या उपासकाला माझ्यापासूनच (काल) लाभ मिळतो. याचे वर्णन याच अध्यायाच्या २० व २१ व्या श्लोकांमध्येही केलेले आहे. गीता च्या ९ व्या अध्यायातील २९ व्या श्लोकामध्ये भगवान (काल, ब्रह्म) म्हणत आहे की मी कुणाचा द्वेष करत नाही किंवा कुणावर प्रेम करत नाही. लगेच तो असेही म्हणत आहे की जे मला प्रेमाने पुजतात, ते मला प्रिय आहेत आणि मी त्यांना प्रिय आहे. अर्थात, मी त्यांच्यामध्ये आहे आणि ते माझ्यामध्ये आहेत. राग व द्वेषाचे प्रत्यक्ष प्रमाण असे आहे की प्रल्हाद विष्णुजींचा आश्रित होता व हिरण्यकशिपू द्वेष करत होता. त्या वेळी भगवानाने नृसिंह रूप धारण करून आपल्या प्रिय भक्ताचे रक्षण केले व राक्षस हिरण्यकशिपूची आंतडी बाहेर काढून त्याचा शेवट केला. यातून प्रल्हादाशी प्रेम व हिरण्यकशिपूशी द्वेष हे प्रत्यक्ष सिद्ध आहे.

म्हणूनच पवित्र श्रीमद् भगवत गीता च्या २ ऱ्या अध्यायातील ५३ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की तत्त्वज्ञान प्राप्त झाल्यानंतर नाना प्रकारांनी भ्रमित करणाऱ्या वचनांनी विचलित होणारी तुझी बुद्धी एका पूर्ण परमात्म्यांमध्ये दृढतेने स्थिर होईल, तेव्हा तू योगी बनशील. अर्थात, तेव्हा तूझी अनन्य मनाने निःशस्य (नि:संशय) होऊन एका पूर्ण प्रभुच्या भक्तीचा प्रारंभ होईल.

पवित्र श्रीमद् भगवत गीता च्या २ ऱ्या अध्यायातील ४६ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की जसे अत्यंत विशाल जलाशय (ज्यातील पाणी दहा वर्षे पाऊस पडला नाही तरीही समाप्त होत नाही.) प्राप्त झाल्यानंतर लहान जलाशयामध्ये (ज्यातील पाणी एखाद्या वर्षी पाऊस झाला नाही तर समाप्त होते.) जेवढे प्रयोजन राहून जाते, त्याप्रमाणे पूर्ण परमात्मा (परम अक्षर पुरुष) यांच्या गुणांचे ज्ञान तत्त्वज्ञानाद्वारे झाल्यानंतर आपली आस्था अन्य ज्ञानांमध्ये व अन्य भगवानांमध्ये (अन्य देवतांमध्ये ब्रह्मा, विष्णु, शिव यामध्ये व क्षर पुरुष अर्थात ब्रह्ममध्ये व अक्षर पुरुष अर्थात परमब्रह्म) तेवढीच राहून जाते. लहान जलाशयाचे वाईट वाटत नाही, परंतु तो कामचलाऊ आहे आणि जीवनासाठी पर्याप्त नाही ही त्याची क्षमता समजून येते. अत्यंत विशाल जलाशय प्राप्त झाल्यानंतर समजते की जरी दुष्काळ पडला, तरी कोणतीही समस्या येणार नाही. अशा वेळी आपण लगेच लहान जलाशयाचा त्याग करून मोठ्या जलाशयाचा आश्रय घेऊ.

अशाप्रकारे तत्त्वदर्शी संताकडून पूर्ण परमात्म्याच्या तत्त्वज्ञानाद्वारे पूर्ण ब्रह्मची महिमा समजल्यानंतर साधक पूर्णरूपाने (अनन्यभावे) त्या पूर्ण परमात्म्यावर सर्व भावांनी आश्रित होतो.

पवित्र श्रीमद् भगवत गीता च्या १८ व्या अध्यायातील ६२ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की हे अर्जुना, तू सर्वस्व भावाने त्या परमेश्वराला शरण जा. त्या परमात्म्याच्या कृपेनेच तुला परमशांती प्राप्त होईल. म्हणजेच शाश्वत स्थान म्हणजेच सनातन परमधाम म्हणजेच कधीही नष्ट न होणारे सतलोक प्राप्त होईल.

पवित्र श्रीमद् भगवत गीता च्या १८ व्या अध्यायातील ६३ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की मी तुला हे रहस्यमय अतिगोपनीय गीता चे ज्ञान सांगितले. आता जशी तुझ्या मनाची इच्छा असेल तसे तू कर. (गीता तील अंतिम १८ व्या अध्यायातील हे अंतिम श्लोकांचे विवेचन चालले आहे, त्यामुळे असे म्हटले आहे.)

## ''गीता ज्ञानदाता ब्रह्मचा इष्ट (पूज्य) देव पूर्ण ब्रह्म आहे.''

पवित्र श्रीमद् भगवत गीता च्या १८ व्या अध्यायातील ६४ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की एक सर्व गुप्त ज्ञानाहून गुप्त ज्ञान पुन्हा एक वेळा ऐक, की हेच पूर्ण परमात्मा (ज्यांच्याविषयी पवित्र श्रीमद् भगवत गीता च्या १८ व्या अध्यायातील ६२ व्या श्लोकामध्ये सांगितले आहे.) माझे निश्चितपणे पूज्यदेव आहेत. म्हणजेच मी देखिल (ब्रह्म क्षर पुरुष) त्यांचीच पूजा करतो. हे तुझ्या हितासाठी सांगत आहे. (कारण हेच ज्ञान गीता ज्ञानदाता प्रभुने पवित्र श्रीमद् भगवत गीता च्या १५ व्या अध्यायातील ४ थ्या श्लोकामध्येही दिलेले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की मी त्याच आदिपुरुष परमेश्वराला शरण आहे. त्यामुळेच येथे म्हटले आहे की हे गुप्ताहून अतिगुप्त ज्ञान पुन्हा ऐक.)

विशेष :- गीता च्या इतर अनुवादकर्त्यांनी अयोग्य अनुवाद केला आहे. 'इष्टः असि मे दृढम् इति'चा अर्थ सांगितला आहे की तू माझा प्रिय आहेस. परंतु अर्थ बनतो की :-

१८ व्या अध्यायातील ६४ वा श्लोक

सर्वगुह्यतमम्, भूय:, श्रृणु, मे, परमम् वच:, इष्ट. असि, मे दृढम्, इति, तत:, वक्ष्यामि, ते, हितम् ।।

अनुवाद :- (सर्वगुह्यतमम्) संपूर्ण गोपनीयांहून अतिगोपनीय (मे) माझे (परमम्) परम रहस्ययुक्त, (हितम्) हितकारक (वच:) वचन (ते) तुला (भूय:) परत (वद्यामि) सांगतो (तत:) ते (श्रृणु) ऐक (इति) पूर्ण ब्रह्म (मे) माझा (दृढम्) पक्का निश्चित (इष्ट:) पूज्यदेव (असि) आहे.

पवित्र श्रीमद् भगवत गीता च्या १८ व्या अध्यायातील ६५ व्या श्लोकामध्ये गीता ज्ञानदाता प्रभु (काल भगवान क्षर पुरुष) म्हणत आहे की जर मला शरण यायचे असेल, तर माझी पूजा अनन्यभावे कर, अन्य देवतांची (ब्रह्मा, विष्णु, शिव), पितर इत्यादींच्या पूजेचा त्याग कर. त्यानंतर तू मलाच प्राप्त होशील, अर्थात ब्रह्मलोकामध्ये बनलेल्या महास्वर्गामध्ये जाशील. मी तुला वचन देतो की तू माझा प्रिय आहेस.

पवित्र श्रीमद् भगवत गीता च्या १८ व्या अध्यायातील ६६ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की जर (एकम्) त्या अद्विितीय म्हणजेच ज्याची तुलना इतर कोणाशीही होऊ शकत नाही, त्या सर्व शक्तिमान, सर्व ब्रह्माण्डांची रचना करणाऱ्या, सर्वांचे पालनपोषण करणाऱ्या परमेश्वराला शरण जायचे असेल, तर 'ॐ' नामाच्या जपातून झालेली कमाई, तसेच अन्य धार्मिक शास्त्रअनुकूल यज्ञाची साधना मला अर्पण कर. त्यामुळे तू माझ्या ऋणातून मुक्त होशील. त्या (एकम्) अद्विितीय म्हणजेच ज्याच्या तोडीचा कोणीही नाही, त्याला तू शरण (व्रज) जा. मी तुला सर्व पापांतून (कालाच्या ऋणातून) मुक्त करेन. तू चिंता करू नकोस.

विशेष :- गीता च्या अन्य अनुवादकर्त्यांनी १८ व्या अध्यायातील ६६ व्या श्लोकाचा अनुवाद अयोग्य केलेला आहे. त्यांनी व्रज शब्दाचा अर्थ येणे असा केला आहे. वास्तविक त्याचा अर्थ जाणे असा होतो. कृपया खालील वास्तविक अनुवाद वाचा-

१८ व्या अध्यायातील ६६ वा श्लोक

'सर्वधर्मान्, परित्यज्य, माम्, एकम्, शरणम्, व्रज,
अहम्, त्वा, सर्वपापेभ्य:, मोक्षयिष्यामि, मा, शुच: ।।'

अनुवाद :- (माम्) माझ्या (सर्वधर्मान्) संपूर्ण पूज्यांना (परित्यज्य) त्यागून तू केवळ (एकम्) एका त्या पूर्ण परमात्म्याला (शरणम्) शरण (व्रज) जा. (अहम्) मी (त्वा) तुला (सर्वपापेभ्य:) सर्व पापांमधून (मोक्षयिष्यामि) मुक्त करीन. तू (मा, शुच:) शोक करू नकोस.

## ''ब्रह्मचा साधक ब्रह्म यास व पूर्ण ब्रह्मचा साधक पूर्ण ब्रह्म यास प्राप्त होतो''

गीता च्या ८ व्या अध्यायातील ५ ते १० व १३ वा श्लोक आणि १७ व्या अध्यायातील २३ व्या श्लोकामध्ये निर्णायक ज्ञान आहे. गीता च्या ८ व्या अध्यायातील १३ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की माझ्या (ब्रह्मच्या) भक्तिसाधनेचे केवळ एक 'ॐ' अक्षर हेच आहे. त्याचाच उच्चार करून जप करायचा आहे. जो भक्त अंतिम श्वासापर्यंत हा जप करतो, तो माझ्या परमगतीस प्राप्त करतो. (आपल्या परमगतीस गीता ज्ञानदाता प्रभूने ७ व्या अध्यायातील १८ व्या श्लोकामध्ये अगदीच अनुत्तम म्हणजे अतिनीच असे म्हटले आहे.)

पवित्र श्रीमद् भगवत गीता अध्याय १७ श्लोक २३ ामध्ये म्हटले आहे की पूर्ण परमात्म्याच्या प्राप्तीचे केवळ तीन मंत्र 'ॐ-तत्-सत्' यांच्या जपाचाच निर्देश केलेला आहे. (ज्यामध्ये ॐ हा जप ब्रह्मचा, तत् हे सांकेतिक आहे जो परब्रह्मचा जप आहे व सत् हा देखिल सांकेतिक आहे, जो पूर्णब्रह्मचा जप आहे.) त्या पूर्ण परमात्म्याच्या तत्त्वज्ञानास तत्त्वदर्शी संतच

जाणतो. त्याच्याकडून तू ते प्राप्त कर. मी (गीता ज्ञानदाता क्षर पुरुष काल–ब्रह्म) जाणत नाही.

पवित्र श्रीमद् भगवत गीता अध्याय८ श्लोका ६ मध्ये म्हटले आहे की अंतसमयी साधक ज्या प्रभुचा नामजप करत शरीराचा त्याग करतो, तो त्या प्रभुलाच जाऊन मिळतो.

गीता च्या ८ व्या अध्यायातील ५ व्या ते ७ व्या श्लोकांमध्ये म्हटले आहे की जो अंतसमयी माझे स्मरण करत शरीराचा त्याग करतो, तो माझ्या (ब्रह्म–काल) भावामध्ये एकरूप होऊन राहतो. नंतर जेव्हा तो मनुष्य जन्म घेतो, तेव्हा तो साधक त्याची साधना ब्रह्मपासूनच प्रारंभ करतो. त्याचा स्वभाव त्यासारखाच होतो. (याचे प्रमाण गीता च्या १६ व १७ व्या अध्यायांमध्येही आहे. तो असा– एखाद्या साधकाने पूर्वजन्मामध्ये जशी साधना केली असेल, तशीच साधना तो पुढील जन्मी देखिल स्वभावानुरूप करतो.)

गीता च्या ८ व्या अध्यायातील ७ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की सदासर्वदा माझे स्मरण कर आणि नि:संदेहपणे युद्ध करूनही मलाच प्राप्त होशील.

गीता अध्याय ८ श्लोक ८ ते १० पर्यंत स्पष्ट केलेले आहे की जो साधक अनन्यभावे परमेश्वराचा नामजप करतो, तो नेहमी त्या परमेश्वरास स्मरण करणारा (परम दिव्यम् पुरुष याति) त्या परम दिव्यपुरुष अर्थात परमेश्वराला (पूर्ण ब्रह्म) प्राप्त होतो. (अध्याय ८ श्लोक ८)

तो साधक अनादि सर्वांचा नियंता, सूक्ष्मातिसूक्ष्म, सर्वांचे पालनपोषण करणाऱ्या सूर्याप्रमाणे स्वयंप्रकाशित अर्थात तेजोमय शरीरयुक्त, अज्ञातरूपी अंधकाराच्या पलीकडे (कविम्) कविर्देव सच्चिदानंदघन परमेश्वराचे स्मरण करतो. (८ व्या अध्यायातील ९ वा श्लोक)

तो भक्तियुक्त साधक तीन मंत्रांच्या जपाच्या भक्ति साधनेच्या शक्तिने (नामजपाच्या कमाईने) अंतसमयी शरीराचा त्याग करताना त्रिकुटीवर पोहोचून अभ्यासवश सार नामाचे स्मरण करत त्या दिव्यरूप अर्थात तेजोमय अर्थात साकार (परम पुरुष) परमेश्वराला प्राप्त होतो. (८ व्या अध्यायातील १० वा श्लोक)

## ''ब्रह्मची (क्षर पुरुष) साधना अनुत्तम (अतिनीच) आहे''

गीता च्या २ ऱ्या अध्यायातील ४ थ्या, ५ व्या, ७ व्या, १२ व्या आणि १८ व्या श्लोकांमध्ये म्हटले आहे की मी (गीता ज्ञानदाता) नाशवान आहे. माझा व तुझा जन्म–मृत्यू कायमच होत राहील. केवळ केलेले कर्मच प्राप्त होते. त्यामुळे मोक्ष मिळत नाही. माझी भक्तिसाधना करणारे जरी उद्धार साधक असले, तरी तेही माझ्या अतिनीच (अनुत्तमाम्) साधनेमध्येच व्यस्त आहेत. म्हणूनच पवित्र श्रीमद् भगवत गीता च्या १८ व्या अध्यायातील ६२, ६४ व ६६ व्या श्लोकांमध्ये म्हटले आहे की त्या परमेश्वराला शरण जा कारण तो माझाही पूज्य देव आहे.

प्रार्थना :– उपरोक्त तीन मंत्रांची भक्तिसाधना माझ्या दासांच्याही दासांकडे (रामपाल दास) उपलब्ध आहे, जी स्वयंपूर्ण परमात्मा कविर्देव यांनी आपल्या भोळ्या आत्म्यांवर दया करून प्रदान केलेली आहे. कारण आता मधली (मध्य) पिढी चालू आहे. कारण कलियुगाच्या प्रारंभी आपले पूर्वज अशिक्षित होते. त्यावेळी परमेश्वराचे तत्त्वज्ञान खोट्या संत, गुरू, महंत आणि आचार्यांनी बाहेर येऊ दिले नाही. तसेच कलियुगाच्या अंतामध्ये सर्व व्यक्ती भक्तिहीन आणि महाविकारी होतील. आता वर्तमानात विसाव्या शतकापासून शिक्षित समाजाचा प्रारंभ झाला आहे. ही मधली पिढी मनुष्य वंशाची आहे.

वास्तविक आपल्या सद्ग्रंथांमध्ये ज्ञान विद्यमान आहे आणि ते खोटे संत, गुरू, आचार्य

व महंत समजू शकलेले नाहीत. त्यामळे सर्व भक्त समाज शास्त्राविरुद्ध ज्ञानाच्या आधाराने दंतकथांच्या (लोकवेद) आधारावर शास्त्रविधीचा त्याग करून मनमानी आचरण (पूजा) करून अनमोल जीवन व्यर्थ घालवत आहेत.

### शास्त्रविधीनुसार भक्ति साधना :-

१) प्रथम चरणामध्ये ब्रह्म गायत्री मंत्र दिला जातो, जो शरीरातील कमळांना उमलण्यासाठी आहे.

उपदेश घेणारा भक्तात्मा असा विचार करेल की गुरुजी म्हणत होते की तिन्ही गुणांची (रजगुण-ब्रह्मा, सत्गुण-विष्णु, तमगुण-शिव) पूजा करायची नाही. मंत्रजप त्यांनीच दिलेले आहेत. त्यांच्यासाठी निवेदन आहे की ही पूजा नाही. आम्ही कालाच्या लोकामध्ये वास्तव्य करत आहोत. येथे आपल्याला ज्या सुविधा पाहिजे असतील, त्या ब्रह्मा-विष्णु-शिव इत्यादीच प्रदान करतील.

ज्याप्रमाणे आपण विजेचे कनेक्शन (लाभ) घेतलेले आहे. त्याचे बिल (खर्च) भरायचे आहे. आम्ही वीजमंत्र्यांची पूजा करत नाही. आपण त्यांचे बिल भरले, तर विजेचा लाभ मिळत राहील. अशाप्रकारे टेलिफोनचे (दूरध्वनी) बिल, पाणीपुरवठ्याचे बिल आदी आपण भरत राहिलो, तरच आपल्याला त्या सुविधा प्राप्त होतच राहतील. तुम्ही शास्त्रविरुद्ध भक्तिसाधना करून भक्तिहीन झाला आहात. त्यामुळे पुण्यहीन झाला आहात. त्यामुळे तुम्हाला धनलाभ आदी होत नाही. हा दास (रामपालजी) आपला गॅरंटर (जबाबदार) बनून या काल लोकातील एका ब्रह्माण्डाच्या शक्तिंपासून (ब्रह्मा, विष्णु, शिव, गणेश, दुर्गा माता) तुम्हाला सर्व सुविधा पुन्हा मिळवून देण्यास प्रारंभ करवून देईल. आपण फक्त या मंत्राचा जप करून बिल भरत राहायचे. जो मंत्र प्रथम (सत् सुकृत अविगत कबीर) आहे, तो तुमची पूजा आहे. तो पूर्ण परमात्मा आहे व त्याच्यामुळे सतम्चा लाभ (फळ) मिळेल. सतम्चा अर्थ अविनाशी. आपणाला अविनाशी पद प्राप्त करायचे आहे. या मंत्राचा चार महिने योग्य जप केल्यानंतर चार महिन्यांनंतर तुम्हाला सतनाम (सत्यनाम) मिळेल, जे दोन मंत्रांचे असेल. त्यातील एक मंत्र कालाच्या २१ ब्रह्माण्डांचे ऋण फेडण्यासाठी आहे. त्या सतनामाच्या जपाने कमाई करून आपणाला ब्रह्म (क्षर पुरुष) अर्थात कालाचे ऋण उतरवायचे आहे. त्यानंतर हा काल आपल्याला सर्व पापांपासून मुक्त करेल.

पवित्र श्रीमद् भगवत गीता अध्याय १८ श्लोक ६२ ते ६६ मध्ये वर्णन आहे की-

१८ व्या अध्यायातील ६२ वा श्लोक

तम्, एव, शरणम्, गच्छ, सर्वभावेन, भारत, तत्प्रसादात्, पराम्, शान्तिम्, स्थानम्, प्राप्स्यासि, शाश्वतम्
। ।

अनुवाद :- '(भारत) हे भारत! तू (सर्वभावेन) सर्वप्रकारे (तम्) त्या अज्ञानरूपी अंधकारामध्ये लपलेल्या परमेश्वराला (एव) च (शरणम्) शरण (गच्छ) जा. (तत्प्रसादात्) त्या परमात्म्याच्या कृपेनेच तू (पराम्) परम (शान्तिम्) शांतीला व (शाश्वतम्) कायमस्वरूपी राहणाऱ्या सत् (स्थानम्) स्थान-धाम-लोकास (प्रास्यसि) प्राप्त होशील.

अनुवाद :- हे भारत! तू सर्वप्रकारे अज्ञानरूपी अंधकारामध्ये लपून राहिलेल्या परमेश्वरालाच शरण जा. त्या परमात्म्याच्या कृपेनेच तू परमशांती व कायमस्वरूपी राहणाऱ्या सत् स्थान-धाम-लोकास प्राप्त होशील.'

१८ व्या अध्यायातील ६६ वा श्लोक

सर्वधर्मान्, परित्यज्य, माम्, एकम्, शरणम्, व्रज, अहम्, त्वा, सर्वपापेभ्य:, मोक्षयिष्यमि, मा, शुच: ।।

**अनुवाद :- (माम्) माझ्या (सर्वधर्मान्) सर्वप्रकारच्या पूजांचा (परित्यज्य) त्याग करून तू केवळ (एकम्) एका त्या पूर्ण परमात्म्याला (शरणम्) शरण (व्रज) जा. (अहम्) मी (त्वा) तुला (सर्वपापेभ्य:) सर्व पापांपासून (मोक्षयिष्यामि) मुक्त करेन तू (मा शूच:) शोक करू नकोस.**

अनुवाद :- 'माझ्या सर्वप्रकारच्या पूजांचा त्याग करून तू केवळ त्या एका पूर्ण परमात्म्याला शरण जा. मी तुला सर्व पापांपासून मुक्त करेन. तू शोक करू नकोस.'

उपरोक्त श्लोकाचा भावार्थ असा आहे की काल (ब्रह्म अर्थात क्षर पुरुष) म्हणत आहे की हे अर्जुना, तू मला शरण राहू इच्छित असशील, तर जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात अडकून पडशील. जर परमशांती व सतलोकी जाण्याची इच्छा असेल, तर त्या पूर्ण परमात्म्याला शरण जा. त्यासाठी माझ्या सर्व धार्मिक पूजा अर्थात सतनामाच्या प्रथम मंत्राच्या जपाची कमाई माझ्याजवळ सोडून सर्वस्व भावाने त्या एकाला (सर्व शक्तिमान अर्थात ज्याच्या बरोबरीचा दुसरा कोणीही नाही अशा त्या अद्वितीय परमेश्वराला) शरण जा. त्यानंतर मी तुला सर्व पापांपासून (ऋणांपासून) मुक्त करेन. तू चिंता करू नकोस. सतनामाच्या दुसऱ्या मंत्राची कमाई आपण परब्रह्म अर्थात अक्षर पुरुषाला द्यायची आहे. कारण आपणाला अक्षर पुरुषाच्या लोकातून सतलोकी जायचे आहे. त्याचे भाडे द्यायचे आहे. नंतर तिसरा मंत्र सतशब्द अर्थात सारनाम मिळेल, जे सतलोकी स्थिरत्व प्राप्त करून देईल.

जर एखादी व्यक्ती परदेशात गेली असेल आणि तेथे त्याच्यावर त्या सरकारचे कर्ज झाले असेल, तर स्वदेशी येण्याची इच्छा झाल्यास त्याला प्रथमत: त्या देशाच्या ऋणापासून मुक्त झाले पाहिजे. त्यानंतर त्याला कोणतेही कर्ज नसल्याचे प्रमाणपत्र (**No Due Certificate**) घ्यावे लागेल. त्यानंतरच परत येण्यासाठी पासपोर्ट बनेल अन्यथा परत येऊ दिले जाणार नाही.

अशाप्रकारे तुम्ही या काललोकी शास्त्राविरुद्ध साधना करून भक्तिहीन होऊन ऋणी झालेले आहात. प्रथमत: तुम्हाला सावकार बनविले जाईल. यासाठी कविर्देवांनी (कबीर साहेब अथवा कबिर् साहेब) मला, या दासाला (संत रामपाल दास) आपला प्रतिनिधी (**Representative**) बनवून पाठविले आहे. त्या परमेश्वरातर्फे हा दास तुमचा जबाबदारी **(Guaranter)** होईल आणि ब्रह्मा, विष्णु, शिव आदी शक्तिंबरोबर तुमचे पुन्हा संबंध प्रस्थापित करेल. त्यानंतर तुम्हाला त्यांच्या मंत्रांचा जप करून त्या कमाईवर त्याचे बिल भागवायचे आहे. जोपर्यंत तुम्ही तेथून मुक्त होत नाही, तोपर्यंत तुम्हाला सर्व भौतिक सुविधा चांगल्याप्रकारे मिळत राहतील. तेथे पुण्यदान आदी करून भक्तिचे धनी बनू शकाल. दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचे झाल्यास, आपल्या शरीरामध्ये कमळे बनलेली आहेत. जेव्हा आपण शरीराचा त्याग करून परमात्म्याजवळ जाऊ, तेव्हा आपणाला या कमळांमधून पुढे जावे लागेल. जसे-१) मूळ कमळामध्ये गणेशजी २) स्वाद कमळामध्ये सावित्री-ब्रह्मा जी ३) नाभिकमळामध्ये लक्ष्मी आणि विष्णु जी ४) हृदयकमळामध्ये पार्वती आणि शिवजी ५) कंठकमळामध्ये दुर्गा (अष्टांगी) हे आहेत. या कमळांमधून तुम्ही तेव्हाच जाऊ शकाल, जेव्हा आपण त्यांचे ऋण फेडू शकाल. प्रथम उपदेशाने तुमची सर्व कमळे फुलतील म्हणजेच तुम्ही ऋणमुक्त व्हाल. जेव्हा अंतसमयी तुम्ही शरीर सोडून जाल, तेव्हा तुम्हाला मोकळा रस्ता मिळेल. म्हणजेच तुम्हाला सर्व ऋणमुक्तिचे प्रमाणपत्र मिळेल.

परंतु, आपणाला तर फक्त आपले मूळ मालक परमात्मा कविर्देव (कबीर साहेब) यांचीच

पूजा करायची आहे. पतिव्रता फक्त आपल्या पतीची पूजा करते, परंतु लहान दिराचा मुलग्यासारखा, मोठ्या दिराचा मोठ्या भावासारखा व सासू-सासऱ्यांचा माता-पित्यासारखा यथोचित आदर करते. तिचा सर्वस्व भाव मात्र पतीमध्ये एकवटलेला असतो. तो इतर कोणामध्ये असू शकत नाही. अगदी त्याप्रमाणेच कबीर परमेश्वरांची भक्ती करून आपणाला आपली भक्ति सफल करायची आहे. त्यासाठी कोणा अज्ञान्याच्या भूलथापांना बळी पडू नका. पूर्ण विश्वासाने या दासद्वारे सांगितलेल्या भक्तिमार्गावर चालत राहा. ही भक्ति सर्व शास्त्रांवर आधारित आहे.

२. दुसऱ्या चरणामध्ये सतनाम प्रदान केले जाते. ते दोन मंत्रांचे आहे. पहिला ॐ (ओऽम) + दुसरा तत् जो सांकेतिक आहे आणि केवळ साधकालाच तो सांगितला जातो.

३. तिसऱ्या चरणामध्ये सारनाम दिले जाते, जे तीन मंत्रांचे बनलेले आहे. ते तीन मंत्र म्हणजे ओऽम-तत्-सत् (तत्-सत् सांकेतिक आहेत, जे साधकाला सांगितले जातात.)

अशाप्रकारे सारनामाच्या (तीन मंत्रांपासून) अभ्यासाने साधकाला परम दिव्यपुरुष अर्थात परमेश्वर कविर्देव प्राप्त होतील व सतलोकी परम शांती अर्थात पूर्ण मोक्ष प्राप्त होईल.

विशेष :- वर्तमानामध्ये ही वास्तविक साधना माझ्याव्यतिरिक्त (दास) कोणाजवळही नाही. जर कोणी माझ्यापासून (दास) चोरून स्वतः गुरू बनून खोटे शिष्य बनवत असेल, तर त्या मनुष्य जीवनाच्या शत्रूपासून सावध राहा. तो कोणतेही अधिकार नसल्याने स्वत:चे जीवनही नष्ट करत आहे. त्याचबरोबर अज्ञानी अनुयायांनाही नरकाचा भागीदार बनवत आहे. त्याला कालाने (ब्रह्म) पाठविलेला दूत समजा.

## ''शंका समाधान''

१. प्रश्न :- वरील गीता सारावरून सिद्ध होते की ब्रह्मा जी, विष्णु जी आणि शिव जी यांची पूजा व्यर्थ आहे, परंतु मी तर तीस वर्षांपासून श्री शिव जींची पूजा करत आहे आणि भगवान श्री कृष्णजी मला अत्यंत प्रिय आहेत. मी या प्रभूंना सोडू शकत नाही. माझे त्यांच्याशी वेगळे नाते जोडले गेलेले आहे. श्री गीता चा नित्य पाठ करतो. हरे राम, हरे कृष्ण, राधेशाम, सीताराम, ओऽम नम: शिवाय, ओऽम नमो भगवते वासुदेवाय आदी नामजप करतो. सोमवारचे व्रतही सुरू आहे. तीर्थस्थानांवरून नदीतील तीर्थ आणतो, तसेच तेथे दानधर्म करण्यासाठी जातो. मंदिरांमध्ये मूर्तिपूजा करण्यासाठीही जातो. स्वर्गप्राप्तीची इच्छा आहे. त्यासाठी परंपरागत पूजेच्या निमित्ताने भेटलेल्या एका महंतांकडून उपदेशही घेतला आहे.

उत्तर :- कृपया आपण पुन्हा वरील गीता सार वाचावे. जोपर्यंत आपणास तत्त्वज्ञान पूर्ण परिचित होणार नाही, तोपर्यंत हा शंकारूपी काटा बोचतच राहील. वर उदाहरण आहे त्याप्रमाणे उलटे लटकलेला संसाररूपी वृक्ष आहे. त्याचे मूळ तर पूर्ण परमात्मा परमेश्वर आहे. त्रिगुणरूपी (रजगुण-ब्रह्मा, सतगुण-विष्णु, तमगुण-शिव) शाखा आहेत. आपण जर एखादे आंब्याचे रोप लावले आणि रोपाच्या मुळांना पाणी पुरवठा (पूजा) केला, तरच त्याचा वृक्ष बनेल. नंतर त्याच्या फांद्यांना फळे लागतील. शाखा (फांद्या) तोडायला थोडेच सांगितले जाते. हे सरळरीत्या बीज पेरलेले भक्तिरूपी रोप अर्थात शास्त्रविधीनुसार साधना आहे.

अशाप्रकारे पूजा तर पूर्ण परमात्म्याची अर्थात मुळाची करायची आहे. नंतर कर्मांची फळे त्रिगुणरूपी (ब्रह्मा, विष्णु, शिव) शाखांना लागतील. त्यामुळे जे काही चालू आहे, ते सोडायचे नाही. केवळ आपले भक्तिरूपी रोप सरळरीत्या पेरायचे आहे. अर्थात शास्त्रविधीनुसार भक्तिसाधनेचा प्रारंभ करायचा आहे.

वर्तमान स्थितीत सर्व पवित्र भक्तसमाज शास्त्रविधी त्यागून मनमानी आचरण करत आहे. अर्थात भक्तिरूपी रोप उलटे लावलेले असेल, तर त्याला मूर्खच म्हटले जाते. (कृपया उलटे लावलेल्या भक्तिरूपी रोपाचे चित्र पाहा.)

म्हणूनच गीता च्या ७ व्या अध्यायातील १२ ते १८ व्या श्लोकांमध्ये म्हटले आहे की त्रिगुणांची (रजगुण–ब्रह्मा जी, सतगुण–विष्णु जी, तमगुण–शिव जी यांच्या) पूजेपर्यंतच बुद्धी सीमित ठेवणाऱ्यांना, त्यांच्याव्यतिरिक्त इतर कोणासही न पुजणाऱ्यांना राक्षस स्वभाव धारण केलेले मनुष्यांमध्ये नीच, दुष्कर्म करणारे मूर्ख असे म्हटलेले आहे. ते मलाही पूजत नाहीत, असेही म्हटलेले आहे. त्यानंतर आपल्या भक्तिसाधनेलाही गीता ज्ञानदात्या प्रभूने (ब्रह्म अर्थात क्षर पुरुष) अतिनीच/अश्रेष्ठ (अनुत्तमाम्) अर्थात व्यर्थ म्हटलेले आहे. म्हणूनच गीता च्या १८ व्या अध्यायातील ६२, ६४, ६६ व १५ व्या अध्यायातील पहिल्या ते ४ थ्या श्लोकांमध्ये म्हटले आहे की त्या पूर्ण परमात्म्याला (उलट्या लटकलेल्या वृक्षाच्या मुळांची पूजा कर) शरण जा. त्याची पूजा तत्त्वदर्शी संताने सांगितलेल्या मार्गाने कर. (गीता च्या ४ थ्या अध्यायातील ३४ व्या श्लोकामध्ये तत्त्वदर्शी संताच्या दिशेने संकेत केलेला आहे.) त्या पूर्ण परमात्म्यांची शास्त्रविधीनुसार साधना केल्यानेच साधकाला परमशांती व सतलोक प्राप्त होतो. अर्थात, त्याला पूर्ण मोक्ष मिळतो. गीता ज्ञानदाता प्रभु (क्षर पुरुष काल) म्हणत आहे की मी देखिल त्यालाच शरण गेलेलो आहे. माझाही इष्ट देव तोच पूर्ण परमात्मा आहे. मी देखिल त्याचीच पूजा करतो. इतरांनीही त्याचीच पूजा केली पाहिजे. तुम्ही गीता चा नित्यपाठही करत आहात, परंतु गीता मध्ये वर्णन केलेल्या विधीच्या विरुद्ध साधना करत आहात. ज्या मंत्रांचा (हरे राम, हरे कृष्ण, राधेश्याम, सीताराम, ओऽम नम: शिवाय, ओम नमो भगवते वासुदेवाय आदी) आपण जप करत आहात, तसेच इतर साधना, व्रत करणे, तीर्थ आणणे, तीर्थस्थानी दानधर्म करणे, तेथे पूजेसाठी जाणे, गंगास्नान व तीर्थस्थानावर, कुंभमेळ्यात स्नान करणे यांचे पवित्र गीता मध्ये वर्णन नसल्याने हे शास्त्रविधी त्याग करून मनमानी आचरण (पूजा) झाले. याला पवित्र गीता च्या १६ व्या अध्यायातील २३ व२४ व्या श्लोकांमध्ये व्यर्थ म्हटलेले आहे.

## ''गादी व महंत परंपरा यांची माहिती''

महंत व गादीची परंपरा यांची माहिती : एखाद्या एकांतस्थानी किंवा शहरात किंवा एखाद्या गावामध्ये कोणी एखादा महान आत्मा संत अथवा साधक राहत होता. त्याने शरीराचा त्याग केल्यानंतर त्याच्या स्मृतीसाठी त्याच्या देहाच्या अंतिमसंस्काराच्या स्थळावर दगड किंवा विटांची बांधकाम करून एक आठवण ठेवली जाते. नंतर त्या पवित्रात्म्याचे अनुयायी किंवा वंशज त्याची दगडाची मूर्ती तयार करून तेथे ठेवतात. काही कालानंतर श्रद्धाळू तेथे जातात. तेथे दानधर्म करू लागतात. त्या स्थानाला मंदिराचे रूप देतात. त्या संत अथवा ऋषिच्या वंशजांच्या मनामध्ये धनाची लालसा निर्माण होते. ते इतरांना असे भ्रमित करतात की जे येथे दर्शन घेतात, त्यांना पूर्ण मोक्ष प्राप्त होतो. जे या महापुरुषाच्या जीवनकाळातील शिष्यांना लाभ मिळाले होते, ते सर्व लाभ इतरांनाही मिळतात. ही मूर्ती म्हणजे साक्षात त्या संताची आहे हे समजून घ्या. जे येथे येणार नाहीत, त्यांचा कधीच मोक्ष संभव नाही इत्यादी इत्यादी.

त्या अज्ञानींना एखाद्याने विचारले की कोणी एक वैद्य होता. तो नाडी पाहून व्याधींवर औषध देत होता. त्या वैद्याच्या मृत्यूनंतर त्याची मूर्ती बनवून स्थापन करून कोणी धनाची लालसा असणारा म्हणू लागला की ही मूर्ती त्या वैद्याचे कार्य करते. या मूर्तीचे दर्शन घेणारा पूर्णपणे बरा होईल अथवा ती लालची व्यक्ति स्वत:च खोटा वैद्य बनून बसली आणि सांगू लागली की मीही औषधे देतो. परंतु ग्रंथातील वर्णनाच्या बरोबर विरुद्ध तो औषधे देत असेल, तर तो

खोटा वैद्य धोका देत आहे. कारण केवळ पैसा मिळवणे हाच त्याचा उद्देश आहे. त्याप्रमाणे कोणीही संत किंवा प्रभूंची मूर्ती आदरणीय आठवण असू शकेल परंतु पूजनीय नसते.

अशाप्रकारेच कोणी संत किंवा प्रभूची मूर्ती बनवून त्या मूर्तीच्या आधारावर कोणी पुजारी, महंत म्हणू लागला की मी देखिल नामोपदेश (गुरुदीक्षा) देतो, तर तो पुजारी किंवा महंत त्या महान संताने आपल्या अनुभवातून लिहिलेल्या पवित्र शास्त्रांच्या बरोबर विरुद्ध साधना देत असेल. येथे तो खोटा संत आणि महंत दोघेही दोषी आहेत. आपल्या अनुयायींचे जीवनकार्य व्यर्थ घालवण्याचे पाप ते आपल्या डोक्यावर घेत आहेत. संतांच्या बाबतीत सांगायचे झाले, तर खरा संत एका वेळी एकच येतो, परंतु त्याच्या मार्गामध्ये करोडो खोटे संत, महंत आणि आचार्य बाधक बनतात.

एखाद्या संताने देह त्याग केल्यानंतर संत अथवा महंतांची परंपरा सुरू होते. पहिल्या संताच्या स्थानाच्या रक्षणासाठी एखाद्या प्रमुखाची निवड केली जाते, त्याला महंत असे म्हणतात. केवळ त्या पवित्र आठवणीची देखभाल करण्यासाठीच त्याची नियुक्ती केली जाते, परंतु लालसेपोटी तो स्वत:च गुरू बनून बसतो आणि भक्तिची इच्छा असणारे भोळे व प्रेमळ आत्मे त्या आधारावर आपले जीवन व्यर्थ घालवतात. महंत परंपरेचा असा एक नियम आहे की पूर्व महंताचा पुत्र जरी तो दारू पिणारा, अज्ञानी असला, तरी तोच त्या महंतपदाचा उत्तराधिकारी असेल. केवळ पूर्ण संतच जीवांचा उद्धार करू शकेल असा हा भक्ति मार्ग आहे. दासांनी (रामपालजी महाराज) दोन-तीन महंत परंपरेच्या पुस्तकांचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये त्यांना असे आढळून आले की :-

१. एक-दोन वर्षांच्या अज्ञानी बालकाला गादीचा उत्तराधिकारी बनवले गेले. मोठा झाल्यानंतर तो नामदान (गुरुदीक्षा) करू लागला. दुसऱ्या पुस्तकामध्ये त्यांनी असे वाचले की एका पाच वर्षांच्या बालकाचे पिता जे महंत होते, त्यांचा अचानक मृत्यू झाला. त्यानंतर अनुयायी व त्या बालकाच्या आईने आपल्या पाच वर्षीय बालकाची महंतपदावर नियुक्ती केली. काही वर्षांनंतर त्या बालकाला गुरू बनवले गेले.

२. एका महंत परंपरेच्या इतिहासात असे वाचयला मिळाले की त्या महंतास संतान नव्हती. त्या महंताचा मृत्यू झाला. त्याच्या बंधूचा तर पूर्वीच मृत्यू झाला होता. त्यालाही आपत्य नव्हते. गादीच्या रक्षणासाठी एका सेवकाला त्या कुळामध्ये संतान होईपर्यंत अस्थायी महंत म्हणून नियुक्त केले गेले. काही वर्षांनंतर महंत कुळामध्ये कोणाला तरी पुत्र झाला, तर इकडे अस्थायी महंत गादी घेऊनच पळून गेला. एका शहरामध्ये स्वत:च गादी स्थापना करून महंत बनून बसला. त्याने हे नवीन दुकान उघडले आणि तिकडे पूर्वस्थानी एका अडीच वर्षांच्या बालकाला महंत म्हणून बसविले गेले.

३. एका महंत परंपरेचा इतिहास बघितल्यावर असे आढळून आले की महंतांच्या मोठ्या मुलाने घराचा त्याग केला होता. त्याच्या लहान भावाची महंतपदी नियुक्ती केली गेली. काही कालानंतर तेथे मंदिराची स्थापना केली गेली आणि तेथे जास्त प्रमाणात दान (भेट व पूजेचे धन) येऊ लागले. येथे घराचा त्याग केलेल्याचा मुलगा म्हणू लागला की या मंदिरावर आमचा अधिकार आहे. यातून भांडण सुरू झाले. गादीवर विराजमान महंताची हत्या केली गेली. त्यानंतर त्याच महंताच्या ज्येष्ठ पुत्राला गादीचा उत्तराधिकारी म्हणून नियुक्त केले गेले. त्याचीही हत्या करण्यात आली. त्यानंतर त्याच्या दुसऱ्या भावाला गादीवर नियुक्त केले गेले. दुसरे जे स्वत:ला अधिकारी म्हणून घेत होते, त्यांनी नवीन स्थानाची स्थापना केली आणि नवीन दुकान उघडले. एकमेकावर खटले भरून सुखी जीवनाला हव्यासातून नरक बनविले. आता त्या

धामाचे महत्त्व काय राहिले? ते तर महाभारतातील कुरुक्षेत्र झाले. काही महतांनी तर संत बनवण्याची एजन्सी घेतलेली आहे. एखाद्याला लाल वस्त्र धारण करायला लावतात. त्याचे पूर्वीचे नाव बदलून नवीन नाव ठेवतात. नंतर तो बनावट महंत आपल्या बनावट शिष्यांना खोटे संत बनवून भोळ्या आत्म्यांच्या जीवनाशी अयोग्यरीत्या खेळत राहतात. यातून ते स्वतःचे अनमोल मनुष्य जीवन स्वत:च व्यर्थ घालवत आहेत आणि भोळ्या आत्म्यांच्या जीवनाचा नाश करून महापापाचे भागीदार बनत आहेत.

ज्यावेळी राजा परीक्षिताला साप चावला, त्यावेळी त्याला पूर्ण गुरूची आवश्यकता जाणवू लागली. कारण पूर्ण संताशिवाय जीवाचे कल्याण असंभव आहे. त्यावेळी पृथ्वीवरील सर्व ऋषिंनी राजा परीक्षिताला दीक्षा देण्यास आणि सात दिवस श्रीमद् भागवत सुधासागरमधील कथा ऐकण्यास मनाई केली. कारण सातव्या दिवशी पोल (सत्य) उघडकीस येणार होते. त्यामुळे कोणीही समोर येत नव्हते. श्रीमद् भागवत सुधासागरची रचना करणारे (लेखक) महर्षी वेदव्यासजी यांनी देखिल असमर्थता व्यक्त केली. कारण ते सर्व ऋषिजन प्रभुला घाबरत होते. त्यामुळेच राजा परीक्षिताच्या जीवनाशी खेळणे त्यांना योग्य वाटले नाही. ज्यांनी परीक्षित राजाला दीक्षा दिली, त्या महर्षी सुखदेवजींना परीक्षिताच्या कल्याणासाठी स्वर्गातून बोलविले गेले आणि सात दिवस कथा ऐकवून राजा परीक्षिताचा जेवढा शक्य आहे तेवढा उद्धार ऋषि सुखदेवजींनी केला. सध्याचे, वर्तमानातील गुरू, संत, महंत, आचार्य यांना प्रभुचे संविधानच माहीत नाही. त्यामुळे ते भयंकर दोषास पात्र होत आहेत.

ओरों पंथ बतावहीं, स्वयं न जाने राह। अन अधिकारी कथा–पाठ करे व दीक्षा देवें, बहुत करत गुनाह।।

वर्तमानामध्ये कथा व ग्रंथांचे वाचन करणाऱ्यांचा व नामदान (गुरुदीक्षा) देणाऱ्यांचा पूरच आलेला आहे. कारण सर्व पवित्र धर्मांचे पवित्र आत्मे तत्त्वज्ञानापासून अपरिचित आहेत. त्यामुळे खोटे गुरू, संत आणि महंतांचा खेळ चाललेला आहे. ज्यावेळी पवित्र भक्तसमाजाला आध्यात्मिक तत्त्वज्ञान समजेल, त्यावेळी या खोट्या संत, गुरू व आचार्यांना तोंड लपवायलाही जागा मिळणार नाही. त्यांना फरारी होऊन स्वत:वरील संकटे सोडवावे लागेल.

## ''पवित्र तीर्थ व धामांची माहिती''

एका साधक ऋषिंनी एका स्थानावर किंवा जलाशयाजवळ बसून साधना केली किंवा आध्यात्मिक शक्तिचे प्रदर्शन केले. ते साधक आपली भक्तीची कमाई सोबतच घेऊन गेलेले असतात आणि त्यांना इष्टलोक प्राप्त झाले. त्या साधना स्थळाला नंतर तीर्थ किंवा धाम नाव पडले. येथे कोणीतरी साधक, संत, ऋषि वास्तव्य करत होते. त्यांनी अनेकांचे कल्याण केले म्हणून आता अनेक जण ते स्थान पाहण्यास जातात, पण आता तेथे उपदेश (गुरुदीक्षा) करणारे संत कोठे आहेत? ते तर भक्तिची कमाई करून निघून गेले.

विचार करावा :– कृपया तीर्थ व धामांना खलबत्त्यासारखे समजावे. (खळ हे एक–दीड फुटाचे लोखण्डाचे गोल पात्र. हे पात्र नऊ इंच परिघाचे उखळासारखे असते आणि सुमारे दीड फूट लांब व दोन इंच परिघाचा गोल लोखण्डाचा दांडा मुसळासारखा असतो. याचा उपयोग सामग्री, औषधे आदी कुटण्यासाठी केला जातो. यालाच खलबत्ता म्हणतात.) एका व्यक्तिने आपल्या शेजाऱ्याकडून खलबत्ता आणला. त्याने हवनाची सामग्री कुटली आणि खलबत्ता धुवून–पुसून परत केला. ज्या खोलीमध्ये खलबत्ता ठेवला होता, त्या खोलीमध्ये सुगंध दरवळू लागला. घरातील सदस्यांनी हा सुगंध कोठून येत आहे, हे पाहिले तर त्यांना समजले की ज्या खोलीत खलबत्ता ठेवला आहे, तेथून हा सुगंध येत आहे. शेजाऱ्याने एखादी सुगंधी वस्तू यात कुटलेली

असेल असा त्यांचा समज झाला. काही दिवसांनंतर सुगंध यायचा बंद झाला.

अशाप्रकारेच तीर्थ व धाम यांना आपण खलबत्त्यासारखे समजावे. सामग्री कुटणाऱ्याने आपल्या सर्व वस्तू काढून घेऊन घासूनपुसून फक्त रिकामा खलबत्ता परत केलेला आहे. तरीही कोणी त्या रिकाम्या खलबत्त्याचा वास घेऊन स्वतःला कृतार्थ मानत असेल तर तो मूर्खपणाच आहे. त्याने देखिल तसली सामग्री आणली, तरच पूर्ण लाभ होईल.

अशाप्रकारे एखाद्या धाम अथवा तीर्थावर वास्तव्य करणारा पवित्र आत्मा रामनामाची सामग्री कुटल्यानंतर सर्व काही झाडून पुसून आपली सर्व भक्तिची कमाई स्वत:सोबत घेऊन गेला. आणि आता अज्ञानी श्रद्धाळू त्या स्थानावर फक्त जाण्यातच कल्याण समजत असतील, तर त्यांच्या मार्गदर्शकांनी (गुरुंनी) शास्त्रविधिरहित सांगितलेल्या साधनेचाच तो परिणाम आहे. त्या महान आत्मा संतासारखी प्रभुसाधना केली तरच कल्याण शक्य आहे. त्यासाठी तत्त्वदर्शी संताचा शोध घेऊन त्यांच्याकडूनच नामोपदेश (दीक्षा) घेऊन आजीवन सत्यभक्ति करूनच मोक्ष प्राप्त करायला हवा. शास्त्रविधी अनुकूल सतसाधना माझ्याजवळ, या दासाजवळ उपलब्ध आहे. कृपया नि:शुल्क प्राप्त करून घ्यावी.

## ''श्री अमरनाथ धामाची स्थापना कशी झाली?''

भगवान शंकरजींनी पार्वतीला एकांत स्थानावर उपदेश दिला होता. त्यामुळे माता पार्वतीची एवढीच मुक्ती झाली की जोपर्यंत प्रभु शिवजींचा (तमगुण) मृत्यू होणार नाही, तोपर्यंत पार्वतीचा मृत्यू होणार नाही. सात ब्रह्माजींच्या (रजगुण) मृत्यूनंतर भगवान विष्णुंचा (सतगुण) मृत्यू होतो. सात विष्णुजींच्या मृत्यूनंतर एका शिवजींचा मृत्यू होतो. तेव्हा माता पार्वतींचाही मृत्यू होईल. त्यांना पूर्ण मोक्ष मिळालेला नाही. तरीही जेवढा लाभ पार्वतीजींना झाला, तो अधिकाऱ्याकडून उपदेश मंत्र घेतल्यामुळे झाला. नंतर श्रद्धाळूंनी त्या स्थानाची आठवण ठेवण्यासाठी ते स्थान सुरक्षित ठेवले आणि त्याच स्थानावर दर्शक जात आहेत.

जसे हा दास (संत रामपाल) स्थानास्थानांवर जाऊन सत्संग करत आहे. तेथे खीर व हलवा देखिल बनविला जातो. जे भक्तात्मा उपदेश प्राप्त करून घेतात, त्यांचे कल्याण होते. सत्संग समाप्तीनंतर सर्व तंबू आदी साहित्य काढून दुसऱ्या स्थानावर सत्संगासाठी नेण्यात येतात. पहिल्या स्थानावर केवळ माती, विटांची बनवलेली भट्टी व चुली शिल्लक राहिलेल्या असतात. नंतर जर कोणी त्या शहरातील एखादी व्यक्ति म्हणाली की या तुम्हाला ते स्थान दाखवतो, जेथे संत रामपाल दासजींचा सत्संग झालेला होता, खीर बनवलेली होती. नंतर ती भट्टी पाहायला जाणाऱ्यांना खीर मिळणार नाही, सत्संगातील अमृतवचने ऐकण्यास मिळणार नाहीत किंवा ज्यामुळे कल्याण होऊ शकेल असा उपदेशही प्राप्त होणार नाही. त्यासाठी तो संतच शोधावा लागेल. जेथे सत्संग चालू असेल, तेथेच सर्व कार्यसिद्धी होईल.

अगदी याचप्रकारे तीर्थे व धामांवर जाणे म्हणजे त्या स्मृतिस्थानरूपी भट्ट्या पाहण्यासारखेच आहे. याचे पवित्र गीता मध्ये वर्णन नसल्यामुळे हे शास्त्राविरुद्ध आहे. त्यामुळे कोणताच लाभ होणार नाही. (प्रमाण पवित्र गीता अध्याय १६ श्लोक २३ व २४)

तत्त्वज्ञानहीन संत, महंत आणि आचार्यांद्वारे भ्रमित श्रद्धाळू तीर्थे आणि धामांवर आत्मकल्याणार्थ जातात. श्री अमरनाथ यात्रेला गेलेले श्रद्धाळू तीन-चार वेळा बर्फाळ वादळामध्ये सापडून मृत्युमुखी पडले. प्रत्येक वेळा मरणाऱ्यांची संख्या हजारो होती. येथे विचार करण्यासारखा विषय असा आहे की जर श्री अमरनाथजींचे दर्शन व पूजा खरोखरच लाभदायक असेल, तर भगवान शिव त्या श्रद्धाळूंचे रक्षण का करत नाहीत? अर्थात प्रभु शिव जीही

शास्त्राविरुद्ध साधनेला अप्रसन्न आहेत.

## ''वैष्णो देवीच्या मंदिराची स्थापना कशी झाली?''

जेव्हा सतीचा (उमादेवी) आपल्या पिता राजा दक्षाच्या हवनकुंडामध्ये उडी मारल्याने जळून मृत्यू झाला, त्यावेळी भगवान शिव जी तिच्या अस्थींचा सापळा मोहवश सतीजी (पार्वतीजी) समजून दहा वर्षे खांद्यावर घेऊन वेड्यासारखे फिरत राहिले. भगवान विष्णुजींनी सुदर्शन चक्राने सतीचा तो सापळा छिन्नविछिन्न करून टाकला. जेथे तिचे धड पडले होते तेथेच तो पुरून टाकला. या धार्मिक घटनेची स्मृती कायम राहण्यासाठी त्या स्थानावर एक मंदिरासारखी स्मृती बनवली गेली, जेणेकरून भावी कालामध्ये असे कोणी म्हणून नये की पुराणामध्ये अयोग्य लिहिलेले आहे. त्या मंदिरामध्ये एक स्त्रीचे चित्र ठेवले गेले. त्याला वैष्णोदेवी असे म्हटले जाऊ लागले. त्याची देखरेख आणि श्रद्धाळू दर्शकांना त्या स्थानाची वास्तविक हकीकत सांगण्यासाठी एका पवित्र प्रामाणिक व्यक्तिची नियुक्ती करण्यात आली. त्याला इतर धार्मिक व्यक्ति थोडेफार वेतन देत होत्या. नंतर त्याच्या वंशजांनी त्या स्थानावर दान (भेट) घेण्यास प्रारंभ केला. हे वंशज श्रद्धाळूंची दिशाभूल करू लागले. ते सांगू लागले की एका व्यक्तिचा व्यापार ठप्प झाला होता. मातेच्या मंदिरामध्ये त्याने शंभर रुपये चढविण्याचा संकल्प केला आणि नारळ फोडला. आता तो अत्यंत धनवान झाला आहे. एक नि:संतान दांपत्य होते. त्याने मातेला दोनशे रुपये, साडी व सोन्याचा गळ्यातील हार चढविण्याचा संकल्प केला. त्यांना पुत्रप्राप्ती झाली.

अशाप्रकारे भोळे आत्मे ज्यामध्ये त्या सर्व साधना शास्त्रविधिरहित म्हणजेच अयोग्य लिहिलेल्या आहेत अशा या दंतकथांवर विश्वास ठेवून आपली पवित्र गीता आणि पवित्र वेदांना विसरले आहेत. त्यामुळे त्यांना कोणतेही सुख मिळत नाही किंवा कोणतीही कार्यसिद्धी होत नाही आणि परमगती म्हणजेच मुक्ति देखिल मिळत नाही. (प्रमाण पवित्र गीता च्या सोळाव्या अध्यायातील २३ व २४ वा श्लोक) अशाप्रकारे जेथे देवीचे डोळे पडले, तेथे नेत्रादेवीचे मंदिर, जेथे जिव्हा (जीभ) पडली, तेथे श्री ज्वालाजीचे मंदिर आणि जेथे धड पडले, तेथे वैष्णोदेवीच्या मंदिरांची स्थापना करण्यात आली.

## ''पुरी मधील श्री जगन्नाथजींचे मंदिर अर्थात धाम कसे बनले?''

उडिसा प्रांतामध्ये एक इंद्रदमन नावाचा राजा होता. तो भगवान श्री कृष्णजींचा अनन्य भक्त होता. एका रात्री श्री कृष्णजींनी राजाला स्वप्नात दर्शन देऊन सांगितले की जगन्नाथ नावाने माझे एक मंदिर बनव. त्याचबरोबर श्री कृष्णजींनी हे देखिल सांगितले की त्या मंदिरामध्ये मूर्तिपूजा करायची नाही. केवळ एका संतास प्रवेशित करायचे, जो दर्शकांत पवित्र गीता नुसार ज्ञानाचा प्रचार करेल. जेथे मंदिर उभारायचे होते, ते समुद्रतटावरील स्थानही दाखविले. सकाळी उठल्यावर राजा इंद्रदमनने आपल्या पत्नीला सांगितले की रात्री भगवान श्री कृष्णजी दिसले. त्यांनी मंदिर उभारण्यास सांगितले आहे. राणी म्हणाली की शुभकार्याला उशीर का करायचा? आपणाला सर्व संपत्ती त्यांनीच दिलेली आहे. त्यांनाच ती समर्पित करण्यात विचार कसला करायचा? श्री कृष्णजींनी स्वप्नामध्ये दाखविलेल्या स्थानावर राजाने मंदिर स्थापन केले, परंतु मंदिर तयार झाल्यानंतर समुद्री तुफान उठले आणि संपूर्ण मंदिर उद्ध्वस्त झाले. येथे एक मंदिर होते, याची एखादी खूनही राहिली नाही. अशाप्रकारे राजाने पाच वेळा मंदिर उभारले, पण प्रत्येक वेळी समुद्राने ते उद्ध्वस्त केले.

राजाने निराश होऊन मंदिर न उभाण्याचा निर्णय घेतला. कोणत्या जन्माचा समुद्र

प्रतिशोध घेत आहे, कोण जाणे, असा तो विचार करू लागला. कोषागारातील सगळी संपत्ती संपली तरीही मंदिर उभारले नव्हते. काही काळ लोटल्यानंतर पूर्ण परमेश्वर (कविर्देव) ज्योति निरंजन (काल) यांना दिलेल्या वचनानुसार ते राजा इंद्रदमनाजवळ आले आणि म्हणाले की हे राजा आता तू मंदिराची उभारणी कर. यावेळी समुद्र मंदिर (महाल) तोडणार नाही. राजा म्हणाला की संतजी, माझा आता यावर विश्वास नाही. मी भगवान श्री कृष्णजींच्या (विष्णु) आदेशाने मंदिर बनवत आहे. पाच वेळा मंदिर उभारले, पण श्री कृष्णजी समुद्राला रोखू शकले नाहीत. प्रत्येक वेळी असा विचार केला की भगवान माझी परीक्षा घेत असतील. परंतु, आता कोषागारातील सगळी संपत्ती संपल्यामुळे मी परीक्षा देण्यायोग्य देखिल राहिलेलो नाही. आता मंदिर बनविणे माझ्या आवाक्यातली बाब नाही. यावर परमेश्वर (कबीर साहेब) म्हणाले की हे इंद्रदमन राजा, ज्या परमेश्वराने सर्व ब्रह्माण्डांची रचना केली आहे, तोच हे सर्व कार्य सिद्धीस नेण्यास समर्थ आहे, अन्य कोणताही प्रभु नाही. मला त्या परमेश्वराची वचनशक्ति प्राप्त आहे. मी समुद्राला थांबवू शकतो. (स्वत:ला लपवून सत हे सांगत आहेत.) राजा म्हणाला की संतजी, श्री कृष्णजींपेक्षा कोणी प्रबळ शक्तियुक्त प्रभु असेल, यावर माझा विश्वासच नाही. जेथे समुद्राला ते थांबवू शकले नाहीत, तर आपण कोणत्या शेतातील मुळी आहात. माझा यावर विश्वास देखिल बसत नाही आणि मंदिर (महाल) उभारण्याएवढी माझी आर्थिक स्थिती देखिल राहिलेली नाही. संत रूपामध्ये आलेले कविर्देव (कबीर परमेश्वर) म्हणाले की हे राजन, जेव्हा मंदिर उभारण्याचे तुझ्या मनात येईल, तेव्हा तू माझ्याजवळ ये. अमुक अमुक स्थानावर माझे वास्तव्य आहे. यावेळी समुद्र मंदिरास तोडणार नाही असे सांगून प्रभु (कबीर साहेब) निघून गेले.


त्या रात्री प्रभु श्री कृष्णजींनी राजा इंद्रदमनाला पुन्हा दर्शन दिले आणि म्हणाले की हे इंद्रदमन, आता पुन्हा एक वेळा तू मंदिराची (महाल) रचना कर. तुझ्याजवळ संत रूपात जे आले होते, त्यांच्याशी संपर्क साधून साहाय्यतेची याचना कर. ते कोणी सामान्य संत नाहीत. त्यांच्या भक्तिशक्तीचा कोणताही अंत वा आरंभ नाही.

राजा इंद्रदमन खडबडून जागा झाला आणि स्वप्नातील सगळा वृत्तांत त्याने राणीला सांगितला. राणी म्हणाली की हे प्रभुंचे बोल असतील, तर तुमच्याकडून कोणतीही चूक होऊ देऊ नका. प्रभुंच्या (श्री कृष्णजी) मंदिराची पुन्हा उभारणी करा. राणीचे सद्भावनायुक्त बोल ऐकून राजा म्हणाला की आता तर कोषागार पूर्ण मोकळा झालेला आहे. जर मंदिर उभारले नाही, तर प्रभुंची अवकृपा होईल. मी तर धर्मसंकटात सापडलो आहे. राणी म्हणाली की माझ्याजवळ काही दागिने आहेत. त्यातून मंदिराची सहज उभारणी होईल. तुम्ही ते दागिने घ्या आणि प्रभुंच्या आदेशाचे पालन करा, असे म्हणत राणीने आपल्या कक्षामध्ये ठेवलेले आणि परिधान केलेले सगळे दागिने काढून प्रभुंच्या निमित्ताने पतीच्या चरणी समर्पित केले. राजा इंद्रदमन त्या स्थानावर गेला, जेथे संतरूपी परमेश्वराने त्याला यायला सांगितले होते. अपरिचित संत म्हणजेच कबीर प्रभुंचा शोध घेऊन राजाने समुद्राला रोखण्याची प्रार्थना केली. प्रभु कबीरजींनी (कविर्देव) सांगितले की ज्या दिशेने समुद्राच्या लाटा येतात, त्या दिशेला समुद्रकिनारी एक चबुतरा बनव. त्यावर बसून मी प्रभुची भक्ति करेन आणि समुद्राला थांबवेन. राजाने कारागिरांकडून एका मोठ्या दगडाला चबुतऱ्यासारखा आकार दिला. परमेश्वर कबीर साहेब त्या स्थानावर बसले. सहाव्यांदा मंदिराच्या उभारणीस प्रारंभ झाला. त्याच वेळी नाथ परंपरेतील एक सिद्ध महात्मा तेथे आले. ते राजाला म्हणाले की हे राजा, तू एक अत्यंत उत्कृष्ट मंदिर बनवत आहेस. त्यामध्ये मूर्तीची स्थापना देखिल करावी लागेल. मूर्तीशिवाय मंदिर कसले? हा माझा आदेश आहे. राजा इंद्रदमन हात जोडून म्हणाला की हे नाथजी, प्रभु श्री

कृष्णजींनी मला स्वप्नामध्ये दर्शन देऊन मंदिर बनविण्याचा आदेश दिला होता आणि सांगितले होते की या महालात (मंदिर) मूर्तीही ठेवायची नाही आणि पाखण्ड पूजाही करायची नाही. राजाचे भाष्य ऐकून नाथजी म्हणाले की स्वप्ने कधी खरी होतात काय? माझ्या आदेशाचे पालन कर आणि चंदनाच्या लाकडापासून बनविलेल्या मूर्तीची अवश्य स्थापना कर. असे सांगून नाथजी जलपान न करता निघून गेले. राजाने भयभीत होऊन चंदनाचे लाकूड मागवून घेतले आणि कारागिराला मूर्ती बनविण्याचा आदेश दिला. श्री कृष्णजींच्या एका मूर्तीची स्थापना करण्याचा आदेश श्री नाथजींनी दिला होता. नंतर इतर गुरू, संतांनी राजाला सल्ला दिला की प्रभु एकटेच कसे काय राहतील? ते तर बलरामाला नेहमी सोबत ठेवत होते. एक जण म्हणाला की सुभद्रा तर भगवान श्री कृष्णजींची लाडकी भगिनी होती. आपल्या बंधूंशिवाय ती कशी काय राहू शकेल? शेवटी तीन मूर्ती बनविण्याचा निर्णय घेतला गेला. त्यासाठी तीन कारागिरांची नियुक्ती केली गेली. मूर्ती तयार होताच त्यांचे तुकडे तुकडे झाले. अशा तीन वेळा मूर्ती भंग पावल्या. राजा अत्यंत चिंतातुर झाला. तो विचार करू लागला की माझ्या भाग्यामध्ये हे यश व पूण्यकर्म नाही. मंदिर बनते, तुटून जाते. आता मूर्ती बनवल्या, त्या देखिल तुटत आहेत. नाथजी देखिल रूष्ठ होऊन गेले आहेत. मूर्ती भंग पावत आहेत, असे जर मी त्यांना म्हटलो, तर ते म्हणतील की राजा ढोंग करत आहे. मला ते शाप तर देणार नाहीत ना? चिंताग्रस्त राजाने आहार घेतला नाही की रात्रभर त्याला झोप लागली नाही. सकाळी बेचैन अवस्थेमध्ये राजा राजदरबारामध्ये गेला. त्यावेळी पूर्ण परमात्मा (कविर्देव) कबीर प्रभु एका ऐंशीवर्षीय कारागिराचे रूप घेऊन राजदरबारमध्ये उपस्थित झाले. त्यांनी कमरेवर एक थैली अडकवलेली होती. त्या थैलीमधील आरी (कारागिराचे हत्यार) बाहेर आलेली स्पष्टपणे दिसत होती. त्यावरून न सांगताच तो कारागीर असल्याची ओळख पटत होती. त्याच्या थैलीत इतरही हत्यारे भरलेली होती. कारागिराच्या वेशातील प्रभु राजाला म्हणाले की मी असे ऐकले आहे, प्रभुंच्या मंदिरासाठी तू बनवत असलेल्या मूर्ती पूर्ण होत नाहीत. मी ऐंशी वर्षांचा वृद्ध झालो आहे आणि साठ वर्षांचा अनुभव माझ्या पाठीशी आहे. चंदनाच्या लाकडाच्या मूर्ती प्रत्येक कारागीर बनवू शकत नाही. जर आपली आज्ञा असेल, तर हा सेवक उपस्थित आहे. राजा म्हणाला की हे कारागीर, तुम्ही म्हणजे माझ्यासाठी स्वतः भगवानच कारागीर बनून आलेले आहात असे वाटते. मी अत्यंत चिंतित होतो. कोणी अनुभवी कारागीर मिळाला, तर समस्येचे निराकरण होईल, असे मला वाटत होते. तुम्ही लवकरात लवकर मूर्ती बनवून द्या. वृद्ध कारागिराच्या रूपामध्ये आलेले कविर्देव (कबीर प्रभु) म्हणाले की राजा, मला एक दालन (खोली) द्या. तेथे बसून मी प्रभुची मूर्ती तयार करेन. मी आतून दरवाजा बंद करून घेऊन सोवळ्यात मूर्ती बनवेन. जेव्हा मूर्ती तयार होतील, तेव्हाच दरवाजा उघडेल. जर मध्येच कोणी दरवाजा उघडला, तर जेवढ्या मूर्ती बनलेल्या असतील, तेवढ्याच राहून जातील. यावर जसे आपणाला योग्य वाटेल तसे करावे, असे राजा म्हणाला.

मूर्ती बनवायला सुरवात करून बारा दिवस झाले, तेव्हा नाथजी तेथे आले. त्यांनी राजाला विचारले की इंद्रदमन मूर्ती बनविल्या का? हात जोडून राजा म्हणाला की महात्माजी आपल्या आज्ञेचे पूर्णपणे पालन केले गेले आहे, परंतु माझे दुर्भाग्य असे की मूर्ती बनत नाहीत. अर्धे काम झाले असतानाच तिचे तुकडे तुकडे होतात. आपल्या सांगण्यावर नाथजींचा विश्वास बसण्यासाठी नोकराकडून मूर्तींचे तुकडे मागवून त्याने दाखविले. नाथजी म्हणाले की मूर्ती तर बनवायच्याच आहेत. आता तू त्या बनवायला घे. त्या कशा काय तुटतात ते मी बघतो. राजा म्हणाला की नाथजी, प्रयत्न तर सुरूच आहेत. प्रभुंनी पाठविलेला एक ८० वर्षांचा अनुभवी

कारागीर बंद खोलीमध्ये मूर्ती बनवत आहे. त्याने सांगितले आहे की मूर्ती तयार झाल्यानंतर तो स्वत: द्वार उघडेल. मध्येच जर कोणी द्वार उघडले, तर मूर्तींचे जेवढे काम झाले आहे, तेवढेच राहील. आज त्याने मूर्तींचे काम सुरू करून बारा दिवस होऊन गेले आहेत. आतापर्यंत तो त्या खोलीतून बाहेर आलेला नाही की त्याने अन्नपाणीही घेतलेले नाही. नाथजी म्हणाले, की मूर्ती कशा बनत आहेत, ते पाहिले पाहिजे. मूर्ती तयार झाल्यानंतर काय बघायच्या? व्यवस्थित बनल्या नसतील, त्यात काही चूक असेल, तर आपण त्याच्याकडून योग्य अशा बनवून घेऊ. असे बोलून नाथजी राजा इंद्रदमनाला सोबत घेऊन जेथे मूर्ती बनविल्या जात होत्या, त्या खोलीसमोर गेले आणि त्यांनी आवाज दिला की हे कारागिरा, दार उघड. अनेक वेळा आवाज देऊनही दार उघडले गेले नाही. तसेच आतून मूर्ती बनविण्याचा येणारा खट खट आवाजही बंद झाला. तेथूनच नाथजी म्हणाले की आपण सांगत आहात की तुम्ही ऐंशी वर्षांचे वृद्ध आहात आणि गेले बारा दिवस आपण अन्नपाणीही घेतलेले नाही. आता आतून येणारा आवाज देखिल बंद झाला आहे म्हणजे कारागिराचा मृत्यू तर झाला नाही ना? धक्का मारून दरवाजा तोडला गेला आणि पाहिले तर तीन मूर्ती ठेवलेल्या होत्या. त्या तिन्ही मूर्तींच्या हाताचे व पायाचे पंजे बनविले नव्हते. कारागीर अंतर्धान पावला होता.



परमेश्वर कबीर जी द्वारा समुद्राकडून जगन्नाथ मंदीर तोडण्यापासून वाचविले

मंदिर बनवून तयार झाले आणि आता दुसरा पर्याय नाही हे पाहून नाथजी हट्ट धरून बसले की जशा आहेत तशात मूर्तींची स्थापना करा. असे वाटते की प्रभुला हेच मान्य असेल. श्री कृष्णजी स्वतःच मूर्ती बनवून गेले असतील, असे वाटते.

मुख्य पंडितांनी शुभमुहूर्त काढला आणि दुसऱ्याच दिवशी मूर्तींची स्थापना करण्यात आली. मुख्य पंडितासह इतर सर्व पंडित, राजा, सैनिक आणि श्रद्धाळू मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना करण्यासाठी निघाले. पूर्ण परमेश्वर (कविर्देव) शूद्राचे रूप धारण करून मंदिराच्या मुख्य द्वाराच्या मधोमध मंदिराकडे तोंड करून उभे राहिले. मागून प्रभुंच्या प्राणप्रतिष्ठापनेसाठी सेना येत आहे, याचे आपणाला ज्ञानच नाही, अशी ते लीला करत होते. सगळ्यात पुढे मुख्य पंडित चालत होता. तरीही परमेश्वर दरवाजाच्या मध्येच उभे राहिले. मुख्य पंडिताने शूद्र रूपामध्ये उभारलेल्या परमेश्वराला असा धक्का मारला की ते दूर जाऊन पडले. तसेच एकांत स्थानी

शूद्रासारख्या लीला करत बसले. राजासह सर्व श्रद्धाळूंनी मंदिरात जाऊन पाहिले तर सर्व मूर्तींनी दरवाजात आडव्या उभारलेल्या शूद्र रूपातील परमेश्वराचे रूप धारण केले होते. या लीला पाहून उपस्थित सर्व व्यक्ती आश्चर्यचकित झाल्या. मुख्य पंडित म्हणू लागला की मुख्य द्वार त्या शूद्राने अशुद्ध केल्यामुळे प्रभु क्रोधित झाले आहेत. त्यामुळेच मूर्तींनी शूद्र रूप धारण केले आहे. हे अत्यंत अनिष्ठ घडले आहे. काही वेळानंतर मूर्ती वास्तविक रूपामध्ये आल्या. त्यानंतर अनेक वेळा गंगाजलाने शुचिर्भूत करून प्राणप्रतिष्ठापना केली गेली. (कविर्देव म्हणाले की अज्ञान आणि पाखण्डीपणाची चरणसीमा बघा. कारागीर भगवानाची मूर्ती बनवतात. त्यानंतर पुजारी किंवा अन्य संत त्या मूर्तिरूपी प्रभुमध्ये प्राणांची प्रतिष्ठापना करतात म्हणजेच प्रभुला जीवनदान देतात. तेव्हा ते माती किंवा लाकडापासून बनविलेले प्रभु कार्य सिद्धीस नेतात? वाह रे वाह पाखण्ड्यांनो, चांगलेच मूर्ख बनविले प्रभुप्रेमी आत्म्यांना.)

मूर्तींची स्थापना झाल्यानंतर काही दिवसांनी ज्याला समुद्री वादळ म्हणतात, अशी सुमारे ४० फूट उंचीची समुद्राच्या पाण्याची लाट मंदिराच्या दिशेने येऊ लागली. समोर कबीर परमेश्वर चबुतऱ्यावर बसले होते. त्यांनी आशीर्वाद देत असल्यासारखा आपला एक हात वर केला. लाटरूपी समुद्र जागच्या जागी थांबला आणि पर्वतासारखी त्याची अवस्था झाल्याने तो पुढे येऊ शकला नाही. ब्राह्मणाचे रूप धारण करून आलेला समुद्र चबुतऱ्यावर बसलेल्या प्रभूंना म्हणू लागला की हे भगवान, आपण माझी वाट मोकळी करा, मी हे मंदिर तोडणार आहे. प्रभु म्हणाले की हे मंदिर नाही. हा तर महाल (आश्रम) आहे. त्यामध्ये विद्वान पुरुषाचे वास्तव्य असेल आणि तो पवित्र गीता चे ज्ञान देत राहील. या महालाचा विध्वंस करणे आपणाला शोभा देत नाही. समुद्र म्हणाला की मी हे मंदिर तोडणारच. प्रभु म्हणाले, की, जा, कोण तुला आडवत आहे? समुद्र म्हणाला की मी विवश झालो आहे. आपली शक्ति अपार आहे. प्रभु, तुम्ही मला वाट द्या. परमेश्वर कबीर साहेबांनी विचारले की तुम्ही असे का करत आहात? ब्राह्मण रूपातील समुद्र म्हणाला की जेव्हा हा श्री कृष्ण त्रेतायुगामध्ये श्री रामचंद्रांच्या रूपामध्ये आला होता, तेव्हा त्याने मला अग्निबाण दाखवून बरेवाईट बोलत अपमानित करून मार्ग मागितला होता. मी त्याचाच प्रतिशोध घेण्यास जात आहे.

परमेश्वर कबीरजी म्हणाले की प्रतिशोध तर आपण पूर्वीच घेतला आहे. आपण द्वारिकानगरी बुडवलेली आहे. समुद्र म्हणाला की मी अजूनही द्वारिकानगरी पूर्णपणे बुडवू शकलेलो नाही. अर्धी बुडायची राहिली आहे. त्या वेळी देखिल एक प्रबल शक्तियुक्त संत समोर आला होता. त्यामुळे मी द्वारिकेस पूर्णपणे बुडवून स्वत:मध्ये सामावून घेऊ शकलो नाही. आता देखिल प्रयत्न करत आहे, परंतु मी तिकडे जाऊ शकत नाही. तिकडून मला बंधन घालण्यात आले आहे.

तेव्हा परमेश्वर कबीर (कविर्देव) यांनी सांगितले की तेथे देखिल मीच पोहचलो होतो. मीच ते अवशेष वाचविले होते. आता जा आणि शिल्लक राहिलेल्या द्वारिकेस गिळंकृत कर, परंतु ती स्मृती तशीच सोडून दे, जेथे श्री कृष्णजींच्या शरीरावर अंतिम संस्कार केले होते. (या स्थळावर अत्यंत विशाल मंदिर बनविले गेले. ही स्मृती प्रमाण बनून राहील, की वास्तवामध्ये श्री कृष्णजींचा मृत्यू झालेला होता आणि पंच महाभूतांपासून बनलेले शरीर ते सोडून गेले होते. नाहीतर भावी कालामध्ये समाज म्हणेल की श्री कृष्णजींचा मृत्यूच झालेला नव्हता.) कबीरजींकडून आज्ञा मिळताच शिल्लक राहिलेल्या द्वारिकानगरीलाही समुद्राने बुडविले. परमेश्वर कबीरजी (कविर्देव) यांनी सांगितले की आता आपण यापुढे कधीही हे जगन्नाथ मंदिर तोडण्याचा प्रयत्न करू नका, तसेच या मंदिरापासून दूर निघून जावे. प्रभुंच्या या आज्ञेला मान

देऊन, नमस्कार करून मंदिरापासून समुद्र सुमारे दीड किलोमीटर मागे हटला. अशाप्रकारे श्री जगन्नाथजींचे मंदिर अर्थात धाम स्थापित झाले आहे.

## ''श्री जगन्नाथाच्या मंदिरामध्ये अस्पृश्यता प्रारंभापासून नव्हती''

काही दिवसांनंतर ज्या पंडिताने प्रभु कबीरजींना शूद्र रूपामध्ये असताना धक्का मारला होता, त्याला कुष्ठरोग झाला. सर्वप्रकारचे औषधोपचार करूनही काहीही फरक पडला नाही. कुष्ठरोगाचा त्रास अधिकाधिक वाढतच गेला. त्याने सर्वप्रकारच्या उपासना देखिल केल्या. श्री जगन्नाथजींसमोर रडून रडून संकटनिवारणासाठी प्रार्थना केली, परंतु सर्व प्रयत्न निष्फळ गेले. स्वप्नामध्ये श्री कृष्णजींनी दर्शन दिले आणि सांगितले की हे पंडिता, ज्या संतांना तू मंदिराच्या मुख्य द्वारावर धक्का मारला होतास, त्यांचे चरण धुवून ते अमृत तू प्राशन कर. त्यानंतरच जर त्यांनी तुला हृदयातून क्षमा केली, तर त्यांच्या आशीर्वादाने तुझा हा असाध्य कुष्ठरोग बरा होऊ शकेल, अन्यथा नाही. आता तो हे करेल, नाही तर काय मरणाला सामोरा जाईल?

तो मुख्य पंडित सकाळी लवकर उठला आणि आपल्या सहयोगी पंडितांना सोबत घेऊन जेथे प्रभु कबीर शूद्र रूपामध्ये विराजमान होते त्या स्थानावर गेला. जेव्हा पंडित प्रभुंच्या जवळ आला, तेव्हा परमेश्वर कबीर साहेब उठून चालू लागले ते म्हणाले की हे पंडिता, मी तर अस्पृश्य आहे. माझ्यापासून तू दूर राहा, नाही तर तू अपवित्र होशील. पंडित प्रभुंच्या जवळ गेला, तर परमेश्वर आणखी पुढे चालू लागले. त्यावेळी पंडित ओक्साबोक्शी रडू लागला आणि म्हणाला की हे पालनकर्त्या, माझ्या हातून चूक घडली, मला क्षमा करा. तेव्हा दयाळू प्रभु थांबले. पंडिताने आदराने एक स्वच्छ वस्त्र जमिनीवर अंथरले आणि प्रभुंना बसण्याची प्रार्थना केली. ते त्या वस्त्रांवर बसले, तेव्हा पंडिताने त्यांचे चरण स्वत: धुतले आणि ते चरणामृत पात्रामध्ये घेतले. प्रभु कबीर साहेब जी म्हणाले की हे पंडिता, हे चरणामृत चाळीस दिवस प्राशन कर आणि अंघोळीच्या पाण्यामध्ये यातील थोडे टाकून अंघोळ करत जा. चाळिसाव्या दिवशी तुझा कुष्ठरोग बरा होईल. प्रभुंनी असेही सांगितले की भविष्यामध्येही या जगन्नाथजींच्या मंदिरामध्ये कोणी अस्पृश्यता मानली, तर त्यालाही दंड मिळेल. उपस्थित सर्व व्यक्तींनी वचन दिले की येथून पुढे या पवित्र स्थानी कोणीही स्पृश्यास्पृश्यता पाळणार नाही.

विचार करा : हिंदुस्थानातील असे एकच मंदिर आहे, की जेथे सुरवातीपासूनच स्पृश्यास्पृश्यता पाळली जात नाही.

मलाही (रामपालजी) ते स्थान पाहण्याची संधी मिळाली. काही पुरावे मिळतील, या उद्देशाने अनेक सेवकांसोबत ते स्थळ पाहण्यासाठी गेलो होतो. तेथे सर्व पुरावे आज देखिल जसेच्या तसे मिळाले. ज्या दगडाच्या चबुतऱ्यावर बसून मंदिर वाचविण्यासाठी कबीर परमेश्वरजींनी समुद्रास थांबविले होते, तो आजही तेथे आहे. स्मृती म्हणून त्यावर एक घुमट बनविलेला आहे. तेथे अत्यंत पुरातन महंत (राखणदार) परंपरेचा एक आश्रम आजही आहे. तेथे सुमारे सत्तर वर्षीय वृद्ध महंतांना समुद्रापासून मंदिराच्या रक्षाणासंदर्भात माहिती विचारली असता त्यांनी देखिल हेच सांगितले. ते म्हणाले की माझे पूर्वज कित्येक पिढ्यांपासून येथे महंत (राखणदार) बनून राहिलेले आहेत. या ठिकाणीच श्री धर्मदास साहेब व त्यांची पत्नी भक्तिमती आमनीदेवी यांनी शरीराचा त्याग केला होता. त्या दोघांच्या समाध्याही एका ठिकाणीच बांधलेल्या दिसल्या.

नंतर आम्ही श्री जगन्नाथजींच्या मंदिरामध्ये गेलो. तेथे आज देखिल मूर्तिपूजा होत नाही, परंतु प्रदर्शनासारख्या त्या मूर्ती तेथे ठेवलेल्या आहेत.

भगवान श्री कृष्णजी, श्री बलरामजी आणि त्यांची भगिनी सुभद्राजी यांच्या मंदिरात स्थापन केलेल्या मूर्ती आजही तेथे आहेत. त्यांच्या दोन्ही हातांना पंजे नाहीत, दोन्ही हात तुटलेले आहेत. त्या मूर्तींची पूजाही केली जात नाही. त्या केवळ दर्शनार्थ ठेवलेल्या आहेत. तेथे एका मार्गदर्शक (गाईड) पंडिताला विचारले की माझ्या ऐकण्यात असे आले आहे की समुद्राने हे मंदिर पाच वेळा तोडले. परत त्याची उभारणी केली गेली. समुद्राने मंदिर तोडण्यामागचे कारण काय? नंतर समुद्रास कोणी थांबविले? पंडित म्हणाला की याबाबत मला एवढी माहिती नाही. ही सर्व कृपा जगन्नाथजींची होती. त्यांनीच समुद्राला रोखले. ऐकण्यात तर असे आले आहे की, समुद्राने तीन वेळा मंदिर तोडले होते. मी पुन्हा प्रश्न केला की पहिल्यांदा मंदिर उभारले गेले, त्यावेळीच प्रभुंनी समुद्राला का रोखले नाही? पंडिताने उत्तर दिले, ही सगळी जगन्नाथाची लीला आहे!

मी पुन्हा विचारले की, या मंदिरामध्ये स्पृश्यास्पृश्यता आहे की नाही? तो म्हणाला की जेव्हा मंदिर बनले, तेव्हापासून येथे कोणताही स्पृश्य-अस्पृश्य असा भेदभाव नाही. मंदिरामध्ये शूद्र आणि पंडित एकाच थाळीमध्ये अथवा पंगतीमध्ये भोजन करू शकतात. त्याला कोणीही मनाई करू शकत नाही. मी प्रश्न केला की पंडितजी अन्य हिन्दू मंदिरांमध्ये तर पूर्वी अत्यंत स्पृश्य-अस्पृश्य भेदभाव मानला जात होता. या मंदिरामध्ये का नाही? प्रभु तर तेच आहेत. पंडिताने उत्तर दिले की लीला आहे जगन्नाथाची.

हे पुण्यात्म्यांनो, आता विचार करा, लीला आहे जगन्नाथाची असे सांगून सत्य किती दाबले गेले आहे बघा. पवित्र स्मृतिस्थाने आदरणीय आहेत, परंतु आत्मकल्याण केवळ पवित्र गीता व पवित्र वेदांमध्ये वर्णित, तसेच परमेश्वर कबीर साहेबजींद्वारा दिलेल्या तत्त्वज्ञानानुसार भक्तिसाधना करण्यानेच संभव आहे. ते शास्त्राविरुद्ध झाल्यास मानवी जीवन व्यर्थ जाईल. (प्रमाण : गीता च्या १६ व्या अध्यायातील २३ व २४ वा श्लोक.) प्रभुंच्या आदेशानुसार श्री जगन्नाथांच्या मंदिरात पवित्र गीता तील ज्ञानमहिमेचे गुणगान होणेच श्रेयस्कर आहे. तसेच श्रीमद् भगवत गीता मध्ये जसा भक्तिविधी आहे, तशीच साधना करण्यात आत्मकल्याण शक्य आहे. केवळ जगन्नाथजींचे दर्शन किंवा खिचडीचा प्रसाद भक्षण करून कोणताही लाभ होणार नाही. कारण या क्रियेचे श्री गीता मध्ये वर्णन नसल्यामुळे ते शास्त्रविरुद्ध आहे. याचे प्रमाण गीता च्या १६ व्या अध्यायातील २३ व २४ वा श्लोकांमध्ये आहे.

## ''स्वर्गाची परिभाषा आहे काय?''

उदाहरण : स्वर्ग म्हणजे एक हॉटेल (रेस्टॉरंट) समजू या. एखादी धनाढ्य व्यक्ति उन्हाळ्याच्या ऋतूमध्ये सिमला किंवा कुलूमनाली यांसारख्या थंड हवेच्या शहरांमध्ये जाते. जेथे खोलीचे भाडे आणि आहाराचा खर्च द्यावा लागतो अशा एखाद्या हॉटेलामध्ये तो उतरतो. दोन-तीन महिन्यांमध्ये वीस-तीस हजार रुपये खर्च करून त्याला पुन्हा आपल्या कार्यक्षेत्राकडे यावे लागते. त्यानंतर दहा महिने त्याला कष्ट करावे लागतील. परत दोन महिने आपली मिळकत अशा हॉटेलमध्ये खर्च करून पुन्हा परत यावे लागते. जर एखाद्या वर्षी कमाई चांगली झाली नाही, तर त्या दोन महिन्यांच्या सुखालाही मुकावे लागते.

अगदी अशाचप्रकारे स्वर्ग समजू या. पृथ्वीलोकामध्ये साधना करून भक्त काही काल स्वर्गरूपी हॉटेलमध्ये जातो. नंतर आपली पुण्याची कमाई खर्च करून पापकर्माच्या आधारावर पुन्हा नरक आणि ८४ लक्ष प्राण्यांच्या शरीरामध्ये (योनीमध्ये) त्याला कष्ट भोगावे लागतात.

जोपर्यंत तत्त्वदर्शी संत मिळणार नाही, तोपर्यंत जन्म-मृत्यू, स्वर्ग-नरक व ८४ लक्ष

योन्यांचे कष्ट आहेत तसेच राहतील. कारण केवळ पूर्ण परमात्म्याचे सतनाम् किंवा सारनामच पापांचा नाश करते. अन्य प्रभुंच्या पूजेने पाप नष्ट होत नाही. सर्व कर्माचे जसेच्या तसे फळ प्राप्त होते.

यासाठीच गीता च्या ८ व्या अध्यायातील १६ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की ब्रह्मलोकापर्यंत (महास्वर्ग) सर्व लोक नाशवान आहेत. जर स्वर्ग आणि महास्वर्गच राहणार नाहीत तर साधकाचे ठिकाण कोठे असेल, याचा कृपया विचार करावा.

प्रश्न :- गीता चा नित्यपाठ करण्याने कोणताच लाभ नाही काय? कुत्र्याला भाकरी, भुकेलेल्यांना अन्न, मुंग्यांना साखर, पीठ, तीर्थस्थानावर अन्नदान (भंडारा) आदी प्रकारे जो दानधर्म केला जातो, तेही सर्व व्यर्थ आहे काय?

उत्तर :- धार्मिक सद्ग्रंथांच्या वाचन-पठणाने ज्ञानयज्ञाचे फळ मिळते, परंतु मोक्ष मिळत नाही. ज्या उद्देशाने यज्ञ केला गेला, त्याचे फळ मिळेल किंवा काही कालासाठी स्वर्गप्राप्ती देखिल होईल, परंतु मोक्ष मिळणार नाही. सद्ग्रंथांमध्ये जी साधना करण्याचा निर्देश केला गेला आहे किंवा एखादी साधना करू नये, असे सांगितले असेल, तर त्याची कायम आठवण राहावी आणि त्यात कोणतीही चूक होऊ नये, ज्यामुळे आपण वास्तविक उद्देशाचा त्याग करून किंवा चुकीच्या मार्गाने शास्त्रविधीचा त्याग करून मन मानेल तसे आचरण (पूजा) करू नये व मनुष्य जीवनाचा मूळ उद्देश आत्मकल्याण, जो फक्त शास्त्र अनुकूल भक्तिसाधना करण्याने संभव आहे, याची स्मृती कायम बनून राहावी हेच नित्यपाठ करण्याचे मुख्य कारण आहे.

एका जमीनदाराला वृद्धावस्थेमध्ये पुत्रप्राप्ती झाली. त्याने विचार केला की जेव्हा हा बालक तरुण होईल, आपल्या शेतीचे, जमिनीचे काम सांभाळण्यायोग्य होईल तेव्हा मला मृत्यू यावा. त्या शेतकऱ्याने आपले अनुभव लिहून ठेवले आणि आपल्या पुत्राला सांगितले की जेव्हा तू तरुण होशील, तेव्हा आपल्या शेतीचे, जमिनीचे सर्व व्यवहार समजण्यासाठी माझा हा अनुभवांची नोंद केलेला लेख दररोज वाचत जा आणि शेती कर. वडिलांच्या मृत्यूनंतर शेतकऱ्याचा पुत्र दररोज तो अनुभव लिहिलेला लेख वाचे, परंतु त्यामध्ये जसे वर्णन केलेले आहे, त्याप्रमाणे आचरण करत नाही. असे असेल तर तो शेतकऱ्यांचा पुत्र धनाढ्य होऊ शकेल काय? ते कधीही शक्य नाही. आपल्या वडिलांनी अनुभवांच्या लेखामध्ये जसे लिहिलेले आहे, त्याप्रमाणेच त्याचे आचरण असले पाहिजे.

अगदी अशाप्रकारे पवित्र गीता चा पाठ (वाचन) श्रद्धाळू नित्यनेमाने करत आहेत, परंतु त्यांची साधना सद्ग्रंथांच्या बरोबर उलटी आहे. यामुळेच गीता च्या १६ व्या अध्यायातील २३ व २४ व्या श्लोकांनुसार ही सर्व साधना व्यर्थ आहेत.

जशी त्रिगुणांची (रजगुण- ब्रह्मा जी, सतगुण- विष्णु जी, तमगुण- शिव जी) पूजा गीता च्या ७ व्या अध्यायातील १२ ते १५ आणि २० ते २३ या श्लोकांमध्ये अमान्य केलेली आहे. श्राद्ध घालणे म्हणजे पितरपूजा, पिंडदान, अस्थिविसर्जन, तेरावा, दहावा, सतरावा, महिना, सहामाही, वर्षश्राद्ध घालणे हे सर्व गीता च्या ९ व्या अध्यायातील २५ व्या श्लोकामध्ये अमान्य केलेले आहे. कोणतेही व्रत करण्यास गीता च्या ६ व्या अध्यायातील १६ व्या श्लोकामध्ये मनाई केलेली आहे. त्यामध्ये लिहिलेले आहे की हे अर्जुना, योग (भक्ती) काहीच न खाणाऱ्यांना (व्रत, उपवास ठेवणाऱ्यांना) कधीच सिद्ध होत नाही. त्यामुळे व्रत (उपवास) करण्यास मनाई आहे.

भुकेलेल्यांना भोजन देणे, कुत्रे, जीवजंतू, पशू यांना पोटाला खायला घालण्यात वाईट

काही नाही, परंतु पूर्ण संतांच्या माध्यमातून त्यांच्या आज्ञेनुसार दान, यज्ञ आदी करणे पूर्ण लाभदायक आहे.

एखादा कुत्रा कारमधील मालकाच्या सीटवर बसून प्रवास करतो. त्याचा ड्रायव्हर मात्र मनुष्य होतो. त्या पशूला सामान्य माणसापेक्षाही अधिक सुविधा प्राप्त होतात. त्या मालकाबरोबरच त्याच्यासाठी स्वतंत्र खोली, पंखा किंवा कूलर लावलेला असतो.

जेव्हा तो अज्ञानी प्राणी मानवी शरीरामध्ये होता, त्यावेळी त्याने दानधर्मही केला, परंतु ते शास्त्रविधीच्या विपरीत मनमानी आचरण (पूजा) असल्यामुळे लाभदायक झाले नाही. प्राणी जसे कर्म करेल, तसेच त्याला फळ मिळेल, हे प्रभुचे विधान (नियम) आहे. जोपर्यंत तत्त्वदर्शी संत म्हणजेच पूर्ण परमात्म्याचा मार्गदर्शक मिळत नाही, तोपर्यंत हे विधान लागू पडते.

प्राणी जसे कर्म करतो तसेच फळ त्याला प्राप्त होते, या विधानानुसार तो तीर्थस्थाने आणि धामांवर किंवा अन्य स्थानांवर अन्नदानाद्वारे (भंडारा) कुत्र्यांना किंवा इतर प्राण्यांना अन्न खायला घालून कर्मांच्या आधारावर कुत्र्याच्या योनींमध्ये गेला. तेथे देखिल केलेल्या कर्माचे फळ मिळाले. कुत्र्याच्या जीवनामध्ये आपली पूर्वजन्मातील शुभ कर्मांची कमाई संपवून तो गाढवाच्या योनीमध्ये जाईल. त्या जीवनामध्ये त्याच्या सर्व सुविधा काढून घेतल्या जातील. संपूर्ण दिवसभर मातीच्या कच्च्या, पक्क्या विटा वाहून नेईल. त्यानंतर अन्य प्राण्यांच्या शरीरामध्ये जन्म घेऊन कष्ट सहन करत राहील आणि नरक देखिल भोगावा लागेल. ८४ लक्ष योन्यांचे कष्ट भोगून पुन्हा मनुष्य शरीर प्राप्त होईल. त्या जन्मी पुन्हा त्याच्या हातून भक्ति घडते किंवा नाही याची खात्री काय? धाम अथवा तीर्थस्थानांना जाताना किंवा प्रवास करताना जेवढे जीवजंतू मरतात, त्याचे पाप देखिल तीर्थ किंवा धामाची यात्रा करणाऱ्यास भोगावे लागते. जोपर्यंत पूर्ण परमात्म्याची वास्तविक सत्यसाधना सांगणारा पूर्ण संत मिळत नाही, तोपर्यंत पापनाश (क्षमा) होऊ शकत नाही. कारण ब्रह्मा, विष्णु, महेश, ब्रह्म (क्षर पुरुष/काल), तसेच परब्रह्म (अक्षर पुरुष) यांची साधना करून पापाचा नाश (क्षमा) होत नाही. त्यामुळे पाप अन् पुण्य या दोन्हीचे फळ भोगावे लागतेच. जर प्राण्याने गीता ज्ञानानुसार पूर्ण संतांना शरण जाऊन पूर्ण परमात्म्याची साधना केली, तर तो एक तर सतलोकी जाईल किंवा पुन्हा मनुष्य शरीर प्राप्त करेल. पूर्व पुण्याईच्या आधारावर त्याला पुन्हा कोणी तरी तत्त्वदर्शी संत प्राप्त होतो आणि तो प्राणी पुन्हा शुभ कर्म करून मुक्त होतो म्हणजे पुन्हा ८४ लक्ष योनींमध्ये कधीच न जाता सतलोकी पूर्ण मुक्तिचा अलौकिक आनंद प्राप्त करतो.

यासाठीच वरीलप्रमाणे मनमानी आचरण लाभदायक नाही.

प्रश्न :- गीता च्या ३ ऱ्या अध्यायातील ३५ वा श्लोक व १८ व्या अध्यायातील ४७ व्या श्लोकामध्ये म्हटलेले आहे की चांगल्या प्रकारचे आचरण हा आपला धर्म इतर दुसऱ्या गुणरहित धर्मापेक्षा अतिउत्तम आहे. आपल्या धर्मामध्ये मरण येणे हे देखिल कल्याणकारी आहे. दुसऱ्यांचा धर्म भय देणारा आहे. यावरून असे सिद्ध होते की जो जशा प्रकारची पूजा करत असेल, तिचा त्याग करू नये. आपल्या धर्मामध्ये मरणे देखिल कल्याणकारक आहे काय?

उत्तर :- जर गीता च्या ३ ऱ्या अध्यायातील ३५ वा श्लोक व १८ व्या अध्यायातील ४७ व्या श्लोकाचा अर्थ जो जशा प्रकारची पूजा करत आहे, त्याने ती तशीच करत राहिले पाहिजे, तिचा त्याग करू नये असा असेल, तर पवित्र श्रीमद् भगवत गीता मधील ज्ञानाची काय आवश्यकता होती? फक्त एका श्लोकावरच सर्व काही साध्य झाले असते. श्री गीता च्या या श्लोकांचा भावार्थ योग्य आहे, परंतु अनुवादकर्त्यांनी त्याचा अर्थ विपरीत केलेला आहे. कृपया

या दोन्ही श्लोकांचा वास्तविक अर्थ खालीलप्रमाणे वाचावा–

३ ऱ्या अध्यायातील ३५ वा श्लोक

श्रेयान्, स्वधर्म, विगुणः, परमधर्मात्, स्वनुष्ठितात्, स्वधर्मे, निधनम्, श्रेयः, परधर्मः, भयावहः।।

अनुवाद :– (विगुण:) गुणरहित अर्थात शास्त्रविधीचा त्याग करून (स्वनुष्ठितात्) स्वत:च्या मनाप्रमाणे चांगल्या प्रकारे आचरणामध्ये आणलेली (परमधर्मात्) दुसऱ्यांच्या धार्मिक पूजेपेक्षा (स्वधर्म) आपल्या शास्त्रविधीनुसार पूजा (श्रेयान्) अतिउत्तम आहे. शास्त्रानुकूल (स्वधर्मे) आपल्या पूजेमध्ये तर (निधनम्) मरणेही (श्रेय:) कल्याणकारक आहे आणि (परधर्म:) दुसऱ्यांची पूजा (भयावह:) भय देणारी आहे.

१८ व्या अध्यायातील ४७ वा श्लोक

श्रेयान्, स्वधर्मः, विगुण:, परधर्मात्, स्वनुष्ठितात्, स्वभावनियतम्, कर्म, कुर्वन्, न, आप्नोति, किल्बिषम्।।

अनुवाद :– (विगुण:) गुणरहित (स्वनुष्ठितात्) स्वतःच्या मनाप्रमाणे केलेले शास्त्रविधिरहित चांगल्या प्रकारचे आचरण (परधर्मात्) दुसऱ्याच्या धर्म म्हणजेच धार्मिक पूजेपेक्षा (स्वधर्मः) आपला धर्म म्हणजेच शास्त्रविधीनुसार धार्मिक पूजा (श्रेयान्) श्रेष्ठ आहे. (स्वभावनियतम्) स्वत:च स्वभावानुसार बनवलेले मन मानेल तसे आचरण करण्याने (कर्म) भक्तिकर्म (न) नको (कुर्वन) करू (किल्बिषम्) ज्यामुळे पापास (आप्नोति) प्राप्त होतो. विशेष :– याचे प्रमाण गीता च्या १७ व्या अध्यायातील पहिल्या ते ६ व्या श्लोकांमध्ये स्पष्ट केलेले आहे.

या श्लोकांमधून असे स्पष्ट होते की आपली शास्त्रविधीअनुसार भक्तिसाधना श्रेष्ठ आहे. दुसऱ्यांची भक्तिसाधना कितीही चमकधमकणारी, सुनियोजित वाटली, तरी ती हानिकारक असते.

मातेचे जागरण करणारे अत्यंत मधुर, सुरेल आवाजामध्ये स्वयंरचित कविता, गीता साग्रसंगीत गाऊन माता दुर्गेची स्तुती करतात. या (स्वुनष्ठितात्) स्वयंनिर्मित शास्त्रविधिरहित साधनेकडे आकर्षित होऊन आपल्या शास्त्रानुकूल साधनेचा त्याग करू नये. एखादा साधक सतसाधना करू लागला की तो पितर पूजा, मंदिरात जाणे अशा पूर्वीच्या शास्त्राविरुद्ध असलेल्या सर्व पूजांचा त्याग करतो. त्यावेळी इतर शास्त्रविधीविरुद्ध साधना करणारे तुम्ही सर्व पूजांचा त्याग केला आहे, त्यामुळे सर्व देव तुमच्यावर कोप धरतील, असे म्हणतील. एका व्यक्तीने असेच केले होते. त्याचा एकुलता मुलगा मरण पावला. त्यामुळे त्याच्या मनात दुसरे करतात त्या शास्त्रविरुद्ध साधनेचे भय निर्माण झाले, परंतु आपली शास्त्रअनुकूल भक्तिसाधना अंतिम श्वासापर्यंत करत राहणेच कल्याणकारक आहे.

प्रश्न :– मी गीता च्या ६ व्या अध्यायातील १० ते १५ या श्लोकांमध्ये वर्णन केलेल्या विधीनुसार एका आसनावर बसून शिरासह इतर अवयव सम करून ध्यान करत आहे. एकादशीचे व्रत देखिल करतो. अशाप्रकारे मला शांती मिळेल का?

उत्तर :– कृपया, आपण गीता च्या ६ व्या अध्यायातील १६ वा श्लोक वाचा. यामध्ये लिहिलेले आहे की हे अर्जुन, हा योग (साधना) अधिक भोजन खाणाऱ्यांना सिद्ध होत नाही किंवा काहीही न खाणाऱ्यांनाही (व्रत, उपवास करणाऱ्यांना) सिद्ध होत नाही. अधिक जागरण करणाऱ्यांना किंवा अधिक झोपणाऱ्यांना देखिल तो सिद्ध होत नाही. एका स्थानावर बसून साधना करणाऱ्यांनाही तो सिद्ध होत नाही. गीता च्या ६ व्या अध्यायातील १० ते १५ व्या श्लोकांपर्यंत वर्णन केलेल्या विधींचे खण्डन गीता च्या ३ ऱ्या अध्यायातील ५ व्या ते ९ व्या

श्लोकांमध्ये केलेले आहे. त्यामध्ये जी मूर्ख व्यक्ती समस्त कर्मेंद्रियांना हटपूर्वक रोखून म्हणजेच एका स्थानावर बसून चिंतन करते, ती पाखण्डी म्हटली जाते, असे वर्णन आहे. त्यामुळे कर्मयोगीच (कार्य करत करत भक्तिसाधना करणारा साधक) श्रेष्ठ आहे. वास्तविक भक्तिविधीसाठी गीता ज्ञानदाता प्रभु (ब्रह्म) एखाद्या तत्त्वदर्शी संताचा शोध घेण्यास सांगत आहे. (गीता च्या ४ थ्या अध्यायातील ३४ वा श्लोक). यावरून असे सिद्ध होते की गीता ज्ञानदात्याद्वारे (ब्रह्म) सांगितली गेलेली भक्तिविधी पूर्ण नाही. त्यामुळेच गीता च्या ६ व्या अध्यायातील १० ते १५ श्लोकांपर्यंत ब्रह्मद्वारा (क्षर पुरुष-काल) सांगितलेले त्याच्या स्वत:च्या साधनेचे वर्णन आहे. तसेच गीता च्या ७ व्या अध्यायातील १८ व्या श्लोकामध्ये आपल्या भक्तिसाधनेने मिळणाऱ्या शांतीला अतिनीच (अनुत्तमाम्) असे म्हटलेले आहे. गीता च्या ६ व्या अध्यायातील १० ते १५ श्लोकांमध्ये म्हटलेले आहे की मन आणि इंद्रियांना वश करू इच्छिणाऱ्या साधकाने एक विशेष आसन तयार करावे. ते अधिक उंच नसावे किंवा कमी उंचीचेही नसावे. अशा आसनावर बसून चित्त तसेच इंद्रियांना वश करून मन एकाग्र करण्याचा अभ्यास करावा. सरळ (ताठ) बसून ब्रह्मचर्याचे पालन करत मनाला लगाम लावत प्रयाण करावे. अशी साधना करणारा साधक माझ्यामध्ये वास करणाऱ्या (निर्वाणपरमाम्) पूर्ण शक्तिहीन म्हणजेच पूर्णपणे मेलेल्या (नाममात्र) शांतीस प्राप्त होतो. म्हणूनच गीता च्या ७ व्या अध्यायातील १८ व्या श्लोकामध्ये आपल्या साधनेने मिळणाऱ्या गतीला (लाभ) अतिनीच (अनुत्तमाम्) म्हटलेले आहे. याच गीता च्या १८ व्या अध्यायातील ६२ वा श्लोक व १५ व्या अध्यायातील ४ थ्या श्लोकामध्ये म्हटलेले आहे की हे अर्जुना, तू परमशांती व सतलोकास प्राप्त होशील. त्यानंतर पुनर्जन्म होत नाही, तर पूर्ण मोक्ष मिळतो. मी देखिल (गीता ज्ञानदाता प्रभु-ब्रह्म-काल) त्याच आदिनारायण पुरुष परमेश्वराला शरण आहे. त्यामुळे पूर्ण परमेश्वरांची भक्तिसाधना व पूजा दृढनिश्चयाने केली पाहिजे.

आपल्या साधनेला अडथळा ठरणाऱ्या ज्ञानाच्या आधारावर सांगितलेल्या मार्गाला ६ व्या अध्यायातील ४७ व्या श्लोकामध्ये देखिल स्वत: (युक्ततम: मत:) अर्थात अज्ञानाचा अंधकार असलेले विचार असे म्हटले आहे. इतर अनुवादकर्त्यांनी मे 'युक्ततम: मत:'चा अर्थ 'परमश्रेष्ठ मान्य आहे,' असा केलेला आहे, परंतु 'हे माझे अडचणीत आणणारे अज्ञानरूपी अंधकाराच्या आधारावर दिलेले मत आहे,' असा त्याचा अर्थ घ्यायला पाहिजे. कारण याच्या यथार्थ ज्ञानाविषयी योग्य तत्त्वदर्शी संताकडून माहिती घेण्यास सांगितलेले आहे. (गीता च्या ४ थ्या अध्यायातील ३४ वा श्लोक).

गीता च्या ६ व्या अध्यायातील ४७ व्या श्लोकाचा वास्तविक अनुवाद

योगिनाम्, अपि, सर्वेषाम्, मदगतेन, अन्तरात्मना,
श्रद्धावान्, भजते, य:, माम्, स:, मे, युक्ततम:, मत: ।।

अनुवाद :- माझ्याद्वारे दिलेला भक्तिविचार जो अडखळ (अडचण) आणणारा हा श्लोक १० ते १५ मध्ये वर्णित पूजा विधीचे आहे. जे मी अनुमानाने सांगितलेली आहे. ते पूर्ण ज्ञान नाही. कारण की, (सर्वेषाम्) सर्व (योगीनाम्) साधकांमध्ये भक्तांमध्ये (य:) जो (श्रद्धावान) पूर्ण आस्थेने (अन्तरात्मना) सत्य ओढीने (मद्गतेन्) माझ्याद्वारे दिलेल्या भक्तिमतानुसार (माम्) मला (भजते) भजतो/पुजतो. (स:) तो (अपि) देखिल (युत्कतम:) अज्ञानरूपी अंधकाराने जन्म-मृत्यू, स्वर्ग-नरक अशी भक्ती असणाऱ्या साधनेमध्येच लीन आहे. हे (मे) माझे (मत:) विचार आहेत.

याचेच प्रमाण पवित्र गीता च्या ७ व्या अध्यायातील १८ व्या श्लोकामध्ये आणि पवित्र गीता च्या ५ व्या अध्यायातील २९ वा श्लोक व ६ व्या अध्यायातील १५ व्या श्लोकामध्ये स्पष्ट केलेले आहे. म्हणूनच पवित्र गीता च्या १८ व्या अध्यायातील ६२ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे, की हे भारत, तू सर्वस्व भावनेने त्या परमात्म्याला शरण जा. त्याच्या कृपेने तुला परमशांती मिळेल व सनातन परमधाम अर्थात सतलोक प्राप्त होईल. पवित्र गीता च्या १५ व्या अध्यायातील ४ थ्या श्लोकामध्ये म्हटले आहे की तुला पवित्र गीता च्या ४ थ्या अध्यायातील ३४ व्या श्लोकामध्ये वर्णन केलेले तत्त्वदर्शी संत मिळाल्यानंतर ज्याकडे गेलेले साधक पुन्हा परतून या जगतामध्ये येत नाहीत अर्थात जन्म-मृत्यूपासून ते कायमचे मुक्त होऊन जातात, ज्या परमेश्वराने संसाररूपी वृक्षाची रचना केलेली आहे, त्या परमपद परमेश्वरास जाणीव पूर्वक शोधले पाहिजे. मी देखिल त्या आदिपुरुष परमेश्वराला शरण आहे. त्याचीच भक्ति केली पाहिजे.

पवित्र गीता च्या तिसऱ्या अध्यायातील पाचव्या ते नवव्या श्लोकांमध्ये आणि गीता च्या ६ व्या अध्यायातील १० ते १५ व्या श्लोकांमधील ज्ञान अयोग्य आहे असे सिद्ध केलेले आहे. अर्जुन म्हणाला की प्रभु, मनाला रोखणे अत्यंत कठीण आहे. त्यावर भगवानांनी उत्तर दिले की अर्जुना, मनाला रोखणे हे वायूला रोखण्यासारखे आहे. नंतर असे देखिल म्हटले आहे की कोणीही व्यक्ती केव्हाही नि:संदेहपणे कर्म केल्याशिवाय क्षणमात्र देखिल राहत नाही. महामूर्ख मनुष्य समस्त कर्मेंद्रियांना हठपूर्वक वरून रोखून मनात मात्र काही ना काही विचार करतच राहतो. त्यामुळेच एका स्थानावर हठयोग करत बसण्यापेक्षा सांसारिक कार्य करत करत (कर्मयोग) भक्तिसाधना करणेच श्रेष्ठ आहे. कर्म न करता अर्थात हठयोगाने एका स्थानावर बसून साधना करण्यपेक्षा कर्म करत भक्तिसाधना करणे श्रेष्ठ आहे. एका स्थानावर बसून साधना करून तुझा जीवन निर्वाह कसा होणार? शास्त्रविधीचा त्याग करून साधना (हठयोग, एका आसनावर बसुन) करणे हे कर्माला बंधन घातल्यासारखे आहे. त्यापेक्षा शास्त्रअनुकूल कर्म करत करत भक्तिसाधना करणे श्रेष्ठ आहे. म्हणूनच सांसारिक कार्य करत करत भक्तिसाधना कर. पवित्र गीता च्या ८ व्या अध्यायातील ७ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की युद्ध कर, पण त्याबरोबर माझे स्मरणही कर. असे केले तरच तू मला येऊन मिळशील. पवित्र गीता च्या ७ व्या अध्यायातील १८ व्या श्लोकामध्ये, तसेच पवित्र गीता च्या १८ व्या अध्यायातील ६२ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की परंतु माझ्या साधनेमुळे होणारा (गति) लाभ (अनुत्तमाम) अतिनीच आहे. त्यामुळेच तू त्या परमेश्वराला शरण जा. त्याच्या कृपेनेच तुला परमशांती लाभेल, तसेच सतलोकी (शाश्वतम् स्थानम्) जाशील. त्या परमेश्वराची भक्तिविधी व पूर्ण ज्ञान (तत्त्वज्ञान) एखाद्या तत्त्वदर्शी संताचा शोध घेऊन त्याला विचार. मी देखिल (गीता ज्ञानदाता ब्रह्म/क्षर पुरुष/काल) ते जाणत नाही.

प्रश्न :- पवित्र गीता च्या १५ व्या अध्यायातील १८ व्या श्लोकामध्ये सांगितलेले आहे की मी लोकांमध्ये, वेदांमध्ये पुरुषोत्तम नावाने प्रसिद्ध आहे. यावरून तर हेच सिद्ध होते की गीता ज्ञानदाता प्रभुच सर्वशक्तिमान आहे, तसेच गीता चा १२ वा अध्याय पूर्णपणे गीता ज्ञानदात्याचीच महिमा सांगत आहे.

उत्तर :- गीता मध्ये गीता ज्ञानदाता प्रभु आपली साधना व समर्थताही सांगत आहे. त्याचबरोबरच त्या पूर्ण परमात्म्याची महिमा देखिल सांगत आहे आणि त्या परमेश्वराच्या भक्तिसाधनेसाठी तत्त्वदर्शी संताचा संकेतही करत आहे. गीता चा पूर्ण १२ वा अध्याय ब्रह्मच्या (क्षर पुरुष/काल) महिमेने परिपूर्ण आहे. पवित्र गीता च्या १५ व्या अध्यायातील १ ते ४ आणि १६ व १७ व्या श्लोकांमध्ये पूर्ण परमात्मा तसेच परब्रह्म, ब्रह्म आदींचे निर्णायक ज्ञान आहे.

१६ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की पृथ्वी तत्त्वाने निर्माण झालेल्या लोकामध्ये (ब्रह्मचे २१ ब्रह्माण्ड व परब्रह्मचे सात संख ब्रह्माण्ड पृथ्वी तत्त्वाने बनल्याने एक लोक देखिल म्हटले जाते.) दोन प्रभु आहेत. एक क्षर पुरुष म्हणजेच ब्रह्म आणि दुसरा म्हणजे अक्षर पुरुष म्हणजेच परब्रह्म. या दोन्ही प्रभुंच्या अंतर्गत येणारे जेवढे प्राणी आहेत, त्यांचे आणि या दोन्ही प्रभुंचे स्थूल शरीर नाशवान आहे आणि जीवात्मा अविनाशी म्हटला गेलेला आहे.

पवित्र गीता च्या १५ व्या अध्यायातील १७ व्या श्लोकामध्ये सांगितलेले आहे की वास्तवामध्ये पुरुषोत्तम अर्थात सर्वशक्तिमान परमेश्वर तर या दोघा प्रभुंपेक्षा वेगळाच आहे. जो परमात्मा म्हटला जातो, जो तिन्ही लोकांमध्ये प्रवेश करून सर्वांचे पालनपोषण करतो, तो वास्तवामध्ये अविनाशी परमेश्वर म्हटला जातो.

१५ व्या अध्यायातीलच १८ व्या श्लोकामध्ये गीता ज्ञानदाता (क्षर पुरुष–ब्रह्म) आपली स्थिती सांगताना म्हणत आहे की मला तर लोकवेदांच्या (दंतकथा) आधारे पुरुषोत्तम म्हणतात. कारण आपल्या २१ ब्रह्माण्डांमध्ये जेवढे प्राणी माझ्या आधीन आहेत, ते स्थूल नाशवान शरीररूपी असोत किंवा अविनाशी आत्मारूपी असोत, त्यांच्यापेक्षा मी उत्तम (श्रेष्ठ) आहे. म्हणूनच मी लोकवेदांच्या आधाराने पुरुषोत्तम म्हणून प्रसिद्ध झालो आहे. वास्तवामध्ये पुरुषोत्तम तर कोणी दुसराच परमेश्वर आहे, त्याच्याविषयी गीता च्या १५ व्या अध्यायातील १७ व्या श्लोकामध्ये त्याचे वर्णन आलेले आहे.

प्रश्न :– गीता च्या १० व्या अध्यायातील २ ऱ्या व ३ ऱ्या श्लोकांमध्ये म्हटले आहे की माझ्या उत्पत्तीविषयी कोणीही काहीही जाणत नाही. जो मला अनादि अजन्मा तत्त्वाने जाणतो, तो सर्व पापांतून मुक्त होतो. यावरून असे स्पष्ट होते की ब्रह्मचा जन्म नाही आणि तो सर्व पापे नष्ट करतो.

उत्तर :– गीता च्या १० व्या अध्यायातील २ रा श्लोक पुन्हा वाचा. त्यामध्ये म्हटले आहे, की माझी उत्पत्ती देवता (ब्रह्मा, विष्णु, शिव) जाणत नाहीत की महर्षी. कारण त्या सर्वांची उत्पत्ती माझ्यापासूनच झालेली आहे.

या श्लोकावरून आपोआपच असे सिद्ध होते की गीता ज्ञानदाता प्रभुची उत्पत्ती म्हणजेच जन्म तर झालेला आहे, परंतु कालापासून (ब्रह्म) उत्पन्न झालेले देवता व ऋषिगण हे जाणत नाहीत, कारण ते कालापासूनच उत्पन्न झालेले आहेत. पित्याच्या जन्माविषयी मुलांना काहीच माहिती नसते, परंतु त्यांचे पिता म्हणजे आजोबाच याबाबत सर्वकाही सांगू शकतात. पूर्ण परमात्म्याने स्वतः काललोकामध्ये प्रगट होऊन ब्रह्मच्या (काल) उत्पत्तीविषयी सांगितलेले आहे. कृपया याच पुस्तकातील सृष्टिरचना हे प्रकरण वाचावे.

गीता च्या १० व्या अध्यायातील ३ ऱ्या श्लोकाचा अनुवाद चुकीचा केलेला आहे. जसे गीता च्या २ ऱ्या अध्यायातील ४, ५ व्या आणि १२ व्या श्लोकांमध्ये स्वत:ला नाशवान व जन्म–मृत्यू वारंवार प्राप्त होणारा असे सांगितलेले आहे, तसेच २ ऱ्या अध्यायातील १७ वा श्लोक व ८ व्या अध्यायातील ३, ८ ते १० व्या व २० व्या आणि १५ व्या अध्यायातील ४, १६ व्या व १७ व्या श्लोकांमध्ये कोणत्या तरी दुसऱ्या अविनाशी अनादि परमात्म्याविषयी सांगितलेले आहे.

त्यामुळेच गीता च्या १० व्या अध्यायातील ३ ऱ्या श्लोकामध्ये सांगितले आहे की जो मानव प्राण्यांमध्ये विद्वान म्हणजेच तत्त्वदर्शी संत मला, तसेच त्या अनादि वास्तवामध्ये जन्मरहित, सर्व लोकांचे महेश्वर म्हणजे परमेश्वराला तत्त्वाने जाणतो, तोच तत्त्वदर्शी संत

ज्यामुळे भक्ती साधना करून पापांपासून मुक्त होतो, त्या सत्यज्ञानाचे उच्चारण करतो. याचे प्रमाण गीता च्या ४ थ्या अध्यायातील ३४ व्या श्लोकामध्येही आहे. कृपया गीता च्या १० व्या अध्यायातील ३ ऱ्या श्लोकाचा यथार्थ अनुवाद वाचा.

गीता च्या १० व्या अध्यायातील २ रा श्लोक

न, मे, विदुः, सुरगणाः, प्रभवम्, न, महर्षयः, अहम्, आदिः, हि, देवानाम्, महर्षीणाम्, च, सर्वशः।।

अनुवाद :- (मे) माझ्या (प्रभवनम्) उत्पत्तीस (न) न (सुरगणाः) देवता लोक जाणत नाहीत आणि (न) न (महर्षयः) महर्षी लोक देखिल (विदुः) जाणतात. (हि) कारण (अहम्) मी (सर्वशः) सर्व प्रकारे (देवानाम्) देवतांचा (च) आणि (महर्षीणाम्) महर्षींचाही (आदिः) आदि अर्थात उत्पत्तीचे कारण आहे.

१० व्या अध्यायातील ३ रा श्लोक

यः, माम्, अजम्, अनादिम्, च, वेत्ति लोकमहेश्वरम्, असम्मूढ, सः, मर्त्येषु, सर्वपापैः, प्रमुच्यते ।।

**अनुवाद :-** (य:) जो विद्वान व्यक्ती (माम्) मला (च) आणि (अनादिम्) कायम राहणारे अर्थात पुरातन (अजम्) जन्म न घेणाऱ्या (लोकमहेश्वरम्) सर्व लोकांमध्ये महान ईश्वर अर्थात सर्वोच्च परमेश्वरास (वेत्ति) जाणवतो आहे, (सः) तो (मर्त्येषु) शास्त्रांना योग्यप्रकारे जाणणारा अर्थात वेदांनुसार ज्ञान असणारा (असम्मूढ) अर्थात तत्त्वदर्शी विद्वान (सर्वपापैः) सर्व पापांना (प्रमुच्यते) विस्तृत वर्णनासह सांगतो, म्हणजेच तोच सृष्टिज्ञान व कर्मांचे योग्य वर्णन करतो, अर्थात अज्ञानाला पूर्णपणे मुक्त करतो. ज्यामुळे त्या तत्त्वदर्शी संताद्वारे सांगीतलेल्या वास्तविक साधनेच्या आधारावर भक्ति करणाऱ्यांची सर्व पापे नष्ट होऊन जातात.

## ''गीता ज्ञानदाता ब्रह्मच्या (काल) उत्पत्तीचा संकेत''

गीता च्या १० व्या अध्यायातील ८ व्या श्लोकामध्ये म्हटलेले आहे, की, अर्जुना, माझी उत्पत्ती (जन्म) कशी झाली हे देवता जाणत नाहीत की महर्षी जाणत नाहीत. कारण ते सर्व जण माझ्याद्वारे निर्माण झालेले आहेत. यावरून असे स्वसिद्ध होते की जसे पित्याची उत्पत्ती बालक सांगू शकत नाहीत, परंतु त्या बालकाचे आजोबा जाणतात, त्याप्रमाणे ब्रह्मची (काल) उत्पत्ती तर झालेली आहे, परंतु ती देवता व ऋषि जाणत नाहीत. अशाप्रकारे २१ ब्रह्माण्डांमध्ये सर्व देव, ऋषि इत्यादी ज्योति निरंजन ब्रह्म अर्थात काल व प्रकृति (दुर्गा) यांच्या संयोगाने उत्पन्न झालेले आहेत. यामुळे काल म्हणत आहे की माझी उत्पत्ती २१ ब्रह्माण्डांमध्ये कोणीही जाणत नाही. कारण सर्वांची उत्पत्ती माझ्यापासून झालेली आहे. केवळ पूर्णब्रह्मच कालाची (ब्रह्म) उत्पत्ती सांगू शकतो. कारण ब्रह्मची (काल) उत्पत्ती परम अक्षर ब्रह्म (पूर्णब्रह्म) यांच्यापासून झालेली आहे. गीता च्या ३ ऱ्या अध्यायातील १४ व १५ व्या श्लोकांमध्ये ब्रह्मच्या उत्पत्तीचे प्रत्यक्ष प्रमाण आहे. जो तत्त्वदर्शी अर्थात विद्वान व्यक्ती मला म्हणजेच कधीही न जन्म घेणाऱ्या सर्व लोकांच्या महेश्वराला अर्थात अविनाशी परमात्म्याला जाणतो, तो तिन्ही वेदांना (ऋग्वेद, सामवेद तथा यजुर्वेद) जाणतो, तो तत्त्वदर्शी संत आहे. त्याने सांगितलेल्या भक्तिमार्गाने साधना केल्यानेच सर्व पापे नष्ट होतील. गीता च्या १५ व्या अध्यायातील १६, १७ व १८ व्या श्लोकांमध्ये वर्णन आहे की पूर्ण परमात्मा अविनाशी तर दुसराच कोणी आहे, जो तिन्ही लोकांमध्ये प्रवेश करून सर्वांचे पालनपोषण करतो. मला (कालाला) तर निव्वळ यासाठीच पुरुषोत्तम म्हणतात की मी २१ ब्रह्माण्डांमध्ये माझ्या आधीन असलेल्या स्थूल शरीरामध्ये असलेल्या नाशवान प्राण्यापेक्षा आणि अविनाशी जीवात्म्यांपेक्षा उत्तम आहे. त्यामुळेच मला (कालाला) लोकवेद अर्थात दंतकथांच्या आधाराने पुरुषोत्तम म्हटलेले आहे.

वास्तविक मी अविनाशी अथवा पालनकर्ता नाही. गीता च्या ३ ऱ्या अध्यायातील १४ व १५ व्या श्लोकांमध्ये म्हटले आहे की सर्व जीव अन्नापासून उत्पन्न होतात. अन्न पावसापासून उत्पन्न होते, पाऊस यज्ञापासून उत्पन्न होतो, यज्ञ शुभ कर्मांपासून, कर्म ब्रह्मापासून उत्पन्न होते. ब्रह्म अविनाशी परमात्म्यापासून उत्पन्न झाला. तोच अविनाशी सर्वव्यापक परमात्माच यज्ञांमध्ये प्रतिष्ठित आहे, यज्ञांमध्ये पूज्य आहे, तोच यज्ञाचे फळही देतो. अर्थात वास्तवामध्ये अधियज्ञ देखिल तोच आहे.

नंतर गीता च्या १० व्या अध्यायातील २ ऱ्या श्लोकामध्ये सांगितलेले आहे की माझी उत्पत्ती (प्रभवम्) कोणीही जाणत नाही. यावरून असे सिद्ध होते की काल देखिल (ब्रह्म) उत्पन्न झालेला आहे. त्यामुळेच तो येथे कोठे तरी आकार रूपामध्येही आहे. नाही तर कृष्णजी तर अर्जुनासमोरच उभे होते. ते तर म्हणतही नाहीत, की, मी अनादि (अजन्मा) आहे. हे सर्व कालच (अदृश्य ब्रह्म) श्री कृष्णजींच्या शरीरामध्ये जीवस्थ रूपात (भुताप्रमाणे प्रवेश करून) बोलून आपल्या प्रतिष्ठेची (स्थितीची) योग्य माहिती गीता च्या रूपामध्ये देऊन गेला.

या विवरणावरून गीता मध्ये असे सिद्ध झालेले आहे की ब्रह्मची उत्पत्ती पूर्ण ब्रह्मद्वारे झालेली आहे. हेच प्रमाण अथर्ववेद काण्ड ४ अनुवाक १ मंत्र ३ मध्ये आहे. कृपया वाचा.

काण्ड नं. ४ अनुवाक नं. १ मंत्र नं. ३

प्र यो जज्ञे विद्वानस्य बन्धुर्विश्वा देवानां जनिमा विवक्ति।
ब्रह्म ब्रह्मण उज्जभार मध्यान्नीचैरुच्चैः स्वधा अभि प्र तस्थौ ।।३।।

प्र–यः–जज्ञे–विद्वानस्य–बन्धुः–विश्वा–देवानाम्–जनिमा–विवक्ति–ब्रह्मः–ब्रह्मणः–उज्ञभार–मध्यात्–निचैः–उच्चैः–स्वधा–अभि–प्रतस्थौ।

अनुवाद :– (प्र) सर्वप्रथम (देवानाम्) देवता व ब्रह्माण्डांची उत्पत्ती (जज्ञे) उत्पत्तीच्या ज्ञानास (विद्वानस्य) जिज्ञासू भक्ताचा (यः) जो (बन्धुः) वास्तविक सोबती अर्थात पूर्ण परमात्माच आपल्या निजसेवकाला (जनिमा) सर्वांचा उत्पत्ती कर्ता आपल्याद्वारे सृजन केलेल्यांना (विवक्ति) स्वतःच व्यवस्थित आणि विस्तारपूर्वक सांगतात की (ब्रह्मणः) पूर्ण परमात्म्याने (मध्यात्) आपल्या माध्यमातून अर्थात शब्दशक्तीद्वारे (ब्रह्मः) ब्रह्म–क्षर पुरुष अर्थात कालास (उज्ञभार) उत्पन्न करून (विश्वा) सर्व संसाराला अर्थात सर्व लोकांना (उच्चैः) वरच्या सतलोक इत्यादी (निचैः) खाली परब्रह्म व ब्रह्म यांच्या सर्व ब्रह्माण्डांना (स्वधा) आपण धारण करणाऱ्या (अभिः) आकर्षण शक्तीने (पतस्थौ) दोन्हींना चांगल्या प्रकारे स्थित केले.

भावार्थ :– पूर्ण परमात्मा आपण रचलेल्या सृष्टिचे व सर्व आत्म्यांच्या उत्पत्तीचे ज्ञान आपल्या दासाला स्वतःच योग्यप्रकारे सांगत आहेत की पूर्ण परमात्म्याने आपल्या मध्य अर्थात आपल्या शरीरातून आपल्या शब्दशक्तीद्वारे ब्रह्मची (क्षर पुरुष–काल) उत्पत्ती केली आणि सर्व ब्रह्माण्डांच्या वर सतलोक, अलखलोक, अगमलोक, अनामीलोक इत्यादी, तर खाली परब्रह्माचे सात संख ब्रह्माण्ड व ब्रह्मच्या २१ ब्रह्माण्डांना आपण धारण केलेल्या आकर्षण शक्तिने थांबवून ठेवलेले आहे.

जसे पूर्ण परमात्मा कबीर परमेश्वर (कविर्देव) यांनी आपल्या स्वतःचे (निज) सेवक म्हणजेच मित्र श्री धर्मदासजी, आदरणीय गरीब दास जी आदींना स्वतः रचलेल्या सृष्टिचे ज्ञान स्वतःच सांगितलेले आहे. वरील वेदमंत्र देखिल याचेच समर्थन करत आहेत.

अथर्व वेद काण्ड १ मंत्र ७

योऽथर्वाणं पितरं देवबन्धुं बृहस्पतिं नमसाव च गच्छात्।

त्वं विश्षेषां जनिता यथास: कविर्देवो न दभायत् स्वधावान् ।।७।।

य:- अथर्वाणम्-पितरम्-देवबन्धुम्- बृहस्पतिम्-नमसा-अव-च-गच्छात्-त्वम्-विश्वेषाम्-जनिता-यथा-स:-कविर्देवः-न-दभायत्-स्वधावान्।

अनुवाद :- (य:) जे (अथवार्णम्) अचल अर्थात अविनाशी (पितरम्) जगतपिता (देवबन्धुम्) भक्तांचा वास्तविक सोबती अर्थात आत्म्याच्या आधार (बृहस्पतिम्) जगतगुरू (च) किंवा (नमसा) विनम्र पुजारी किंवा विधिवत साधकास (अव) सुरक्षेसह (गच्छात्) सतलोकी जाण्यास प्राप्त झालेल्यांना तेथे घेऊन जाणारे (विशेषाम्) सर्व ब्रह्माण्डाचे (जनिता) रचना करणारी जगदंबा अर्थात मातेचे गुण असलेली (न दभायत्) कालासारखा धोका न देणारे (स्वधावान) स्वभाव अर्थात गुण असणारा (यथा) जसे आहेत तसे अर्थात ज्याप्रमाणेच (सः) ते (त्वम्) आपण (कविर्देवः कविर्-देव) कविर्देव आहात अर्थात भिन्न भाषांमध्ये यांना कबीर परमेश्वर देखिल म्हणतात.

भावार्थ :- या मंत्रावरून हे देखिल स्पष्ट होते की ज्यांनी सर्व रचना केलेली आहे, त्या परमेश्वराचे नाव कविर्देव म्हणजेच कबीर परमेश्वर आहे.

जो परमेश्वर अचल म्हणजेच वास्तवामध्ये अविनाशी (गीता च्या १५ व्या अध्यायातील १६ व १७ व्या श्लोकांमध्ये देखिल प्रमाण आहे.) जगद्गुरू, आत्माधार, जो पूर्ण मुक्त होऊन सतलोकी जाणाऱ्यांना तेथे घेऊन जाणारे, सर्व ब्रह्माण्डांचे रचनाकार, कालासारखा (ब्रह्म) धोका न देणारे जसे आहेत तसे स्वतः कविर्देव अर्थात कबीर प्रभु आहेत. याच परमेश्वराला त्याने सर्व ब्रह्माण्डांना व प्राण्यांना आपल्या शब्दशक्तीने उत्पन्न केल्यामुळे (जनिता) माता असे देखिल संबोधले जातात. तसेच (पितरम्) पिता व (बन्धु) भाऊ देखिल आणि (देव) परमेश्वर देखिल हेच आहेत. त्यामुळेच या कविर्देवांची (कबीर परमेश्वर) स्तुती केली जाते. त्वमेव माता च पिता त्वमेव त्वमेव बन्धु च सखा त्वमेव, त्वमेव सर्वं मम देव देव. या परमेश्वराच्या महिमेचे वर्णन पवित्र ऋग्वेद मंडल नं. १ सूक्त नं. २४ मध्ये विस्तृत स्वरूपात आहे.

प्रश्न :- वेद सृष्टिच्या प्रारंभी प्राप्त झाले होते आणि कविर्देव (कबीर परमेश्वर) तर सन १३९८ मध्ये उत्पन्न झालेत, मग वेदांमध्ये कविर् अर्थात कबीर नावाचे वर्णन कसे आले?

उत्तर :- पूर्ण परमात्म्याचे वास्तविक नाव कविर्देव आहे आणि उपमात्मक नावे सतपुरुष, परम अक्षर ब्रह्म, पूर्ण ब्रह्म इत्यादी आहेत. देशाच्या प्रधानमंत्रीजींच्या देहाचे नाव दुसरेच असते आणि प्रधानमंत्री, प्राईममिनिस्टर इत्यादी पदाची नावे असतात. हेच पूर्ण परमात्मा कविर्देव नामांतरण करून चारही युगांमध्ये आलेले आहेत आणि सृष्टि व वेदांची रचना होण्यापूर्वी देखिल अनामी (अनामय) लोकांमध्ये मानवसदृश शरीरामध्ये कविर्देव या नावाने होतेच. तेच कविर्देव पुन्हा सतलोकाची रचना करून तेथे विराजमान झाले. त्यानंतर परब्रह्म किंवा ब्रह्मांच्या सर्व लोकांची (धामांची) आणि वेदांची त्यांनी रचना केली. त्यामुळे वेदांमध्ये कविर्देव यांचे वर्णन आहे.

## ''कबीर साहेबद्वारे बिभीषण आणि मंदोदरी यांना शरणामध्ये घेणे''

परमेश्वर मुनिन्द्र, अनल अर्थात नल व अनिल अर्थात नील यांना शरण घेतल्यानंतर परमेश्वर श्रीलंकेमध्ये गेले. तेथे एक चंद्रविजयजी या परमभक्ताचे १६ सदस्यांचे पुण्य परिवार वास्तव्य करत होते. ते भाट जातीमध्ये जन्मलेले पुण्यकर्मी आत्मा होते. परमेश्वर मुनिन्द्रजींचा (कविर्देव) उपदेश ऐकून पूर्ण परिवाराने नामदान प्राप्त केले होते. परमभक्त चंद्रविजयजींची पत्नी

भक्तमती कर्मवती लंकेचा राजा रावणाची राणी मंदोदरीकडे नोकरी (सेवा) करत होती. राणी मंदोदरीला हलकेफुलके, छोटे-मोठे विनोद ऐकवून तिचे मनोरंजन करत होती. भक्त चंद्रविजय राजा रावणाच्या दरबारामध्ये नोकरी (सेवा) करत होता. राजाला स्तुतिकवने ऐकवून प्रसन्न करत होता.

भक्त चंद्रविजयची पत्नी भक्तमती कर्मवती परमेश्वराकडून उपदेश प्राप्त केल्यानंतर राणी मंदोदरीला सृष्टिरचना आणि आपल्या सतगुरुदेव मुनिन्द्रजी यांच्याकडून ऐकलेली प्रभु चर्चा दररोज ऐकवू लागली.

भक्तमति मंदोदरी राणीला अतिशय आनंद होऊ लागला. तासोन् तास भक्तमती कर्मवती प्रभूंच्या सत्यकथा ऐकवायची आणि मंदोदरीच्या डोळ्यांतून अश्रू वाहायचे. एक दिवस मंदोदरीने कर्मवतीस विचारले की तू तर अत्यंत अर्थहीन व व्यर्थ गोष्टी पूर्वी करायचीस आणि आता हे ज्ञान कोणाकडून ऐकलेस? एवढा बदल परमात्मातुल्य संताशिवाय होऊ शकणार नाही. तेव्हा कर्मवतीने सांगितले की आम्ही नुकतीच एका परम संताकडून नामदीक्षा (गुरुदीक्षा) घेतलेली आहे. राणी मंदोदरी त्या संतांच्या दर्शनाची अभिलाषा व्यक्त करत म्हणाली की तुझे गुरू परत जेव्हा येतील, तेव्हा तू त्यांना आमच्या घरी घेऊन ये. आपल्या मालकिणीचा आदेश झाल्यानंतर नतमस्तक होऊन सत्कारपूर्वक कर्मवती म्हणाली की जशी आपली आज्ञा असेल त्याप्रमाणे आपली सेविका करेलच, परंतु माझी एक विनंती आहे की संत महात्म्यांना आदेशपूर्वक बोलवून चालणार नाही. आपण स्वत: जाऊन दर्शन घेणे श्रेयस्कर ठरेल आणि जशी आपली आज्ञा असेल तसेच होईल. महाराणी मंदोदरी म्हणाली की परत जेव्हा तुझे गुरुदेव येतील, तेव्हा मला सांग. मी स्वत: दर्शन घेण्यास येईन. परमेश्वरांनी पुन्हा लंकेमध्ये येऊन कृपा केली. काही कालानंतर आपला दीर श्री भक्त बिभीषणला उपदेश दिला. भक्तमती मंदोदरी उपदेश प्राप्त करून रात्रंदिवस प्रभु स्मरणामध्ये लीन राहू लागली. आपला पती रावणाला श्री सतगुरु मुनिन्द्रजींकडून नामदीक्षा घेण्याची तिने अनेक वेळा प्रार्थना केली, परंतु रावणाने ते मान्य केले नाही. तो म्हणायचा की मृत्युंजय शिवजींची भक्ती केलेली आहे. त्यांच्या बरोबरीची कोणतीही शक्ती नाही. तुला कोणी तरी चुकीचे मार्गदर्शन केले आहे.

काही दिवसांनंतर वनवास भोगत असलेल्या सीतेचे अपहरण करून रावणाने तिला आपल्या नौ लखा बागेमध्ये कैदेत ठेवले. भक्तमती मंदोदरीने वारंवार प्रार्थना करूनही रावणाने माता सीताजीला परत सोडून येण्याचे तिचे मत स्वीकारले नाही. त्यावेळी भक्तमती मंदोदरी आपल्या गुरुदेव मुनिन्द्रजींना म्हणाली की महाराज, माझ्या पतीने परस्त्रीचे अपहरण केले आहे. ते मला सहन होत नाही. काहीही झाले तरी ते तिला परत सोडून येणे मान्य करत नाहीत. प्रभु, आता आपणच दया करा. जीवनात आजपर्यंत मी असे दु:ख कधीही सहन केलेले नाही.

परमेश्वर मुनिन्द्रजी म्हणाले की बेटी मंदोदरी, ती स्त्री कोणी सर्वसाधारण स्त्री नाही. शापामुळे श्री विष्णु जींना पृथ्वीवर यावे लागलेले आहे. ते अयोध्यावासी श्री राजा दशरथाचे पुत्र रामचंद्र आहेत. त्यांना १४ वर्षे वनवास मिळाला आहे. स्वतः लक्ष्मीजी सीतेचे रूप धारण करून त्यांच्या पत्नीच्या रूपामध्ये वनवास भोगत होती. रावणाने साधूचा वेश धारण करून तिला धोका देऊन उचलून आणले आहे. ती सीता म्हणजे स्वतः लक्ष्मीच आहे. तिला शीघ्र परत करून क्षमायाचना करत आपल्या जीवनाची भीक मागणे रावणासाठी शुभ आहे.

भक्तमती मंदोदरीने अनेक वेळा प्रार्थना करूनही रावणाने ते मान्य केले नाही. तो म्हणू लागला की जंगलभर भटकणारे दोन विदूषक माझे काय बिघडू शकणार आहेत. माझ्याजवळ मोजता येणार नाही एवढी सेना आहे. माझे एक लाख पुत्र आणि सव्वा लाख नाती आहेत.

माझा पुत्र मेघनाथ याने स्वर्गाचा राजा इंद्र याला पराजित करून त्याच्या मुलीशी विवाह केला आहे. ३३ कोटी देवतांना मी कैद करून ठेवले आहे. तू मला त्या दोन आधाराशिवाय भटकणाऱ्या वनवाश्यांना ते भगवान आहेत असे सांगून भीती दाखवत आहेस काय? ही स्त्री मी कधीही परत करणार नाही.

मंदोदरीने आपल्या पूज्य गुरुदेवांकडून ऐकलेले भक्तिमार्गाचे ज्ञान रावणाला खूप समजावून सांगण्याच्या प्रयत्न केला. बिभीषणाने देखिल त्याला खूप समजवण्याचा प्रयत्न केला, परंतु रावणाने त्याला बदडून काढले आणि म्हणाला की तू तर त्या श्रीरामचंद्राची बाजू घेऊन पक्षपात करत आहेस. त्यापेक्षा तू त्याच्याजवळच निघून जा.

एक दिवस भक्तमती मंदोदरीने आपल्या पूज्य गुरुदेवांना प्रार्थना केली की हे गुरुदेव, माझे सौभाग्य संकटात आहे. आपण देखिल एक वेळा माझ्या पतीला समजवून बघा. जर त्याने तुमचेही काही ऐकले नाही, तर मग मला विधवा होण्याचे दु:ख होणार नाही.

आपली कन्या मंदोदरीची प्रार्थना ऐकून मुनिन्द्रजींनी राजा रावणाच्या दरबारासमोर उभे राहुन द्वारपालांना रावणाला भेटण्याबद्दल प्रार्थना केली. द्वारपाल म्हणाले की ऋषिजी, यावेळी आमच्या राजाचा दरबार सुरू आहे. अशा वेळी आतील संदेश बाहेर येऊ शकतो, परंतु बाहेरचा कोणताही संदेश आत जाऊ शकत नाही. त्यामुळे आम्ही विवश आहोत. त्यावेळी पूर्ण प्रभु अंतर्धान पावले व राजा रावणाच्या दरबारामध्ये प्रकट झाले. रावणाची दृष्टी ऋषिंवर पडल्यावर त्याने गर्जना करत विचारले की माझ्या आज्ञेशिवाय या ऋषिला कोणी आत येऊ दिले? ज्याच्या हातून हा गुन्हा घडला आहे, त्याला आणून माझ्यासमोर मारून टाका. तेव्हा परमेश्वर म्हणाले की हे राजन, तुझ्या द्वारपालांनी तर मला स्पष्ट मनाई केलेली होती. मी आत कसा काय आलो, हे त्यांना माहीत देखिल नाही. रावणाने विचारले की तू आत कसा काय आलास? तेव्हा मुनिन्द्र वेशामध्ये आलेले पूर्ण प्रभु अदृश्य होऊन पुन्हा प्रगट झाले आणि म्हणाले, की हा मी असा आत आलो. रावणाने आत येण्याचे प्रयोजन विचारले, तेव्हा प्रभु म्हणाले की आपण योद्धा असूनही एका अबला स्त्रीचे अपहरण करून तिला आणलेले आहे. हे आपली प्रतिष्ठा व शूरवीरतेच्या विरुद्ध आहे. ही कोणी सर्वसाधारण स्त्री नाही. ती स्वतः लक्ष्मीजींचा अवतार आहे. तिचे पती श्री रामचंद्रजी हे स्वतः विष्णु आहेत. तिला परत करून आपल्या जीवनाची भिक्षा माग. त्यामध्येच तुझे कल्याण आहे. हे ऐकून तमगुणांचा (भगवान शिव) उपासक रावण क्रोधित झाला. म्यानातून तलवार काढून सिंहासनावरून तो आक्रमकतेने उठला. त्या मूर्ख प्राण्याने (अज्ञानी) ऋषिजींना मारण्यासाठी तलवारीचे अंधाधुंद सत्तर वार केले. परमेश्वर मुनिन्द्रजींनी झाडूतील एक लहानसा तुकडा हातामध्ये धरला होता. त्याचाच त्यांनी ढालीसारखा उपयोग केला. रावणाचे सत्तर वार त्या झाडूतील नाजूक तुकड्यावर पडले. लोखंडी खांबावर तलवार जोराने आपटल्यासारखा आवाज होत गेला, पण त्या झाडूच्या नाजूक तुकड्याला काही देखिल झाले नाही. रावण घामाघूम झाला. तरीही आपल्या अहंकाराने त्याने हार मानली नाही. एवढे मात्र जाणले की हे कोणी साधारण ऋषि नाहीत. तो म्हणाला की, मला तुमचे काही एक ऐकायचे नाही. आपण जाऊ शकता. परमेश्वर अंतर्धान पावले आणि मंदोदरीस सर्व वृत्तांत कथन करून त्यांनी प्रस्थान केले. राणी मंदोदरी म्हणाली की हे गुरुदेव, आता मला विधवा होण्यामध्ये कोणतेच कष्ट पडणार नाहीत.

श्री रामचंद्र व रावण यांचे युद्ध झाले. त्यात रावणाचा वध झाला. जे लंकेचे राज्य रावणाने दहा वेळा मस्तक अर्पण करत तमगुण भगवान शिवाची कठीण साधना करून प्राप्त केलेले होते, ते रावणाचे क्षणिक सुखही नष्ट झाले आणि तो नरकाचा भागीदार बनला. याच्याविरुद्ध

पूर्ण परमात्म्याच्या सतनाम साधक बिभीषणाला मात्र विनासायास, कोणतीही कठीण साधना न करता पूर्ण प्रभुंच्या कृपेने लंकादेशाचे राज्य प्राप्त झाले. हजारो वर्षांपर्यंत बिभीषणाने लंकेचे राज्यसुख भोगले व प्रभुच्या कृपेने राज्यामध्ये पूर्ण शांती नांदली. सर्व राक्षसवृत्तीच्या व्यक्तिंचा विनाश झाला होता. भक्तमती मंदोदरी, भक्त बिभीषण आणि परमभक्त चंद्रविजयजी यांच्या परिवारातील सर्व सोळा सदस्य व इतर ज्यांनी पूर्ण परमेश्वराचा उपदेश प्राप्त करून आजीवन मर्यादेत राहून सतभक्ती केली, ते सर्व साधक पृथ्वीवर देखिल सुखी राहिले आणि अंतसमयी परमेश्वराच्या विमानामध्ये बसून सतलोकी (शाश्वतम् स्थानम्) निघून गेले. म्हणूनच पवित्र गीता च्या ७ व्या अध्यायातील १२ ते १५ व्या श्लोकांमध्ये सांगितले आहे की त्रिगुणांची (रजगुण–ब्रह्मा जी, सतगुण–विष्णु जी, तमगुण–शिव जी) साधना करून मिळणाऱ्या क्षणिक सुविधेद्वारे जे ज्ञान हरवून बसलेले आहेत ते राक्षस स्वभावाचे, मनुष्यांमध्ये नीच, दुष्कर्मे करणारे मूर्ख मला (काल–ब्रह्म) भजत (पूजत) नाहीत.

यानंतर गीता च्या ७ व्या अध्यायातील १८ व्या श्लोकामध्ये गीता बोलणारा प्रभु (काल–ब्रह्म) सांगत आहे की एखादा उदार आत्मा माझीच (ब्रह्म–काल) साधना करतो, कारण त्याला तत्त्वदर्शी संत मिळत नाही. असे पवित्र आत्मे देखिल माझ्या (अनुत्तमाम्) अति अश्रेष्ठ/नीच (गतिम्) मुक्तीच्या स्थितीमध्ये आश्रित राहिले. ते देखिल पूर्णपणे मुक्त नाहीत. म्हणूनच पवित्र गीता च्या १८ व्या अध्यायातील मंत्र ६२ व्या श्लोकामध्ये सांगितलेले आहे की हे अर्जुना, तू सर्वस्व भावाने त्या परमेश्वराला (पूर्ण परमात्मा तत् ब्रह्म) शरण जा. तू परमशांती आणि सतलोक अर्थात सनातन परमधामास प्राप्त होशील.

म्हणूनच पुण्यात्म्यांना निवेदन आहे की आज या दासाच्या दासाजवळही पूर्ण परमात्म्याच्या प्राप्तीची वास्तविक विधी प्राप्त आहे. नि:शुल्क उपदेश घेऊन अवश्य लाभ घ्या.

## ''द्वापार युगामध्ये इंद्रमतीला शरणामध्ये घेणे''

द्वापर युगामध्ये चंद्रविजय नावाचा एक राजा होता. त्याची पत्नी इंद्रमती ही अत्यंत धार्मिक प्रवृत्तीची स्त्री होती. ती संत महात्म्यांचा अत्यंत आदर करत असे. तिने एका गुरुदेवांकडून दीक्षा देखिल घेतली होती. तिच्या गुरुदेवांनी तिला सांगितले होते की मुली, साधुसंतांची सेवा केली पाहिजे. संतांना अन्नदान केल्याने मोठा लाभ मिळतो. एकादशीचे व्रत, मंत्रजप आदी साधना करत ती अत्यंत दृढतेने भगवंत भक्ती करत होती. गुरुदेवांनी सांगितले होते की संतांना अन्नदान केलेस, तर तू पुढेही राणीच बनशील आणि तुला स्वर्ग प्राप्त होईल. राणीने ठरविले होते की दररोज एका तरी संताला अन्नदान करायचेच. तिने मनामध्ये प्रतिज्ञा केली होती की पहिल्यांदा संतांना अन्नदान आणि त्यानंतरच आपण भोजन घ्यायचे. आपण असे केले, तरच आपणाला आठवण राहील, नाही तर विसरून जाऊ. राणी दररोज प्रथम एका संताला भोजन आहार करवायची आणि नंतर स्वत: आहार घ्यायची. हा नित्यक्रम अनेक वर्षे चालत राहिला.

एकदा हरिद्वारमध्ये कुंभमेळा आयोजित केला गेला. जेवढे त्रिगुण मायेचे उपासक संत होते, ते सर्व गंगेमध्ये स्नानासाठी तेथे आले होते. त्यामुळे इकडे राणीला अनेक दिवस अन्नदान करण्यासाठी एकही संत प्राप्त झाला नाही. त्यामुळे राणी इंद्रमतीने स्वत:ही भोजन घेतले नाही. चौथ्या दिवशी ती आपल्या दासीला म्हणाली की हे दासी, कोणी संत मिळतो का बघ, नाही तर आज तुझी ही राणी जिवंत राहणार नाही. आज माझे प्राण निघून गेले, तरी मी भोजन नाही करणार. ते दीनदयाळ कबीर परमेश्वर आपल्या पूर्वीच्या सद्भक्तांना शरण

घेण्यासाठी न जाणे कोणकोणते कारण पुढे करतील? दासीने गच्चीवर चढून पाहिले, तर समोरून एक संत येत होते. त्यांनी श्वेत वस्त्र परिधान केले होते. द्वापर युगामध्ये परमेश्वर कबीर करुणामय नावाने प्रगट झाले होते. दासी खाली आली आणि तिने राणीला सांगितले की साधूसारखी एक कोणी तरी व्यक्ती दिसत आहे. राणी म्हणाली की जा लवकर आणि त्यांना बोलवून आण. दासी महालाबाहेर गेली आणि तिने परमेश्वरांना प्रार्थना केली की साहेब जी, आमची राणी आपली आठवण का काढत आहे. करुणामय साहेबजींनी प्रश्न केला की तुझी राणी माझी आठवण काढत आहे? माझा आणि राणीचा काय संबंध? दासीने सर्व हकीकत सांगितली. करुणामय कबीर साहेब जी म्हणाले की जर राणीला गरज असेल, तर तिने येथे यावे. मी येथेच उभा आहे. तू दासी आणि ती राणी. मी तेथे गेलो आणि जर ती म्हणाली की तुम्हाला कुणी बोलाविले अथवा तिचा पती राजा देखिल काही अपशब्द बोलला तर? बेटी, संतांचा अनादर अत्यंत पापदायक होतो. दासी पुन्हा परतली आणि तिने राणीला सर्व वार्ता ऐकवली. राणी म्हणाली की दासी, माझा हात पकड आणि चल. तेथे पोहोचताच राणीने दंडवत घालून प्रार्थना केली की हे सर्वांच्या पालनकर्त्या, भगवान मला वाटते की आपणास खांद्यावर बसवून घेऊन जावे. करुणामय साहेब जी म्हणाले की कन्ये, मी हेच बघत होतो, की, तुझ्यामध्ये काही श्रद्धा आहे की अशीच उपाशी मरत आहेस. राणीने स्वतःच्या हातांनी स्वयंपाक बनविला. करुणामय रूपामध्ये आलेले कविर्देव म्हणाले की मी भोजन आहार घेत नाही. माझे शरीर भोजन आहार घेणारे नाही. तेव्हा राणी म्हणाली की मग मी देखिल भोजन घेणार नाही. यावर करुणामय साहेब जी म्हणाले की ठीक आहे मुली, आण ते भोजन, मी खातो. कारण समर्थ त्यांनाच म्हणतात, जे त्यांच्या मनात येईल ते करतात. करुणामय साहेबजींनी भोजन घेतले. नंतर त्यांनी राणीला प्रश्न केला की ही जी साधना तू करत आहेस, ती तुला कोणी सांगितली? राणी म्हणाली की माझ्या गुरुदेवांनी हा आदेश दिलेला आहे. कबीर साहेबांनी विचारले की काय आदेश दिला आहे तुझ्या गुरुदेवांनी? इंद्रमती म्हणाली की ब्रह्मा-विष्णु-महेश यांची पूजा करावी, एकादशीचे व्रत करावे, तीर्थभ्रमण, देवीची पूजा, श्राद्ध घालावे, मंदिरामध्ये जावे, संतांची सेवा करावी इत्यादी. करुणामय साहेब जी म्हणाले की जी साधना तुझ्या गुरुदेवांनी दिलेली आहे, ती करून तू जन्म-मृत्यू, स्वर्ग-नरक आणि ८४ लक्ष योनींच्या कष्टातून मुक्त होऊ शकणार नाहीस. राणी म्हणाली की महाराजजी जेवढे संत आहेत, ते आपापली प्रभुता आपणच बनवून येतात. मी भले मुक्त होऊ अथवा न होऊ, कृपया माझ्या गुरुदेवांविषयी आपण काही बोलू नका.

आता करुणामय कबीर साहेब विचार करू लागले की या भोळ्या जीवांना कसे काय समजावून सांगावे? यांनी जे शेपूट पकडले आहे, ते मेले तरी सोडू शकत नाही. करुणामय साहेब जी म्हणाले की कन्ये, जशी तुझी इच्छा. मी कोणाची निंदा करत नाही. मी तुझ्या गुरुदेवांना शिवी दिली किंवा अपशब्द बोललेलो आहे का? मी तर सत्य भक्तिमार्ग सांगत आहे. तुझी ही भक्ती तर शास्त्राविरुद्ध आहे. ती तुला मुक्ति देणार नाही किंवा तुझे येणारे कर्मदंडही नष्ट करू शकणार नाही. आणखी एक ऐक, आजपासून तिसऱ्या दिवशी तुझा मृत्यू होईल. त्यावेळी तुझा गुरू तुला वाचवू शकणार नाही किंवा तुझी ही अयोग्य नकली साधनाही वाचवू शकणार नाही. (जेव्हा मृत्यूची वेळ येते, तेव्हाच जीवांना भीती वाटते अन्यथा ते मानत नाहीत.) राणीने विचार केला की संत कधीही असत्य भाष्य करत नाहीत. असे न व्हावे की मला परवाच मरण यावे. या भीतीने करुणामयसाहेबांना तिने विचारले की साहेब, माझे प्राण वाचू शकतात का? कबीर (करुणामय) साहेब जी म्हणाले की वाचू शकतात, पण जर तू

माझ्याकडून नामोपदेश प्राप्त केलास, माझी शिष्या बनलीस, पूर्वीच्या पूजांचा त्याग केलास, तरच तुझा जीव वाचेल. इंद्रमती म्हणाली की मी असे ऐकले आहे की गुरुदेव कधीही बदलू नयेत. त्यामुळे पाप लागते. कबीर साहेब जी (करुणामय) म्हणाले की नाही पुत्री, हा देखिल तुझा भ्रम आहे. एखाद्या वैद्याच्या औषधींपासून गुण आला नाही, तर आपण दुसऱ्या वैद्याकडून घेत नाही का? एखादा पाचवीच्या इयत्तेचा अध्यापक असतो आणि एखादा पुढच्या इयत्तेचा अध्यापक देखिल असतो. पुत्री, पुढच्या इयत्तेत जायला पाहिजे ना? का आयुष्यभर पाचवीच्या वर्गातच बसणार? यासाठी त्याग करावाच लागेल. तू आता पुढचे शिक्षण घे. त्यासाठी मी तुला शिकवायला आलो आहे. तसे तर तिने हे मान्यच केले नसते, परंतु समोर मृत्यू दिसू लागला, तेव्हा तिला वाटले की संत म्हणत आहेत, तर चालत्या गाडीला अडथळा नको. हा विचार करून इंद्रमती म्हणाली की जसे आपण म्हणत आहात, त्याचप्रमाणे मी करेन. करुणामय कबीर साहेबांनी तिला नामदीक्षा दिली आणि म्हणाले की तिसऱ्या दिवशी माझ्या रूपामध्ये काल (ब्रह्म) येईल. तू त्याच्याशी बोलू नकोस जे मी नाम दिलेले आहे, त्याचा दोन मिनिटे जप कर. त्यानंतर तू त्याच्याकडे बघ. त्यानंतर त्यांचा तू सत्कार कर. ही माझी केवळ या वेळेपुरती आज्ञा आहे, अन्यथा तसे बघायचे झाले तर गुरुदेव आल्याबरोबर त्यांच्या चरणी लीन झाले पाहिजे. राणी म्हणाली की ठीक आहे.

आता राणीला चिंता सतावू लागली. श्रद्धेने ती नामजप करू लागली. करुणामय साहेबजींच्या, गुरुदेवांच्या रूपामध्ये काल आला. त्याने इंद्रमती, इंद्रमती असा आवाज दिला. आता तिला पूर्वीचीच भीती होती. ती नामजप करत होती. तिने कालाकडे पाहिलेच नाही. दोन मिनिटांनंतर जेव्हा पाहिले, तेव्हा कालाचे स्वरूप बदलले होते. कालाचा वास्तविक चेहरा दिसू लागला. करुणामयसाहेबांचे स्वरूप त्याला राहिले नव्हते. आपले स्वरूप अचानक बदलेले आहे, हे जेव्हा कालाने पाहिले, तेव्हा त्याला समजले की हिच्याजवळ कोणता तरी शक्तियुक्त मंत्र आहे. जाताना तो म्हणाला, की, आता तर तू वाचलीस, पण नंतर तुला बघून घेईन. राणी अत्यंत आनंदित झाली. तिचा आनंद गगनात मावेना. ती आपल्या दासींना सांगू लागली की माझा मृत्यू होणार होता. मला नेण्यासाठी काल आला होता, परंतु माझ्या गुरुदेवांनी माझे रक्षण केले. राजा म्हणाला की तू अशाच प्रकारची नाटके करत असतेस. काल आला असता तर तो काय तुला सोडून गेला असता? हे संत तर भ्रमिष्टच करत असतात. आता असल्या गोष्टी तो राजा कसा मानेल? आनंदातच राणी झोपी गेली. काही वेळानंतर सर्प बनून काल पुन्हा आला आणि राणीला त्याने डंख मारला. त्याबरोबर मला साप चावला, असे राणी ओरडून सांगू लागली. नोकर इकडे-तिकडे पळू लागले. पाहता पाहता एक मोरीमधून तो साप निघून गेला. आपल्या गुरुदेवांचा धावा करून राणी बेशुद्ध झाली. करुणामय (कबीर) साहेब तेथे प्रगट झाले. त्यांनी लोकांना दाखविण्यासाठी काही मंत्र म्हटले. (ते तर मंत्राशिवाय देखिल जिवंत करू शकतात. त्यांना कोणत्याही जप-मंत्रांची आवश्यकता नाही.) त्यांनी इंद्रमतीला जिवंत केले. राणी अत्यंतिक उपकार मानून म्हणाली की हे बंदी छोड जर मी आपणाला शरण आले नसते, तर माझा मृत्यू अटळ होता. साहेब म्हणाले की हे इंद्रमती, या कालाला मी तुझ्या घरामध्ये घुसूही दिले नसते. तुझ्यावर त्याने हल्ला देखिल केला नसता, परंतु त्यामुळे तुझा विश्वास बसला नसता. तू असा विचार केला असतास की माझ्यावर कोणतीही आपत्ती येणार नव्हती आणि गुरुजींनी मला भ्रमिष्ट करून नामोपदेश केला. यासाठीच मी तुला थोडासा झटका दाखविला आहे. अन्यथा पुत्री, तुझा माझ्यावर विश्वास बसला नसता.

धर्मदास यहाँ घना अंधेरा, बिन परचय जीव जम का चेरा ।।

कबीर साहेबांनी (करुणामय) सांगितले की आता जेव्हा माझी इच्छा होईल, तेव्हाच तुझा मृत्यू होईल. गरीब दास जी म्हणतात, की–

गरीब, काल डरै करतार से, जय जय जय जगदीश । जौरा जौरी झाडती, पग रज डारे शीश।।

हा काल कबीर भगवानांना (कबीर परमेश्वर) घाबरतो आणि हा मृत्यू कबीर साहेबांचे जोडे झाडतो म्हणजेच तो त्यांच्या नोकरासारखा आहे. नंतर त्यांच्या चरणाची धूळ आपल्या मस्तकी लावून म्हणतो की आपण ज्याला मारण्याचा आदेश द्याल, त्याच्याजवळच मी जाईन, अन्यथा मी जाणार नाही.

गरीब, काल जो पीसै पीसना, जौरा है पनिहार । ये दो असल मजूर हैं, मेरे साहेब के दरबार ।।

हा काल जो येथील २१ ब्रह्माण्डांचा भगवान (ब्रह्म) आहे, तो ब्रह्मा, विष्णु, महेश यांचा पिता आहे. तो तर माझ्या कबीर साहेबांचे पीठ दळतो म्हणजेच पक्का नोकर आहे आणि जौरा (मृत्यू) माझ्या कबीर साहेबांचे पाणी भरते म्हणजेच एक विशेष मोलकरीण आहे. हे दोघे खरेखुरे मजूर माझ्या साहेबांच्या दरबारामध्ये आहेत. काही दिवसांनंतर साहेब पुन्हा आले. त्यांनी राणी इंद्रमतीला सतनाम प्रदान केले.

नंतर काही काळानंतर करुणामय साहेबांनी राणी इंद्रमतीची दृढ श्रद्धा पाहून तिला सारनाम प्रदान केले. शब्द उपलब्ध करून दिले. जेव्हा साहेब यायचे तेव्हा इंद्रमती प्रार्थना करत असे की माझ्या पतिराजाने देखिल हे मान्य करावे असे जरा समजवून सांगा. ते आपल्या चरणी आले, तर माझे जीवन सफल होऊन जाईल. आपण देखिल नामदीक्षा घ्यावी, अशी कबीर साहेबजींनी राजा चंद्रविजयला प्रार्थना केली. हे दोन दिवसांचे राज्य म्हणजे निव्वळ थाटमाच आहे. नंतर हा तुझा प्राणी देह ८४ लक्ष योनींमध्ये निघून जाईल. चंद्रविजय म्हणाला की भगवान, मी काही नामोपदेश घेणार नाही, परंतु भले सर्व खजिना दान करू दे, कोणत्याही प्रकारचा सत्संग करू दे मी आपल्या शिष्येला (राणीस) मनाई देखिल करणार नाही. कबीर (करुणामय) साहेब जींनी विचारले की आपण नाम का घेणार नाही? चंद्रविजय राजा म्हणाला की मला मोठमोठ्या राजांच्या मेजवानीला जावे लागते. करुणामय (कबीर) साहेब म्हणाले की तुझ्या मेजवानी आणि पार्ट्यांना जाण्यात नाम काय बाधा आणेल? तू कोणत्याही सभेमध्ये जा, तेथे काजू खा, दूध पी, सरबत पी, फक्त मद्यपान करू नको. मद्यपान हे महापाप आहे. ही गोष्ट राजाने मात्र मान्य केली नाही.

राणीच्या प्रार्थनेवर करुणामय (कबीर) साहेबजींनी राजाला पुन्हा समजावून सांगितले की हे राजा, नामाविना हे जीवन व्यर्थ होऊन जाईल. तू नामदीक्षा घे, पण राजाने पुन्हा सांगितले की गुरुजी मला नामासाठी आग्रह धरू नका. मी राणीच्या सत्संगात बाधा आणणार नाही. भले राणीने कितीही दान केले, कितीही सत्संग केला, तरी आपल्या शिष्येला मी मनाई करणार नाही. यावर साहेब राणीला म्हणाले की पुत्री हे दोन दिवसांचे सुख पाहून याची बुद्धी भ्रष्ट झालेली आहे. तू प्रभुंच्या चरणी लीन राहा आणि आपले आत्मकल्याण करवून घे. येथे कोणी कोणाचा पती नाही आणि कोणी कोणाची पत्नी नाही. हा तर केवळ दोन दिवसांचा संबंध आहे. बेटी, तू आता तुझे सुकर्म बनव. चाळिसाव्या वर्षी मरणार होती ती इंद्रमती ८० वर्षांची वृद्धा झाली. जेव्हा तिचे शरीर वृद्धत्वामुळे कंप पावू लागले, तेव्हा करुणामयसाहेब म्हणाले की इंद्रमती, आता बोल तुझी काय इच्छा आहे? सतलोकी येण्याची तुझी इच्छा आहे काय? इंद्रमती म्हणाली की साहेब, मी तयार आहे. हे दात्या, मी तर केव्हाही तयार आहे. करुणामयसाहेब म्हणाले की नातवंडांमध्ये तुझी कोणती ममता, मोह तर राहिला नाही ना? राणी म्हणाली की नाही साहेब, आपण ज्ञानच असे निर्मळ दिले आहे की या गलिच्छ लोकांची

मी काय इच्छा धरू? कबीरजी (करुणामय) म्हणाले की मग चल पुत्री सतलोकी. राणीने प्राण त्याग केला आणि कबीर साहेब (करुणामय) राणी इंद्रमतीचा आत्मा घेऊन वर गेले. याच ब्रह्माण्डामध्ये एक मान सरोवर आहे. त्या मान सरोवरावर आत्म्याला स्नान करावे लागते. अशा आत्म्यांना साहेब तेथे काही काल ठेवतात आणि पुन्हा विचारतात की आता पुन्हा सांग तुझी काही इच्छा शिल्लक आहे काय? अन्यथा पुन्हा जन्म घ्यावा लागेल. जर मनामध्ये कोणती इच्छा राहिली असेल, तर सतलोकी जाऊ शकत नाही. इंद्रमती म्हणाली की साहेब, आपण तर अंतर्यामी आहात. मला तर आपल्या चरणांशिवाय कोणतीही इच्छा नाही. माझ्या मनामध्ये फक्त एक शंका उत्पन्न झाली आहे. आजकालचे पती आपल्या पत्नीच्या सत्संगात बाधा आणतात. माझे जे पती होते, त्यांनी मला कोणत्याही धार्मिक कर्मासाठी कधीही मनाई केलेली नाही. जर त्यांनी मला मनाई केली असती, तर मी आपल्या चरणी आली नसते. माझे कल्याण झाले नसते. त्यांच्या या शुभकर्मामधील सहयोगाचा त्यांना काही लाभ होत असेल, तर हे दात्या, कधी तरी त्यांच्यावर देखिल दया करावी. आता साहेबांनी पाहिले की ही त्या अज्ञानी मूर्खामध्ये पुन्हा अडकली आहे. साहेब म्हणाले की ठीक आहे पुत्री, आता तू दोन-चार वर्षे येथेच राहा.

दोन वर्षांनंतर राजाचा मृत्युसमय जवळ आला. कारण त्याने नामोपदेश घेतलेला नव्हता. यमाचे दूत आले. राजा चौकामध्ये चक्कर येऊन पडला. दूतांनी राजाचा गळा दाबला. राजाने तेथेच मलमूत्र विसर्जन केले. करुणामय (कबीर) साहेब राणीला म्हणाले की बघ तुझ्या राजाची काय दुरवस्था होत आहे? तेथूनच साहेब राणीला दाखवत होते. तेव्हा राणी म्हणाली की हे पाहा दाता, जर राजाच्या भक्तिमधील सहयोगातून काही एक बनत असेल तर त्याच्यावर दया करावी. राणीच्या मनात अजूनही थोडीशी ममता, मोह शिल्लक होता. साहेब कबीरजींना (करुणामय) वाटले, की आता ही पुन्हा कालाच्या जाळ्यामध्ये फसणार. याचा विचार करून कबीर साहेब मान सरोवरावरून तेथे गेले, जेथे राजा चंद्रविजय आपल्या महलामध्ये बेशुद्ध होऊन पडला होता. यमदूत त्याचे प्राण काढून घेत होते. कबीर साहेब येताच ते असे आकाशामध्ये उडाले की जसे मृतापासून गिधाडे आकाशात उडतात. चंद्रविजय शुद्धीवर आला. समोर करुणामयसाहेब उभे होते. ते केवळ चंद्रविजयलाच दिसत होते. इतरांच्या दृष्टिपथात ते नव्हते. चंद्रविजय कबीर (करुणामय) साहेबांच्या चरणी लोटांगण घालून याचना करू लागला की हे दाता, मला क्षमा करावी. परमेश्वरा, माझे प्राण वाचवा. कबीर साहेब म्हणाले की राजा त्या दिवशीही तुला तेच सांगितले होते आणि आता देखिल तुला हेच सांगतो की तुला नामोपदेश घ्यावा लागेल. राजा म्हणाला की मी नामोपदेश घेईन. आताच घेईन. त्याला नामोपदेश देऊन कबीर साहेब म्हणाले की आता मी तुला दोन वर्षांचे आयुष्य प्रदान करेन. जर यामधील एक श्वास देखिल वाया गेला, तर तुला पुन्हा कर्मदंड सोसावा लागेल.

कबीर, जीवन तो थोडा भला, जै सत सुमरण हो। लाख वर्ष का जीवना, लेखे धरे ना को ।।

शुभकर्मामध्ये सहयोग दिलेले पूर्वीचे कर्म, सोबत श्रद्धेने दोन वर्षे केलेले स्मरण आणि तीनही नाम प्रदान करून कबीर साहेब चंद्रविजयलाही पैलतीरी घेऊन गेले. बोलो सतगुरु देव की जय। ''जय बन्दी छोड ।''

यावरून असे सिद्ध होते की परमेश्वर कबीर साहेब जी खऱ्या श्रद्धाळूंचे आयुष्य वाढवितात आणि त्यांच्या परिवाराचे रक्षण करतात. हे प्रमाण फार पूर्वीचे आहे. आताच्या कालात सर्वसाधारण व्यक्ति यावर विश्वास ठेवत नाहीत. पूज्य कबीर परमेश्वरांच्या शक्तिने या दासाद्वारा (माझ्या) वर्तमानामध्ये झालेले कष्टनिवारण आणि आयुवृद्धीचे अनेक प्रमाण ''परमेश्वरका सार

संदेश'' या पुस्तकामध्ये वाचावीत.

## ''पवित्र पुराणांचे रहस्य''

पुराणांना समजण्यासाठी कृपया हे लक्षात ठेवावे, की, श्री ब्रह्मा पुराण, श्री विष्णु पुराण आणि श्री शिव पुराण यांचा प्रारंभ जसे ब्रह्म (काल) यास प्रथम अव्यक्त गीता च्या सातव्या अध्यायातील २५ व्या श्लोकामध्ये म्हटलेले आहे, त्याप्रमाणे ब्रह्मच्या (काल) लीलेने होतो. त्यालाच क्षर पुरुष किंवा ज्योति निरंजन देखिल म्हटले जाते. त्याला सदाशिव, कालरुपी ब्रह्म असे देखिल संबोधले जाते. तोच ब्रह्माण्डामध्ये एका ब्रह्मलोकाची रचना करून त्याच्या वरील भागामध्ये वास्तव्य करतो.

यालाच महाविष्णु, महाब्रह्मा आणि महाशिव असे संबोधले जाते. तसेच त्या क्षेत्राला काशी देखिल म्हटले जाते. त्यामध्ये रजगुणप्रधान, सतगुणप्रधान, तमगुणप्रधान तीन स्थाने बनवून आपली पत्नी दुर्गा सोबत (महालक्ष्मी) राहून तीन पुत्र रजगुण श्री ब्रह्मा जी, सतगुण श्री विष्णु जी, तमगुण श्री शिव जी यांची उत्पत्ती करून अचेत करून ठेवतो. बेशुद्धावस्थेतच त्यांचे पालनपोषण करत राहतो. तरुण झाल्यावर श्री ब्रह्मास कमळाच्या फुलावर, श्री विष्णुस शेषनागावर आणि श्री शिवास कैलास पर्वतावर शुद्धीवर आणतो. या तीनही प्रभूंना स्वत:लाही याचे ज्ञान नाही की त्यांचा उत्पत्तीकर्ता कोण आहे? हाच कालरुपी ब्रह्मच विष्णुरूप धारण करून आपल्या नाभीपासून कमळ उत्पन्न करतो. त्यावर श्री ब्रह्मा जीस ठेवून शुद्धीवर आणतो. जेव्हा वाटेल तेव्हा तो श्री विष्णु, श्री ब्रह्मा, श्री शिव यांचे रूप धारण करून दृष्टिगोचर होतो. हा काल आपल्या वास्तविक रूपामध्ये कधीच प्रकट होत नाही, हे कालने (ब्रह्म) श्रीमद् भगवत गीता चे ज्ञान देताना दाखविले होते. याचे प्रमाण गीता च्या १० व्या आणि ११ व्या अध्यायांमध्ये आहे. श्रीमद् भगवत गीता च्या ११ व्या अध्यायातील ४७ व ४८ व्या श्लोकांमध्ये सांगितलेले आहे की हे अर्जुना, माझे हे वास्तविक कालरूप तुझ्याव्यतिरिक्त यापूर्वी कोणीही पाहिलेले नाही आणि यापुढेही कोणी पाहू शकणार नाही. हे रूप मी तुझ्यावर अनुग्रह करून दाखविलेले आहे. हे माझे (ब्रह्म) हजार भुजा व नेत्र आदी असणारे कालरूप वेदांमध्ये वर्णन केलेल्या यज्ञ, ओऽम नामाचा जप अशा विधींनी कधीही पाहता येणार नाही. याचा भावार्थ असा आहे, की वेदांममध्ये वर्णन केलेल्या विधींनी प्रभुची प्राप्ती होणार नाही. ऋषि–महर्षींनी वेदांमधील ओऽम नाम हे प्रभुप्राप्तीचे समजून त्यासाठी यज्ञ आणि ओऽम नामाचा जप अशा घोर साधना केल्या, परंतु त्यांना ब्रह्मचे (काल) दर्शन झाले नाही. कोणी कमळांचा प्रकाश पाहिला, तर कोणी शरीरामधील ज्योत पाहिली किंवा धून (आवाज) ऐकली. पण हे सर्व कालचा (ब्रह्म) छळ (फसवणूक) आहे. जसे एखाद्या जागी एका रंगाचे हजार बल्ब एकमेकांच्या जवळ गोलाकार लावून प्रकाशित केले असतील, तसे कोणी कोणी सहस्र कमळांच्या एक हजार ज्योतींपासून निघणारा प्रकाश पाहून प्रभुप्राप्ती झाली असे मानले. यात दूरवरून पाहणाऱ्यांना प्रकाशाचा एक समूहच दिसणार. अगदी जवळ गेल्यानंतर समजते की हा तर बल्बच्या समूहाचा प्रकाश आहे.

अशाप्रकारे काही साधक हठयोग करून शरीरामध्ये अंतर्मुख होऊन थोड्याशा आतषबाजीस (प्रकाशास) पाहून प्रभुची प्राप्ती झाली असे मानतात. त्याच काल ज्वालेचा आनंद समजून आपले अनमोल जीवन नष्ट करतात. वेदांमध्ये स्पष्ट लिहिलेले आहे की परमेश्वर शरीरयुक्त आहे. यजुर्वेदाच्या १ ल्या अध्यायातील १५ वा आणि ५ व्या अध्यायातील १ ल्या मंत्रांमध्ये याचे प्रमाण आहे.

अग्ने तनूर् असि। विष्णवे त्वा सोमस्य तनूर् असि।

याचा शब्दार्थ असा आहे की परमेश्वर शरीरयुक्त आहे म्हणजेच त्या पालनकर्त्या अमरपुरुषाला (सतपुरुष) शरीर आहे अर्थात परमेश्वराला आकार आहे. म्हणूनच ऋषिंनी प्रभुच्या दर्शनासाठी घोर साधना केल्या, परंतु वेदांमध्ये वर्णन केलेल्या विधींनी प्रभुची प्राप्ती होऊ शकत नाही. त्यामुळे आजपर्यंत सर्व साधक, ऋषि आदींनी वेदांच्या ज्ञानाविरुद्ध आपल्या अनुभवांच्या पुस्तकांची रचना केली आहे. आता सर्व भक्तसमाज पवित्र वेदांच्या जागी अन्य महर्षी अथवा संतांच्या अनुभवातून निर्माण झालेल्या पुस्तकांच्या ज्ञानाचा आधार घेत आहे.

पवित्र वेद आणि श्रीमद् भगवत गीता ज्ञानदाता ब्रह्म म्हणत आहे, की, तीनही गुण (रजगुण ब्रह्मा जी, सतगुण विष्णु जी, तमगुण शिव जी) ईष्ट रूपामध्ये पूजायोग्य नाहीत. कारण ते देखिल नाशवान आहेत, तसेच कर्माची फळे जशीच्या तशीच प्रदान करतात. ते पापक्षमा (नाश) करू शकत नाहीत. त्यांना पूजणाऱ्या भक्तांना त्यांच्या प्रारब्धामध्ये लिहिलेले कष्ट भोगावेच लागतात. या तीन प्रभुंच्या साधनेने क्षणिक सांसारिक सुख प्राप्त होते, परंतु पूर्ण मोक्ष मिळत नाही आणि या तीन प्रभुंपासून (श्री ब्रह्म, श्री विष्णु, श्री शिव) प्राप्त होणाऱ्या क्षणिक लाभावर ज्यांची आस्था बनलेली आहे, ते राक्षस स्वभाव धारण केलेले, मनुष्यांमध्ये नीच, दुष्कर्म करणारे, मूर्ख माझी (काल–ब्रह्मला) पूजा देखिल करत नाहीत. (प्रमाण श्रीमद् भगवत गीता तील सातव्या अध्यायातील १२ ते १५ श्लोक) कारण ब्रह्मसाधक अधिक कालापर्यंत ब्रह्मलोकामध्ये बनलेल्या महास्वर्गामध्ये आपल्या नामजप व पुण्याच्या कमाईच्या आधारावर राहतो. म्हणूनच काल म्हणत आहे की या तीनही प्रभुंपेक्षा अधिक लाभ मी देऊ शकतो, परंतु हे ब्रह्मलोक आणि काल देखिल (ब्रह्म) नाशवान आहे. गीता च्या आठव्या अध्यायातील १६ व्या श्लोकामध्ये सांगितले आहे की ब्रह्मलोकापर्यंत सर्व लोक नाशवान आहेत. तसेच गीता च्या २ ऱ्या अध्यायातील १२ वा श्लोक व ४ थ्या अध्यायातील ५ व्या श्लोकामध्ये स्वत: गीता ज्ञानदाता ब्रह्म (काल) म्हणत आहे की माझाही जन्म–मृत्यू होतो म्हणजेच मी (ब्रह्मकाल) नाशवान आहे. म्हणूनच पवित्र गीता च्या ७ व्या अध्यायातील १८ व्या श्लोकामध्ये म्हटलेले आहे की जे ४ थ्या प्रकारचे माझे (ब्रह्म) साधक जे ज्ञानी आहेत, ते वेदांच्या ज्ञानाच्या आधारावर जाणून घेतात की केवळ एक पूर्ण परमात्माच इष्ट रूपामध्ये पूज्य आहे, तोच पापनाशक, पूर्ण मोक्षदायक आहे, तसेच मानवी शरीर हे फक्त प्रभुप्राप्तीसाठीच मिळालेले आहे. त्यांनी वेदांचा स्वत:च असा निष्कर्ष काढला आहे की ओऽम (ॐ) हाच एक प्रभुप्राप्तीचा मंत्र आहे. हा ॐ मंत्राचा जप करत हजारो वर्षे साधना करून आपल्या शरीराचा त्याग केला, परंतु त्यांना प्रभुदर्शन झाले नाही. अन्य सर्व सुविधा मिळाल्या, स्वर्ग–महास्वर्ग आदी ठिकाणी उच्चपद प्राप्त झाले, मात्र भजनाची (नामजप) आणि पुण्याची कमाई समाप्त झाल्यानंतर पुन्हा जन्म–मृत्यू आणि ८४ लक्ष प्राण्यांच्या शरीरामध्ये दुःखद कष्ट आणि नरकामधील पापकर्माचे फळ देखिल भोगावे लागले.

पवित्र यजुर्वेदाच्या ४० व्या अध्यायातील १० वा मंत्र आणि पवित्र गीता च्या ४ थ्या अध्यायातील ३४ व्या श्लोकामध्ये या दोन्ही शास्त्रांचा ज्ञानदाता ब्रह्म म्हणत आहे की त्या पूर्ण परमात्म्याविषयी मला (कालरुपी ब्रह्म) काहीच माहिती नाही. त्या परमेश्वराविषयी पूर्ण माहिती, तत्त्वज्ञान आणि त्याच्या प्राप्तीचा विधी अर्थात पूर्ण मोक्षाच्या मार्गाच्या माहितीसाठी तत्त्वदर्शी संतांचा शोध घे. त्यानंतर ते जशी साधना सांगतील, तशी कर. त्यानंतर ज्यांच्याकडे गेलेले साधक पुन्हा परत या (नश्वर) संसारामध्ये येत नाहीत म्हणजेच पूर्ण मोक्ष मिळवून सदा सर्वकाळाकरिता जन्म–मृत्यू आणि ८४ लक्ष योनींचे कष्ट आणि नरकपीडेचे कष्ट यांतून मुक्त

होतात, तसेच पूर्ण शांती प्राप्त करून अविनाशी लोक म्हणजेच सतलोक मिळवतात, त्या परमपद परमेश्वराचा शोध घेतला पाहिजे. (प्रमाण गीता च्या १५ व्या अध्यायातील एक ते ४ था श्लोक आणि १८ व्या अध्यायातील ६२ वा श्लोक, तसेच ऋग्वेद मंडल एक मधील २४ व्या सुक्तातील पहिला व २ रा मंत्र.)

तत्त्वदर्शी संत न मिळाल्यामुळे सर्व ऋषिजन वेदांनुसार साधना करूनही महाकष्टच भोगत राहतात. म्हणूनच गीता च्या ७ व्या अध्यायातील १८ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की जे ज्ञानी आत्मे आहेत, ते असतील तरच उद्धार. कारण प्रभुप्राप्तीसाठी ते तन-मन-धन अर्पण करून वेदानुसार साधना करतात, परंतु ते देखिल ज्यामुळे त्यांचा पूर्ण मोक्ष मिळत नाही, त्या माझ्या (काल-ब्रह्म) अश्रेष्ठ (अनुत्तमाम्) गतीवर म्हणजेच साधनेने मिळणाऱ्या लाभवरच आश्रित आहेत. त्यांचा जन्म-मृत्यू, नाना प्राण्यांच्या देहामधील आणि नरकामधील कर्माधाराने होणारे कष्ट कधीही समाप्त होऊ शकत नाही.

ज्योति निरंजनाने (कालरूपी ब्रह्म) शपथ घेतलेली आहे की मी कधीही कोणालाही कोणत्याही साधनेने आपल्या वास्तविक कालरूपामध्ये दर्शन देणार नाही. म्हणूनच हा कालरुपी ब्रह्मच आपल्या पुत्रांच्या (ब्रह्मा, विष्णु, शिव) रूपांमध्ये दिसून स्वत:च नाना प्रकारची चरित्रे रचतो. त्यामुळे सामान्य जन असा विचार करतात की ही लीला भगवान विष्णुने केली, कधी म्हणतात ही लीला श्री ब्रह्माने केली, तर कधी म्हणतात ही लीला श्री शिवाने केली. जसे सर्वसामान्य लोक म्हणतात की श्री ब्रह्मा जींची उत्पत्ती श्री विष्णुजींच्या नाभीतून निघालेल्या कमळावर झाली, परंतु त्या वेळी श्री विष्णुजींच्या रूपामध्ये कालाने आपल्या नाभीपासून कमळ प्रगट केले होते.

श्री व्यासजींनी श्री नारदजींकडून ऐकलेले, नारदजींनी आपले पिता श्री ब्रह्माजींकडून ज्याची माहिती मिळवली, श्री लोमहर्षण ऋषिंनी (ज्यांना सुतजी देखिल म्हटले जाते) आपल्या गुरुदेव श्री व्यास ऋषिंपासून ऐकले होते, ते ज्ञान ब्रह्मा पुराणामध्ये (सृष्टिचे वर्णन नावाचा अध्याय) सांगितले आहे. श्री ब्रह्मा जींना तर स्वत:लाच याचे ज्ञान नाही की त्यांची उत्पत्ती कोठून झाली आहे. (श्री देवी महापुराण ३ रा स्कंद). याचा भावार्थ असा नाही की पुराणांमधील ज्ञान चुकीचे आहे. जे ज्ञान श्री ब्रह्मा जी शुद्धीवर आल्यानंतर सांगितले होते, ते त्या स्तरापर्यंत तरी योग्य आहे, परंतु शुद्धीवर येण्यापूर्वीचे जे पूर्ण परमेश्वरांनी प्रथम सतयुगामध्ये सत सुकृत नावाने प्रगट होऊन तत्त्वदर्शी संतांच्या रूपामध्ये तत्त्वज्ञान आणि वास्तविक सृष्टिरचनेचे ज्ञान श्री ब्रह्मा जी, श्री मनूजी आदींना दिले होते, परंतु त्यांनी ते ऐकले न ऐकल्यासारखे केले होते ते ज्ञान हे दंतकथा (लोकवेद) आहे. त्यानंतर जेव्हा श्री ब्रह्मा जींना त्यांचेच वंशज विचारू लागले, त्यावेळी त्या ऐकीव ज्ञानाच्या आधाराने काही सरमिसळ करून पूर्वीचे ज्ञान सांगितले आहे. त्यामुळे कोणतेही पुराण निर्णायक ज्ञानयुक्त नाही. कोणत्या तरी एका पुराणाच्या आधारे असे सिद्ध होते की श्री ब्रह्माजींची उत्पत्ती श्री विष्णुजींपासून झाली इत्यादी इत्यादी. त्यामुळे सर्व ऋषिजन आणि श्री ब्रह्मा, विष्णु व शिव जी देखिल स्वत: शंकेमध्ये आहेत.

## ''श्री ब्रह्मा जी आणि श्री विष्णु जी यांचे युद्ध''

श्री शिवपुराण (विद्येश्वर संहितेतील अध्याय ६ वा, अनुवादक- दीन दयाळ शर्मा, प्रकाशक- रामायण प्रेस, मुंबई, पान नं. ६७ आणि संपादक- पंडित रामलग्न पांडेय विशारद, प्रकाशक- सावित्र ठाकूर, प्रकाशन- रथरात्रा, वाराणसी, शाखा- नाटी इमली वाराणसीच्या विद्येश्वर संहितेच्या ६ व्या अध्यायातील पान नं. ५४ आणि टीकाकार डॉ. ब्रह्मानंद त्रिपाठी

साहित्य आयुर्वेद ज्योतिष आचार्य, एम. ए., पीएच.डी., डी.एस., सी.ए. प्रकाशक– चौखंबा, संस्कृत प्रतिष्ठान, ३८ यू. ए., जवाहरनगर, बंगलो रोड, दिल्ली, संस्कृतसहित शिवपुराणातील विद्येश्वर संहितेच्या सहाव्या अध्यायातील पान नं. ४५ वर)

श्री ब्रह्मा जी एकदा श्री विष्णु जीकडे आले. त्यावेळी श्री विष्णु जी लक्ष्मीसहित शेषशय्येवर झोपले होते. सोबतच अनुचर देखिल बसलेले होते. श्री ब्रह्मा जी श्री विष्णु जींना म्हणाले की पुत्रा ऊठ, मी तुझा पिता आलो आहे. मी तुझा प्रभु आहे. यावर विष्णु जी म्हणाले की ये, बैस मी तुझा बाप आहे आणि तुझे तोंड असे वाकडे का झालेले आहे? ब्रह्मा जी म्हणाले की हे पुत्रा, तुला आता गर्व झालेला आहे. मी फक्त तुझा संरक्षकच नाही, तर समस्त जगतांचा पिता आहे. श्री विष्णु जी म्हणाले की अरे चोरा! तू आपला मोठेपणा का दाखवत आहेस? सर्व जगताचा वास तर माझ्यामध्ये आहे. तू माझ्या नाभिकमळातून उत्पन्न झालेला आहेस आणि मलाच असा बोलतोस? एवढे बोलणे झाल्यावर दोघेही शस्त्रास्त्रांनी लढू लागले. त्यांनी एकमेकांच्या छातीवर आघात केले. हे पाहून सदाशिवांनी (कालरुपी ब्रह्म) एक तेजोमय लिंग दोघांच्या मध्ये उभे केले, तेव्हा त्यांचे युद्ध समाप्त झाले. (हे विवरण श्री गीता प्रेस गोरखपूर यांनी प्रकाशित केलेल्या शिवपुराणातून घेतले आहे, परंतु मूळ संस्कृतसहित आणि आणखी दोन संपादक व प्रकाशकांच्या शिवपुराणात योग्य आहे.)

विचार करा :– श्री शिवपुराण, श्री विष्णुपुराण व श्री ब्रह्मापुराण आणि श्री देवी महापुराण यांमध्ये तीन प्रभु व सदाशिव (कालरुपी ब्रह्म) आणि देवी (शिवा–प्रकृति) यांच्या जीवनलीला आहेत. त्यांच्या आधारावरच सर्व ऋषिजन व गुरुजन ज्ञान सांगत होते. जर कोणी पवित्र पुराणांहून भिन्न ज्ञान सांगत असेल, ते पाठ्यक्रमाच्या विरुद्ध ज्ञान असल्याने व्यर्थ आहे.

वरील युद्धाचे विवरण हे पवित्र शिव पुराणा तील आहे, ज्यामध्ये दोन्ही प्रभु चार–पाच वर्षांच्या मुलांसारखे भांडत आहेत. एक म्हणत आहे की तू माझा पुत्र आणि दुसरा म्हणत आहे की तू माझा पुत्र आणि मी तुझा बाप. नंतर एकमेकांची गळपट्टी धरून लाथाबुक्क्यांनी मारहाण करत आहेत. हेच चरित्र त्रिलोकनाथांचे आहे.

वरील तीन पुराणांचा (श्री ब्रह्मपुराण, श्री विष्णुपुराण, श्री शिवपुराण) प्रारंभ तर कालरुपी ब्रह्म म्हणजेच ज्योति निरंजनापासूनच होतो, जो ब्रह्मलोकामध्ये महाब्रह्मा, महाविष्णु आणि महाशिव अशी रूपे धारण करून राहतो आणि त्या रूपांच्या माध्यमातून आपल्या लीला देखिल करतो. आपले वास्तविक कालरूप जे आहे, ते लपवून ठेवतो. त्यानंतरचे विवरण रजगुण ब्रह्मा जी, सतगुण विष्णु जी व तमगुण शिव जी यांच्या लीलांचे आहे. या ज्ञानाच्या आधाराने पवित्र पुराणे समजून घेणे अगदी सोपे होऊन जाते.

## ''श्री विष्णुपुराण''

(अनुवादक– श्री मुनिलाल गुप्त, प्रकाशक– गोविंद भवन कार्यालय, गीता प्रेस, गोरखपूर) श्री विष्णुपुराणाचे ज्ञान श्री पाराशर ऋषिंनी आपला शिष्य श्री मैत्रेय ऋषिंना सांगितले.

श्री पारासर ऋषिंनी विवाह होताच गृहत्याग करून वनामध्ये साधना करण्याचा दृढसंकल्प केला होता. त्यांची धर्मपत्नी म्हणाली की आताच तर आपला विवाह झालेला आहे आणि लगेच तुम्ही घराचा त्याग करून जात आहात. एखादे आपत्य झाल्यानंतर आपण साधनेसाठी जावे. श्री पाराशर ऋषि म्हणाले की साधना केल्यानंतर संतान झाली, तर तिच्यावर चांगले संस्कार होतील. मी काही कालानंतर तुझ्यासाठी माझी शक्ती (वीर्य) एखाद्या पक्ष्याद्वारे पाठवून देईन. ते तू ग्रहण करावेस. असे सांगितल्यावर घराचा त्याग करून पाराशर ऋषि साधना

करण्यासाठी वनामध्ये गेले. एक वर्ष साधना केल्यानंतर त्यांनी आपले शक्ती (वीर्य) एका वृक्षाच्या पानातून आपल्या मंत्रशक्तीने शुक्राणूंचे रक्षण केले आणि एका कावळ्याला म्हणाले की हे पान माझ्या पत्नीला देऊन ये. कावळा ते घेऊन जात असताना त्याच्या चोचीमधून ते पान पाण्यामध्ये पडले. ते पान एका माशाने खाल्ले. काही महिन्यांनंतर एका नाविकाने माशाला पकडून कापले. त्यामधून एक कन्या बाहेर पडली. नाविकाने तिचे नाव सत्यवती असे ठेवले. ती कन्या (माशाच्या उदरातून जन्म झाल्यामुळे) मच्छोदरी नावानेही ओळखली जात होती. नाविकाने सत्यवतीला आपल्या मुलीसारखे सांभाळले.

कावळ्याने परत जाऊन श्री पाराशर ऋषिंना सर्व वृत्तांत सांगितला. जेव्हा सोळा वर्षांनंतर साधना समाप्त झाल्यावर श्री पाराशर ऋषि आपल्या घरी जात होते, तेव्हा नदी पार करण्यासाठी नाविकाला हाक दिली आणि म्हणाले की मला लवकरात लवकर पैलतीरी ने. माझी पत्नी माझी प्रतीक्षा करत आहे. त्यावेळी नाविक भोजन ग्रहण करत होता आणि पाराशर ऋषिंच्या बीजापासून माशाच्या उदरातून बाहेर पडलेली १४ वर्षीय युवा कन्या आपल्या पित्याजवळच होती. नाविकाला हे माहीत होते की साधना, तपस्या करून येणारे ऋषि सिद्धियुक्त असतात. त्यांच्या आज्ञेचे तत्काळ पालन केले नाही तर ते शाप देतात. नाविक म्हणाला की हे ऋषिवर, मी भोजन ग्रहण करत आहे. अपूर्ण भोजन ग्रहण करणे हा अन्नदेवतेचा अपमान असतो. मी तसे केले तर मला पाप लागेल, परंतु श्री पाराशर ऋषिंनी त्याचे काही एक ऐकले नाही. ऋषि अतिउत्सुक झालेले पाहून नाविकाने आपली तरुण मुलगी सत्यवतीला ऋषिजींना पैलतीरी सोडण्यास सांगितले. पित्याच्या आदेशप्रमाणे ती नावेमधून पाराशर ऋषिंना घेऊन निघाली. नदीच्या मध्यावर आल्यानंतर पाराशर ऋषिंनी सत्यवतीजवळ (आपल्या बीजशक्तीने उत्पन्न झालेल्या कन्येला म्हणजेच स्वतःच्या मुलीला) दुष्कर्म करण्याची इच्छा व्यक्त केली. ऋषिंनी क्रोधाने दिलेल्या शापामुळे दुःखी झालेल्या व्यक्तींच्या कथा सत्यवतीने पालकपिता नाविकाकडून ऐकलेल्या होत्या. शापाच्या भीतीने सत्यवती म्हणाली की ऋषि जी आपण तर ब्राह्मण आहात आणि मी एका शूद्राची मुलगी आहे. पाराशर ऋषि म्हणाले की त्याची तू काळजी करू नको. तिने अब्रुरक्षणासाठी पुन्हा ढोंग रचले की ऋषिवर माझ्या शरीरातून माशाचा दुर्गंध येत आहे. पाराशर ऋषिंनी आपल्या सिद्धिशक्तीने तिच्या शरीराची दुर्गंधी घालवली. आता सत्यवती म्हणाली की दोन्ही किनाऱ्यावरील लोक पाहत आहेत. पाराशरजींनी गंगेचे जल घेऊन आकाशात फेकले आणि सिद्धिशक्तिद्वारे दाट धुके पसरवले. त्यांनी आपले मनोरथ पूर्ण केले. सत्यवतीने ही सर्व हकीकत आपल्या पालक मातेला (नाविकाच्या पत्नीला) सांगितली. नाविकाच्या पत्नीने सर्व घटना नाविकाला सांगितली. ती म्हणाली की ऋषिंनी आपले नाव पाराशर असून ते ऋषि वसिष्ठजींचे पौत्र (नातू) आहेत, असे सांगितले आहे. सत्यवतीच्या पोटी व्यास ऋषिंनी जन्म घेतला.

त्याच श्री पाराशर ऋषिंनी श्री विष्णुपुराणाची रचना केलेली आहे. श्री पाराशर ऋषिजींनी सांगितले आहे की हे मैत्रेय, जे ज्ञान मी तुला ऐकविणार आहे, तोच प्रसंग दक्षादी मुनींनी नर्मदा नदीच्या तीरावर राजा पुरुकृत्सला ऐकवला होता. पुरुकृत्साने तो सारस्वताला आणि सारस्वताने मला सांगितला आहे. श्री पाराशरजींनी श्री विष्णुपुराणाच्या पहिल्या अध्यायातील ३१ व्या श्लोकामध्ये (पृष्ठ क्रमांक ३) सांगितलेले आहे की हे जग विष्णुंपासून निर्माण झालेले आहे आणि ते त्यांच्यामध्ये स्थित आहे. तेच जगताची स्थिती आणि लय यांचे कर्ता आहेत. २ ऱ्या अध्यायातील १५ व १६ व्या श्लोकांमध्ये (पृष्ठ क्रमांक ४) सांगितलेले आहे की हे द्विज! परब्रह्मचे पहिले रूप पुरुष म्हणजेच भगवंतासारखे वाटते, परंतु व्यक्त (महाविष्णु रूपामध्ये प्रगट

होणे) व अव्यक्त (अदृश्य रूपामध्ये २१ ब्रह्माण्डांमध्ये वास्तविक कालरूपामध्ये राहणे) ही त्याची अन्य रूपे आहेत, तर काल त्यांचे परम रूप आहे. भगवान विष्णु जे कालरूपामध्ये म्हणजेच व्यक्त व अव्यक्त रूपांनी स्थित होतात, ती त्यांची बाललीला आहे.

२ ऱ्या अध्यायातील २७ व्या श्लोकामध्ये (पृष्ठ क्रमांक ५) सांगितलेले आहे की हे मैत्रेय, प्रलयकाळात प्रधान म्हणजेच प्रकृतिच्या साम्य अवस्थेमध्ये स्थित झाल्यानंतर म्हणजेच पुरुषाच्या प्रकृति पासून पृथक स्थित झाल्यानंतर विष्णु भगवानांचे कालरूप प्रवृत होते.

२ ऱ्या अध्यायातील २८ ते ३० व्या श्लोकांमध्ये (पृष्ठ क्रमांक ५) त्यानंतर (स्वर्गकाळात आल्यानंतर) त्या परब्रह्म परमात्मा विश्वरूप सर्वव्यापी सर्वभूतेश्वर सर्वात्मा परमेश्वराने आपल्या इच्छेने विकारीप्रधान आणि अविकारी पुरुषामध्ये प्रविष्ट होऊन त्यांना क्षोभित केले. ।।२८–२९।।जसे क्रियाशील नसतानाही गंध आपल्या सान्निध्याने देखिल प्रधान व पुरुष यांना प्रेरित करतो.

विशेष :– २८ ते ३० व्या श्लोकांमध्ये स्पष्ट केलेले आहे की प्रकृति (दुर्गा) आणि पुरुष (काल–प्रभु) यापेक्षा अन्य दुसरा कोणी तरी असा परमेश्वर आहे, जो या दोघांना पुन्हा सृष्टिरचनेसाठी प्रोत्साहित करतो.

२ ऱ्या अध्यायातील ६६ व्या श्लोकामध्ये (पृष्ठ क्रमांक ८) लिहिलेले आहे की तेच प्रभु विष्णु सृष्टा (ब्रह्म) होऊन आपलीच सृष्टि निर्माण करतात. ७० व्या श्लोकामध्ये असे लिहिलेले आहे की भगवान विष्णूंनीच ब्रह्मा आणि इतरांची अवस्थांद्वारे रचना केली आहे. त्यांचीच रचना केली जाते आणि स्वत: देखिल संहृत अर्थात मरण पावतात. ४ थ्या अध्यायातील ४ थ्या श्लोकात (पृष्ठ क्रमांक ११) लिहिले आहे की असा दुसरा कोणी तरी परमेश्वर आहे, जो ब्रह्मा, शिव आदी ईश्वरांचा ईश्वर आहे. ४ थ्या अध्यायातील १४ व १५ आणि १७ ते २२ या श्लोकांमध्ये (पृष्ठ क्रमांक ११ व १२) लिहिलेले आहे की पृथ्वी बोलत आहे– हे कालस्वरूपा आपणास माझा नमस्कार आहे. हे प्रभो ! आपणच जगताची सृष्टि आणि इतरांसाठी ब्रह्मा, विष्णु आणि रुद्ररूप धारण करणारे आहात. आपण ज्या अवतार रूपामध्ये प्रगट होता, त्याच रूपाची देवगण पूजा करतात. आपणच ओंकार आहात. चौथ्या अध्यायातील ५० व्या श्लोकामध्ये (पृष्ठ क्रमांक १४) लिहिलेले आहे की नंतर त्या भगवान हरीने रजगुणयुक्त होऊन चतुर्मुखधारी ब्रह्मा रूप धारण करून सृष्टिची रचना केली.

या विवरणावरून असे सिद्ध झाले आहे की ऋषि पाराशरजींनी ऐकलेले ज्ञान अर्थात लोकवेदांच्या आधारावर श्री विष्णुपुराणाची रचना केली गेलेली आहे. कारण वास्तविक ज्ञान हे पूर्ण परमात्म्याने प्रथम सतयुगामध्ये स्वतः प्रगट होऊन श्री ब्रह्माजींना दिलेले होते. श्री ब्रह्माजींनी काही ज्ञान आणि काही स्वनिर्मित काल्पनिक ज्ञान आपल्या वंशजांना सांगितले. एकाकडून दुसऱ्याला असे ऐकून व सांगूनच श्री पाराशरजींना लोकवेद प्राप्त झाला. श्री पाराशरजींनी विष्णुंना काल देखिल म्हटलेले आहे आणि परब्रह्म देखिल म्हटले आहे. या विवरणावरून असे देखिल सिद्ध झालेले आहे की विष्णु म्हणजेच ब्रह्मस्वरूप काल आपली उत्पत्ती ब्रह्मा, विष्णु आणि शिव रूपाने करून सृष्टिची निर्मिती करतात. ब्रह्मच (काल) ब्रह्मलोकामध्ये तीन रूपांत प्रगट होऊन लीला करत छळ करतो. तेथे त्याचा स्वतःचा देखिल मृत्यू होतो. (विशेष माहितीसाठी कृपया 'प्रलय की जानकारी' या पुस्तकातील 'गहरी नजर गीता में' यातील ८ व्या अध्यायातील १७ व्या श्लोकातील व्याख्या वाचावी.) त्याच ब्रह्मलोकामध्ये तीन स्थाने बनविलेली आहेत. एक रजगुणप्रधान ज्यामध्ये हाच कालरूपी ब्रह्म

आपले ब्रह्मारूप धारण करून राहतो. तसेच पत्नी रूपात दुर्गेला सोबत ठेवून एक रजगुणप्रधान पुत्र उत्पन्न करतो. त्याचे नाव ब्रह्मा असे ठेवतो. त्याद्वारेच एका ब्रह्माण्डामध्ये तो उत्पत्ती करून घेतो. अशाप्रकारे त्या ब्रह्मलोकात एक सतगुणप्रधान स्थान बनवून विष्णु रूप धारण करून स्वतः वास्तव्य करतो. येथे दुर्गेस (प्रकृति) पत्नी रूपामध्ये ठेवून एक सतगुणयुक्त पुत्र उत्पन्न करतो. त्याचे नाव विष्णु असे ठेवतो. त्या पुत्राद्वारे एक ब्रह्माण्डामध्ये तिन्ही लोकांतील (पृथ्वी, पाताळ, स्वर्ग) स्थिती बनविण्याचे कार्य करून घेतो. (प्रमाण शिवपुराण– गीता प्रेस, गोरखपूरद्वारा प्रकाशित अनुवाद– हनुमान प्रसाद पोद्दार चिमनलाल गौस्वामी, रुद्रसंहिता अध्याय ६, ७ पृष्ठ १०२ व १०३)

ब्रह्मलोकामध्येच एक तिसरे स्थान तमगुणप्रधान रचून तेथे स्वतः शिवरूप धारण करून राहतो. येथेही दुर्गेला (प्रकृति) सोबत ठेवून पती–पत्नी व्यवहाराने तमगुणयुक्त तिसरा पुत्र उत्पन्न करतो. त्याचे नाव शंकर (शिव) असे ठेवतो. या पुत्राद्वारे तिन्ही लोकांतील प्राण्यांचा संहार करवून घेतो.

विष्णु पुराणामध्ये ४ थ्या अध्यायापर्यंत जे ज्ञान आहे ते कालरूप ब्रह्म म्हणजेच ज्योति निरंजन यांचे आहे. पाचव्या अध्यायापासून पुढील मिळतेजुळते ज्ञान कालपुत्र सतगुण विष्णुंच्या लीलांचे आहे आणि त्यांचेच अवतार श्रीराम, श्री कृष्ण आदींचेही ज्ञान आहे.

येथे विशेष विचार करण्यासारखी बाब ही आहे की श्री विष्णु पुराणाचे वक्ता श्री पाराशर ऋषि आहेत. हेच ज्ञान दक्षादी ऋषिंपासून पुरुकुत्सने ऐकले, पुरुकुत्साने सारस्वताला ऐकविले आणि सारस्वताकडून श्री पाराशर ऋषिंनी ऐकले. ते हेच ज्ञान श्री विष्णुपुराणामध्ये लिपीबद्ध केले गेलेले आहे आणि आज आपल्या करकमळांमध्ये आहे. यामध्ये केवळ एका ब्रह्माण्डाचे ज्ञान आहे आणि तेही अपूर्ण आहे. श्री देवी पुराण, श्री शिवपुराण आदी पुराणांचे ज्ञान देखिल ब्रह्मजींनीच दिलेले आहे. श्री पाराशर ऋषिंनी सांगितलेले ज्ञान श्री ब्रह्माद्वारे दिल्या गेलेल्या ज्ञानासारखे असू शकत नाही. म्हणूनच श्री विष्णुपुराण समजून घेण्यासाठी देवी पुराण आणि श्री शिवपुराण यांची मदत घ्यावी लागेल. कारण हे ज्ञान दक्षादी ऋषिंना त्यांचे वडील श्री ब्रह्मा जी यांच्याकडून मिळालेले आहे. श्री देवी पुराण आणि श्री शिवपुराण समजण्यासाठी श्रीमद् भगवत गीता आणि चारही वेदांची मदत घ्यावी लागेल. कारण हे ज्ञान जो ब्रह्मा, विष्णु व शिव जी यांचा उत्पन्नकर्ता अर्थात पिता आहे, त्या स्वतः भगवान कालरूपी ब्रह्मद्वारे दिले गेलेले आहे. पवित्र वेद आणि पवित्र श्रीमद् भगवत गीता जी यांचे ज्ञान समजण्यासाठी कालरूपी ब्रह्मचे उत्पत्तिकर्ता म्हणजेच पिता परम अक्षर ब्रह्म (कविर्देव) यांनी प्रदान केलेल्या, जे (कविर्गीभी) कविर्वाणीद्वारे स्वतः सतपुरुषांनी (पूर्ण ब्रह्म कविर्देव) प्रगट होऊन सांगितलेल्या स्वसम वेद म्हणजेच सूक्ष्म वेदाचा सहयोग घ्यावा लागेल. (ऋग्वेद मंडल ९ सूक्त ९६ मंत्र १६ ते २० पर्यंत याचे प्रमाण आहे.)

## ''श्री ब्रह्मा पुराण''

या पुराणाचे वक्ता श्री व्यास ऋषिंचे शिष्य, ज्यांना सुतजी देखिल म्हटले जाते ते श्री लोमहर्षण ऋषि जी आहेत. श्री लोमहर्षणजी (सूतजी) यांनी सांगितले आहे की हे ज्ञान प्रथमत: श्री ब्रह्माजींनी दक्षादी श्रेष्ठ मुनींना ऐकवलेले होते, तेच मी ऐकवत आहे. या पुराणाच्या सृष्टिचे वर्णन नावाच्या अध्यायामध्ये (पृष्ठ २७७ ते २९९) पर्यंत सांगितलेले आहे की ब्रह्मा, विष्णु आणि शिव रूपांद्वारे जगताची उत्पत्ती, पालन आणि संहार करतात, ते श्री विष्णु जी सर्व विश्वाचा आधार आहेत. त्या भगवान विष्णुंना माझा नमस्कार.

जी नित्य सद्सत् स्वरूप म्हणजेच कारणभूत अव्यक्त प्रकृति आहे तिलाच प्रधान म्हणतात. तिच्यापासून पुरुषाने हे विश्व निर्माण केले आहे. अमित तेजस्वी ब्रह्माजींनाच पुरुष समजावे. ते समस्त प्राणिमात्रांच्या सृष्टिची निर्मिती करणारे, भगवान नारायणांचे आश्रित आहेत.

स्वयंभू भगवान नारायणांनी पाण्याची सृष्टि केली. नारायणांपासून उत्पन्न झाल्यामुळे पाण्याला नार म्हटले जाऊ लागले. भगवानांनी सर्वांत अगोदर पाण्यावर विश्रांती घेतली. त्यामुळेच भगवानांना नारायण म्हटले जाते. भगवानांनी पाण्यामध्ये जी आपली शक्ती सोडली, तिच्यापासून एक सुवर्णमय अंडे प्रगट झाले. त्यामध्येच स्वयंभू ब्रह्मजींची उत्पत्ती झाली, असे ऐकण्यात येते. एक वर्ष त्या अंड्यामध्ये निवास करून श्री ब्रह्माजींनी त्याचे दोन तुकडे केले. त्यातील एका तुकड्यापासून धुलोक बनले आणि दुसऱ्यापासून भूलोक.

त्यानंतर ब्रह्माजींनी आपल्या शक्तिने रुद्रास प्रगट केले. हे ऋषि लोमहर्षण (सूतजी) यांनी सांगितलेले ज्ञान ऐकले-बोललेले (लोकवेद) आहे. ते पूर्ण नाही. कारण सांगणाराच (वक्ता) म्हणत आहे की असे ऐकलेले आहे. म्हणूनच पूर्ण माहितीसाठी श्री देवी महापुराण, श्री शिव महापुराण, श्रीमद् भगवत गीता, चारही वेद आणि पूर्ण परमात्माद्वारा सांगीतलेले सूक्ष्मवेद अर्थात कविर्वाणी (कबीरवाणी) म्हटले जाणारे तत्त्वज्ञान यांची मदत घेतली पाहिजे. यासाठी कृपया 'गहरी नजर गीता में', 'परमेश्वर का सार संदेश', 'परिभाषा प्रभु की' आणि याच पुस्तकातील 'यथार्थ ज्ञान प्रकाश' वाचावेत.

(वास्तविक ज्ञान कलयुगामध्ये स्वतः प्रगट होऊन कविर्देव (कबीर परमेश्वर) यांनी आपला विशेष सेवक श्री धर्मदास साहेबजींना (बांधवगढ येथील) पुन्हा व्यवस्थितपणे सांगितले. त्याचे वर्णन याच पुस्तकामधील 'सृष्टि रचने'मध्ये आहे. कृपया ते वाचावे.)

श्री पारासरजींनी काल ब्रह्मला परब्रह्म देखिल म्हटले आहे, तसेच ब्रह्म आणि विष्णु देखिल म्हटलेले आहे. यालाच अनादि अर्थात अमर देखिल म्हटलेले आहे. या ब्रह्म अर्थात कालचा जन्म-मृत्यू होत नाही, असे जे म्हटले आहे, त्यावरूनच ऋषिंची बालबुद्धी सिद्ध होते.

विचार करा :- विष्णु पुराणाचे ज्ञान एका ऋषिद्वारे सांगितले गेलेले आहे. ते लोकवेदाच्या (ऐकलेले, बोललेले ज्ञान अर्थात दंतकथा) आधारावर सांगितलेले आहे, तर ब्रह्मापुराणाचे ज्ञान श्री लोमहर्षण ऋषिंनी दक्षादी ऋषिंकडून जे ऐकले, ते लिहिलेले आहे. म्हणूनच ही दोन्ही पुराणे (विष्णुपुराण व ब्रह्मापुराण) समजून घेण्यासाठी जे स्वत: श्री ब्रह्मा जींनी आपला पुत्र नारदजींना सांगितलेले होते, जे श्री व्यास ऋषिंद्वारे ग्रहण करून लिहिले गेले, त्या श्री देवी पुराण आणि श्री शिवपुराण यांची मदत घेतली पाहिजे. अन्य पुराणांतील ज्ञान श्री ब्रह्माजींच्या ज्ञानासारखे (श्री देवी पुराण) असू शकत नाही. म्हणूनच अन्य पुराणे समजून घेण्यासाठी देवी पुराण आणि श्री शिवपुराण यांची मदत घेतली पाहिजे. कारण हे ज्ञान दक्षादी ऋषिंचे पिता श्री ब्रह्माजींनी दिलेले आहे. श्री देवी पुराण आणि श्री शिवपुराण समजून घेण्यासाठी श्रीमद् भगवत गीता आणि चार वेदांची मदत घेतली पाहिजे. कारण जो ब्रह्मा, विष्णु आणि शिव यांचा उत्पन्नकर्ता अर्थात पिता आहे, त्याने हे ज्ञान स्वतः भगवान कालरुपी ब्रह्मद्वारे दिलेले आहे. पवित्र वेद आणि पवित्र श्रीमद् भगवत गीता जी यांचे ज्ञान समजून घेण्यासाठी स्वसम म्हणजेच सूक्ष्म वेदाची मदत घ्यावी लागेल. जो कालरुपी ब्रह्मचा उत्पत्तिकर्ता अर्थात पिता परमअक्षर ब्रह्म (कविर्देव) यांनी प्रदान केलेला आहे. जो (कविर्गीभिः) कविर्वाणीद्वारे स्वत: सतपुरुष (पूर्ण ब्रह्म) यांनी प्रगट होऊन बोललेले आहे. (ऋग्वेद मंडळ ९ सुक्त ९६ मंत्र १६ ते २० पर्यंत याचे प्रमाण आहे.) तसेच श्रीमद् भगवत गीता मध्ये भगवान काल म्हणजेच ब्रह्मने आपली स्थिती स्वत:च सांगितलेली आहे, जी सत्य आहे.

गीता च्या १५ व्या अध्यायातील १८ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे की मी (कालरुपी ब्रह्म) आपल्या २१ ब्रह्माण्डांमध्ये जेवढे प्राणी आहेत, ते स्थूल शरीरामध्ये नाशवान आणि आत्मा रूपामध्ये अविनाशी असले तरी त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहे. म्हणूनच लोकवेदांच्या (ऐकले-बोललेले ज्ञान) आधाराने मला पुरुषोत्तम मानतात. वास्तविक पुरुषोत्तम तर माझ्यापेक्षा (क्षर पुरुष अर्थात कालपुरुष) आणि अक्षर पुरुषापेक्षाही (परब्रह्म) दुसराच आहे. वास्तवामध्ये त्यांनाच परमात्मा किंवा भगवान म्हटले जाते. तिन्ही लोकांमध्ये प्रवेश करून तेच सर्वांचे पालनपोषण करतात. तेच वास्तवामध्ये अविनाशी परमेश्वर आहेत. (गीता अध्याय १५ श्लोक १६-१७) गीता ज्ञानदाता ब्रह्म स्वत: सांगत आहे की हे अर्जुना, तुझे आणि माझे अनेक जन्म झालेले आहेत, हे तू जाणत नाहीस, मी मात्र जाणतो. श्रीमद् भगवत गीता च्या ४ थ्या अध्यायातील ५ वा श्लोक व २ ऱ्या अध्यायातील १२ व्या श्लोकामध्ये याचे प्रमाण आहे. तसेच ७ व्या अध्यायातील १८ व्या श्लोकामध्ये स्वत:च्या साधनेलाही (अनुत्तमाम्) अतिअश्रेष्ठ अर्थात अतिनीच सांगितलेले आहे. म्हणूनच १८ व्या अध्यायातील ६२ व्या श्लोकामध्ये म्हटलेले आहे की हे अर्जुना, सर्वस्व भावाने त्या परमेश्वराला शरण जा. त्यांच्या कृपेनेच तुला परमशांती प्राप्त होईल आणि कधीही नष्ट न होणाऱ्या लोकी म्हणजेच सतलोकास प्राप्त होशील. १५ व्या अध्यायातील चौथ्या श्लोकामध्ये सांगितलेले आहे की तुला तत्त्वदर्शी संतांची प्राप्ती झाल्यानंतर (ज्यांचे गीता अध्याय ४ श्लोक ३४ मध्ये आणि अध्याय १५ श्लोक १मध्ये वर्णन आलेले आहे.) त्या परमपद परमेश्वराचा तू शोध घेतला पाहिजेस. त्यांच्याकडे गेलेले साधक पुन्हा परत या नश्वर जगतामध्ये येत नाहीत म्हणजेच ते पूर्ण मोक्ष प्राप्त करून घेतात. त्या परमेश्वराकडून या सर्व संसाराची उत्पत्ती झालेली आहे आणि तेच सर्वांचे पालनपोषण करणारे आहेत. मी देखिल (गीता ज्ञानदाता ब्रह्मरूपी काल) त्याच आदिपुरुष परमेश्वराला शरण आहे. पूर्ण विश्वासाने त्यांचीच भक्तिसाधना अर्थात पूजा केली पाहिजे.

## ''श्री देवी महापुराणातून ज्ञान ग्रहण करा''

''श्री देवी महापुराणातील आंशिक लेख आणि सारविचार''.

(संक्षिप्त श्रीमद् देवी भागवत, सचित्र मोटा टाईप, केवळ हिंदी, संपादक- हनुमान प्रसाद पोद्दार, चिम्मनलाल गोस्वामी, प्रकाशक- गोविंद भवन-कार्यालय, गीता प्रेस, गोरखपूर)

।।श्री जगदम्बिकायै नमः ।।

### श्री देवी मद्भागवत
### तिसरा स्कंद

राजा परीक्षिताने श्री व्यासजींना ब्रह्माण्डाच्या रचनेविषयी विचारले. श्री व्यासजी म्हणाले की हे राजन, हाच प्रश्न मी ऋषिवर नारदजींना विचारला होता. तेच वर्णन तुम्हाला सांगतो. मी नारदजींना विचारले की एक ब्रह्माण्डाचे रचनाकार कोण आहेत? कोणी शंकर भगवानांना याचे रचनाकार मानतात, तर काही श्री विष्णु जींना आणि काही श्री ब्रह्मा जींना, तसेच काहीजण आचार्य भवानीदेवीला सर्व मनोरथ पूर्ण करणारी आहे असे सांगतात. ती आदिमाया महाशक्ति आहे. तसेच परमपुरुषासोबत राहून कार्य संपादन करणारी प्रकृति आहे. ब्रह्मसोबत (काल) तिचा अभेद संबंध आहे. (पृष्ठ ११४)

नारदजी म्हणाले की व्यासजी! प्राचीन कालची गोष्ट (घटना) आहे. हाच संदेह माझ्या हृदयामध्ये देखिल उत्पन्न झालेला होता. तेव्हा मी माझे पिता अमित तेजस्वी ब्रह्मा जींच्या स्थानी गेलो आणि आता तू ज्याविषयी मला विचारत आहेस, ते मी माझ्या पिताजींना

विचारले होते की हे पिताजी, हे संपूर्ण ब्रह्माण्ड कोठून उत्पन्न झाले? याची रचना आपण केलेली आहे, श्री विष्णुजींनी की श्री शंकरजींनी केलेली आहे? कृपया सत्य सत्य सांगावे.

ब्रह्मा जी म्हणाले की (अध्याय ५वा पृष्ठ ११५ ते १२० व १२३, १२५, १२८, १२९), 'पुत्रा, या प्रश्नाचे मी काय उत्तर देऊ? हा प्रश्न अतिशय जटिल आहे. पूर्वकाळामध्ये सर्वत्र पाणीच पाणी होते, तेव्हा कमळापासून माझी उत्पत्ती झाली. मी कमळावर बसून विचार करू लागलो, या अगाध पाण्यामध्ये मी कसा काय उत्पन्न झालो? माझे रक्षक कोण आहेत? कमळाच्या देठाला पकडून मी पाण्यामध्ये उतरलो. तेथे मला शेषशायी भगवान विष्णुंचे दर्शन झाले. ते योगनिद्रेच्या आधीन होऊन गाढ नीद्रेमध्ये झोपलेले होते. इतक्यातच भगवती योगनिद्रेची आठवण आली. मी त्यांचे स्तवन केले, तेव्हा कल्याणमयी भगवती श्री विष्णुंच्या विग्रहातून निघून अचिंत्य रूप धारण करून आकाशामध्ये विराजमान झाली. दिव्य आभूषणे तिचे तेज वाढवत होती. जेव्हा योगनिद्रेतील भगवान विष्णुंच्या शरीरातून वेगळी होऊन आकाशामध्ये विराजमान होऊ लागली, तेव्हा श्रीहरी विष्णु जी त्वरित उठून बसले. तेव्हा तेथे मी व भगवान विष्णु दोघेच होतो. तेथेच रुद्र देखिल (शंकरजी) प्रकट झाले. आम्हा तिघांना देवी म्हणाली की 'ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वरा, तुम्ही पूर्णपणे सावध होऊन आपल्या कार्यामध्ये संलग्न व्हा. सृष्टि, स्थिती आणि संहार ही तुमची प्रत्येकाची कार्ये आहेत. एवढ्यात एक सुंदर विमान आकाशातून उतरले. तेव्हा त्या देवीने आम्हाला आज्ञा दिली की देवतांनो, निर्भीडपणे इच्छापूर्वक या विमानामध्ये प्रवेश करा. ब्रह्मा, विष्णु आणि रुद्र, मी आज तुम्हाला एक अद्भूत दृश्य दाखविणार आहे. आम्ही तिघा देवतांना त्यावर बसलेले पाहून देवीने आपल्या सामर्थ्याने विमान आकाशात उडविले.

एवढ्यात आमचे विमान गतिमान झाले आणि ते दिव्य धाम– ब्रह्मलोकामध्ये जाऊन पोहोचले. तेथे आणखी एक ब्रह्मा विराजमान होते. त्यांना पाहून भगवान शंकर आणि विष्णु यांना आश्चर्य वाटले. भगवान शंकर आणि विष्णूंनी मला विचारले, हे चतुरानन! हे अविनाशी ब्रह्मा कोण आहेत? मी उत्तर दिले, की मला काहीच माहीत नाही, सृष्टिचे अधिष्ठाता हे कोण आहेत? भगवन! मी कोण आहे आणि माझा उद्देश काय आहे, या विचारामध्ये माझे मन घिरट्या घालत आहे.

एवढ्यातच मनासारख्या तीव्र गतीने ते विमान त्वरित तेथून निघाले आणि कैलास पर्वताच्या सुरम्य शिखरावर जाऊन पोहोचले. तेथे विमान पोहोचताच एका भव्य भवनातून त्रिनेत्रधारी भगवान शंकर बाहेर आले. ते नंदी वृषभावर बसलेले होते.

क्षणभरातच ते विमान त्या शिखरावरूनही वाऱ्यासारख्या वेगाने उडाले आणि वैकुंठ लोकामध्ये पोहोचले. जेथे भगवती लक्ष्मीचे विलास भवन होते. पुत्र नारद, तेथे मी जी संपत्ती पाहिली, तिचे वर्णन करणे माझ्यासाठी असंभव आहे. ती उत्तमपुरी पाहून विष्णुंचे मन आश्चर्याच्या समुद्रामध्ये गटांगळ्या खाऊ लागले. तेथे आणखी एक कमललोचन श्रीहरी विराजमान होते. त्यांच्या चार भुजा होत्या.

इतक्यात वाऱ्याबरोबर गुजगोष्टी करत ते विमान लगेच उडाले. पुढे अमृता सारखा मधुर असणारा समुद्र भेटला. तेथेच एक मनोहर द्विप होता. त्या द्विपामध्येच एक मंगलमय मनोहर पलंग अंथरलेला होता. त्या उत्तम पलंगावर एक दिव्य रमणी (सुंदरी) विराजमान होती. आम्ही आपापसात म्हणू लागलो की ही सुंदरी कोण आहे आणि तिचे नाव काय आहे? आम्ही तर तिच्याविषयी पूर्णपणे अनभिज्ञ आहे.

नारद! आम्ही तसेच संदेहग्रस्त होऊन तेथेच थांबलो होतो. तेव्हा भगवान विष्णु जी त्या चारुहासिनी भगवतीला पाहून विवेकपूर्वक निश्चय करून म्हणाले की ही भगवती जगदंबिका आहे. पुन्हा विष्णु जी म्हणाले की ही भगवती आपणा सर्वांची आदिकारण आहे. महाविद्या आणि महामाया ही तिची नावे आहेत. ती पूर्ण प्रकृति आहे. तिलाच विश्वेश्वरी, वेदगर्भा आणि शिवा असे संबोधले जाते.

ही तीच दिव्यांगना आहे, जिचे प्रलयार्णवामध्ये मला दर्शन झालेले होते. त्यावेळी मी बालक रूपामध्ये होतो. मला पाळण्यात घालून ही जोजवत होती. वटवृक्षाच्या पानावर एक सदृढ शय्या अंथरलेली होती. त्यावर झोपून मी माझ्या कमळासारख्या तोंडात पायाचा अंगठा चोखत असे आणि खेळत असे. ही देवी गाणे गाऊन मला झुलवायची. तीच ही देवी आहे, यामध्ये कोणताच संदेह नाही. हिला पाहून मला पूर्वीच्या गोष्टींची आठवण आली. ही आपणा सर्वांची जननी आहे.

श्री विष्णुंनी वेळेनुसार त्या भगवती भुवनेश्वरीची स्तुती सुरू केली.

भगवान विष्णु बोलले– हे प्रकृति देवी नमस्कार असो, भगवती विधात्रीस निरंतर नमस्कार आहे, तूच शुद्धस्वरूपा आहेस, हा सारा संसार तुझ्यापासूनच उद्भासित (निर्माण) होत आहे. मी, ब्रह्मा आणि शंकर– आम्ही सर्व तुझ्या कृपेनेच अस्तित्वात आहे. आमचा अविर्भाव (जन्म) आणि तिरोभाव (मृत्यू) होत असतो. केवळ तूच नित्य आहेस, जगज्ञननी आहेस, प्रकृति आणि सनातन देवी आहेस.

भगवान शंकर म्हणाले– हे देवी! जर महाभाग विष्णु तुझ्यापासून प्रगट झालेले आहेत, तर त्यानंतर उत्पन्न होणारे ब्रह्मा देखिल तुझेच बालक झाले आणि मी तमगुणी लीला करणारा शंकर तर काय मग तुझा पुत्र नाही झालो? अर्थात, मलाही उत्पन्न करणारी तूच आहेस. या जगताच्या सृष्टि, स्थिती आणि संहारामध्ये तुझे गुण सदा समर्थ आहेत. त्याच तीन गुणांनी उत्पन्न झालेलो आम्ही ब्रह्मा, विष्णु आणि शंकर नियमानुसार कार्यामध्ये तत्पर राहतो. मी, ब्रह्मा आणि शिव विमानात बसून जात होतो. आम्हाला वाटेत नवनवीन जगत दिसले. भवानीमाता, जरा सांगा तरी ते जगत कोणी बनविलेले आहेत?

म्हणूनच श्रीमद् देवी भागवत महापुराण सभाषटिकम् समहात्यम, खेमराज श्री कृष्णदास प्रकाश मुंबई, यामध्ये संस्कृतसहित हिंदी अनुवाद केलेला आहे, हे प्रमाण पाहा.

तिसरा स्कंद अध्याय ४ पृष्ठ १० श्लोक ४२

ब्रह्मा–अहम् इश्वर फिल ते प्रभावात्सर्वे वयं जनि युती न यदा तू नित्याः, के अन्ये सुराःशतमख प्रमुखाः च नित्या नित्या त्वमेव जननी प्रकृतिः पुराणा (४२) ।

मराठी अनुवाद :– हे माते! ब्रह्मा, मी आणि शिव तुझ्या प्रभावानेच जन्मवान आहे. नित्य नाही अर्थात आम्ही अविनाशी नाही, मग अन्य इंद्रादी दुसरे देवता कोणत्या प्रकाराने नित्य असू शकतात? तूच फक्त अविनाशी आहेस, प्रकृति आणि सनातनी देवी आहेस. (४२)

पृष्ठ ११–१२ अध्याय ५ श्लोक ८ :– यदि दयार्द्रमना न सदांऽबिके कथमहं विहित: च तमगुण: कमलजश्च रजगुणसंभव: सुविहित: किमु सत्वगुणों हरि:। (८)

अनुवाद :– भगवान शंकर म्हणाले :– 'हे माते! जर तू आमच्यावर दयायुक्त आहेस तर मला तमगुणी का बनविलेस, कमळातून उत्पन्न झालेल्या ब्रह्मांना रजगुणी का बनविलेस आणि विष्णुंना सतगुणी का बनविलेस ? अर्थात जीवांच्या जन्म–मृत्युरूपी दुष्कर्मामध्ये आम्हाला का लावलेस?

श्लोक १२ :– रमयसे स्वपतिं पुरुषं सदा तव गतिं न हि विह विद्म शिवे (१२)

मराठी अनुवाद :– आपला पति पुरुष अर्थात काल भगवानासोबत सदा भोगविलास करत राहतेस. तुझी गती कोणीही जाणत नाही.

ब्रह्मा जी म्हणत आहेत की मी देखिल महामाया जगदंबिकेच्या चरणावर नतमस्तक झालो आणि तिला म्हणालो की माता! वेद म्हणतात, 'एकमेवाद्विितीयं ब्रह्म' आहे. तर काय ती आत्मस्वरूपा तूच आहेस की ते कोणी अन्य पुरुष आहेत?

देवी ने म्हणले की मी आणि ब्रह्म एकच आहोत. माझ्यात आणि ब्रह्ममध्ये किंचितमात्र देखिल भेद नाही. गौरी, ब्राह्मी, रौद्री, वाराही, वैष्णवी, शिवा, वारुणी, कौबेरी, नारसिंही आणि वासवी ही सर्व माझीच रूपे आहेत. ब्रह्मा जी! या शक्तिला तू आपली स्त्री बनव. महासरस्वती या नावाने विख्यात ही सुंदरी आता सदा सर्वकाळ तुझीच स्त्री होऊन राहील. भगवती जगदंबा भगवान विष्णुंना म्हणाली की हे विष्णो! मनाला मुग्ध करणाऱ्या या महालक्ष्मीस घेऊन आता तू देखिल जा. ही सदा तुझ्या वक्षस्थळी विराजमान राहील.

देवी म्हणाली की शंकर! मनाला मुग्ध करणारी ही महाकाली गौरी या नावाने विख्यात आहे. तू हिचा पत्नी रूपाने स्वीकार कर.

आता माझे कार्य सिद्ध करण्यासाठी तुम्ही तिघे विमानावर बसून त्वरित जा. कोणतेही कठीण कार्य समोर ठाकल्यानंतर जेव्हा तुम्ही माझे स्मरण कराल, तेव्हा मी प्रगट होईन. देवांनो! माझे आणि सनातन परमात्म्यांचे ध्यान तुम्ही सदासर्वकाळ स्मरण केले पाहिजे. आम्हा दोघांचे स्मरण करत राहिलात, तर तुमचे कार्य सिद्ध होण्यामध्ये किंचितही संदेह राहणार नाही.

ब्रह्मा जी म्हणतात – अशाप्रकारे भाष्य करून भगवती जगदंबिकाने आमची रवानगी केली. त्यांनी शुद्ध आचारयुक्त शक्तिंमधून भगवान विष्णुंना महालक्ष्मी, शंकरांसाठी महाकाली आणि माझ्यासाठी महासरस्वती यांना पत्नी बनण्याची आज्ञा दिली. आता त्या स्थानापासून आम्ही निघालो.

सार विचार :– एका ब्रह्माण्डाच्या वास्तविक स्थितीपासून महर्षी व्यासजी, महर्षी नारदजी आणि श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शंकरजी देखिल अनभिज्ञ आहेत. हे देखिल स्पष्ट होते की श्री दुर्गास प्रकृति देखिल म्हटले जाते आणि दुर्गा व ब्रह्म (ज्योति निरंजन–काल) यांचा पती–पत्नी संबंध देखिल आहे. त्यामुळेच असे लिहिले आहे की ब्रह्मसोबत प्रकृतिचा अभेद्य संबंध आहे, जसे पत्नीला अर्धांगिनी देखिल म्हटले जाते. स्वतःची निर्मिती कोठून झाली आहे, हे श्री ब्रह्मा जींनाही ज्ञात नाही. हजार वर्षांपर्यंत त्यांनी पाण्यामध्ये पृथ्वीचा शोध घेतला, परंतु ती सापडली नाही. तेव्हा त्यांनी आकाशवाणीच्या आधारावर हजार वर्षांपर्यंत तप केले. कमळाच्या देठाला पकडून जेव्हा ते खाली उतरले, तेव्हा तेथे शेषनागाच्या शय्येवर भगवान विष्णु बेशुद्ध होऊन पडलेले होते. श्री विष्णुंच्या शरीरामधून एक देवी बाहेर पडली (भूतनीसारखी), जी सुंदर आभूषणे परिधान करून आकाशामध्ये विराजमान झाली. त्यावेळी श्री विष्णु जी शुद्धीवर आले. एवढ्यात श्री शंकरजी देखिल तेथे आले.

या विवरणावरून असे सिद्ध होते की तीन भगवानांना बेशुद्ध करून ठेवलेले होते. नंतर त्यांना सचेत (शुद्धीवर आणले.) केले गेले. आकाशातून विमान आले. देवीने तिन्ही प्रभूंना विमानामध्ये बसण्याचा आदेश दिला. विमान आकाशात उडविले गेले. वर आणखी एक ब्रह्मा, एक विष्णु, आणि एक शिव पाहिले, जे ब्रह्मलोकामध्ये होते.

विचार करा :– ब्रह्मलोकामध्ये दुसरे ब्रह्मा, विष्णु, शिव दिसले होते, ही ज्योति

निरंजनाचीच (कालब्रह्म) कलाबाजी आहे. तोच अन्य तीन रूपे धारण करून ब्रह्मलोकामध्ये तीन गुप्त स्थाने (एक रजगुणप्रधान क्षेत्र, एक सतगुणप्रधान क्षेत्र, एक तमगुणप्रधान क्षेत्र) निर्माण करून वास्तव्य करतो आणि प्रकृतिला (दुर्गा, अष्टांगी) आपल्या पत्नीच्या रूपामध्ये ठेवतो. जेव्हा हे दोघे रजगुणप्रधान क्षेत्रामध्ये असतात, तेव्हा हा महाब्रह्मा आणि दुर्गा महासावित्री म्हणून संबोधले जातात. या दोघांच्या संयोगातून जो पुत्र या रजगुणप्रधान क्षेत्रामध्ये उत्पन्न होतो, तो रजगुणप्रधान असतो. त्याचे नाव ब्रह्मा ठेवले जाते आणि तरुण होईपर्यंत त्याला अचेत (बेशुद्ध) करून ते पालनपोषण करत राहतात. नंतर कमळाच्या पुष्पावर ठेवून सचेत करतात. जेव्हा हे दोघे (काल ब्रह्म आणि दुर्गा) महाविष्णु आणि महालक्ष्मीच्या रूपामध्ये सतगुणप्रधान क्षेत्रामध्ये राहतात, तेव्हा दोघांच्या पती-पत्नी व्यवहारातून जो पुत्र उत्पन्न होतो, तो सतगुणप्रधान असतो. त्याचे नाव विष्णु असे ठेवतात. काही दिवस त्या बालकास अचेत (बेशुद्ध) करून तरुण होईपर्यंत पालनपोषण करतात. नंतर शेषनागाच्या शय्येवर झोपवतात. नंतर त्याला शुद्धीवर आणले जाते. अशाचप्रकारे जेव्हा हे दोघे तमगुणप्रधान क्षेत्रामध्ये राहतात, तेव्हा प्रकृति अर्थात दुर्गा व महाशिव अर्थात सदाशिव यांच्या पती-पत्नी व्यवहारातून जो पुत्र त्या क्षेत्री उत्पन्न होतो, तो तमगुणप्रधान होतो. त्याचे नाव शिव असे ठेवले जाते. त्यालाही तरुण होईपर्यंत अचेत (बेशुद्ध) केले जाते. नंतर तरुण झाल्यानंतर त्याला सचेत करतात. नंतर तिघांनाही एकत्र करून विमानामध्ये बसवून वरील लोकांचे दृश्य दाखवितात, कारण ते स्वत:लाच सर्वस्व मानून बसतील. गुणप्रधान क्षेत्र समजण्यासाठी एक उदाहरण आहे की एखाद्या घरामध्ये तीन खोल्या आहेत. एका खोलीमध्ये देशभक्त शहिदाचे चित्र (प्रतिमा) लावलेले असेल आणि जेव्हा एखादी व्यक्ती त्या खोलीमध्ये जाते, तेव्हा तिचे विचार देखिल देशभक्तासारखे होतात. दुसऱ्या खोलीमध्ये साधू, संत, ऋषि आदींची चित्रे लावलेली असतील, तर त्या खोलीमध्ये प्रवेश करताच मन शांत होते आणि प्रभुभक्तिकडे ओढले जाते. तिसऱ्या खोलीमध्ये जर अश्लील, अर्धनग्न स्त्री-पुरुषांची चित्रे लावलेली असतील तर मनामध्ये घाणेरडे (अश्लील) विचार घर करू लागतील. अशाप्रकारे वर ब्रह्मलोकामध्ये कालरुपी ब्रह्मने तीन स्थाने एकेक गुणप्रधान बनविलेली आहेत. तीनही प्रभु (रजगुण ब्रह्मा जी, सतगुण विष्णु जी, तमगुण शिव जी) आपल्या गुणांचा प्रभाव कसे पाडतात, याचे उदाहरण- स्वयंपाकघरामध्ये भाजीला मिरचीची फोडणी दिली, तर मिरचीच्या गुणाने बाहेरच्या खोलीतील सर्व व्यक्तिंना शिंका येऊ लागल्या. येथे साकार वस्तू मिरची तर स्वयंपाकघरामध्ये होती, परंतु तिची निराकार शक्ति अर्थात गुणामुळे दूर बसलेल्या व्यक्तिस प्रभावित केले. अगदी अशाच प्रकारे तीन प्रभु (श्री ब्रह्मा जी रजगुण, श्री विष्णु जी सतगुण, श्री शिव जी तमगुण) आपापल्या लोकामध्ये राहून तिन्ही लोकांतील (पृथ्वी लोक, पाताळ लोक आणि स्वर्ग लोक) प्राण्यांना प्रभावित करतात. जसा मोबाईल रेंजने आपले कार्य करतो, त्याप्रमाणे अदृश्य शक्तिरूपी गुणांनी तिन्ही देवता आपल्या पिता कालची सृष्टि त्याच्या आहाराकरिता चालवत आहेत. दुर्गेचे स्वत:चा स्वतंत्र लोक देखिल (धाम) आहे, जेथे ती आपल्या वास्तविक रूपामध्ये दर्शन देते. नंतर त्यांचे विमान दुर्गा देवीच्या द्विपामध्ये पोहोचले. जेव्हा ज्योति निरंजन अर्थात कालरुपी ब्रह्मने विष्णु जींना बालपणाच्या स्मृती जागृत केल्या, तेव्हा श्री विष्णु जींनी सांगितले की ही दुर्गा आपल्या तिघांचीही माता आहे. मी (विष्णु) बालक रूपामध्ये पाळण्यामध्ये झोपलेलो होतो. ही मला अंगाई ऐकवून जोजवत होती. त्यावेळी श्री विष्णु जी म्हणाले की हे दुर्गा आपण आमची माता आहात. मी (विष्णु), ब्रह्मा आणि शंकर तर जन्मवान आहे. आमचा तर अविर्भाव अर्थात जन्म आणि तिरोभाव अर्थात मृत्यू होत असतो. आम्ही अविनाशी नाही. आपण प्रकृति देवी आहात. ही बाब

श्री शंकरजींनीही स्वीकार केली आणि म्हणाले की मी तमगुणी लीला करणारा शंकर देखिल आपलाच पुत्र आहे. श्री विष्णु जी, श्री ब्रह्मा जी देखिल आपणापासून उत्पन्न झालेले आहेत.

नंतर या तीन देवांचे दुर्गा देवीने लग्न केले. प्रकृतिदेवीने (दुर्गा) आपल्या शब्दशक्तीने आपलीच आणखीतीन रूपे धारण केली. श्री ब्रह्माजींचा विवाह सावित्रीशी, श्री विष्णुजींचा विवाह लक्ष्मीशी आणि श्री शिवजींचा विवाह उमा अर्थात कालीशी (पार्वती) करून विमानामध्ये बसवून त्यांना स्वतंत्र द्विपामध्ये (लोकामध्ये) पाठवून दिले.

ज्योति निरंजन (काल–ब्रह्म) यांनी आपल्या श्वासांद्वारे चारही वेद समुद्रामध्ये लपविले. नंतर प्रथम सागर मंथनाच्या वेळी समुद्रावर प्रगट करून दिले. ज्योति निरंजनाच्या (काल) आदेशाने दुर्गाने चारही वेद श्री ब्रह्माजींना दिले. ब्रह्माने दुर्गा देवीस (आपली माता) विचारले की वेदांमध्ये जे ब्रह्म (प्रभु) सांगितलेले आहेत, ते आपणच आहात का कोणी अन्य पुरुष आहेत?

कालाच्या भीतीने वास्तविकता लपविण्याचा प्रयत्न करत दुर्गा म्हणाली की मी आणि ब्रह्म एकच आहोत. यात कोणताच भेद नाही. तरीही वास्तव दडून राहिले नाही. दुर्गा देवी नंतर म्हणाली की तुम्ही तिघांनी माझे आणि ब्रह्मचे सदासर्वकाळ स्मरण करत राहिले पाहिजे. आम्हा दोघांचे स्मरण करत राहिलात आणि जर एखादे कठीण कार्य समोर ठाकले, तर मी लगेच समोर प्रकट होईन.

विशेष :– कारण कालाने दुर्गा देवीला सांगून ठेवलेले आहे की माझा भेद कोणासही सांगू नकोस. या भीतीतून दुर्गा सर्व जगताला वास्तवापासून अपरिचित ठेवते. त्यामुळे ती आपल्या पुत्रांनादेखील अंधारात ठेवते. याचे कारण असे आहे की दररोज एक लाख मानव शरीरधारी प्राण्यांचा आहार करण्याचा शाप कालला (ब्रह्म) लागलेला आहे. म्हणूनच तो आपल्या तीन पुत्रांद्वारे आपला आहार तयार करवितो. श्री ब्रह्माजींच्या रजगुणाने प्रभावित करून काल सर्व प्राण्यांद्वारे संतान उत्पत्ती करवून घेतो. श्री विष्णुजींच्या सतगुणाद्वारे एक दुसऱ्यांमध्ये मोह उत्पन्न करून स्थिती अर्थात काल जाळ्यामध्ये थांबवून ठेवतो आणि श्री शंकरजींच्या तमगुणापासून संहार करून काल ब्रह्म आपला आहार तयार करवितो.

नंतर तो तिन्ही प्रभुंनाही मारून खातो आणि नवीन पुण्यकर्मी प्राण्यांमधून तीन पुत्र उत्पन्न करून आपले कार्य चालू ठेवतो. इकडे पूर्वीचे तिघे ब्रह्मा, विष्णु आणि शिव ८४ लक्ष योनी आणि स्वर्ग–नरकामध्ये कर्माच्या आधारावर चक्कर मारत बसतात. हेच प्रमाण शिव महापुराण, रुद्रसंहिता, प्रथम (सृष्टि) खण्ड, अध्याय ६, ७ आणि ८, ९ मध्ये देखिल आहे.

## ''श्री शिव महापुराणातील सार विचार''

### ''शिव महापुराण''

''श्री शिव महापुराण (अनुवादक :– श्री हनुमान प्रसाद पोद्दार, प्रकाशक– गोविंद भवन कार्यालय, गीता प्रेस गोरखपूर) मोटा टाइप, अध्याय ६, रुद्रसंहिता, प्रथम खण्ड (सृष्टी) पासून निष्कर्ष''

आपला पुत्र श्री नारदजींनी श्री शिव म्हणजेच श्री शिवांविषयी विचारल्यानंतर श्री ब्रह्मा जी म्हणाले की (पृष्ठ १०० ते १०२) ज्या परब्रह्माविषयी ज्ञान आणि अज्ञानाने पूर्ण युक्तींद्वारे असे विकल्प केले जातात की जो निराकार परब्रह्म आहे, तोच साकार रूपामध्ये सदाशिव रूप धारण करून मनुष्य रूपामध्ये प्रकट झाला. सदाशिवाने आपल्या शरीरातून एका स्त्रीला उत्पन्न केले, जिला प्रधान, प्रकृति, अंबिका, त्रिदेवजननी (ब्रह्मा, विष्णु, शिव यांची माता) संबोधले

जाते. तिला आठ बाहू आहेत.

## ''श्री विष्णुंची उत्पत्ती''

हे जे सदाशिव आहेत, त्यांना परमपुरुष, ईश्वर, शिव, शंभू आणि महेश्वर म्हटले जाते. ते आपल्या सर्वांगास भस्म लावतात. त्या कालरुपी ब्रह्मने एक शिवलोक नावाचे (ब्रह्मलोकामध्ये तमगुणप्रधान क्षेत्र) धाम बनविले. त्याला काशी म्हटले जाते. शिव आणि शिवा यांनी पती-पत्नी रूपामध्ये राहून एका पुत्राची उत्पत्ती केली, ज्याला विष्णु असे नाव प्रदान केले. अध्याय ७, रुद्रसंहिता, शिव महापुराण (पृष्ठ १०३, १०४)

## ''श्री ब्रह्मा आणि शिव यांची उत्पत्ती''

अध्याय ७, ८, ९ (पृष्ठ १०५-११०) श्री ब्रह्माजींनी सांगितले की श्री शिव आणि शिवा (कालरुपी ब्रह्म आणि प्रकृति-दुर्गा-अष्टंगी) यांनी पती-पत्नी व्यवहारातून माझीही उत्पत्ती केली. तसेच नंतर मला देखिल अचेत (बेशुद्ध) करून कमळावर ठेवले. हाच काल महाविष्णुचे रूप धारण करून आपल्या नाभीतून एक कमळ उत्पन्न करतो. ब्रह्मा पुढे सांगत आहेत की नंतर शुद्धीवर आलो. कमळाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केला, परंतु यश आले नाही. नंतर तप करण्याची आकाशवाणी झाली. त्यामुळे मी तप केले. नंतर माझे आणि विष्णुंचे एका गोष्टीवरून युद्ध झाले, (विवरण याच पुस्तकाच्या पृष्ठ १०८ वर) तेव्हा आमच्या मध्ये एक तेजोमय लिंग प्रकट झाले आणि ओऽम ओऽम असा नाद प्रगट झाला. त्या लिंगावर उ-ऊ-म ही तीन अक्षरे देखिल लिहिलेली होती. नंतर रुद्ररूप धारण करून सदाशिव पाच मुखांच्या मानव रूपामध्ये प्रकट झाले. त्यांच्यासोबत प्रकृति (दुर्गा) देखिल होती.

नंतर शंकराला अचानकपणे प्रकट केले (कारण हा पूर्वी बेशुद्ध होता. नंतर सचेत करून तिघांना एकत्र केले गेले), म्हणाले की तुम्ही तिघे सृष्टि, स्थिती आणि संहाराचे कार्य सांभाळा.

रजगुणप्रधान ब्रह्मा जी, सतगुणप्रधान विष्णु जी आणि तमगुणप्रधान शिव जी आहेत. अशाप्रकारे तीनही देवतांमध्ये गुण आहेत, परंतु शिव (कालरुपी ब्रह्म) गुणातीत मानले गेले आहे आहेत. (पृष्ठ ११० वर)

सार विचार :- या विवरणावरून असे स्पष्ट होते की कालरुपी ब्रह्म अर्थात सदाशिव आणि प्रकृति (दुर्गा) हे दोघे श्री ब्रह्मा, श्री विष्णु आणि श्री शिव यांचे माता-पिता आहेत. दुर्गा देवीला प्रकृति तसेच प्रधान देखिल म्हटले जाते. तिच्या आठ भुजा आहेत. ती सदाशिव अर्थात ज्योति निरंजन कालच्या शरीर अर्थात उदरातून आली आहे. ब्रह्म अर्थात काल आणि प्रकृति (दुर्गा) सर्व प्राण्यांना भ्रमितच ठेवतात. ते आपल्या पुत्रांनाही वास्तविकता सांगत नाहीत. त्याचे कारण असे की कालच्या (ब्रह्म) २१ ब्रह्माण्डांतील प्राण्यांना माहीत झाले की त्यांना तप्त शिलेवर भाजून काल (ब्रह्म-ज्योति निरंजन) खात आहे. त्यासाठीच जन्म-मृत्यू आणि अन्य दुःखदायी योनींमध्ये पीडित करतो व आपले तिन्ही पुत्र रजगुण-ब्रह्मा जी, सतगुण-विष्णु जी, तमगुण शिव जी यांपासून क्रमाने उत्पत्ती, स्थिती, पालन आणि संहार करवून आपला आहार तयार करवून घेतो. याचे कारण कालला एक लाख मानव शरीरधारी प्राण्यांना आहार करण्याचा शाप लागलेला आहे. कृपया श्रीमद् भवगत गीता जीमध्येही काल (ब्रह्म) आणि प्रकृति (दुर्गा) यांच्या पती-पत्नी कर्मातून रजगुण-ब्रह्मा, सतगुण विष्णु आणि तमगुण शिव यांची उत्पत्ती पाहा.

## ''तीन गुण काय आहेत? प्रमाणासहित.''

''तीन गुण– रजगुण ब्रह्मा जी, सतगुण विष्णु जी, तमगुण शिव जी आहेत. ब्रह्म (काल) आणि प्रकृति पासून (दुर्गा) ते उत्पन्न झालेले आहेत आणि तीनही नाशवान आहेत.''

प्रमाण : गीता प्रेस, गोरखपूर, प्रकाशित श्री शिव महापुराण ज्याचे संपादक आहेत श्री हनुमान प्रसाद पोद्दार पृष्ठ सं. ११० अध्याय ९, रुद्रसंहिता. अशाप्रकारे ब्रह्मा, विष्णु आणि शिव या तीन देवतांमध्ये गुण आहेत, परंतु शिव (ब्रह्म–काल) गुणातीत म्हटले गेलेले आहेत.

दुसरे प्रमाण :– गीता प्रेस, गोरखपूर यांच्याकडून प्रकाशित श्रीमद् देवी भागवत पुराण ज्याचे संपादक आहेत श्री हनुमान प्रसाद पोद्दार चिमनलाल गोस्वामी, तिसरा स्कंद, अध्याय ५, पृष्ठ १२३ भगवान विष्णुंनी देवी दुर्गेची स्तुती केली. ते म्हणाले की मी (विष्णु) ब्रह्मा आणि शंकर तुझ्या कृपेने विद्यमान आहे. आमचा तर अविर्भाव (जन्म) आणि तिरोभाव (मृत्यू) होतो. आम्ही नित्य (अविनाशी) नाही. तूच नित्य आहेस, जगज्ञननी आहेस, प्रकृति आणि सनातनी देवी आहेस. भगवान शंकर म्हणाले की जर भगवान ब्रह्मा आणि भगवान विष्णु तुझ्यापासून उत्पन्न झालेले आहेत, तर त्यांच्यानंतर उत्पन्न होणारा मी तमगुणी लीला करणारा शंकर काय तुझा पुत्र नाही का झालो? अर्थात, मला देखिल उत्पन्न करणारी तूच आहेस. या जगताच्या सृष्टि–स्थिती–संहारामध्ये तुझेच गुण सदासर्वदा आहेत. याच तीन गुणांनी उत्पन्न आम्ही ब्रह्मा, विष्णु आणि शंकर नियमानुसार कार्यात तत्पर राहतो.

हे विवरण केवळ हिंदीमध्ये अनुवादित श्री देवी महापुराणातील आहे, ज्यामध्ये काही तथ्यांना लपविले गेलेले आहे. म्हणूनच हेच प्रमाण. श्रीमद् देवी भागवत महापुराण सभाषटिकम् समहात्म्यम, खेमराज श्री कृष्ण दास प्रकाश, मुंबई, यामध्ये संस्कृतसहित हिंदी अनुवाद केलेला आहे. तिसरा स्कंद अध्याय ४ पृष्ठ १० श्लोक ४२ :–

ब्रह्मा – अहम् ईश्वर: फिल ते प्रभावात्सर्वे वयं जनि युता न यदा तू नित्या:, के अन्ये सुरा: शतमख प्रमुखा: च नित्या नित्या त्वमेव जननी प्रकृति: पुराणा (४२) ।

मराठी अनुवाद :– हे माते! ब्रह्मा, मी आणि शिव तुझ्याच प्रभावाने जन्मवान आहे, नित्य नाही. अर्थात, आम्ही अविनाशी नाही, तर अन्य इंद्रादी दुसरे देवता कोणत्या प्रकारे नित्य असू शकतील? तूच अविनाशी आहेस, प्रकृति आणि सनातन देवी आहेस. (४२)

पृष्ठ ११–१२ अध्याय ५ श्लोक ८ :– यदि दयार्द्रमना न सदांऽबिके कथमहं विहित: च तमगुण: कमलजश्च रजगुणसंभव: सुविहित: किमु सत्वगुणों हरि:। (८)

अनुवाद :– भगवान शंकर म्हणाले की हे माते! जर आमच्यावर तू दयायुक्त आहेस तर मला तमगुणी का बनविलेस? कमळातून उत्पन्न झालेल्या ब्रह्माला रजगुणी कशासाठी बनविलेस? आणि विष्णुला सतगुणी म्हणून का बनविलेस? अर्थात, जीवांच्या जन्म–मृत्यू रूपी दुष्कर्मामध्ये का लावलेस?

श्लोक १२ :– रमयसे स्वपतिं पुरुषं सदा तव गतिं न हि विह विद्म शिवे। (१२)

मराठी अनुवाद :– आपला पतिपुरुष अर्थात काल भगवानासोबत तू सदा भोगविलास करत राहतेस. तुझी गती कोणीही जाणत नाही.

### 'निष्कर्ष'

श्रीमद् भगवत गीता चे ज्ञान देखिल याच कालरुपी ब्रह्मने श्री कृष्णजींच्या शरीरामध्ये प्रेतवत प्रवेश करून सांगितलेले आहे. वरील पवित्र पुराणांनी प्रमाणित केलेले आहे की प्रकृति

असे दुर्गा देवीस म्हटले जाते आणि सदाशिव अर्थात कालरुपी ब्रह्म व प्रकृति यांच्यापासून रजगुण ब्रह्मा जी, सतगुण विष्णु जी आणि तमगुण शिव जी यांची उत्पत्ती पती-पत्नी व्यवहाराने झालेली आहे. याचीच साक्ष श्रीमद् भगवत गीता देखिल आहे. श्री गीता जी सर्व शास्त्रांचा सार आहे म्हणूनच यामध्ये संक्षिप्त विवरण सांकेतिक शब्दांमध्ये (कोडवर्ड) आहे. ते फक्त तत्त्वदर्शी संतच समजू शकतात. आता कृपया पवित्र श्रीमद् भगवत गीता मध्ये पाहा.

गीता च्या १४ व्या अध्यायातील ३ ते ५ व्या श्लोकांमध्ये पवित्र श्रीमद् भगवत गीता बोलणाऱ्या काल ब्रह्मने श्री कृष्णजींच्या शरीरामध्ये प्रेतवत प्रवेश करून सांगितलेले आहे की प्रकृति (दुर्गा) तर माझी पत्नी आहे. मी ब्रह्म तिच्या योनीमध्ये बीज स्थापन करतो, ज्यामुळे सर्व प्राण्यांची उत्पत्ती होते. मी सर्वांचा पिता आणि प्रकृति (दुर्गा) सर्वांची माता संबोधली जाते. प्रकृति दुर्गा द्वारे उत्पन्न तीनही गुण (रजगुण-ब्रह्मा, सतगुण-विष्णु, तमगुण-शिव) जीवात्म्यांना कर्माधाराने शरीरामध्ये बांधतात. अर्थात, हे तीनही गुण सर्व प्राण्यांना संस्काराच्या आधाराने उत्पत्ती, स्थिती आणि संहार करून फसवून अडकवून ठेवतात.

गीता च्या ११ व्या अध्यायातील ३२ व्या श्लोकामध्ये सांगितलेले आहे की मी काल आहे. सर्वांना खाण्यासाठी प्रगट झालेलो आहे. ११ व्या अध्यायातील २१ व्या श्लोकामध्ये अर्जुन म्हणत आहे की आपण तर ऋषिंनाही खात आहात. देवता आणि सिद्ध देखिल आपणाकडे मंगल अर्थात रक्षेची याचना करत आहेत, परंतु सर्वांना आपण खात आहात. काही आपल्या दाढांमध्ये लटकलेले दिसत आहेत, काही आपणांमध्ये प्रवेश करत आहेत.

## ''रजगुण श्री ब्रह्मा जी, सतगुण श्री विष्णु जी आणि तमगुण श्री शिव जी या त्रिदेवांची पूजा व्यर्थ सांगितलेली आहे.''

हाच गीता ज्ञानदाता प्रभु (श्रीमद् भगवत गीता अध्याय ७ श्लोक १२ ते १५ मध्ये) म्हणत आहे की तिन्ही गुणांची (रजगुण-ब्रह्मा, सतगुण-विष्णु, तमगुण-शिव) पूजा करणाऱ्यांचे ज्ञान नष्ट झालेले आहे. हे तर यांच्यापेक्षा वर मी आहे, माझी भक्ति पूजा देखिल करत नाही. तीन प्रभुंपर्यंतची (ब्रह्मा, विष्णु, महेश) साधना करणारे राक्षस स्वभावास धारण केलेले मनुष्यांमध्ये नीच, दुष्कर्म करणारे मूर्ख या तिन्हींच्या वर माझी ब्रह्मची (काल) पूजा देखिल करत नाहीत.

श्रीमद्भगवत गीता चा ज्ञानदात्या प्रभुने ७ व्या अध्यायातील १८ व्या श्लोकामध्ये आपल्या (स्वत:च्या) भक्तीलाही अनुत्तम (नीच) म्हटलेले आहे.

म्हणूनच गीता च्या १५ व्या अध्यायातील ४ था लोक आणि १८ व्या अध्यायातील ६२ व ६६ व्या श्लोकांमध्ये एका अन्य परमेश्वराला शरण जाण्यास सांगितलेले आहे.

ज्या काळी गीता चे ज्ञान सांगितले जात होते, त्यापूर्वी १८ पुराणे नव्हती, ११ उपनिषदे नव्हती किंवा सहा शास्त्रे देखिल नव्हती. हे सर्व नंतर ऋषिंनी आपापल्या अनुभवांवरून रचलेली पुस्तके आहेत. त्या काली केवळ पवित्र चार वेदच शास्त्र रूपामध्ये प्रमाणित होते आणि त्याच पवित्र चार वेदांच्या सारांशाचे पवित्र गीता मध्ये वर्णन आहे.

# ''शास्त्रार्थ विषय''

# ''शास्त्रार्थाने परमेश्वराचे तत्त्वज्ञान गुंतवले''

शास्त्रार्थ कसा होत असे? :–

दोन विद्वान प्रश्न–उत्तर करत असत आणि श्रोतागण देखिल बहुसंख्येने शास्त्रार्थ (प्रश्नोत्तर) ऐकण्यासाठी विराजमान होत असे. जय–पराजयाचा निर्णय श्रोत्यांच्या हातामध्ये असे. ज्यांना स्वत:लाच ज्ञान नाही तो श्रोतागण टाळ्या वाजवून विजयी होण्याचे प्रमाण देत असे. अशाप्रकारे विद्वानांच्या जय–पराजयाचा निर्णय अविद्वानांच्या हातामध्ये होता.

**प्रमाण** :– पुस्तक श्रीमद् दयानंद प्रकाश, लेखक श्री सत्यानंदजी महाराज, प्रकाशक सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा, ३/५ महर्षी दयानंद भवन, रामलीला मैदान, नवी दिल्ली–२. गंगाकाण्ड आठवा सर्ग पृष्ठ ८९ वरून जसेच्या तसे लेख :– तीन दिन तक, प्रतिसायं कृष्णानन्द जी और स्वामी जी का शास्त्रार्थ होता रहा। एक दिन शास्त्रार्थ के समय किसी ने कृष्णानन्द जी से साकारवाद का अवलम्बन किया और इसी पर शास्त्रार्थ चलाया। स्वामी जी का तो यह मन–चाहता विषय था। उन्होंने धाराप्रवाह संस्कृत बोलते हुए निराकार सिद्धांत पर वेदों और उपनिषदों के प्रमाणों की एक लडी पिरोदी, और कृष्णानन्द जी को उनका अर्थ मानने के लिए बाधित किया। कृष्णानन्द कोइ प्रमाण न दे सका। केवल गीता का यह श्लोक ''यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत'' लोगों की ओर मुंह करके पढने लगा। स्वामी जी ने गर्ज कर कहा कि, ''आप वाद मेरे साथ करते हैं, इसलिए मुझे ही अभिमुख कीजियें।'' परन्तु उसके तो विचार ही उखड गये थे, वह चौकडी ही भूल चुका था। मुख में झाग आ गए। गले में घिग्घी बँध गई। चेहरा फिका पड गया। किसी प्रकार लाज रह जाए, इससे उसने तर्क–शास्त्र की शरण लेकर स्वामी जी को कहा कि, ''अच्छा, लक्षण का लक्षण बताइये?'' स्वामी जी ने उत्तर दिया कि ''जैसे कारण का कारण नहीं वैसे ही लक्षण का लक्षण भी नहीं है।'' लोगों ने अपनी हसीं से कृष्णानन्द की हार प्रकाशित कर दी और वह घबडाकर वहाँ से चलता बना।

या लेखावरून हे स्पष्ट होते की विद्वानांच्या जय–पराजयाचा निर्णय अविद्वान करत होते. स्वामी दयानंदजी वारंवार संस्कृत बोलले, श्रोत्यांनी हास्य केले आणि महर्षी दयानंदर्जीना विजेता घोषित केले म्हणजेच परमात्मा निराकार मानला गेला, परंतु यजुर्वेद अध्याय १ मंत्र १५ आणि यजुर्वेद अध्याय ५ मंत्र १ मध्ये स्पष्ट केलेले आहे की परमात्मा सशरीर आणि साकार स्वरूपात आहे.

स्वामी दयानंद संस्कृत भाषेमध्ये प्रवचन करत होते याचे प्रमाण– 'सत्यार्थ प्रकाशची भूमिका' पृष्ठ ८ वर स्वामी दयानंदजींनी सांगितलेले आहे की प्रथमत: ज्यावेळी 'सत्यार्थ प्रकाश' छापला गेला, त्यावेळी मला हिंदी चांगल्याप्रकारे येत नव्हती. कारण बालपणापासून सन १८८२ पर्यंत (संवत १९३९) संस्कृत भाषेमध्ये शास्त्रार्थ करत होतो. यावरून असे सिद्ध होते की स्वामी दयानंद संस्कृत भाषेमध्ये शास्त्रार्थ करत होते. संवत १९३९ (सन १८८२) मध्ये 'सत्यार्थ प्रकाश' पुन्हा छापण्याच्या एका वर्षानंतर सन १८८३ मध्ये स्वामीजींचे निधन झाले. यामुळे स्पष्ट होते, की निधनाच्या एका वर्षापूर्वीच स्वामी दयानंदजींनी हिंदी भाषा समजून घेतली. त्यापूर्वी ते संस्कृतमध्ये प्रवचन (व्याख्यान) करत होते. श्रोतागण संस्कृतबाबतीत अपरिचित होते आणि ते विद्वानांच्या जय–पराजयाचा निर्णय मात्र करत होते.

आता हा दासांचा दास (रामपाल दास) इच्छित आहे की सर्व पवित्र धर्माचे प्रभुप्रेमी पुण्यात्मे तत्त्वज्ञानांशी परीचित व्हावेत, तेव्हा ते स्वत: खरे सोने व पितळ यांची पारख करतील.

कथा :– एका शेठ व्यापाऱ्याचे दोन पुत्र होते. एक सोळा वर्षांचा आणि दुसरा अठरा वर्षांचा. पित्याच्या देहांतानंतर पुत्राच्या मातेनी कपड्यामध्ये लपटलेले रत्न आपल्या मुलांच्या हातामध्ये ठेवले आणि म्हणाली की पुत्रांनो, हे रत्न घेऊन जावा आणि आपल्या काकांना (पित्याच्या मोठा बंधूंना) म्हणा की आमच्याजवळ पैसे नाहीत. हे रत्न आपल्याजवळ ठेवून घ्या आणि व्यापारामध्ये आम्हाला भागीदार करून घ्या. आम्ही एकटी मुले व्यापार करू शकत नाही. दोघेजण मातेने दिलेले रत्न घेऊन काकांजवळ आले आणि मातेने सांगितल्याप्रमाणे त्यांनी प्रार्थना केली. त्यांच्या काकांनी रत्न पाहिले आणि त्या दोघांची प्रार्थना स्वीकार करून म्हणाले की मुलांनो, हे रत्न आपल्या मातेला देऊन या. ती ते सांभाळून ठेवेल. तुम्ही माझ्याबरोबर दुसऱ्या शहरामध्ये चला. मला फार मोठ्या प्रमाणात उधार माल मिळतो. परत येऊन या रत्नाचा विचार करू.

दोन्ही बालक काकांसोबत दुसऱ्या शहरामध्ये गेले. एके दिवशी काकांनी मुलांना एक रत्नाचा तुकडा दिला आणि म्हणाले की मुलांनो, ज्याच्याकडून काल आपण ५० हजारांचा माल उधार घेतला होता, त्या व्यापाऱ्याला हा रत्नाचा तुकडा देऊन या. त्याला असेही म्हणा की हे रत्न ठेवून घ्या, आम्ही परत आल्यानंतर आपले ऋण फेडू आणि आमचे रत्न परत घेऊ.

काकांनी सांगितल्याप्रमाणे दोन्ही मुलांनी व्यापाऱ्याला सांगितले. तेव्हा व्यापाऱ्याने एक रत्नपारख्यास (सोनारास) बोलविले. सोनाराने त्या रत्नाची पारख केली आणि सांगितले, की हे रत्न नाही, हा तर रत्नसारखा दगड आहे. याची किंमत शंभर रुपयेदेखील होणार नाही. ते म्हणाले की एवढ्या रत्नाची किंमत तर नऊ लाख रुपये होते. व्यापारी त्यांना बरे–वाईट बोलला आणि ते रत्नसारखा दगड समोरच्या रस्त्यावर फेकले. दोन्ही मुले ते रत्नसारखा दगड घेऊन परत आपल्या काकांकडे आले. अश्रुपूर्ण नयनांनी त्यांनी सर्व वृत्तांत ऐकवला.

काका म्हणाले की पुत्रांनो, तो सोनार (रत्नपारखी) होता. तो योग्यच सांगत होता. हे तर खरोखरच रत्नसारखा दगड आहे. याची किंमत शंभर रुपयेही नाही. पुत्रांनो, माझ्याकडून चूक झाली. रत्न तर हे आहे, नजरचुकीने मीच तुम्हाला रत्नसारखा दगड दिले. आता तुम्ही जावा आणि त्या शेठला सांगा की आमचे काका धोकेबाज नाहीत. रत्नाच्या बदल्यात नजरचुकीने त्यांनी रत्नसारखा दगड दिले होते. दोघे भाऊ पुन्हा त्या व्यापाऱ्याकडे गेले आणि म्हणाले की शेठजी, आमचे काका धोकेबाज व्यक्ती नाहीत. नजरचुकीने त्यांनी रत्नाच्या जागी रत्नसारखा दगड दिले होते. हे घ्या रत्न. सोनाराने परत पारख करून हे खरे रत्न असल्याचे सांगितले.

सामान घेऊन ते परत आपल्या शहरात आले, तेव्हा काका म्हणाले की पुत्रांनो, तुमच्या आईकडून आणखी रत्न आणा. उधारी जास्त झालेली आहे. दोघांनी आपल्या आईकडून रत्न ठेवलेले कापड मागून घेतले आणि उघडून पाहिले तर ते रत्न नव्हते. जे होते ते सगळे रत्नसारखा दगड होते. काकांनी त्यांना रत्न आणि रत्नसारखा दगड यांची ओळख करून दिलेली होती. दोन्ही पुत्रांनी आपल्या आईला सांगितले की मातोश्री, हे तर रत्नसारखा दगड आहे, रत्न नाही. ते दोघेजण पुन्हा आपल्या काकांकडे आले आणि म्हणाले की आमची आई खूपच भोळी आहे. तिला रत्न व रत्नसारखा दगड यातील फरक कळत नाही. हे रत्न नाही. हे तर रत्नसारखा दगड्च आहे. काका म्हणाले की त्या दिवशी तुम्ही माझ्याजवळ जे

आणले होते ते देखिल रत्नसारखा दगड्च होते. त्यावेळी जर मी हे रत्नसारखा दगड असे म्हटलो असतो, तर तुमची माता म्हणाली असती की आता माझा पती राहिला नाही म्हणूनच ते माझ्या रत्नास रत्नसारखा दगड म्हणत आहेत. पुत्रांनो, आज मी तुम्हास रत्न आणि रत्नसारखा दगड यांची पारख करण्यायोग्य बनविले. त्यामुळे तुम्ही स्वतः याबाबत निर्णय घेतला.

विशेष :- अशाप्रकारे आज हा दास इच्छितो की हे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावे, तसेच शास्त्रांचे प्रमाण पाहून आपण स्वतः पारख करण्यायोग्य होऊन संत कोण आहे आणि कोण असंत आहे, याची ओळख करू शकाल.

शास्त्रार्थ विद्वान करत असत आणि जय-पराजयाचा निर्णय अविद्वानांच्या हाती असे. हा दास इच्छितो की प्रभुप्रेमी पुण्यात्म्यांनी प्रथम शास्त्र समजून घ्यावे. त्यानंतर ते स्वतः जाणतील की हे संत व महर्षी काय शिक्षण देत आहेत.

## ''महर्षी सर्वानंद तसेच परमेश्वर कबीर (कविर्देव) यांचा शास्त्रार्थ.''

एक सर्वानन्द नावाचे महर्षी होते. त्यांची पूज्य माता श्रीमती शारदादेवी पाप कर्मफलाने पीडित होती. तिने कष्टनिवारणासाठी सर्वप्रकारच्या पूजा व जंत्र-मंत्र अनेक वर्षांपर्यंत केले. शारीरिक पीडा निवारणासाठी अनेक वैद्यांची औषधे देखिल घेतली, परंतु काहीच लाभ झाला नाही. त्या वेळच्या महर्षींकडून दीक्षा देखिल घेतली, परंतु सर्व महर्षींनी सांगितले की मुली शारदा, ही तुझी पीडा पापकर्माचा दंड म्हणून आलेले प्रारब्ध कर्म आहे, याला क्षमा मिळत नाही. हा दंड भोगावाच लागतो. भगवान श्रीरामने वालीचा वध केलेला होता. त्या पापकर्माचा दंड श्रीरामांच्या (विष्णु) आत्म्याने श्री कृष्ण बनल्यानंतर भोगला. वालीचा आत्मा शिकारी बनला आणि त्याने श्री कृष्णाचा वध केला. अशाप्रकारे गुरुजी, संत-महंत आणि ऋषिंचे विचार ऐकून भक्तमती शारदा दुःखी मनाने आपल्या प्रारब्ध पापकर्माचे कष्ट रडतकडत भोगत होती. एके दिवशी तिच्या एका जवळच्या नातेवाइकाने सांगितले की काशीमध्ये स्वयंभू स्वतः सशरीर प्रगट झाले आहेत. तेव्हा तिने कविर् (कविर्देव) परमेश्वर अर्थात कबीर प्रभूंकडून नामदीक्षा घेतली आणि त्याच दिवशी ती कष्टमुक्त झाली. कारण पवित्र यजुर्वेदाच्या ५ व्या अध्यायातील ३२ व्या मंत्रामध्ये लिहिलेले आहे की कविरंघारिरसि अर्थात (कविर्) कबीर (अंधारि) पापांचा शत्रू (असि) आहे. नंतर याच पवित्र यजुर्वेदाच्या ८ व्या अध्यायातील १३ व्या मंत्रामध्ये लिहिलेले आहे की परमात्मा (एनसः एनसः) अधर्माचे अधर्म म्हणजेच पापांचेही पाप म्हणजे घोरपापही समाप्त करतात. प्रभु कविर्देव (कबीर परमेश्वर) म्हणाले की पुत्री शारदा, हे सुख तुझ्या भाग्यामध्ये नव्हते. मी माझ्या स्वतःच्या कोषामधून तुला ते प्रदान केलेले आहे आणि पाप विनाशक असल्याचे प्रमाण दिलेले आहे. तुझा पुत्र महर्षी सर्वानंदजी म्हणत असतो की प्रभु पापक्षमा (विनाश) करू शकत नाही. मग तू माझ्याकडून उपदेश (नामदीक्षा) प्राप्त करून आत्मकल्याण करून घे. महर्षी सर्वानंद जे भक्तमती शारदाचे पुत्र होते, त्यांना शास्त्रार्थ (वादविवाद) करण्याचे अत्यंत वेड होते. त्यांनी आपल्या समकालीन सर्व विद्वानांना शास्त्रार्थ (वादविवाद) करून पराजित केले होते. नंतर त्यांनी विचार केला की मी सर्व विद्वानांवर विजय प्राप्त केलेला आहे, हे सगळ्या लोकांना सांगावे लागत आहे. त्यापेक्षा आपल्या आईकडून आपण स्वतःचे नाव सर्वाजित ठेवून घ्यावे. हा विचार करून त्यांनी आपली आई श्रीमती शारदाजींजवळ प्रार्थना केली की आई, माझे नाव बदलून सर्वाजित ठेव. त्यांची माता म्हणाली की बेटा, सर्वानंद हे काय वाईट नाव आहे? महर्षी सर्वानंदजी म्हणाले की माताजी, मी सर्व

विद्वानांना शास्त्रार्थामध्ये पराजित केले आहे म्हणूनच माझे नाव सर्वाजित असे ठेवावे. आई म्हणाली की पुत्रा, एक विद्वान माझे गुरू महाराज कविर्देव (कबीर प्रभु) यांना देखिल तू पराजित करून दाखव, मगच मी तुझे नाव सर्वाजित ठेवेन. मातेचे हे वचन ऐकून श्री सर्वानंद प्रथम हसले आणि म्हणाले की माताजी, तुम्ही देखिल अगदी भोळ्या आहात. तो विणकर (कोष्टी) कबीर तर अशिक्षित आहे. त्याला काय पराजित करायचे? हा आता गेलो आणि लगेच परत आलो बघ.

महर्षी सर्वानन्दजी सर्व शास्त्र/ग्रंथ एका बैलावर ठेवून कविर्देव (कबीर परमेश्वर) यांच्या झोपडीसमोर आले. आधी परमेश्वर कबीरजी यांची मानलेली मुलगी कमाली त्यांना विहिरीवर भेटली. ती दरवाजात येऊन म्हणाली की या महर्षीजी, हेच आहे परमपिता कबीर साहेबांचे घर. श्री सर्वानंदजींनी कमालीकडून आपल्याजवळचे भांडे पाण्याने इतके काठोकाठ भरून घेतले की आणखी जरासे पाणी त्यात ओतले तर ते बाहेर पडून जाईल. त्यानंतर ते म्हणाले की मुली, हे पात्र जपून घेऊन जा आणि कबीरांना दे. त्यानंतर ते जे उत्तर देतील ते मला येऊन सांग. पुत्री कमालीने दिलेल्या भांड्यामध्ये कबीर परमेश्वरजींनी (कविर्देव) एक कपडे शिवायची मोठी सुई टाकली. त्यामुळे भांड्यामधील थोडे पाणी जमिनीवर सांडले. त्यानंतर ते कमालीला म्हणाले की मुली, हे भांडे श्री सर्वानंदजींना परत कर. भांडे घेऊन बाहेर आलेल्या कमालीला सर्वानंदजींनी विचारले की काय उत्तर दिले कबीराने? कमालीने प्रभुंनी भाड्यात सुई टाकल्याचा सर्व वृत्तांत सांगितला, तेव्हा महर्षी सर्वानंदजींनी परमपूज्य कबीर परमेश्वरांना (कविर्देव) विचारले की आपण माझ्या प्रश्नाचे काय उत्तर दिले आहे?'' प्रभु कबीर साहेबजींनी विचारले की काय प्रश्न होता आपला?

श्री सर्वानन्द महर्षी म्हणाले की मी सर्व विद्वानांना शास्त्रार्थामध्ये (वादविवाद) पराजित केलेले आहे. माझे नाव सर्वाजित ठेवावे, अशी मी माझ्या आईला प्रार्थना केली होती, पण तिने आपणास पराजित केल्यानंतरच माझ्या नावात परिवर्तन करायचे ठरविलेले आहे. आपणाजवळ भांडे पाण्याने काठोकाठ भरून पाठविण्यामागे तात्पर्य असे आहे की हे भांडे जसे पाण्याने काठोकाठ भरले होते, तसा मी ज्ञानाने परिपूर्ण आहे. यामध्ये आणखी पाणी सामावणार नाही. ते बाहेर पडेल. अर्थात माझ्याशी ज्ञानचर्चा करण्याने कोणताच लाभ होणार नाही. आपले ज्ञान माझ्यात सामावणार नाही. ती सगळी वायफळ बडबड होईल. त्यापेक्षा आपली हार लिहून द्या. यामध्येच आपले हित आहे.

पूज्य कबीर परमेश्वर (कविर्देव) म्हणाले की आपल्या पाण्याने काठोकाठ भरलेल्या भांड्यामध्ये लोखण्डाची सुई टाकण्यामागे माझा अभिप्राय असा आहे की जशी सुई भांड्यातील पाणी बाहेर पाडून तळाला जाऊन थांबली आहे, तसे माझे ज्ञान (तत्त्वज्ञान) भारी (सत्य) आहे. अशाप्रकारे माझे तत्त्वज्ञान तुमच्या असत्य ज्ञानाला (लोकवेद) बाहेर काढून तुमच्या हृदयामध्ये सामावून राहील.

हे ऐकून महर्षी सर्वानंदजी म्हणाले की मग आता प्रश्न करा. एक बहुचर्चित विद्वान विणकराच्या (कोष्टी) घरी आलेला पाहून आसपासचे भोळेभाबडे अशिक्षित विणकर (कोष्टी) शास्त्रार्थ (वादविवाद) ऐकण्यासाठी गोळा झाले.

पूज्य कविर्देवांनी प्रश्न केला :

कौन ब्रह्मा का पिता है, कौन विष्णुकी माँ।
शंकर का दादा कौन है, सर्वानंद दे बताए।

महर्षी सर्वानन्दजींचे उत्तर :- श्री ब्रह्मा जी रजगुण आहेत, श्री विष्णु जी सतगुणयुक्त आहेत आणि श्री शिव जी तमगुणयुक्त आहेत. ते तिघेही अजर-अमर अर्थात अविनाशी आहेत. सर्वेश्वर-महेश्वर-मृत्युंजय आहेत. त्यांचे माता-पिता कोणी नाहीत. तुम्ही अज्ञानी आहात. तुम्हाला शास्त्रांचे ज्ञान नाही. असाच काहीतरी उलटासुलटा प्रश्न केलेला आहे. सर्व उपस्थित श्रोत्यांनी टाळ्या वाजवल्या आणि महर्षी सर्वानंदजींचे समर्थन केले.

पूज्य कबीर प्रभु (कविर्देव) म्हणाले की महर्षी तुम्ही श्रीमद् देवी भागवत पुराणातील तिसरा स्कंद, तसेच श्री शिवपुराणातील सहावा व सातवा रुद्रसंहिता अध्याय प्रभूला साक्षी मानून, गीता वर हात ठेवू वाचा आणि मग अनुवाद सांगा. महर्षी सर्वानंदजींनी गीता वर हात ठेवून शपथ गेतली की जे कीही असेल ते खरे सांगेन.

पूज्य कबीर प्रभुंनी (कविर्देव) सांगितल्यानंतर सर्वानंदजींनी पवित्र पुराणांचे ध्यानपूर्वक वाचन केले. श्री शिवपुराणामध्ये (गीता प्रेस, गोरखपूर यांच्याकडून प्रकाशित, ज्याचे अनुवादक आहेत श्री हनुमान प्रसाद पोद्दार) पान क्र. १०० ते १०३ वर लिहिलेले आहे की सदाशिव अर्थात कालरुपी ब्रह्म आणि प्रकृति (दुर्गा) यांच्या संयोगाने (पती-पत्नी व्यवहाराने) सतगुण श्री विष्णु जी, रजगुण श्री ब्रह्मा जी, तमगुण श्री शिव जी यांचा जन्म झाला आहे. याच प्रकृतिला (दुर्गा) अष्टांगी असे संबोधले जाते, त्रिदेवांची जननी (ब्रह्मा, विष्णु, शिव जी यांची आई) म्हटली जाते.

पवित्र श्रीमद् देवी पुराणाच्या (गीता प्रेस, गोरखपूर यांच्याकडून प्रकाशित, अनुवादक श्री हनुमान प्रसाद पोद्दार आणि चिमनलाल गोस्वामी) तिसऱ्या स्कंदमध्ये पान नं. ११४ ते १२३ मध्ये स्पष्ट वर्णन आले आहे- भगवान विष्णु जी म्हणत आहेत की ही प्रकृति (दुर्गा) आम्हा तिघांची जननी आहे. जेव्हा मी लहान बालक होतो, तेव्हा मी हिला पाहिलेले होते. मातेची स्तुती करत श्री विष्णुजींनी म्हटले की माता, मी (विष्णु), ब्रह्मा आणि शिव तर नाशवान आहोत. आमचा तर अविर्भाव (जन्म) आणि तिरोभाव (मृत्यू) होत असतो. आपण प्रकृति देवी आहात. भगवान शंकर म्हणाले आहेत की हे माता, जर ब्रह्मा व विष्णु आपणापासून उत्पन्न झालेले आहेत तर मग माझी माताही आपणच आहात.

महर्षी सर्वानन्दजी पूर्वी ऐकलेल्या आणि सांगितलेल्या अपुऱ्या शास्त्राविरुद्ध ज्ञानाच्या (लोकवेद) आधारावर या तिघांना (ब्रह्मा, विष्णु आणि शिव) अविनाशी व अजन्मा म्हणत होते. त्यांनी पुराणांचे वाचन केले असते तरीही ते अज्ञानीच राहिले असते. कारण ब्रह्म (काल) पवित्र गीता च्या माध्यमातून सांगत आहे की मी सर्व प्राण्यांची (जे माझ्या २१ ब्रह्माण्डांमधील माझ्या आधीन आहेत ते) बुद्धी आहे. जेव्हा मला वाटेल, तेव्हा मी त्यांच्यात ज्ञान भरून देईन आणि जेव्हा वाटेल तेव्हा अज्ञानही भरेन. त्यावेळी पूर्ण परमात्म्यांनी सांगितल्यानंतर कालचा (ब्रह्म) दबाव बाजूला झाला आणि सर्वानंदजींना स्पष्ट ज्ञान झाले. सर्वानंदजी यांनी स्पष्ट केले की वास्तविक असेच लिहिलेले आहे, परंतु मानहानीच्या भीतीने मी म्हणालो की मी सर्वकाही वाचलेले आहे, पण असे कोठेही लिहिलेले नाही. कविर्देवांना (कबीर परमेश्वर) म्हणालो की तू असत्य (खोटारडा) आहेस. शास्त्रांविषयी तुला काय माहिती आहे? मी तर दररोज ते वाचत असल्याने आता मला न समजण्यासारखे काय शिल्लक राहिलेले असणार? त्यानंतर असे घडले की सर्वानंदजींनी धारेच्या प्रवाहासारखे संस्कृत बोलायला सुरवात केली. कंठस्थ केलेली म्हणजेच पाठांतर केलेली दुसरीच कोणती तरी वेदवाणी ते बोलत राहिले, पण पुराण मात्र त्यांनी ऐकविले नाही.

तेथे उपस्थित असलेल्या भोळ्याभाबड्या श्रोत्यांना संस्कृत समजत नव्हते. त्यांच्या वाणीने प्रभावित होऊन ते सर्वानंद महर्षीजींच्या समर्थनार्थ प्रशंसा करून त्यांना महाज्ञानी म्हणू लागले. त्यांचा भावार्थ असा होता की परमेश्वर कबीरजींना (कविर्देव) सर्वानंदजी यांनी पराजित केले. त्यांनी सर्वानंदजींना विजयी घोषित केले. परमपूज्य कबीर परमेश्वरजी (कविर्देव) म्हणाले की सर्वानंदजी आपण पवित्र गीता ची शपथ घेतलेली आहे, हे देखिल विसरला आहात. जर तुम्ही समोर लिहून ठेवलेल्या शास्त्रांतील सत्यही मानत नसाल, तर मग मी पराजित झालो आणि तुम्ही जिंकलात.

एका जमीनदाराचा मुलगा सातवीमध्ये शिकत होता. त्याला थोडीफार इंग्रजी भाषा येत होती. एक दिवस त्याचे पिता आणि तो शेतामध्ये बैलगाडी घेऊन जात होते. समोरून एक इंग्रज व्यक्ती आली. त्याने बैलगाडीवानांना इंग्रजीमध्ये रस्त्याची माहिती विचारली. पिता आपल्या मुलाला म्हणाला की बेटा, या इंग्रजाची आपण जास्त शिकलेलो आहे हे सिद्ध करण्याची इच्छा आहे. तुला देखिल इंग्रजी भाषा येते. तू त्याच्याशी इंग्रजी बोल आणि त्याचे गर्वाचे घर मोडून टाक. शेतकऱ्याच्या मुलाने इंग्रजीत पाठ केलेले आजारपणाच्या सुट्टीसाठीचे प्रार्थनापत्र पूर्णपणे ऐकवले. इंग्रज त्या मूर्ख बालकाची मूर्खता पाहून म्हणाला की मी याला रस्त्याबद्दल माहिती विचारतोय आणि हा सांगतोय आजारपणाच्या सुट्टीचे प्रार्थनापत्र. कपाळावर हात मारत आपली गाडी घेऊन तो तेथून निघून गेला. शेतकऱ्याने आपल्या विजेत्या पुत्राची पाठ थोपटली आणि म्हणाला की वाह रे पट्ट्या! तू तर माझे जीवन सफल केलेस. आज तू इंग्रजांना त्यांच्या भाषेमध्ये पराजित केलेस. तेव्हा तो मुलगा म्हणाला की पिताजी माय बेस्ट फ्रेंड (माझा उत्तम मित्र) नावाचा निबंध ऐकवला असता, तर तो इंग्रज गाडी येथेच सोडून पळून गेला असता. अगदी अशाच प्रकारे कविर्देवजी सांगत होते एक आणि सर्वानंदजी उत्तर देत होते काही दुसरेच. अशा अयोग्य शास्त्रार्थाने (वादविवाद) जनसमुदायाच्या मनामध्ये घर केलेले आहे.

परमपूज्य कबीर परमेश्वर (कविर्देव) म्हणाले की सर्वानंदजी आपण जिंकला आणि मी पराजित झालो. महर्षी सर्वानंदजी म्हणाले की मला तुम्ही तसे लिहून द्या. मी कोणतेही कार्य अर्धवट करत नाही. परमात्मा कबीरजी (कविर्देव) म्हणाले की ही कृपा देखिल तूच कर. तुला जे काही लिहायचे आहे ते लिही. मी फक्त अंगठा लावून देईन. महर्षी सर्वानंदजींनी लिहिले की शास्त्रार्थामध्ये सर्वानंद विजयी झाले आणि कबीर साहेब पराजित झाले. त्यानंतर त्याने कबीर परमेश्वरांचा अंगठा घेतला. आपल्या आईजवळ जाऊन सर्वानंदजी म्हणाले की आई हे घे तुझ्या गुरुदेवांना पराजित केल्याचे प्रमाण! भक्तमती शारदाजी म्हणाली की पुत्रा मला ते वाचून दाखव. जेव्हा सर्वानंदजींनी ते वाचले, तेव्हा त्यामध्ये लिहिलेले होते की शास्त्रार्थामध्ये सर्वानंद पराजित झाला आहे आणि कबीर परमेश्वर (कविर्देव) विजयी झाले आहेत. सर्वानंदजींची माता म्हणाली की पुत्रा, तू तर म्हणत होतास की तू विजयी झालेला आहेस आणि तू तर पराजित झाला आहेस. महर्षी सर्वानंदजी म्हणाले की माताजी, मी कित्येक दिवसांपासून एकसारखा शास्त्रार्थामध्ये (वादविवादामध्ये) व्यस्त होतो. त्यामुळे निद्रावश होऊन माझ्याकडून लिहिण्यामध्ये चूक झाली. आता मी परत जातो आणि बरोबर लिहून आणतो. यावेळी मातेने अट घातली की तू विजयी झाल्याचे कोणतेही लिखित प्रमाण देशील तरच मी ते मान्य करेन, मात्र कोणताही मौखिक पुरावा कधीच मान्य करणार नाही. महर्षी सर्वानंदजी परत गेले आणि म्हणाले की कबीर साहेब, माझ्या लिहिण्यामध्ये थोडी चूक झालेली आहे. आपणाला ते पुन्हा लिहावे लागेल. कबीर साहेब जी म्हणाले, ''ठीक आहे, पुन्हा लिही.'' सर्वानंदजींनी परत सगळा मजकूर लिहिला आणि कबीर साहेबांचा अंगठा घेऊन ते मातेजवळ आले. यावेळी

देखिल पुन्हा उलटेच घडले होते. ते म्हणाले की माताजी, मी पुन्हा जातो. तिसऱ्या वेळेला त्यांनी लिहून आणलेला मजकूर आधी वाचला आणि तो व्यवस्थित आहे याची खात्री करूनच घरात पाय ठेवला. सर्वानंदजी त्या मजकुरावरील दृष्टी ढळू न देता आपल्या घरामध्ये प्रवेश करतच म्हणाले की माताजी, आता ऐका. असे म्हणून ते वाचू लागले, तर त्यांच्या डोळ्यांदेखत अक्षरे बदलली. तिसऱ्या वेळेलाही ते हेच वाचू लागले की शास्त्रार्थामध्ये सर्वानंद पराजित झाला आणि कबीर साहेब विजयी झाले. सर्वानंद काहीच बोलेना हे पाहून त्यांची माता म्हणाली की पुत्रा तू बोलत का नाहीस? काय लिहिलेले आहे ते वाचून दाखव. त्या मातेला हे माहीत होते की हा आपला मूर्ख अज्ञानी पुत्र पर्वताशी टक्कर घेण्यास जात आहे. ती सर्वानंदजींना म्हणाली, कि, पुत्रा, ते स्वतः परमेश्वर आलेले आहेत. जा आणि त्यांच्या चरणी दंडवत घाल. आपल्या चुकीची त्यांच्याकडे क्षमायाचना कर आणि उपदेश घेऊन आपले जीवन सफल करून घे. सर्वानंदजी आपल्या मातेच्या चरणांवर पडून रडू लागला आणि म्हणाला की माताजी, हे तर स्वयं प्रभु आलेले आहेत. आपण माझ्यासोबत चला. मला एकट्याला तेथे जाण्याची लाज वाटत आहे. सर्वानंदजींची आई त्यांना घेऊन प्रभु कबीर साहेबांकडे गेली आणि सर्वानंदजींनाही कबीर परमेश्वरांकडून नामोपदेश प्राप्त करवून दिला आणि त्यावेळीच स्वतःला महर्षी म्हणवून घेणाऱ्या त्या अज्ञानी मूर्ख प्राण्याचा पूर्ण परमात्म्याच्या चरणी आल्यानंतरच उद्धार झाला. पूर्णब्रह्म कबीर परमेश्वर (कविर्देव) म्हणाले की सर्वानंद तुला अक्षर ज्ञानाच्या आधारे देखिल शास्त्र समजले नाही. कारण मला शरण आल्याशिवाय ब्रह्म (काल) कोणाचीही बुद्धी पूर्णपणे विकसित होऊ देत नाही. आता पुन्हा याच पवित्र वेद व पवित्र गीता आणि पवित्र पुराणांचे वाचन कर. आता तू ब्राह्मण झाला आहेस. 'ब्राह्मण सोई ब्रह्म पहचाने' विद्वान तोच आहे, जो पूर्ण परमात्म्याला ओळखतो. नंतर आपले कल्याण करून घ्या.

विशेष : आजपासून साडेपाचशे वर्षांपूर्वी हेच पवित्र वेद, पवित्र गीता व पवित्र पुराणांमध्ये लिहिलेले ज्ञान कबीर परमेश्वरजींनी (कविर्देव) आपल्या सर्वसाधारण वाणीमध्ये देखिल दिलेले होते. ते त्या कालापासून आजपर्यंतच्या महर्षींनी व्याकरणातील त्रुटी असलेली भाषा समजून हे वाचण्याची काही आवश्यकता नाही अशी समजूत करून घेतली आणि म्हणाले की हा कबीर तर अज्ञानी आहे. त्याला अक्षर ज्ञान नाहीच नाही, मग संस्कृत भाषेमध्ये लिहिलेल्या शास्त्रांमधील लपलेली गूढ रहस्ये त्याला काय माहिती असणार? आम्ही विद्वान आहोत. जे आम्ही सांगतो, ते सर्व शास्त्रांमध्ये लिहिलेले आहे आणि श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी व श्री शिव जी यांचे कोणीही माता-पिता नाहीत. ते तर अजन्मा अजर-अमर, अविनाशी आणि सर्वेश्वर, महेश्वर, मृत्युंजय आहेत. सर्व सृष्टिची रचना त्यांनी केलेली असून ते तीनही गुणांनी युक्त आहेत. या आणि अशाच प्रकारच्या व्याख्या ते आतापर्यंत सांगत राहिले. आजही तेच पवित्र शास्त्र आणि पुराणे आपल्याजवळ आहेत, ज्यामध्ये तीन प्रभुंच्या (श्री ब्रह्मा जी-रजगुण, श्री विष्णु जी-सतगुण, श्री शिव जी-तमगुण) माता-पित्यांचा स्पष्ट उल्लेख आहे. त्या कालामध्ये आपले पूर्वज अशिक्षित होते आणि शिक्षित वर्गाला शास्त्रांचे पूर्ण ज्ञान नव्हते. तरीही कबीर परमेश्वरांद्वारे (कविर्देव) सांगितले गेलेले सत्य ज्ञान असत्य आहे असे सांगत, त्यांनी जाणूनबुजून खोटे ठरवले. त्या महर्षींचे असेही म्हणणे आहे की कोणत्याही शास्त्रामध्ये असे लिहिलेले नाही की श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी व श्री शिव जी यांचे कोणी माता-पिता आहेत, परंतु पवित्र पुराण साक्षी आहेत की श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी यांचा जन्म-मृत्यू होतो. ते अविनाशी नाहीत आणि या तिन्ही देवतांची माता प्रकृति (दुर्गा) आहे आणि पिता ज्योति निरंजन कालरुपी ब्रह्म आहे.

आज सर्व मानव समाज, बंधू-भगिनी, तरुण-वृद्ध, मुले-मुली शिक्षित आहेत. आज कोणीही असे सांगू शकत नाही की कबीर परमेश्वर (कविर्देव) साहेबजींच्या अमृतवाणीमध्ये जसे लिहिलेले आहे, त्याप्रमाणे शास्त्रामध्ये/पुराणांमध्ये लिहिलेले नाही.

## पूज्य कबीर परमेश्वर (कविर्देव) यांची अमृतवाणी

धर्मदास यह जग बौराना। कोइ न जाने पद निरवाना।।
अब मैं तुमसे कहों चिताई। त्रियदेवन की उत्पति भाई ।।
ज्ञानी सुने सो हिरदै लगाई। मूर्ख सुने सो गम्य ना पाई।।
माँ अष्टंगी पिता निरंजन। वे जम दारुण वंशन अंजन ।।
पहिले कीन्ह निरंजन राई। पीछेसे माया उपजाई।।
धर्मराय किन्हाँ भोग विलासा। मायाको रही तब आसा ।।
तीन पुत्र अष्टंगी जाये। ब्रह्मा विष्णु शिव नाम धराये।।
तीन देव विस्तार चलाये। इनमें यह जग धोखा खाये ।।
तीन लोक अपने सुत दीन्हा। सुन्न निरंजन बासा लीन्हा।।
अलख निरंजन सुन्न ठिकाना। ब्रह्मा विष्णु शिव भेद न जाना ।।
अलख निरंजन बडा बटपारा। तीन लोक जिव कीन्ह अहारा ।।
ब्रह्मा विष्णु शिव नहीं बचाये। सकल खाय पुन धूर उडाये।।
तिनके सुत है तीनों देवा। आंधर जीव करत हैं सेवा ।।
तीनों देव और औतारा। ताको भजे सकल संसारा।।
तीनों गुणका यह विस्तारा। धर्मदास मैं कहों पुकारा ।।
गुण तीनों की भक्ति में, भूल परो संसार।
कहै कबीर निज नाम बिन, कैसे उतरें पार ।।

या अमृतवाणीमध्ये परमेश्वर कबीर साहेब जी आपला खास निजसेवक श्री धर्मदास साहेबजींना सांगत आहेत की हे धर्मदास, हा सर्व संसार तत्त्वज्ञानाच्या अभावाने विचलित झालेला आहे. कोणालाही पूर्ण मोक्षाचा मार्ग व पूर्ण सृष्टिरचनेचे वास्तविक ज्ञान नाही. म्हणूनच मी तुला माझ्याद्वारे रचना केली गेलेल्या सृष्टिची कथा ऐकवतो. बुद्धिमान व्यक्तिंच्या तर लगेचच लक्षात येईल, परंतु या सर्व प्रमाणांना पाहूनदेखील जे मानणार नाहीत, त्या अज्ञानी (मूर्ख) प्राण्यांवर कालाचा प्रभाव आहे. ते भक्तियोग्य नाहीत. आता तिन्ही भगवानांची (ब्रह्मा जी, विष्णु जी आणि शिव जी) यांची उत्पत्ती कशी झाली, हे मी सांगतो. यांची माता तर अष्टंगी (दुर्गा) आहे आणि पिता ज्योति निरंजन (ब्रह्म-काल) आहे. प्रथम ब्रह्मची उत्पत्ती अंड्यातून झाली. त्यानंतर दुर्गेची उत्पत्ती झाली. दुर्गेच्या रूपावर आसक्त होऊन कालाने (ब्रह्म) चूक (छेडछाड) केली. तेव्हा दुर्गेने (प्रकृति) त्यांच्या उदरामध्ये आश्रय घेतला. जेथे ज्योति निरंजन होता, तेथे मी गेलो. तेव्हा दुर्गा देवीला (भवानी) काल ब्रह्मच्या उदरातून बाहेर काढून २१ ब्रह्माण्डांसह १६ संख कोस दूर पाठविले. ज्योति निरंजनाने प्रकृति देवीबरोबर (दुर्गा) भोगविलास (पती-पत्नी व्यवहार) केला. त्या दोघांच्या संयोगातून तीन गुणांची (श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी) उत्पत्ती झाली. याच तिन्ही गुणांची (रजगुण-ब्रह्मा जी, सतगुण-विष्णु जी, तमगुण-शिव जी) साधना करून सर्व प्राणी कालच्या जाळ्यामध्ये फसलेले आहेत. जोपर्यंत वास्तविक मंत्र प्राप्त होणार नाही, तोपर्यंत त्यांना पूर्ण मोक्ष कसा मिळेल?

# भटकलेल्यांसाठी सत्मार्ग

## ''ईशवंती भगिनीची दु:खभरी आत्मकथा''

मी भक्तमती ईशवंती देवी, पत्नी श्री भक्त सुरेशदास अहलावत, पुत्र श्री प्रतापसिंह अहलावत, पाना गंजा, गाव-डीघल, जिल्हा-झज्जर येथील रहिवासी आहे. हे बंदी छोड सतगुरु रामपालजी महाराज, मी आणि माझा परिवार आपल्या चरणकमळांची धूळ आहे. तुम्ही आम्हाला जे सुख दिले, त्याची आम्ही या जीवनामध्ये कधी कल्पना देखिल करू शकत नव्हतो. आज मी माझ्यावर ओढवलेली संकटांची सत्यकथा येथे लिहीत आहे. त्या संकटांचे निवारण करून आपण आम्हावर कृपा केलेली आहे. आमची दु:खदायी सत्यकथा वाचून आमच्यासारखे इतर दु:खी परिवार देखिल आपल्या आशीर्वादाने कल्याण करवून घेऊ शकतील. आमचे जीवन पूर्णपणे अंधकारमय होते. जर आम्ही आपल्या चरणी आलो नसतो, तर आज आम्ही जीवित राहिलो नसतो.

मी असाध्य रोगाने पीडित होते. भापदौडा येथे राहणारा माझा भाऊ ओमप्रकाश, पुत्र श्री दयानंद राठी हरियाना पोलिसांत नोकरी करत होता. त्याचाही याच व्याधीने मृत्यू झाला. मी देखिल त्याच स्थितीला पोहोचली होते. माझे हात-पाय पूर्णपणे लकवाग्रस्त (अर्धांगवायू) झाले होते. तोंडातून आवाज यायचा देखिल बंद झालेला होता. ठिकठिकाणच्या डॉक्टर व मांत्रिकांना आम्ही दाखविले, परंतु सर्व ठिकाणी निराशाच हाती आली. माझे पती एवढे मद्यपान करायचे की जेव्हा ते घरी यायचे, तेव्हा मुले भीतीने कॉटखाली लपून बसायची. पतीने दारूसाठी घरातील भांडी देखिल विकून टाकली. त्याचबरोबर डोक्यावर कर्जाचा बोजा देखिल चढवून ठेवला होता. त्यांच्या त्रासाने शेजारी देखिल वैतागून गेले होते. एके दिवशी मद्यधुंद स्थितीत माझा पती मला विहिरीमध्ये ढकलून द्यायला घेऊन गेला होता. महापापी अंगातील भूत म्हणाले की यात कोणी कितीही प्रयत्न केले तरी काहीही चालणार नाही. या घराची मी पूर्ण बरबादी करूनच सोडेन. माझ्या बंधूंनी मांत्रिक आणि डॉक्टरांकडे चकरा मारण्यात भरपूर धन वाया घालविले, परंतु त्याचा मला काहीच लाभ झाला नाही. इकडे पती दारू पीत होता आणि तिकडे लहान मुले होती. माहेरातही काही थारा नव्हता. माझा भाऊ सुखबीर डी.टी.सी.मध्ये ड्रायव्हर आहे. त्याने परमपूज्य सतगुरु रामपालजी महाराज यांच्याकडून नामोपदेश (गुरुदीक्षा) घेतला आहे. तो म्हणाला की बहिणीला संत रामपालजी महाराजांकडून नामोपदेश प्राप्त करवून देतो. ती जर मरणारच असेल तर हा शेवटचा उपाय करून पाहू. यावर माझे वडील दयानंद राठी म्हणाले की नामोपदेशाने (गुरुदीक्षेने) कोणी कधी बरे होते का? माझ्या बंधूंनी सर्वांना नामोपदेशाची महिमा समजावून सांगितली. त्यानंतरच मग सर्वांनी त्याबाबत सहमती दर्शवली. त्या वेळी सतगुरुदेव गाव पंजाब, खोड दिल्ली येथे सत्संग करत होते. माझा पूर्ण परिवार मला घेऊन रात्री दहा वाजता महाराजजींच्या चरणाशी आला. ही सत्यकथा २५ डिसेंबर १९९६ ची आहे.

माझ्या भावाने पूज्य रामपालजी महाराजजींना माझी दु:खदायी कथा सांगितली. गुरुजींनी रात्री दहा वाजता सत्संगामध्येच नामोपदेशाची कृपा केली. त्यापूर्वी माझे बोलणे देखिल पूर्णपणे बंद झालेले होते. जीभ जरा देखिल उचलत नव्हती. जेव्हा २६ डिसेंबरच्या प्रात:काळी मी झोपेतून जागी झाले, तेव्हा मी चांगल्याप्रकारे बोलण्याच्या स्थितीमध्ये आले होते. मी भावाला म्हणाले की इतक्या वर्षांनंतर मला याची जाणीव होत आहे की माझ्या शरीरात आता जीव आहे आणि माझ्या शरीरातून कोणते तरी जडत्व उतरले गेले आहे. मी

बोलत असलेले पाहून माझा भाऊ आश्चर्यचकित झाला आणि म्हणू लागला की महाराज रामपालजी तर साक्षात कबीर परमेश्वरच आहेत. त्यावेळी मी बीडी पीत (धूम्रपान) होते. त्याच दिवशी मी तिचा त्याग केला. घरी आले तर माझे पती भक्त सुरेश म्हणाले की तू कसला नामोपदेश घेऊन आली आहेस? मी बघतो, तुझ्या नामामध्ये किती शक्ति आहे? ते आपल्या आईला म्हणाले की ही चांगला नामोपदेश घेऊन आली आहे. आता माझी मुले सकाळी उठल्यानंतर गुडमॉर्निंगऐवजी सतसाहेब म्हणू लागली आहेत. भक्त सुरेश वर्षभर असेच मद्यपान करून घरामध्ये भांडण करत असे.

एके दिवशी माझ्या पतीने बंदी छोड कबीर साहेब, गरीब दास साहेब जी व सतगुरुदेव संत रामपालजी महाराज यांच्या प्रतिमा (फोटो) तोडण्याचा पवित्रा घेतला. जेव्हा मी हात जोडून बंदी छोड सद्गुरूंना प्रार्थना केली की आपणच यांच्या बुद्धीवर नियंत्रण आणू शकता, तेव्हा बंदी छोड यांनी स्वतःच असा चमत्कार दाखविला की माझ्या पतीने सतगुरु कबीर साहेबजींसह सगळ्या प्रतिमा पूजा स्थळावर जेथे होत्या तेथे परत ठेवल्या आणि दंडवत घातला. तेव्हापासून त्यांनी मद्यपान, बिडी आदी सर्व वाईट व्यसने सोडून दिली. या सर्व घटनांचे गंजा व डीघल ही संपूर्ण गावे साक्षी आहेत. मला पुनर्जन्म प्राप्त झाल्याचे पाहून माझ्या दु:खाने दु:खी झालेले माझे भाऊ राजेंद्र सिंह राठी डी.एस.पी. (हरियाना) आणि प्रेमप्रकाश राठी ॲडव्होकेट (दिल्ली) यांच्यासह त्यांच्या पूर्ण परिवाराने देखिल नामोपदेश घेतला. त्यानंतर कबीर परमेश्वरांनी असे सुख दिले, ज्याची कल्पना करणे देखिल शक्य नाही. आमच्या म्हशीने सर्प खाल्लेला होता. तिची पूर्णपणे वाईट अवस्था झाली होती. डॉक्टरांना दाखविल्यावर त्यांनी सांगितले की म्हशीने कोणतीतरी विषारी वस्तू खाल्ली आहे. त्यांनी तिला दहा इंजेक्शन दिली. दुसऱ्या दिवशी म्हशीच्या डोळ्यांमधून निळे पाणी वाहू लागले आणि म्हैस आंधळी झाली. डॉक्टरांचा देखिल काही उपाय चालला नाही. रात्री स्वप्नामध्ये सतगुरुदेव रामपालजी महाराज दिसले. त्यांनी म्हशीच्या शरीरावर हात फिरवला. सकाळी उठल्यावर आम्ही आणि शेजाऱ्यांनी म्हशीच्या तोंडामध्ये साप पाहिला. आम्ही तो ओढून बाहेर काढला. त्यानंतर म्हैस स्वस्थ झाली आणि भरपूर दूध देऊ लागली. असे किती प्रकारचे सुख त्यांनी आम्हास दिले याची कल्पना देखिल करता येत नाही. काल-परवापर्यंत आमच्याजवळ दहा रुपये देखिल नव्हते आणि आता त्याच शेतामधून धान्याच्या राशी पडतात. आता कोणापुढे मदतीसाठी हात पसरण्याची गरज राहिलेली नाही. शेजारीपाजारी म्हणतात की तुमचे गुरुजी म्हणजे तुमच्यासाठी राम आहेत. अज्ञानाच्या पाशात अडकून भरकटलेला भोळाभाबडा समाज तुमची महिमा काय जाणणार? संत रामपालजी महाराजांच्या विरोधकांना तर केवळ चिखल उडवणे माहिती आहे. ज्याच्यावर असे प्रसंग बेतले तोच आपणांकडून काय मिळाले आहे, हे सांगू शकतो? आमची आपणास एवढीच प्रार्थना आहे की तुम्ही आम्हाला आपल्या चरणी जागा द्या आणि आपण हजारो वर्षे असेच दु:खी जीवांचा आधार बनून राहावे. पूर्ण परमात्माच सतगुरु रामपालजी महाराजांच्या रूपात अवतरले आहेत.

आपले नाम घेतल्यानंतर आमच्या घरात इतकी सुख-शांती प्राप्त झाली की परमेश्वरा! त्याचे आम्ही वर्णनही करू शकत नाही. तरीही मी ते सांगण्याचा प्रयत्न करत आहे. मी आपल्याकडून १९९७ मध्ये नामोपदेश घेतला. त्यानंतर सुमारे दीड वर्षानंतर एक घटना घडली, ती अशी-

एका रात्री मला असे सर्वकाही दिसू लागले की मी गावामध्ये स्मशान कोठे आहे, याची चौकशी करत आहे. मला स्मशान दाखवून सांगितले गेले, की, उद्या आपणाला येथे यायचे आहे.

ते जेथे मुंडण करतात, ते स्मशान होते. सकाळी मला जुलाब झाले आणि कोठेतरी एकसारखे डोके आपटत राहावे अशा शिरोवेदना सुरू झाल्या. मरण यायला एवढे कारणे पुरेसे होते. डॉक्टरांना बोलविले गेले. त्यांनी इंजेक्शन दिले. त्यानंतर त्यांनी सांगितले की हिचा मृत्यू झालेला आहे. त्यानंतर चार दूत दिसू लागले. त्यांनी दोन्ही बाजूंनी पकडले आणि सांगू लागले की आम्हाला भगवानांनी पाठविलेले आहे. आम्ही तुला घेऊन जाणार आहे. तुझे आयुष्य आता संपले झाले. मी म्हणाले की माझे गुरुजी तुम्हाला घेऊन जाऊ देणार नाहीत. ते म्हणाले की काय करतील तुझे गुरुजी? तुझा इथला कालावधी तर आता संपलेला आहे. आम्ही असे करतो की तू तुझ्या स्वतःच्या हातानेच स्वतःला मृत्युसदनी पाठवशील. त्यानंतर मी माझ्या दोन्ही हातांनी माझा गळा जोरजोराने दाबू लागले. त्यामुळे माझा जीव डोळ्यांत आला. मी कोणाबरोबर काहीही बोलू शकले नाही. बंदी छोड म्हणतात, आ जम तेरे घर ने घेरैं, तू राम कहन नहीं पावेगा तशी माझी अवस्था झाली होती. त्यानंतर कबीर साहेब कमळाच्या फुलावरून माझ्याजवळ प्रगट झाले. त्यानंतर माझ्या शरीरातून पूज्य सतगुरु रामपालजी महाराजांचा आवाज आला की या मुलीला तुम्ही कसे काय घेऊन जाणार? आम्ही तुम्हाला तिला नेऊ देणार नाही. आम्ही आमच्या मर्जीप्रमाणे हिला घेऊन जाणार आहे. हिचा तुम्ही पाय कापला, तर आम्ही तो देखिल जोडून देऊ. त्यानंतर त्यांनी गुरुजींशी इतका वाद घातला की मी त्याचे वर्णन देखिल करू शकत नाही. त्यानंतर यमाचे दूत पळून गेले. गुरुजी मला म्हणाले की मुली, भिऊ नकोस. तुझा मृत्यू आम्ही टाळला आहे. आता आमची जेव्हा इच्छा होईल, तेव्हाच तुला आम्ही घेऊन जाऊ.

आमची एक म्हैस व्यायला आली होती. ती एक दिवस पूर्णपणे भुतासारखी झाली. डॉक्टरांना बोलवून आणले. त्यांनी वेळेपूर्वीच तिची प्रसूती केली. त्यानंतर म्हशीने नाळ टाकली नाही. कोणाच्या तरी सांगण्यावरून थोडीशी नाळ बाहेर होती, तिला वीट बांधल्याने नाळ तुटली. नाळ तुटल्यामुळे म्हशीची प्रकृति आणखीच बिघडली. आता म्हैस मरणारच, असेच सर्वजण म्हणू लागले. आम्ही घाबरून रात्री पाच डॉक्टरांचे दरवाजे ठोठावले, परंतु एकही डॉक्टर आला नाही. सगळे डॉक्टर म्हणू लागले की ही केस आता आमच्या हातात राहिलेली नाही. आता परमात्माच तिला वाचवू शकतो. म्हशीला कोणीच वाचवू शकत नसल्यामुळे मी अत्यंत दुःखी होऊन आशा सोडली. तरीही मनोमन आशा धरली की भक्तजी आशा सोडू नका. आमचे बंदी छोड सर्वकाही ठीक करतील. त्यानंतर बंदी छोड सद्गुरूंसमोर दंडवत घातला आणि प्रार्थना केली. सकाळी एका डॉक्टरजवळ गेले. त्याने येऊन पाहिले आणि म्हणाला की ही म्हैस वाचणार नाही. असेच आमच्या आणखी एका म्हशीबाबत घडले होते. तेव्हा एका प्रसिद्ध डॉक्टरांनी खूप प्रयत्न केले होते, पण ती वाचू शकली नाही. त्यानंतर डॉक्टर म्हणाले की परमेश्वराच्या दयेने ही म्हैस वाचली तरी दूध देणार नाही. त्यानंतर सात दिवसांनी म्हशीच्या आंतड्यामधील नाळ काढताना मला गुरुजी दिसले. सकाळी म्हशीने नाळ टाकली आणि ती स्वस्थ बनली. त्यानंतर पंधरा लिटर दूध देऊ लागली. ही सर्व आमच्या बंदी छोड सद्गुरूंची कृपा आहे, पण अशाप्रकारेच आमच्या शेजारांच्या चार-पाच म्हशी दगावल्या आहेत.

माझा सगळ्यात लहान मुलगा १४ वर्षांचा आहे. त्याचे नाव नवनीत आहे. त्याला बालपणीच (सहा महिन्यांचा असताना) निमोनिया झालेला होता. त्याच्यामागे पाच वर्षे हे दुखणे लागले होते. मी शक्य ते सर्व प्रयत्न केल्यानंतर आणि डॉक्टरांनी मनाई केल्यानंतरही मी हार मानली नाही. एक दिवस मी त्याला सतगुरुदेव रामपालजी महाराज यांच्याकडून नामदीक्षा मिळवून दिली आणि त्या दिवसापासून असे वाटू लागले की माझ्या मुलाला कोणताच आजार

झालेला नव्हता. आता तो त्याच्या समवयस्क सर्व मुलांपेक्षा तंदुरुस्त आहे. हे सर्व चमत्कार आमचे सतगुरुदेव रामपालजी महाराजांच्या असीम कृपेने झालेले आहेत.

एक दिवस पौर्णिमेच्या सत्संगावेळी २००४ मध्ये पाऊस न पडल्याने आमची भात शेती वाळू लागली होती. पाटाच्या पाण्याची पाळी देखिल येऊन गेलेली होती. त्यानंतर एक महिन्याने पुन्हा पाटाचे पाणी मिळणार होते. आम्ही फक्त मोसमी पावसावर हवाला ठेवून होतो.

परंतु पौर्णिमेच्या सत्संग समाप्तीनंतर आम्ही आश्रमातून जेव्हा शेत पाहण्यास गेलो, तेव्हा आमची अडीच एकर शेती गुडघाभर पाण्याने भरलेली होती. हे कधी स्वप्नामध्येही न होणारे कार्य आमच्या सतगुरुदेवांच्या कृपेनेच झाले आणि शेजारचे सर्व शेतकरी हळहळून म्हणू लागले की हा पाणीपुरवठा तुमच्या सतगुरुदेवांनी तुमच्यासाठी आणि केवळ तुमच्यासाठीच आणलेला आहे. सर्व शेतकऱ्यांचे जास्तीत जास्त दहा मन धान्याचे उत्पादन झाले, तर सतगुरुदेवजींच्या कृपेने आमचे एकरी चाळीस मन धान्याचे उत्पादन झाले.

असे अनेक प्रकारचे सुख आमच्या बंदी छोड सतगुरु रामपालजी महाराजांनी आम्हाला दिलेले आहे. माझे आणि माझ्या परिवारातर्फे आपणा सर्व वाचकांना प्रार्थना आहे की आपण अतिशीघ्र सतलोक आश्रम, करौंथा अथवा बरवाला येथे येऊन पूर्ण संत सतगुरु रामपालजी महराजजींकडून मोफत नामोपदेश घ्यावा. आपले मनुष्य जीवन व्यर्थ घालवू नका. कबीर परमेश्वर म्हणतात की

कल करे सो आज कर, आज करे सो अब।
पल में प्रलय होएगी, बहुर करोगे कब।।

सत साहेब! जय बंदी छोड। सतगुरु रामपालजी महाराज की जय!

## ''उद्ध्वस्त परिवार समृद्ध झाले''

मी भक्त रमेश, पुत्र श्री उमेदसिंह, गाव पेटवाड, तहसील हांसी, जिल्हा हिसार येथील रहिवासी आहे. आता एम्पलॉईज कॉलनी, जेलसमोर, जिंद येथे सहपरिवार राहत आहे.

नामोपदेश घेण्यापूर्वी आम्ही भुतांची पूजा करत होतो. आमच्या गावी बाबा सरीया यांचा चांगलाच बोलबाला होता. तेथे आम्ही प्रत्येक पौर्णिमेला ज्योत लावण्यासाठी जात होतो. शुक्रवार, जन्माष्टमी, शिवरात्री आदी व्रते देखिल आम्ही करत होतो. पिंडदान आणि श्राद्ध देखिल घालत होतो. तरीही आमचे घर पूर्णपणे उद्ध्वस्त झाले होते. जेव्हा मी बारा वर्षाचा होतो, तेव्हा माझे वडील वारले. माझ्या घरामध्ये तीन सदस्य होते. त्या तिघांचीही आपापसात भांडणे व्हायची. तिघांनाही भूत-प्रेत अत्यंत दु:खी करत असे आणि तिघेही गंभीर आजारी पडत होतो. सुरवातीला डॉक्टरांना दाखविले, परंतु काहीच फरक पडला नाही. नंतर मांत्रिकांजवळ गेलो. एखादा मांत्रिक म्हणायचा, मला पाच हजार रुपये द्या, मी तुम्हाला पूर्णपणे बरे करतो, तर कोणी म्हणायचा दहा हजार रुपये द्या.

आम्ही पूर्णपणे उद्ध्वस्त झालो होतो, परंतु काहीच इलाज चालत नव्हता. माझ्या कौथकला गावातील एक नातेवाईक रघुवीर सिंह यांच्या वारंवार सांगण्याने माझ्या आईने १९९६ मध्ये संत रामपालजी महाराजांकडून नामोपदेश घेतला. माझ्या पत्नीला पाच वर्षांत मुलबाळ झाले नव्हते. माझ्या आईच्या सांगण्यावरून माझ्या पत्नीने देखिल संत रामपालजी महाराजांकडून नामोपदेश घेतला. त्यानंतर वर्षाच्या आतच तिला पुत्रप्राप्ती झाली. माझा देवावरील विश्वास पूर्णपणे उडलेला होता. त्यामुळे मी नामोपदेश घेतलेला नव्हता आणि माझ्या

आई व पत्नीला देखिल संत रामपालजी महाराजांकडे जाण्याला मज्ज्ञाव करत होतो. माझा मुलगा पंधरा दिवसांचा असताना खूप आजारी पडला. डॉक्टर म्हणाले की हे बाळ सकाळपर्यंत जगणार नाही. त्यापेक्षा तुम्ही त्याला घेऊन जावा. संध्याकाळी एका भक्ताने जिंद येथील आश्रमात बंदी छोड सतगुरु रामपालजी महाराज आल्याचे सांगितले. ते पूर्ण संत आहेत आणि तेच या बाळाला बरे करू शकतात. आम्ही डॉक्टर आणि मांत्रिकांकडे जाऊन थकलो होतो. माझा परमात्म्यावरचा विश्वास उडाला होता. मी त्या भक्ताला नकार दर्शविला, परंतु त्याने पुन्हा विनंती केली की स्वतः बंदी छोड भगवानच धरतीवर आलेले आहेत. जर त्यांनी दया केली, तर हे बाळ बरे होऊ शकते. त्या भक्ताने एवढ्या विश्वासाने सांगितल्यावर मी माझ्या आईला बाळाला रामपालजी महाराजांकडे घेऊन जाण्यास अनुमती दिली. माझ्या आईने मुलाला सतगुरु रामपालजी महाराजांच्या चरणी ठेवले आणि अंत:करणपूर्वक प्रार्थना केली की महाराजजी, हे बाळ मृत्यू पावल्यासारखेच आहे. आता केवळ आपणच त्याला वाचवू शकता. बंदी छोड सतगुरु रामपालजी महाराज म्हणाले की कबीर परमेश्वरांच्या कृपेने या बाळाला बरे वाटेल. दुसऱ्याच दिवशी सतगुरु रामपालजी महाराजांच्या कृपेने मृत्यूच्या जबड्यात गेलेले ते बालक ठीक झाले. बोला, बंदी छोड, सतगुरु रामपालजी महाराज की जय!

आमचे उद्ध्वस्त झालेले घर बंदी छोड सतगुरु रामपालजी महाराजांच्या कृपेने पुन्हा बहरले. एवढा साक्षात्कार पाहून देखिल मी पाप कर्माच्या प्रभावाने नामोपदेश घेतला नाही आणि पूर्वीप्रमाणेच पूजापाठ, भुतांची पूजा करत राहिलो. आमच्या घरी बंदी छोड गरीब दास जी महाराज यांच्या अमृतवाणीचे पारायण संत रामपालजी महाराज करत होते आणि मी बाहेर जाऊन मद्यपान करत असे. वर्षभरानंतर आमच्या घरी पारायण चालू असताना संध्याकाळी बंदी छोड सतगुरु रामपालजी महाराज यांनी सत्संग केला, तेव्हा मी सत्संग ऐकला आणि नामोपदेशही घेतला. त्यानंतर आमच्या घरी दु:ख नावाची गोष्टच राहिली नाही. माझ्या आईने कोणाच्या तरी सांगण्यावरून नामजपात खण्ड पाडला. काही कालानंतर सन २००० मध्ये माझ्या आईच्या पायांची अचानक आग होऊ लागली. डॉक्टरांना दाखविले असता त्यांनी ब्लड कॅन्सर झाल्याचे सांगितले. ती दहा–पंधरा दिवसांत मरून जाईल. तिला चंदीगढ येथील पी.जी.आय. दवाखान्यामध्ये घेऊन जावे. तेथे तुम्हाला दीड लाख रुपये लागतील आणि तरीही ती जास्तीत जास्त एका वर्षापर्यंत जीवित राहू शकेल, परंतु वेदना कमी होणार नाहीत. बंदी छोड सतगुरु रामपालजी महाराजांनी सांगितले की आपल्या आईने नामजपामध्ये खण्ड पाडलेला आहे. विजेचे बिल भरले नाही, तर वीज कनेक्शन तोडतात. विजेपासून मिळणारा लाभ बंद होतो. तो पुन्हा चालू करायचा झाल्यास बिल भरावे लागते. माझ्या आईने आपल्या चुकांबद्दल क्षमायाचना केली. महाराजजींनी पुन्हा दुसऱ्यांदा नामोपदेश दिला आणि डोक्यावर हात ठेवला. त्यांनी डोक्यावर हात ठेवताच तिच्या पायाची जळजळ व वेदना नष्ट झाल्या. त्यानंतर जवळजवळ दोन वर्षांनंतर तिची दाढ काढली, पण दाढ काढल्यानंतर रक्तस्राव थांबला नाही. डॉक्टरांनी बरीच औषधे दिली आणि टाके देखिल घातले, परंतु रक्तस्राव थांबत नसल्याने डॉक्टरांनी पुन्हा तपासणी केली आणि सांगितले की हिला ब्लड कॅन्सर आहे आणि आता तो फुटलेला आहे. आता हा आजार बरा होऊ शकत नाही. त्यापेक्षा तुम्ही हिला घरी घेऊन जावे. रक्तस्राव थांबत नसल्याने ती जास्तीत जास्त दोन दिवस राहील. दुसऱ्या दिवशी लघवी व शौचातूनही रक्त पडायला सुरवात झाली. मी सतगुरु रामपालजी महाराजांना फोनवरून सांगितले की डॉक्टरनी तिची दोन दिवसांची खात्री दिली आहे. सतगुरु रामपालजी महाराज म्हणाले की बंदी छोड जे काही करतील, ते ठीक करतील. दुसऱ्या रात्री दोन वाजता यमदूत

आईला नेण्यासाठी आले. माझी आई म्हणू लागली की तुझे आठ-दहा वर्षांपूर्वी मरण पावलेले पिता मला नेण्यास आलेले आहेत. ती एवढे म्हणत असतानाच यमदूताने मातेच्या शरीरात प्रवेश केला आणि म्हणू लागला की आता मी हिला घेऊन जाणार आहे. हिचा आयुष्याचा कालावधी पूर्ण झालेला आहे. आईद्वारे यमदूताने चहा पिण्याची इच्छा व्यक्त केली. आम्ही त्याच्यासाठी चहा बनविण्यास ठेवला. एवढ्यात तो म्हणू लागला की तुमच्या घरांमध्ये कोणती मोठी शक्ति आहे, हे मला समजेना. ती मला मारत आहे. मी येथे आणखी थांबू शकत नाही. मला लवकर चहा द्या. मी जात आहे. त्याने गरम गरमच चहा पिला. जाताना तो म्हणू लागला की तुमच्या घरात तर पूर्ण परमात्मा उभे ठाकले आहेत. मी हिला घेऊन जाऊ शकत नाही, असे म्हणतच तो निघून गेला. एक मिनिटात तिचा रक्तस्राव बंद झाला. तिची काली पडलेली जीभ आणि दात पूर्वीसारखे साफ झाले आणि बंदीछोड सतगुरु रामपालजी महाराजांच्या कृपेने आई पूर्ववत बरी झाली. परमात्मा कबीर साहेबजींनी माझ्या आईचे पाच वर्षे आयुष्य वाढवून दिले. या कालावधीत तिच्या तब्येतीची कोणतीही तक्रार नव्हती. २४ जुलै २००५ रोजी तिने सत्य भक्ती करून सतलोकी प्रस्थान केले. बोला बंदी छोड सतगुरु रामपालजी महाराज की जय, सतसाहेब!

## ''किडनी ठीक केली आणि सैतानाला मनुष्य बनविले''

मी भक्त जगदीश, पुत्र श्री प्रभुराम, गाव पंजाब-खोड, दिल्ली-८१ येथील रहिवासी डी.टी.सी.मध्ये (दिल्ली ट्रान्स्पोर्ट कॉर्पोरेशन) मॅकेनिक आहे. मी मद्यपान करून राक्षस वृत्तीचा बनलो होतो. मला दारू पिणे, मांस खाणे, सिगारेट ओढणे, हुक्का पिणे आदी वाईट सवयी लागल्या होत्या.

मी नोकरीवरून संध्याकाळी सात-आठ वाजता घरी यायचो. अनेक वेळा जास्त दारू प्यायल्यानंतर रात्रीचे नऊ-दहा देखिल वाजत असत. दारूच्या नशेमध्ये मी वेड्यासारखा एकदा इकडे, एकदा तिकडे लडखडतच घरात घुसत होतो. घरी आल्यावर पत्नी, मुलांना मारहाण सुरू व्हायची. प्रत्येक दिवशी घरामध्ये असा कहर मांडलेला असायचा. ज्या मुलांना प्रेमाने पोटाशी धरले पाहिजे, तीच निरागस मुले मला पाहून कॉटखाली लपायची. आपले बाबा घरी येताना खाऊ घेऊन येतील, या आशेने मुले माझी वाट पाहत असत आणि मी त्यांना खाऊ देण्याऐवजी दारूच्या नशेत रागवत असे, मारत असे.

दुसरीकडे माझी धर्मपत्नी सुमित्रादेवी आपल्या दु:खदायक जगण्याबरोबर भयानक रोगाशी झुंज देत होती. तिच्या दोन्ही किडन्या खराब झालेल्या होत्या. डॉक्टरांनी सांगितले होते की औषधे वेळेवर घेत राहा. तरीही ती सहा महिन्यांपेक्षा जास्त जगणार नाही. ऑल इंडिया मेडिकल आणि डॉ. राम मनोहर लोहिया हॉस्पिटल, दिल्ली येथील रिपोर्टमध्ये देखिल किडन्या खराब झाल्याने ती सहा महिन्यांपेक्षा अधिक काल जीवित राहू शकणार नाही, तसेच तिला शेवटपर्यंत औषधे देखिल नियमित घ्यावी लागतील, अशीच नोंद होती. त्या निरागस बालकांचे काय हाल होत असतील? त्यांचे वडील मद्यधुंद अवस्थेत आणि आई मृत्युशय्येवर. थोड्याफार कष्टाचे काम देखिल तिच्या हातून होत नव्हते. जेव्हा त्या मुलांना माहीत झाले की आपली आई थोड्याच दिवसांची सोबती आहे, तेव्हा त्या मुलांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत असत. इकडे वडील मद्यपी आणि तिकडे आई जीवघेण्या व्याधीने पीडित. आमचे भवितव्य काय? मुलगा आणि कन्या आपल्या आईजवळ बसून रडत असत. ते म्हणायचे की हे भगवान, आम्हा सर्वांना देखिल आमच्या मातेबरोबर तुझ्याकडे बोलवून घे. इथे कोणाच्या आधारावर

जगायचे?

परमात्म्याने आम्हा असहाय बालकांची हृदयापासूनची आर्त हाक ऐकली आणि आमचे शुभकर्म उदयास आले. आमच्या शेजारी राहणाऱ्या भक्तमती निहालीदेवी यांनी गुरुदेव संत रामपालजी महाराज यांच्या आज्ञेनुसार ३० व ३१ डिसेंबर १९९६ आणि १ जानेवारी १९९७ रोजी सतगुरु गरीब दास जी महाराजांच्या अमृतमयी वाणीसह तीन दिवसांचा अखण्ड पाठ आपल्या घरी केला. त्यामध्ये संत रामपालजी महाराज यांनी ३१ डिसेंबर १९९६ रोजी रात्री ९ ते ११ या वेळेत सत्संग/प्रवचन केले. माझी धर्मपत्नी, सुमित्रादेवी देखिल सत्संग ऐकण्यासाठी गेली. थोड्या वेळाने मी कामावरून घरी आलो. मुलांकडून समजले की त्यांची आई शेजारी माई निहालीदेवी यांच्या घरी सत्संग ऐकण्यासाठी गेलेली आहे. हे ऐकून मी अत्यंत क्रोधित झालो आणि म्हणालो की कुठल्या पाखण्ड्याजवळ गेलेली आहे? मी आताच जाऊन तिला मारतच घरी आणतो. या विचारातच मी भक्तमती निहालीदेवींच्या घरी गेलो. मी दारू प्यायलेलो होतो. जेव्हा मी निहालीमाईच्या घरी पोहोचलो, तेव्हा संत रामपालजी महाराज सत्संग करत होते. अनेक भक्तजन सत्संग ऐकत होते. त्या सर्वांना पाहून मी काही बोललो नाही आणि गप्पगुमान सर्वांच्या मागे बसलो. मी सत्संग ऐकला. सत्संगामध्ये महाराजजींनी सांगितले की :-

शराब पीवैं कडवा पानी, सत्तर जन्म श्वान के जानी।  
गरीब, सो नारी जारी करैं, सुरापान सो बार।  
एक चिलम हुक्का भरैं, डूबैं काली धार ।।  
कबीर, मानुष जन्म पाय कर, नहीं भजैं हरि नाम।  
जैसे कुआ जल बिना, खुदवाया किस काम ।।

महाराजजींनी सत्संगामध्ये सांगितले की ज्या मुलांना पित्याने पोटाशी धरले पाहिजे, ती मुले मद्यपी बापाला पाहून कॉट खाली जाऊन लपतात. दारू पिणारी व्यक्ति स्वतः देखिल दु:खी होते. तिच्याकडून धनहानी होते. समाजामध्ये तिची कोणतीही पत राहत नाही. तो आपला परिवार, शेजारीपाजारी आणि नातेवाइकांना देखिल त्रास देऊन त्यांच्याकडून शाप प्राप्त करून घेतो. दारूड्याची पत्नी, मुले तर त्याच्या त्रासाचे शिकारीच होतातच, पण त्याचबरोबर आई-वडील, बंधू-भगिनी देखिल रात्रंदिवस या चिंतेने ग्रासले जातात. या सर्व पापाचा भार त्या अज्ञानी, मूर्ख दारूड्याच्या माथी पडतो. मनुष्य जन्म हा प्रभूची भक्ति करून आत्मकल्याण करून घेण्यासाठी दिलेला आहे. तो मद्यपानासारख्या व्यसनांत नष्ट करू नये. एखादा मुलगा शाळेत शिक्षण न घेता फक्त वाईट वस्तीतच फिरत असेल, तर तो शिक्षणापासून वंचित राहतो. नंतर आयुष्यभर मजुरी, काबाडकष्ट करत राहतो. तेव्हा त्याला वाटते की जर मी देखिल गुंडगिरी केली नसती, तर आज माझ्या सहकाऱ्यांसारखा एखादा उच्च अधिकारी झालो असतो, परंतु आता तो विचार करून काय उपयोग? याचा विचार तर त्याच वेळी करायला पाहिजे होता. आता ती वेळ निघून गेली आहे.

कबीर साहेब म्हणतात की -

अच्छे दिन पीछे गये, गुरू से किया न हेत।  
अब पछतावा क्या करे, जब चिडियाँ चुग गई खेत ।।

अशाप्रकारे जर मनुष्य जन्मामध्ये एखादा प्रभुभक्ति करत नसेल, तर तो पशु-पक्ष्यांच्या योनीत जन्म घेतो. ती व्यक्ति मद्यपान करते, ती नशेमध्ये भरलेल्या ताटाला लाथ मारते.

भक्तिच्या अभावाने भिन्न भिन्न योनींमध्ये कष्ट सहन करते. कधी तरी तो कुत्र्याची योनी धारण करतो. थंडी असली तरी देखिल रात्रभर कुत्र्याला गल्लीत पडून राहावे लागते. ऊन, वारा, पाऊस, थंडी हे सारे महाकष्ट त्याला सहन करावे लागतात. सकाळी उठल्यावर पोटातली आग सतावते. त्या नादात तो कोणाच्या घरातील स्वयंपाकघरामध्ये घुसण्याचा प्रयत्न करतो. तेथील सदस्य त्याला लाकडाने किंवा दगडांनी मारतात. वेदना सहन करत तो बराच वेळ ओरडत राहतो. नंतर दुसऱ्या एखाद्या घरामध्ये घुसतो. तेथे भाकरी मिळणार की लाकडाचा मार, याची त्याला कल्पना नसते. तेथेही मार मिळाला, तर तो कुत्रा (मद्य पिणारा जो आता कुत्रा बनला आहे.) गावाच्या बाहेर जातो. भुकेने व्याकुळ झाल्यामुळे मनुष्यांची विष्ठा खातो. तो अज्ञानी, मूर्ख प्राणी जेव्हा मनुष्य शरीरामध्ये होता, तेव्हा त्याला सत्संग घडला असता, त्याने चांगले विचार ऐकले असते, वाईट गोष्टींचा त्याग करून आपले कल्याण करवून घेतले असते, तर तो अखण्ड सुखी झाला असता आणि मुलांना भक्तिमार्गाला लावून चांगले शिक्षण दिले असते, चांगले संस्कार केले असते, तसेच प्रभुदीक्षेचा लाभ मिळवून दिला असता, तर तो अखण्ड सुखी झाला असता. मद्याची नशा काही वेळापर्यंत राहते, पण परमात्म्याच्या नामस्मरणाने, भजनाने मिळालेल्या सुखाचा आनंद नेहमी सोबतच राहतो.

आदरणीय संत रामपालजी महाराजांचे हे अमृतवचन ऐकून माझे मद्याचे व्यसन छूमंतर झाले. डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. घरी आलो, पण झोप लागली नाही. एक जानेवारी १९९७ रोजी दुपारी दीड वाजता माझ्या पत्नीसह संत रामपालजी महाराजांजवळ गेलो. त्यांच्याकडून आत्मकल्याणासाठी नामोपदेश प्राप्त करवून घेतला. त्यानंतर आजपर्यंत (२००५) दारू, तंबाखू, तसेच मांस यांना स्पर्श देखिल केलेला नाही. माझ्या पत्नीने देखिल सतगुरु रामपालजींकडून नामोपदेश घेतला. त्या दिवसापासून आजतागायत ती पूर्णपणे स्वस्थ आहे. डॉक्टरांकडून घेतलेले उपचार, तसेच व्याधीचे एक्स-रे रिपोर्ट आज देखिल आम्ही तसेच ठेवलेले आहेत. येणाऱ्या प्रत्येकाला आम्ही ते प्रत्यक्षात दाखवतो.

माझी सर्वांना हीच प्रार्थना आहे की तुम्ही देखिल प्रभुंच्या चरणी या, संतरूपामध्ये आलेल्या परमेश्वराच्या संदेशवाहक संत रामपालजी महाराजांना ओळखा. मोफत नामोपदेश प्राप्त करून कृपया आपले कल्याण करवून घ्या. सतसाहेब!

– भक्त जगदीश.

## ''भूत व रोगग्रस्त परिवारास समृद्ध केले''

भक्तमती अपलेशदेवी, पत्नी श्री रामेहर, पुत्र श्री स्वर्गीय मॉंगेराम, गाव-मिरच, तहसील-चरखी दादरी, जिल्हा-भिवानी (हरियाना) येथील रहिवासी.

मी अपलेशदेवी माझ्या दु:खी जीवनाची एक झलक आपणास सांगत आहे. मी आणि माझी मुले राहुल व ज्योती. आम्हाला भूतकाळातील वाईट अनुभव आठवले की खिन्न होऊन जातो. त्या घटनांचे वर्णन करताना हृदय पिळवटून निघते.

माझे पती ड्यूटीवर असतानाच ६ डिसेंबर १९९५ च्या रात्री गुंडांनी त्यांची हत्या केलेली होती. परंतु पूर्ण परमात्म्याने (कबीर साहेब) आमच्यावर कृपा केल्याने माझ्या पतींना जीवनदान मिळाले. त्यामुळे आज आमच्या पूर्ण परिवाराला बंदी छोड सतगुरु रामपालजी महाराजांच्या दयेने पूर्ण परमात्म्याच्या चरणी स्थान प्राप्त झाले आहे. माझ्या पतीने स्वच्छ कपडे घातल्यावर काही वेळानंतर कंबरेवर जेथे नाडा बांधला जातो तेथे सगळीकडे कपडे रक्ताने माखायचे.

मुलाच्या थुंकीतूनही रक्त पडायचे. मी देखिल वर्षभरापासून हृदयविकाराने अतिशय आजारी पडले होते. यावर मी वर्षभर औषधे घेत होते. माझे पतिदेव दिल्ली पोलिसमध्ये नोकरीला आहेत. माझ्या सर्व शरीरावर फोड, कांजिण्या उठत. घरातील कटकटींमुळे माझे पती रामेहर यांचे मानसिक संतुलन बिघडायचे.

या सर्व त्रासातून मुक्त होण्यासाठी आम्ही सन १९९५ ते जुलै २००० पर्यंत डझन भरापेक्षा जास्त लोभी, लालची गुरूंचे दरवाजे खटखटवले. भारतामधील यमुना, गंगा, हरिद्वार, ज्वालाजी, चामुंडा, चिंतपुरनी, नगर, कोट, बालाजी, मेहंदीपूर, गुडगावची माई, गौरख टिला (किल्ला) राजस्थान आदी अनेक तीर्थस्थानी मुलांसोबत अनेक वेळा जाऊन आलो, परंतु त्यातून कोणताच फरक पडला नाही.

आमच्या परिवाराची स्थिती अशा अवस्थेपर्यंत पोहोचली होती की आम्ही होळी, दिवाळी हे सण देखिल एखाद्या मशिदीमध्ये बसून व्यतित करत होतो.

आम्हाला संत रामपालजी महाराजांद्वारे परमपूज्य कबीर परमेश्वरांना शरण येण्याचा लाभ मिळाल्यामुळे आम्ही अत्यंत नशीबवान आहे. आता ते कालाचे दूत, ते आमच्या रोगांवर ऑल इंडिया हॉस्पिटलमध्ये केले जाणारे उपचार हे सर्व कोठे गेले? सतगुरुदेवांच्या चरणांच्या धुळीपुढे ते टिकू शकले नाहीत.

एका कालची पूजा करण्याऱ्या मांत्रिकाने २५ फेब्रुवारी २००१ ला फोन करून विचारले की अपलेश तुमचेच नाव आहे का? मी होकार देऊन आपण आपले नाव सांगा म्हणाले, तेव्हा तो मांत्रिक म्हणाला, की हा बलवान कोण आहे? तुमचा कोण लागतो? मी म्हणाले की तुम्ही कोण आहात, आपले नाव काय आणि हे सर्व तुम्ही का विचारत आहात? तेव्हा तो मांत्रिक म्हणाला की मुली, तू माझे नाव विचारू नकोस. ते मी सांगू शकत नाही. मी हांसी येथून बोलत आहे. हा बलवान आणि त्याच्याबरोबर एक व्यक्ति माझ्याकडे आले होते आणि ते दोघे तुमच्यावर घाला घालण्यासाठी मला तीन हजार सातशे रुपये देऊन गेले आहेत. माझ्याजवळ तुमचा फोन नंबर नव्हता. तुमची दुरवस्था झाली किंवा नाही हे पाहण्यासाठी मी तुमचा फोन नंबर देखिल बलवानाकडून घेतलेला होता. हे वाईट काम मी रात्रीच्या वेळी केले, परंतु जेव्हा मी झोपायला गेलो, तेव्हा मला श्वेत वस्त्रांमध्ये ज्या गुरूंची तू पूजा करतेस, ते दिसले. त्यांनी मला सांगितले की याचा परिणाम तू स्वत: भोगशील. हा सर्व परिवार सर्वशक्तिमान सर्व कष्ठहरण परमपूज्य कबीर परमेश्वरांना शरण गेलेला आहे. तुझी लायकी काय आहे? येथील धर्मराज देखिल आता या परिवाराचे काही वाकडे करू शकत नाही.

गरीब, जम जौरा जासै डरै, मिटें कर्म के लेख।
अदली अदल कबीर हैं, कुल के सतगुरु एक ।।

परम पूज्य कबीर परमेश्वरजींना यम (काल आणि कालाचे दूत) आणि मृत्यू देखिल घाबरतात. ते पूर्ण प्रभु पापकर्म दंडाचा लेख देखिल समाप्त करतात. त्यानंतर तो मांत्रिक म्हणाला, की, मुली, तुला मी एवढेच सांगतो की तू ज्या देव पुरुषोत्तमाची पूजा करतेस, ते अत्यंत प्रबल शक्तियुक्त आहेत. मी गेली २५ वर्षे हे घाला घालण्याचे काम करत आहे. आजपर्यंत किती परिवार मी उद्ध्वस्त केले आहेत, कुणास ठाऊक, परंतु आज प्रथमच मला पराजय स्वीकारावा लागला. मुली, या शक्तिचा तू त्याग करू नकोस, नाही तर मार खाशील. तुमच्या विनाशासाठी बलवान आणि त्याचे साथीदार फिरत आहेत. मी म्हणाले की आम्ही पूर्ण परमात्म्यांची पूजा करतो आणि बलवान हा माझ्या पतींचा मोठा भाऊ आहे. तो आमचा

जीवघेणा शत्रू बनलेला आहे.

आम्ही आज एवढे नशीबवान आहोत की आम्ही एखादी वस्तू अथवा कार्याची इच्छा व्यक्त केली, तर हे सतगुरुदेव आणि कबीर साहेब ती पूर्ण करतात. आज

गुरू गोविंद दोनों खडे, किसके लागे पाय।
बलिहारी सतगुरुदेव रामपालजी के चरणों में जिन्हे परमेश्वर दिया मिलाय।।

बंधू आणि भगिनींनो, आमचा सर्व परिवार मिळून तुम्हाला संदेश देत आहे की जर तुम्हाला सतलोकीचा मार्ग, पूर्ण मोक्ष व सर्व सुख प्राप्त करायचे असतील आणि सांसारिक दु:खांपासून सुटका करून घ्यायची असेल, तर बंदी छोड संत रामपालजी महाराजांकडून सतनाम प्राप्त करवून घ्यावे आणि आपला अनमोल मनुष्य जन्म सफल करून घावा.

सतसाहेब!

–भक्तमती अपलेशदेवी

## ''भक्त सतीशची आत्मकथा''

मी भक्त सतीशदास, १९३ सेक्टर ७, आर.के. पुरम, नवी दिल्ली येथील रहिवासी आहे. या ओळी आमच्या जीवनाच्या चरितार्थ होतात. कारण सतगुरु बंदी छोड रामपालजी महाराजांचा डिसेंबर १९९७ मध्ये दिल्ली येथील प्रीतमपुरामध्ये सत्संग झालेला होता. तेव्हा आम्ही माझ्या एका मित्राच्या सांगण्यावरून सत्संग ऐकण्यास गेलो, परंतु पारंपरिक पूजेचा त्याग करण्याच्या गोष्टी ऐकल्यानंतर सत्संगामध्ये मन लागले नाही. सतगुरु वारंवार शास्त्र वाचून आम्हाला समजावून सांगत होते, तेव्हा माझ्या मनात आले की पुस्तके (ग्रंथ) आपण घरामध्येच वाचू शकत नाही का? अशाप्रकारे ज्योति निरंजनाने (काल) आमची बुद्धी अयोग्यरीत्या स्थिर केली आणि आमचा भक्तिमार्गाचा स्त्रोतच बंद केला.

सद्‌गुरू आम्हाला समजावत होते की

गुरू बिन किन्हें न पाया ज्ञाना, ज्यों थोथा भूस छडे किसाना।
गुरू बिन भरम ना छूटें भाई, कोटि उपाय करो चतुराई ।।

अशाप्रकारे आमची बुद्धी अयोग्यप्रकारे स्थिर झाल्यामुळे आम्ही इकडच्या तिकडच्या गोष्टी करत घरी परत आलो. सन १९९९ मध्ये माझी पत्नी श्रीमती मंजू हिला ब्रेन ट्युमर (मेंदूचा कॅन्सर) झाला. त्याविषयी आम्हाला सफदरजंग हॉस्पिटलमध्ये चाचण्या घेऊन उपचार करताना समजले. त्यानंतर मी तिला पंत हॉस्पिटल, A.I.I.M.S. नवी दिल्ली, त्यानंतर अपोलो हॉस्पिटल, नवी दिल्ली येथील डॉक्टरना देखिल दाखविले. सर्व डॉक्टर लगेच ऑपरेशन करण्याचा सल्ला देत म्हणाले की ऑपरेशनच्या दरम्यान हिच्या एका हाताला पॅरालेसीस (पक्षाघात) होऊ शकतो. अपोलो हॉस्पिटलमधील डॉक्टरनी रिपोर्ट पाहिल्यानंतर ते असेही म्हणाले की हिचे दोन्ही डोळे अजून शाबूत कसे काय आहेत? त्याच वेळी त्यांनी आय स्पेशालिस्टकडून काही चाचण्या करून घ्यायला सांगितल्या. मी त्या चाचण्या लगेच करून घेतल्या. तेव्हा आय स्पेशालिस्ट आणि न्यूरो सर्जन यांनी सल्ला दिला की प्रत्येक १५ दिवसांनी हिच्या डोळ्यांची तपासणी केली पाहिजे. कारण ब्रेन ट्यूमर अशा जागेवर आहे की तिची दृष्टी केव्हाही जाऊ शकते. माझी पत्नी आणि मी दोन्ही पायांनी विकलांग आहोत आणि आता हात व डोळेच काम देणार नाहीत हे ऐकून आमचा वरचा श्वास वर आणि खालचा खाली राहिला, परंतु याशिवाय

दुसरा कोणता उपायच नसल्याने आम्ही शेवटी पंत हॉस्पिटल, नवी दिल्ली येथे ऑपरेशन करण्याचा निर्णय घेतला. डॉक्टरांच्या सांगण्यानुसार I.N.M.A.S हॉस्पिटल, तिमारपूर, दिल्ली येथून M.R.I चाचणी करवून घेतली. त्याचबरोबर इतरही आवश्यक त्या सर्व चाचण्या करवून घेतल्या. डॉक्टरांकडून केवळ ऑपरेशनची तारीख घ्यायची होती. आम्हाला पूर्ण परमात्मा तत्त्वदर्शी संत रामपालजी महाराजांच्या पूर्वी ऐकलेल्या सत्संगातील ओळी आठवल्या–

जिन मिलते सुख उपजे, मिटें कोटि उपाध।
भुवन चतुर्दश ढूंढियों, परम स्नेही साध ।।

या ओळींचे स्मरण केल्याबरोबर आमचा भक्तिमार्ग परमेश्वराने खुला केला आणि मनामध्ये भावना उत्पन्न झाली की ऑपरेशनपूर्वी नामोपदेश घेऊन पाहावे. त्यानंतर मी आपल्या मित्रांबरोबर प्रीतमपुरा, दिल्ली येथे जाऊन ४ फेब्रुवारी २००१ रोजी पूर्ण परमात्मा तत्त्वदर्शी संत रामपालजी महाराजांकडून नामोपदेश घेतला. पूर्वीचे सर्वप्रकारचे पूजाविधी सोडून दिले. अखण्ड पाठ करण्याचा सल्ला देत सतगुरुजी म्हणाले की परमात्म्याची इच्छा झाली तर ऑपरेशन टळेल आणि सर्वकाही ठीक होऊन जाईल. आम्ही सद्गुरूंच्या आज्ञेनुसार घरामध्ये तीन दिवसांचा अखण्ड पाठ केला आणि त्यानंतर डॉक्टरांकडून ऑपरेशनची तारीख घेण्यासाठी पंत हॉस्पिटल, नवी दिल्ली येथे गेलो. जे डॉक्टर पूर्वी ऑपरेशनचा सल्ला देत होते, तेच डॉक्टर दुसरी एमआरआय चाचणी पाहून म्हणू लागले की आता ऑपरेशनची काहीच आवश्यकता नाही. त्यावेळी सद्गुरूंची वाणी आठवली–

सतगुरू दाता हैं कलि माहिं, प्राण उधारण उतरे सांई।
सतगुरू दाता दीन दयालं, जम किंकर के तोडें जालं ।।

आणि आम्ही सद्गुरूंना आठवून हमसून हमसून रडू लागलो की परमेश्वरा, आम्ही तुमच्या महिमेची कोणत्या शब्दांमध्ये व्याख्या करू. अशाप्रकारे पूर्ण परमेश्वर कबीर साहेबांचे अवतार तत्त्वदर्शी संत रामपालजी महाराज यांच्या कृपेने माझ्या पत्नीचे ऑपरेशन टळले. त्यानंतर आम्हाला एका पैशाचीही औषधे खावी लागली नाहीत. आज आम्ही् सुखमय जीवन जगत आहोत.

२० नोव्हेंबर २००४ च्या रात्री कालाच्या झपाट्याने माझी पत्नी प्राण निघून गेल्यासारखी पडली. तिला परमेश्वरांचे अमृतजल पाजल्यानंतर शुद्ध आली. नंतर आम्ही तिला सतगुरुजींकडे घेऊन गेलो, तेव्हा सतगुरु रामपालजींनी सांगितले की आज हिचा मृत्यू होणार होता, पण कबीर परमेश्वरांनी तिचे आयुष्य वाढवून दिले आहे. आता तिला फक्त भक्ति करायची आहे.

त्यानंतर २२ नोव्हेंबर २००४ रोजी माझ्या पत्नीला सोनीपत येथे सत्संगामध्येच अर्धांगवायूचा झटका (पॅरालेसीस) आला. त्यात तिच्या हातांतील शक्ति नाहीशी होऊ लागली आणि त्याचवेळी तिला सतगुरुजींचा हात आपल्या हातामध्ये दिसू लागला. जवळजवळ पाच मिनिटांपर्यंत हे दिसत राहिले. जेव्हा अर्धांगवायूचा प्रभाव संपला, तेव्हा सतगुरुजींचा हात अदृश्य झाला आणि आजतागायत ती पूर्णपणे ठीक आहे.

सद्गुरू तत्त्वदर्शी संत रामपालजी महाराज, जे कबीर परमेश्वरांचे जसेच्या तसे अवतारात आलेले आहेत, त्यांनी आम्हाला असे सिद्ध करून दाखविले, की–

गरीब जम जौंरा जासे डरें, मिटें कर्म के अंक।

कागज कीरें दरगह दई, चौदह कोटि न चंप ।।

भक्त सतीश मेहरा,
RLF-907/17, राज नगर –II, पालम कालोनी,
नवी दिल्ली. ०९७१८१८४७०४

## ''भक्त रामस्वरूप दासची आत्मकथा''

बंदि छोड कबीर साहेब की जय

मी भक्त रामस्वरूप मंगल राम, बडौली (जि. अंबाला) येथील रहिवासी आहे. मी तेरा वर्षांपूर्वी धन–धन सतगुरू यांच्याकडून नामदीक्षा घेतली होती. सहा वर्षांपूर्वी माझे हात–पाय चेतनाहीन झाले होते. कोणतेही काम करता येत नव्हते. कमरेपासून खाली माझे शरीर लुळे पडले होते. माझे दोन्ही मुलांनी मला अंबाला सरकारी रुग्णालयात घेऊन गेले. त्यानंतर खासगी डॉक्टरनाही दाखविले. उपचारासाठी दोन वर्षे इकडे तिकडे फिरल्यानंतर मला पी.जी.आय. चंदीगढ येथे नेण्यात आले. तेथे ज्या मशीनने तपासण्या केल्या जात होत्या, त्याचा नंबर नोंदणीनंतर एक महिन्याने येत होता. त्यामुळे वर्षभरात फक्त दोन वेळाच तपासणी करण्यात आली. या मशीनद्वारे तपासणीची फी सहा हजार रुपये होती. दोन वेळा तपासणी करूनही आजाराचे निदान झाले नाही. त्यामुळे दोन्ही वेळा माझ्या डोक्यावर शस्त्रक्रिया करण्यास सांगण्यात आले. त्यात माझ्या जीवालाही धोका होता आणि शस्त्रक्रियेनंतर मी पूर्णपणे निरोगी होईन, याची खात्री नाही, असे सांगण्यात आले. त्यानंतर माझे कुटुंबीय मला बाबा रामदेव यांच्या योगाश्रमात घेऊन गेले. तेथे काही दिवस उपचार केल्यानंतरही काहीच फरक पडला नाही. त्यामुळे मला परत घरी नेले. पंजाब, हरियाणा येथील काही मांत्रिकाकडे नेले, तरीही अवस्था तशीच होती. आता आपले आयुष्य काही दिवसांचेच शिल्लक आहे, असा मी विचार केला. सर्व बाजूंनी निराशाच पदरी पडल्यानंतर माझ्या शाहपूर (अंबाला) येथील मुलीने मला तिच्या सासरी बोलवून घेतले. माझे जावई संजू यांनी कुकू–भगत यांच्याविषयी सांगितले, जे १५ ऑगस्ट २००८ रोजी मला बरवाला आश्रमात सतगुरू बंदिछोड रामपाल दासजी महाराजांकडे घेऊन गेले. १६ ऑगस्ट २००८ रोजी मी नामदीक्षा घेतली आणि मला आराम पडू लागला. गुरुजींच्या कृपेने मी आमच्या शेतात ट्रॅक्टर चालवला आणि शेतीची सर्व कामे करू लागलो. पूर्ण संत रामपालजी महाराजांच्या आशीर्वादाने मला जीवदान मिळाले. महाराज बंदिछोड यांनी आमच्यावर जी कृपा केली आहे, ती मी शब्दांत व्यक्त करू शकत नाही. गुरुजी, मला जीवदान देण्यासाठी आपण सतलोकातून आला आहात. आपल्या चरणी माझे कोटी कोटी दंडवत प्रणाम.

भक्त रामस्वरूप दास
गाव बडौली (जि. अंबाला)

## ''भक्तमती तारा कट्टावर असीम कृपा''

बंदिछोड सतगुरु रामपालजी महाराजांच्या चरणी कोटी–कोटी दंडवत प्रणाम. मी जयपूर येथील रहिवासी तारा कट्टा संस्कृतमधून एमए झाली आहे. राजस्थान युनिव्हर्सिटीमधून मला बीए संस्कृतमध्ये सुवर्णपदक मिळाले आहे. मी सहा लेखकांचे गीता, उपनिषद, पुराण व सारे दर्शन शास्त्र आणि सर्व गुरुंची प्रवचने ऐकली. परंतु समाधान मिळाले नाही. एकदा

जयपूरमध्ये भास्कर भक्ती चॅनलवर सतगुरु रामपालजी महाराजांचा कार्यक्रम पाहिला आणि ३० नोव्हेंबर २००३ रोजी नामोपदेश घेतला. त्यावेळी आजारपणाने मी खूप त्रासले होते. मे १९९१ मध्ये माझी बायोपसी चाचणी केल्यावर मला अल्सरेटिव्ह कोलाईटीस (Ulcerative Colitis) नावाचा आजार झाल्याचे सांगण्यात आले. या आजारात मोठ्या आंतड्याला फोड येतात आणि लघवीवाटे रक्त पडते. यावर कोणताच उपाय नाही, असे मला डॉक्टरनी सांगितले. ३ जून २००२ पर्यंत माझ्या आंतड्यात ७५ सेंटिमीटर एवढा अल्सर वाढला. १० एप्रिल २००८ रोजी गुरुजींच्या सांगण्यावरून मी औषध बंद केले. या औषधात अशा चार गोळ्यांचा समावेश होता की डॉक्टरनी सांगितलेले जिवंत राहायचे असेल तर आयुष्यभर या गोळ्या खाव्या लागतील. २३ एप्रिल २००४ रोजी माझ्या फुफ्फुसात इन्फेक्शन झाले. डॉक्टरांकडे गेल्यावर ते म्हणाले, तुम्हाला असा आजार झाला आहे, ज्यामध्ये तुम्हाला ताप यायला पाहिजे, वजन आणि रक्त कमी झाले पाहिजे. परंतु तुम्ही तर एकदम स्वस्थ आहात. मी म्हणाले, ही तर माझ्या सतगुरु रामपालजी महाराजांची कृपा आहे. माझ्या कर्माप्रमाणे माझ्यावर संकटे येत राहणार आहेत. पण माझे गुरुदेव या संकटांना माझ्यार प्रभाव पाडू देत नाहीत. अशाप्रकारे आपल्या भक्तांचे परमात्मा रक्षण करतात. त्यामुळे डॉक्टर खूपच प्रभावित झाले. जानेवारी २००९ मध्ये गुरुजींच्या कार्य प्रसारासाठी जायचे होते. रात्रभर रक्ताची धार लागली होती. सकाळी विचार केला, मरायचेच आहे तर प्रसार करत करत मरू. तिसऱ्या दिवशी औषधाशिवाय ठीक झाले. डॉक्टरनी सांगितले होते, शरीर स्वास्थ्यासाठी कोर्टीसन स्टेरॉईड (Cortisone Steriod) दररोज घ्यावेच लागेल. परंतु सतगुरु रामपालजी महाराजांच्या सांगण्यावरून मी सगळी औषधे सोडली होती. मी एकही औषध घेतले नाही, तरीही आता मी सतगुरु रामपालजी महाराजांच्या दयेने पूर्णपणे ठीक आहे. इतका जुना आजार गुरुदेवांना शरण आल्यावर पूर्ण बरा झाला. माझे एवढेच सांगणे आहे की सत्यज्ञान आणि सत्य भक्तीचा पृथ्वीवर असा दुसरा कोणताच मार्ग नाही. सतगुरु रामपालजी महाराज साक्षात पूर्ण परमात्मा आहेत. सतसाहेब.

सद्‌गुरूंच्या चरणी दंडवत प्रणाम,
भक्तमती तारा कट्टा
फोन नं. ०९७७२३१२३३५

## ''गुरुकृपेची महिमा''

मी त्रिलोक दास बैरागी ढीमरखेडा (जिल्हा कटजी, मध्य प्रदेश) येथील रहिवासी आहे. मी दि. २७ जून २०१० रोजी नामोपदेश घेतला. जेव्हा नामोपदेश घेतला तेव्हा हा केवळ नामोपदेश नसून, अमृत आहे हे मला माहीत नव्हते. माझे सांगणे तुम्हाला अतिशयोक्ती वाटेल. परंतु गुरुदेवांच्या चरणांची शपथ घेऊन सांगतो की यामध्ये मी जे अनुभव घेतले किंवा माझ्यासमोर जे काही घडले, त्यावरून माझ्या बाबतीत असे चमत्कार घडतील याची मी कल्पनादेखील केली नव्हती. नामोपदेश घेतल्यानंतर सहा महिन्यांनी पाच मुलींनंतर झालेला माझा मुलगा आजारी पडला होता. सलग एक महिना एमबीबीएस डॉक्टरकडून उपचार करूनही काही फरक पडत नव्हता. एके दिवशी सकाळी नऊच्या सुमारास त्याने डोळे झाकले आणि बेशुद्ध पडला. त्याला घेऊन लगेच उमरियापान येथे गेलो. त्याची तब्येत बघून तेथील डॉक्टरनी उपचार करायला नकार दिला. तेथून त्याला सिहोरा येथे नेले. सगळीकडे एमबीबीएस डॉक्टर होते. पण मुलग्याची अवस्था बघून कोणीही इलाज करायला तयार

होईना. जणू त्यांचे सांगणे होते की मुलग्याचा मृत्यू झाला आहे. त्यावेळी तो फक्त एक वर्षाचा होता. एका डॉक्टरने त्याला ऑक्सिजन दिला तर काहीतरी होऊ शकेल, असे सांगितले. मी लगेच एक चार चाकी गाडी ठरवली आणि जबलपूरला घेऊन गेलो. तेथे लहान मुलांवरील रिसर्च सेंटर आहे. मुलग्याची अवस्था पाहून तेथील डॉक्टरांनीही सांगितले की तो काहीच हालचाल करत नाही, सुई टोचलेली देखिल त्याला समजत नाही. त्याला उपचारासाठी दाखल करून घेणे माझ्यासाठी रिस्क आहे. मी सांगितले, त्याला दाखल करून घेऊन तुम्ही उपचार सुरू करा. बाकी सगळे परमात्म्यावर सोडा. डॉक्टर म्हणाले, जर याला सहा तासांत शुद्ध आली तर तो वाचू शकेल. अन्यथा अशक्य आहे. सकाळी नऊ वाजल्यापासून रात्रीचे नऊ वाजायला आले, तरी तो शुद्धीवर आला नव्हता. माझी पत्नी आणि मी रडू लागलो. अचानक माझे लक्ष 'ज्ञान गंगा' आणि 'भक्तीच्या सौदागरास संदेश' या पुस्तकांमधील भक्तांबाबत घडलेल्या चमत्कारांकडे गेले. मी स्वत:ला सावरले आणि गुरुचरणी लीन झालो. म्हणालो, गुरुजी, माझ्या मुलाचे रक्षण करा आणि गुरुमहिमेवर असलेला माझा विश्वास आणखी दृढ करा. रात्री सुमारे बारा वाजता डॉक्टर तपासायला गेले, तेव्हा त्यांनी मुलग्याची तब्येत कशी आहे विचारले. मी म्हणालो, जशी सकाळी होती तशीच आहे. डॉक्टरनी एक इंजेक्शन मागवून घेतले आणि मुलग्याच्या कमरेत दिले. त्याबरोबर जणू काही गुरुजींनी इंजेक्शन दिल्यासारखा मुलगा रडू लागला. त्या परिस्थितीत एक आनंदाची लहर पसरली. डॉक्टरनी माझ्या डोक्यावर हात ठेवला आणि म्हणाले, आता तुमचा मुलगा शुद्धीवर आला आहे. अशा परिस्थितीत शुद्धीवर येण्याचे मुलांचे प्रमाण अतिशय कमी आहे.

विचार करण्यासारखी गोष्ट ही आहे की इंजेक्शन दिल्यानंतर पंधरा-वीस मिनिटांनी परिणाम दिसू लागतो. पण माझा मुलगा इंजेक्शन टोचल्याबरोबर रडू लागला. हा सर्व कबीर परमेश्वराचाच चमत्कार आहे, हे यावरून स्पष्ट होते.

'सतगुरू शरण में आने से आई टलै बला, जै भाग्य में मृत्यू हो कांटे में टल जा'

गुरुजी सांगतात की आंतरिक तळमळीने मंत्रजप केल्याने चमत्कार घडतात. मी अचंबित झालो होतो. मी रुग्णालयातच गुरुजींच्या चरणांची प्रार्थना केली आणि आभार मानत रडू लागलो. डॉक्टरनी सांगितले, याच्यावर सलग आठ दिवस उपचार करण्याची गरज आहे आणि दिवसाचा खर्च पाच हजार रुपये होता. मी म्हणालो, डॉक्टर, आम्हाला सकाळी डिसचार्ज द्या. डॉक्टर म्हणाले, अहो, आता कुठे तो शुद्धीवर आला आहे. तुम्ही त्याला घरी नेले तर त्याचा मृत्यू होऊ शकतो. मी म्हणालो, जे होईल ते होईल, आम्हाला डिसचार्ज द्या. आता मुलग्याला डिसचार्ज घेऊन सहा महिने झाले आहेत, तरी त्याला कधी साधा ताप देखिल आलेला नाही. अशी गुरुमहिमा पाहून मी धन्य झालो आहे. हालाखीच्या परिस्थितीमुळे माझी सायकल घ्यायचीही हिंमत होत नव्हती. अचानक एक दिवस स्टेट बँकेच्या मॅनेजरने तुम्हाला कर्ज पाहिजे काय, असे विचारले. मी म्हणालो, मिळाले तर आनंदच आहे. त्यातून माझी परिवारिक स्थिती सुधारेल. बँक मॅनेजरने मला दीड लाख रुपये कर्ज दिले. सायकल खरेदी करू न शकणारा माणूस अचानक ५५ हजार रुपयांची हिरोहोंडा मोटारसायकल घेऊन आला. आज मी अभिमानाने गाडीवरून फिरतो. मी सरकारी शाळेत शिपाई होतो. सोळा वर्षे नोकरी झाली तरी घरची परिस्थिती हालाखीची होती. जबलपूर विभागात प्रमोशन निघाले आणि मी शिपायाचा लिपिक झालो. गावाच्या खुर्च्या पुसणारा माणूस स्वत: साहेब बनून खुर्चीत बसला. मी कल्पनाही करू शकत नाही, इतका माझा पगार वाढला. माझा लहान भाऊ बीएडसाठी प्रयत्न करून नाराज होऊन बसला होता. एक दिवस अचानक

त्याला कौन्सिलिंग लेटर आले. बीएड करण्यासाठी ३३ गुण आवश्यक होते. त्याला २९ गुण मिळाले होते आणि त्यावेळी २८ गुण मिळालेल्यांना प्रवेश देण्यात येणार होता. यावर त्याचा विश्वास बसेना. २९ गुण असल्यामुळे त्याला संधी मिळाली आणि तो आता बीएड करत आहे. हे चार चमत्कार असे घडले, ज्यांच्याबद्दल मी कधी विचारही केला नव्हता, मला रामायणातील ओळी आठवल्या– 'माता–पिता, गुरू की वाणी, विना विचार करो शुभ जानी' हे सगळे चमत्कार एक वर्षात घडले. त्याचे पुरावे म्हणजे

१ – भारत हॉस्पिटल सेंटरची सर्व कागदपत्रे

२ – गाडीची कागदपत्रे

३ – प्रमोशनची ऑर्डर

४ – बीएडचे कौन्सिलिंग लेटर

हे सर्व चमत्कार नामोपदेश घेतल्यानंतर सहा महिन्यांत घडले. परंतु केवळ नामोपदेश घेऊन फायदा होत नाही, तर गुरुजींनी सांगितलेला मार्ग आचरणात आणावा लागतो.

'हरि रूठै गुरु ठौर है, गुरू रूठै नही ठौर'

गुरुजींच्या चरणी शिष्याचे अनुभव सादर समर्पित

भक्त त्रिलोक दास बैरागी

सहा ग्रेड–३ शासकीय उच्च माध्यमिक विद्यालय,

मुरवारी, तहसील–ढीमरखेडा, जिल्हा, कटनी (मध्यप्रदेश)

## ''११००० व्होल्टच्या वीज वाहिनीपासून सुटका''

मी भक्त सुरेश चाँदराम दास धनाना (जि. सोनीपत, सध्या रा. शास्त्रीनगर, रोहतक, हरियाणा) येथील निवासी आहे. सतगुरुजींकडून नामोपदेश घेण्यापूर्वी आमची आर्थिक स्थिती खूप हालाखीची होती. आमच्या परिवारातील एकही सदस्य असा नव्हता, जो कधी आजारी नाही. माझी पत्नी भूत–प्रेत बाधेने हैराण झाली होती. एवढी संकटे असूनही आम्ही देवदेवतांची मनापासून पूजा करत होतो. माझी तर हनुमानावर खूप श्रद्धा होती. तरीही घरावर संकटांमागून संकटे येत होती. कोणत्याही कामात यश मिळत नव्हते. पूर्ण परमात्मा सतगुरु रामपालजी महाराज आमच्याच परिवारातील असल्यामुळे आम्ही त्यांच्याकडे परमात्मा म्हणून पाहत नव्हतो. याचे परिणाम आम्हाला अनेक वर्षे भोगावे लागले. सिंहपुरा गावातील विकास नावाचा एक भक्त मला म्हणाला की तुमच्या घरी पूर्ण परमात्मा जगतगुरू रामपालजी महाराज आले आहेत आणि तुम्ही झोपला आहात. मी म्हणालो की 'काल'ने आमच्या मागे एवढे कष्ट लावले आहेत की आम्हाला त्याबाबत विचार करायलाही वेळ मिळत नाही. सगळा वेळ डॉक्टरांकडे चकरा मारण्यातच निघून जातो. त्यात पैशाची चणचण असते. भक्त विकासने मला खूप समजावून सांगितले. पूर्ण परमात्म्याची अशी कृपा झाली की संत रामपालजी महाराजांकडून नामोपदेश घेण्यासाठी मी ऑक्टोबर २०१० मध्ये सतलोक आश्रम, बरवाला येथे पोहोचलो. नामोपदेश घेतल्यानंतर सद्गुरूंनी आपल्या दयेची पोथडी खोलली आणि मला असे सुखानुभव मिळू लागले, ज्यांचे मी शब्दांत वर्णनही करू शकत नाही.

माझ्या पत्नीला भूत–प्रेत त्रास देत होते. पण आता सद्गुरूंच्या कृपेने मी पूर्णपणे ठीक आहे. माझा बारा वर्षांचा मुलगा मोहित ७ सप्टेंबर २०११ रोजी मी सांगितले म्हणून मेस्त्रीला

बोलवायला गेला होता. तो मेस्त्रीच्या घराच्या छतावर चढला आणि सज्ञात आला. सज्जावरून ११००० व्होल्टची वीज वाहिनी गेली होती. माझा मुलगा आणि वीज वाहिनी यांच्यात केवळ एक फुटाचे अंतर होते. जेव्हा तो तारेच्या जवळ गेला, तेव्हा वीज प्रवाहाने त्याला ओढून घेतले आणि तारेचा त्याच्या डोक्याला स्पर्श झाला. तेथे एक इंचाची जखम झाली. त्याच्या तोंडाला फेस आला आणि शरीरात उतरलेला वीज प्रवाह पायाचा अंगठा फोडून बाहेर पडू लागला. त्याचवेळी सतगुरु रामपालजी महाराज आकाशमार्गाने तेथे आले आणि माझ्या मुलग्याला हजारो दिव्यांच्या प्रकाशासारखे चमकदार तेजोमय सशरीर दिसू लागले. त्यांनी माझ्या मुलाचा हात पकडला आणि विजेपासून त्याची सुटका करून सज्ञावर झोपवले. त्यानंतर मुलग्याने गुरुजींशी खूप गप्पागोष्टी केल्या. जेव्हा सतगुरु तेथून जाऊ लागले, तेव्हा मुलग्याने गुरुजी, कोठे जात आहात, असे विचारले. सतगुरु म्हणाले की बेटा, घाबरू नकोस. मी तुझ्याबरोबरच आहे. त्यावेळी मोहितची आईदेखील तेथे होती. मुलाच्या शरीरातून विजेचे झोत बाहेर पडत असलेले पाहून तीही खूप घाबरली होती.

त्यानंतर आम्ही मुलग्याला पीजीआय रोहतक हॉस्पिटलमध्ये घेऊन गेलो. तेथेही त्याला गुरुजी दिसले आणि तो गुरुजी माझ्याबरोबर आहेत. तुम्ही घाबरू नका, असे सांगू लागला. आम्ही जर गुरुजींना शरण गेलो नसतो, तर आमचा मुलगा आम्हाला जिवंत दिसला नसता आणि माझी पत्नी भूतबाधेने केव्हाच मरून गेली असती. आम्ही पूर्ण वाताहत होण्यापासून वाचलो, ही सतगुरु रामपालजी महाराजांची कृपा आहे.

वाचकांना विनंती आहे की माझी सत्यकथा वाचल्यानंतर तुम्हीही सतगुरु रामपालजी महाराजांना शरण येऊन वेळ जाण्यापूर्वी आपले कल्याण करा. प्रारब्धात लिहिलेल्या कर्मामुळे ज्या घटना घडतात, त्यांच्यापासून तुमची पूर्ण सुटका होईल. सतगुरु बंदिछोड आपल्या सर्व पापांचा नाश करतात. असाच पुरावा ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलाच्या १६१ व्या सुक्तातील दुसऱ्या मंत्रामध्ये आणि नवव्या मंडलातील ८० व्या सुक्तातील दुसऱ्या मंत्रामध्ये आला आहे. त्यात म्हटले आहे की जर एखाद्या रोग्याची प्राणशक्ती क्षीण झाली असेल अथवा त्याचे आयुष्यही शिल्लक राहिलेले नसेल तर त्याच्या प्राणांचे रक्षण करेन आणि त्याला शंभर वर्षांचे आयुष्य प्रदान करून म्हणजे साधकाचे आयुष्य वाढवून त्याला सर्व सुख प्रदान करतो.

सज्जनहो, सतगुरु रामपालजी महाराजांनी आपल्या अमृत वचनांमध्ये असेही सांगितले आहे की प्रत्येक प्राण्याला त्याने केलेल्या कर्मानुसारच सुख-दुःखे प्राप्त होतात. दुःख हे पापकर्माचे फळ आहे आणि सुख हे पुण्यकर्माचे फळ आहे. आतापर्यंत सर्व संत, आचार्य, गुरू हेच सांगत आले आहेत की जे प्रारब्ध कर्माचे भोग आहेत, ते प्रत्येक प्राण्याला भोगून संपवावे लागतात. सभ्य वाचकहो, सतगुरु रामपालजी महाराज म्हणतात की पापकर्मामुळे दुःख होते. जर पापकर्माचाच नाश झाला तर दुःखांचाही आपोआपच शेवट होतो. जर भक्ती करत असूनही पापकर्माचे फळ, दुःख भोगावे लागले, तर भक्तीची आवश्यकताच संपून जाते. आमचा मुलगा मोहित याचा ७ सप्टेंबर २०११ रोजी प्रारब्ध कर्माच्या पापामुळे मृत्यू अटळ होता. पण आमचे सतगुरु रामपालजी महाराजांच्या कृपेने परमपूज्य कबीर परमेश्वरांनी आमच्या पापाचा नाश केला आणि माझ्या मुलाचे रक्षण करून त्याचे आयुष्य वाढवले. जर ७ सप्टेंबर २०११ रोजी प्रारब्ध कर्माच्या फलस्वरूप आमच्या मुलावर मृत्यू ओढवला असता, तर आमच्या संपूर्ण परिवाराने भक्तिमार्गाचा त्याग केला असता आणि नास्तिक बनले असते. कारण त्यावेळी आम्हाला पूर्ण परमात्म्याचे ज्ञान नव्हते. आता देवावर पूर्ण विश्वास बसला आहे आणि परमपूज्य कबीरजी हेच परमेश्वर आहेत, हा दृढविश्वास निर्माण झाला आहे. ते पापनाशक, सर्व सुखदायक आणि पूर्ण

मोक्षदायक आहेत आणि सतगुरु रामपालजी महाराज हे त्यांनी पाठवलेले अवतार आहेत. त्यामुळे तुम्हाला पुन्हा प्रार्थना करतो की विनाविलंब बरवाला येथील सतलोक आश्रमात जाऊन नामोपदेश घ्या आणि आपले कल्याण करा. माझ्यासारखे अनेक जण दु:खी आहेत, त्यामुळेच तुम्हाला प्रार्थना करण्याचा माझा उद्देश आहे. माझी ही आत्मकथा वाचून तेही आपल्या संकटांचे निवारण करू शकतील आणि सुखी होऊ शकतील.

यह संसार समझदा नाही, कहंदा शाम दोपहरे नूं।
गरीबदास यह वक्त जात है, रोवोगे इस पहरे (समय) नूं ।।

प्रार्थी – भक्त सुरेश चाँदराम दास
शास्त्रीनगर, हिसार बायपास, रोहतक.
मोबाईल नं. ०९८२९५८८६२८

## ''परमात्माने जिवन दान दिले''

मी भक्त विषंभर दास गाव गीतौर, जिल्हा भिण्ड, मध्यप्रदेश चा रहिवासी आहे. मी सदगुरू रामपाल जी महाराज यांसकडून दोन वर्षांपासून नाम उपदेश (अनुग्रह) घेतला आहे. माझी मुलगी साधना ही एक महिन्यापासून खूपच गंभीर स्वरुपात आजारी होती. तिच्या पोटात गैस (वायू) बनत होता. ज्यामुळे पोट वारंवार फुगत होते तसेच पाय व डोक्यात दुखत असत. कित्येक वेळा तर घसा देखील बंद होत होता. एकदा तर मुलीचा घसा इतका बंद झाला की आठ दिवसापर्यंत तर पाणी देखील पिता नाही आले. मी माझ्या मुलीचा उपचार डॉ महेश्वर यांसकडून केला कि जे ग्वालियर चे सर्वात मोठे डॉक्टर आहेत. पाच दिवसापर्यंत माझी मुलगी दवाखान्यात दाखल राहिली परंतु तिला एक टक्का देखील फरक पडला नाही. परत मी माझ्या मुलीला ग्वालियरचे दुसरे डॉक्टर P.C. Jain यांच्याकडे दाखल केले. तीन दिवस माझी मुलगी तेथे दाखल राहिली. तिला उलट्या–जुलाब, पोट दुखणे, डोके दुखणे खूप जोरात होऊ लागले. तीने तीन दिवसापर्यंत काहीच खाल्ले व पिले नाही. आमचा पूर्ण परिवार मुलीचा हा गंभीर आजार पाहून रडू लागला. आम्ही रडत रडत आमचे परमेश्वर सदगुरू रामपाल जी महाराज यांची आठवण काढली. नंतर रात्री जवळपास १२ च्या सुमारास सदगुरू रामपाल जी महाराज यांनी माझ्या मुलीला दर्शन दिले व सांगितले की आज पासून तुझ्या शरीरात हा आजार नाही राहणार. एवढे म्हणताच मुलीने गुरुदेवांसमोर दंडवत प्रणाम केला व त्याच वेळी तीने संध्या आरती म्हणण्यास सुरुवात केली व पूर्ण आरती केली. हि लीला पाहून दवाखान्याचा संपूर्ण कर्मचारी वर्ग एकत्र झाला व परमेश्वराची हि लीला पाहू लागले व म्हणाले कि किती मोठी कृपा केली तुमच्या गुरुदेवांनी. दुसऱ्या दिवशी सकाळी ९.३० वाजता डॉक्टरांनी येऊन मुलीचा चेकअप केला व चेकअप झाल्यावर डॉक्टर आश्चर्यचकित झाले व म्हणाले कि मुलीला तर रात्रीच मरून जायला पाहिजे होते. परंतु आत्ता तर तिच्या शरीरात किंचित देखील आजार नाही आहे. हे सर्व पाहून संपूर्ण दवाखान्यात चर्चेचा एकच विषय बनला. आज माझी मुलगी १०० टक्के व्यवस्थित आहे. चांगल्या प्रकारे जेवण खात पीत आहे तिच्या शरीरात कोणताच रोग नाही.

हे सर्व सदगुरू रामपाल जी महाराज यांच्याच कृपेने झाले जे परमेश्वर कबीर साहेब यांचेच रूप आहे. जो पर्यंत ह्या पृथ्वीवर आमचे श्वास चालू राहतील तो पर्यंत आम्ही आमच्या सदगुरू रामपालजी महाराजजींच्या लीलांचे असेच गुणगान करत राहणार.

।।सत साहेब ।।

भक्त विशम्भर दास
गाँव–गीतौर, तहसील–मेहगाँव
जिल्हा भिण्ड, (M.P.)
Mob :- 9926297456

## ''उध्वस्त परिवार एकत्र झाला''

मी भक्त रमेश पित्याचे नांव श्री उमेद सिंह, गाव–पेटवाड़, तालुका हांसी, जिला हिसार येथे कारागृहास्मोरील एम्पलॉईज कॉलोनी, मध्ये कुटुंबासोबत राहतो.

दीक्षा घेण्यापूर्वी आम्ही भूतांची पूजा करत होतो. आमच्या गावात बाबा सरियाला मान्यता होती व तिथे आम्ही दर महिन्याच्या पौर्णिमेला जोती पेटवण्यासाठी जात असू. आम्ही शुक्रवार, जन्माष्टमी, शिवरात्रीचे व्रतसुद्धा करत होतो. पितरांना पिंड दान करून त्यांचे श्राद्धही करत होतो. तरीसुद्धा आमचे घर बिल्कुल ओसाड झाले होते. जेंव्हा मी बारा वर्षांचा होतो, तेव्हा माझ्या वडिलांचा मृत्यू झाला. घरात तीन जण होते, तिघेही आपसात भांडत असत. तिघानाही भूत–प्रेतबाधेने दुःखी केले होते आणि तिघेही अतिशय आजारी असत. आधी डॉंक्टरांना दाखवले पण काहीच आराम मिळाला नाही. मग आम्ही मांत्रिकाकडे गेलो, कोणी म्हणायचा तुम्ही ५००० रूपये द्या, तुम्हाला एकदम बरे करीन. कोणी म्हणायचा तुम्ही १०००० रूपये द्या, तुम्हाला एकदम बरे करीन.

आम्ही बिलकुल उघडे पडलो होतो. परन्तु काहीही समाधान नव्हते. माझे नातेवाईक भक्त रघुबीर सिंह गाव कौंथ कलां, यांनी वारंवार सांगितल्यावर माझ्या आईने सन् १९९६ मध्ये संत रामपालजी महाराजांची दीक्षा घेतली. माझ्या पत्नीला पाच वर्ष होऊन सुद्धा कोणतेही अपत्य झाले नव्हते. माझ्या आईने सांगितल्यावरून माझ्या पत्नीनेसुद्धा संत रामपालजी महाराजांकडून दीक्षा घेतली. दीक्षा घेतल्यावर एका वर्षात माझ्या पत्नीने मुलाला जन्म दिला. माझा देवावरच विश्वास उडाला होता. त्यामुळेच मी दीक्षा घेतली नव्हती आणि आपल्या आई व पत्नीला सुद्धा संतजीकडे जाण्याची परवानगी देत नसे. माझा पंधरा दिवसांचा मुलगा खूप आजारी पडला. डॉक्टरांनी सांगितले की हा मुलगा सकाळ पर्यंतच जगेल, त्याला घेऊन जा. संध्याकाळी एका भक्ताने बन्दी छोड़ सतगुरु रामपालजी महाराजांच्या विषयी सांगितले की ते जिंद येथे आले आहेत आणि ते पूर्ण संत आहेत. आम्ही डॉक्टर आणि मांत्रिकांच्या कडे जाऊन कंटाळलो होतो. माझा देवावरील विश्वासच उडाला होता. तरीही त्या भक्ताला मी नाही म्हटले. परंतु त्याने पुन्हा विनंती केली की ते स्वतः बन्दी छोड़ परमेश्वर च पृथ्वीवर आलेले आहेत. जर त्यांनी दया केली तर हा मुलगा वाचू शकतो. त्या भक्ताने इतका विश्वास दिल्यावर मी आपल्या आईला परवानगी दिली. माझी आई मुलाला घेऊन सतगुरु रामपालजी महाराजांच्या चरणी ठेवले आणि रडतच विनंती केली की महाराज हा मुलगा मेलेलाच आहे. आता आपणच ह्याला ठीक करू शकता. तेव्हा संकटमोचक सतगुरु रामपालजी महाराजांनी सांगितले की परमेश्वर कबीरजींच्या कृपेने तो बरा होईल. दुसऱ्या दिवशी जो मुलगा मरायचा होता, तो बरा झाला.

आमचे उध्वस्त झालले घर संकटमोचक सतगुरु रामपालजी महाराजांच्या कृपेने परत एकत्र आला. इतका चमत्कार पाहूनसुद्धा पाप कर्मांमुळे मी त्यांची दीक्षा घेतली नाही आणि पूर्वीच्याच भुतांच्या पूजा करत राहिलो. आमच्या घरी संकटमोचक शास्त्रानुकूल भक्तिने भक्तांचे झालेले लाभ गरीब दास जी महाराजांच्या वचनांचा पाठ संत रामपालजी महाराज करत असत

आणि मी बाहेर जाउन दारू पीत असे. नंतर एक वर्षाने एक दिवस आमच्या घरी पाठ सुरु होता तेव्हा संध्याकाळी संकटमोचक सतगुरु रामपालजी महाराजांनी सत्संग केला. तेव्हा मी सत्संग ऐकला आणि दीक्षा घेतली. नंतर आमच्या घरात दुःख नावाची चीजच उरली नाही. माझ्या आईने कोणाच्या तरी सांगण्यावरून नामजप थांबविला. काही दिवसांच्या नंतर सन् २००० मध्ये माझ्या आईच्या पायात अचानक आग व्हायला लागली. डॉक्टरांना दाखविले, तेव्हा त्यांनी सांगितले की रक्ताचा कर्करोग आहे. ही दहा–पंधरा दिव्संच्यावर जगणार नाही. जर पीजीआय मध्ये चण्डीगढ़ला घेऊन गेलात तर तिथे दीड लाख रूपये खर्च येईल, दुखणेही कमी होईल पण तरीसुद्धा त्या एक वर्षाच्या वर जगणार नाहीत. संकटमोचक सतगुरु रामपालजी महाराजांनी सांगितले की तुमच्या माताजींनी नामजप बंद केला आहे. जसे विजेचे बिल न भरलयास ते जोडणी बंद करतात आणि मग वीज पुरवठा बंद होतो. तो पुन्हा नीट व्यवस्थित सुरु करावा लागतो. माझ्या आईने आपली चूक मान्य केली, क्षमा याचना केली. महाराजांनी परत दीक्षा दिली आणि डोक्यावर हात ठेवला. डोक्यावर हात ठेवताच पायात आग होणे आणि दुखणे बंद झाले. मग जवळपास दोन वर्षांच्या नंतर पाय बधीर होऊन हाडातून रक्त बाहेर येऊ लागले. डॉक्टरांनी औषध दिले आणि टांके सुद्धा घातले, परन्तु रक्त यायचे काही बंद होत नव्हते. मग डॉक्टरांनी परत तिच्या आजाराची तपासणी केली आणि सांगितले की ह्यांना रक्ताचा कर्करोग आहे आणि आता तो सगळीकडे पसरला आहे. आता ह्या बऱ्या होणे अवघड आहे. ह्यांना घरी घेऊन जा. हे रक्त निघाल्याने दोन दिवसात मरण पावतील. मग दुसऱ्या दिवशी त्यांच्या लघवी आणि संडासच्या जागेतून सुद्धा रक्त यायल सुरवात झाली. तेव्हा मी सतगुरु रामपालजी महाराजांना फोनवरून सांगितले की डॉक्टरांनी सांगितले आहे की ह्या दोन दिवसांच्या सोबती आहेत. तेव्हा सतगुरु रामपालजी महाराजांनी म्हटले की संकटमोचक जे करतील ते योग्यच असेल. मग दुसऱ्या दिवशी रात्री दोन वाजता यमदूत त्यांना घेण्यासाठी आले. माझ्या आईने म्हटले की तुझे वडील (ते दहा वर्षांपूर्वीच वारले होते) मला घ्यायला आले आहेत. असे म्हणत तो यमदूत माझ्या आईच्या शरीरात शिरला आणि म्हणू लागल की मी आज हिला घेऊनच जाणार. हिची वेळ झालेली आहे. मला चहा द्या. तेव्हा आम्ही त्याच्यासाठी चहा ठेवलाच होता, तेवढ्यात तो यमदूत म्हणू लागला की माहित नाहीं पण तुमच्या घरात कोणतीतरी मोठी शक्ती आहे, ती मला मारते आहे. मी इथे आणखी थांबू शकत नाही. मला लवकर चहा द्या. मी चाललो आणि गरम चहा पिऊन गेला. जातेवेळी म्हणू लागला की तुमच्या घरी पूर्ण परमात्मा आले आहेत. मी हिला नाही नेऊ शकत असे म्हणत निघून गेला. एक मिनटाने रक्त बिल्कुल बंद झाले, काळे झालेले जीभ आणि दात बिल्कुल साफ झाले आणि संकटमोचक सतगुरु रामपालजी महाराजांच्या कृपेने ती आधीसारखीच बरी झाली. परमात्मा कबीर साहेबजींनी माझ्या आईचे आयुष्य पाच वर्षाने वाढविले. सत्य भक्ति करुन सतलोक प्रस्थान केले.

भक्त रमेश दास

मोबाईल नं. ७४०४४३८००

## ''सतगुरुदेवजींच्या अमृतमय दयेचा वर्षाव''

बंदि छोड सतगुरु रामपाल जी महाराज की जय

माझे नाव श्याम दास (श्याम सापकोटा) आहे. मी मधवलिया -८ कोटिहवा, रुपन्देही, नेपाळ येथील रहिवासी असून नेपाळ सरकारचे उपसचिव (Under Secretary) पदावर भू आणि जलधार संरक्षण विभाग, ववरमहल, काठमांडू, नेपाळ येथे कार्यरत आहे. शके २०६०/८/९२ पर्यंत नोकरीचा कार्यकाळ आहे. मी अनेक रोगांनी त्रस्त असल्यामुळे 'ओम' मंत्राचा जप आणि ध्यान करत होतो. ओम शांतीचे (ब्रह्माकुमारी राजयोग) सात दिवस मार्गदर्शनही घेतले होते. परंतु दवाखाना काही सुटला नव्हता. ध्यान करताना श्रीगणेश, ब्रह्मा सावित्री, विष्णु-लक्ष्मी, शिव-पार्वती, वेगवेगळे मानव, जनावरे आणि जंगल, नदी-नाले आदी चित्रे दिसत होती. तरीही माझ्या रोगांची संख्या वाढतच गेली. जे रोग मला जडले होते त्यांचे वर्णन खाली दिले आहे.

१) मेनिया- मी सायकियॅट्रीक होऊन दोन वेळा दवाखान्यात दाखल झालो होतो. दोन्ही वेळा अनेक प्रकारच्या गोळ्या दिवसातून तीन वेळा खाव्या लागत होत्या.

२) हात कापणे- माझे दोन्ही हात थरथर कापत असल्यामुळे मी सही देखिल व्यवस्थित करू शकत नव्हतो.

३) दृष्टिदोष- माझ्या चष्म्याचा नंबर (-) २.५ होता.

४) मूळव्याध- दोन तीन वर्षे या रोगाने आजारी होतो. आयुर्वेदिक आणि होमिओपॅथिक औषधे घेतल्यावर थोडे बरे वाटायचे. पण पुन्हा रक्तस्राव सुरू व्हायचा.

५) युरिक ॲसिड- दोन्ही गुडघ्यांच्या सांध्यामध्ये तीव्र वेदना होत होत्या. यावर आयुर्वेदिक आणि ॲलोपॅथिक औषधेही घेतली होती.

६) गॅस्ट्रिक- सुरुवातीला छाती आणि पोटात आग व्हायची. सुकामेवा, तेलकट, चहा किंवा थंड काहीही खाल्ले की लगेच जळजळ सुरू व्हायची. सहन होत नसल्यामुळे ॲलोपॅथिक औषधे खात होतो.

७) पोटफुगी- माझे पोट सुटल्यामुळे चालताना लगेच थकवा यायचा. चढ असल्यावर तर पाच मिनिटेही चालायला चमत नव्हते. हे आजार आणि घरच्या अनेक समस्यांनी मला हैराण करून सोडले होते.

एकदा मी माझी सासरवाडी ४-बाणगंगा, कपिलवस्तू येथून घरी येत होतो. तेव्हा हायवे नं. ४, ४ बाणगंगा, कपिलवस्तू, नेपाळ येथे 'ज्ञान गंगा' पुस्तकाचा प्रचार-प्रसार सुरू होता. माझ्या पत्नीने एक पुस्तक घेतले. मी ते पुस्तक दोन-तीन वेळा मन लावून वाचले. त्यातील संस्कृत श्लोकांसंबंधित वेद आणि श्रीमद् भगवत गीता त तुलना करण्यासाठी इंटरनेटवर शोध घेऊन परीक्षण करण्याचाही प्रयत्न केला. मला हे ज्ञान खूपच आवडले. त्यामुळे एप्रिल २०१२ मध्ये सतलोक आश्रम, चंदीगड रोड, बरवाला (जिल्हा हिसार, हरियाणा) येथे जाऊन जगद्गुरू तत्त्वदर्शी रामपालजी महाराजांकडून मंत्रदीक्षा घेतली आणि २ नोव्हेंबर २०१२ रोजी सतनाम मंत्रदीक्षा घेतली.

आता मी मेनिया रोगावर **Lithium-400 mg** ही ॲलोपॅथिक गोळी फक्त संध्याकाळी एक घेतो. परमेश्वराच्या कृपेने आता मला सायक्रोटिक सिम्टम नाही आणि माझे हातही थरथरायचे बंद झाले आहेत. आता मी चांगल्या अक्षरात लिहू शकतो. आता मला चष्माही

वापरावा लागत नाही. काहीही वाचायचे झाले तर चष्म्याची गरज भासत नाही. पाच–सहा महिन्यांपासून मूळव्याधीचा कोणताही त्रास नाही. युरिक ॲसिडवर औषधे खाणे आणि मसाज करणे बंद केले आहे. एकदा माझ्या छातीत आणि पोटात खूपच जळजळ होऊ लागली. मी २९ जानेवारी २०१३ रोजी रात्री जगद्गुरू तत्त्वदर्शी संत रामपालजी महाराजांचे स्मरण केले आणि सद्गुरूंचा एक पाय माझ्या छाती आणि पोटावरून फिरताना दिसला. थोड्या वेळाने माझ्या छाती आणि पोटातील जळजळ पूर्णपणे थांबली. त्यासाठी मला कोणतेही औषध खावे लागले नाही.

माझे सर्व भक्त आत्म्यांना निवेदन आहे की तुम्ही पवित्र पुस्तक 'ज्ञान गंगा' आणि 'धरतीवर अवतार' श्रद्धेने वाचा आणि परमात्म्याचे तत्त्वज्ञान समजून घेऊन सतलोक आश्रम, चंदीगढ रोड, बरवाला (जिल्हा हिसार, हरियाणा) येथे येऊन नामदीक्षा घेऊन आत्मकल्याण करा आणि रोग, शोक, चिंता आदी सर्व दु:खांचा नाश करून या जन्मी सुस्वास्थ्य आणि सुख–समृद्धी प्राप्त करून आपली सत्यभक्ती पूर्ण करून आपले निजधाम सतलोक (जेथून आपण आलो आहोत) पुन्हा प्राप्त करा.

।।सतसाहेब ।।

– भक्त श्याम दास

## ''सत कबीर यांची दया''

बंदि छोड सतगुरु रामपाल जी महाराज की जय

मी श्याम कुमार लोटन यादव, वॉर्ड नं. ५, कचुडी, धनुषा येथे राहायला आहे. मी इलेक्ट्रिकल इंजिनिअर असून नेपाळमधील बतौर विद्युत प्राधिकरण विभाग, काठमांडू येथे उपप्रबंधकपदी कार्यरत आहे. मी श्याम कुमार माझ्या पूर्वीच्या दु:खी जीवनाची झलक तुम्हाला सांगू इच्छितो. आजही पूर्वीचा वाईट काल आठवल्यावर माझ्या अंगावर शहारा येतो आणि कालीज फाटू लागते.

मी सायन्सचा विद्यार्थी असल्यामुळे पूर्वी नास्तिक प्रवृत्तीचा होतो. मी इंजिनिअर झाल्यावरही त्यात काही फरक पडला नव्हता. मौजमस्ती करणे हेच जीवन समजत होतो. परंतु ३४ वर्षांचा असतानाच मला मधुमेह झाला. त्यामुळे माझ्या मेंदूची क्रयशक्ती कमी झाली आणि मी चिंताग्रस्त जीवन जगू लागलो. त्यानंतर एक अशी घटना घडली की मी आध्यात्मिकतेकडे झुकू लागलो. मी दाड जिल्ह्यात सेवारत होतो, तेव्हा एक अजब घडना घडली. एका बसमध्ये माओवादी आणि सशस्त्र नेपाळी सैनिकांमध्ये गोळीबार झाला. त्यात माझ्या एका मित्राच्या डोक्यात गोळी लागून मागील बाजूने बाहेर पडली. गोळीबारात अनेक लोक मारले गेले. परंतु ज्या मित्राला डोक्यात गोळी लागली होती, त्याच्यावर लखनौमध्ये उपचार केल्यावर तो वाचला होता. लखनौवरून परतल्यावर आम्हाला समजले की त्यावेळी ज्या व्यक्तीच्या हातापायात गोळ्या लागल्या, तिचा मृत्यू झाला. त्या दिवशी हे जग चालवणारी कोणती तरी अदृश्य शक्ती आहे यावर माझा विश्वास बसला आणि देवाची जाणीव झाली. परंतु ती शक्ती कशी मिळवायची, हे मला माहीत नव्हते.

त्याच वेळी ओम शांती पासून मी भक्तिसाधना सुरू केली. त्यानंतर योगी विकाशनंदजी, स्वातीजी, रामदेवजी महाराज यांच्याकडून ज्ञान घेऊन दोन वर्षे योग साधना केली. दिल्लीच्या कुमारस्वामी महाराजांकडे नियमित पैसे पाठवून त्यांची विशेष कृपा मिळविण्याचाही प्रयत्न

केला. परंतु माझा मधुमेह काही कमी झाला नाही. कोणत्याही मार्गाने परमात्माप्राप्तीचा उपाय माझ्या हाती लागला नाही.

त्याच वेळी 'भक्ती के सौदागर को संदेश' हे पुस्तक माझ्या हातात पडले आणि मी वाचायला सुरुवात केली. ते वाचल्यानंतर ब्रह्माचे वडील कोण आहेत, विष्णुची आई कोण आहे आणि शंकराचे आजोबा कोण आहेत, या प्रश्नांची उत्तरे मिळाली आणि माझे डोके सुंन्न झाले. त्या नऊ दिवसांत 'भक्ती के सौदागर को संदेश' हे पुस्तक मी अनेक वेळा वाचले आणि उत्सुकता लागल्यावर वेबसाईटवर पाहिले आणि मला ज्ञानाची भूक लागली. मी अनेक पुस्तके वाचली. त्यातील 'गहरी नजर गीता ', 'आध्यात्मिक ज्ञान गंगा', 'करौंथा काण्ड का रहस्य' अशी हिंदी पुस्तके दोन वर्षे वाचत राहिलो. संदर्भासाठी श्री देवी पुराण, महाभारत, रामायण, गरुड पुराण, श्रीमद् भगवत गीता ही पुस्तके वाचली आणि त्यातून पुरावे मिळाले. त्यानंतर सतलोक आश्रम, चंदीगढ रोड, बरवाला (जिल्हा. हिसार, हरियाणा) येथे जाण्याची इच्छा होऊ लागली. मला शास्त्राविरुद्ध साधना करायला लावणारे सर्व धर्मगुरू ढोंगी वाटू लागले. त्यामुळे मी सर्व उपासना सोडून दिल्या.

कविर्देवांच्या (कबीर साहेब) कृपेने नेपाळ सरकारच्या कार्यालयीन कामासाठी पंजाबमधील भटिंडा शहरात येण्याची संधी मिळाली. माझी जिंदवरून हिसार येथे जाण्याची इच्छा होती. परंतु त्यावेळी शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू असल्यामुळे जिंदवरून भटिंडा येथे गेलो. तेथून अमृतसरला जाताना आश्रमामध्ये फोन केला आणि आश्रमात जाण्याचा मार्ग विचारून घेतला. अंबाला येथून बसने बरवाला (सतलोक आश्रम) येथे या. तो रस्ता मोकळा आहे, असे त्यांनी सांगितले. परंतु तोपर्यंत आम्ही फार पुढे गेलो होतो. परत कुरुक्षेत्र येथे आलो आणि तेथे तीन साथीदारांना सोडून भाड्याने गाडी करून परमात्मा स्वरूपदूत मला सतलोक आश्रम, बरवाला येथे घेऊन आले. आश्रमामध्ये आल्यावर तेथे नामदीक्षा मोफत दिली जाते आणि खाण्यापिण्याची आणि राहण्याची मोफत व्यवस्था आहे, हे समजले. संत रामपालजी महाराजांकडून नामदीक्षा आणि आशीर्वाद घेऊन कामानिमित्त दिल्लीला गेलो आणि तेथून काठमांडू, नेपाळला गेलो. त्यानंतर तपासणी केल्यावर माझा मधुमेह एकदम नॉर्मल झाला होता. हा परमात्म्याचा (पूर्ण ब्रह्म) चमत्कार दिसला. त्याच दिवशी पूर्ण ब्रह्म परमात्मा स्वत: कबीर साहेबच संत रामपालजी महाराजांच्या रूपात सतलोक आश्रम, चंदीगढ रोड, बरवाला (जि. हिसार, हरियाणा) येथे विराजमान झाले आहेत, याचा मला दृढविश्वास झाला.

त्या दिवसापासून सतगुरु रामपालजी महाराजांच्या कृपेने पूर्ण श्रद्धेने आणि मन लावून मी भक्ती करत आहे. त्यानंतर माझी पत्नी आणि मुलग्याला सतलोक आश्रम, बरवाला येथे घेऊन गेलो आणि त्यांना नामदीक्षा दिली. त्यानंतर एक अद्‌भुत चमत्कार झाला. माझी बदली काठमांडू शहरात झाली आणि नेपाळमध्ये चालू असलेल्या 'ज्ञान गंगा' पुस्तकाच्या प्रचाराच्या कार्यात भाग घेऊ लागलो. हळूहळू भक्त समाजावर सतगुरुजींच्या अमृत दयेचा वर्षाव होऊ लागला. नेपाळमध्ये सतगुरुदेवांच्या ज्ञानाचा प्रसार जोरात सुरू झाला आणि अनेक भक्त सतलोक आश्रमात जाऊन नामोपदेश घेऊ लागले.

मी सर्व बंधू-भगिनी, तसेच भक्त समाजाला हात जोडून विनंती करतो की नकली गुरू, महामंडलेश्वर, स्वामी आदींच्या फंदात न पडता ज्ञान समजून घेऊन विवेकाने निर्णय घेऊन पूर्ण परमात्म्याची भक्ती करण्यासाठी सतलोक आश्रम, चंदीगढ रोड, बरवाला (जि. हिसार, हरियाणा) येथे या. आपला बहुमूल्य वेळ वाया न घालवता लवकरात लवकर नामदीक्षा

(उपदेश) घ्या आणि आपले कल्याण करा. माझी सर्व भक्त समाजाला विनंती आहे की 'धरतीवर अवतार' हे पुस्तक वाचा, CD, DVD बघा आणि साधना चॅनलवर दररोज सायंकाळी ७.५५ वाजता सतसंग ऐका. निरपेक्ष बुद्धीने मनन करा, शास्त्रामधील पुरावे बघा. जे सद्ग्रंथांच्या आधारे सत्यज्ञान सांगतात तेच तत्त्वदर्शी संत असू शकतात. आणि ते तत्त्वदर्शी संत सतगुरु रामपालजी महाराज सतलोक आश्रम, चंदीगढ रोड, बरवाला, (जि. हिसार, हरियाणा) येथे विराजमान आहेत. त्यांच्याकडून नामदीक्षा घेऊन आपला आणि आपल्या परिवाराचा आत्मोद्धार करा.

'कबीर समझा हैतो सिर धर पांव, बहुर नहीं रें ऐसा दांव'

सध्या २१ ब्रह्माण्डांमध्ये एकमात्र जगद्गुरू तत्त्वदर्शी संत रामपालजी महाराजांनाच मोक्ष मंत्र प्रदान करण्याचा अधिकार आहे, जे शास्त्रविधीनुसार साधना सांगतात.

।।सत साहेब ।।

भक्त श्याम दास
काठमांडू, नेपाळ
संपर्क सूत्र +००९७७-९८५१००९०९९

## ''सद्गुरू रामपालजी महाराजांची कृपा''

मी भक्त हरिगोविंद दास गा. वि. स. मिचैंया, वॉर्ड नं. ३, थाना चौक (जिल्हा सिरहा, अंचल जनकपूर, नेपाळ) येथील रहिवासी आहे. माझ्या जीवनात बंदिछोड सतगुरु रामपालजी महाराजांच्या आशीर्वादाने घडलेले चमत्कार शब्दांमध्ये मांडण्याचा प्रयत्न करत आहे.

ज्येष्ठ २१ शके २०६७ (६ जुलै २०१०) रोजी मी आमच्या आमराईतील आंबे उतरत होतो. सुमारे ७ फूट उंचीच्या एका फांदीवर मी उभा होतो. अचानक मी उभा असलेली फांदी तुटली. त्यावेळी मी दुसरी फांदी पकडली. परंतु माझ्या शरीराच्या वजनाने ती फांदीही तुटली आणि मी जमिनीवर आपटलो. शेतातील जमीन भुसभुशीत होती आणि मी फार उंचीवरून पडलोही नव्हतो, तरीही माझ्या मांडीचे हाड तुटले. मला उचलून हाडांच्या स्थानिक डॉक्टरकडे नेले. एक्स-रे काढल्यावर मांडीचे हाड पूर्णपणे मोडल्याचे समजले. मला लगेचच स्ट्रेचरवर झोपवले. डॉक्टर म्हणाले की अशा केसमध्ये लगेच पॅरालेलिस (लकवा) होतो. परंतु आश्चर्य म्हणजे तुम्ही पायाची अजूनही हालचाल करत आहात. रात्री मला रुग्णवाहिकेतून काठमांडूला नेले. तेथे माझा धाकटा मेहुणा डॉक्टर आहे आणि इतरही तज्ज्ञ डॉक्टर आहेत. येताना वाटेत माझ्या पायाची हालचाल होते की नाही, याची माझा मेहुणा सारखी चौकशी करत होता. परंतु माझ्या दोन्ही पायांची हालचाल होत होती. दवाखान्यात पोहोचल्यावर पुन्हा एक्स-रे काढला. मांडीचे हाड तुटूनही माझ्या पायाची हालचाल होत होती, हे पाहून डॉक्टरही आश्चर्यचकित होत होते. कारण मांडीचे हाड तुटल्यावर शक्यतो लकवा मारतो. मी मात्र ठीक होतो. एवढ्या कमी उंचीवरून पडल्यावर मांडीचे हाड मोडत नाही, त्यामुळे माझ्या मांडीच्या हाडात काही दोष आहे का, अशी डॉक्टरांना शंका येऊ लागली. त्यासाठी माझ्या हाडांची वेगळी तपासणी करण्यात आली. पण हाडात कोणताही दोष नव्हता. डॉक्टरांनी मला तीन महिने झोपून राहायला सांगितले. झोपूनच जेवायचे, आंघोळ करायची, तेथेच प्रातःविधी करायचे असा प्रकार सुरू होता. या स्थितीने आपण घोर नरकात जाऊन पडले आहोत, असे मला वाटू लागले. मला रुग्णवाहिकेतून परत घरी नेण्यात आले.

माझे एक सुखी कुटुंब होते. स्थानिक राजकारणाबरोबर मी लहान–मोठे व्यापार करत होतो. माझे आजोबा धार्मिक प्रवृत्तीचे होते. माझे पितृक गाव मनहवी येथील सात गुंठे जमीन दान देऊन त्यांनी राम–जानकी मंदिर बांधले होते. माझे वडील वैष्णव होते आणि पूजापाठावर त्यांचा विशावास होता. मीही वैष्णव होतो. परंतु राजकारणात पडल्यापासून मांस–मच्छी भक्षण करत होतो. माझी पत्नीही मांसाहारी होती. मी स्वतःला खूप सुखी समजत होतो. माझे आदरणीय सासरे (रामचरित्र भक्त + ००९७७–९८४१६८४०६१, ९८०९४३२८८८) हे ऑगस्ट २००८ मध्येच सतगुरु रामपालजी महाराजांचे शिष्य बनले होते. त्यांचे बघून माझ्या पत्नीनेही नामदीक्षा घेतली होती. परंतु मला ते पसंत नव्हते. माझ्या घरात कलह वाढू लागला होता. घरात स्थानिक सण–उत्सव, देवदेवतांची पूजा हे सर्व बंद करण्यात आले होते आणि माझ्या मांस–मच्छी खाण्यातही अडचण येत होती. त्यामुळे मी रामपालजी महाराजांच्या पूर्ण विरोधात गेलो. माझे सासरे जेव्हा मला 'भक्तीच्या सौदागरास संदेश' (सध्याचे नाव ज्ञान गंगा) हे पुस्तक वाचण्याचा आणि सीडी बघण्याचा सल्ला देत, तेव्हा मला खूप वाईट वाटायचे.

झाडावरून पडल्यावर माझ्या घरात गृहदेवता आणि इतर देवदेवतांची पूजा बंद केल्यामुळे अशा घटना घडत आहेत आणि माझ्या या दुर्घटनेला माझे सासरे आणि पत्नी कारणीभूत आहेत, असा मी निष्कर्ष काढला. मी थोडासा तापट स्वभावाचा असल्यामुळे सासऱ्यांना घालून–पाडून बोलू लागलो. कोणतेही कारण नसताना पत्नीशी भांडण काढू लागलो, संत रामपालजी महाराजांबद्दल अपशब्द बोलू लागलो. ही घटना घडल्यानंतर माझ्या जीवनात नैराश्य पसरलेले होते. स्वतःच्या पायांनी मी कधीच चालू शकणार नाही, असे मला वाटू लागले. घरात कमावणारा मी एकटाच आणि व्यापारातही तोटा होऊ लागला होता. अशा नरकयातना भोगण्यापेक्षा मरण बरे, असे मला वाटू लागले. या नैराश्यातून हळूहळू मी माझे जेवणही कमी केले. वास्तविक माझी जेवणावरची वासनाच उडाली होती. परंतु पूर्णब्रह्म सतगुरु रामपालजी महाराजांची लीला काही वेगळीच होती.

दरमन्यान, एक दिवस माझे सासरे आमच्या घरी आले. 'भक्तीच्या सौदागरास संदेश' या पुस्तकातील भरकटलेल्यांना दिशा याविषयी दिलेला अंश स्वतः वाचत असल्याचा बहाणा करून माझ्या कानावर घालण्याविषयी सासऱ्यांनी माझ्या पत्नीला समजावून सांगितले. तिनेही तसे केले. भरकटलेल्यांना दिशा याविषयी वाचल्यावर जर परमात्म्याची कृपा झाली, तर मीही पूर्णपणे बरा होऊ शकतो, असे मला वाटू लागले. जगण्याविषयी आलेले नैराश्य जाऊन उत्साह वाढला. सर्व पुस्तक मी मन लावून वाचले. माझे सासरे बरवाला येथील सतलोक आश्रमात जाताना नेहमी माझ्या पत्नीला फोन करून सांगत होते. परंतु काही महिन्यांपासून मी माझ्या सासऱ्यांबरोबर बोलणेच काय, फोन करणेही बंद केले होते. त्या दिवशी मात्र माझ्या सासऱ्यांना मी स्वतः फोन केला आणि 'भक्तीच्या सौदागरास संदेश' (सध्याचे ज्ञान गंगा) हे पुस्तक पूर्णपणे वाचले आहे. आता सगळ्या गोष्टी माझ्या ध्यानात येत आहेत. माझ्या हातून चूक होत होती. तुम्ही मला क्षमा करा. पूज्य गुरुदेवांकडे माझ्यासाठी क्षमा मागा. मीही त्यांना शरण येईन, असे सांगितले. आश्रमातून परतल्यावर ते मला भेटायला आले. त्याही परिस्थितीत बरवाला येथील सतलोक आश्रमात घेऊन जाण्यासाठी मी त्यांच्याकडे आग्रह धरला. परंतु डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे तीन महिने जाण्यास त्यांनी मला मज्ज्ञाव केला.

या घटनेपूर्वी मी पलंगावर कूस देखिल बदलू शकत नव्हतो. परंतु आता मी कूस बदलू

शकत होतो. तीन महिन्यांनंतर मी उठून बसलो. दोन व्यक्तींच्या आधाराने उठून उभा राहिलो. परंतु माझे दोन्ही पाय सुजले आणि संपूर्ण शरीरात असह्य वेदना येऊ लागल्या. डॉक्टरांनी सांगितले की, अजून किमान आठवडाभर कळा येतच राहतील. त्यानंतर कळा कमी येत जातील. स्थानिक डॉक्टरांनी सांगितले की, तुला वर्षभर पट्टा लावावा लागेल आणि जास्त हिंडू-फिरू शकणार नाहीस. अवजड वस्तू उचलून चालणार नाही. दुचाकीवर बसून चालणार नाही. जेव्हा माझे सासरे मला बरवाला येथे नेण्यासाठी आले, तेव्हा सर्वांनी त्याला विरोध केला. अजूनही हाड जुळले नसल्यामुळे काठमांडू येथील आणि स्थानिक डॉक्टरांनी जाण्यास मज्ज्ञाव केला. बसमधून जाण्याचा धोकाही पत्करू नको, असे सांगितले. वाटेत काही अघटित घडले तर आयुष्यभर स्वतःला क्षमा करू शकणार नाहीस. परंतु सासरे म्हणाले की, सतगुरुदेव विस्कटलेली घडी पुन्हा बसवतात, मग हाडाची चिंता कसली आणि सतगुरु रामपालजी महाराजांनी तर तुम्हाला घेऊन येण्याचा आदेशच दिला आहे. त्यामुळे मी सतगुरु रामपालजी महाराजांकडे जाण्यासाठी घरातून बाहेर पडलो. दोन व्यक्तींच्या आधाराने बसमध्ये चढलो. पुढे रेल्वे आणि जीपने प्रवास करत बरवाला येथील आश्रमात पोहोचलो. सद्गुरूंच्या कृपेने वाटेत कोणतीही अडचण आली नाही. सतलोक आश्रमात गेल्यानंतर मी नामदीक्षा घेतली. आश्रमात सतगुरुदेवांचे प्रथमच दर्शन घेतले आणि त्यांचा आशीर्वाद मिळताच सर्व वेदना नाहीशा झाल्या. त्यापूर्वी माझे जे वर्तन होते, त्यासाठी मी हमसून-हमसून रडत क्षमा मागू लागलो. परंतु पूज्य गुरुदेव म्हणाले की, बेटा, मी तुला केव्हाच क्षमा केली आहे. जे झाले ते विसरून भतिमार्गाला लाग. रात्री प्रातःविधीला जायची वेळ आली तेव्हा स्वतः स्वच्छतागृहात जाऊन बसू शकलो. रेल्वेने प्रवास करताना मला हे शक्य झाले नव्हते. मी पँट घालू शकत नव्हतो. परंतु आश्रमात गेल्यावर माझ्या पायांची सूज उतरली आणि स्वतः पँट घालू शकलो. आश्रमातून बाहेर पडताना मी पूज्य गुरुदेवांकडे मला मोटारसायकल चालवता यावी, अशी याचना केली. गुरुदेव म्हणाले की, बेटा, भरपूर फिरव, आता सर्वकाही ठीक झाले आहे. पाचव्या दिवशी घरी पोहोचलो आणि मोटारसायकल चालवू लागलो. गावातील सर्व जण आश्चर्यचकित झाले. आता मी पूर्णपणे तंदुरुस्त झालो होतो. माझ्या पत्नीने पूर्वीच नामदीक्षा घेतली होती आणि ती नियमित नामजप करत होती, त्यामुळे मला लकवा मारला नाही आणि माझा मृत्यू टळला, हे मला आता उमजून आले.

आता मी पूर्णपणे ठीक आहे. ३५-४० किलोचे वजन उचलणेही मला अवघड वाटत नाही. माझा संपूर्ण परिवार सतगुरुदेवांकडून नामदीक्षा घेऊन सुखी झाला आहे. व्यापार-उद्योगही पहिल्यापेक्षा चांगला चालला आहे. माझी भरभराट पाहून मिचैंया येथील अनेक दुःखी लोक सतगुरुदेवांकडून नामदीक्षा घेऊन सुखी होत आहेत. प्रिय वाचकहो, सतगुरु रामपालजी महाराजांना केवळ रामपालजी समजण्याची चूक करू नका. ते तर साक्षात पूर्णब्रह्म कबीर परमेश्वर आहेत. कबीर साहेबांची वाणी आहे-

कबीर, पाँच सहंस अरू पाँच सौ, जब कलयुग बित जाय।  
महापुरुष फरमान तब, जग तारन को आय ।।

**कबीर सागर कबीर वाणीमध्ये पान नं. १३६-१३७ वर वाणी आहे की :-**

द्वादश पंथ काल फुरमाना।  
भूले जीव न जाये ठिकाना ।।  
बारहवें पंथ प्रगट होवै वानी।

शब्द हमारे की निर्णय ठानी ।।
बारहें पंथ हमही चलि आवैं।
सब पंथ मिटा एक ही पंथ चलावै ।।

**प्रिय वाचकहो! शेवटी विनंती एवढीच आहे की, श्री सतलोक आश्रम, चंदीगढ रोड, बरवाला, हिसार येथे बंदिछोड सतगुरु रामपालजी महाराजांकडून मोफत नामदीक्षा घेऊन आपले जीवन सफल करा, आनंदमय जीवन जगा आणि जन्म-मरणाच्या फेऱ्यातून सुटका करून घेऊन मोक्ष प्राप्त करा.**

**सतगुरुदेवजी की जय।**
**विनीत,**
**भक्त हरिगोविंद दास,**
**मिचैंया-३, सिरहा, नेपाल**
**+ ००९७७-९८०४७६६७५५,**
**+ ००९७७-९८४२८३६८७७**

**ओ३म्**

**सच्चिदानन्दायेश्वराय नमो नमः**

# भूमिका

सत्यार्थप्रकाश को दूसरी वार शुद्ध करके छपवाया है क्योंकि जिस समय मैंने यह ग्रन्थ **'सत्यार्थप्रकाश'** बनाया था, उस समय और उससे पूर्व संस्कृतभाषण करना, पठन-पाठन में संस्कृत ही बोलने और जन्मभूमि की भाषा गुजराती थी, इत्यादि कारणों से मुझ को इस भाषा का विशेष परिज्ञान न था। अब इसको अच्छे प्रकार भाषा के व्याकरणानुसार जानकर अभ्यास भी कर लिया है, इस समय इसकी भाषा पूर्व से उत्तम हुई है। कहीं-कहीं शब्द वाक्य रचना का भेद हुआ है, वह करना उचित था, क्योंकि उसके भेद किए विना भाषा की परिपाटी सुधरनी कठिन थी, परन्तु अर्थ का भेद नहीं किया गया है, प्रत्युत विशेष तो लिखा गया है। हाँ, जो प्रथम छपने में कहीं-कहीं भूल रही थी, वह वह निकाल शोधकर ठीक-ठीक करदी गई है।

यह ग्रन्थ १४ समुल्लास अर्थात् चौदह विभागों में रचित हुआ है। इसमें १० दश समुल्लास पूर्वार्द्ध और चार उत्तरार्द्ध में बने हैं, परन्तु अन्त्य के दो समुल्लास और पश्चात् स्वसिद्धान्त किसी कारण से प्रथम नहीं छप सके थे, अब वे भी छपवा दिये हैं।

१२ सत्यार्थप्रकाशः

यद्यपि इस ग्रन्थ को देखकर अविद्वान् लोग अन्यथा ही विचारेंगे, तथापि बुद्धिमान् लोग यथायोग्य इसका अभिप्राय समझेंगे, इसलिए मैं अपने परिश्रम को सफल समझता हूं और अपना अभिप्राय सब सज्जनों के सामने धरता हूं। इसको देख दिखला के मेरे श्रम को सफल करें और इसी प्रकार पक्षपात न करके सत्यार्थ का प्रकाश करना मुझ वा सब महाशयों का मुख्य कर्त्तव्य कर्म है।

सर्वात्मा सर्वान्तर्यामी सच्चिदानन्द परमात्मा अपनी कृपा से इस आशय को विस्तृत और चिरस्थायी करे।

।। अलमतिविस्तरेण बुद्धिमद्वरशिरोमणिषु।।

।। इति भूमिका।।

स्थान महाराणाजी का उदयपुर (स्वामी) दयानन्द सरस्वती

भाद्रपद सम्वत् १९३९

ही प्रतिमा 'सत्यार्थ प्रकाश'च्या भूमिकेसंबंधित विवरणाची आहे.

शंका समाधान :- (१) ज्या काही विरोधी व्यक्ती महर्षी दयानंदची महिमा फुकट ऐकून त्यांनी रचलेल्या 'सत्यार्थ प्रकाश'च्या प्रती विकून उदरनिर्वाह करत होते, ते सांगतात की 'ज्ञान गंगा' पुस्तकातील 'शास्त्रार्थ विषय' या अध्यायात लिहिले आहे की महर्षी दयानंद सन १८८२ (शके १९३९) पर्यंत संस्कृतमध्ये भाषण देत होते. हे योग्य नाही; कारण 'सत्यार्थ प्रकाश'च्या भूमिकेमध्ये स्पष्ट सांगितले आहे की सन १९७४ (शके १९३१) मध्ये सत्यार्थ प्रकाश लिहिले, त्यापूर्वी संस्कृतमध्ये भाषण देत होते. त्यानंतर हिंदी भाषा शिकली.

शंका समाधान :- वर दिलेल्या 'सत्यार्थ प्रकाश' संबंधित प्रतिमेमध्ये महर्षी दयानंद यांनी स्पष्ट केले आहे की जेव्हा 'सत्यार्थ प्रकाश' लिहिले गेले, त्यावेळी मला हिंदी भाषेचे विशेष ज्ञान नव्हते. आता शके १९३९ (सन १८८२) मध्ये उदयपुरात महाराणाजी यांचे उदयपूर (शके १९३९, सन १८८२) भाद्रपद महिन्यात दुसऱ्यांदा छापले, तोपर्यंत महर्षीजींना हिंदी भाषेचे विशेष ज्ञान नव्हते. सन १८८२ मध्ये विशेष ज्ञान मिळाल्यानंतर 'सत्यार्थ प्रकाश' शुद्ध करून छापले. यावरूनही सिद्ध होते की महर्षी दयानंद सन १८८२ (शके १९३९) पर्यंत संस्कृतमध्येच शास्त्रार्थ साांगत होते.

दुसरे कारण म्हणजे जेव्हा दोन विद्वान चर्चा करत होते, तेव्हा ती संस्कृत भाषेत करत होते; कारण सर्व शास्त्र संस्कृत भाषेतच लिहिलेले होते. महर्षी दयानंद त्याचा हिंदी अनुवाद करूच शकत नव्हते; कारण सन १८८२ (शके १९३९) पर्यंत महर्षी दयानंद यांना हिंदी भाषेचे विशेष ज्ञान नव्हते, याचा ते स्वत: स्वीकार करतात. सन १८८३ (शके १९४०) मध्ये महर्षी दयानंद यांचा मृत्यू झाला. यावरून महर्षी दयानंद सन १८८२ (शके १९३४) पर्यंत संस्कृत भाषेतच शास्त्रार्थ सांगत होते आणि त्यांचा जय-पराजय याचा निर्णय ज्यांना संस्कृत भाषा येत नव्हती, ते श्रोते करत होते. त्यामुळे दयानंदसारख्या व्यक्तींना महर्षी म्हटले जात होते, हे

सिद्ध होते.

महर्षी दयानंद आणि कृष्णानंद यांच्यात शास्त्रार्थ व्हायचा, तेव्हा कृष्णानंद यांचा पक्ष दृढ होता. त्यामध्ये कृष्णानंद यांनी श्रीमद् भगवत गीतेच्या चौथ्या अध्यायातील सातव्या श्लोकाच्या आधारे परमात्मा साकार आहे, हे सिद्ध केले होते, 'यदा, यदा, हि, धर्मस्य, ग्लानि: भवति, भारत,------' या श्लोकाचा गीता प्रेस, गोरखपूर येथून प्रकाशित झालेल्या श्रीमद् भगवत गीतेमध्ये पुढीलप्रमाणे अर्थ लिहिला आहे. हे भारत, जेव्हा जेव्हा धर्माची हानी होते आणि अधर्माची वृद्धी होते तेव्हा तेव्हा मी माझ्या रूपाची रचना करतो. म्हणजे साकार रूपात लोकांसमोर प्रगट होतो.

लक्षात घ्या, महर्षी दयानंद विषय बदलून संस्कृत भाषेत बोलत होते आणि संस्कृत भाषा न येणाऱ्या श्रोत्यांनी आपले हसे व्हायला नको म्हणून वेद ज्ञानहीन महर्षी दयानंदला विजयी घोषित केले होते. महर्षी दयानंद तर असा विजयी झाला होता, जसा एका जमीनदाराचा मुलगा इयत्ता सातवीमध्ये शिकत होता. बाकीचे वर्णन या पुस्तकाच्या पान नं.२५७ वर वाचा.

**Note :- For circulation amongst like minded person only** ❑❑❑